# मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना



संपादक

डॉ. भास्कर शेळके

AGASTI LIBRARY, AKOLE

DN4011

LIBRARY AKOLE 422601 AGASTI ARTS, COMMERCE & DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE

# मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना

पुस्तक जपून वापरावे.

AGASTI LIBRARY, AKOLE

DN4012

संपादक

डॉ.भास्कर शेळके

सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

Agasti Arts, Commerce & Dadasaheb Rupwate
Science College, Akole, Dist. Ahmednagar
LIBRARY DONATION
Acc.No. DN 4012
Price 460/- Dt. 29/8/2023

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

891.46309
SHE
DN 4012

# Marathi Dalit Gramin Kadmbari Tulana

## मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना

संपादक : प्रा.डॉ.भास्कर शेळके

© डॉ.अविनाश भास्कर शेळके
मो.नं.९८९०६८६५२१

**प्रकाशक :**
सौ.तारादेवी भास्कर शेळके
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता.जुन्नर,
जिं.पुणे. ४१० ५०२
मो.नं.९८२२४४८१८१

**प्रकाशन क्रमांक ३**

**प्रथमावृत्ती : २६.७.२०१३**

**मुखपृष्ठ :**
**प्रा.विनायक पारे,** बारामती

**अक्षर जुळणी :**
**श्री.गणेश उर्फ देवव्रत दाजीराम बागल**
बालाजी एंटरप्रायजेस, मंचर (पुणे)

**मुद्रक:**
न्यू भारत प्रिंटर्स, पुणे

मूल्य : रु.४६०/-

ISBN No.: 978 - 81 - 924997 - 2 - 7

DADASAHEB RUPWATE ... LIBRARY AKOLE 422601 DIST. AHMEDNAGAR

## ◆ अर्पण पत्रिका ◆

जुन्नर तालुक्याचे भाग्यविधाते
जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थापक अध्यक्ष
माजी आमदार सहकार महर्षी
**कै.दादासाहेब तथा शिवाजीराव काळे साहेब**

यांना सविनय...

**डॉ.भास्कर शेळके**

DADASAHEB RUPWATE ... LIBRARY AKOLE 422601 AHMEDNAGAR

# ◆ मनोगत ◆

'मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना', या विषयावर श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि.पुणे येथे दोन दिवसांचे दि. २६ व २७ जुलै २०१३ रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या विषयावर अनेक नामवंत अभ्यासक, प्राध्यापक, संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. त्या शोधनिबंधाचा संदर्भग्रंथ करावा असे अनेक अभ्यासकांना वाटले. म्हणूनच 'मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना' हा ग्रंथ आज सिद्ध होत आहे. या संदर्भग्रंथात अनेक मान्यवर अभ्यासक संशोधकांनी वेगवेगळ्या विषयावर अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केलेले आहेत. सदर शोधनिबंधात व्यक्त झालेली मते ही संबंधित लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्यामुळे हा ग्रंथ अधिकाधिक वस्तुनिष्ठ होण्यास मदतच झाली आहे. या सर्व शोधनिबंध लेखकांबद्दल संपादक या नात्याने कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे परम कर्तव्य समजतो.

ग्रंथ प्रकाशन कामी संस्थेचे अध्यक्ष मा.ॲड.संजय शिवाजीराव काळे यांनी प्रोत्साहन दिले, तसेच त्यांचे सर्व सहकारी विश्वस्त व अध्यक्ष प्रतिनिधी, मा.प्राचार्य डॉ.कांतिलाल पुराणे, मा.उपप्राचार्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि हितचिंतक मित्रांनी सहकार्य, मार्गदर्शन केले. प्रोत्साहन दिले. विनायक पारे, बारामती यांनी मुखपृष्ठ तयार करून दिले. तसेच मुद्रक न्यू भारत प्रिंटर्स, पुणे व टंकलेखक श्री.गणेश उर्फ देवव्रत दाजीराम बागल (बालाजी एंटरप्रायजेस, मंचर) यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

संपादक

**डॉ.भास्कर शेळके**

सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख

श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

# ◆ प्रस्तावना ◆

'मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना', हा समीक्षणात्मक आणि संशोधनात्मक ग्रंथ रसिक वाचकांच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. १९६० नंतर प्रस्थापित मराठी साहित्यात अनेकविध प्रवाह सामील झाले. या प्रवाहांमध्ये दलित आणि ग्रामीण या दोन प्रवाहांचे अनन्य साधारण महत्त्व आहे. या प्रवाहांनी समग्र मराठी साहित्याला नवसंजीवनी प्राप्त करून दिली. मराठी साहित्याला आलेले मरगळलेपण नष्ट केले. या ग्रंथाचे अवलोकन व मूल्यमापन करत असताना काही महत्त्वाचे निष्कर्ष हाती आले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. दलित ग्रामीण कादंबरीकारांनी वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी लेखन केलेले आहे.

२. दलित ग्रामीण कादंबरीकारांनी समाजव्यवस्थेला आत्मभान, आत्मजाणीव आत्मशोध घेण्यास प्रवृत्त केले. नागर जीवनापेक्षा दलित ग्रामीण समाजव्यवस्थेचे जीवनानुभव हे वैशिष्ट्यपूर्ण असेच आहेत.

३. दोन्ही प्रवाहांना म.फुले, डॉ.आंबेडकराच्या विचारधारेची वैचारिक बैठक लाभली आहे.

४. या वैचारिकतेमुळे हे दोन प्रवाह सामान्य माणसाच्या शोषणमुक्तीचा जाहीरनामा ठरलेले आहेत. या दोन प्रवाहांनीच अगदी पहिल्यांदा सर्वसामान्य माणूस साहित्याच्या केंद्रस्थानी आणला. त्याच्या मूख भावभावनांना हुंकार प्राप्त करून दिला. म्हणूनच हे दोनही प्रवाह वेगळे आणि उठावदार असेच ठरतात.

५. दोन्ही प्रवाहात रंजनप्रधान कादंबरीदेखील विपुल प्रमाणात निर्माण झाली आहे.

६. दलित कादंबरीतून वेदना, विद्रोह, नकार यांचे प्रतिबिंब दिसते तर ग्रामीण कादंबरीतून शोषण प्रतिबिंबित होते.

७. दलित ग्रामीण कादंबरी प्रारंभी प्रमाणभाषेला जवळ गेलेली दिसते. अलीकडील कादंबरी निवेदन संवादासाठी बोली केंद्रस्थानी ठेवताना दिसते.

८. शेतावर राबणारा व गावकुसाबाहेरचा दुर्लक्षित समाज साहित्याच्या

केंद्रस्थानी आला. त्यांच्या भावभावना कादंबरीकारांनी अधोरेखित केल्या.

LIBRARY

९. मानवतेचे शिकवण या कादंबऱ्या देतात आणि माणुसकी हे मूल्य शिरोधार्य मानतात.

१०. काळानुरूप विषय विविधता हे दलित आणि ग्रामीण कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ठ ठरते.

११. दलित ग्रामीण कादंबरीने मनोरंजनाबरोबरच समाजाचे दुःख, दारिद्रय वेदना मनाचा हुंकार, समस्या, व्यथा, शोषण चित्रित केले आहे. साहित्यातील विषयांची कोंडी फोडली आहे. शिक्षण प्रसारामुळे संवेदनाक्षम मनाचा हुंकार आविष्कृत झाला.

१२. दलित ग्रामीण जीवन प्रारंभी मध्यमवर्गीय लेखकांनी चित्रित केले, त्यात उपरेपणा किंवा सानुकंपा दिसते, ती अयोग्य वाटते.

१३. प्रारंभीच्या दलित ग्रामीण कादंबरी म. गांधीच्या विचार प्रभावातून आलेली दिसते, पण खरी वैचारिक बैठक म.फुले डॉ.आंबेडकरच असलेली दिसते.

१४. दलित कादंबरीपेक्षा ग्रामीण कादंबरी विपुल असलेली दिसते, त्याचे कारण दलित आत्मकथनांचे अनुकरण असे दिसते.

१५. दलित ग्रामीण कादंबरीने मराठी कादंबरीचा आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने चेहरा मोहरा बदलून टाकला.

१६. सामाजिक बांधिलकी प्रकटकरणाऱ्या कादंबऱ्यांनी दारिद्रयाचे, अन्याय, अत्याचार, उपासमार, शोषणावर भर दिंला. शेतकरी, शेतमजूर, भटके, विमुक्त, तमासगीरांचे दुःख मुखर केले. भूक आणि गरिबी यांचे चित्रण दलित ग्रामीण कादंबरीतून समर्थपणे येते. म्हणूनच दलित ग्रामीण कादंबरीमुळे मराठी साहित्य समृद्ध झाले.

१७. दलित चरित्रात्मक कादंबरी संख्येने कमी असलेली दिसते. तसेच आत्मचरित्रात्मक ग्रामीण कादंबरीही मर्यादितच आहे. पण चरित्रात्मक ग्रामीण कादंबरी नाही. मात्र दलिंत ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण अपरिहार्यपणे आले आहे.

१८. चळवळीचे चित्रण करणारी दलित कादंबरी संख्येने कमी असली तरी ग्रामीण कादंबरीतून चळवळीचे चित्रण अभावानेच येते.

१९. दलित ग्रामीण कादंबरी संशोधक समीक्षकांनी उपेक्षाच केली. अर्थात याला काही सन्माननीय अपवाद आहेतच.

२०. स्त्रीलेखिकांच्या दलित कादंबऱ्या नाहीत. उलट ग्रामीण लेखिकांच्या कादंबऱ्या मर्यादित असल्या तरी आहेत.

२१. दलित ग्रामीण कादंबरीकारांनी विविध मान्यताप्राप्त पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. काही कादंबऱ्यांचे अन्यभाषेत भाषांतर झाले. दलित ग्रामीण कादंबऱ्यावर चित्रपट निघाले.

सारांश दलित आणि ग्रामीण कादंबरी लेखकांचा मूळ हेतू शोषण विरहित समाजाची निर्मिती करणे आणि शोषणाधिष्ठित समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे हाच आहे. हा ग्रंथ विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक यांना मार्गदर्शक ठरेल असाच आहे. रसिक वाचक या ग्रंथाचे स्वागतच करतील. अशी मला आशा वाटते.

* * *

## ◆ अनुक्रमणिका ◆


| | | |
|---|---|---|
| १. | ग्रामीण दलित कादंबरीः तुलनात्मक संस्कृती मीमांसा<br>*-डॉ.आनंद पाटील* | १३ |
| २. | 'तुलनात्मक साहित्यः परंपरा व साहित्य संशोधनाची नव संधी'<br>*-डॉ. राहुल पाटील* | ३५ |
| ३. | तौलनिक साहित्य संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये<br>*-प्रा. नंदा कराड* | ४१ |
| ४. | तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व दलित, ग्रामीण कादंबरी<br>*-प्रा.अपर्णा पाडे* | ४६ |
| ५. | दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्याचा तौलनिक विचार<br>*-डॉ.शशिकांत साळवे* | ६१ |
| ६. | 'ग्रामीण' आणि 'दलित' साहित्य : काही साम्यभेद<br>*-डॉ.नानासाहेब सूर्यवंशी* | ६५ |
| ७. | दलित - ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास<br>*-प्रा.सुनिता पावडे* | ७० |
| ८. | ग्रामीण व दलित कादंबरी तौलनिक अध्ययन<br>*-प्रा. गणेश मालटे* | ७५ |
| ९. | ग्रामीण व दलित कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास<br>*-प्रा. राजाराम प्रभाकर गावडे* | ८१ |
| १०. | 'ग्रामीण - दलित कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास : स्वरुप व दिशा'<br>*-डॉ. रमाकांत कराड* | ८७ |
| ११. | मराठी ग्रामीण व दलित कादंबरीः एक तुलनात्मक अभ्यास<br>*-डॉ.प्रवीण ससाणे* | ९२ |
| १२. | ग्रामीण-दलित कादंबरीः तुलनात्मक अभ्यास<br>*-डॉ.धनंजय वाघमारे* | ९९ |
| १३. | ग्रामीण व दलित कादंबऱ्यातील राजकीय स्थित्यंतराचा तौलनिक परामर्श<br>*-प्रा. डॉ. सीताराम निघूट* | १०३ |
| १४. | मराठवाड्यातील ग्रामीण दलित कादंबरी तौलनिक समीक्षा<br>*-प्रा. डॉ. नवनाथ चौधरी* | १०६ |
| १५. | एकविसाव्या शतकातील दोन ग्रामीण कादंबऱ्या : 'जमीन' आणि 'बोडखी'<br>*-डॉ.कीर्ती मुळीक* | ११४ |
| १६. | 'तहान' व 'सूड' या कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास<br>*-प्रा. माया तानाजी शिंदे* | १२२ |

१७. 'हकिकत आणि जटायू', 'जातवन':
या कादंबरीमधील दलित जीवनाचा वेध १२९
*-प्रा.केतकी भोसले*
१८. दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास: १३३
मेलेलं पाणी आणि गोतावळा
*-डॉ.विजया पाटील*
१९. झाडाझडती आणि अस्वस्थनायक तुलना १३९
*-प्रा.लता पवार*
२०. २००० नंतरच्या ग्रामीण व दलित कांदबरीतील नायकांच्या संघर्षाचे
चित्रणः(बारोमास व राघववेळ) १४७
*-प्रा.मीरा देठे*
२१. २००० नंतरचे पाडा व कटुसत्य कादंबरीचा सामाजिक व राजकीय तुलनात्मक
अभ्यास १५३
*-प्रा. डॉ. शारदा मोरे*
२२. दलित-ग्रामीण कादंबरीतील संघर्षमय जीवन सांगणाऱ्या अनुक्रमे कोंडी (बाबुराव
बागूल) व पाचोळा (रा. रं. बोराडे) १६१
*-डॉ.सौ.उज्ज्वला देवरे*
२३. हाल्या हाल्या दुधू दे! (बाबाराम मुसळे) व श्राद्ध (उत्तम कांबळे)
समाजवास्तव व राजकारणाचा बळी ठरणाऱ्या दोन अस्वस्थ १७२
नायकांची शोकांतिका
*-प्रा. अनिता तायडे*
२४. बनगरवाडी व फकिरा या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास १७८
*-डॉ.किशोर सोनवणे*
२५. दलित आणि ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास १८३
('त्रिशंकू'आणि 'मेड इन इंडिया')
*-प्रा. कल्पना गावडे*
२६. फकिरा व गोतावळा या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास १९३
*-प्रा. संदीप भास्कर पाटील*
२७. चौथी क्रांती व तणकट या दोन कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास १९७
*-प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर*
२८. आमदार सौभाग्यवती व 'सभापती' या कादंबऱ्यातील राजकारणाचा
तुलनात्मक अभ्यास २०१
*-डॉ. अनिल गर्जे*
२९. दलित ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचे चित्रण : तौलनिक विचार २०५
*-डॉ.भास्कर शेळके*

३०. मराठी ग्रामीण आणि दलित निवडक कादंबऱ्यांतील स्त्रीचित्रणांचा तौलनिक अभ्यास २१३
*-डॉ.संगीता नरेंद्र लांडगे*

३१. ग्रामीण आणि दलित कांदबरीतील स्त्री चित्रण : एक तौलनिक अभ्यास २२०
*-डॉ.नवनाथ येठेकर*

३२. ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्रियांचे प्रश्न : तुलनात्मक अभ्यास २२४
*-प्रा. सौ. मंगल डोंगरे*

३३. ग्रामीण व दलित कांदंबरीतील स्त्रियांचे चित्रण २२८
*-प्रा.मनिषा कांबळे (बनसोड)*

३४. ग्रामीण कादंबरी 'इथे मुलांना मरण जन्मता' व 'चक्री' मधील स्त्रीचित्रणाचा तुलनात्मक अभ्यास २३३
*-प्रा.निशा भंडारे*

३५. ग्रामीण व दलित साहित्यातील स्त्रीजीवन २४३
*-प्रा.भाऊसाहेब गव्हाणे*

३६. 'निवडक दलित-ग्रामीण कादंबरीतील देवदासी प्रथेचे आर्त चित्रण' २४८
*-डॉ.एन.डी.पवार*

३७. ग्रामीण व दलित कादंबरीतील स्त्रियांची भाषा २५३
*-डॉ. सुनंदा थोरात*

३८. चळवळ व ग्रामीण दलित कादंबरी २६०
*-प्रा. उमा उत्तम कांबळे*

३९. ग्रामीण साहित्य चळवळीत कादंबरीचे योगदान २७१
*-प्रा. संदीप चपटे*

४०. दलित-ग्रामीण साहित्य चळवळ एक तुलनात्मक विचार २७३
*-प्रा. डॉ. जया जितेंद्र कदम*

४१. मराठी कादंबरीतील राजकारण संदर्भ आणि सहकार चळवळीचे प्रतिबिंबः एक विवेचन अभ्यास २८०
*-डॉ.मधुकर मोकाशी*

४२. दलित आणि ग्रामीण साहित्यः लेखिकांच्या कादंबरीचा अभाव कारणमीमांसा २८४
*-डॉ.प्रतिमा इंगोले*

४३. रंजनवादी/रंजनप्रधान दलित, ग्रामीण कादंबरी २९६
*-डॉ.भास्कर शेळके*

४४. ग्रामीण आणि दलित कादंबरीतील सामाजिकता एक तुलनात्मक अभ्यास ३०१
*-डॉ. अपर्णा साबणे*

४५. ग्रामीण दलित कादंबरी आणि समाजपरिवर्तन ३०७
*-डॉ.दत्तात्रय गंधारे*

४६. 'दलित, ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता' ३१३
*-प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे*
४७. ग्रामीण व दलित कादंबरी - समाजशास्त्रीय आकलन ३१९
*-डॉ. सुभाष आहेर*
४८. इंग्रजी वाङ्मयातील दलित ग्रामीण कादंबरीतील व्यथा ३२६
*-प्रा.चंद्रकांत मंडलिक*
४९. १९८० नंतरची ग्रामीण व दलित कांदबरी ३३१
*-प्रा.एस.बी.रणदिवे*
५०. १९८० नंतरची दलित व ग्रामीण कादंबरी ३४१
*-प्रा.देविदास शेटे*
५१. मराठी दलित व ग्रामीण कादंबरीतील बदलत्या जीवनाचे चित्रण ३४५
*-डॉ.बाळासाहेब दिघे,*
५२. दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा ३५२
*-डॉ. सारीपुत्र तुपेरे*
५३. दलित, ग्रामीण जाणिवेचे कादंबरीकार : माधव कोंडविलकर ३६०
*-प्रा.सौ.दीपा कुलकर्णी*
५४. अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील ग्रामीण आणि दलित जाणिवा ३६५
*- प्रा.राजेश्वर दुडूकनाळे*
५५. कादंबरी एक वाङ्:मय प्रकार ३७०
*-प्रा.सुभाष अडावतकर*
५६. दलित कादंबरी : संकल्पना व स्वरूप ३७६
*-प्रा. सुहास निर्मळे*
५७. दलित साहित्य ३८२
*-डॉ.चंद्रकांत रूद्राक्ष*
५८. समकालीन वास्तव व मराठी कादंबरी/ *-डॉ. गणेश मोहिते* ३८८
५९. ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता सद्यस्थिती आणि उपाय ३९७
*-प्रा. दीपक बोचरे*
६०. दीक्षाभूमी : सामाजिक, धार्मिक, साहित्यिक चळवळीचे प्रेरणास्त्रोत ४०१
*- डॉ.भास्कर शेळके*
६१. ग्रामीण व दलित कादंबरीलेखनातील स्त्री साहित्यिकांच्या
अत्यल्प योगदानाचा स्त्रीवादी मागोवा/–प्रा. शोभा नितर ४०५
६२. 'चारापाणी' व 'झावळं' या कादंबऱ्यांचा : एक तुलनात्मक विचार ४१२
*–डॉ. उगले ए. बी.*
६३. समस्याप्रधान दलित ग्रामीण कादंबरी/*प्रा.बाळासाहेब वामनराव सोनवणे* ४१८
६४. ग्रामीण दलित कांदबरीतील स्त्री चित्रण/*डॉ. दिलीप अलोणे* ४२९

# ग्रामीण दलित कादंबरी : तुलनात्मक संस्कृती मीमांसा

प्रा. डॉ. आनंद पाटील

प्रस्थापित साहित्याच्या कल्पना टाकून मराठी पंडितांनी बाहेरच्या जगाकडे चिकित्सक दृष्टीने बघायला हवे. ब्रिटिश संभ्यतेचे श्रेष्ठत्त्व लंडनमधील ब्रिटिश म्युझियममध्ये प्रत्यक्ष जाऊन पाहिल्याशिवाय कळणार नाही. विद्यापीठातील पंडितच तेवढे विद्वान आहेत हे मत फार चुकीचे आहे.... डॉ. रवींद्रनाथ टागोर, श्रीपतराव शिंदे, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे आदी साहित्यिक महाविद्यालयात तयार झाले नाहीत. हरी नारायण आपटेंनी कांदबऱ्या लिहिण्याची कला कोणत्या विद्यापीठात अवगत केली? या सर्वांचे साहित्य संसाराच्या जिवंत संघर्षातून जन्माला आले. तेजस्वी साहित्यिक विक्रमसिंह समाजात अगदी खालच्या तळात विखुरले आहेत. त्यांना संधी प्राप्त करून देणे व त्यांना दारिद्र्याच्या गाळातून वर काढणे शासनाने आपले कर्तव्य मानले पाहिजे. या भाषणाने डॉ. पंजाबराव देशमुखांनी संपूर्ण साहित्य संमेलन प्रभावित केले. वीर उत्तमराव मोहिते जागतिक कृषकक्रांतीचा विधाताः लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, अमरावती : मराठा विज्ञान मंदिर १९८३, १९८४.

१९३२ साली कोल्हपूरात भरलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून आद्य तुलनाकार, धर्ममीमांसक, बॅरिस्टर, घटना समिती सदस्य मंत्री डॉ.पंजाबराव शामराव देशमुख यांनी केलेल्या भाषणातील एक मुद्याचा सारांश चरित्रकाराने वरील प्रमाणे दिला आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेसने १९३३ मध्ये प्रकाशित केलेला The Origin and Development of Releligin in Vedic Literature हा डी. फिल. चा तुलनात्मक प्रबंध पाऊण शतक उपेक्षित राहिला. त्याची विज्ञानवादी तौलनिक मांडणी ग्रामीण साहित्याला भक्कम तात्त्विक बैठक पुरवणारी होती. परंतु फर्ग्युसनमधील त्यांचे कनिष्ठ समकालीन १९३० च्या दशकात बा.सी. मर्ढेकरांच्या रूपात पहिल्या महायुद्धानंतर ॲंग्लोमेरिकी विद्वानांनी सांस्कृतिक साम्राज्य जगावर टिकवण्यासाठी 'सौंदर्यानुभव आणि विश्वसाहित्या' संबंधी आखलेल्या महाप्रकल्पाचे वाहक

बनले. चार वर्षे इंग्लडमध्ये वास्तव्य करून कुठलीही पदवी न मिळालेला हा लेखक नवसाहित्य व सौंदर्यशास्त्राचा (आयात) पितामह बनला. उलट तीन वर्षात तीन पदव्या मिळवणारा सामान्य शेतकऱ्याचा पी.एस. देशमुख नावाचा सहा भाषावर प्रभूत्त्व संपादणारा ऑक्सफर्ड स्कॉलर मराठी साहित्य संस्कृतीत उपेक्षित राहिला. हेच आज ग्रामीण व दलित साहित्याच्या मृत्यूचे खरे कारण आहे. हे त्यांच्या वरील भाषणातील पुढील विचार पाहिल्यास लक्षात येईल.

जगाच्या उत्पत्ती संबंधी गृहीत धरलेल्या अद्वैताच्या अमानुष कल्पना हेच मराठी साहित्याच्या अधःपतनाचे खरे कारण आहे. मानवी भावना, संवेग, उपजत प्रेरणा आणि मानवी संसार हे काव्याचे विषय टाकून भारतीय मन आपौरुषेय विश्वात विहार करायला लागलं. म्हणूनच भारतीय वाङ्मयानं मानवी मनाचा ठाव घेणं बंद केलं. भौतिक संसारातील वास्तविक समस्यावर भारतीय साहित्यिक आपले लक्ष केंद्रित करीत नाहीत. तोपर्यंत आमच्या साहित्याचा विकास होत नाही. पायाखालची जमीन सोडून केवळ आकाशातील काल्पनिक शक्तीवर श्रद्धा ठेवलेले अभंग, ओंव्या व आर्या रचने मानवी उद्धाराचे साहित्य नव्हे. खरे काव्य मानवी संसार व व्यवहार यात आहे. प्रत्यक्ष संसारातील वास्तविक सुख-दुःखाची उकल समाजाला दाखवून द्या. म्हणजे तुमच्या उद्धाराचा जिवंत प्रवाह तुमच्या वाङ्मयातून वाहू लागेल (१९४)

हा शिंदे-देशमुखी ठाकरी प्रवाहच करवीर राजर्षी शाहूंचे जन्मस्थान कागलकडील आनंद जकाते-यादव हे मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राच्या आंतरराष्ट्रीय नव वसाहतवादी त्सुनामीत सापडल्याने पूर्णपणे लोप पावला. त्याला दुहेरी वसाहतवादाने गिळून टाकले. वर उल्लेखिलेल्या महाप्रकल्पामधून आयसीएसच्या अभ्याक्रमातील "द प्रेझेंट" या पेपरामुळे व २० गुणासाठी चार वर्षेकाव्यलेखन कार्यशाळेत हजेरी लावल्यामुळे मर्ढेकरः तौलनिक संस्कृती मीमांसामध्ये केली आहे. "ब्रिटिश म्युझियम" मध्ये जाऊन तुलनात्मक अभ्यास न केल्याने 'अज्ञानाचे उत्पादन' मराठीत प्रचंड प्रमाणावर झाले आहे. खुद्द मर्ढेकरांनी "रात्रीचा दिवस" करून संज्ञाप्रवाही तंत्र जेम्स जॉईसचे बोट पकडून मराठील आणण्याचा प्रयत्न केला. पण फार प्रतिकाराला कंटाळल्यावर तांबडी माती व पाणी सैनिक भरतीच्या साम्राज्यवादी प्रचारासाठी ग्रामीण जीवनावर लिहिल्या. ग्रामीण पात्रांवर संज्ञा प्रवाही तंत्र लादणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी त्या कांदबऱ्याच्या संहितातच म्हटले आहे. असे असूनही ग्रामीण कथा-कादंबऱ्याच्या गोतावळ्यात

मनोविश्लेषणाची 'मळणी' एवढी वाढली की आज त्यांच्या संदर्भहीन पालापाचोळा झाला आहे. हा विरोधाभास का निर्माण झाला? ह्याचा उलगडा देशमुख व त्यांचे गुरू फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य वासुदेवराव बळवंत पटवर्धन यांच्या तुलनात्मक दृष्टिकोनातून विश्वसाहित्याचे संदर्भ लक्षात घेऊन केला तरच नीट होऊ शकतो. हे भान यावे म्हणून पटवर्धनांनी मराठी साहित्याच्या इतिहासात समकालीन अभ्यासक्रमातील इंग्रजी ग्रंथ व त्यांचे मराठी साहित्य व भाषेवरील परिणाम स्पष्ट करणारे किमान परिशिष्ट जोडावे अशी सूचना साहित्य परिषदेला केली होती. ती फेटाळली गेली. आगरकरवादी पटवर्धनांना नाटक पाहून रात्री परततांना सनातन्यांनी बेदम चोप दिला होता. देशमुखांचा प्रबंध आंधारात राहणे आणि सनातन्यांचा असा कट्टर विरोध या संघर्षाचे मूळ त्यांच्या प्रत्येक भाषणात शोधता येते. उदा. ४ नोव्हेंबर १९३९ रोजी नाशिक येथील मराठा लीगच्या अधिवेशनात बोलताना डॉ. देशमुख म्हणाले, ...

केवळ पूर्वजांच्या पराक्रमाच्या भांडवलावर आपल्या जमातीला यापुढे जगणे शक्य नाही.... येथे जमलेल्या सरदार जहागिरदारांना माझा हा सल्ला रुचणार नाही. ते इंग्रजी सामघजाला मदत करणार असतील तर मी त्यांना त्यापासून परावृत्त करू शकत नाही. पण त्यांना आज महाराष्ट्रातील ही मराठा जमात कोणत्या परिस्थितीत जाऊन पोहचली आहे याचा विचार करायला हवा. या जमातीत दहापाच मराठा संस्थानिक व दहावीस जमीनदार सुखी दिसतील. समुद्रासारखी पसरलेली ही अफाट जमात दुःख, दारिद्र्य, निरक्षरता, देवभोळेपणा, धर्मभोळेपणा, वेडगळपणा इत्यादींनी ग्रासलेली आहे. चालू महायुद्धात ब्रिटिश साम्राज्य सत्तेला सर्वतऱ्हेची मदत करून आमच्या समाजातील हे सारे रोग नाहीसे होणार आहेत का?...(२५८)

ब्रिटिश साम्राज्याच्या पगारपत्रकावर सही करणारे मर्ढेकर, विदर्भात पहिले दलित वसतिगृह काढणारे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना घटना मसुदा समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा अर्ज सहीसाठी पाठवणारे डॉ.देशमुख यांच्या भिन्न भूमिकांतील हे अंमर अँग्लोमेरिकी सौंदर्यशास्त्राच्या महाप्रकल्पाने पार पुसून टाकले. ग्रामीण साहित्याला शाहू-शिंदे सत्यशोधकी वैचारिक बैठक ही दलित साहित्याला आंबेडकरी विचारांचा कणा आहे तशी नाही, अशी बऱ्याच प्रमाणात ''अज्ञान उत्पादक'' विधाने केली जातात. मुळात लॉर्ड बॅबिंटन मेकॉल्ने १८३५ मध्ये 'मिनिटस्' मध्ये मांडलेल्या मडक्याच्या

गाळण्याच्या सिद्धांताप्रमाणे जाती-वर्ण श्रेणीबाबत समाजात पाश्चात्त्य साहित्य व संस्कृती पाझरू लागली. समाज शास्त्रज्ञांनी या जुळ्या प्रक्रियेचे सूत्र मांडले.

आधुनिकरण - इंग्रजीकरण - पाश्चात्यीकरण + संस्कृतकरण ब्राह्मणीकरण = संस्कृतकरण ते व्हर्नॅक्युलर मराठीकरण आणि आजचे ग्लोबल संकरीकरण अशा साहित्याच्या ''जातियीकरणाची'' सविस्तर चर्चा मी (२०१२) अन्यत्र केली आहे. सदाशिवपेठी ३.५ टक्के ग्रामीण, दलित, जनवादी ही नवजातवादी कृत्रिम वर्गवारी जगभरच्या साहित्यात कुठेही आढळत नाही. रंग, वंश व प्रदेश-पंथ वगैरेवर आधारित लेबले चिकटवली जातात. परंतु मर्ढेकर-नेमाडेंचे पश्चिमी बीफीकरण, आंबेडकरवादी यशवंत मनोहरांचे मर्ढेकरीकरण, मर्ढेकरांचे टाळकरी आनंद जकातेंचे यादवी शहरीकरण उर्फ पुणेरीकरण, शरण कुमार लिंबाळेंचे मिश्र ब्राह्मणीकरण, नामदेव चं. कांबळेंचे बीजेपीकरण, बाबुराव गुरवांचे विद्रोहीकरण, राजा शिरगुप्पेंचे चिनीकरण, उद्धव शेळके- शंकर पाटलांचे सदाशिव पेठीकरण, हमीद दलवाईंचे सुफीकरण, माडगूळकरांचे मांसाहरीकरण अशा ''संस्कृती संकरांच्या'' नाना प्रकरांचे विश्लेषण कालबाह्य, आत्मकेंद्री व एकांगी वांझ अस्वादक समीक्षेत सापडत नाही. म्हणूनच भारताला जाती आधारित तुलनात्मक संस्कृती समीक्षेची गरज द्विमुखी (जानसमुखी) साहित्याच्या निरोगीपणासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन मी १९९० च्या दशकता साहित्य अकादमीच्या कानपूर येथील देशीवादावरील चर्चासत्रात केले होते. 'यशवंतराव चव्हाणः जगातील इंग्रजी ग्रंथांनी रचलेला राष्ट्र पुरुष' या ग्रथांतही मी डॉ.देशमुख, डॉ.आंबेडकर, मर्ढेकर आणि यशवंतराव हे वसाहतकाळातील अखेरच्या लढाऊ पर्वाने घडवलेले थोर पुरुष कसे आहेत, हे सविस्तर स्पष्ट केले आहे. यशवंतरावांनी स्वतःची इंग्रजी बोलण्याची 'देशी शैली' कशी घडवली या विषयीची आंतरराष्ट्रीय संदर्भातील मांडणी करताना तेच कृती, उक्ती व वेष यांच्यात मुळीच अंतर पडू न दिलेले, मर्ढेकरी ॲग्लो सौंदर्यशास्त्राच्या महापुरात मुळीच न सापडलेले पाहिजे 'देशीवादी ग्रामीण' लेखक आहेत, याची चर्चा केली आहे. त्यांच्या नंतर मात्र संधिसाधू देशीवाद्यांची संख्या वाढल्याचे दिसते. नवा जात दहशतवाद व भ्रष्टाचारावर २६ जानेवारीला अशिष नंदीचे 'शूद्राती शूद्रांना' जबाबदार धरले. तेच साहित्यात आहे.

अर्थात लेखक, समीक्षक, सिद्धांत, इतिहास, वाद, विचारधारा वगैरे मरण पावल्याचे उत्तराधुनिक जगात मान्य झाले आहे. मग फुले-सावरकर

आंबेडकरवाद, शाहू-महर्षी शिंदे विचारधारणा आज साहित्यात जिवंत आहेत असे का मानायचे? मुळात मराठी कादंबरींचे इतिहास व पुढे नेमाड्यांनी 'रंजन, कृती व बोध' अशी बाळ बोध कालबाह्य मांडणी केलेला दीर्घ निबंध संरचनावाद व उत्तरवासाहतिक सिद्धांताच्या परिभाषेत ''बालिश व निरोपयोगी'' ठरतात. उदाहरणार्थ कुणीही आजवर एडवर्ड सईदच्या तौलनिक उत्तरवासाहतिक परिभाषेत युरोपचे (व सध्या अमेरिकेचे) साम्राज्य व भारतीय कादंबरीचा परस्पर संदर्भ स्पष्ट केलेला नाही. तसे करणे स्थानिक सांस्कृतिक वसाहतवादाला विघातक ठरणारे होते. सबब मराठी ग्रामीण, दलित, जनवादी कादंबरी आणि देशी-विदेशी सांस्कृतिक साम्राज्याच्या संदर्भातच काही तुलना करू. त्या आधी सईदची महत्त्वाची निरीक्षणे आधारासाठी नोंदवू.

आजवर मराठीत कादंबऱ्यांचे ठोकळेबाज वर्गीकरण सामाजिक ऐतिहासिक, पौराणिक किंवा पुढे टोळीने गाजवलेले नेमाडे प्रणीत रंजन, बोध व कृती आधारित विवेचन तुलनाकार एडवर्ड डब्ल्यु सईदच्या मांडणीपुढे मागास व उत्तरवासाहतिक सिद्धांताच्या परिभाषेत बालिश व एकांगी वाटते. कारण त्यात मराठी कादंबरी पाश्चात्त्य साम्राज्यवादी संस्कृतीचेच उत्पादन सर्वार्थाने कसे आहे. या आंतरराष्ट्रीकरण व वसाहतिकरणाच्या संदर्भाचा गंधही त्या चर्चेला नाही. कल्चर ॲन्ड इम्पिरिचालिझममध्ये सईदचे मुख्य सूत्रच पाश्चात्त्य संस्कृती व साम्राज्यच्या वर्चस्वाचा विस्तार करण्याचे साधन म्हणून आधुनिक कादंबरीची मीमांसा करावी हे आहे. परमेश्वराने निवडलेल्या गोऱ्यांनी जगभरच्या गोरेतरांना संस्कृती शिकवण्याचे 'गोऱ्यांचे ओझे' ही संकल्पना नीट समजली तर आधुनिकतावादाच्या भारतीय भाडोत्री दलालांनी व अप्पियाच्या शब्दात निमगोऱ्या-ब्राऊन्सनी इतरेजनांना शहाणे करून सोडण्याची मध्यस्थांची भूमिका कशी पार पाडली हे वालं, दभि, वदि आदि कुलकर्णी व गाडगिळांचे 'नव' कादंबरीवरील लेख वाचल्यास लगेच लक्षात येईल. सईदच्या मांडणीचा भागा कथन हाच (narrative) आहे. वासाहतिकरणांत कथा, कथने व मिथके पसरवण्याला फार महत्त्व असते. त्या कथा कादंबऱ्या वाचूनच वसाहतिकरण झालेले लोक स्वतःची अस्मिता व स्तःच्या अतिस्तत्त्वाच्या इतिहासाचा उपयोग करू लागतात. गोऱ्या साहेबांचे 'ग्रॅन्ड कथन' अंतरंगात मुरवले जाते. तेव्हा बोलविता धनी वेगळाची असते, हे सहज लक्षात येत नाही. म्हणून सईद म्हणतो.

पुढे मुक्तीच्या लढ्याच्या व मानवतेच्या नावाखाली ही कथने वेगवेगळी वळणे घेतात. परंतु 'राष्ट्रच स्वतः कथने आहेत' हा होमी के. भाभाच्या संपादित केलेल्या Nations and Narrations मधील बोलका संदर्भ आपल्या विषयाला अधिक लागू पडतो. कथन दडपणाऱ्या दृश्य-अदृश्य शक्ती कादंबरीतच शोधण्याएवढी आंतरसंहितता मीमांसा प्रगल्भ व्हायला हवी. उद्धव शेळक्यांच्या 'धग' मध्ये बहुसंख्य जाती धर्मांचे प्रातिनिधिक चित्रण येते. ब्राह्मण वर्गाची अनुपस्थिती आहे, इकडे प्राचार्य डबीरबाईंनी बोट दाखवले आहे. पण असे का घडले? शेळक्यांच्या ब्राह्मणांच्याकडे तसेच प्रकाशक, समीक्षक, पुरस्कार सगळेच ब्राह्मणा हाती. हे फक्त तुलनात्मक संस्कृती अभ्यासातील सिद्धांताच्या आधारेच सिद्ध करता येते. थोरल्या शंकर पाटलांची लिंगायत ही जात व त्यांनी केलेला ब्राह्मण विद्यार्थिनीशी विवाह हे 'एक गाव बारा भानगडी' ते 'धिंड' पर्यंतच्या अनेक 'मराठा' पाटलांची प्रतिमा बिघडवणे ही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्यांना मिळालेल्या सन्मानाची सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. 'हिंदू' ग्रामीणही नाही व दलितही नाही.. नेमांड्याच्या चोर वाटा देखील संस्कृती अभ्यासातच- त्याही तौलनिक- उजेडात येतील. शुद्ध ग्रामीण अथवा दलित कादंबरी हे नवजातवादी मिथक नववसाहतवादी आधुनिकतेच्या प्रकल्पाला पोषकच होते. ते किती तकलादू आहे, हे सईदप्रमाणे तुलनाकाराचा वाद्यमेळीच बहुआयामी (contrapuntal) दृष्टिकोन स्वीकारला तरच लक्षात यईल. 'जात' हा घटक गाळला तर दोन्ही लेबले ठोकळेबाज व निरर्थक आहेत असेच म्हणावे लागेल.. एम.एच.अब्राम्स व इतरांच्या सूची मध्येही प्रादेशिक ग्रामीणची चर्चा नाही. दलित 'पर्यायी' सौंदर्यशास्त्र ही दुबळी संकल्पना किती ठिसूळ व अज्ञानमूलक आहे याची कल्पना त्याच्या ग्रंथातील 'प्रतिकार व विरोध' हे प्रकरण वाचल्यास येते. याच्या पुढे जाऊन कॅनडात दलित साहित्याचे अध्यापन करणाऱ्या अरुणप्रभा मुखर्जींचे Aesthetics of Opposition : Writing from the Hyphenated Sapce (1994) अनुवाद करून लेखकानी वाचायला हवे. तरच आंतरराष्ट्रीय युरोमेरिका केंद्रितता ग्रामीण व दलित कादंबरीला कशी पुरून दशांगुळे ठरली आहे आणि कॉम्परॅडॉर (भाडोत्री दलाल वर्ग) वर्ग जगभर पाश्चात्त्य साम्राज्याचा सेवक कसा आहे याचे असंख्य पुरावे मिळतील.

अन्य पूर्ववसाहतीत युरोमेरिकेच्या सांस्कृतिक साम्राज्याला विरोध करणारे प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्र चांगले तयार झाले. भारतात ते तसे तयार न

व्हायला देशी वसाहतवाद व गांधीवादही जबाबदार आहे. अफ्रिकनर्सना हिंसावादी फ्रांज फॅना भेटला. ग्रामीण कादंबरीकारांनी एक ध्यानात घ्यावे. एकूर, कळपी काँग्रेस गवतासारखे तणकट लाथाडतो आणि मस्तीत एकटाच घनदाट अरण्यात हुंदडतो. मादी त्याला शोधत येते पण तो तिच्या मागे कळप करायला कधीच जात नाही. व्यवस्थेचा भाग बदलण्याचा मोह पडायला नको म्हणून जँ पॉल सार्त्रने नोबेल पुरस्कार नाकारला होता. केंद्रातील पुरस्कार हे देखित परिघावरच्या ग्रामीण-दलित वगैरे लेखकाचे नियमन करतात. हे जाळे आंतरराष्ट्रीय आहे म्हणून सईद म्हणतो,

1. AMERICAN ASCENDANCY : THE PUBLIC SPACE AT WAR

Imperialism did not end, did not suddenly become 'past', once decolonization had set in motion the dimantling of the classical empires. A legacy of connections still binds countires like Algeria and India to france & Britain respectively...... (141)

हे मराठी मधील कोणत्याही आधुनिक साहित्य प्रकाराचा विचार आंतरराष्ट्रीय संदर्भ लक्षात घेतल्या शिवाय होऊच शकत नाही. उदा. समग्र प्रादेशिक उर्फ ग्रामीण, दलित वगैरे स्वातंत्र्योत्तर उदय पावलेले नवजातवादी साहित्य संकरित द्विमुखीच आहे. रूपबंध व कथनाच्या 'आवाजा' वरुन अगदी ग्रामीण व दलित साहित्याचे बारशे अमेरिकेच्या पाळण्यात झाल्याचे भरपूर पुरावे मी ''ग्रामीण साहित्याचा उदय आणि विकास : सिद्धान्ताच्या नव्या दिशा'' (२०११) या लेखात मांडले आहेत. आंतरराष्ट्रीय व स्थानिक वसाहतवाद परस्परांत मिसळल्याने साहित्याच्या आंतरराष्ट्रीयकरणात नेमकी फेकाफेकी कशी होत राहिली हे गुलदस्त्यातच राहिले. दोन्ही गटात गॅरेट ग्रिफिथ्स सारखा ॲंग्लोमेरिकी महाप्रकल्पाविरोधी उत्तरवास्तहतिक प्रतपरिभाषित (Counter discourse) व सिद्धांत रचणारा तुलनाकार जन्मला नाही. त्यामुळे मर्ढेकरांची सौदर्यशास्त्रा आडून आलेल्या नवसाहतवाद व सांस्कृतिक फॅसिझम ओळख आधुनिकतेच्या आकर्षक चेहऱ्यामुळे कधीच होऊ शकली नाही. ''आधुनिकतावाद म्हणजेच नववसाहतवादाचे शस्त्रधारी वेषांतर आहे'' हे अशिष नंदीचे सिद्धांतन कळण्याएवढे वाङ्मयीन प्रौढत्त्व व प्रभूत्त्व आजही आस्वाद ॲडिक्टेड आस्वादक समीक्षकांना संपादन करता आलेले नाही. मुळात आस्वादक समीक्षा हेच जातीवर्ण व्यवस्थेतील वर्चस्वाचे साधन कसे आहे याचा उलगडा करणारी

सैद्धांतिक व सांस्कृतिक साक्षरता परिचयाची झालेली नाही. तुलनात्मक संवादी कल्पना शक्तीच वाढली नसल्यामुळे 'बालिश' वर्णनात्मक पातळीवर दोन्ही गटातील कथा-कादंबऱ्याची आस्वादक समीक्षा कोंडीत सापडलेली दिसेल.

या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या पाळण्यात जन्मलेल्या ग्रामीण व दलित साहित्याविषयी नव्याने उदयाला येणाऱ्या या साहित्याच्या विकासाचे सिद्धांतन करताना मी त्या लेखाच्या सुरुवातीला म्हटले होते, ग्रामीण/ दलित/ प्रादेशिक/ नव वगैरे लेबले अस्मितेची जणू चिन्हे बनली. या 'नवजातवादी' उपप्रकारांचा उदय एकाच प्रदेशात/राज्यात, भाषेत पण भिन्न जातीवर्णांच्या उपगटांत व्हावा हा अपघात स्वातंत्र्यानंतर घडला असे म्हणता येत नाही. त्यांना स्वतंत्र, स्वयंभू व स्वायत्त समजले हा वासाहतिक बालिशपणा आणि राष्ट्रीयतेचा पोकळ अभिनिवेश समजला जातो. दलित साहित्याचे प्रेरणास्थान अमेरिकेतील लॅक पँथर्सच्या चळवळी व शिष्यवृत्तीत आहेत. गतशतकाच्या मध्यावर अवतरलेल्या नवता व आधुनिकतेच्या सौंर्यानुभवाचे उगमस्थान पहिल्या महायुद्धानंतर अॅग्लोमेरिकेने आपला जगावरचा साम्राज्यवाद टिकवण्यासाठी तयार केलेल्या 'आधुनिक सौंदर्यशास्त्रीय नवते' च्या प्रकल्पात आहेत.... त्यात 'प्रादेशिकता आधुनिकता वाद' हा अॅग्लोमेरिकी ब्रॅन्ड मराठीला अजून अपरिचित राहिला आहे.... (पाहा शूमेकर)

प्रादेशिक कादंबरी ही ''ब्रिटिश इंडियात'' वसाहतकाळाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या अखेरच्या टप्प्यात पहिल्या महायुद्धानंतर पाश्चात्त्यीकरण झालेल्या मध्यम वर्गात प्रथम आयात झालेली संकल्पना आहे. अमेरिकेत जॉन क्रोवे रॅम्सन Aesthetics of Regionalism प्रादेशिकतेचे सौंदर्यशास्त्र लिहिले. औद्योगिकरणाच्या प्रारंभामुळे ग्राम व्यवस्थेचे प्राचीन ढाचे भारतातही मोडू लागले होते. त्यात गांधीजींनी 'खेडयाकडे चला' म्हटल्याने रविकिरण मंडळाच्या रोमॅन्टिक ग्राम जीवनाच्या कल्पनांना नवे परिमाण मिळू लागले. वसाहतिकरणाच्या पहिल्या दोन टप्प्यात युरोपी 'पॅस्टोरल' घटकांना साहित्यात हळू हळू जास्त जागा मिळू लागली. साहित्य व संस्कृतीच्या वाढत्या आंतरराष्ट्रीयीकरणाबरोबर निर्माण होणाऱ्या आंतरसंस्कृतिवादाची (interculturalism) ही परिणती होती. वर उल्लेखिलेले 'संस्कृतकरण' मागे पडत जाऊन 'इंग्रजीकरणा'चे प्रमाण वरचढ झाले होते. स्वातंत्र्य लढ्यात सामील होणाऱ्या अनेक सांस्कृतिक उपगटांच्या भावनिक व वाङ्मयीन संरचना सामावून घेण्यासाठी 'प्रादेशिक साहित्य' ही

अमेरिकी नव समीक्षेतील नवी संकल्पना सोईची होती. र.वा.दिघे यांच्या 'पाणकळा' ला साहित्य संमेलनात पुरस्कार मिळाला तेव्हा वि.स.खांडेकर, ना.सी.फडके वगैरे प्रस्थापितांची उपरोधी मते मराठी साहित्याच्या जातियीकरणाचे (castealization) स्वरूप स्पष्ट करायला पुरेशी आहेत. ग. ल. ठोकळांची गावगुंड, अणाभाऊ साठे यांची फकिरा, श्री. ना. पेंडशांची गारंबीचा बापू असे प्रादेशिक कादंबऱ्यांचे विविध नमुने म्हणजेच ब्रिटिश रोमान्स इन प्रादेशिक गावठी ड्रेस कसे आहेत हे मी (२००५) एका तुलनात्मक शोधनिबंधात दाखवून दिले आहेत.

मुळात इंग्रजीच्या अभ्यासक्रमामधून परिचित झालेल्या हार्डीच्या वेसेक्स परगण्याशी संबंधित कादंबऱ्या व एच.इ. बेट्सच्या खेड्यात घडणाऱ्या कथांनी ही वाट मराठीत मळली होती. युरोपातील अन्य देशामधील प्रादेशिक साहित्य प्रकारांचा परिचय करून घेण्याची ओढ किती प्रबर होती हे त्र्यं.शं. शेजवलकरांनी (१९३२) वि.स. सुखटणकरांच्या सह्याद्रीच्या पायथ्याशी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून लक्षात येते. या बदलत्या भावनिक व वाङ्मयीन संरचनांना पुढे अमेरिकेतील प्रादेशिकतावादी सौंदर्यशास्त्राने विकासाची वेगळी वाट दाखवली. तिच्या पाऊलखुणा मर्ढेकरांच्या सैन्यभरतीचे साम्राज्यवादी उदात्तीकरण करणाऱ्या दोन कादंबऱ्या कशा दिसतात याचा उल्लेख मागे केला आहे. प्रादेशिकतेच्या ठळक खुणा त्यांनी आयरिश जेम्स जॉईसच्या गडद प्रभावामुळे पुसल्या आहेत. कारण त्यांची पहिली रात्रीचा दिवस जॉईसच्या द पोर्टेट ऑफ द झार्टिस्ट ॲज अे यंग मॅन वर सरळ बेतली होती. उलट मी बिकट वाट सुलभीकरणाने शापित मराठीत मळणे अशक्य वाटल्याने ते अमेरिकन बेस्ट सेलरकडे वळते. या संकरात परके घटक प्रबळ ठरले. तोंडी लावायला पोवाड्याचा व बोली भाषेचा वापर, ग्रामीण पात्रे व विविध नागर ग्रामीण पार्श्वभूमीवर घडणारी कथानके यामुळे प्रादेशिकता फार धूसर राहिली. मात्र स्वातंत्र्य लढ्याची मुळीच सावली न पडलेल्या, साम्राज्यवादी सैन्य भरतीचा प्रचार करणाऱ्या वेगळ्या लोकप्रिय कादंब्ऱ्या म्हणून हे नमुना संस्कृती संकराची प्रतवारी स्पष्ट करायला उपयोग आहेत.

सूक्ष्म पातळ्यावर जगभरच्या साहित्यात बोलीभाषेचा प्रवेश प्रमाण साहित्य प्रकारांत पहिल्या महायुद्धानंतर ॲंग्लोमेरिकी ''विश्वसाहित्य व सौंदर्यानुभव'' या महाप्रकल्पानंतर झाला हा अपघात नव्हे. नव्याने स्वतंत्र झालेल्या पूर्ववसाहतीतील 'नव' साहित्याच्या उदया विषयी ब्रूस किंगने म्हटले आहे.

DADASAHEB RUPWATE ... LIBRARY AKOLE 422601

..... How could one reconcile cosmpolitan awareness, standards of judgement; and scepticism with the need to see the world through local, rather than alien, eyes? How could local folk culture be integrated with modern art? such conflicts were never resolved and give new literatures their strengh.... The conflict between modernization and asserting a separate usable past, however, remains central to most national literatures and the various post-colonial movements that followed. It could be argued that the international literature of post-colonialism, in all languages, is based on the conflict between what is parceive as the traditional culture of the pas t and incorporation into a global modern culture (7)

हा आंतरराष्ट्रीय संघर्ष जाणीवपूर्वक ग्रामीण-दलित कादंबरीकारांनी समर्थपणे पेलला का? धर्मांतरानंतर हिंदू लोकसंस्कृतीला नकार देणारा दलित कादंबरीकर पोकळीत पाश्चात्त्य आधुनिकतावादी पॅराशूटमध्येच अडकला आहे का? सत्यशोधकी आंबेडकरी लोकसंस्कृतीची कोणती आंतरसंहिता या कादंबऱ्यात प्रबळ आहे? या प्रश्नांची उत्तरे देणारी समतोल संस्कृती समीक्षा अजून मराठीत जन्मलेली नाही.

मात्र साहित्याच्या आंतरराष्ट्रीयीकरणाविषयी भारतीय इंग्रजी साहित्याचे विवेचन करताना विनय धारवरडकरांनी त्याच ग्रंथातील दीर्घ निबंधात वसाहतकाळात भारतीय साहित्यांचे आंतरराष्ट्रीयीकरण कसे होत गेले याचा आढावा घेतला आहे परंतु त्यात जात व सांस्कृतिक उपगटांच्या बोली भाषामधील साहित्याचे संदर्भ मुळीच नाहीत. शिवाय तौलनिक मांडणी केली असली तरी त्यांची भूमिका वसाहतवाद विरोधी नाही याचे दुसरे टोक "The Post colonial Project : Critical Approaches and Problems" या गॅरेथ ग्रिफिथ्स्च्या निबंधात गाठले आहे. मराठी - दलित कादंबऱ्यांची आस्वादक उथवा अमेरिक 'नव' समीक्षा कशी ''उत्तरवासाहतिक'' नाही याचा उलगडा निबंध वाचल्यास होतो. आपल्या साहित्याच्या निर्वासतहतिकरणासाठी त्याचा प्रकल्प उपयुक्त आहे. तो म्हणतो,

The future seems to require that the insights of recent theory be applied in the study of specific local traditions and to comparisons that can be descerned in and between them. How are mod-

ern post-colonial texts and the societies they represent, despite their differences, illuminared by their shared experience in colonialiszation and later?(1976)

असे अनेक प्रश्न आहेत. याचा अर्थ विसाव्या शतकाच्या प्रारंभी सुरू झालेली प्रादेशिकतेची चर्चा मर्ढेकरांच्या पुसट परपुष्टतेच्या संकल्पनेची अंधारातील बाजू स्पष्ट करते. उदा.पाश्चात्त्य वाङ्मयप्रकार व सिद्धांताचे वाहक ब्राह्मण वर्गातीलच होते. त्या नवसाहित्य प्रकारांचे शंभर टक्के जनक तेच ठरले. मात्र नवजातवादी साहित्यातील उपप्रकारांचे पित्वृत्त्व क्वचित अपघाताने ब्राह्मणेतरांकडे गेले. 'दलित नाटक' म्हटले तर ब्राह्मण त्याचे पितृत्त्व स्वीकारणे शक्य नाही. मग श्री.ना.पेंडसे यांची गारंबीचा बापू ही कादंबरी प्रादेशिक/ ग्रामीण नाही असे चिन्ह मीमांसेतील व विवेचन या तौलनिक शोधनिबंधात मी (२००५) टीका वस्त्रहरण पेंडश्यांची कादंबरी म्हणजे "ब्रिटिश रोमान्स इन गारंबी ड्रेस ऑन बॉम्बेज धोबी घाट" असा एक निष्कर्ष नोंदवला आहे. आंतरराष्ट्रीयकरणात विदेशी व देशी घटकांच्या संयोग संकरात साहित्य दुतोंडी (जानसमुखी) कसे होते याचे सिद्धांतन स्थानिक सांस्कृतिक वसाहतवाद टिकवण्यासाठीच The Professor's House (1922) ही कादंबरी अमेरिकेत गाजत होती. त्यात ग्रामीणतेचे उदात्तीकरण होते. 'खेड्याकडे चला' म्हणणारे गांधी भारतात नेतृत्त्व करायला आले. मराठीतील प्रादेशिक/ ग्रामीणतेच्या संकल्पनाचा उदय औद्योगिकीकरणापेक्षा स्वातंत्र्योत्तर शिक्षण प्रसार व लोकशाहीत घडलेल्या बदलांशी आहे. इथे 'नव्या साहित्याचा उदय' आणि 'विकसनशील साहित्य' या संकल्पनामधील फरक स्पष्ट करायला हवा. अलिकडील तुलनाकारांच्या सिद्धांतानाचा आधार घेऊ. ते 'वाङ्मयीन उदय' आणि 'उदयोन्मुख साहित्य' या संकल्पनात फरक करतात. त्यात दुसऱ्या संकल्पनेची व्याप्ती ग्रामीण, दलित, जनवादी मुस्लीम, जैन वगैरे सर्व पोट प्रकारांना कवेत घेणारी आहे. आंतरविद्याशाखीय ज्ञानाच्या दुष्काळात 'उदय' च्या संकल्पनेच्या विचारावर मराठीत मर्यादा पडल्या आहेत. त्या एक नाहीत. 'वाङ्मयीन उदय' म्हणजे उदयोन्मुख साहित्य नव्हे. "विद्याशाखीय पेचाशी संबंधित अशा साहित्यकृतीचा संच" शिक्षण क्षेत्रात लक्षणीय ठरण्याशी ती संबंधित आहे. तिचे अनेक अर्थ आहेत. "तौलनिक वाङ्मयीन इतिहासातील साहित्याच्या उदयाच्या समस्या" या विषयावर १९९८ मध्ये जागतिक परिषद झाली होती. नवे आणि अजून

विकास पावणारे असा तिचा अर्थ आहे. ही तौलनिक साहित्यामधील मध्यवर्ती तौलनिक समस्या आहे. तिच्यात इतिहासशास्त्रीय व राष्ट्रतित समस्या गुंतली आहे. उदयाच्या प्रक्रियेत प्रमाण कानूनी परंपरांचा पुनर्विचार एक खास आशयात्मक कार्य म्हणून करणे अभिप्रेत असते. पाश्चिमीकरण + संस्कृतकरण = संस्कृतीकरणात अंतरसंहितात्मक, आंतरवाङ्मयीन आणि आंतरकलात्मक जाळे तयार होत गेले. अनुवाद झाले. उदयोन्मुख साहित्य खूप नवी सामग्री घेऊन पुढे येते. नव्या सौंदर्यशास्त्राची मागणी करते हे कळायला आंतरविद्याशाखीय बहुदृष्टिकोनी चिकित्सेची गरज असते (पहा डॉमिन्गुएज २००६)

याचा अर्थ बोलीभाषांमध्ये लेखन करण्याचे नवे प्रवाह २० व्या शतकाच्या उत्तरार्धात जगभरच्या पूर्ववसाहतीत सुरू झाले. मात्र युरोमेरिका केंद्रिता (Euromericacentricism) व त्यांच्या वर्चस्वाला आफ्रिका व कॅरेबिया प्रमाणे भारतात प्रतिकार का झाला नाही? त्यांच्या मागे उल्लेख केलेल्या महाप्रकल्पातील सौंदर्यानुभव व नव समीक्षा विचारांचा मूळ वाहक ब्राह्मणवर्गच का झाला? गंगाधर गाडगीळ यांची 'नवकथा' व ग्रामीण/दलित आधुनिक कथेत नेमका फरक बोली वगळता कोणताही का नाही? १९६२ मध्ये हरारे येथील इंग्रजी परिषदेत कादंबरीकार न्गुगी वा थिलांगो, चेनुआ अचेबे व नाटककार दोळे सोयिंका यांनी ॲग्लोमेरिक "साहेबी कथनांका" चे वर्चस्व झुगारण्याची प्रतिज्ञा केली. त्यांनी ॲग्लोमेरिकी कादंबरीचे रूपबंध उधळून लावले. तेव्हा त्या कादंबऱ्याच नाहीत असे प्रखर आक्षेप घेतले गेले. उलट भारतीय कादंबरी 'ट्वाईस बॉर्न' द्वीज आहे. तिच्यात पाश्चात्त्य नमुन्यांचे अनुकरण जास्त आहे. त्यामुळे खेसलात ग्रामीण कथनोच अंश नसून सॅलिंजरची कॅचर इन द दाय जॉईसची द पोर्टेट ऑफ ॲन आर्टिस्ट ॲज अे यंग मॅन व स्टर्नची ट्रीस्टम शॅन्डी यांच्या रिमिक्समुळे नागर शैली घटकांची 'मिसळ' (पुणेरी अस्तित्वादी) जास्त आहे. नायक नावाला ग्रामीण आहे आणि लेखक संधिसाधू, देशवादी, ओबीसी आरक्षणवाला व अनीतिवादी आहे. ग्रामीण कथन व शैली नाकारण्याचा हा संधिसाधूपणा म्हणजे स्थानिक वसाहतवादाच्या कातरीतून सुटण्याची चोरवाट आहे. अशाच पळवाटा संज्ञाप्रवाहाच्या तंत्राच्या मर्ढेकरी सांस्कृतिक साम्राज्यवादाच्या सावलीत शोधणारे बहुसंख्य ग्रामीण-दलित कादंबरीकार आजही दिसतात. आज उत्तराधुनिक जगात संज्ञाप्रवाही तंत्र म्हणजे बालिशपणा होता असे समजले जाते. हे नोबेल विजेते गॅब्रिएल मारक्विझ, गुंटर

गघस वगैरेंनी दाखवून दिले आहे.

याचा अर्थ मराठी ग्रामीण व दलित कादंबऱ्यांच्या ''डॅफोडिलीकरणाघा आणि दुतोंडी (two facedness) पणाचा उलगडा करणारा तुलनाकार अजून जन्मलेला नाही. प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्रात निरडॅफोडिलीकरणाला अधिक महत्त्व असते. त्याप्रमाणे न्गुगी वा थिवांगोने तर आपल्या बोलीभाषेत मायभूमीतील कथनप्रकारांचे पुनरुज्जीवन करीतच साहित्य निर्मिती करण्याची शपथ घेतली. इंग्रजीचा प्राध्यापक असूनही इंग्रजी विभाग खालसा करून तुलनात्मक पद्धतीचे अभ्यासक्रम ॲंग्लोमेरिकी ग्रंथांचे वर्चस्व झुगारून पुर्नरचना करण्याची जाहीर मागणी केली. त्याचे ग्रंथ इंग्रजीत अनुवादित नसल्याने नोबेल पुरस्कारासाठी नामांकन मिळूनही त्याला डावलले जाते याची फिकीर त्याला नाही. चेनुआ अचेबेची थिंग्ज फॉल अपार्ट ही ग्रामीण बोलीचा वापर पूर्णपणे करणारी गाजलेली कादंबरी यादवांची गोतावळा व नामदेव कांबळेंची राघववेळ समोर मांडल्यास पुढील निष्कर्ष निघतात. याच्या पुढची पायरी म्हणजे अरविंद अडिगाची द व्हाईट टायगर व अरूंधती रॉयची द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज या अनुक्रमे आनंद विंगकरची अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट (२०११) व बाबुराव बागूल-सूड यांच्या तुलना केल्यास ग्रामीणत्त्व व दलितत्त्वाच्या वेगळ्या प्रादेशिक बाजू उजेडात येतात. त्यात अनिता नायरच्या बेटर मॅन (१९९९) ची भर घातली तर केरळच्या खेड्यातील जीवनातील जात-धर्म भेदांचे सांस्कृतिक धागे सारख्याच पोताचे आढळतील.

'स्वातंत्र्योत्तर' ग्रामीण व दलित-ग्रामिण कादंबरी शिक्षणप्रसाराबरोबर विस्तारली. तिने नाना बोली व अज्ञान अनुभवांचा वेध घेतला. मुख्य प्रवाहातील अडीच टक्क्याच्या लघुसंस्कृतीतील कथा कादंबऱ्यांना धक्के दिले. ओव्यांच्या खांद्याला खांदा लावून शिव्या चाळरू लागल्या. नव्या सांस्कृतिक सुभेदारीचा अभास निर्माण केला. शेषराव मोहित्यांच्या असं जगणं तोलाचं मध्ये शेतकरी चळवळ तर बाबुराव बागूल यांच्या सूड मध्ये दलित चळवळीच्या विचारधारा जोमाने प्रकटल्या. उलट नामदेव कांबळे यांनी राघववेळ मध्ये पाच पाटलांची नाहक बदनामी केली म्हणून मराठवाड्यातील दलितांनी मोर्चा काढला. अण्णाभाऊ साठे यांनी सुष्ट-दुष्ट पाटील-कुलकर्णी समतोलपणे चित्रित केले होते. जातीच्या भिंती पलीकडे केलेला तो 'डावा' दलित लेखक होता. त्यांचीच ज्ञातीबांधव नामदेवने आपले आंबेडकरी चळवळीशी काही घेणे देणे नाही, आपण भारतीय

जनता पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे जाहीर केले. थोडक्यात लेखकाची जातच अनुभवांची अभिव्यक्ती त्याने स्वीकारलेल्या राजकीय विचारसरणीच्या चौकटीत कशी करते याचाच तुलनात्मक संस्कृती अभ्यास होणे गरजेचे आहे.

अशी सांस्कृतिक साक्षरेची मोहीम काढली तर बाबुराव गायकवाड यांनी संशोधन केलेल्या सवर्णांच्या दलित विषयीच्या लेखनाची व्यवस्था नीट लावता येईल. नव जातवादी कप्पेबंदीमुळे आंतरसंहितता दुबळी होत गेली आणि संवादी व तुलनात्मक कल्पनाशक्ती पांगुळलील देवासला दिवाण म्हणून पंधरा वर्षेराहिलेल्या कांदबरीकार इ. एम्. फॉरस्टरने म्हणले आहे.

"Ideas are fatal to caste".

यामुळेच प्रयत्न करूनही ग्रामीण व दलित लेखकांची एक संघटना होऊ शकली नाही. उलट आफ्रिकनर जगाच्या पाठीवर कुठेही असोत "Black is beautiful" म्हणताच एकत्र येतात. गोऱ्यांच्या सांस्कृतिक वर्चस्वाला व 'मास्टर नॅरेटिव्हला' निकराचा विरोध करतात. उलट सर्वच भारतीय लेखक थोड्या बहुत प्रमाणात मास्टर नॅरेटिव्ह डोक्यावर घेऊन नाचतात. पाश्चात्त्य ते श्रेष्ठ हा अवलंबित्त्व गंड अजूनही प्रबळ आहे. त्याला प्रतिकार करण्याचे सौंदर्यशास्त्र मी दोन लेखात स्वतंत्रपणे मांडले आहे (पहा त्रयी) भारतीय परंपरेत तुलनाच त्याच ठरल्या आहेत. त्यामुळे असा प्रतिकार आस्वादक समीक्षेने निरक्षर गटांवरील वर्चस्व घालवण्यासाठी करणे कधीच शक्य नाही. त्यामुळे व्यंकटेश माडगूळकरांची बनगरवाडी म्हणजे अँग्लोमेरिकी सौदर्यानुभवाच्या मर्ढेकरी पाकात कुक केलेली लघुसंस्कृतीची अमेरिकी प्रादेशिकता वादाच्या आकर्षक कुपीतील फर्प्यूम आहे. स्वातंत्र्यानंतर उपेक्षित घटकांत रशियन साम्यवादाने पारंपरिक सांस्कृतिक वर्चस्वाची लय बिघडू नये म्हणून आयसीएस्च्या अभ्यासक्रमांतून मर्ढेकरांनी आयात केलेल्या सौदर्य घटकांचा तो परिणाम आहे. 'लयतत्त्व' ही संकल्पना समग्र पाश्चात्त्य साहित्यात आढळत नाही. Rhythm, Rhyme, असे घटक आढळतात. मग साहित्य रचनेतील एका साधारण घटकाला आस्वादक अंध समीक्षकांनी (विशेषतः कुलकर्णी-पुराणिकांनी) त्याला मोठ्या 'तत्त्वा'चे रूप का दिले? केवळ तौलनिक संस्कृती समीक्षेतच या प्रश्नाचे उत्तर मिळू शकते. ते शोधायचे तर साहित्याच्या जातीयकरणाची चर्चा अटळ ठरते. तीच सिद्धांताच्या आधारे सुरू होणे म्हणजे निर्वास्तहतीकरण (decolonization) प्रक्रियेला आमंत्रण देणे ठरते. हेच वास्तहतीकरण झालेल्या भारतीय साहित्य

संस्कृतीत फार धोकादायक ठरते. सबब अज्ञानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असते. तशी वाङ्मयीन भावनांची संरचना अभ्यासक्रमच करतात.

आजवर मराठीत थॉमस हार्डी व पेंडसे/दिघ्यांच्या कादंबऱ्यांच्या उथळ तुलना होत आल्या आहेत. परंतु प्रादेशिकतेचे सिद्धांतन अमेरिकेतील पुढील घटकांच्यावर अवलंबून होते. अमेरिकेतील ''आधुनिकतेचे सहा चेहरे'' नावाने त्या प्रक्रिया ओळखल्या जातात. प्रादेशिक संस्कृती व काव्याच्या रूपबंधांचा परस्पर संबंध अतूट असतो. अधून मधून शुद्ध देशी संस्कृतीचा पुरस्कार केला जातो. रबरी व उपरी तकलादू संस्कृती यात भेद केला जातो. औद्योगिकरणामुळे होणारे निसर्गावरील आक्रमण व पर्यावरणाचे असंतुलन यामुळे निर्माण होणार ताणतणाव साहित्यात चित्रित केले जातात. प्रादेशिकतेत पुढील गुणधर्म आढळतात.

The whole way in which we live, act, think and feel. it is a kind of imaginatively balanced life lived out in a definite social traditilons, in its tables, chairs, porlraits, festivals, laws, marriage customs (xxvi) अँग्लोअमेरिकेत प्रादेशिकतेचे मंथन सुरू होते तेव्हा Willa Cather व इतरांचे लेखन बहरत होते.

हे आंतरराष्ट्रीय संदर्भ हरवल्याने अज्ञानाच्या उत्पादनाचे बळी 'डिव्हाईड अॅन्ड रूल' नुसार आपसातल्या भांडणात पुरते बुडाले. युरोपी गोरे त्यांच्या कांदबऱ्या बर्मिंगहॅम स्कूल फॉर स्टडी ऑफ पॉव्हर्टी साठी प्रयोग-संशोधनाचा कच्चा माल म्हणून वापरू लागले. अधीच सुलभीकरण व अनुकरणाचा शाप आणि आस्वादक समीक्षेने वाढवलेल्या कॅन्सरला समग्र मराठी कादंबरी कधी बळी पडली हे तुलनात्मक संस्कृती अभ्यासांच्या अभावामुळे कुणाच्याच लक्षात आले नाही. आता जागतिकीकरणात जगभरच्या बेस्ट सेलर व अभिजात कादंबऱ्यांच्या अनुदानांनी नवे आव्हान उभे केले आहे. घरच्या पेक्षा परकी बरी, फॉरेन थिंग्ज आर ऑलवेज अॅट्रॅक्टीव्ह? इंग्रजी माध्यमांच्या शाळांची वाढती संख्या ज्ञाति अभिमानापेक्षा संस्कृती संकाराची मागणी करते. या संकरातही अँग्लोमेरिकी सांस्कृतिक नेतृत्त्वाचे वर्चस्व आहेच. ते ग्रामीण व दलित सुभेदाऱ्यांना सुरुंग लावणारे आहे. म्हणूनच डायस्पोरांचे मराठी विश्वसाहित्य संमेलन म्हणजे रिमोट कंट्रोलने लावणीचे पॉपिंग ब्राह्मणीकरणातून सांस्कृतिक उद्योग म्हणून करण्याचे एक माध्यम आहे. साहित्याच्या अशा आंतरराष्ट्रीयीकरणाचे पूर्ण

अज्ञान उत्तरवसाहतकाळात इमॅन्युअल कांटने म्हटल्याप्रमाणे ॲंगेमेरिकी सिद्धांता आडून मोठ्या प्रमाणात करण्यात आले. गैरसोईचे फ्रेंच सिद्धांत व अफ्रिकन-कॅरेबियन सिद्धांतन मराठीत फारसे आले नाही. आज ग्रामीण-दलित कादंबऱ्यांची पुरती कोंडी झाली आहे. तिची ही कारणे आहेत. अभ्यासक्रमांची सोय म्हणून प्रसिद्ध होणाऱ्या काही कांदबऱ्यांत अपरिचित अनुभव व भाषेचे काही गुणधर्म सोडल्यास जुन्या बाटलीत नवी दारू भरण्याचा जुनाच सांस्कृतिक उद्योग सुरू आहे, इतकेच.

या शिवाय जात-पंथ-गट-तटांच्या चळवळीत बेडूक उड्या मारीत मोठे ठरलेले (काही पेपर मेड पपेटस्) लेखक जागतिकीकरणाच्या लाटेत वाहून जाताना दिसतात. वीस-तीस वर्षापूर्वी अभिजात अभिरुचीने जुळवून घेत महान ठरवलेली ग्रामीण/दलित कादंबरी आज पूर्णपणे संदर्भहीन झाली आहे. मुळात प्रमाण मराठीच चंगळदारी अमेरिकीकरण झालेल्या पिढ्यांना नीट समजत नाही. शब्दकोश वाचून ग्रामीण दलित कादंबरी कोण समजून घेणार? आजच्या पर्यावरणीय असमतोलाच्या काळात 'लोकल' यादवांचा 'लोकल' गोतावळा एक पुराण-ब्राह्मणग्रंथातील मिथकच आहे. ट्रॅक्टर बाजूला पडून माफियांचे जेसिबी, पोकलॅन्ड व बुलडोझर सह्याद्रिच पोखरत आहेत. हे ज्वलंत वास्तवाचे पेटते आगडोंब व ॲग्लोमेरिकी उर्फ मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राने देशी नववसाहतवाद वाढवण्यासाठी रिमोट कंट्रोलने विझवले. उलट समकालीन अचेबेने "Things fall apart center cannot hold" या नोबेल पुरस्कार विजेत्या डब्ल्यू बी. येटस्च्या कवितेच्या ओळीतील शब्द कादंबरीच्या शीर्षकांत वापरून एका संपूर्ण जमातीच्या वासाहतिकरणाची कहाणी संपूर्ण देशी घटक वापरून मांडली. जोसेफ कॉनरॅडच्या कादंबऱ्यांतील 'काळया' लोकांचे केलेले चित्रण एकांगी व तद्न खोटे ठरवणारा प्रक्षोभक लेख लिहिला. या प्रतिज्ञापूर्वक सुरू केलेल्या ''डिडॅफोडिलीकरणाला'' व्यामिश्र आंतरराष्ट्रीय संदर्भ आहेत. याउलट अशी देशी घटकांची सकृद्ध आंतरसंहितता (intertextuality) ग्रामीण-दलित कांदबरीत सापडणे कठीण आहे. असे का घडले? हे सांगणारे सिद्धांतनही मुळीच झालेले नाही. संकल्पना व सिद्धांतांची फौज उभी केल्या शिवाय कुठलीही भाषा अथवा साहित्य स्वतःच्या पायावर रणांगणांत उभी राहू शकत नाहीत.

मुळात ''स्वातंत्र्योत्तर'' या फसव्या 'प्लॅग फ्रिडम'(fanon) दर्शक संकल्पनेने केलेल्या सुलभीकरणामुळे 'उत्तरवासाहतिकत्वाची चिकित्साच झाली

नाही. स.गं. मालशे, वासुदेव बळवंत पटवर्धनांच्या सारखे अभ्यासक तसा आग्रह धरत होते. त्र्यं.शं. शेजवलकरांनी मागे उल्लेख केल्या प्रमाणे कथा-कादंबऱ्यांची चर्चा पेट्रन (आश्रमयदाते) व प्रकाशकमुखीच राहिली. त्यामुळे अन्य पूर्ववसाहतित सिद्धांतन व नव्या संकल्पनांचे पाठबळ उत्तरवासाहतिक साहित्याला मिळाले, तसे ग्रामीण व दलित कादंबरीला मिळाले नाही. त्यांना मध्यमवर्गीय वाचकांच्या आश्रयाने प्रमाणित नियमित केले. 'कादंबरीतला वाचक' देखील कादंबरीला घडवतो असा नवा सिद्धांत आहे. तो मान्य केला तर मध्यमवर्गीय मर्ढेकरी सौंदर्यशास्त्रीय चौकटीत त्या का व कशा बंदिस्त झाल्या या नववासाहतिकरणाच्या परिभाषेतील मर्यादांचा उलगडा होतो.

मराठी मुख्य परंपरेत नवे आशयद्रव्य, नवे प्रदेश साकल्याचे, बोली, पात्रे वगैरेंची भर ग्रामीण व दलित कादंबरीने घातली. 'देशी लोक', घटक 'मार्गी', परंपरेला संजिवनी देतात, हे सनातन सत्यच आहे पण आंतरराष्ट्रीयीकरणात या कादंबऱ्यांनी नेमके नवे काय दिले, हा प्रश्न उरतोच. आपल्या सांस्कृतिक उपगटाचे प्रतिनिधित्व त्यांच्या लेखकांनी कसे केले? 'बारी' नंतरचे स्वामीकार व पांगिरा नंतरचे पानिपतकार यांची लोकप्रिय परिभाषिते नववसाहतवादाला पुष्टी देणारीच आहेत यात शंका नाही. ग्रामीण व दलित कादंबरीकाराला जुळवून घेत गिळण्याच्या या वासाहतिक प्रक्रियेचे (appropriation) विवेचन स्थूल वर्णनांच्या चिखलात रूतलेल्या ग्रामीण व दलित समीक्षेत सापडणे कठीण आहे. वसाहतवादाचा विळखा पडत असता जुळवून घ्यायला मान वाकवणे व प्रतिकारासाठी मान ताठ ठेवणे याचे राजकारणही सौदर्यशास्त्रीय अंगानेच विचारात घ्यायला हवे. कारण आपण तथाकथित सौदर्यशास्त्र शिकताना त्याचे राजकारण टाळतो. राजकारणाचे सौंदर्यशास्त्र आहे. 'बोट' चं 'बॉट' करून 'प्लॉट' भरणं म्हणजे ग्रामीण साहित्य नव्हे.

साहित्य जेवढे ग्रामीण/प्रादेशिक जास्तीत जास्त असेल तेवढे ते अधिक वैश्विक ठरते, असा एक सिद्धांत मांडला जाते. नोबेल पुरस्कार देताना तो एक महत्त्वाचा निकष मानला जातो. अमेरिकन स्टाईनबेकची द ग्रेप्स ऑफ रॉथ, ऑस्ट्रेलियन बुश (झुडूप) साहित्य. द ट्री आफ्रिकन- अमेरिकत जाझ कादंबरी लिहिली जाते. ग्रामीण लेझिम दलित जलसा कादंबरी हा आगळा प्रकार विकसित झाल्याचे का दिसत नाही? अशी जगभर गाजणाऱ्या प्रादेशिक/ग्रामीण कादंबऱ्यांची उदाहरणे दिली जातात. भारतातील राही मासूम रझाची

आधा गाँव, फनिश्वरनाथ रेणूची मैला आँचल, शुक्लांची अलग अलग वैतरणी, कांजी पेटेलची गुजराती देहूल, महाबळेश्वर सैलची कोंकणी काळी गंगा अशा प्रादेशिक-ग्रामीण कादंबऱ्यांशी आपल्या ग्रामीण दलित कादंबऱ्याची तुलना करणे उद्‌बोधक ठरेल.

वासाहतिकरणात विरोधापत्तींची संख्या वाढत जाते. इंग्रजी मधील रिरिवे चा मराठी अनुवाद ''विरोधाभास'' फार चुकीचा ठरतो. कारण त्यात 'भास' नसून कठोर वास्तव असते. उदाहरणार्थ आफ्रिका व कॅरेबियामधील संस्कृती व भाषा युरोपी साम्राज्यवाद्यांनी नष्ट केल्या. अमेरिकेतही तेच धडले. तरी तिथल्या लेखकांनी भूतकाळ खूप खोदला. देशी लोकपरंपरामधील कथन तंत्रे व आशय सूत्रांचे पुनरुज्जीवन केले. तसे मराठीत का घडले नाही? जाती-वर्ण भेदांच्या भिंतीत अडकलेल्या लोककलावर अन्य जाती मधील राम जोशी, शिवा संभा, सूफी कीर्तनकार झाल्याचा इतिहास आहे. मात्र वर उल्लेख केलेली इंग्रजीकरणाची प्रक्रिया संस्कृतकरणापेक्षा प्रबळ झाली. तिला प्रतिकार म्हणून लोकसंस्कृती-करणाचा जोमदार प्रवाह निर्माण होऊ शकला नाही. लोकसाहित्य संकलनातच अडकले. त्या घटकांचा प्रवेश कादंबरीत व्हायला नव समीक्षेने मज्जाव केला. पौर्वात्यवादापासून वर्चस्ववादी परक्या संस्कृतीशी देशी भाडोत्री दलालांनी हातमिळवणी केल्यामुळे साचेबद्धतेचा शाप लाभला. बोली व अनुभवांचे रंग वगळता साच्याचे गणपती कादंबरीच्या रूपात तयार झाले. काही पुरस्कारांचे दूध पिऊ लागले? काही फॉरेन लिकरवाले तर काही कंट्री-मळीचे गुत्तेदार बनले. जागतिकीकरणात इंग्रजी माध्यमांच्या शाळा वाढताच दारिद्रय विक्रीची ही वाङ्‌मयीन दुकाने सांस्कृतिक दिवाळखोरीत जात आहेत.

कागदावरच स्वातंत्र्यापेक्षा वसाहतवादाचे परिणाम किती दूरगामी आहेत याचा अभ्यासच झाला नाही. अशी खंत स.गं.मालशे यांनी गतशतक शोधितांनामध्ये व्यक्त केली आहे. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र किंवा संस्कृती असे 'बाहेरचे हात' ह्या कादंबऱ्यांचे नियमन करतात. वासाहतिक परिभाषिनाच्या सिद्धांताच्या साक्षरतेचा अभाव असल्याने सत्ता व ज्ञान यांच्या परस्पर संबंधांचा गुंताच कळला नाही. सुलभीकरणाचा शाप व आश्रयदात्या आस्वादक समीक्षेचा कॅन्सर यामुळे ग्रामीण व दलितच नव्हे तर मराठीतील हा एक वाङ्‌मय प्रकारच मृत्यू पंथाला लागला आहे. संख्यात्मक सूज ही प्रकाशक, अभ्यासक्रम आणि जातीवर्ण, धर्म, प्रदेशाचे प्रतिनिधित्व वगैरेमुळे सतत टिकलेली बाब आहे.

तिची मोठी "फ्रेम" गॅरेथ ग्रिफिथ्सने सई, भाभा, स्टीफन स्लेमन आदी उत्तरवसाहतवाद्यांच्या भूमिकांच्या आधारे मांडलेल्या प्रकल्पाचा स्वीकार केला तर अधिक लक्षात येते. मराठीतील आजवरच्या उपलब्ध समीक्षेतील अज्ञानाच्या उत्पादनचे मूळी त्यात सापडते. खरा धोका ग्रिफिथ्सने दाखवला आहे.

...There is also considerable danger involved in the appropriation of the literary and cultural output of the post-colonial societies aroungd the world to the Euro-American critical industry. As several critics have noted this might be seen to replicate the colonial relationship whereby the colonies produced the raw material (the literary text) and the metropolitan societies added the value (critical judgement, evaluation and commentary) of course, took most profit (166,67)

या आंतरराष्ट्रीय विशाल वर्तुळाच्या पोटातील छोट्या मराठीच्या अत्यंत मिनी वर्तुळात नेमकी हीच प्रक्रिया जशीच्या तशी घडली आहे, घडत आहे. नागर समाजातील उच्चभ्रूंच्या समीक्षेसाठी ग्रामीण व दलित कादंबरीकारांनी "कच्चा माल" पुरवला आणि "मोस्ट ऑफ द प्रॉफिट" भाडोत्री दलाल वर्गानेच लाटला. हा कितीही कठोर असला तरी आंतरराष्ट्रीय पातळीवरचा निष्कर्ष स्वीकारावाच लागतो.

या विशाल परिप्रेक्षातून पाहिले म्हणजे ब्रिटन व अमिरेकेतर प्रदेशातील साहित्याची चर्चा, विशेषता अमेरिकेत समासिकता (marginality), दुय्यमता (subaterneity) व एजन्सी अशा तात्त्विक प्रश्नाकडे वळली. नेमकी हीच परिभाषा दलित व ग्रामीण साहित्यांच्या परीक्षणांत गो.म. कुलकर्णी, बांदिवडेकर वगैरेंनी वापरलेली दिसते. केंद्र व परिघाच्या संबंधांची चर्चा नेमाड्यांच्या उदयापूर्वीच्या दशकात एच.डब्ल्यू. न्यूच्या कॅनडातील निबंधात आढळते. आज मात्र खरे संकट जागतिकीकरणाच्या (त्सुनामीत स्थानिक फरक, हितसंबंध, भाषा व साहित्य पार वाहून जाण्याचे आहे. त्यामुळे संधिसाधू हंगामी देशीवाद्यांना बरे दिवस आलयाचा अभ्यास निर्माण झाला आहे. त्यातून जाती धर्मवादी संघर्ष वाढत आहेत. स्वातंत्र्य युद्धकाळातील राष्ट्रवादी देशीयतेपेक्षा वसाहतकाळापूर्वीची परशुरामाची मिथ्कातील कुऱ्हाड आज पाजरण्याचा मूलतत्त्ववाद फार वेगळा आहे. टोकाचा पुरुज्जीवनवादही फार हितावह नाही. मात्र सांस्कृतिक सत्ताधिश अशी मिथके नेतृत्व टिकवण्यासाठी पसरवित असतो. कथा-कादंबऱ्या म्हणजे

हेच सुधारित संकरित सांस्कृतिक मॅचफिक्सिंगमधून काढलेले पीक असते. ''धार आणि काठ'' म्हणजे अशा मिथकांची कालबाह टेलिफोन डिरेक्टरीच आहे. ग्रिफिथसला मराठी साहित्य नसावी. पण त्याने युरोपातील साहित्याच्या भारतावरील प्रभाव विषयी म्हटले आहे.

... In countiries such as India, where there are many substantial literature in the indigenous languages, writing in contemporary Kannada, Malayalam or Bengali shows the influence of western literary forms and concerns alongside or admixed with, the indigenous (168)

त्याच्या या जगभरच्या साहित्याच्या तुलना पाहिल्या म्हणजे अनन्य मर्ढेकर, दलित साहित्य जगात अनन्य आहे, क्ष मराठी कादंबरीकार नोबल पुरस्कार मिळवण्याच्या पात्रतेचा आहे, असे अनेक अभिनिवेशी दावे एकांगी व अज्ञानमूलक आहेत. आपल्या वाङ्मयीन संरचना सांस्कृतिक श्रेणी बद्धतेत झाल्यामुळे तुलनात्मक व संवादी कल्पनाशक्तीचे संवर्धन नीट होत नाही. वाचकच वर्णनाच्या व सुलभीकरणाच्या दलदलीत रुतलेला आणि लेखक आधुनिकतावादी कालबाह्य संज्ञाप्रवाह, प्रतिभा, प्रतीके, लय वगैरेच्या गाळात बुडालेला आहे. अशा परिस्थितीत कॉम्प्यू, नॉव्हेल, मॅजिक रियालिझमचा बूम, रिमिक्स, व गिमिक्सचे सांस्कृतिक कार्निव्हालायझेशन, मिखाईल बाख्तीनचे संवादी कल्पनाशक्ती व हेटरॉग्लॉसियाचे सिद्धांतन मराठीच्या ग्रामीण व दलित सुभेदारीत कसे प्रवेश करणार? जे आहे त्यात समाधान मानणारे जास्त असतात, तेव्हा त्या साहित्य प्रकाराची कोंडी झाली असे समजावे. प्रतिकार, विद्रोह या घोषणा आकर्षक असतात. विद्रोह व जुळवून घेत गिळणे या जुळ्या प्रक्रिया वसाहतवादच जन्माला घालतो. त्यांचा वेध ग्रामीण व दलित कादंबरी कसा घेते यावर त्यांचे भविष्य अवलंबून आहे.

आश्चर्य म्हणजे दलित काव्याच्या तुलना वातानुकुलित आफ्रोअमेरिकन ब्लॅक काव्याशी फुलब्राईट स्कॉलरशिपमुळे हाफ ब्राईट प्रबंधात (इंग्रजी) जास्त प्रमाणात झाल्या आहेत. सर्वेगुणाम् कांचनाम आश्रयेत। उक्तीप्रमाणे गरीब आफ्रिका, कॅरेबियन किंवा ऑस्ट्रेलियन अनुक्रमे काळया व ॲबओरिजिन बुश रायटरशी तुलना अजून झालेली नाही. तसे विविधांगी अभ्यास झाले तर दलित-ग्रामीण कादंबरी युरोप अमेरिकेच्या साम्राज्याचे अधिक मोठ्या प्रमाणात 'उत्पादन'

कसे आहे आणि ती काळ्या व मिश्रवंशीय बुश लेखकांच्या प्रमाणे सलमान रश्दीच्या परिभाषेत साम्राज्यवाद पलवार (empire writes back) मुळीच करीत नाही. हे अभ्यासावे लागते. मागे उल्लेख केलेल्या संस्कृतीकरणाची (acculturation) व अज्ञानाच्या उत्पादनाची ही वासाहतिक फळे आहेत असेच म्हणावे लागेल. दलित लेखक रशियन साम्यवादाकडे वळू नये म्हणून अँग्लोमेरिकन शिष्यवृत्त्या दिल्या गेल्या. ॲप्रोप्रिएशन म्हणतात ते असे राजकीय असते. ब्राह्मण व दलितांच्या प्रमाणे त्या युद्धखोर लढाऊ जातींना देऊ नयेत हे अलिखित धोरण असल्याने रेड इंडियन्सच्या 'नोटिव्ह अमेरिक लिटरेचर'चा व ग्रामीण कादंबरीचा पदर जोडला गेला नाही. अमेरिकेत ग्रामीण-देशी साहित्य चळवळ आहे.

अशा चर्चासत्रातून वरील प्रमाणे उत्तरवासाहतिक सिद्धांत ग्रामीण व दलित कादंबरीला तुलनात्मक पद्धतीने लागू करायला हवेत. 'शुद्ध' साहित्याकडून हा अभ्यास संस्कृतीच्या चिन्ह मीमांसेकडे वळवावा लागेल. कादंबरीच्या उत्पादनावर व विक्रीवर कुणाचे नियंत्रण आहे? साहित्य संहितेचा उपभोग कोण घेतात व उपयोग कसा केला जातो? काय मांडले यापेक्षा कादंबरीकाराने काय लिहायचे टाळले याचाही शोध घेतला पाहिजे. ग्रामीण व दलित कादंबरीचा जुन्या ऐतिहासिक व टीकेच्या परंपरेवर झालेल्या परिणामाचाही लेखाजोखा मांडायला हवा. त्यांचा एकत्रित विचार करताना कृत्रिम कप्पेबंदीच दोन्हींना खुजे बनवते की नाही याचा उलगडा होत जातो. पदवीपूर्व वर्गात परिणामकारकपणे त्यांचे अध्यापन साम्य-भेदांची जाणीव बाळगून तुलनात्मक पद्धतीने व्हायला हवे. उत्तर-वासाहतिक साहित्याचे सिद्धांतनच आंतरराष्ट्रीय संदर्भात त्यांची स्थान निश्चिती करायला अधिक उपयोगी आहे.

* * *

## निवडक संदर्भ :-

१. देशमुख पंजाबराव शामराव The origin and Development of Religion in vedic Literature, London OUP, १९३३ अनु. वैदिक साहित्यातील धर्माचा उदय आणि विकास, आनंद पाटील, अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, २००४



DH 21012

२. Dominiquez, Cesar, "Literary Embergenbce as a case study of Theory, " Comparative Literature and culture CLC web 8.2 (2006) 1 to 13
3. Griffiths, Gareth. "The Post -colonial Project : Critical Appreoaches and Problems" in Bruce King Op Cit. pp.164-77.
4. King, Bruce. New National and Post-colonial Literature, Oxford : Clarendon Press 1996.
५. मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता : लोकेनेते डॉ. पंजाबराव देशमुख, अमरावती : मराठा विज्ञान मंदिर, १९९३.
6. Mukherjee, Arun Prabha. Aesthetics of Opposition. Toranto : Tazar Publication 1994.
७. पाटील आनंद, "ग्रामीण साहित्याचा उदय आणि विकास'', साहित्य विमर्श मरणम् पुणे : डायमंड पब्लिकेशन, २०११, पृ.८३.
८. टीका वस्त्रहरण, नागपूर : आकांक्षा प्र.२००८
९. समीक्षा 'अपहरण', औरंगाबाद : रजत प्र.२०१०.
१०. तुळह, मुंबई ग्रंथाली, २००२
11. Literary into comparative culutre, criticism Ambala : Associated Publishers 2011
12. Nair Anita. The Better Man Harmondsworth : Penguin Publication 1999.
13. Said, Edward W. Culture and Imperialisam. London. Vintage Books 1994.

* * *

## 'तुलनात्मक साहित्य : परंपरा व साहित्य संशोधनाची नव संधी'

- डॉ. राहुल अशोक पाटील,

### तुलनात्मक साहित्याभ्यास: संकल्पना व स्वरूप -

तुलनात्मक अभ्यास हा विविध भाषा, कालखंड, आंतर विद्याशाखीय अभ्यास आणि संशोधन या क्षेत्रांशी निगडित आहे. या अभ्यासासाठी निवडलेले साहित्य आणि त्या साहित्याशी संबंधित सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचा आढावा घेण्याची संधी येथे असते. आपण मराठीचा गौरव करणारे इंग्रजीसाठी नाके मुरडतो कारण मराठी व्यतिरिक्त इंग्रजी काय पण इतर कोणतीही भाषा सहसा आपल्याला येत नाही. प्रत्येकाने आपल्या भाषेचा अभिमान बाळगणे साहजिकच आहे पण त्याचबरोबर इतर भाषा अभ्यासणेही आज जागतिकीकरणात तितकेच गरजेचे आहे. तौलनिक भाषाभ्यास म्हणजे काय हे समजावून घेतांना किंवा जागतिकीकरणात तौलनिक अभ्यासाला चांगली संधी आहे असे म्हणण्यापूर्वी आपण आपल्या स्वभाषेचा व्यवस्थित अभ्यास करणे अधिक महत्त्वाचे आहे.

स्थूलमानाने म्हटल्यास, तुलनेच्या आधाराने केलेला साहित्याचा अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय. पूर्वी साहित्यामध्ये किंवा विविध भाषांमध्ये अभिसरण होत नव्हते. भाषा आणि तिचे साहित्य हे आपल्या स्वत:पुरतेच मर्यादित होते. उदा. संस्कृतमधील साहित्यशास्त्र हे सर्वस्वी संस्कृतवरच अवलंबून होते.

### तुलनात्मक विषयांतील संशोधनाचे फायदे व उपलब्ध संधी -

तौलनिक साहित्याचा अभ्यास करणारी स्वतंत्र विद्याशाखा असली तरी तिचे स्वतंत्र साहित्यशास्त्र नाही. या अभ्यासात ज्या प्राथमिक गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत त्यात तुलना ही आधारभूत आहे, तिच्यासाठी एकापेक्षा अधिक वस्तूंची आवश्यकता असते हे गृहीतच आहे. तुलनात्मक साहित्यात सांस्कृतिक बहुविविधता, विविध कालखंड, साहित्य प्रकार, मध्यवर्ती

कल्पना, विविध सामाजिक- राजकीय चळवळी, समीक्षा, सिद्धांत/ तात्त्विकता, सामाजिक बांधिलकी, मानवी वर्तन या विषयांवर विविध दृष्टिकोनांतून विचारमंथन करता येते.

तुलनात्मक विषयांवरील अभ्यासामुळे समीक्षात्मक विचार सुदृढ होतो, एखाद्या घटनेकडे किंवा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकस होतो, दोन किंवा अधिक भाषांतील/विषयांतील साम्य- भेद कळण्यास संशोधकाला मदत होते. अभ्यासासाठी निवडलेल्या संस्कृतीचा भाषिक प्रभाव आणि परिणामही समजतो. तसेच, सांस्कृतिक बहुविविधतेची जाण आल्याने आपण आणि आपले साहित्य इतर साहित्याच्या तुलनेत नेमके कोठे आहे हे कळण्यासही हातभार लागतो.

तुलनात्मक विषयावर संशोधन करण्याचा सगळयात महत्त्वाचा फायदा म्हणजे अशा अभ्यासात संशोधनकर्त्याला अधिक स्वातंत्र्य मिळून त्याच्या क्षमतेनुसार विषयाची निवड आणि मांडणी करण्यास अधिक वाव मिळतो. त्याचप्रमाणे, पारंपरिक व साचेबद्ध विषयांवरील संशोधनाच्या पलीकडे जाऊन नवे व वेगळे विषय निवडून त्या विषयांना योग्य न्याय देता येतो. परदेशी साहित्य व शिक्षणाच्या स्तरावर नव्याने उदयाला येणाऱ्या भाषांचे पर्यावरण, तेथील साहित्य जाणून त्याचा अभ्यास करता येतो.

तुलना केल्याने भाषांमधील विविधता, गुंतागुंत प्रकटते आणि योग्य मूल्यमापनही करता येते. यामुळे अशा विषयांतील सखोल, उत्तम ज्ञान व माहिती अभ्यासकाला मिळू शकते. आज स्पर्धेच्या युगात विविध क्षेत्रात संशोधन होऊन तुलनात्मक विषयात संशोधन करण्यासाठी नवनव्या संधी उपलब्ध होत आहेत. जगात यापुढे एकत्र राहण्याशिवाय व व्यापक दृष्टिकोन ठेवण्याशिवाय पर्याय नाही. जागतिकीकरणात परस्पर संबंध, परस्पर परिणाम व प्रभाव साहजिकच आहे आणि यासंदर्भात सांस्कृतिक आणि साहित्य हेच मुख्य साधन ठरणार आहे, याबाबत दुमत नाही.

**तुलनात्मक संशोधनाच्या सर्वसाधारण पायऱ्या –**

१८८६ साली प्रा. पॉज्नेट यांनी आपल्या 'कम्पॅरिटव्ह लिटरेचर' ग्रंथात या विद्याशाखेच्या व्याप्तीची आणि कार्यपद्धतीची पहिल्यांदा शास्त्रीय मांडणी केली. तुलनात्मक विषयांवर संशोधनात्मक अभ्यास करतांना साधारणपणे

सहा पायऱ्या महत्त्वाच्या आहेत.

१. साम्य आणि भिन्नतेवर आधारित विषयांचा शोध
२. संबंधित माहितीचे संकलन
३. उपलब्ध माहितीचे पृथ्थकरण करून मीमांसा
४. संकलित, विश्लेषित माहितीची योग्य मुद्यांआधारे तुलना
५. यातून उपलब्ध माहितीचे विश्लेषण
६. संशोधनाचा अन्वयशोध घेत निष्कर्ष आणि मांडणी

**तुलनात्मक अध्ययनासाठी किमान अट –**

काटेकोर विचार करावयाचा झाल्यास भिन्न परिसर आणि भिन्न पार्श्वभूमीतील कलाकृतींची तुलना करणे कितपत योग्य आहे, हा अनेक समीक्षकांचा प्रश्न वस्तुनिष्ठ आहे. साहित्य हे वेगवेगळया भाषांमध्ये असले तरी त्यात अंतिमत: मानवी मनाचा आविष्कार असतो. पण अशा कलाकृतींपैकी काहींमध्ये विशिष्ट समानतेचा धागा आणि काही संबंधही असतो; अशा साहित्यात तुलना होऊ शकते. त्यासाठी अभ्यासकात सर्वप्रथम तटस्थ दृष्टी आणि वस्तुनिष्ठता असली पाहिजे. तुलनेसाठी कमीत कमी दोन भाषा, दोन संस्कृती किंवा साम्य-भेद असणाऱ्या साहित्यकृती असल्या पाहिजेत. याचा अर्थ तुलना केवळ दोनच घटकात होते असे नाही तर त्यासाठी किमान दोन घटक अपरिहार्य असतात. ज्यांना तुलनात्मक विषयात दर्जेदार संशोधन करावयाचे आहे त्यांनी संबंधित विषयांचे भिन्नत्व, त्यांच्या भिन्न परंपरा, त्या साहित्यातील साम्य आणि विरोध यांचा शोध घेऊन अशा साम्य व भेदांची कारणमीमांसा करणे अभिप्रेत असते. यासंदर्भात स्वार्थमोअरने तयार केलेला तुलनात्मक साहित्य संशोधन सिद्धांत अभ्यासणे उपयुक्त ठरते. या सिद्धांतात त्याने व्यापक स्वरूपात साहित्य विषयक तुलना, समीक्षात्मक लेखन व सिद्धांत याविषयी विश्लेषण केले आहे.

ॲण्ड्र्यू डी. मॅक्रीड यांनी जुलै, १९८३ मध्ये सादर केलेल्या 'तुलनात्मक साहित्य आणि संगीतशास्त्र' या शोधनिबंधात ''तुलनात्मक साहित्यामुळे नवीन संकल्पना सिद्ध करण्यास उपयुक्त प्रतिसाद दिला जातो. त्याचबरोबर, तात्त्विक वर्तन, सामाजिक विज्ञानाधिष्ठीत वर्तन समृद्ध करण्यासही हातभार लागतो. एका विषयातील समस्येचे निराकरण करण्यासाठी दुसऱ्या विषयातील पद्धत उपयुक्त ठरु शकते.'' असे मत मांडले आहे.

**भाषाभ्यास आणि तुलनात्मक साहित्य –**

भाषाभ्यासात तुलना करणे हे अधिक उपयुक्त ठरते. जगात सर्वप्रथम युरोपातील प्रबोधनकाळात ग्रीक आणि रोमन साहित्य आणि युरोपीय भाषा प्राकृत यांच्यात तुलनात्मक अभ्यास केला गेला. प्राचीन काळी विविध युरोपीयन भाषा आणि संस्कृत यांच्या तुलनेतूनच 'आधुनिक भाषाविज्ञान' निर्माण झाले आहे. दोन पूर्णत: भिन्न पार्श्वभूमीवर हा पाया अवलंबून आहे. जगात आज हजारो समाज गट, दोनशे देश, कोटयवधी माणसे, त्यांच्या विविध भाषा, सुमारे तीन हजार उपभाषा आहेत. याचा विचार करता तुलनात्मक विषयातील संशोधनास किती वाव आहे, हे सहज ध्यानात येते.

जगभरात आजवर तुलनात्मक साहित्यात जे संशोधन झाले आहे त्यात ग्रीक, रोमन, लॅटिन, इंग्रजी, मॉडर्न लॅंग्वेजेस या भाषांमध्ये आणि विविध विषयांवरील साहित्य; विशेषत: नाटय साहित्यात सर्वोत्कृष्ट समजल्या जाणाऱ्या विषयांवर अधिक संशोधन झाले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेत नेटाने, सुसूत्रपणे आणि व्यापकतेने ही मांडणी केली गेली. अमेरिकेची निर्मिती आणि जडणघडण यामागे विभिन्न राष्ट्रांमधून आलेले प्रवाह आहेत. तौलनिकच्या अभ्यासाला जी बहुविविधता व बहुसांस्कृतिकता लागते ती अमेरिकेत विपुल असल्याने तेथे तौलनिकचा अभ्यास आणि विकास झपाटयाने झाला.

तौलनिक संशोधन व अभ्यास हा तटस्थ स्वरूपात करावयाचा असला तरी त्यात रुक्षपणा नाही. कारण अस्तित्त्वात असलेल्या एकाच समाजगटात काही साम्ये व काही भेदही असतात. ती जाणून घेणे हा काही प्रमाणात रंजक आणि नावीन्याचा भाग आहे. अभ्यासदृष्टीने तुलना केल्यास ते अधिक प्रकर्षाने जाणवतात. तुलना करणे, माहिती घेणे ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे. दैनंदिन आयुष्यातसुद्धा आपण कळत- नकळत कित्येकदा तुलना करुन वस्तुस्थिती जाणून घेतो किंवा तसा प्रयत्न करतो.

उदा. खरे/ खोटे, इष्ट/ अनिष्ट, न्याय/ अन्याय, वास्तव/ अवास्तव

**भारत आणि तौलनिक अभ्यास–**

एकोणिसाव्या शतकात औद्योगिक संस्कृतीच्या प्रभावाने युरोपात विद्या, वाङ्मय, तत्त्वज्ञान क्षेत्रातील आदानप्रदान व पाचही खंडातील दळणवळण वाढले. याचबरोबर, सांस्कृतिक क्षेत्रातही व्यापक विनिमय होऊ लागल्याची

लक्षणे दिसतात. पूर्वी दोन हजार वर्षांत झाले नव्हते एवढे सांस्कृतिक आदानप्रदान गेल्या शतकात झालेले आहे. याचाच परिणाम म्हणून रामायण, महाभारत, पुराणकथा, धर्मशास्त्र, तांत्रिक विद्या, आयुर्वेद असे आशय- विषय भारतातून जगापर्यंत पोहोचले. भारतातील जातककथा आणि पंचतंत्र यातील कथांनी दरम्यानच्या काळात युरोपीय साहित्यात मोलाची भर घातली. भारतातून हे साहित्य बदल होत वेगवेगळया रुपात तेथपर्यंत जाऊन पोहोचले. कलकत्त्यात १७८४ मध्ये स्थापन झालेल्या 'एशियाटिक सोसायटी'मुळे पुढील काळात भगवद्‌गीता, उपनिषदे, वेद, महाकाव्ये, अनेक हिंदू आणि बौद्ध धर्मग्रंथ युरोपपर्यंत सहज जाऊन पोहोचले. परिणामी, युरोपातील लोकांच्या ज्ञानाची खोली आणि कक्षाही वाढली. या सांस्कृतिक देवाणघेवाणीमुळे आपल्याकडील जिज्ञासा, विविधता आणि संपन्नता वाढण्यास मदत झाली. मादाम स्ताइल या फ्रेंच अभ्यासिकेने जर्मनीतील साहित्याचा अभ्यास लेखनातून मांडल्याने युरोपमध्ये अशा प्रकारचा अभ्यास सर्वप्रथम सुरू झाला. पुढे अल्पावधीतच फ्रेंच येथील सॉरबॉन विद्यापीठात या अभ्यासाला अधिकृत स्थान मिळाले आणि अभ्यासक्रम म्हणून त्याचा अभ्यास होऊ लागला. तौलनिक साहित्याभ्यासात फ्रेंच देशाने विशेष स्थान मिळविले आहे. त्यापाठोपाठ, शिलर, श्लेगल आणि महाकवी गटे या जर्मन अभ्यासकांनी तौलनिककडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन जगाला दिला. "आपली वैशिष्टये कायम ठेवून आपण इतरांच्या वैशिष्टयांचा कानोसा घेतला पाहिजे" असे विचार गटे या अभ्यासकांने मांडले.

अठराव्या शतकाच्या शेवटी सर विल्यम जोन्स याने "भारतीय भाषा आणि युरोपीयन भाषा एकवंशीय असल्याचा दावा" करून भारतविषयक विद्याशाखेचा पाया घातला. एकोणाविसाव्या शतकात इंग्रज सत्तेत भारतात काम पाहणाऱ्या अनेक अधिकाऱ्यांनी भारत आणि येथील साहित्याचा सखोल अभ्यास केला. अव्वल इंग्रजी काळात आपल्याकडील शिक्षणाची दिशा पूर्णत: बदलली. विविध विद्यापीठे भारतात स्थापन झाल्याने इंग्रजी भाषा आणि साहित्य यांचाही परिचय भारतीयांना झाला. मोठया प्रमाणात तिकडच्या ज्ञानाची, साहित्याची 'घेवाण' सुरू झाली. मेकॉले या अतिस्वाभिमानी कट्टर इंग्रज अधिकाऱ्याने अहंमभावाने भारतीय ज्ञानास कमी लेखण्यासाठी कळत- नकळत भारत आणि युरोपीय साहित्याची तुलना केली. १८४८ साली मॅथ्यू अरनॉल्ड या विचारवंताने एका पत्रात 'युरोपच्या तुलनेत इंग्लंड साहित्यात बरेच मागासलेले

आहे.' असे निरीक्षण नोंदविले. दोन साहित्याची तुलना करून एकमेकांस छोटे-मोठे दाखविणे हे तौलनिक साहित्याचे मुळीच काम नाही. पण या संदर्भांमुळे तुलना अगदी प्राचीन कालखंडापासून आणि जगभर सुरू असल्याचे अनेक दाखले मिळतात.

हेन्री एच. एच. रिमाक यांनी ''तुलनात्मक साहित्याभ्यास म्हणजे विशिष्ट भौगोलिक मर्यादेच्या पलीकडचा अभ्यास होय. असे सांगतानाच त्यात एका बाजूस साहित्याचा परस्परसंबंध व दुसऱ्या बाजूस ज्ञान, विश्वास/ समजूत/ श्रद्धा (कला, तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे, विज्ञान व धर्म) आहे. साहित्याच्या अभिव्यक्तीची, मांडणीची या उपरनिर्देशित घटकांशी कळत-नकळत तुलना केली जाते.'' असे विचार मांडले आहेत.

**समारोप व निष्कर्ष –**

तौलनिक संशोधन हे जगात बऱ्याच वर्षांपासून सुरू असले तरी भारतात शास्त्रीय पद्धतीने त्यावर फारसे काम झालेले दिसत नाही. येणाऱ्या जागतिक काळात देशा- देशांतील परस्परसंबंध, देवाणघेवाण ही वाढणारच आहे. आपण किंवा कोणीही ठरविले तरी या संक्रमणापासून दूर राहू शकणार नाही. त्यामुळे मानवाच्या सहज प्रवृत्तीनुसार 'आपले आणि दुसऱ्याचे' ही तुलना होतच राहणार आहे. फक्त 'आपला तो साहेब आणि दुसऱ्याचे ते कार्टे' हा दृष्टिकोन किंवा वरवरची तुलना न होता ती शास्त्रशुद्ध पद्धतीने, संशोधनात्मक अंगाने आणि तटस्थ वृत्तीने व्हायला हवी. प्राचीन काळापासून जगभरात भारतीय साहित्याचा एक विशिष्ट दबदबा आहे. तो सिद्ध करण्यासाठी आपण बहुभाषिकत्व, बहुसांस्कृतिकत्व बाळगून स्व-भाषेचे, साहित्याचे आणि जागतिक भाषा आणि साहित्याचे बारकावे समजावून घेणे आणि त्यादृष्टीने अभ्यासपूर्ण मांडणी करणे अपरिहार्य आहे, असे प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते.

* * *

# तौलनिक साहित्य संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये

**–प्रा. नंदा कुंडलिक कराड**

**प्रास्ताविक:–**

तौलनिक साहित्य एक स्वतंत्र अभ्यास पद्धती म्हणून केव्हा वापर झाला हे निश्चितपणे सांगता येत नाही. तौलनिक साहित्य संकल्पनेचा उगम जर्मन महा कवी ग्योएथे, फ्रेंच विदुषी मादाम द स्टाईल, प्रसिद्ध इंग्रज टिकाकार मॅथ्यू अर्नोल्ड अशा निरनिराळ्या देशातील थोर, उदार साहित्य चिंतकांच्या उद्‌गारात शोधला जातो. तौलनिक साहित्याचा झपाट्याने विकास झाला. फ्रान्स, जर्मनी, अमेरिका या देशात त्याच्या स्वतंत्र प्रणाली जन्माला आल्या. वसाहतवादाच्या काळात तौलनिक साहित्य उदय पावले आणि वाढले. तौलनिक साहित्याचा एकसंघ इतिहास मांडणे ही गोष्ट अशक्य आहे. कारण ते एका विशिष्ट देशात एक सलग चळवळ म्हणून उदयास आलेले नाही. भिन्न देशातील त्याचा विकासही समांतर नाही. त्याची सर्वच गुण वैशिष्ट्ये सर्वच देशात समान आढळत नाहीत. संबंधित देशाची स्थिती गती, प्रगती, राजकीय प्रणाली वगैरे बाबींवर तौलनिक साहित्याचा विकास अवलंबून राहिलेला आहे. आज जगातील सर्व राष्ट्रांमध्ये तौलनिक साहित्य हे रूजत चाललेले आहे.

**तौलनिक साहित्य संकल्पना:–**

तौलनिक साहित्य ही संज्ञा इंग्रजीतील 'कम्पॅरेटिव्ह लिटरेचर\$ या संज्ञेसाठी मराठीत वापरली जाते. परंतु ही संज्ञा पुष्कळच वादग्रस्त ठरली आहे. ए बोगस टर्म दॅट मेक्स नायदर सेन्स नॉट सिंटेक्स म्हणजे तौलनिक साहित्य ही संज्ञा अर्थशून्य आणि व्याकरणदुष्ट आहे. असा कडवट शेरा लून कूपर यांनी दिला. मराठीमध्ये तौलनिक साहित्य म्हणजे तुलनेच्या आधाराने केलेल्या साहित्याचा अभ्यास होय.

तौलनिक साहित्य ही संकल्पना समजून घेताना संपूर्ण मानवी जीवन व्यवहारातील अपरिहार्य असा घटक असलेली तुलना साहित्य क्षेत्रात कशा प्रकारे केली जाते व का केली जाते याचा विचार करताना तुलना म्हणजे नेमके काय? या प्रश्नाचे उत्तर शोधून काढले पाहिजे. मराठी शब्दरत्नाकर या शब्दकोशामध्ये

वा.गो.आपटे यांनी तुलना या शब्दाचा अर्थ बरोबरी, सादृश्य असा दिला आहे. डॉ.र.बा. मंचरकर यांनी तुलना या अर्थाचे स्पष्टीकरण देताना मोजणे, जोखणे, तोलणे, बरोबरीचे मानणे, साम्यभेद यांची पडताळणी करणे म्हणजे तुलना होय असे म्हटले आहे. मंचरकरांनी केलेले हे स्पष्टीकरण तुलना या शब्दाच्या बऱ्याच अर्थांगाची नोंद घेणारे आहे. मित्शेलने तुलना म्हणजे काही बाबीचे साम्य जोखणे व फरक करणे. त्यांना एकीकडे सारखे किंवा एकच समजणे आणि दुसरीकडे व्यवच्छेदक व निराळे पाहणे असा अर्थ सांगितला आहे. तुलना या शब्दाबद्दलच्या स्पष्टीकरणातून तुलनेमध्ये नेमकी कोणती मानसिक अथवा बौद्धिक कृती होते याचा बोध होतो.

तौलनिक साहित्य ही एक स्वतंत्र आंतरविद्याशाखा आहे. एकापेक्षा अधिक साहित्याच्या संबंधातून, संपर्कातून जे प्रश्न निर्माण होतात ते केंद्र स्थानी ठेवून केलेल्या तौलनिक अभ्यासाला तौलनिक साहित्य म्हणतात. एका साहित्याच्या अंतर्गत तुलना ही तौलनिक पद्धतीची सीमा मानावी. एकापेक्षा अधिक साहित्याच्या तुलनेपासून तौलनिक साहित्याचे क्षेत्र सुरू होते. कोणत्याही दोन साहित्याची तुलना म्हणजे तौलनिक साहित्य होय. साहित्य आणि साहित्य यांच्या तुलनेशिवाय साहित्य आणि कला, साहित्य आणि ज्ञानशाखा, साहित्य आणि जीवनक्षेत्रे अशा वेगळ्या प्रकारच्या तुलना तौलनिक साहित्यात येतात. तौलनिक साहित्य आंतरविद्याशाखीय ज्ञान शाखा आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या तुलना या साहित्यात समाविष्ट करणे योग्य ठरेल. एका साहित्यांतर्गत तुलना अनेक साहित्य संबंध तुलना आणि साहित्य आणि कला, ज्ञानशाखा व मानवी जीवनक्षेत्रे यांची तुलना असे त्याचे तीन भागात वर्गीकरण करता येईल. असे केल्याने तौलनिक साहित्य विचाराचे एक जिनसी साहित्यशास्त्र घडवता येईल.

तौलनिक साहित्याच्या संदर्भामध्ये जगातील वेगवेगळ्या विचारवंतानी या संकल्पनेची अंगे लक्षात घेऊन केलेल्या व्याख्यांचा परामर्श घेतला तर ही संकल्पना चांगल्याप्रकारे समजू शकते. पॉल वॅन टीघेम यांनी तौलनिक साहित्याबद्दल म्हटले आहे की, तौलनिक साहित्याचा अत्यावश्यक हेतू म्हणजे निरनिराळ्या साहित्याच्या एकमेकांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास हाच आहे. त्यानंतर एम.एफ.ग्यूयर्द यांनी तौलनिक साहित्याबद्दल म्हटले की, तौलनिक साहित्य हा आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंधाचा इतिहास होय. ही व्याख्या तुलनात्मक साहित्य अभ्यासाला आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापकत्त्व देत असली तरी ती केवळ एक

इतिहास आहे असे म्हणणे योग्य नाही. हेन्री एच.एच.रेमाक यांनी तौलनिक साहित्याची व्याख्या केलेली आहे. तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट देशाच्या बंदिस्त सीमेपलीकडचा अभ्यास होय. त्या एकीकडे साहित्यातील परस्पर संबंधाचा, तर दुसऱ्या बाजूला कला, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, विज्ञान, धर्म वगैरे अशा ज्ञान व श्रद्धा क्षेत्रांचा अभ्यास असतो. थोडक्यात ही एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्याशी आणि वाङ्मयाची इतर मानवी आविष्कार क्षेत्रांशी केलेली तुलना असते. रेमाक यांची व्याख्या विविध अंगाना स्पर्श करणार आणि त्यातील व्यापकता लक्षात घेणारी आहे. जे.एम.कॅरे यांच्या मते तौलनिक साहित्य हे वाङ्मयइतिहासाची एक शाखा आहे. चैतन्यमय आंतरराष्ट्रीय संबंधाचा तो अभ्यास होय. बायरन व पुश्किन गोएथे व वॉल्टर स्कॉट, कलाईल अनेक प्रतिभावंत साहित्यकृती इतकेच काय पण अनेक साहित्यातील लेखकांचे जीवन त्यांच्या वास्तव संबंधाचा तो अभ्यास करतो. वरील सर्व व्याख्यांवरून डॉ.आनंद पाटील यांनी तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समकालीन संस्कृतिसापेक्ष स्वत्त्वाच्या प्रादेशिक आधाररेषा पक्क्या आखून सांस्कृतिक राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी वाङ्मय आणि इतर कला साहित्य आणि शास्त्र, विज्ञान, साहित्य आणि नवी जुनी ज्ञानक्षेत्रे तसेच मानवी अभिव्यक्तीच्या पद्धतीच्या परस्पर व्यामिश्र संबंधाची अनेक विद्याशाखीय दृष्टिकोन वापरून विविध पातळ्यांवर केलेली तुलनात्मक चिकित्सा होय. पाटलांची ही व्याख्या तुलनात्मक साहित्याची व्याप्ती वाढविणारी आहे.

वरील व्याख्यांवरून तौलनिक साहित्यामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो. हे लक्षात येते. तसेच तौलनिक साहित्याचे स्वरूप समजण्यास मदत होते. तौलनिक साहित्याचे स्वरूप नीटपणे समजण्यासाठी निसर्गातील अथवा मानवी जीवनातील कुठलाही एखादा घटक असो किंवा साहित्यातील वेगवेगळे वाङ्मयप्रकार असोत त्यांचे स्वरूप त्या त्या घटकांची म्हणून जी काही वैशिष्ट्ये असतात त्यावरून समजून घेतले जाते. अर्थात निसर्गातील व मानवी जीवनातील कुठलाही एखादा घटक असो किंवा साहित्यातील वेगवेगळ्या वाङ्मरप्रकारांमध्ये काही सर्वसमावेशक वैशिष्ट्ये असतात.

मराठी वाङ्मयामध्ये अलीकडेच, तौलनिक साहित्य संशोधन ही संकल्पन रूढ झाली आहे. मूळस्वरूपातील किंवा अप्रकट रूपाने ती सुरुवातीपासून होती. पण प्रकट स्वरूपाने १९४५-५० च्या आसपास ती मराठी वाङ्मयामध्ये दिसू

लागते. तौलनिक साहित्याचा अभ्यास रोमन व युरोपमध्ये झाला. इंग्रजी साहित्यातून मराठी साहित्यात ज्या विविध संकल्पना अवतरल्या आहेत. त्यामध्ये तौलनिक साहित्यभ्यास ही संकल्पना त्या अपवाद नाही. तौलनिक साहित्य देश भाषांच्या पलीकडे जाऊन समग्र साहित्याचा एकात्म अभ्यास करू लागले. त्यामुळे त्यांच्या सीमारेषा विश्वसाहित्य आणि सर्वसाधारण साहित्य या दोन प्रकारामध्ये मिसळू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळात ही संकल्पना अवतरली असे म्हणता येते. तौलनिक साहित्यासाठी युरोपमध्ये Comparative Literary Studies ही संज्ञा वापरली जाते. ती संज्ञा मराठीमध्ये तौलनिक साहित्याभ्यास या नावाने ओळखली जाते.

तौलनिक साहित्याचा अभ्यास हा देश, भाषा आणि काळ यांच्या सीमा ओलांडणारा आहे. तौलनिक साहित्य म्हणजे आंतरराष्ट्रीय जुळवाजुळवीचा पद्धतशीर अभ्यास करणारी शोध शाखा होय. साहित्य ही एक आंतरसांस्कृतिक आणि आंतर भाषा वैज्ञानिक दृश्य घटना असते. तौलनिक साहित्याचा इतिहास, तत्त्वज्ञान व समीक्षा यांच्या साहाय्याने केलेला संश्लेषक अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्य अभ्यास होय असे Pichois आणि Roussey यांनी म्हटले आहे.

तौलनिक साहित्य सौंदर्यशास्त्र, समाजशास्त्र आणि विचारतिहास यांना स्पर्श करते या सर्वांकडून ती काहीना काही ऋण घेते. तथापि जे घेतले त्याचे ती स्वतंत्रपणे व्यवस्थापन करु शकत नाही. तिला तिची अशी खास अभ्यास पद्धती आहे. तौलनिक साहित्याचे अभ्यासक्षेत्र अत्यंच व्यापक आणि जवळजवळ सर्व समावेश आहे. त्याच्या अभ्यासाचे काही अचूक तंत्र नाही. त्यामुळे तौलनिक साहित्याला स्वतःची अशी पद्धती घडविता आलेली नाही. तौलनिक साहित्याचा संबंध केवळ साहित्याशी नाही तर समाज, राष्ट्र आणि संस्कृती यांच्याशी आहे.

**तौलनिक साहित्याची वैशिष्ट्ये:-**

तौलनिक साहित्याचे काही ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साहित्याभ्यास:- तौलनिक साहित्यात कोणत्याही दोन अथवा अधिक भाषांचा अभ्यास करता येतो. उदा.मराठी-कन्नड, मराठी- गुजराती, मराठी-हिंदी, बंगाली-हिंदी, हिंदी- पंजाबी इत्यादी एकाच भारतीय भाषेतील साहित्याबरोबर अन्य भारतीय भाषांतील साहित्याबरोबर

विदेशातील साहित्याशी तुलना होऊ शकते. उदा.गीता, बायबल, ऑडिसी, हॅम्लेट इ.

२) दोन किंवा अधिक वाङ्मयातील संबंधाचा अभ्यासः– तौलनिक साहित्य हा अभ्यास प्रकार दोन किंवा अधिक वाङ्मयातील संबंधाचा अभ्यास करते. तौलनिक साहित्यात राष्ट्रीय साहित्य आणि सर्वसाधारण साहित्य या दोन्हीचा तसेच राष्ट्रीय आणि विश्व पातळीवरील तौलनिक अभ्यासाचा समावेश होतो.

३) प्रत्यक्ष निरीक्षणास वावः– तौलनिक साहित्यात प्रत्यक्ष निरीक्षणाला अधिक महत्त्व असते.

४) अनंत व शृंखलाबद्ध ज्ञानास प्रकाशित करणेः– मनुष्याच्या ज्ञानासंबंधी सर्व शोधकार्याचे परम ध्येय अज्ञान सत्याचा शोध घेणे हा आहे. तुलनात्मक साहित्यात संशोधनाचा मूळ उद्देश अनंत व शृंखलाबद्ध ज्ञानास प्रकाशित करणे हा होय.

**सारांशः–**

वरील विवेचनावरून असे निष्कर्ष निघतात की, तौलनिक साहित्य हे साहित्य समीक्षेची एक उत्तम व श्रेष्ठ साधन आहे. तौलनिक साहित्य अभ्यास पद्धती ही एकांगी किंवा एकसूरी नसून असंख्य अभ्यास विषयाचे आव्हान पेलणारी आहे. साहित्याभ्यासाच्या संदर्भात तौलनिक पद्धतीचा अवलंब अधिक झाल्याने ही ज्ञानशाखा वाङ्मयीन जगतात अधिक लक्षवेधी ठरली आहे. वाङ्मयीन विश्वात तौलनिक साहित्याचे महत्त्व सांस्कृतिक एकता टिकविण्यासाठी व विकसित करण्यासाठी अनन्य साधारण आहे. तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना ही भिन्न परंतु सर्वसंमत अशा तत्त्वाच्या आधारावरून पुढे आलेली आहे.

* * *

# तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व दलित, ग्रामीण कादंबरी

प्रा.अपर्णा पांडे

मानवी जीवनात तुलनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. मानवी जीवनात तुलना अगदी अनादि काळापासून दिसते. आपली आवड, अभिरुची, निर्णय घेण्याची क्षमता किंवा एखादी कलाकृती जेव्हा आपण चांगली वाटली असे म्हणतो तेव्हा आपण तुलनाच करत असतो. एखाद्या साहित्यकृतीची आपण निवड करतो तेव्हा त्या साहित्यकृतीचा विषय, भाषाशैली, तिच्यातील जीवन व वाङ्मयीन मूल्ये, लेखक, त्या साहित्यकृतीवर इतरांनी केलेल्या प्रतिक्रिया या साऱ्याचा विचार करत असतो.

फार प्राचीन कालापासून दोन किंवा अधिक साहित्यिक, साहित्यकृती यांची श्रेष्ठतेच्या दृष्टीने तुलना करण्याची परंपरा दिसते. संस्कृत मधील प्रसिद्ध वचन उपमा कालिदासस्य, भारवेरर्थ गौरवम् । दण्डिनः पदलालित्य माघे सन्ति त्रयो गुणः ।। यातून कालिदास, भारवि, दंडी व माघ यांची तुलना आलेली दिसते. पण अशा तुलनांमध्ये शास्त्रीय व सैद्धान्तिक आधाराऐवजी व्यक्तिसापेक्षतेवर भर असलेला दिसतो. साहित्यकृतीच्या अनन्यसाधारणत्वाची कल्पना स्वीकारूनही तुलना होताना दिसते. साहित्याची, साहित्यिकांची तुलना करूनच आपण त्यांचे स्थान ठरवत असतो. परंतु या तुलनेपेक्षा तौलनिक साहित्याभ्यासात होणाऱ्या तुलनेचे उद्दिष्ट वेगळे असते.

**तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप :**

इनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिका मध्ये Comparative ही संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे The general term comparison implies that the units being compared have more similarities than differences or may be classified together. तर कृ.पां. कुलकर्णी यांच्या मराठी व्युत्पत्तिकोषात तुलना या संज्ञेचा खुलासा वजन करणे, मोजणे, बरोबर मानणे असा केलेला दिसतो. व्यावहारिक जगात तुलनेचा अर्थ साम्यभेद पडताळणे, तोलणे, मोजणे या क्रियांपुरता सीमित दिसतो. पूर्वी वाङ्मयातही हा अर्थ

व्यापक अर्थाने वापरला जात नव्हता. दळणवळणाची साधने वाढली, बदलली तसे सांस्कृतिक आदान-प्रदानही वाढू लागले. जागतिकीकरणामुळे बहुसंस्कृतिवादाचा रेटा वाढत गेला व तुलनेच्या कक्षा विस्तारू लागल्या. मित्शेने तुलनेसंबंधी आपली मते मांडताना म्हटले आहे- "काही बाबींचे साम्य जोखणे व फरक करणे, त्यांना एकीकडे सारखे किंवा एकच समजणे आणि दुसरीकडे व्यवच्छेदक व निराळ्या पाहणे या दुपेरी प्रक्रियेला मी तुलना समजतो." असे म्हणून perceptual (जाणीवरूपी संवेद्य) discursive (विवेचक तुलना), disciplinary (शास्त्रीय प्रणालीबद्ध तुलना) असे तीन सिद्धान्त मांडले आहेत. क्रमबद्ध व पद्धतशीरपणे केलेली तुलना तौलनिक साहित्याभ्यासात अभिप्रेत असते. तौलनिक साहित्याभ्यासात मूल्यकल्पना निश्चित करण्यासाठी साहित्यातील श्रेष्ठ कनिष्ठत्व ठरविण्यासाठी तुलना केली जात नाही. या गोष्टी येथे गौण आहेत. तुलना हे अभ्यास पद्धतीचे प्राणभूततत्त्व आहे. एकभाषिक सीमा उल्लघून अन्य भाषिक साहित्याच्या क्षेत्रात प्रवेश तौलनिक साहित्याभ्यासात अभिप्रेत असतो. इंग्रजी comperative Literature साठी हा मराठी पर्यायी शब्द आहे.

१९ व्या शतकात ही अभ्यासपद्धती उदयाला आलेली दिसते व २०व्या शतकात ती हळू हळू विकसित होत गेली. वेर्नर फ्रीडरिश, रने वेलेक, ए.आल्ड्रिज ऑवन, एस.एस.प्रावर, हेन्री रेमार्क, हॅरी लीव्हिन आदि विचारवंत तसेच बुद्धदेव बोस यांनी आपली मते मांडलेली दिसतात. फ्रान्स आणि अमेरिका या अभ्यासाची मुख्य पीठे आहेत. तसेच जर्मनी, इतर युरोपियन राष्ट्रे यात तौलनिक साहित्याभ्यास वेग घेऊ लागला आहे. त्या मानाने भारतात या शाखेचा म्हणावा तसा विस्तार झालेला दिसत नाही. तौलनिक साहित्याभ्यासाबद्दल एकच एक अशी व्याख्या सांगणे अवघड आहे. अनेक अभ्यासकांनी याविषयी आपली मते मांडलेली दिसतात.

तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे दोन किंवा अधिक साहित्यांमधील परस्पर संबंधांचा अभ्यास असा अर्थ फ्रेंच अभ्यासकांनी रूढ केलेला दिसतो. एस.एस. प्रावर यांच्या मते, An examination of literary texts (including works of literary theory and critism) in More than one language, through an investigation of contrast analogy, provenance or influence; or a study of literary relations and communications between two or more groups that speak different languages. प्रावरने आपले



LIBRARY AKOLE

मत मांडताना वैधर्म्य, साधर्म्य प्रभव किंवा प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास असे म्हटले आहे.

तर हेन्री रेमाकने विस्तृतपणे याचे स्वरूप विशद करताना तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट देशाच्या बंदिस्त सीमेपलीकडचा अभ्यास होय. त्यात एकीकडे साहित्यामधील परस्परसंबंधांचा, तर दुसऱ्या बाजूला कला (म्हणजे चित्र, शिल्प, वास्तुरचना,संगीत) तत्त्वज्ञान, इतिहास समाजशास्त्रे (म्हणजे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र) विज्ञान धर्म वगैरे अशा ज्ञान व श्रद्धाक्षेत्रांचा अभ्यास असतो. थोडक्यात ही एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्यांशी आणि वाङ्मयाची इतर मानवी आविष्कारक्षेत्रांशी केलेली तुलना असते. हा विचार मांडलेला आहे. तसेच तौलनिक साहित्य म्हणजे आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंधाचा इतिहासच होय. किंवा तौलनिक साहित्य हे वाङ्मय इतिहासाची शाखा आहे, चैतन्यमय आंतरराष्ट्रीय संबंधांचा तो अभ्यास होय.

अशा विविध व्याख्यांमधून वेगवेगळ्या गोष्टींवर भर दिला जातो. काही ठिकाणी इतिहास, वाङ्मय संकल्पना तर काही ठिकाणी आंतरराष्ट्रीय संबंध तर काही ठिकाणी कला व इतर समाजशास्त्रे तर काही ठिकाणी कलाकृतीतील साधर्म्य, वैधम्य, प्रभव, प्रभाव अशा संकल्पनांवर भर दिसतो.

**डॉ.आनंद पाटील यांनी आपल्या तौलनिक साहित्य:**

नवे सिद्धांत आणि उपयोजन या पुस्तकात या विविध व्याख्यांचा विचार करून भारतीय संदर्भात तौलनिक साहित्याची व्याख्या केलेली दिसते– तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समकालीन संस्कृतिसापेक्ष स्वत्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून, सांस्कृतिक राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी वाङ्मय आणि इतर कला, साहित्य आणि शास्त्रे–विज्ञाने साहित्य आणि नवी– जुनी ज्ञानक्षेत्रे तसेच मानवी अभिव्यक्तीच्या पद्धतींच्या परस्पर व्यामिश्र संबंधांची अनेक विद्याशाखीय दृष्टिकोन वापरून विविध पातळ्यांवर केलेली तुलनात्मक चिकित्सा होय.

यावरील तौलनिक साहित्याभ्यासाची स्वरूप एकजिनसी नाही. यात अभ्यासाचे उद्दिष्ट, भूमिका, दृष्टिकोन यात खूप विविधता दिसते. उदा. फ्रेंच तुलनाभ्यास हा तौलनिक साहित्याभ्यासाला साहित्येतिहासाची शाखा मानतो.

तौलनिक साहित्याभ्यासाचा अभ्यास करताना १) सर्वसाधारण साहित्य

२) राष्ट्रीय साहित्य ३) विश्वसाहित्य ४) तौलनिक साहित्य या संकल्पनांचा विचार महत्वाचा आहे.

**सर्वसाधारण साहित्य :** सर्वसाधारण साहित्याभ्यास हा राष्ट्र व भाषा यांची मर्यादा ओलांडणारा असतो. भाषानिरपेक्ष दृष्टीने साहित्यविषयक विधानांची चिकित्सा व व्यवस्थापन करण्याचा येथे प्रयत्न असतो. अनेक देशातील व भिन्न भाषांतील साहित्यातील निरनिराळ्या सेंद्रिय घटकांच्या विश्लेषणाला यात महत्त्व असते.

सर्वसाधारण साहित्य व तौलनिक साहित्यातील अंतर स्पष्ट करण्याचा प्रयत्न अनेक अभ्यासकांनी केलेला आहे. तौलनिक साहित्याला आधार पुरविण्याचे कार्य हे साहित्य करत असते. यात विविध प्रवृत्ती, चरित्रकोश आदिंचा विचार होतो. अशा अभ्यासातून साहित्यकृतीची तुलना करण्याचा दिसतो.

**राष्ट्रीय साहित्य** – राष्ट्रीय साहित्य विशिष्ट देशाचे, भाषेचे आणि संस्कृतीचे असते. आपली ओळख ही राष्ट्रावरच आधारलेली असते. माणसाप्रमाणे राष्ट्राचाही स्वभाव असतो. प्रत्येक राष्ट्राच्या भाषावैशिष्ट्यामुळे त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य सिद्ध होत असते. भाषा एक असली तरी राष्ट्रीय गुणधर्मांच्या वैशिष्ट्यामुळे त्या त्या राष्ट्रातील साहित्य आपण भिन्न मानत असतो. उदा. इंग्रजी साहित्यच असले तरी अमेरिकन, ब्रिटिश अशी नामानिधान आपण देतो. भौगोलिकता, ऐतिहासिक परंपरा, भाषिक विशेष, साहित्य विकासाच्या परंपरा या साऱ्या गुणधर्मांची चर्चा आपण करत असतो. त्याचवेळी व्यक्तिविशेष, समाजविशेष, राष्ट्र व वंशविशेष याचाही विचार करत असतो. वर वर अंतर्विरोधी वाटणाऱ्या या जाणिवेतच सकलत्वाची संकल्पना सामावलेली आहे. मानवाप्रमाणेच स्थलकालादि वैशिष्ट्यांनी साहित्य अवतरत असते. ह्या संकल्पनेच्या आधारावरच राष्ट्रीय साहित्य ही संकल्पना उभी आहे. राष्ट्र ही संकल्पना वास्तवात एक भाषा, एकात्म लोकसमूह याच्याशी निगडित आहे. पण प्रत्यक्षात भाषाभेदांमुळे काय घडत आहे हे आपण पाहतोच आहे. एक भाषिक राष्ट्रीय साहित्य हा तुलनात्मक अभ्यासाचा एक घटक मानला जातो. तसेच अनेक भाषा व साहित्य परंपरांशी मिळून बनलेले राष्ट्रीय साहित्य हा अभ्यासाचे क्षेत्र बनू शकते. प्रांतीय साहित्याकडे पाहण्याची व्यापक दृष्टी व पार्श्वभूमी समजून घेऊन साहित्य परंपरेचे आकलन होण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यास आवश्यक आहे. स्वत:च्या अनुभूतीच्या विस्तारासाठी राष्ट्रीय साहित्य भाष्यकारांनी इतर साहित्याकडे

वळले पाहिजे. म्हणजे सर्व समावेशक दृष्टिकोन विकसित होईल.

**विश्वसाहित्य** – विश्व साहित्य संकल्पनेचे अनेक अर्थ व्यक्त केले गेलेले दिसतात. 'विश्वातील अक्षर वाङ्मय म्हणजे विश्वसाहित्य' व यामुळे भिन्न देशातील साहित्यातील साधर्म्य अथवा वैधर्म्य याची जाणीव होते. 'पृथ्वीवरील कोणत्याही साहित्याचे अध्ययन' कालोघात टिकलेले अभिजात साहित्य जेव्हा श्रेष्ठ ठरते तेव्हाच त्याचा समावेश विश्वसाहित्यात होतो. कार्ल मार्क्स याने विश्वसाहित्याचा विचार केलेला आहे. त्याला साहित्यकृतीची चर्चा, आर्थिक सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भात, तौलनिक पायावर व्हावी असे त्याचे म्हणणे होते. आपल्याकडे रविंद्रनाथ टागोर यांनी विश्व साहित्य ही संकल्पना मांडली. जर्मन कवी गटे याने आपली विश्वसाहित्याची कल्पना मांडली. त्याची संकल्पना व्यापक होती. जगातील यच्चयावत साहित्याचा अभ्यास किंवा जगातील अक्षर साहित्यकृतीचा अभ्यास असा अर्थ त्याला अभिप्रेत नाही तर आपल्या राष्ट्रीय साहित्याखेरीज इतर राष्ट्रांमधील साहित्यिक परंपरांचे आपल्याला भान असले पाहिजे. अन्य भाषातील राष्ट्रातील कृतींचे आपण स्वागत केले पाहिजे व राष्ट्राराष्ट्रात केवळ व्यापाराची देवाण–घेवाण न होता साहित्य विषयक देवाण–घेवाण झाली पाहिजे असे त्याचे म्हणणे होते. तौलनिक साहित्याभ्यासात ज्या गोष्टींचा विचार केला जातो. त्याला जवळ जाणाऱ्या या कल्पना आहेत. विश्वसाहित्य या सकल्पनेत जगातील उत्तमोत्तम कृती म्हणजेच स्थलकालाची सीमा ओलांडून सर्वत्र आस्वाद्य ठरलेल्या कृतींचा विचार व्हावा. उदा– गीता, बायबल, रामायण, हॅम्लेट इ. आज विश्व जवळ येत आहे. केवळ भौगोलिक पातळीवरच नव्हे तर राजकीय, सांस्कृतिक, वैचारिक साहित्यिक पातळीचा विचार महत्त्वाचा आहे. आपले साहित्य व संस्कृती जाणून घ्यायची असेल तर इतर साहित्य आणि संस्कृती जाणून घेणे आवश्यक आहे. विश्वसाहित्य अर्वाचीन साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासाचे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. यात जगातील विविध भाषांतील अभिजात कलाकृती, साहित्य परंपरा, चळवळी आदिंचा विचार केला जातो. विश्वसाहित्याच्या तौलनिक अभ्यासामुळे आपला वाङ्मयाबद्दलचा दृष्टिकोन विशाल होतो. माणसामाणसातील दुरावा मिटून मने जवळ येण्यास गती मिळते.

**तौलनिक साहित्य** – तौलनिक साहित्य संबंधाने विविध विचार प्रवाह दिसतात. उदा. फ्रेंच अभ्यासक साहित्य इतिहासाशी तुलनात्मक साहित्याचा

संबंध जोडतात. तौलनिक साहित्याच्या आधारे निरनिराळ्या राष्ट्रातील साहित्यातील देवाण-घेवाण आणि त्यांचे परस्पर संबंध शोधले जातात. खरतर या ठिकाणी भिन्न भाषा व देशांतील साहित्यांच्या तुलना अभिप्रेत आहेत. अर्थात तुलनेसाठी घेतलेल्या गोष्टी या तुल्यबळ असाव्या लागतात. तौलनिक साहित्यात साहित्यकृती, लेखक, प्रवाह, किंवा चळवळी, मध्यवर्ती कल्पना इ. तुलना दुसऱ्या देशातील साहित्यकृती, लेखक, प्रवाह किंवा चळवळी मध्यवर्ती कल्पना यांच्याशी केली जाते. विश्वसाहित्य या संकल्पनेत जगातील अशाप्रकारे या चार साहित्यविषयक संकल्पनांमुळे तौलनिक साहित्याभ्यास ही संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते.

LIBRARY

**तौलनिक साहित्याभ्यासाची उद्दिष्टे** – भाषिक भेद बाजूला ठेवून साहित्याच्या वृद्धीचा व विकासाचा विचार यात केला जातो. लेखकांनी किंवा साहित्यांनी अन्य भाषिक लेखकांवर वा साहित्यावर कोणता प्रभाव पाडला अथवा परिणाम केला ह्याचा शोध घेणे व ह्या प्रभावासंबंधाने चिकित्सा करणे हे तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट अनेक अभ्यासकांनी मानलेले आहे. या पद्धतीत परस्परांतील संबंधाचे स्वरूप स्पष्ट करायचे असल्याने साहित्याबरोबरच अन्य जीवनक्षेत्राशीही याचा संबध येतो. त्यामुळे आस्वादकाची दृष्टी व्यापक बनते. तौलनिक साहित्याभ्यास साहित्यपंरपरेचे त्या त्या भाषिक समाजाशी असलेले नाते स्पष्ट करतो व या अभ्यासाच्या तीन ठळक दिशा सुजीत मुखर्जी यांनी सांगितल्या आहेत.

१) साहित्यकृतींच्या द्वारे प्रस्थापित होणारे आंतरराष्ट्रीय संबंध

२) समाज सांस्कृतिक चळवळींनी निर्माण केलेला साहित्याभ्यास

३) साहित्याच्या राष्ट्रीय वैशिष्ट्यांचा तौलनिक अभ्यास या अभ्यासाचा मुख्य उद्देश आपल्या साहित्यविषयक दृष्टिकोनाचा विकास व्हावा नवी क्षितिजे दिसावीत हाच असतो.

तौलनिक साहित्याभ्यासात केवळ साम्य भेद दाखविणे एवढाच हेतू नसतो तर त्याबरोबर त्याची मीमांसा केलेली असते. त्यामुळे साहित्याची समज संपन्न होते. मीमांसेमुळे मूल्यमापनाची नवी दृष्टी मिळते. या अभ्यासात भिन्न भिन्न राष्ट्रातील वाङ्मयाचे संबंध स्पष्ट करणे प्रमुख उद्देश आहे. डॉ. सु.रा. चुनेकरांनी तुलनाक्रम साहित्य संशोधन हे राष्ट्रीय संस्कृती, एकात्मता, सोहार्द व सहकार्य यास अत्यंत पोषक आहे असे म्हटले आहे. तौलनिक साहित्याभ्यासामुळे

आंतरराष्ट्रीय सहिष्णुता व सामंजस्य निर्माण होईल अशी आशा अभ्यासक व्यक्त करतात.

**तौलनिक साहित्याभ्यासाचे अभ्यास क्षेत्र –** तौलनिक साहित्याभ्यासाला स्वतंत्र विद्याशाखा मानावे किंवा नाही याबाबत वाद दिसतो पण या अभ्यासाचे राष्ट्रीय व वैश्विक पातळीवरील विकासाच्या दृष्टीने असलेले महत्त्व सर्वांनी विशद केले आहे. तुलनात्मक अभ्यासात दोन किंवा अधिक साहित्याची तुलना करून, साम्य, वैधर्म्य, प्रेरणा, प्रभाव आदिंचे तटस्थ व शोधक दृष्टीने विवेचन महत्त्वाचे असते. एकास कमी लेखणे व दुसऱ्यास श्रेष्ठ लेखणे या अभ्यासाचा उद्देश नसतो, तर ही तुलना स्वेच्छेने व जिज्ञासेपोटी होणे आवश्यक असते. तौलनिक साहित्याभ्यासात सामान्यत: कालखंड अथवा युग, लेखक/कवी, विशिष्ट कलाकृती, साहित्य- समीक्षा, विशिष्ट विचारप्रवाह, विविध वाङ्मयप्रकार (काव्य, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध इ.) काव्यशास्त्र, प्रेरणाभाव, वाङ्मयाचा इतिहास, लोकसाहित्य, अशा विविध अंगांनी अभ्यास करता येतो. तौलनिक साहित्याभ्यास हा एकाच वेळी अनेक क्षेत्रांना स्पर्श करणारा विषय असल्याने यात व्यामिश्रता आहे. साहित्य व संस्कृती यांची आंतरराष्ट्रीय देवघेव स्पष्ट करणे. लेखक लेखकांमधील आंतरक्रियेचा अभ्यास, साहित्यकृतीचा उगम, प्रसार, प्रभाव याचा विचार साहित्य व इतर कला यांचा एकमेकांवर होणारा प्रभाव याबरोबरच साहित्य व कलाभिव्यक्तीची इतर ज्ञानक्षेत्रे व घटना यांचा परस्पर संबंध तौलनिक अभ्यासात शोधला जातो. अनन्यसाधारण असलेली पण विशिष्ट सामाजिक वातावरणातून जन्मलेली अशा कलाकृतीचे स्वरूप स्पष्ट करणे आवश्यक आहे.

साहित्य ही एक वैश्विक घटना कशी आहे व त्यामुळे तिच्यावर अधिक प्रकाश कसा टाकता येतो. व आकलन अधिक नेमके कसे होते हे या अभ्यासातून व्यक्त होते. तौलनिक साहित्याभ्यासाची व्याप्ती प्रा.रा.ग. जाधव यांनी अर्वाचीन साहित्यासंबंधी मांडताना १) द्वैभाषिक साहित्याभ्यास २) राष्ट्रीय साहित्यविचार ३) विश्वसाहित्याभ्यास ४) लोकवाङ्मयाचे तौलनिक अध्ययन या स्थूलमानाने चार विभागात विभागणी करून अधिक विवेचन केलेले आहे. अर्वाचीन साहित्य इंग्रजी भाषेतील प्रेरणेने निर्माण झाले.

हळूहळू विविध आधुनिक वाङ्मयप्रकार आले. पुढे वेगवेगळ्या चळवळी झाल्या त्यांचा साहित्याचे विषय व आशयावर प्रभाव पडला. साहित्यात जे

विविध वाद आले ते प्रामुख्याने पाश्चिमात्त्य साहित्यपंरपरेतून आलेले आहेत. त्याचा जीवनविषयक व वाङ्मयीन प्रवृत्तीवर झालेला परिणाम साहित्य निर्मितीवर असलेला प्रभाव या साऱ्याचा वाङ्मयीन संस्कृतीच्या तौलनिक अभ्यासात उपयोग होतो.

रा.ग. जाधवांच्या मते प्रादेशिक साहित्याची राष्ट्रीय दृष्टीने मीमांसा करून व सर्व प्रादेशिक साहित्याच्या अशा मीमांसा तौलनिक साहित्याभ्यासाचा विषय करून राष्ट्रीय साहित्याची अर्थपूर्ण संकल्पना उभी करता येईल.

भारतासारखा बहुभाषी व बहुसंस्कृती असलेल्या देशात तौलनिक साहित्याभ्यासाची अनेक क्षेत्रे खुली आहेत. अनुवाद हे तौलनिक साहित्याभ्यासाचा मुख्य आधार आहे. ज्यावेळी आपल्याला मूळ भाषा येत नाही तेव्हा प्रामुख्याने आपल्याला अनुवादावरच अवलंबून रहावे लागते. भिन्न भाषिक अभ्यासासाठी अनुवादाचा वाटा महत्त्वाचा असतो. आदान-प्रदानाच्या कार्यात अनुवाद मोठी भूमिका बजावतो. फ्रेंच जर्मन आदी भाषांतील इंग्रजी अनुवादाचा आधार आपल्याला घ्यावा लागतो. अर्थात अनुवादित ग्रंथांवर अवलंबून राहिल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. पण याला पर्याय नसतो. प्रत्येक भाषेची स्वत:ची वैशिष्ट्ये आणि लकब असते याचे भान अनुवाद, रूपांतर, भाषांतर करताना ठेवावे लागते. अनुवादामुळे आपली शब्दसंपत्ती वाढते, तसेच संकल्पनांचे विश्व, आपली साहित्याबद्दलची समज समृद्ध होते. विश्वातील अनेकांशी, त्यांच्या मनाशी, भाव-भावनांशी आपले नाते जुळते.

काळानुसार तौलनिक साहित्याभ्यासात विशिष्ट अभ्यासाला महत्त्व येत गेले. जसे सुरुवातीला मौखिक परंपरेचा विचार होत होता. पण हळूहळू हे क्षेत्र विस्तारत आहे पूर्वी अनुवाद, भाषांतराआधारे तौलनिक अभ्यास केला जात होता. पण आता भाषांतर ही तौलनिक साहित्याभ्यासाची वेगळी शाखा आकाराला आली आहे.

तिसऱ्या जगातील साहित्याचा आता विचार होऊ लागला आहे. भिन्न पद्धती, विषयाचे नावीन्य याचा विचार होत आहे. भारतातील साहित्याचा तौलनिक साहित्याभ्यास करताना फ्रेंच, अमेरिकन पद्धतीचा वापर करून चालणार नाही. हे लक्षात घेणे आवश्यक आहे. पारंपरिक अभ्यासपद्धतींचा विचार करताना भिन्न देश व संस्कृती सापेक्ष विचार केला जात आहे. पारंपरिक इतिहासाच्या कल्पना बदलल्या जात आहेत. राष्ट्रीय संस्कृती, संस्कृती-संकर,

साधर्म्य, विघटन आदी गोष्टींवर अधिक भर दिला जात आहे. व संस्कृतीवर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. तौलनिक साहित्याभ्यासाचे क्षेत्र कसे अमर्याद आहे हे स्पष्ट होत जाते.

**तौलनिक साहित्याभ्यास करताना घ्यावयाची काळजी** – तौलनिक साहित्याभ्यास करताना दृष्टी तटस्थ आणि वस्तुनिष्ठ असावी लागते. आत्मगौरव किंवा आत्मनिंदा होता कामा नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. साहित्यातील साम्य आणि विरोध याचा शोध घेणे त्याची कारणमीमांसा करणे यात अभिप्रेत असते. गुणमापन किंवा श्रेष्ठ कनिष्ठ ठरविणे हा या अभ्यासाचा उद्देश नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. भिन्न भाषिक साहित्याचा तुलनात्मक अभ्यास करताना संशोधकाला दोन अथवा अधिक भाषांचे जुजबी ज्ञान असून चालणार नाही. तर त्या दोन भाषांवर प्रभुत्व असण्याची गरज आहे. परंपरा, प्रभाव, परिणाम या गोष्टींना वाजवीपेक्षा अधिक महत्त्व दिले गेल्यास लेखकाचे स्वातंत्र्य, कलाकृतीचे, साहित्यकृतीची स्वायत्तता यावर गदा आणल्यासारखे होईल. असे होऊ नये याची काळजी तौलनिक पद्धतीने अभ्यास करताना घेतली पाहिजे. केवळ माहिती समोर मांडणे म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास नव्हे याचे भान सतत ठेवले पाहिजे. विषय निवडण्यापूर्वी डोळ्यासमोर उद्देश ठेवणे गरजेचे आहे. तसेच तौलनिक साहित्याभ्यासाचे क्षेत्र हे अमर्याद असल्याने अभ्यासाचे क्षेत्र, विषय सिमीत करून घेणे अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे असते. त्यामुळे विवेचन सर्वांगपूर्ण व सखोल होते.

**तौलनिक साहित्याभ्यासाच्या मर्यादा** – तौलनिक साहित्याभासाने आपली साहित्यविषयक जाण समृद्ध होते, दृष्टी व्यापक होते हे जरी खरे असले तरी काही मर्यादा जाणवतात. तौलनिक साहित्याभ्यासाची स्वत:ची अशी खास पद्धती नाही त्यामुळे यात व्यक्ती भिन्नता आढळते. अनुवादाचा अभ्यास करताना प्रत्यक्ष संहितेचा सूक्ष्म अभ्यास असावा लागतो. पण ही काहीशी बहिर्वर्ती पद्धत आहे. कलाकृतीच्या वैचारिक, सामाजिक, आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संदर्भ याचे भान अभ्यासकाला असते त्यामुळे प्रचलित प्रवाह व चळवळी यामध्ये या पद्धतीला रस आहे. त्यामुळे ऐतिहासिकतेच्या अंगाने विचार होतो. तौलनिक अभ्यासाविषयीची व्यापकता लक्षात घेता अचूक तंत्राचा अभाव त्यामुळे ही पद्धत म्हणावी तशी विकसित झालेली दिसत नाही.

असे असले तरी आजच्या जागतिकीकरणाच्या काळात, बदलत्या

सामाजिक-सांस्कतिक परिस्थितीत या अभ्यासपद्धतीचे महत्त्व आहे. व स्वतंत्र शाखा म्हणून, आंतरविद्याशाखा म्हणून सर्वांनाच आज या पद्धतीचा स्वीकार केलेला दिसतो आहे. विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रमात या पद्धतीचा समावेश झालेला आहे. हळूहळू हे क्षेत्र विस्तारत आहे. या पार्श्वभूमीवर दलित व ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास करायचा आहे. दलितांची सांस्कृतिक चळवळ हे स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजापुढचे आव्हानच होते. फुले-आंबेडकरांच्या विचारातून याची निर्मिती झाली आणि समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या त्रयीवर तिची स्थापना झाली. दलितांची दु:खे, कुचंबणा, गुलामगिरी, विपन्नावस्था, होणारे अत्याचार हे त्यांच्या साहित्यातून उमटू लागले. बाबुराव बागूल म्हणतात 'माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश-वर्ण आणि जातिश्रेष्ठत्त्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य.' दलित साहित्याचे उद्दिष्ट आहे. ते मानवमुक्तीचे आणि म्हणून हजारो वर्षापासून चालत आलेल्या जाचक समाजव्यवस्थेला त्यांनी ठामपणे नकार दिला. हा नकार, विद्रोह. काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथने इ. वाङ्मय प्रकाराच्या रूपाने बाहेर पडला. दलित चळवळीने दलित साहित्याला दिशा दिली, त्याला घडवलं.

१९७० नंतर ग्रामीण चळवळ आकारास आली. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय हा ग्रामीण साहित्य चळवळीचा आधार आहे. अशी नोंद वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोशात आहे. चळवळी आधीचे ग्रामीण साहित्य व त्यानंतरचे ग्रामीण साहित्य यात आशय व अनुभवदृष्ट्या फरक/वेगळेपणा जाणवतो. ग्रामीण चळवळीमागील वैचारिक भूमिका स्पष्ट करताना आनंद यादव म्हणतात 'ग्रामीण साहित्याची चळवळ ही महात्मा फुले यांच्या मानवतावादाचा, शूद्रातिशूद्रांवर व स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा व त्यांच्या विकासाचा, छोटे शेतकरी, खंडकरी, कुळे, कुणबी, शेतमजूर, खेड्यातून नागर विभागात पोटार्थी होऊन आलेले मजूर, कामगार, दलित व आदिवासी यांच्या होणाऱ्या शोषणाचा वारसा सांगते. या सर्वांच्या विकास- उद्धारार्थ काळाच्या ओघात ज्यांनी ज्यांनी कार्य केले व विचार मांडले त्यांचा; आणि त्यांच्या आवश्यक त्या विचारांचा ती वारसा सांगते. कुठल्याही एका व्यक्तीची किंवा विभूतीची... ती पूजक नाही.' यातून ग्रामीण चळवळीची व्यापकता स्पष्ट होते.

**ग्रामीण समाजातील** जाती–जमातीतील ताण–तणाव, जातीय अहंकार, निवडणुकांमधून जातीय भावनांना आवाहन केले जाते यातून जातीय गट वाढत जातात. तणाव वाढतात याचे चित्रण आजच्या ग्रामीण साहित्यातून येते.

तसेच साखर कारखाने, खरेदी विक्री संघ निवडणुकांमधील गलिच्छ वातावरण, जाती आणि राजकारण, सत्तेच्या बळावर होणाऱ्या गोष्टी, महिलांवर होणारे अत्याचार, खेड्यातील अज्ञान, दारिद्र्य शोषणाने त्रस्त झालेला गरीब समाज, देवदासीचे जगणं, जोगत्याचे जीवन, शेतकऱ्यांच्या विकासाच्या सवलती त्यांच्या पर्यंत पोहचत नाही याची खंत, धरणग्रस्तांचे दु:ख, ऊस तोडणी कामगारांचे दु:ख, दुर्दैवी जीवन, ग्रामीण जीवनात घडणारी स्थित्यंतरे, शहरीकरणामुळे ढासळत जाणारे ग्रामीण व्यवसाय, ग्रामीण तरुणांची बेराजगारी, भूमिहीन मजुरांचे शोषण, यांत्रिकीकरणामुळे माणूस व माती यांचे दुरावलेले संबंध, शहर व ग्रामीण जीवनातील सांस्कृतिक संघर्ष असे कितीतरी विषय ग्रामीण कादंबरी व इतर वाङ्मयप्रकारातून आलेले दिसतात.

दलित साहित्यातून आर्थिक व सांस्कृतिक प्रश्न व्यक्त होतात. स्वसमाजाचे, लोकजीवनाच्या चित्रणाबरोबर स्वेतर समाजाच्या चालीरीती, त्यांचे मानसिक मागासलेपण, होणारे अन्याय, अत्याचार, वाट्याला आलेले कष्टप्रद जीवन, समाजातील रूढी, परंपरा, दैवते, प्रथा, अंधश्रद्धा, जातपंचायत, मुरळीच्या, वेश्येच्या मुलीच्या जीवनाची ससेहोलपट, अस्पृश्यतेचे दु:ख, समाजातून दिसणारा भेदभाव वाट्याला येणारी अपमानकारक वागणूक, स्त्रियांवर होणारे अत्याचार, जीवनभर व्यापून उरलेली भूक, समाज धर्म संस्कृती यातून यांच्या विषमतेतून वाट्याला येणारे दु:ख, भीषण दारिद्र्य, अज्ञान, गावकुसाबाहेरचे जगणे, पण याच बरोबर ज्ञानामुळे शिक्षणामुळे समाजपरिवर्तन करण्यासाठी आलेले आत्मभान, आत्मविश्वास परिवर्तनासाठी प्रस्थापित समाजाविरुद्ध उभारलेला संघर्ष पण प्रत्येक वेळी या संघर्षात यश मिळेलच असे नाही. प्रसंगी येणारे अपयश जीवावर बेतणारा संघर्ष असे अनेक विषय कादंबरीत आलेले दिसतात. दलित हे पद मूल्यवाचक आहे. त्यामुळे कलाकृती त्या व्यक्तीची असली तरी ती शेवटी व्यक्तीच्या, जातिसमूहाची बनते. 'सामूहिकता' हे दलित साहित्याचे वैशिष्ट्य कादंबरीतूनही प्रत्ययाला येते. दलित कादंबरीचा विचार करता कविता, कथा आणि आत्मकथन यांच्या तुलनेत याची निर्मिती

मर्यादीत दिसते. ग्रामीण कादंबरीच्या बाबतीतही कथेपेक्षा कादंबरीची निर्मिती मर्यादित आहे.

तौलनिक साहित्याभ्यासात तुलना करायची त्या घटकातील साधर्म्य, वैधर्म्य, प्रभव आणि प्रभाव या अंगाने विचार करायचा असतो. तसेच राष्ट्रीय साहित्याचा तौलनिक विचार करत असताना त्या कृती निर्माण करणाऱ्या राष्ट्रीय वैशिष्ट्यावर बोट ठेवणे असा सरधोपट, सुलभ मार्ग स्वीकारल्या जाण्याची शक्यता असते. किंवा काही वेळा उथळ निष्कर्ष काढले जावू शकतात तेव्हा अभ्यासकांनी याचे भान ठेवणे आवश्यक असते. तौलनिक साहित्याभ्यासात साहित्याच्या परंपरांची तुलना करून त्यातील साम्यभेदाची जाणीव करून घेणे हा महत्त्वाचा मुद्दा असतो. त्यामुळे ग्रामीण साहित्य परंपरा व दलित साहित्य परंपरा हा तौलनिक अभ्यासाचा विषय ठरतो. प्रादेशिक परंपरा व त्यातील विकास हा विषय तौलनिक अभ्यास क्षेत्रात येतो. प्रांतीय साहित्याकडे पाहण्याची यथार्थ व व्यापक दृष्टी तौलनिक साहित्याभ्यासामुळे येते. तसेच तौलनिक साहित्याभ्यास करत असताना आपला अभ्यास विषय मर्यादित, सीमित करून घेणे आवश्यक असते. यादृष्टीने दलित व ग्रामीण साहित्य प्रवाहातील कोणताही एक घटक निवडणे हे श्रेयस्कर आहे व याठिकाणी कादंबरी वाङ्मय प्रकाराच्या आधारे हा अभ्यास होत आहे.

या दोन्ही प्रवाहांचा विचार करता काही गोष्टी जाणवतात. या दोन्ही प्रवाहातील साहित्य आधी निर्माण झाले व नंतर त्याला ही विशेषणे लावली गेली. अगदी संत साहित्यापासून आपल्याला याची पाळेमुळे दिसतील. दलित साहित्य चळवळ अधिकाधिक सामाजिक प्रयोजनातून आली व परंपरागत गोष्टींना नकार व प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा विद्रोह दलित लेखनातून व्यक्त झाला. दलित साहित्याप्रमाणे ग्रामीण साहित्यातून विद्रोह व्यक्त होत नाही. पण वास्तव ग्रामीण जीवनाचे चित्र उभे राहते असे दिसते. दलित साहित्य प्रवाहाच्या मुळाशी असणाऱ्या समाजापुढे, वर्गापुढे शोषक-शत्रू जसा समोर व स्पष्ट दिसतो तसे ग्रामीण समाजासमोर नाही. हा शोषकवर्ग केवळ या वर्गाबाहेरचा नाही तर आतला देखील आहे. दलित व ग्रामीण साहित्याची बीजे ही आपल्या समाजव्यवस्थेतच दडलेली आहेत.

ग्रामव्यवस्थेत असणाऱ्या दलितांचा संघर्ष स्वत:प्रमाणेच ज्या ग्रामव्यवस्थेचा ते भाग आहेत त्या व्यवस्थेशी आहे व ही व्यवस्था उलथून

टाकण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तसेच ग्रामीण भागात दलित आणि दलितेतर संघर्ष वरचेवर तीव्र रूप धारण करताना दिसतो. ग्रामीण कादंबरीकारांच्या लेखनातून दलित समाजाचे चित्रण येताना दिसते. तसेच दलित कादंबरीतून ग्रामीणता व दलित जीवन मिसळून गेलेले दिसते.

दलित व ग्रामीण जीवनातून वाट्याला आलेले दु:ख, दारिद्र्य, भूकेची वेदना साहित्यातून व्यक्त होते. दलित साहित्यातून पारंपरिक मूल्यांना नकार, पुनर्जन्म, संचित, कर्मवाद या कल्पनांना नकार व विद्रोह आहे व समतेवर आधारित अशा जीवनव्यवस्थेची उभारणी आहे. दलितांच्या वाट्याला येणारे दु:ख हे वर्णव्यवस्थेतून निर्माण झालेल्या बलुतेदार पद्धतीत दडलेलं आहे. तर ग्रामीण जीवनात वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेच्या शोषणाबरोबरच अनियमित निसर्ग आणि अर्थव्यवस्थेमुळे होणारे शोषण विविध प्रश्नांना जन्म देते. भारतीय जीवन हे कृषिकेंद्रित जीवन आहे. बहुतांश दलित कादंबरी ही ग्रामीण भागाच्या पार्श्वभूमीवर घडते. विविध स्तरातील दलितांचे चित्रण यात येते. महार, मांग, चांभार, पारधी, देवदासी, तमासगीर, झोपडपट्टीतील जीवन, मुरळी, वेश्या इ. साऱ्यांचे दु:ख या कादंबऱ्यातून व्यक्त होते.

दलित आणि ग्रामीण कादंबरीत बोलीभाषेचा वापर, भाषेतील विविध छटा, म्हणी, प्रभावी वाक्प्रचार यामुळे भाषिक समृद्धता दिसते. दलित आणि ग्रामीण कादंबरीचा अधिक नेमकेपणाने तौलनिक अभ्यास होण्यासाठी यातील विशिष्ट मुद्द्यांचा विचार केल्यास अधिक सोयीचे व सखोल अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. जसे दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यातून येणारे भूक आणि दारिद्र्य याचे चित्रण, सामाजिक, राजकीय चित्रण, स्त्रीजीवनाचे चित्रण, समीक्षा अशा विविध मुद्द्यांच्या आधारे ही तुलना होऊ शकते.

अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, अशोक व्हटकर, उत्तम बंडू तुपे, माधव कोंडविलकर, भीमसेन देठे, कल्पना जाधव इ. अनेक कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातून दलित जीवनाचे प्रश्न, स्त्री चित्रण आदि गोष्टींचा विचार करता येईल.

उद्धव शेळके, आनंद यादव,विश्वास पाटील, रा.रं.बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, राजन गवस, वासुदेव मुलाटे, शंकर पाटील, रंगनाथ पठारे, सदानंद देशमुख इ. कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनात आलेले प्रश्न, त्यासाऱ्याचे चित्रण याचा विचार करता येईल. विषम समाज व्यवस्थेतून निर्माण

होणारे शोषण, आर्थिक प्रश्न, पोटाची आग, दारिद्र्यामुळे सोसाव्या लागणाऱ्या यातना अनेक कादंबऱ्यातून येतात. सामाजिकता हा तर दलित कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. परंपरागत चालत आलेली अस्पृश्यता, दैन्यावस्था, दारिद्र्य, अंधश्रद्धा, माणुसकीचे ध्येय गाठायचा केलेला प्रयत्न हे वारणेच्या खोऱ्यात, फकिरा, वारणेचा वाघ, वैजयंता अशा अण्णाभाऊ साठेंच्या कादंबऱ्यातून व्यक्त होते. तसेच शंकरराव खरात (पारधी मी माझ्या गावाच्या शोधात), केशम मेश्राम (पोखरण), नामदेव ढसाळ (हाडकी हाडवळ), अशोक व्हटकर (मेलेलं पाणी) माधव कोंडविलकर(अनाथ, छेद, आता उजाडेलं) उत्तम बंडू तुपे (भस्म, शेवती), सुधाकर गायकवाड (शूद्र) अशा अनेक कादंबरीतून दलित वास्तव प्रगट होते. तर गावातला दुष्काळ, गावातील आर्थिक सामाजिक रूप, यंत्र संस्कृतीच्या आगमनामुळे कृषिसंस्कृतीला गेलेला तडा, जोगत्याच्या जीवनाची होणारी परवड, स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार अशा अनेक प्रश्नांना गोतावळा (आनंद यादव) पाचोळा (रा.रं.बोराडे) झाडाझडती, पांगिरा (विश्वास पाटील) भंडारभोग, (राजन गवस) पखाल, हाल्या हाल्या दुदू दे (बाबासाहेब मुसळे), शापित (अरुण साधू) अशा अनेक कादंबऱ्यातून वाट मिळालेली दिसते. दलित कादंबरीतून गावातले राजकारण, आर्थिक आणि सामाजिक सत्तेच्या आधारे दलितांचा बळी कसा घेतला जातो, दलितांमध्ये असलेल्या आपपरभावाचा फायदा इतर लोक कसे करून घेतात. दलितांमधील अंतर्गत कलह, तळागाळातील व्यक्ती राजकीय पुढारी बनते तेव्हा तिचा घेतला जाणारा फायदा. स्वतःच्या स्वार्थासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मूल्ये कशी विसरली जातात. ग्रामीण आणि पक्षीय राजकारणातील अपप्रवृत्तीचे दर्शन याचे चित्रण येते.

ग्रामीण भागातला राजकारणी वर्ग, मतांसाठी दिखाऊपणा करणारा पण प्रत्यक्षात वेगळीच कृती करणारा राजकारणाचे बेगडी रूप, सहकारी चळवळीचा फायदा नेमका कोणाला? त्यासंबंधीची परिस्थिती याचे दर्शन ग्रामीण कादंबरीतून घडते. पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीला दुय्यमस्थान आहे. ग्रामीण कादंबरी व दलित कादंबरी या दोन्हीतून स्त्रियांचे शोषण, त्यांची सोशीक वृत्ती, आपल्या मुलांबाळांसाठी असलेली माया व त्यांच्यासाठी काहीही करण्याची असलेली तयारी, कुटुंबासाठी वाट्टेल ते कष्ट सोसण्याची तिची धडपड, देवदासी, मुरळी, वेश्या म्हणून तिच्या वाट्याला येणारे उपेक्षित जीवन, उपभोग्य वस्तू म्हणून

तिच्याकडे पाहिले जाणे. तिचा गैरवापर करून घेतला जातो. समाजाकडून तिला मिळणारी अपमानास्पद वागणूक. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीने प्रेरित होऊन विद्रोहाची, बंडाची भाषा करणारी दलित स्त्री अशी तिची विविध रूपे. अण्णाभाऊ साठे (चित्रा, मूर्ति, चंदन, चिखलातले कमळ इ.)

उत्तम बंडू तुपे (झुलवा, खुळी, खाई) अशोक व्हटकर (७२ मैल), बाबुराव बागूल (सूड), भीमसेन देठे (चक्री) सुशीला जाधव (कसरत), कल्पना जाधव (उपेक्षिता) अशा कितीतरी कादंबऱ्यातून आलेले आहेत. तर राजन गवस (चौडकं), रा.रं.बोराडे (पाचोळा), विश्वास पाटील (आंबी), अरुण साधू (शापित) शंकर पाटील (घुंगरू) रवींद्र शोभणे (कोंडी) उद्धव शेळके (धग), रंगनाथ पठारे (हारण) अशा विविध कादंबऱ्यातून ग्रामीण स्त्री चे दुःख, वेदना बोलकी होताना दिसते.

दलित चळवळ, ग्रामीण चळवळ यांचा व साहित्यनिर्मितीचा अन्यन्य संबंध आहे ती ही तौलनिक साहित्याभ्यासाच्या आधारे स्पष्ट करता येतो. हा अभ्यास करताना एक गोष्ट जाणवते ग्रामीण साहित्याची भूमिका आणि दलित साहित्याची भूमिका यातील अंतर वेगाने कमी होऊ लागले आहे. या दोन्ही साहित्याचा संबंध येतो तो सांस्कृतिक परिवर्तनाशी. सांस्कृतिक पातळीवरील संघर्ष, प्रश्न सुटण्यासाठी वेळ लागतो. सांस्कृतिकता विशाल अशी संकल्पना आहे व आज तौलनिक साहित्याभ्यासात महत्त्व येते आहे ते सांस्कृतिक अभ्यासाला त्या दृष्टीने या दोन प्रवाहातील तौलनिक अभ्यास होणे महत्त्वाचे वाटते. वेगवेगळ्या मुद्यांच्या आधारे या दोन्ही साहित्यप्रवाहाचा सखोल अभ्यास आपली साहित्यविषयक जाण समृद्ध करेलच पण त्याचबरोबर मानवता मूल्याची आपल्यातील जाणीव अधिक प्रगल्भ करेल.

* * *

# दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्याचा तौलनिक विचार

डॉ.शशिकांत साळवे

स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रस्थापित मराठी साहित्यात अनेकविध प्रवाह निर्माण झाले. उदा.दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, नागर साहित्य, देशी साहित्य, जनसाहित्य, वसाहतवादी साहित्य इ. या सर्व साहित्य प्रवाहांनी प्रस्थापित मराठी साहित्याला आलेली मरगळ आणि साचलेपण नष्ट करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली. या सर्व साहित्य प्रवाहामध्ये पुरोगामी, परिवर्तनशील आणि माणुसकी हे मूल्य शिरोधार्य मानणारा जर कोणता प्रवाह असेल तर तो दलित साहित्याचा होय. या साहित्य प्रवाहाने प्रस्थापित मराठी साहित्यात वास्तववाद रुजविण्याचे महनीय कार्य केले. मराठी साहित्य हे दिशाहीन होत चालले होते. ते मूठभराचे साहित्य होत होते. या मराठी साहित्याला उपराकार लक्ष्मण मानेंनी साडेतीन टक्क्यांचे साहित्य म्हणून हीनवले होते. त्या साहित्याला दलित साहित्याने वैश्विक बनविले. एवढेच नव्हेतर सातासमुद्रापलीकडे पोहचविले. कमी अधिक फरकाने इतर साहित्य प्रवाहाने देखील मराठी साहित्याला नवसंजीवनी दिली हे सूर्य प्रकाशाइतके सत्य आहे. परंतु या सर्व प्रवाहामध्ये विशेष नावलौकिक झाला तो दलित साहित्याचाच. म्हणून तर ग्रामीण लेखक, समीक्षक डॉ.आनंद यादव यांनी दलित साहित्यासंदर्भात म्हटले आहे. कानामागून आले आणि तिखट झाले, डॉ.आनंद यादवांना हे विधान जरी उपरोधिकपणे केले असले तरी या साहित्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक अधिष्ठान आहे. हे कोणीही नाकारू शकत नाही. प्रस्तुत विवेचनात ग्रामीण आणि दलित साहित्याचा तौलानिक विचार अभिप्रेत आहे.

## दलित साहित्यः–

दलित साहित्याच्या प्रमुख प्रेरणांच्या बाबत अनेक अभ्यासक संशोधक वेगवेगळ्या प्रेरणा अधोरेखित करतात. उदा. भगवान गौतम बुद्ध, फुले, शाहू, वि.रा.शिंदे, पेरियार स्वामी, चोखामेळा एवढेच नव्हे तर काही अभ्यासक अगदी केशवसुतांचे नाव घेण्यास देखील मागेपुढे पाहत नाहीत. कॉ.शरद पाटील तर दिग्नागापर्यंत मागे जातात. या सर्वच विद्वानांना मी नाकारत नाही. परंतु दलित

साहित्याची ठोस जर कोणती प्रेरणा असेल तर ती फक्त आणि फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी विचारसरणी होय. विज्ञानाने मानवाला साधने दिली. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र मानवजातीला दलित समाजाला, दलित साहित्याला नवा विचार दिला. दलितांना माणूस म्हणून मूल्य प्राप्त करून दिले. दलितांत जनजागृती घडवून आणली. या झोपलेल्या समाजाला जागे करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. म्हणून अण्णाभाऊ साठे म्हणतात, जग बदल घालुनी घाव सांगुनी गेले मला भीमराव आणि म्हणून दलित साहित्याची मूळ प्रेरणा कोण असेल तर फक्त बाबासाहेब आंबेडकरच.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक, जनता, समता, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत इत्यादी मुखपत्र चालवून इथल्या समाजाला लिहिते केले. विचार करायला भाग पाडले. समाजमनात क्रांतीची बीजे पेरली. आम्ही देखील माणसे आहोत. याची जाणीव करुन दिली. बाबासाहेबांच्या लेखणीने दलित समाजात आत्मभान आले आणि ते आत्मशोध घेऊ लागले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक मंथनाने आणि कृतिशील कार्यक्रमाने दलितांमध्ये अनेक वैचारिक, सामाजिक आणि राजकीय चळवळी निर्माण झाल्या. या चळवळीमधूनच दलितांमध्ये लेखक, कवी, जलसाकार निर्माण झाले.

डॉ.बाबासाहेबांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन इथल्या प्रस्थापित समाजाला आव्हानच केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले धर्मांतर म्हणजे संपूर्ण जगाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना म्हणून नोंद झाली. जागतिक पातळीवर या घटनेला विशेष मोल प्राप्त झाले. म्हणून वामनदादा म्हणतात,

वामन या धरतीवरती, कोठें घडलेच नाही,
पाच लाख एकावेळी, पायी पडलेच नाही,
असे कुठे गौतमाशी, नाते जडलेच नाही.

म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे मुख्य प्रेरणास्थान ठरतात. डॉ.बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर अनेक साहित्यिक लिहिते झाले. प्रस्थापित मराठी साहित्यात जेवढे साहित्य प्रकार हाताळले गेले. ते सर्वच प्रकार दलित साहित्यिकांनी हाताळले. नव्हे ताकदीने लिहिले विश्वसाहित्यात दलित साहित्याचे नावलौकिक झाले. दलित साहित्याने येथील पीडित, शोषित, वंचित, उपेक्षित गावकुसाबाहेरील समाजाला माणुसकीचे सर्व हक्क प्राप्त करून दिले. प्रस्थापित

साहित्यात सामान्य माणसांच्या भावभावना मुखर झाल्याच नव्हत्या. त्या माणसाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणले प्रथमतः ते दलित साहित्यानेच.

दलित साहित्य वेदना, विद्रोह, नकार आणि दुःखातून जन्माला आले आहे. हा नकार आहे. इथल्या अन्यायकारक व्यवस्थेला हा नकार आहे. इथल्या मनुवादी संस्कृतीला हा नकार आहे इथल्या शोषणमूलक संस्कृतीला. हा नकार आहे इथल्या शेंदरी संस्कृतीला. हे सर्व नाकारताना मात्र माणुसकी हे मूल्य आणि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही तत्त्वत्रयी मात्र दलित साहित्य कधीच नाकारत नाही.

दलित साहित्य, ईश्वर संकल्पना नाकारते, जातीयता नाकारते आणि शोषणविरहित समाजाची प्रतिष्ठापना करते. म्हणून केवळ ग्रामीण साहित्य प्रकाराहूनच नाही तर समग्र मराठी साहित्य आणि इतर साहित्य प्रवाह यापेक्षा दलित साहित्य वेगळे ठरते हे त्रिकालबादी सत्य आहे.

### ग्रामीण साहित्यः-

ग्रामीण साहित्याची प्रेरणा नेमकी काय असा जेव्हा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा आपण अगदी हरिभाऊंची 'काळ तर मोठा कठीण आला' या ग्रामीण कथेपर्यंत जातो किंवा लोकहितवादी, म.फुले यांचा नामनिर्देश करतो. एवढेच नव्हेतर अजून काही ठोस पुरावे म्हणून म.गांधीच्या 'खेड्याकडे चला' या हाकेकडे जातो. तेव्हा मूळ प्रश्न निर्माण होतो की, ग्रामीण साहित्याची ठोस प्रेरणा कोणती? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेडोपाड्यात शिक्षणाची गंगोत्री गेली. सामान्य माणूस लिहिता झाला. त्याच्या भाव-भावनांना तो वाट करून देऊ लागला. परंतु त्याने साहित्यात जे विषय हाताळले ते प्रेम, निसर्ग, मनोरंजन, हेच परिणामी ग्रामीण साहित्य हे वास्तवापासून दूर जाऊ लागले. ग्रामीण साहित्याचा तो विषयच होऊन बसला. एवढेच नव्हेतर तर ग्रामीण लेखक समीक्षकानी अगदी त्याच पद्धतीने ग्रामीण साहित्याच्या व्याख्यादेखील तयार केल्या. वास्तविक कोणत्याच अभिजात साहित्याची व्याख्याच करता येत नाही पण असे घडले हे मात्र कोणी नाकारू शकत नाही. रूढी, परंपरा, तर ग्रामीण साहित्यात चित्रित झाल्याच पण त्याचबरोबर विनोदी ग्रामीण साहित्य जन्माला यावे ही पुन्हा एक विशेष बाब. परिणामी ग्रामीण माणसाच्या मूळ समस्या बाजूला राहिल्या. इथल्या ग्रामीण माणसाला रूढी-परंपरेच्या गर्तेत लोटून पूजा-अर्चा-नवस सायास यात गुंतवून प्रस्थापित समाजाने त्याचे मोठे शोषण केले. याला वाचा फोडण्याचे

महनीय कार्य केले ते तृतीय रत्न या नाटकाच्या निमित्ताने म.फुले यांनी म्हणून म.फुलेच ग्रामीण साहित्याची प्रधान प्रेरणा ठरू शकते. असे निरीक्षणांती लक्षात येते.

**मूल्यमापनः-**

ग्रामीण साहित्य आणि साहित्य या दोनही साहित्यांचा मूळ विषय आहे शोषणाधिष्ठित माणूस या शोषणाधिष्ठित माणसाला शोषणमुक्त करणे. त्याला नवा अवकाश उपलब्ध करून देणे होय. शोषणविरहित समाजाची निर्मिती करणे होय. 'माणुसकी' हे मूल्य ग्रामीण आणि दलित हे दोन्ही साहित्यप्रवाह प्रमाण मानतात. स्वातंत्र्य-समता-बंधुभाव या त्रयीवर या प्रवाहांची नितांत श्रद्धा आहे. परंतु याबाबत ग्रामीण साहित्य कृतिशील दिसत नाही. अलीकडे ग्रामीण साहित्याचीच एक उपशाखा म्हणून कृषिसाहित्य निर्माण झालेले दिसते. याचे मूळ कारण असे की, ग्रामीण साहित्याला तात्त्विक अधिष्ठान न असल्याकारणाने असे घडते आहे. ग्रामीण साहित्य निर्मिती खेड्याशी निगडित आहे. तर दलित साहित्य खेड्याबरोबरच शहरातील बकालजीवनावरही प्रकाशझोत टाकते.

ग्रामीण साहित्याचा नायक वेशीच्या आतला आहे तर दलित साहित्याचा नायक गावकुसाबाहेरचा आहे. त्याला या समाजव्यवस्थेने नाकारले आहे. रूढी परंपरेचा तो बळी ठरलेला आहे. ग्रामीण साहित्य ईश्वर-आत्मा, या बाबी स्वीकारते तर दलित साहित्य ईश्वर-आत्मा यांना मूठमाती देते. या सृष्टीचा कर्ता हा ईश्वर आहे ही धारणा ग्रामीण साहित्यात दिसते. परंतु या सृष्टीची निर्मिती कार्यकारण भावातून झाली असे दलित साहित्य मानते. निसर्गतत्त्वातूनच या विश्वाची उत्पत्ती झाली आहे.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की, ग्रामीण आणि दलित साहित्य हे दोन्ही प्रवाह स्वातंत्र्योत्तर काळानंतर निर्माण झाले या प्रवाहाने शोषणविरहित समाजाची निर्मिती व्हावी. यासाठी आपली लेखणी झिजवली. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रवाहाला जी वेगळी ताकद निर्माण करून दिली होती. ती त्यांच्या अनुयायांनीच क्षीण केली असेच म्हणावे लागेल. कारण आज ग्रामीण आणि दलित साहित्यिक बोलतो एक लिहितो एक आणि वागतो वेगळेच त्यामुळे दिशाहीनपणाच झालेला दिसतो. तरी देखील या प्रवाहाकडे एक आशेचा किरण म्हणून पहावे असे आजही मनापासून वाटते.

* * *

# 'ग्रामीण' आणि 'दलित' साहित्य : काही साम्यभेद

–डॉ.नानासाहेब सूर्यवंशी

आज साहित्य निर्मितीचे केंद्र बदलले आहे. तळागाळातील समाजातून अनेक नवनवीन लेखक मंडळी आपला जीवनानूभव स्वत:च्या भाषेत, बोलित, मुखर करीत आहेत. ग्रामीण भागातील ग्रामीण जीवनानुभव आज कथा–कादंबरी–कविता या वाङ्मयप्रकारातून जोरकसपणे व्यक्त होऊ लागला आहे. ग्रामीण साहित्य हे नव्या संवेदनशील, सर्जनशील, सृजनक्षम मनाचा कलात्मक आविष्कार साकार करणारे लेखक ग्रामीण भागातील वर्ग, वर्ण, जाती, जमातीमधून आलेले आहेत. हे सारे लेखक आपल्या आतल्या उर्मी, उर्जेच्या स्वबळावर लेखन करीत आहेत. म्हणून त्यांच्या लेखनातून आत्मविश्वास प्रखरतेने जाणवलेले दिसून येते.

'ग्रामीण' आणि 'दलित' या दोन संज्ञा आज साहित्य विश्वात स्थिर झालेल्या आहेत. ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य हे एकमेकांशी समांतर असे साहित्य आहे. ग्रामीण आणि दलित साहित्याचा निर्माता हा खेड्यात राहणारा आहे. खेड्यातील आपला जीवनानूभव व्यक्त करणारा आहे. 'ग्रामीण' ही संज्ञाच मुळात व्यापक स्वरूपाची आहे. 'ग्रामीण' हे एक मूल्य आहे. ग्रामीण हे साहित्यातील अभिव्यक्ती आशयाचे एक विशेशण आहे. ग्रामीण–खेड्यातील माणूस हाच ग्रामीण–दलित साहित्याचा नायक आहे. ग्रामीण साहित्यातील नायकाचा जीवनानूभव दलित साहित्यातील नायकाच्या जीवनानूभवापेक्षा वेगळा आहे. ग्रामीण साहित्यातील नायक हा गावातील समाजव्यवस्थेत, अर्थव्यवस्थेत पिचलेला आहे. तर दलित साहित्यातील नायक हा गावाबाहेर व सर्वच व्यवस्थेत दबला गेलेला आहे. समाज व्यवस्थेचा तो बळी गेलेला आहे. 'आहेरे' वाल्यापेक्षा 'नाहीरे' वाल्याचा तो नायक असतो. समाजव्यवस्था अर्थव्यवस्थेशी तो सतत संघर्ष करीत असतो. या संघर्षातून त्याला नवी मूल्य निर्माण करायची असतात. ही सारी जाणीव दलित साहित्यातील नायकाला झालेली असते. दलित साहित्यातील नायक आत्मभानाची जाणीव झालेली दिसते. आत्मभान याचा अर्थ आपण इतरांसारखे आहोत ही जाणीव होय. दलित माणसाला वर्णश्रमव्यवस्था,

जातिव्यवस्था आणि जन्मजात व्यवसाय यामुळे आत्मभान नव्हते. दलित माणसाला म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांच्यामुळे आत्मभान लाभले. या आत्मभानाचे प्रतिबिंब दलित साहित्यात दिसू लागले. दलित साहित्यात प्रकट होणारे हे आत्मभान दलित साहित्याची प्रेरणा आहे. याच आत्मभानामुळे दलित साहित्यात आत्मशोध सुरू झाला. या आत्मशोधातून दलित साहित्यात नकार आणि विद्रोह जाणवतो. गावात राहणारा पण गावाने कधी आपणाला आपले म्हटलेच नाही. अशी आत्मभानाची जाणीव दलित कवीला होऊ लागली. गाव आणि आपण ह्यातलं बोचरं अंतर त्याला तीव्रतेनं जाणवू लागले. ही जीवघेणी वेदना मग तो शब्दात व्यक्त करू लागला.

म्हणून, ग्रामीण जीवनात आपल्या अस्तित्त्वाचा लढा लढणारा दलित समाज वाचकाला अंतर्मुख करून जातो.

ग्रामीण साहित्यातील नायकाला ही अषी आत्मभानाची जाणीव झालेली दिसते. पण दलित साहित्यातील नायक जसा विद्रोह नकार, बंड करतो तसा ग्रामीण साहित्यातील नायक नकार, बंड, विद्रोह करत नाही. कारण, सर्वदूर पसरलेल्या अनेक समाज गटात विभागलेल्या ग्रामीणांचे असंख्य प्रश्न एकदम डोळ्यांसमोर येणे शक्य नाही. दुसरे ग्रामीण समाजाचे असंघटित असणे हे ही एक कारण आहे. कारण कोणतेही असले तरी एकूण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची आणि नवी समताधिष्ठित समाजरचना उभी करण्याची जाणीव ग्रामीण साहित्या कमी दिसते हे सत्य.

ग्रामीण साहित्य आज ही मध्यमवर्गीय संवेदनशीलतेपासून पूर्णपणे मूक्त झालेले नाही. आजचा ग्रामीण लेखक पूर्वीच्या ग्रामीण लेखकाच्या अनुकरणातून थोड्याफार प्रमाणात मूक्त होऊ पाहत आहे. दलित साहित्याने सर्वप्रथम मध्यमवर्गीय मराठी अभिरूचीचे संस्कार नाकारले म्हणूनच दलित साहित्यात आपणाला नकार, विद्रोह दिसतो. असे ग्रामीण साहित्याच्याबाबत दिसत नाही. आज तिसऱ्या पिढीतील ग्रामीण साहित्यिकात नकार, बंड, विद्रोह जाणवतो. पण तो दलित साहित्यातील विद्रोहासारखा क्रांतीकारक नाही असे असले तरी ग्रामीण साहित्य सर्व नाकारण्यापेक्षा जे चांगले आहे, स्वागतार्ह आहे त्याचा स्वीकार करीत असते. केवळ बंड करून उठण्यापेक्षा अत्यंत सोशिकपणाने, संस्कारीत मनाने परिस्थितीला सामोरे जाणारा, संक्रमणाने घाबरलेल्या वाताहत झालेल्या, तरी नव्या युगाला, नव्या पहाटेला सामोरे जाणारा, परिवर्तनशील माणूस आजच्या

ग्रामीण साहित्याचा नायक आहे. ग्रामीण साहित्यातील नायक प्रसंगानूरूप बंड–नकार करणारा आजच्या ग्रामीण कादंबरी–कथा–कवितेतून दिसून येतो. ग्रामीण जीवनात आज फार मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. आज ग्रामीण भागात प्रसार व प्रचार करणारी सर्व माध्यम जाऊन पोहचली आहे. यंत्राने आज सारी शेती केली जात आहे. हे सारे घडत असतांना ग्रामीण 'माणूस' किती बदलतो हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. ग्रामीण माणसाच्या वृत्ती–प्रवृत्तीत बदल जाणवत आहे. ग्रामीण भागात आर्थिक कोंडी निर्माण होत आहे. जाती–जातीतील (सुवर्ण–सुवर्ण, दलित–दलित) संघर्ष अजूनही संपलेला नाही. उलट तीव्र झालेला दिसून येतो. आज जाती केंद्रे आणि अर्थकेंद्रे एकवटू पाहात आहेत. आज ग्रामीण भागात जो संघर्ष जाणवत आहे तो सबल आणि दुर्बल यांच्यामध्ये. अशा परिस्थितीत ग्रामीण समाजाच्या ज्या वेदना आहेत त्या आजच्या ग्रामीण साहित्यात साकार होत आहेत.

ग्रामीण भागातील आजच्या होत असलेल्या परिवर्तनाने ग्रामीण माणूस ढवळून निघत आहे. आज ग्रामीण भागात नवविचारांचे आणि लोकशाहीचे वारे गावावरून वाहत आहे. ह्या नव वाऱ्यामुळे ग्रामीण भागातील 'माणूस' पुरता गांगरून गेला आहे. नवे वारे लागलेल्या संवेदनशील ग्रामीण माणसांची अवस्था फार बिकट झाली आहे. जुने तर सोडता येत नाही नवे विचार स्वीकारणे कठीण जात आहे. अशा या भयावह अवस्थेचे चित्रण आंनद यादव, रा.रं.बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, सदानंद देशमुख, वासुदेव मुलाटे, इंद्रजीत भालेराव अशा कितीतरी ग्रामीण साहित्यिकांनी केले आहे.

एकूण, आज ग्रामीण जीवनात बहुसंख्य प्रश्न निर्माण झाले आहेत. ते अर्थव्यवस्थेने आणि जातीव्यवस्थेने निर्माण केले आहेत. या दोन्ही कारणामुळे जे प्रश्न निर्माण झाले त्याचे चित्रण ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य करीत आहे. दलित साहित्यीकांनी ग्रामीण भागात जातिव्यवस्थेने निर्माण केलेल्या भयावह, विदारक व्यवस्थेचे चित्रण केले. एक समतेचा लढा उभा करण्याचे काम दलित चळवळीने केले. बाबुराव बाबुल, नामदेव ढसाळ, प्र.ई. सोनंबाळे, यशवंत मनोहर इ. दलित लेखकांनी लेखन केले आहे.

दलित समाजाच्या दारूण अवस्थेसंबंधी, दैन्य, दारिद्र्यासंबंधी आणि अस्पृश्यतेसंबंधी आपल्या विद्रोही भावनांचा आविष्कार दलित साहित्यातून झाला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रभावी नेतृत्त्वाखाली उभारलेल्या

चळवळीने दलित माणूस जागा झाला आणि त्यातून लिहिले गेलेले लेखन अत्यंत प्रभावी झाले. दलित, शोषित, पीडित अशा अभावग्रस्त समाजाच्या दुःखाचे, दैन्याचे, दारिद्र्याचे आजपर्यंतच्या साहित्यानेही अस्पृश्य ठेवलेल्या जगाचे चित्र दलित साहित्याने आविष्कृत केले. दलित साहित्याला नव्या समाजरचनेचा ध्यास आहे. समताधिष्ठित समाज घडविण्याचे, एकात्म समाज निर्मिण्याचे, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय यावर आधारलेल्या लोकशाहीप्रधान समाजरचेनेचे स्वप्न पूर्ण करायचे ह्यासाठीच दलित साहित्यात विद्रोह येत असतो म्हणून दलित साहित्य हे मानवतावादी, युगप्रवर्ततक जीवनदृष्टी असलेले साहित्य आहे.

दलित साहित्य म्हणजे पारंपरिक मूल्यांना नकार देणारे, पुनर्जन्म, संचित कल्पना आणि कर्मवाद इ. हिंदू धर्मातील संकल्पनांना विद्रोह नकार देऊन समतेवर आधारीत अशी एक नवी समाजव्यवस्था उभारणी करू इच्छिणारे आहे.

ग्रामीण साहित्य कृषीकेंद्रित जीवन व्यवस्थेचे आणि या जीवनव्यवस्थेला आधारभूत असणाऱ्या बलुतेदारांच चित्रण करणारे आहे. इथे जातीव्यवस्थेतील संघर्षापेक्षा कृषी व्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रश्नाशी संघर्ष असतो. उदा. आनंद यादव यांची 'गोतवळा', रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा', शांता जोशी यांची 'गव्हानी' इ.

ग्रामीण भागात राहणाऱ्या दलितांना ग्रामव्यवस्था इच्छा असो वा नसो स्वीकारावी लागत असते. दलितांमध्ये नवजाणीव निर्माण झाली आणि या व्यवस्थेला ते नकार देऊ लागले. तेव्हा जो संघर्ष होत असतो तो, वर्णसंघर्ष तर असतोच, पण तो 'ग्रामीण जीवनात' घडणार संघर्ष असतो. म्हणजे ग्रामीण भागात राहणाऱ्या दलितांच्या जीवनाचे चित्रण हे गघम विभागातील दलितांचे चित्रण असते. ग्रामीण भागात राहणारे दलित गघमविभाग, कृषी संस्कृती सोडू शकत नाहीत. ग्रामीण जीवनातील इतर घटक तर स्थितिशील असेच असतात. अषा समाजात नव्या जाणिवामुळे जो संघर्ष निर्माण होतो, त्या संघर्षाचे चित्रण करणारे साहित्य हे 'ग्रामीण साहित्य' या सदरातच जमा (व्हायला हरकत नाही) असते. हे यथार्थ आहे.

शेवटी असे म्हणावे वाटते की, ग्रामीण जीवन जसे तापत जाईल, अनेक प्रश्न ग्रामीण माणसाला भेडसावत जातील, तसे ग्रामीण माणूस आपल्यावर झालेले पूर्ण संस्कार झटकून या ग्रामीण प्रश्नांना सामोरे जाईल व समाताधिष्ठित

समाज निर्माण करण्याचे स्वप्न ग्रामीण साहित्यातून साकार करण्याचा प्रयत्न करतील तेव्हाच ग्रामीण आणि दलित साहित्याचे ईप्सित एकच असेल. म्हणून ग्रामीण आणि दलित साहित्यात असा फरक असला तरी, दलितांना, जिथे संघर्ष करावा लागतो ते 'कुरुक्षेत्र' जर गघमविभाग असेल तर ते साहित्य निदान ग्रामीण साहित्याच्या सीमारेषेवरचे साहित्य आहे असे म्हणावयास हरकत नाही. याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील दलितांना केवळ जातीय पातळीवरील संघर्ष द्यावा लागतो. म्हणून अशा संघर्षाचे 'कुरुक्षेत्र' शेवटी गघमविभागच असते!

ग्रामीण साहित्य चळवळ आणि दलित साहित्य चळवळ या दोन्हीही चळवळी मराठी साहित्यात अंत्यंत महत्त्वाच्या आहेत. दलित साहित्य चळवळीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे भरभक्कम अधिष्ठान लाभले आहे. तसे ग्रामीण साहित्य चळवळीला लाभलेले नाही. म्हणून आज ग्रामीण साहित्य चळवळ क्षीण झालेली दिसते. ग्रामीण साहित्याची चळवळ आज ठंडावलेली असली तरी ग्रामीण साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत आहे हे सत्य आहे. आज दलित साहित्य चळवळ झाली नसली तरी साहित्य लेखन मात्र कमी झालेले दिसते. दलित साहित्यिकांनी एकच एक वाङ्मय कलाकृती लिहिली. नंतर त्यांच्या हातून अशी दुसरी कलात्मक वाङ्मय कलाकृती निर्माण झाली नाही. उदा. लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, कावळे गौतम, कळसे वैजनाथ इ. आज ग्रामीण, दलित जीवनात बदल झालेला जाणवतो. भौतिक परिस्थिती बदललेली आहे पण ग्रामीणता कमी होऊन ग्रामीणांचे प्रश्न संपले आहेत असे नाही. दलित समाजाचे हे प्रश्न संपलेले नाहीत. जीवनाच्या बदलाबरोबर त्याचे स्वरूपही बदलले हे खरे पण, ह्या बदललेल्या स्वरूपात अनेक प्रश्न मात्र तीव्र बनत गेले. या तीव्र प्रश्नाचे चित्रण ग्रामीण, दलित साहित्यात होऊ लागले आहे.

* * *

# दलित–ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास

प्रा.सुनिता पावडे

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठी साहित्यात अनेक नवीन साहित्य प्रवाहांचा शिरकाव झालेला दिसतो. त्यामध्ये दलित साहित्य व ग्रामीण साहित्य या दोन प्रवाहांचा अंतर्भाव आहे. ''दलित जाणिवेतून दलित जीवनाचे भेदक दर्शन घडविणारे साहित्य ते दलित साहित्य'' अशी डॉ.भालचंद्र फडके यांनी दलित साहित्याची व्याख्या केली. ''ग्रामीण साहित्य'' म्हणजे ग्रामजीवन चित्रित करणारे साहित्य होय. प्रा.डॉ.आनंद यादव यांनी खेडेगाव, तेथील जीवन पद्धती, तेथील खास रीती, शेती, तेथील निसर्गाशी–मातीशी असलेले मानवीपण प्रदेशानिष्ठ वैषिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या ह्या साऱ्यांचा ग्रामीण साहित्यात समावेश केला आहे.

दलित आणि ग्रामीण हे दोन प्रवाह असले तरी त्या दोन्हींचाही प्रारंभ महात्मा फुल्यांपासून झालेला दिसतो. एवढेच नाहीतर ग्रामीण भागातील दलित चित्रण हा 'ग्रामीण साहित्या' चा एक घटक म्हणायला हरकत नाही. दलित आणि ग्रामीण साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या साहित्य प्रकारात विपुल लेखन झालेले दिसते. प्रस्तुत लेखात 'कादंबरी' या साहित्यप्रकाराच्या आधाराने दलित व ग्रामीण साहित्याचा तौलनिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी माधव कोंडविलकर यांच्या 'अजून उजाडायचं आहे' या दलित कादंबरीचा व प्रा. आप्पासाहेब खोत यांच्या 'गांवपांढर' या ग्रामीण कादंबरीचा अभ्यास केला आहे. त्यातील साम्य व भेदाच्या आधारे ही तुलना केली आहे.

माधव कोंडविलकरांची 'अजून उजाडायचं आहे' ही कादंबरी कोकणातील पातेपिलवली या छोट्या गावातील एका चांभाराच्या कुटुंबाची कहाणी आहे. देवजी चांभार, त्यांची बायको देवकी, मुलगा काशिनाथ, त्याची बहीण, मुलगी या कुटुंबाचे दारिद्र्य दुःखाने भरलेले कुटुंबजीवन यात उभे केले आहे. या कुटुंबातील नात्यागोत्याची माणसे तसेच जातपंचायत, त्यांचे परस्परसंबंध

कुटुंबजीवनाच्या पातळीवर मार्मिकपणे रंगविले आहेत. खेड्यातील लोकजीवनाचे तसेच त्यात होणाऱ्या स्थित्यंतराचे दर्शन घडविणारी माणसे आणि प्रसंगही या कांदबरीत आहेत. चांभाराच्या जीवनातील वहाणा तयार व दुरुस्त करण्याबरोबरच कातडे मिळविणे पर्यंतचे हुबेहूब चित्रण या कादंबरीत आहे.

थोडक्यात, देवजी चांभाराच्या दुर्दैवी जीवनाची करुण कहाणी आहे. प्रा.आप्पासाहेब खेत यांची 'गांवपांढर' ही कादंबरी बदलत्या ग्रामीण संस्कृतीचा, जीवनाचा वेध घेणारी आहे. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीचे निरीक्षण करून ही कादंबरी फुलविली आहे. बदलत्या खेड्यातील सामाजिक परिस्थिती, बदलेली खेडी, खेड्यातील राजकीय पार्ट्या, सोसायट्या, बँका यांचे नुतनीकरण व त्यातून बदलत गेलेले मानवी मन, स्वार्थी माणूस, चाललेला सत्ता संघर्ष या कादंबरीतून साकारताना दिसतो. या कादंबरीचा नायक बाळ आणि दिनकर शिंदे यांचा मित्र परिवार हा नव्या विचारांचा आहे. तर शंकर मास्तर, आमदार बापू, गोप्या, गणू, ही राजकारणी माणसे भ्रष्टाचाराने बरबटलेली आहेत. नव्या विचारांना विरोध करणारी ही माणसे आहेत. शिक्षणाने शहाणी झालेली माणसे कशा प्रकारे परिस्थिती, समाज, गाव सुधारण्याचा यशस्वी प्रयत्न करतात ते 'गांवपांढर' मध्ये प्रा. खोत यांनी चित्रित केलेले आहे.

ग्रामजीवनामध्ये शेतकरी व त्याची शेती हे केंद्रस्थानी असते. तर पाटील-कुलकर्णी, कारू-नारू, फिरस्ते हे सर्व त्यांच्याभोवती अशी रचना असते शेतकरी आणि आलुतेदार, बलुतेदार संबंधाना पूर्वीपासून 'कारू-नारू' असे संबोधण्यात येते. 'चांभार' या जातीला कारू असे म्हणतात. गावगाड्यात सर्व जाती एकमेकांवर अवलंबून असतात. चांभार हा चप्पल शिवणे, बांधणे यासारखी कामे गावासाठी करतो. त्या बदल्यात त्याला जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी त्या त्या जातीतील लोकांकडून मिळत असतात. 'अजून उजडायचं आहे' या कादंबरीत देवजी हा सर्व गावाला चप्पल बांधून देतो. त्याबदल्यात तो पैसे घेत नाही. तर पावसाळा येण्यापूर्वी घर नीट करून घेणे, सुताराकडून दारं करून घेणे. सणाच्या वेळी मिष्टान्न दारोदार फिरून मागणे. घरातील भांडे गहाण ठेवून पैसे मिळविणे. यासारख्या गोष्टी देवजीला नित्याच्या होत्या. सणाच्या वेळी तर प्रत्येक घरासमोर लाचारपणे उभे राहणे, त्यांची बोलणी खाणे व मिष्टान्न मिळविणे ही आपली परंपरा आहे असेच देवजीला वाटते व ती परंपरा न मोडण्याचा तो प्रयत्न करतो. परंतु हा देवजीचा पळकुटेपणा

आहे. परिस्थितीसमोर तो हताश झाला आहे. परंपरेच्या जोखंडात तो अडकून पडला आहे. त्याच्याच भावकीतली लोक आपली कामं सोडून मुंबईला गेलेत व तेथे आपला उदरनिर्वाह चालवत आहे. देवजी मात्र वाडवडिलांचा विचार करत जीव टांगणीला लावून बसला आहे.

'गांवपांढर' मध्ये याउलट परिस्थिती पहायला मिळते. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या आहेत. गावात पतसंस्था, दूधसंघ यांची स्थापना झाली आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे ऊसासारखं पैसाचं पीक सर्वत्र घेतलं जाते. शेतातही बारमाही कामे असतात. पैसा हातात खेळू लागल्यामुळे लोकं रिकामी राहू लागली. त्यामुळे राजकारण, सहकार या क्षेत्रामध्ये संघर्ष निर्माण होऊ लागला. त्याचे पडसाद गावावर व गावातील लोकांवर पडू लागलेले दिसतात. तरीदेखील शिक्षणाने शहाणी झालेली माणसे गावात राजकारण येऊ नये यासाठी प्रयत्न करतात. प्रा. बाळ व दिनक शिंदेसारखी माणसे त्यासाठी झटताना दिसतात.

'देवजी' हा शहराकडे जाण्यास तयार नाही. तर प्रा. बाळ शहरात नोकरीकरून सुद्धा आपल्या गावपांढरीकडे सतत फिरताना दिसतो. हा शिक्षणाचा परिणाम आपल्याला दोन्ही कादंबऱ्यात दिसतो. देवजी आपल्या मुलाला काशीनाथला शाळेत जा असे सांगतो. पण काम असेल तेव्हा शाळा सोडून घरी राहण्यास सांगतो. याउलट प्रा. बाळ, दिनकर शिंदे, संगिता, ज्ञानू तात्या सारखी माणसे गावात शाळा स्थापन करण्यासाठी प्रयत्न करतात. वास्तविक पाहता 'अजून उजाडायचं आहे' मधील देवजी, देवकी, अशिक्षित आहेत. दलित समाजात जन्मलेले, वाढलेले आहेत. परंतु याच दलित समाजात जन्मलेले वाढलेले प्रा. बाळ व दिनकर शिंदे हे 'गांवपांढर' मधील माणसे मात्र शिक्षणाने गावातील प्रमुख व्यक्तींमधील एक होऊन राहिलेले आहेत. हाच यातील प्रमुख फरक सांगता येईल. दलितांना गांवगाड्यापासून बाजूला सारले जाते. कोणत्याही ठिकाणी शेवटचा मान हा दलितांचा असतो. स्पृश्य, अस्पृश्य, शिवाशिव यासारख्या गोष्टी दलितांच्या बाबतीत पहायला मिळतात. पण शिक्षणाने या सर्वांवर मात केलेली आपल्याला दिसते. त्याचबरोबर जागृत झालेला समाज देखील याला कारणीभूत आहे.

साडीला ढिगळ लावता लावता 'अजून उजाडायचं आहे' मधील देवकी ही आपल्या फाटक्या संसाराला ढिगळ लावण्यासाठी आतोनात प्रयत्न

करते. आपला नवरा, आपले कुटुंब यांना जपण्यासाठी सतत काळजी घेते. आपल्या मुलांना, नवऱ्याला खुष ठेवण्यासाठी कोंबड्याची चोरीदेखील करते. अशी सोशीक व्यक्तिरेखा 'गावंपांढर' मध्ये पहायला मिळत नाही. सौदर्यानेच जीजीच्या सुखी संसारावर विरजण पडते. उतावळेपणा, भोगवृत्ती, सोशीकपणाचा अभाव या सगळ्या गोष्टी जीजीच्या व्यक्तिरेखेत पहावयास मिळतात. त्यामुळे परिस्थितीने जीजीच्या उभ्या आयुष्याची राखरांगोळी होते. याला परिस्थितीबरोबरच जीजी देखील कारणीभूत आहे. क्षणिक सुखासाठी आपलं आयुष्य बरबाद करणारी जीजी 'गांवपांढर' मध्ये दिसते. तर दुसऱ्याच्या दुःखाला जाणणारी शांताक्कासारखी प्रेमळ स्त्री देखील माधव कोडविलकर उभी करतात.

वेदना, सोशीकपणा हा दलित साहित्याचा आत्मा असलेला दिसतो तर ग्रामीण साहित्यात परिस्थितीनुसार माणसं आपल्याला बदलण्याचा व त्यात समरस होण्याचा प्रयत्न करतात.

'गांवपांढर' मध्ये ग्रामीण जीवन रेखाटताना तेथील बदलाचे व विज्ञानाच्या प्रगतीचे बरेवाईट परिणाम पहायला मिळतात. मुलाचा हट्ट पूर्ण करण्यासाठी व मुलाने काही बरे वाईट करू नये यासाठी अशोकला गाडी घेऊन देणारे काका आपल्याला दिसतात. मुलांबद्दल सतत काळजी करणारे पालक 'गांवपांढर' मध्ये दिसतात. तसेच देवजी आपल्या मुलीला सासरी त्रास होऊ नये यासाठी माहेरी तिला चांगले अन्न देणे, जावयाचा पाहुणचार करणे याकडे लक्ष देतो. पण तोच देवजी ''पोरांच्या जातीला लाडसुद्धा फार बरे नाहीत. ती एकदा लाडावली की लाडावली! आणि मग डोक्यावर चढली की भारी पडतात!'' असे म्हणतो. म्हणजे परिस्थितीने माणूस मुलांच्या भविष्याचा देखील विचार करतो. तर पैशाने माणूस मुलाच्या भविष्याचा विचार न करता मुलाच्या हट्टाचा विचार करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केल्यामुळे अनेक गावातील लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्यात पातेपिलवली गाव देखील मागे नव्हते. तेथील सगळे महार बौद्ध झाले होते. त्यामुळे मेलेली गुरं कोणी सोडवून देत नव्हते. त्याचा परिणाम देवजीच्या व्यवसायावर झालेला दिसतो. परंतु गावात नगदी पिकाबरोबरच दूधाचा व्यवसाय, पशुपालन, यासारखे जोडधंदे, दळणवळणाच्या साधनाची रेलचेल यामुळे 'गांवपांढर' तील लोक सधन झालेले दिसतात. त्याचबरोबर सर्व व्यवसायात विज्ञान-तंत्रज्ञानाने सुधारणा झालेली दिसते.

'अजून उजाडायचं आहे' व 'गांवपांढर' या दोन्ही कादंबऱ्यात व्यसनाधीनतेने ग्रासलेले लोक दिसतात. त्याचबरोबर सत्ता संघर्ष पहायला मिळतो. विषमता व अन्यायाला वाचा फोडण्याची वृत्ती दिसते. दोन्ही कादंबऱ्यात गावगाड्याचे वर्णन आलेले असले तरी आपली वेदना संताप व्यक्त करताना शिव्या, असभ्य भाषा, ओंगळ किळसवाणे वर्णन, वास्तवाचे भान जाणून देण्यासाठी तसचे कोकणातील बोलीचा वापर केलेला माधव कोंडविलकारांनी दिसतो. तर कोल्हापूर भागातील जनजीवन व तेथील भाषेचा वापर करून जिवंत चित्रण करण्याचे काम प्रा. खोत यांनी केले आहे.

थोडक्यात, दलित साहित्यात ग्रामीण जीवन आलेले आहे. विशेषत: चातुर्वर्ण्यव्यवस्था, जातीभेद, अस्पृष्यता, उच्च नीचता व ह्या सर्वांमधून निर्माण होणारी वेदना अधिक प्रमाणात ग्रामीण भागातून दिसून येते. ग्रामीण भागात म्हणावी तेवढी जागृती, सुधारणा झालेली दिसत नाही. त्यामुळे सवर्ण हे दलितांवर अन्याय, अत्याचार करीत आलेले आहे. त्याचमुळे ग्रामीण भागातील दलित चित्रण हे व्यापक अर्थाने 'ग्रामीण साहित्य' आहे असे म्हणायला हरकत नाही असे माधव कोडंविलकरांच्या 'अजून उजाडायचं आहे' या कादंबरीतून वाटते. तर विज्ञानाने शिक्षणाने जागा झालेला, परिस्थितीनुसार स्वत:ला बदलणारा पैशाने सधन झालेला समाज व्यसनाधीनता, अराजकता, सत्ता, संघर्ष, निवडणूका, शारीरिक सुख मिळविण्यासाठी वाटेल ते करू लागला. त्यामुळे स्वत:च्या स्वार्थासाठी सामान्यांचा बळी जाऊ लागला. यातून मार्ग काढणारे देखील सर्वसामान्य माणसेच आहेत. आपल्या गावाला या गर्तेतून काढणाऱ्या सुजाण, जबाबदार नागरिकांचे व त्यांच्या यशस्वी कार्याचे वर्णन प्रा. आप्पासाहेब खोत यांनी 'गांवपांढर' या ग्रामीण कादंबरीत केले आहे.

* * *

# ग्रामीण व दलित कादंबरी तौलनिक अध्ययन

–प्रा. गणेश गोपाळ मालटे

ग्रामीण व दलित समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाल्यानंतर ग्रामीण लोकजीवन जे पूर्वी लोकवाङ्मयातून अभिव्यक्त होत होते व पुढील पिढीला संक्रमित होत होते. ते शिक्षणाच्या अभावाने ग्रामीण व दलित समाजाच्या भावनिक कोंडीला प्रवाहित करता येत नव्हते पण जेव्हा दोनही समाजाची अक्षराशी ओळख झाली तेव्हापासून अंत:करणात कोंडून ठेवलेले प्रवाहित व्हायला मार्ग मिळाला. अंत:करणाचा आत्मविष्कार व्हायला लागला. शिक्षणाची गंगा ग्रामीण परिसरात आणि स्वाभाविकच दलित समाजापर्यंत गेली. त्यामुळे ग्रामीण व दलित या दोघांनाही आपले भोगलेपण मांडण्याची संधी मिळाली. त्यामुळेच ग्रामीण परिसरातून साठोत्तरी साहित्यामध्ये नवीन लेखकांनी हजेरी लावली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र दिल्यामुळे स्वाभाविकच दलित वर्गाचा ओढा या क्षेत्राकडे वळला. ग्रामीण दलित साहित्यातून कथा, कादंबरी, ललित लिहायला सुरुवात झाली तसेच आत्मकथनातून लोक स्वत:ला व्यक्त करायला लागले ही अभिव्यक्ती ग्रामीण व दलित दोन्ही समाजामध्ये झाली. शिकलेला वर्ग आपले भोगलेपण मांडायला लागला. ग्रामीण जीवनात दलित हा शोषित घटक आहे. त्यामुळे त्यांच्या वेदना वेगळ्या आहेत.

ग्रामीण जीवन शेती मा लोकसंस्कृतीच्या भोवती फिरतांना दिसते. त्यामुळे कृषी, पशू, पक्षी शेताची मशागत या सर्व बाबी ग्रामीण साहित्यातून व्यक्त व्हायला लागल्या. ग्रामीण माणसांची बोलीभाषा, त्यांचे उच्चार, आशय यात नागरीपेक्षा वेगळपण आहे पण ग्रामीणचा गोडवा हा देखील वेगळा आहे.

दलित साहित्यामध्ये काही अपवाद वगळता सर्वांनीच आत्मकथनपर लेखनाला प्राधान्य दिले. या संदर्भात असे म्हटले जाते की, दलित साहित्य हे वेदना, विद्रोह, आकांत आणि दलित जाणिवेने भरलेले असते. त्यात आकांतही व आक्रमकताही आहे.

ग्रामीण व दलित या दोन्ही अंगाने विचार करतांना असे लक्षात येते की, दोन्हीचा तौलनिक अंगाने विचार करता ग्रामीण साहित्याचा उगम हा

मनोरंजनासाठी झाला. त्यामुळे जनपदगीते, दंडार, इत्यादीतून ग्रामीण माणूस व्यक्त होत गेला तर दलित साहित्याचा उद्‌गम हा वेदना व विद्रोह आर्थिक विषमता, अन्याय, अत्याचार, पिळवणूक अशा नकारात्मक संदर्भातून झाला. म्हणजे ग्रामीण साहित्य निर्मिती सकारात्मक, आनंदासाठी व मनोरंजनासाठी झाली. त्याच आत्मप्रगटीकरण नाही तर विनोदी अंगाने ग्रामीण माणूस त्यांच्या बोलीसह मांडण्याचा प्रयत्न ग्रामीण साहित्यातून झाला. ग्रामीण साहित्यावर लोकवाङ्‌मयाचा प्रभाव आहे व ग्रामीण संस्कृतीचाही प्रभाव आहे तर दलित साहित्यावर आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव आहे. ग्रामीण साहित्यात वेदना आहे, विनोद आहे पण विद्रोह आणि आक्रमकता नाही. ग्रामीण साहित्यात जशा ग्रामीण जाणीवा आहे तशाच दलित साहित्यातही दलित जाणीवा आहेत. दलित साहित्यात माणसाचा त्याच्या जन्मामुळे भोगाव्या लागलेल्या यातनांचे चित्रण दिसते. तसेच दलित साहित्यात दिसून येणारा दलित व जन्मापासून दलित शोषित आहे. दलित साहित्य निर्मिती करणारे लेखक हे दलित समाजातून आलेले आहेत. उदा. बाबुराव बागूल, दया पवार, नामदेव ढसाळ, प्र.ई.सोनकांबळे, माधव कोंडविलकर, नामदेव कांबळे इत्यादी दलित साहित्य म्हणजे स्वत:ला व स्वत:हा भोवती वास्तावाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्ती शब्दरूप आविष्कार होय. दलित साहित्य हे आंबेडकरी चळवळीने प्रभावित झाल्यामुळे तो एक व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे.

ग्रामीण व दलित साहित्याचा आलेख हा कथा, कादंबरी, नाटक असा आहे. इथे फक्त कादंबरीचाच विचार करावयाचा आहे. त्यामुळे कादंबरी याचा वाङ्‌मय अनुषंगाने तौलनिक अंगाने निवेदन केले आहे. कादंबरी हा निवेदन प्रधान वाङ्‌मयप्रकार असल्यामुळे, त्यात सांगण्याजोगा भरपूर मजकूर असतो. या मजकुराला आपण कथानक असे म्हणतो. कथानक नसलेल्या कादंबऱ्यांतदेखील असा निवेदन योग्य मजकूर असतो. या मजकुराचा घटना, प्रसंग, पात्रे प्रस्तुतीकरण पद्धती या सर्वांशी संबंध येतो. किंबहुना असेही म्हणता येईल की, कथानकात या सर्वांचा समावेश होतो. कथानकात हे सारे घटक एकजिनसीपणाने येत असल्यामुळे कथानक एकात्म होते.

कादंबरी हा निवेदन वाङ्‌मयप्रकार आहे. जेव्हा एखादे कथानक कथेच्या अवाक्यात बसत नाही तेव्हा कादंबरीच्या आकृतिबंधामध्ये बसविले जाते. कादंबरी हा एक प्रभावी परिणाम घटक असा निवेदन प्रकार आहे. संज्ञा

संकल्पना कोषात कादंबरीच्या व्याख्या करताना असे म्हटले जाते की, एक दीर्घ कथात्मक गद्य साहित्य प्रकार Novus या शब्दाचा कादंबरी हा मराठी पर्याय आहे. Novel ही संज्ञा मूळ लॅटिन Novus म्हणजे नावीन्यपूर्ण आणि त्याच्या या इटालियन रूपावरून इंग्रजी आली.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार पाश्चिमात्त्य साहित्यातून मराठी वाङ्मयात आला. त्यामुळे पूर्वी मराठी भाषेत आविष्कारासाठी कथा व कविता हे माध्यम होते. त्यामुळे कथा, काव्य हे प्रकार अस्तित्वात आले. इंग्रजी वाङ्मयाची कादंबरी ही मराठी साहित्याला देण आहे. कादंबरी अन्य वाङ्मयप्रकाराहून वेगळी आहे. कारण तिच्यात कथानक, व्यक्तिचित्रण, निवेदन, वर्णन, भाषाशैली इ. घटक येतात.

कादंबरी या संज्ञेचा अर्थबोध करून देण्यासाठी तिच्या व्याख्येमध्ये कादंबरीचे लक्षण अचूक व मोजक्या शब्दात ग्रंथीत करता यायला हवे, अन्य वाङ्मयीन कृती कादंबरी असल्याची खूण तिच्या अंगी असणाऱ्या ज्या विशिष्ट गुणधर्मामुळे जसे त्या गुणधर्मावर नेमके बोट ठेवता यायला हवे म्हणजे अन्य वाङ्मयप्रकारातून तिच्या रुपाची पृथगात्मकता ज्या वैशिष्ट्यामुळे जाणवते, ती वैशिष्ट्ये अधोरेखित करता यायला हवीत. कादंबरी वाङ्मयप्रकारात निवेदक, भाषाशैली, निरगाठ उकल व लेखकांचा जीवनविषयक दृष्टिकोन या सर्व घटकांचा समावेश होतो म्हणून कादंबरीचे वेगळेपण लक्षात राहिले. कादंबरीचे स्वरूपच कथनात्मक असते. तसेच ते निवेदन शैलीवर अवलंबून असते.

अर्वाचीन कादंबरीचा जन्म १८ व्या शतकात झाला तर ग्रामीण व दलित कादंबरी ही साठोत्तरी आहे. कादंबऱ्यामधून नागरी जीवन, ग्रामीण जीवन व दलित जीवन व्यक्त झाले. ग्रामीण व दलित हे स्वतंत्र प्रकार म्हणून अस्तित्वात आले. ग्रामीण भागात जसा दलित समाज आहे तशाच नागरी समुदायातही दलित वस्त्या आहेत. दोन्ही ठिकाणचे प्रश्न वेगवेगळे आहेत. अस्पृश्यतेची तीव्रता ग्रामीण भागात अधिक आहे. ग्रामीण व दलित साहित्याचा कादंबरीच्या अंगाने विचार करावयाचा झाल्यास तो कथानक, भाषाशैली, बोलीभाषा, व्यक्तिरेखा या अंगाने करावा लागेल.

ग्रामीण कादंबरी ग्रामीण जीवनाभोवती केंद्रित झालेली असते. यात ग्रामीण लोक, त्यांची संस्कृती व्यवहार, रूढी, परंपरा, सणवार परिसर, शेती, बलुतेदारी, अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, दुष्काळ व्यवस्थेकडून

होणारे शोषण, निर्सगाने केलेले शोषण, शेती निष्ठा, अशा संदर्भाने प्रवास करते. ग्रामीण व्यक्ती ही या कादंबरीचे नायक-नायिका असते. लेखक ग्रामीण जीवन हळूवारपणे मांडण्याचा प्रयत्न करतो. वैदर्भीम कादंबऱ्याचा विचार करावयाचा झाल्यास पा.श्रा. गोरे यांची 'कात टाकलेली नागीन', उद्धव शेळके यांची 'धग', बाबाराव मुसळे यांची 'पखाल', 'हल्या हल्या दुधू दे', तर सदानंद देशमुखांची 'तहान व बारोमास', रविंद्र शोभणे यांची 'कोंडी' या कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवन व ग्रामीण जीवनाची संस्कृती व जीवन दर्शन होते. उद्धव शेळकेच्या 'धग' कादंबरीतील कौतिक ही थेट पाथेर पांचालीशी नाते सांगते. ग्रामीण समाजामध्ये वंश परंपरांगत व्यवसाय करणारे व्यावसायिक त्याचे व्यवसायाचे संक्रमण झाले नाहीतर संबंध कुटुंबाची कशी वाताहात होते हे लक्षात येते. कौतिक ही ग्रामीण स्त्रीची प्रतिनिधी ठरते त्यातून पतीबद्दलची अपार निष्ठा व कुटुंबासाठी काबाडकष्ट उपसण्याची शक्ती जगण्यातल्या चिवटपणा व पतीसाठी संकटांचा सामना करण्याची लढवैय्या वृत्ती दिसते. ग्रामीण कादंबऱ्याचे कथानक ग्रामीण संस्कृतीशी निगडित असते. मग ग्रामीण लेखकही ग्रामीण परिसराशी अनुबंध असणारा असतो. त्यामुळेच तो व्यक्तिरेखेतील बारकावे चित्रित करतो. ग्रामीण भागातील वऱ्हाडी ठसका ग्रामीण वृत्ती-प्रवृत्ती, विकृती असणारी भिन्न भिन्न पात्रे ग्रामीण रांगडेपण हळवेपण त्याच्यातील निष्क्रियपणा, ग्रामीण कादंबरीमध्ये प्रामुख्याने जाणवते. ग्रामीण कादंबरीतही आर्थिक व समाजिक विषमतेचा प्रत्यय येतो. ग्रामीण कादंबऱ्यातील संवाद हे त्या त्या परिसरातील बोलीच्या अनुषंगाने येतात. ग्रामीण लेखक संवादासाठी बोलीभाषा व निवेदनासाठी प्रमाणभाषा वापरताना दिसतात. ग्रामीण जीवन मांडतांना लेखक खेडे, शेती, पशु-पक्षी, घर, माणसे उभे करण्याचा प्रयत्न करतो. ग्रामीण माणूस त्याच्या बोलीभाषेसह त्यांच्या कादंबरीतून उभा राहतो. नागरी संस्कृतीमध्ये विकसित झालेल्या वाचकांना ग्रामीण बोलीभाषा आकलनात अडथळे येतात. तरीसुद्धा ग्रामीण कादंबरीने साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. यातील कथानक पात्रे संवाद काल्पनिक असली तरी संबंधीत परिसराचे प्रतिनिधित्त्व करते हे तेवढेच खरे.

दलित कादंबरी ही आत्मकथाच्या अनुषंगाने प्रवास करताना दिसते. त्यामुळे अनेक दलित कादंबऱ्या आत्मकथनात्मक वाटायला लागतात. आंबेडकरी चळवळीने दलित वर्ग लिहिता झाल्याने तो कल्पकतेत न रमता दलित समाजाने भोगलेले वास्तव मांडण्याचा प्रयत्न करतो. बहुतेक दलित कादंबऱ्यातून दलितांची

आत्मकथनेच आली आहेत. एखादी साहित्यकृती दलित आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी काही निकषांचा आधार घ्यावा लागतो. त्यात वेदना, विद्रोह, आक्रोश, आक्रमकता व दलित जाणीव ही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे दलितांनी भोगलेले जीवन दलित कादंबऱ्यातून मांडले जाते. त्यामुळे या कादंबऱ्या वास्तवाच्या अधिक जवळ दिसतात. आजच्या दलित कादंबऱ्यामध्ये दलित आत्मकथने अधिक दिसतात त्यामुळे आत्मकथनात्मक साहित्य हे दलित साहित्यातून सुरू झाले असे म्हटले जाते. या कादंबऱ्याच्या सूचीवरूनच वेदना, विद्रोह व आक्रोश लक्षात येतो. अशोक व्हटकराचं-'मेलंलं पाणी', प्र. इ. सोनकांबळे 'आठवणीचे पक्षी', दया पवार 'बलुतं', माधव कोंडवलीकर-'मुक्काम पोस्ट देवाचे गोठाणे', उत्तम बंडू तुपे-'काट्यावरची पोर', रूस्तुम उचलखांब-'गावकी', कुमुद पावडे-'अंत:स्फोट', शरदकुमार लिंबाळे-'अक्करमाशी', लक्ष्मण माने-'उपरा', लक्ष्मण गायकवाड-'उचल्या', वैजनाथ कळसे-'आमरनीच्या घन', पार्थ पोळके-'आयरान', दादासाहेब मोरे-'गबाळ', 'झोंबी'-आनंद यादव, मुक्ता सर्वगोड-'मिटलेले कवाडं', ना.स. झोडगे-'फाझर', सौ. शांताबाई कांबळे-'माझ्या जन्माची चित्तरकथा', बेबी कांबळे-'जिणं आमचं भिमराव गस्ती', 'बेरड', श्रीरंग रोडगे-'महार वेटाळ', किशोर शांताबाई काळे-'कोल्ह्याट्याचं पोर', दलित कादंबऱ्या ह्या वास्तवाच्या जवळच्या आहेत. त्या दलित वास्तव मांडतात. नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ', 'ऊनसावली', 'संध्याछाया' या कादंबऱ्यातून वालंबीची राघवला मोठे करण्याची धडपड दिसते. या कादंबऱ्या आत्मकथनात्मक नसताना देखील लेखकांशी नाते सांगताना दिसते. दलित कादंबऱ्यामध्ये दलितांना मिळालेली पशूतुल्य वागणूक, पिळवणूक, अन्याय, अत्याचार याचा प्रत्यय येतो. त्याची वेदना विद्रोह करते तर आक्रोश आक्रमक होतो. तो परिस्थितीची प्रतिकार करतो. त्यात परिस्थिती शरणता दिसत नाही. दलित कादंबऱ्यातून ग्रामीण व नागरी दोन्ही जीवन रेखाटलेले दिसते. कारण आंबेडकरी चळवळीनंतर दलित वर्गामध्ये गतिशीलता आली. तो रोजगारासाठी खेड्यातून शहराकडे गेले त्यामुळे दलित कादंबरी ही ग्रामीण किंवा निव्वळ नागरी असू शकत नाही तर ती दलित कादंबरीचं असते कारण तिच्यात दलित जाणिवांची प्रभावी अभिव्यक्ती असते. दलित कादंबरीचा लेखकही दलित असतो. ग्रामीण कादंबरी ही निखळ ग्रामीणच असते तर काही दलित कादंबऱ्या ग्रामीण व दलित दोन्ही संज्ञेत समाविष्ट होतात. उदा. उचल्या,

बलुतं, राघववेळ इत्यादी.

ग्रामीण व दलित कादंबऱ्याचं तुलनात्मक विचार करतांना असे लक्षात येते की, ग्रामीण कादंबऱ्या ह्या काल्पनिक असू शकतात. लेखकाने कल्पना विस्तार केलेल्या असू शकतो पण दलित कादंबऱ्या मात्र प्रखर वास्तववादी असतात. त्यात भोगलेपण आविष्कृत झालेले असते. ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामीण बोलीभाषेचा प्रत्यय येतो. तर दलित कादंबरीमध्ये ग्रामीण, नागरी, व वस्तीची बोलीभाषा तिन्हीचा आढळ येतो. ग्रामीण कादंबऱ्यामध्ये ईश्वर शरणता हा भाग येतो. नशिब, विपत्ती, ईश्वर यासोबतच जीवननिष्ठाही येतात पण दलितांची धर्मांतरानंतर ईश्वरविषयक संकल्पना बदलली त्यामुळे त्याची वेदना विद्रोह करते, आक्रमक होते पण ईश्वर शरणता स्वीकारत नाही. असे असले तरी ग्रामीण व दलित कादंबरी आवृत्तिबंधाच्या मर्यादा तोडून बाहेर जात नाही. त्या वाचक भाव ठेवतात. पात्र, संवाद, निवेदन, आकर्षक व प्रभावी करण्याचा प्रयत्न करतात. निवेदनात अस्सलपणा यावा म्हणून संवादात बोलीभाषा वापरतात. या दोन्ही प्रवाहांनी सामान्य ग्रामीण माणूस व उपेक्षित, शोषित दलित मांडण्याचा प्रयत्न केला हे साम्य दुर्लक्षित करण्यासारखे नाही.

* * *

# ग्रामीण व दलित कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास

–प्रा. राजाराम प्रभाकर गावडे

**प्रस्तावना :**

आधुनिक आणि सर्वाधिक लोकप्रिय झालेला वाङ्मय प्रकार म्हणजे कादंबरी होय. कादंबरी इतकी लोकप्रियता ललित वाङ्मयाच्या दुसऱ्या कोणत्याच प्रकाराला लाभली नाही. कारण आपण जे जीवन जगतो, ज्या जगात राहतो, त्याबद्दल कुतुहल वाटणे हा उपजत मनुष्य स्वभाव आहे. जिज्ञासेची पूर्तता कादंबरीशिवाय दुसऱ्या कोणत्याही वाङ्मयप्रकाराकडून होऊ शकत नाही. मनुष्याचे वागणे, त्याच्या बोलण्याचालण्याचा इतरांवर होणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया हे सर्व जाणून घ्यायला तो उत्सुक असतो. ही उत्सुकता कादंबरीच्याद्वारे बव्हंशी पूर्ण होऊ शकते. कादंबरीमध्ये वास्तवतेबरोबरच कल्पकतेलाही बराच अवसर असतो. लेखक कल्पनेचे साहाय्य घेऊन कादंबरीत रंजकता आणण्याचा प्रयत्न करीत असतो. कादंबरीला इतर सर्व वाङ्मयप्रकारात जी अफाट लोकप्रियता लाभली तिचे कारण हेच आहे. मनुष्याच्या जीवनात सुखाचे क्षण निर्माण करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत त्यापैकी साहित्य आणि साहित्यातही कादंबरी हा वाङ्मयप्रकार मनुष्याचे जीवन सुखद करण्याचा प्रयत्न करतो.

विश्वात अनंत सत्ये दडली आहेत. अनंत रहस्ये अद्याप उमगलेली नाहीत. ती शोधून काढणे, त्यांचे वास्तव स्वरुप समजून घेणे यासाठी मनुष्य अनंत काळापासून धडपडत आला आहे. अनेक साहित्यिक याच सत्याचा पाठपुरावा करीत आले आहेत. थोडक्यात कादंबरीचा जन्म झाला कसा तर दिवसभर उपसलेल्या कष्टांचा विसर पडावा म्हणून शेकोटीभोवती जमल्यानंतर आपण जो पराक्रम केला त्याचे वर्णन करण्यात येई. यातूनच कादंबरीचे बीज आकाराला आले. थोडक्यात लेखकाच्या बालपणातील, कुमारवयातील व तरुणपणातील, अनुभवलेल्या आणि पाहिलेल्या घटना, व्यक्ती, प्रसंग यांचा ठसा त्यांच्या कादंबरीच्या कथानकांवर विशेष असतो. या काळातील संस्कारात कौटुंबिक, आसपासच्या परिसरातील शिक्षणाचे, शिक्षकांचे, वाचनाचे, गावचे संस्कार असतात. त्यामुळे या वयात कोणते संस्कार होतात हे निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. हे संस्कार पुष्कळवेळा इतके दाट असतात की, सबंध कादंबरी

ही जणू आत्मचरित्राचाच एक अप्रत्यक्ष प्रकार होऊन बसते. यासाठी तो काही वेळा कल्पनाधिष्ठित अशा साहित्य रुपाचा आधार घेत असतो. यासाठी कादंबरी हा साहित्य प्रकार लेखकांना जवळचा वाटतो.

**दलित साहित्याच्या प्रेरणा :**

दलित साहित्याच्या प्रेरणेचा मूलस्त्रोत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी मांडलेले विचार होत. दलितांमध्ये शिक्षणप्रसार व्हावा, स्पृश्यवर्गीयांनी दलितांना माणसासारखे वागवावे, दलितांमध्ये आर्थिक, सामाजिक सुधारण घडवून याव्या ज्यामुळे दलितांचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य नाहीसे होईल. धर्म व जातीच्या नावाखाली दलितांवर होणरे अन्याय अत्याचार नाहीसे व्हावेत, यासाठी महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा इ. अनेक महापुरुषांनी कार्य केले ही एक महत्त्वाची प्रेरणा होय.

दलित समाजाची नाळ वर्णव्यवस्थेने ज्ञानापासून तोडली होती. त्यामुळे त्यांचे जीवन लाचारीने वेढलेले होते. अस्पृश्य समाज अज्ञान, दारिद्र्य, लाचारी, अपमान अशा दारुण अवस्थेत जगत होता. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने दलित समाजाला प्रभावी नेतृत्व लाभले. त्यांनी दलितांमधील माणूस प्रथम जागा केला. शेकडो वर्षे पशुपातळीवर जीवन जगणाऱ्या दलित समाजाला त्यांनी त्यांच्यामधील मनुष्यत्वाची जाणीव करून दिली. माणूस म्हणून जगण्यास प्रवृत्त केले. असा जागृत झालेला दलित माणूस आपल्या सर्व सामर्थ्यानिशी आंबेडकरांच्या चळवळीत सामील झाला. स्वातंष्य, समता आणि बंधुत्व यावर आधारलेला समाज निर्माण करणे हे आंबेडकरांचे ध्येय होते. जातीचे अस्तित्त्व व जाणीव जोपर्यंत समाजात असते तोपर्यंत समाजात एकात्मता निर्माण होत नाही. म्हणून दलित समाजाला धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात समान हक्क मिळवून देण्यासाठी महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह नाशिक, पर्वती इ. ठिकाणी केलेले मंदिर प्रवेशाचे सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, शांततेच्या व घटनात्मक मार्गाने केलेल्या मागण्या इ. विविध मार्ग आंबेडकरांनी योजले आणि अखेर धर्मांतर करून त्यांनी आपल्या आंदोलनास व्यापक अधिष्ठान प्राप्त करून दिले. लक्षावधी अस्पृश्यांना बुद्धजन बनवून त्यांच्या मुक्तीचा व आत्मोद्धराचा मार्ग त्यांनी दाखविला. म्हणून दलित साहित्याचे मुख्य प्रेरणास्थान डॉ.बाबासाहेब

आंबेडकर हेच आहेत. म्हणून दलित कादंबरी हीसुद्धा बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या कार्याला वाहिलेली एक शब्दांजली आहे असे मला वाटते.

**आंबेडकरी प्रेरणेचा समर्थ हुंकार म्हणजे दलित कादंबरी:**

डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या कार्याने दलित चळवळ अधिक गतिमान झाली. हजारो वर्षे लाथाडलेल्या अस्पृश्यांना हृदयाशी धरणारा, सामाजिक न्यायासाठी विषमतेविरुद्ध लढणारा, माणसांसाठी माणसं असलेल्या अस्पृश्यांना माणुसकीचे हक्क मिळावेत म्हणून अन्याय, अत्याचाराचे वाभाडे काढणारा पराक्रमी योद्धा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. परंतु या महापुरुषाच्या महापरिनिर्वाणाने अनेक प्रश्न निर्माण झाले.

आंबेडकरांच्या आकस्मिक निधनानंतर दलित समाज पोरका झाला. त्यांच्यानंतर दलित समाजाचे धुरीणत्व करील असा तोलामोलाचा नेता नव्हता. त्याची परिणती दलित संघटना, चळवळ दुभंगण्यात झाली. संघटनेत फूट पडली. अंतर्गत वाद उफाळून आले. नेतृत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले. रिपब्लिकन पक्षाची शकले झाली. यासर्व गोष्टीचे चित्र दलित कादंबरीकारांनी काही प्रमाणात केले आहे.

यातून 'मी माझ्या गावाच्या शोधात' शंकरराव खरात, 'काजळी रात्र' ना.रा. शेंडे, 'मुक्तिसंगघम' हि.गो.बनसोडे, 'युगविधान' बा.स.हाटे, 'बलिदान' ज.वि.पवार, 'इस्कोट' भीमसेन देठे, 'आघात' विलास अंभोरे, 'हाडकी हाडवळ' नामदेव ढसाळ, 'माझं गाव कुठाय' योगेंद्र मेश्राम, 'दंगल' शरणकुमार लिंबाळे, 'फकिरा', अण्णाभाऊ साठे, 'दे दान सुटे गिऱ्हाण' ना.ब. जाधव, 'हकिकत आणि जटायू' केशव मेश्राम, 'राघववेळ' नामदेव कांबळे, 'अजून उजाडायचं आहे' माधव कोंडविलकर, 'मेलेलं पाणी' अशोक व्हटकर, 'झुलवा' उत्तम बंडू तुपे, 'सूड' बाबुराव बागूल इ. अनेक कादंबरीकार या चळवळीतून तयार झाले.

**काही दलित कादंबऱ्यातील आशय पुढीलप्रमाणे :**

चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेत दलित समाज सर्वस्वी व संपूर्णपणे उपेक्षित राहिला होता. सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक स्वातंत्र्यापासून तो वंचित होता. मूलभूत मानवी हक्कांपासून अलिप्त होता. या वंचित समाजाला हक्काची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करून दिली. परंतु डॉ. बाबासाहेबांच्या

आकस्मिक मृत्यूने फार मोठा आघात या समाजावर झाला. त्याचे चित्रण काही कादंबरीकारांनी आपलया कादंबरीमध्ये केलेले आहे.

भीमसेन देठे आपल्या 'इस्कोट' या कादंबरीमध्ये म्हणतात, 'शेताचा बांध फुटून पाणी सैरभैर व्हावं, तसा दामूच्या घोगऱ्या आवाजाबरोबर त्याचा हुंदका फुटला होता. कधी न रडलेला दामू आज धाय मोकलून रडत होता, 'बाबा गेले.......!' असे म्हणून तो पुन्हा मोठमोठयाने रडू लागला. बाबासाहेब गेल्याचे तो सर्वांना सांगतो. हां हां म्हणता ही बातमी साऱ्या गावात पसरली. कर्त्या मंडळीबरोबर तरुण मंडळीही गोळा झाली. जमलेल्या लोकांपैकी कित्येकांनी बाबासाहेबांना पाहयलेलं नव्हतं, परंतु त्यांच्याबद्दलच्या श्रद्धेने त्यांच्या प्रेमाने तो जनसमूदाय हेलावला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनामुळे झालेल्या दु:खाचे चित्रण ना.म. शिंदे यांनीही केले आहे. ते म्हणतात, ''हे देवा, अरे कडू देवा! क घात केलास रे !'' खेडयातील सर्व दलित स्त्रियासुद्धा आपला आधार गेल्याचे दु:ख व्यक्त करीत होत्या.

महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाचे बा.स.हाटे यांनीही आपल्या कादंबरीमधून चित्रण केलेले आहे. उदा. आता दुपार झाली आहे. आपण सर्वांना तहान लागली आहे. चला आताही वर्षानुवर्षाची तहान भागवली पाहिजे. आपणाला पुरून उरेल एवढे पाणी आपल्या जवळच आहे. ते आपल्याला बोलावत आहे.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलितांच्या चळवळीत फूट पडली. त्याबद्दलही भीमसेन देठे म्हणतात, ''डॉ. बाबासाहेबांनी पददलित समाजाला नरकातून वर काढलं. त्यांच्यात नवा प्राण फुंकला. नव्या धर्माचा संदेश देऊन प्रगतीच्या दिशा मोकळया केल्या. संपूर्ण दलित समाज आत्मीयतेने, नवचैतन्याने भारला गेला. आयुष्यभर झिजून त्यांनी पददलितांची जी जोरदार संघटना तयार केली होती, तिचे त्यांच्या निधनानंतर स्वार्थी व ढोंगी पुढाऱ्यांन तीन तेरा वाजविले.

**दलित कादंबऱ्यांचे वेगळेपण :**

दलित कादंबरी किंवा दलित साहित्याचे प्रेरणास्थान हेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहे. त्यांच्या विचारांची छाप संपूर्ण दलित साहित्यातून दिसून येते.

बाबासाहेबांच्या विचाराने जागे झालेल्या कादंबरीकारांनी दलितांच्या घरादाराचे वस्तीचे चित्रण केले आहे. उदा. शंकरराव खरात 'मी गावाच्या शोधात' 'इस्कोट', 'फकिरा' इ. दलितांच्या उद्योग-व्यवसायाचे म्हणजे गावकीच्या कामाचे चित्रणही दलित लेखकांनी केलेले आहे. उदा. उत्तम कांबळे, 'श्राद्ध', 'कल्लोळ' दि.रा. वाघमारे, माधव कोंडविलकर 'छेद', इ. दलितांच्या श्रद्धा, अंधश्रद्धांचे प्रश्न, परंपरांचेही चित्रण काही कादंबरीकारांनी केलेले आहे. उदा. बी. रंगराव यांची 'सोना', 'मुक्ती', 'फिरस्ता', मेलेलं पाणी', 'तीन-भिंती', 'काळगर्भ' इ. दलितांच्या दुःख आणि दारिद्र्याचे चित्रणही अनेक कादंबरीकारांनी केलेले आहे. जन्मजात अस्पृश्यतेमुळे दलितांच्या वाटयाला अनेक दुःखे आलेली आहेत. दलित माणसाला या समाजव्यवस्थेने सामाजिक-सांस्कृतिक जीवनापासून वंचित ठेवले आहे. दलितांकडून श्रम होऊन त्याला मात्र उत्पादनाच्या साधनांपासून दूर ठेवले गेले आहे. त्यामुळे दलितांच्या वाट्याला दुःख-दारिद्र्यच आले याचे चित्रणही अनेक कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यात केले आहे. उदा. 'मी माझ्या गावाच्या शोधात' शंकरराव खरात, 'वेदना', 'राघववेळ', 'अनाथ', 'मेलेलं पाणी', 'तीन भिंती', 'पारधी', इ.

दलितांवरील अन्याय, अत्याचाराचे चित्रणही अनेक कादंबरीकारांनी केलेले आहे. अस्पृश्यांवर नेहमीच अन्याय अत्याचार होत असतो. दलितांची चूक असो अथवा नसो त्यांना अन्याय निमूटपणे सहन करावा लागतो. उदा. 'दंगल', 'युगविधान', 'वेदना', 'कल्लोळ', 'सोळा शिणगार', 'इस्कोट', 'जागृती', 'सूड', इ.

**ग्रामीण कादंबरी आणि दलित कादंबरीतील फरक :**

दलित कादंबऱ्यांचा आढावा घेतला असता विद्रोह, नकार, दुःख हे दलित साहित्याचे स्वरूप दलित कादंबरीतही जाणवते. दलित कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांतून मानवमुक्तीचा समर्थपणे लढा उभारलेला आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो घेईल तो गुरगुरणारच. याप्रमाणे 'शिका, संघटित व्हा, आणि सत्यासाठी संघर्ष करा' हे बिरुद समोर ठेवून दलित कादंबरीकारांनी स्वातंत्र्य, समता बंधुता, यासाठी लढा उभारलेला दिसतो.

ग्रामीण कादंबरीचा अभ्यास केल्यानंतर मात्र हे जाणवत नाही. मुळात ग्रामीण साहित्याची नाळचं कृषिकेंद्रिततेशी जोडलेली आहे. ग्रामीण माणूस,

वातावरण, निसर्ग, घटना, पाटिलकी, गावगुंडी या सर्वांचा मेळ ग्रामीण कादंबरीकारांनी कादंबरीमध्ये घातलेला दिसतो. कादंबरी हा साहित्यप्रकारच कल्पनेच्या स्वैर भरारीवर आधारलेला आहे. गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या घोषणेमुळे संपूर्ण खेडी परिवर्तनाच्या वाटेवर उभी राहिली. स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण साहित्याचे स्वरुप हे पूर्णत: रंजक अशा पद्धतीचे असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यात प्रादेशिकतेच्या शिरकाव्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे चित्रण कादंबऱ्यातून दिसायला लागले. महाराष्ट्राची भौगोलिक रचना ज्याप्रमाणे आहे अगदी तशीच परिस्थिती मराठी ग्रामीण साहित्याची सुद्धा आहे. स्वातंत्र्योत्तर कादंबऱ्यांमध्ये रंजकतेबरोबरच वास्तवाला सुद्धा महत्त्व येऊ लागल्याचे दिसते. आपण आणि आपले प्रश्न साहित्याच्या माध्यमातून समाजांपुढे मांडले पाहिजेत असेही लेखकांना वाटू लागले. 'बनगरवाडी', 'धग', 'पाचोळा', 'नटरंग', 'हाल्या हाल्या दुधू दे' इ. कादंबऱ्यांचा अभ्यासा केला असता नव्या जुन्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न अत्यंत महत्त्वपूर्ण पद्धतीने कादंबरीकारांनी केलेला दिसतो. ग्रामीण कादंबऱ्यातून नागरजीवनाऐवजी .षिप्रधान आणि समूहजीवनप्रधान ग्रामीण लोकजीवन हाच ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याचा विषय आहे असे म्हणावे लागते.

१९६० नंतरची ग्रामीण कादंबरी ग्रामजीवनाच्या अधिक निकट गेली. ग्रामजीवनाचे व ग्रामजीवनाभोवतीच्या भटक्या विमुक्तांच्या जीवनाचे विविध स्तर तिने धुंडाळले. दलित साहित्य चळवळीच्या माध्यमातून तिने ग्रामीण भागातील दलित समाजाच्या व्यथा, वेदना शब्दरूप केल्या. मध्यमवर्गीय जाणिवेतून मुक्त होऊन वास्तववादाच्या जवळ जाण्याचा ग्रामीण कादंबरीने अधिक प्रयत्न केल्याचे दिसते. असे प्रा. डॉ. रवींद ठाकूर म्हणतात.

* * *

# 'ग्रामीण–दलित कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास : स्वरुप व दिशा'

– डॉ. रमाकांत कराड

तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्याभ्यासाची एक महत्त्वाची शाखा म्हणून मान्य झालेली आहे. दोन भिन्न भाषा, संस्कृती–समाज,देश यांच्या साहित्यकृतींमधील तुलनेला इथे महत्त्व आहे. त्याचप्रमाणे एकाच प्रदेशातील, समाज संस्कृतीतील, भाषेतील साहित्यकृतींची तुलनाही इथे अभिप्रेत असते. ग्रामीण व दलित कादंबरींचा तुलनात्मक विचार  प्रेरणा–प्रवृत्ती, लेघकांचा दृष्टिकोन, जाणिवा, भाषा, समाज दर्शन अशा काही बाबींच्या आधारे करता येईल.

ग्रामीण व दलित कादंबऱ्या साठोत्तरी सामाजिक व सांस्कृतिक चळवळींच्या प्रभावातून निर्माण होताना दिसतात. हा त्यांच्यामधील समानतेचा मुद्दा आहे. साठोत्तरीनंतर दलित व ग्रामीण कादंबऱ्यांची निर्मिती कसदारपणे होत असली तरी स्वातंत्र्यपूर्व कालघंडातही ग्रामीण व दलित जीवनावर कादंबरी लेखन झालेले आहे. या संदर्भात ना.वि. कुलकर्णी, वि.स.खांडेकर, वि.वा.हडप, वि.द. चिंदरकर, ग.त्र्यं. माडखोलकर इत्यादी नागरी दलितेतर कादंबरीकारांच्या निर्मितीचा विचार करता येईल. अर्थात त्या काळातील सामाजिक–साहित्यिक वातावरणात दलित व ग्रामीण संवेदनशीलताचा उदय झालेला नसल्याने खऱ्या अर्थाने ग्रामीण व दलित कादंबरी साठोत्तरी नंतरच पाहायला मिळते.

ग्रामीण व दलित या दोन्ही प्रवाहातील कादंबरींतील प्रेरणाच्या संदर्भात समानतेचा मुद्दा म्हणून 'समाज परिवर्तनाचा विचार करता येईल. साहित्यासह जीवन परिवर्तनाच्या प्रेरणेतून या दोन्ही प्रवाहातील कादंबऱ्यांची निर्मिती होताना दिसते. समाजजीवनात परिवर्तनाच्या दृष्टीने  कादंबरी सशक्त– विस्तृत साहित्यप्रकार आहे. ग्रामीण व दलित समाज जीवनात परिवर्तन झाले पाहिजे, नवे विचार, नवी मूल्ये समाजात रुजली पाहिजे, असा परिवर्तनाच्या प्रेरणेचा स्वीकार या दोन्ही प्रवाहातील कादंबरीकारांनी तत्त्वत: तरी स्वीकारलेला आहे. प्रत्यक्ष कादंबऱ्यामध्ये ही व्यक्तिरेघा त्यांच्या भूमिका–विचार यातून सामाजिक परिवर्तनाचे विचार, मूल्ये व त्यातील संघर्ष अडथळे यांचा आविष्कार होताना

दिसतो. साहित्य हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे अशी भूमिका चळवळींतून निर्माण झालेले साहित्यप्रवाह घेत असतात. समाज परिवर्तनाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी साहित्याचा चांगला उपयोग होऊ शकतो, असे त्यांना वाटत असते. परंतु इथे हे लक्षात घेतले पाहिजे की साहित्यातून होणारे परिवर्तन हे संवेदनाच्या स्तरावरचे अते.

ग्रामीण कादंबरी निर्मितीमागे असलेल्या ग्रामीण जाणीव/ग्रामीण संवेदनशीलता व दलित कादंबरी निर्मितीमागे असलेल्या दलित जाणीव/दलित संवेदनशीलता या घटकाचे स्वरुप त्यांच्यामधील वेगळेपणा दर्शवितो. विशेषत: ग्रामीण व दलित साहित्याच्या चळवळीनंतर जी ग्रामीण व दलित कादंबरी निर्माण होत आहे त्यामध्ये ग्रामीण जाणीव व दलित जाणिवेच्या मूल्यगर्भ संदर्भ आहे.

दलित जाणिवेत दलित व्यक्तिच्या आत्मसन्मानाचा, आत्मशोधाचा भाग असतो. आत्मसन्मान नाकारणाऱ्या परंपरा, देव धर्म यांना दलित लेखकही नाकारतो. त्या विरुद्ध विद्रोहाचा भाव व्यक्त होतो. लेघकांनी दलित जाणिवेतून दलित कादंबरीची निर्मिती केल्यामुळे त्यामध्ये अनिष्ट परंपरा, अंधश्रद्धा, प्रस्थापित धार्मिक व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करणारी माणसे दिसतात. ही विद्रोहाची भावना दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या दलितेतर कादंबरीकारांच्या लेघनात दिसत नाही. या संदर्भात विभावरी शिरुरकर यांची 'बळी' र. वा. दिघे यांची 'कार्तिकी' मधू मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल' रणजित देसाई यांची 'समिधा', व्यंकटेश माडगूळकर यांची 'पुढचं पाऊल'. या कादंबऱ्याचा उदाहरणादाखल विचार करता येईल. या कादंबऱ्यांमध्ये दलित माणसांचे जीवन चित्रित झाल्याचे दिसून येते, परंतु दलित साहित्य चळवळीनंतर दलित जाणिवतेची जी वैशिष्ट्ये सांगितली जातात, त्यांचा या कादंबऱ्यांमध्ये अभाव आहे. याचे कारण एखाद्या जीवनानुभवाकडे लेखक कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो हे असू शकते. दलित कादंबरीकारांनी दलित जाणिवेतून निर्माण केलेल्या कादंबऱ्यांतून दलित संवेदनशीलता तिच्या वैशिष्ट्यांसह दिसून येते. पोघरण- केशव मेश्राम, 'फकिरा'-अण्णाभाऊ साठे, शूद्र-सुधाकर गायकवाड, आग-बाबुराव गायकवाड या कादंबऱ्यांचा उदाहरणादाखल विचार करता येईल.

ग्रामीण जाणिवेतून निर्माण झालेल्या कादंबऱ्या म्हणून विश्वास पाटील यांची पांगिरा, बाबाराव मुसळे यांची 'वारुळ' सदानंद देशमुख यांची 'तहान'

अशा कितीतरी कादंबऱ्यांचा विचार करता येईल. याउलट ग.ल. ठोकळ यांची गावगुंड किंवा र.वा. दिघे यांची 'पाणकळा', सराई किंवा श्री. ना. पेंडसे यांची 'गारंबीचा बापू' या कादंबऱ्यांमध्ये रंजनांची प्रेरणा ग्रामीण संवेदनशीलपेक्षा प्रभावी असल्याने त्या कादंबऱ्या ग्रामीण वास्तवापासून ढळलेल्या आहेत.

ग्रामीण कादंबरीप्रमाणेच दलित कादंबरीच्या निर्मिती मध्ये स्त्री कादंबरीकार दिसून येत नाही. एकूण मराठी कादंबरीत स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री कादंबरीकारांचे योगदान लक्षणीय आहे. दलित व ग्रामीण या दोन्हीही साठोत्तरी साहित्य प्रवाहांमध्ये मात्र स्त्रियांनी कादंबरी लेखात संख्यात्मक व गुणात्मक दोन्ही दृष्टीने मोलाची भर घातलेली दिसत नाही. दलित कादंबरीत नलिनी भोसेकर यांनी 'तडा', कल्पना जाधव यांनी 'उपेक्षित' ही कादंबरी लिहिलेली आहे. सुशिला सपकाळ यांनी 'कसरत' ही दलित स्त्री जीवनावर कादंबरी लिहिलेली आहे. दलित स्त्री मनाच्या भावनांना, त्यांच्या व्यथांना व्यक्त करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

ग्रामीण कादंबरीत अनुराधा गुरव यांची 'अंजना' व माया साठे यांची 'कमळा' व प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई' व 'पार्टटाईम' या कादंबऱ्या दिसतात. यांचा अपवाद वगळता ग्रामीण स्त्री जीवनावर पुरुष कादंबरीकारांनीच लिहिलेले दिसते.

ग्रामीण कादंबरी वाङ्मयात स्वतंत्रपणे मूल्यशोधात्मक दृष्टीने गुणात्मक भर घालणारी कादंबरी एकाही लेखिकेने लिहिलेली नाही. हा डॉ.मोहन पाटील यांचा ग्रामीण कादंबरी निर्मिती संदर्भातील अभिप्राय म्हणजे स्त्री लेखिकांच्या संदर्भात चिंतेची बाब आहे. वास्तविक दलित व ग्रामीण स्त्री अजूनही उपेक्षितच आहे. स्त्री वर्गावर होणारे अन्याय, अत्याचार, स्त्रियांना शिक्षणानंतर आलेली जागृती, जागा झालेला स्वाभिमान व एकूणच स्त्री जीवनाविषयी वास्तवदर्शी लेखन करणाऱ्या स्त्री कादंबरीकार संख्येनेही अत्यल्प आहे, ही वस्तुस्थिती आहे. दलित व ग्रामीण या दोन्ही कादंबऱ्यात ही समान बाब दिसत आहे.

प्रामुख्याने अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, अशोक व्हटकर, बळवंत कांबळे यांनी स्त्रीच्या दलित म्हणून असलेल्या समस्यांना व्यक्त केलेले आहे. संसारी स्त्री ते मुरळी, शोषित-अत्याचारीत स्त्री ची विविध रूपे आपल्याला या कादंबऱ्यांतून पाहायला मिळतात. या संदर्भात ग्रामीण कादंबऱ्यांशी तुलना केली तर राजन गवस, गणेश आवटे, महादेव मोरे यांच्या कादंबऱ्यांतून दलित

स्त्री जीवनाचे चित्रण झालेले दिसते. ग्रामीण आणि दलित या दोन्हीही कादंबऱ्यांतून पुरुष कादंबरीकारांनी चित्रित केलेले स्त्रीजीवन संपूर्णपणे निर्दोष आहे असे म्हणता येणार नाही.

कादंबऱ्यांची भाषा या दृष्टीने दलित व ग्रामीण या दोन्ही प्रवाहातील कादंबऱ्यांकडे पाहिले असता एक समान भाग आढळतो. ग्रामीण दलित समाजाच्या बोलीभाषांना त्या जीवनानुभवाची स्वाभाविक भाषा म्हणून वापरण्याचा प्रयत्न या दोन्ही प्रवाहातील कादंबरीकारांनी केलेला आहे. ग्रामीण कादंबरीमधून महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील ग्रामीण बोलींचा आविष्कार झालेला दिसून येतो. दलित कादंबऱ्यांमधून ही ग्रामीण समाजातील पूर्वास्पृश्य व उपेक्षित जमातींच्या बोली भाषांचा आविष्कार झालेला दिसतो. प्रमाण भाषेच्या वापरातून कधी कधी साचेबंदपणा कृत्रिमता जाणवत असते परंतु बोलीभाषेचे सामर्थ्य अनंत असते. ग्रामीण व दलित या दोन्ही कादंबऱ्यांतील बोलीभाषांच्या अपूर्व आविष्कारामुळे बोलींचा वैशिष्ट्यपूर्ण भाग अभ्यासकांच्या लक्षात आलेला आहे.

ग्रामीण व दलित कादंबरीत बोलीभाषेच्या वापरासंदर्भात एक भेदाचा मुद्दा लक्षात येतो. महादेव मोरे,आनंद यादव, रा.रं. बोराडे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून संपूर्णपणे ग्रामीण बोली साहित्याचे माध्यम म्हणून वापरलेली आहे. तसा प्रयोग दलित कादंबरीकारांनी केलेला दिसत नाही. संपूर्णपणे बोलीला कादंबरीची भाषा म्हणून न वापरता निवेदनात प्रमाणभाषा, संवाद व आवश्यक तेथे बोली भाषेचा उपयोग त्यांनी केलेला दिसतो. आज समाजभाषाविज्ञानाच्या दृष्टीने ग्रामीण व दलित या दोन्हीही कादंबऱ्यांची 'बोली भाषा' हे एक मोठे अभ्यासक्षेत्र अभ्यासकांसाठी उपलब्ध झालेले आहे, असे म्हणता येईल.

ग्रामीण कादंबरीचे मुख्य केंद्र हे शेतीनिष्ठ जीवन पद्धतीत असल्याचे दिसून येते. ग्रामीण जीवन, तेथील ग्रामीण माणूस त्यांच्या चालीरीती, त्याची शेतीनिष्ठ जीवनशैली पीक-पाणी, गावगाडा या संदर्भातून आकाराला येणारे ग्रामीण अनुभवविश्व ग्रामीण कादंबऱ्यांमधून आढळते. या संदर्भात दलित कादंबरीचा विचार केला तर उत्तम बंडू तुपे यांच्यासारख्या कादंबरीकार आपल्या 'खाई' 'इंजाळं' 'चिपाड' इत्यादी कादंबऱ्यातून शेतकरी, शेतमजूर असलेल्या दलित समाजातील माणसांवर लिहितात. त्यांच्या दलित म्हणून असलेल्या

अनुभवांबरोबरच शेतीसंदर्भातील प्रश्नांवर ते भर देतात. तुलनेने दलित कादंबरीकार प्रामुख्याने ग्रामीण जीवनात दलित म्हणून येणाऱ्या अनुभवांना आविष्कृत करतात. शेतीतील जीवन हा त्या कादंबऱ्याचा ग्रामीण कादंबऱ्यांइतका गाभा नसतो.

अशाप्रकारे प्रेरणा, लेखकांच्या जाणिवा, कादंबरीतील समाजवास्तव, 'स्त्री' जीवन चित्रण, भाषा शैली अशा घटकांच्या आधारे दलित ग्रामीण कादंबरीचा तुलनात्मक विचार करता त्यामध्ये काही समानतेचे, भेदाचे व साम्यभेदातील गौण प्राधान्यभावाचे दर्शन आपणाला घडते तसेच त्यातून ग्रामीण व दलित या दोन्ही प्रवाहातील कादंबऱ्यांची वैशिष्टये, बलस्थाने व मर्यादाही दिसतात.

* * *

# मराठी ग्रामीण व दलित कादंबरी: एक तुलनात्मक अभ्यास

– डॉ.प्रवीण ससाणे

साहित्यकृतीतील जीवन अनुभव व तिचा निर्माता हे दोन्ही घटक अपरिहार्यपणे सामाजिक असतात. साहित्य हे समाजाचा आरसा असते. हे सूत्र याच भूमिकेतून पुढे आले आहे. तिच्या निर्मात्याची मनोभूमिका, त्याचा समाज, त्याची संस्कृती, त्यातून घटत गेलेली त्याची धन अथवा ऋण जीवन वृत्ती याद्वारे साहित्य कृतीतील संवेदन आकार येत असते. म्हणून साहित्य प्रकाराचा अभ्यास करत असताना. साहित्याच्या समाजशास्त्राचा विचार करणे अपरिहार्य ठरते. साहित्य आणि समाज यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करताना साहित्याचे समाजातील स्थान, त्यांची व्याप्ती, समाज प्रबोधनाचे कार्य साहित्याचा समाजावर होणारा परिणाम (सकारात्मक, नकारात्मक किंवा विद्रोही) या अनुषंगाने विचार करावा लागतो. साहित्याने मांडलेले नैतिकतेचे प्रश्न, लेखकाची मनोभूमिका, एक सामाजिक दस्तऐवज म्हणून त्याने केलेली मांडणी, समकालीन समाजाचा त्या साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन या गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व असते. तौलनिक अभ्यासात या अनुषंगाने बहुकेंद्री अभ्यास होणे अपेक्षित असते. कादंबरी या फॉर्मचा उगम हाच मुळात मध्यम वर्गांच्या विविध स्थित्यंराशी, एकट्याने वाचण्याच्या सवयीशी, प्रयोजक आशयसूत्राशी, निरपेक्ष अवकाशांशी जोडलेला असतो. हे सर्व मान्यच आहे. त्याप्रमाणेच साहित्यात समाजाचे प्रतिबिंब उमटलेले असते, असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे, हा अभ्यासाच्या अनेक दृष्टिकोनापैकी एक दृष्टिकोन आहे असे म्हणता येते. साहित्याचा परिणाम म्हणून सामाजिक उद्‌बोधन, लोकशिक्षण किंवा नैतिक उन्नती होऊ शकते. परंतु ते साहित्य निर्मितीचे उद्दिष्ट नसते व समकालीन युगधर्म हा साहित्यकृतीवर परिणाम केल्याशिवाय राहत नाही. किंबहुना दुसऱ्या भाषेत, समाजाचे आर्थिक, नैतिक व राजकीय जीवन समजावून घेण्यासाठी साहित्याइतके विश्वासार्ह साधन दुसरे कुठले नाही. व्यक्तीचे कुटुंब, गाव, शहर, जातीजमाती, सांस्कृतिक मंडळे, सहकारी संस्था यांच्याद्वारे होणारे कौटुंबिक, आर्थिक, राजकीय, नैतिक इत्यादी सर्व प्रकारचे सामाजिक व्यवहारांचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते.

साहित्यकृती ही तिच्या निर्मात्याची स्वतंत्र निर्मिती असली तरी तो समकाळाशी बद्ध असतोच. त्रमकालीन सामाजिक परंपरा, संकल्पना जीवनमूल्ये, श्रद्धा, अंधश्रद्धा, स्वभाषा, त्या भाषेतील वाङ्मय, सामाजिक रीतीरिवाज व संस्कृती यांचा इतरांप्रमाणेच पण अधिक जागरूक असा अन्वय लेखक घेत असतो. स्वतःच्या प्रतिभा शक्तीने या घटकांना तो काही प्रमाणात वळण लावून आपल्या आशयसूत्रामध्ये समाविष्ट करत असतो. या अर्थाने साहित्यनिर्मिती ही व्यक्तीच्या व समाजाच्या विस्तृत, वांशिक, सांस्कृतिक, संप्रेषणाचा भाग असते.

या भूमिकेतून १९६० नंतरच्या मराठी ग्रामीण व दलित कादंबरीचे अवलोकन केल्यास पुढील काही निष्कर्ष प्रस्तुत लेखकाला जाणवतात.

ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रातील ज्येष्ठ लेखक १९६० नंतर काहीसे बाजूला सरकलेले दिसतात. ग.ल.ठोकळांचे कथालेखन चालू असले तरी कादंबरीलेखन मात्र लोप पावले.

र.वा.दिघ्यांचे कादंबरीलेखन मंदावले, श्री.ना.पेंडसे आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या लेखनातील ग्रामीण स्पर्श ६० नंतर उणावला गो.नी.दांडेकर आणि अण्णाभाऊ साठे नंतर ही लिहित राहिले. पण ६० पूर्वीची उंची त्यांना क्वचित गाठता आली. शंकर पाटील ६० नंतर ग्रामीण कादंबरीकडे वळले आणि एक कादंबरी लिहून थांबले. रणजीत देसाई लवकर या क्षेत्रापासून दूर गेले. हमीद दलवाईचे लेखन त्यांच्या सामाजिक चळवळीमुळे थंडावले आणि अखेर अकाली मृत्यूमुळे बंद पडले. उद्धव शेळके यांना आपला सूर धगच्या स्वरूपाने गवसला खरा पण त्या पट्टीतले गाणेच त्यांनी सोडून दिले. त्यामुळे ६० नंतरची ग्रामीण कादंबरी ६० नंतरच्या जुन्या लेखकांनी घडवलेली आहे असे जाणवते.

६० नंतरच्या नव्या लेखकांत अग्रगण्य असलेले आनंद यादव आणि रा.रं.बोराडे यांनी कसदार पण अल्प लेखन केले आहे. ना.धो. महानोरांच्या बाबतीतही हेच म्हणता येते ज्यांच्यापासून अपेक्षा करावे असे महादेव मोरे विपुल लिहितात. पण त्यांच्या लेखनातून मिळणाऱ्या आश्वासनाची परिपूर्ती करणारा आविष्कार अजून त्यांच्या लेखणीला भेटलेला नाही. अण्णाभाऊ साठे, दलवाई, यांचे मृत्यू, नव्या कसदार लेखकांची अल्पनिर्मिती यामुळे गेल्या दशकात ग्रामीण कादंबरीचा प्रवाह रोडवल्यासारखा वाटतो. विपुल लिहिणाऱ्या साधारण प्रतीच्या लेखकांनीच तो गजबजलेला वाटतो.

६० नंतर समाजाच्या विविध स्तरातून आलेल्या नवशिक्षित लेखकांनी ग्रामीण साहित्याचे विश्व गजबजून गेलेले दिसते. पण कादंबरी व अन्य वाङ्मय प्रकारातही बहिणाबाईंची व सरोजिनी बाबरांच्या कथा यांचे अपवाद सोडून स्त्रियांचा वावर डोळ्यात भरण्यासारखा दिसत नाही. ग्रामीण साहित्यातून स्त्रियांची प्रभावी चित्रणे आली असली तरी व ग्रामीण लेखिका अजून तिकडे वळलेल्या दिसत नाहीत.

६० पूर्वीच्या ग्रामीण कादंबरी स्थूलमानाने पांढरेपेशा, मध्यमवर्गीय नागर लेखकांनी लिहिलेली कादंबरी आहे. आपल्याला जाणवलेले ग्रामीण वास्तव नागर वाचकांना समजावून सांगण्याची ऊर्मी त्यामागे आहे व नागर वाचकांचे कुतूहल पुरविण्यासाठी जणू हे लिखाण झाले. लेखकांच्या दृष्टिकोनामुळे वाचकही दूर उभा राहून त्रयस्थाच्या नजरेने हे नवलाईचे जीवनविश्व पाहत होता. ६० नंतर प्रत्यक्ष ग्रामीण जीवन जगत असलेले समाजाच्या निरनिराळ्या स्तरातले लेखक आणि वाचक मोठ्या प्रमाणात या क्षेत्रात आले आणि पूर्वीचे चित्र बदलले. ग्राम जीवनाची अनुभूती घेणारे मन ग्रामीण कादंबरीतून बोलू लागले आहे. आत्मनिवेदनातून आपला घाट शोधण्याच्या ग्रामीण कादंबऱ्या यादृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. त्यामुळे वाचक व चित्रित झालेले ग्रामजीवन यांच्यात एक प्रत्यक्ष संवाद होऊ शकतो.

याचा दुसराही एक परिणाम दिसतो यातील बहुअंश लेखकामुळेच खेड्यातले असले तरी आता शहरात रुळलेले आहेत. त्यामुळे ते दुभंगल्यासारखे वाटतात. गावाकडची माणसं, शहरी अलिप्तपणाने किंवा ग्रामीण जिव्हाळ्याने उभी करणे त्यांना साधत नाही. त्यामुळे त्यांना माणसं दिसतात. पण ती गवसत नाही. अनुभूती ग्रामीण आणि आविष्कार नागर अभिरुचीला मानणारा या द्वैतातूनही त्यांचे दुभंगलेपण व्यक्त होते.

ग्रामीण भाषेतपण शहरीमानाने केलेले, लिखाण गडद रंग वापरणारे आहे. भडक संघर्षाभोवती गुंफलेल्या गुलाबी प्रणयकथांचे त्यांचे रूप आहे. अशा लिखाणात ग्रामीण जीवन एक नवलाईचे पार्श्वभूमी म्हणून आलेले दिसते. अंजनमूल्ये म्हणून तिचा पद्धतशीर वापर करण्यात आलेला दिसतो ही नवीन ग्रामीण कादंबरी लोकप्रियेत आघाडीवर आहे. त्यांच्या निघणाऱ्या अनेक-अनेक आवृत्त्या वाचकांच्या मागणीची साक्ष आहे. मराठीतल्या कलात्मक म्हणविणाऱ्या कादंबरीचे नव्याने साक्षर झालेल्या वाचकांच्या अविकसित अभिरुचीवर डोळा

ठेवून केलेले लेखन ही तिच्या लोकप्रियतेची कारणे असावीत. दलित साहित्याने आज आपला असा सवत सुभा मांडलेला असला तरी त्याचे आखात ग्रामीण साहित्यात प्रा.माटे, माडगूळकरांपासून घुसलेले आहे. अरुण साधूंची 'बहिष्कृत' सारखी कादंबरी ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवरच घडते. पण तेथे केंद्रीय स्थान आहे ते दलित संवेदनेला, ग्रामीण संवेदनेला नव्हे. दलितांची संवेदना समस्या ग्रामीण जीवनासह आपल्या सर्व जीवनाला व्यापणारी आहे. स्थूलवैशिष्ट्याने ती मर्यादित होणारी नाही. त्यामुळे ग्रामीणऐवजी दलित कादंबरी म्हणून बहिष्कृत चा विचार करणे योग्य ठरेल. याउलट नलग्यांच्या गस्तसारख्या कादंबरीतून नवे दलितांचे चित्रण येते ते ग्रामीण संवेदन व्यक्त करते. दलितांसह ग्रामजीवन व्यक्तविण्याच्या प्रयत्न त्यात आहे. म्हणून दलितांच्या जीवनाचे चित्रण करणारी असूनही ती ग्रामीण कादंबरी मानली पाहिजे. दलित व ग्रामीण यांचे प्रवाह असे परस्परांत मिसळणारे आहेत. अशावेळी त्यात व्यक्त होणारी संवेदना लक्षात घेऊन गट निश्चिती करावी लागेल.

साठ पूर्वीची ग्रामरीण कादंबरी ग्रामजीवनातील पांढरपेशा वर्गाचे चित्रण करण्याकडे अधिक झुकली आहे. साठनंतर पांढरपेशा वर्गाची चित्रण विरळ झाल्याची जाणवतात. शिंप्यासारखे ग्रामीण व्यावसायिक, कष्टकरी मजूर, माळावरच्या भटक्या जमाती, दलितांचे जीवन यावर तिची नजर खिळली आहे. दुःख आणि दारिद्र्य यांनी पिचलेल्या तळागळातल्या माणसाचे कण्हणे तिच्यातून ऐकू येऊ लागले आहे. पण कृषिकेंद्रित वारसा व हा जो ग्रामजीवनाचा अस्सल गाभा त्याचे आविष्करण मात्र पुरेशा प्रमाणात मागे व आताही होताना दिसत नाही.

'ग्रामीण' आणि 'नागर' ही परस्पराविरोधी विशेषणे आहेत. 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' ही विशेषणे मात्र तशी नाहीत. 'प्रादेशिक' हे 'ग्रामीणाला' पोटात घेणारे मोठे वर्तूळ आहे. समूहदर्शन, परिसर प्राधान्य आणि विस्तृत कॅनव्हास यामुळे 'ग्रामीण' साहित्याला 'प्रादेशिक' रूप येऊ लागले. साठ पूर्वीची ग्रामीण कादंबरी बाह्य वास्तवाची जाणीवपूर्वक दखल घेणारी दिसते. परिसराशाी त्याच्या भौगोलिक ती अधिक निबद्ध आहे. या स्थूलनिष्ठेमुळे परिसर प्राधान्यामुळे साठ पूर्वीच्या ग्रामीण कादंबरीला प्रादेशिकतेचे परिमानही लाभताना दिसते. पण साठनंतर चित्रण विषय असलेल्या ग्रामजीवनातील घटकांच्या प्रमाणात उपरोक्त बदल झाल्यामुळे आजच्या ग्रामीण कादंबरीचा स्थलनिष्ठ संदर्भ सुटत

चालला. परिसर प्राधान्यातीत गौण ठरते. परिसरापेक्षा त्या परिवरातील माणसांच्या मनाशी अधिक इमान बाळगून ती आविष्कृत होते.

आजही ग्रामीण कादंबरी खलाशी बांधलेली न राहता ग्रामीण संवेदनशीलतेशी अधिक बद्ध आहे. तिच्यातून व्यक्त होणारे पण शहरी जीवनातील यांत्रिकता, आधुनिकतेने आलेली संकीर्णता वा दुंभगलेपण आणि 'सोफिस्टीकेशन' यांच्यापासून दूर आहे. आपली भूमी, अवतीभोवतीचा निसर्ग यांच्याशी बांधलेले ते स्थिर केंद्री मन आहे. कुटुंब, जात, धर्म अशा अनेक धाग्यांनी ते अवतीभोवतीच्या माणसांशी जोडलेले आहे. शहरी मनासारखे ते स्वयंकेंद्री नाही. त्याचा कार्यकारण संबंध निराकाय वाटतो. त्याची विचार करण्याची पद्धती या संवेदना यावर परंपरेचा प्रभाव आहे. जे जीवन आणि ते भोगणारे मन तसे मुके आहे. दैव, दारिद्र्य यांनी त्याला अनेक ठिकाणी पीळ पडलेले आहेत. सनातन दुःखाची जाणीव मुरलेले आणि जीवनाच्या ओढीने परिस्थितीशी झगडणारे हे मन आहे. भूक, वासना, कष्ट यांच्या उघड्या वाघड्या अनुभवांनी त्याचा जीवन संबंध भरलेला असतो. उग्रता, भडकपणा, उत्कटता, रगदारपणा आणि रसरशीतपणा हेच तिचे प्रकृतिविशेष आहेत. ग्रामीण जीवनाच्या मर्यादित परिघात अवतरणारी ही अनुभवसृष्टी केंद्राशी एकसुरी वाटते. पण तिच्याकडे वेगवेगळ्या नजरांनी पाहणाऱ्या लेखकाला तिच्यातील गुंतागुंतीचे चित्रण कलात्मक पातळीवर नेणे शक्य असते, हे साठ नंतरच्या कादंबरीकारांनी दाखवून दिले आहे.

माणूस आणि माती यांची समाजातून ओढ जाणवून सामूहिक नेणिवेला स्पर्श करणे ही ग्रामीण साहित्याची एक ठळक प्रवृत्ती आहे. शहरी 'कॅक्टस' संस्कृतीच्या निसर्गापेक्षा कामजीवनाला निसर्ग वेगळा असतो. येथे माणूस व त्याभोवती त्याचे घडविलेले जग अशी स्थिती नसते. सृष्टीच्या इतर घटकांसारखा तिचा एक घटक म्हणूनच तो वावरत असतो. ग्रामीणजीवनातील निसर्गाचे स्थान लक्षात घेऊन ग्रामीण कादंबरीपूर्वी व आताही त्याचे चित्रण होत आलेले आहे. कधी निव्वळ पार्श्वभूमी म्हणून, कधी कादंबरीतील जीवनविश्वाशी संवाद-विरोध साधीत त्याला अर्थपूर्ण करणारा घटक म्हणून. तर कधी त्या जीवनाचा अंगभूत भाग म्हणून चित्रदर्शी पद्धतीने रेखाटला हा निसर्ग कालपरिवर्तन व जीवनाचे सातत्यही सुचवत जातो.

साठ पूर्वीची ग्रामीण कादंबरी कादंबरीचा बंध हाताळणाऱ्या लेखकाने घडविलेली कादंबरी आहे. तसे साठ नंतर दिसत नाही. विविध साहित्य बंधनात

सारख्याच तोलाने लिहिणारे आनंद यादवांसारखे लेखक केवळ अपवाद आहेत.

**दलित कादंबरी संदर्भातील निरीक्षणे:–**

१९६० नंतर मराठी साहित्यात दक्षिण जाणिवेच्या कादंबरीचा पायरव ऐकू येऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व दलित जीवन आणि स्वातंत्र्योत्तर दलित जीवनाचे चित्रण या कादंबरीने केले. जीवनाशयाच्या नव्या भिंती मराठी कादंबरीला त्यामुळे विधियोगी अभिव्यक्ती वैश्विक पातळीवर नेऊन दलित लेखकांना या वाङ्मय प्रकारात भरघोस यश संपादन करता आले असते. पण तसे फारसे घडलेले नाही. काही सन्माननीय अपवाद वगळता मराठी कादंबरी प्रबंधात दलित लेखकाचे योगदान संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही गोष्टीने मर्यादितच राहिले.

साठोत्तर कालखंडात दलितत्तेर लेखकांनी काही महत्त्वपूर्ण कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. त्यात मालतीगंधा (१९७५), बहिष्कृत (१९७८), भाकरी आणि फूल (१९८२), देवाची माणसे (१९८४), प्रभंजन (१९८९), प्रबुद्ध (१९८९) अशा काही कादंबऱ्या आढळतात. या कादंबऱ्या अनुक्रमे आनंद रेगे, अरुण साधु, मधु मंगेश कर्णिक, आणि भा.द.खेर, यांनी लिहिलेल्या आहेत. या कादंबऱ्यामधून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर दलित जीवनाचे चित्रण प्राधान्याने केलेले आढळते. विशेषतः भाकरी आणि फूल यासाख्या कादंबरीत दलित जीवनाच्या मिती आलेल्या आहेत. ग्रामीण दलितांमध्ये मागील तीन पिढ्यांमध्ये जो बदल झाला आहे, त्याचे चित्रण अत्यंत कलात्मकतेने केलेले आहे. भाकरी आणि फूल सारखी कादंबरी गंगाधर पानतावणे यांनी गौरवलेली आहे, हे लक्षात घेता त्याचे सामर्थ्य लक्षात यावे. लेखक मध्यमवर्गीय असूनसुद्धा दलित जीवनाचा सुमारे ६० वर्षाचा तीन पिढ्यांचा इतिहास या कादंबरीतून चित्रित झालेला आहे.

दलित कादंबऱ्यामध्ये स्त्रीलेखिका अभावानेच आढळतात. प्रा.सुशिला जाधव, सुगंधा शेंडे अशा काही बोटावर मोजण्या एवढ्याचे लेखिका आढळतात. दलित कादंबरीतः शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, अशोक व्हटकर, योगेंद्र मेश्राम, बा.स.हाटे या कादंबरीकाराचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यापैकी बंधु माधव, हरिभाऊ पगारे, यांनी अनुक्रमे रमाबाई, बाबासाहेब यांच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्या मालिकेत बा.स.हाटे यांच्या 'युगविधान', मनोहरांच्या 'रमाई' या चरित्र कादंबरीचा विशेष उल्लेख करावा लागेल. दलित कादंबरीत चरित्र कादंबरी हा एक

महत्त्वाचा उपप्रकार प्रगत होऊ शकतो. पण यातही 'रमाई' सारखी कादंबरी विशेष लोकप्रिय आहे. बा.स.हाटे यशवंत मनोहर आणि बंधू माधव या लेखकांच्या कादंबऱ्यांना जवेढी लोकप्रियता लाभली तेवढी अन्य लेखकांना लाभलेली नाही. दलित कादंबरीमध्ये बाबुराव बागूल, केशव मेश्राम, सुधाकर गायकवाड या लेखकांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केलेले आहे. बाबुराव बागूल यांनी क्रांतिकारी जाणिवेतून लिखाण केले तर केशव मेश्राम व सुधाकर गायकवाड यांनी आपल्या कादंबऱ्यांना आदिम जीवनाचे आयाम दिलेले आहेत. एरव्ही बहुतांशी कादंबऱ्या या केवळ समाजातील विषमता, अन्याय व आर्थिक सामाजिक छळाचे चित्रण करणाऱ्याच आहेत: यात सामाजिक परिवर्तनाचा विचार प्रधान असून स्व आणि स्वेत्तर सामाजिक व मानसिक परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रेरणा प्राधान्याने जाणवतात. काही कादंबरीकारांनी वास्तवतेच्या नावाखाली सामाजिक वास्तव कादंबरीतून जसेच्या तसे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्या आशयाचा कलात्मकतेचे भान देणे किंवा त्या वास्तवाला कल्पनियतेच्या पातळीवर नेऊन त्याचे चित्रण करणे त्यांना साधलेले दिसत नाही.

दलित कादंबरीचा वेगळा प्रवाह दलित साहित्यात आढळत असला तरी आजही तो प्रवाह क्षीण आहे. साधारणतः मागील तीस वर्षांमध्ये दर्जेदार असा फारच थोड्या कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. अगदी अलीकडच्या काळात काही सन्माननीय कादंबऱ्याचा अपवाद वगळता सर्वसामान्यतः सुमार कादंबऱ्यांची संख्याच एकूण प्रवाहात जास्त आहे.

दलित जाणिवेच्या कादंबऱ्यांचे अन्य मराठी कादंबऱ्यापासून वेगळे स्वरूप आहे. एवढे मात्र निश्चित दलित कादंबरीतून ज्या दलित जाणिवा प्रखरपणे व्यक्त केल्या जातात आणि सामाजिक परिवर्तानाचा जो विचार त्यातून ध्वनीत झालेला असतो. त्यामुळे अशा कादंबऱ्याचे वेगळेपण ठळकपणे जाणवते. या कादंबऱ्यातील जीवनवास्तव, भाषाशैली, स्वैरमांडणी यामुळे या कादंबऱ्या अन्य कादंबऱ्यापासून वेगळ्या वाटतात.

* * *

# ग्रामीण-दलित कादंबरी: तुलनात्मक अभ्यास

- डॉ.धनंजय वाघमारे

प्रास्ताविक:-

कादंबरी म्हणजे काय? असा पहिला प्रश्न डोळ्यांसमोर उभा राहतो. कादंबरीची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. तरी देखील तिच्या वैशिष्ट्यांचा विचार आपणा करू शकतो. व्यापक जीवनानुभूतीची अभिव्यक्ती आणि वास्तव जीवनाशी असणारे तिचे नाते कादंबरीचे हे खरे वैशिष्ट्य आहे. कादंबरी ही स्वतंत्र कलाकृती असते. स्थूलमानाने विषय जरी एक असला, तरीही प्रत्येक कादंबरीचा विषय वेगळा असतो. मांडण्याची पद्धत, तिची रचना, भाषा वेगळी असते. वातावरण वैशिष्ट्यपूर्ण असते. कादंबरी हा लेखकाच्या मानाने घेतलेला मानवी मनाचा आणि जीवनाचा, घटना व पात्रांच्या साहाय्याने घेतलेला एक शोध असतो.

वरील पार्श्वभूमीवर मराठीतील ग्रामीण आणि दलित कादंबरी यामधील तुलना करणे प्रस्तुत ठरते. मुळामध्ये साहित्याचे असे हवाबंद कप्पे करता येत नाहीत. मात्र आपण आपल्या सोयीसाठी कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इ.प्रकार पडले आहेत. मराठी साहित्यामधील जे महत्त्वाचे प्रवाह आहेत. त्यामध्ये ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य हे महत्त्वाचे प्रवाह आहेत. या दोन्ही प्रवाहातील कादंबरी हा घटक तपासणे आणि त्यामधील तुलना करणे हा प्रस्तुत शोध निबंधाचा हेतू आहे.

पिराजी पाटील ही पहिली ग्रामीण कादंबरी १९०३ साली धनुर्धारी उर्फ रामचंद्र विनायक टिळेकर यांनी प्रसिद्ध केली. अनेकांनी त्यावर आक्षेप घेतले आहेत. तो वादाचा मुद्दा बाजूला ठेवून एकंदर ग्रामीण कादंबरी मागील प्रेरणांचा मागोवा घेताना असे जाणवते की, त्या प्रेरणा माणुकीबद्दलच्या अंतःतळमळीची आहे. याशिवाय ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण दर्शन घडविणे, शहरी वाचकांच्या कुतुहलाची जागृतीसाठी वेगळ्या वाटा शोधण्याच्या हेतूने देखील ग्रामीण कादंबरीचे लेखन झालेले आढळते. यामधूनच स्वाधीपन संसार (१९२७) प्र.ह. खाडीलकर, सात लाखातील एक (१९३०) भा.वि. वरेटकर, सीता (१९३१) श.शा.पाटील, मोहित्यांची मंजुळा (१९३१) रामतनय इ. उमेदीच्या काळामधील महत्त्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या आढळतात. खेड्यापाड्यामधील लोकांमध्ये सामाजिक सुधारणा व्हाव्यात ह्या हेतूने देखील काही कादंबऱ्यांचे लेखन झालेले आढळते. खेड्याच्या

उद्धारातच एकूण देशाचा उद्धार आहे जाणिवेने ग्रामीण कादंबऱ्याचे लेखन झालेले आढळते. १९२० ते १९४० हा कालखंड विचारात घेतल्यास या काळातील लेखकांनी या प्रेरणेतून कादंबरी लेखन केलेल आढळते. ग्रामीण जीवनातील सर्वस्तरांवरील विषमता, दैन्य, अज्ञान, अंधश्रद्धा, ग्रामीण माणसाची रूढीप्रियता नाहीशी करून त्यांच्या आत्मभान निर्माण करणे हीच ह्या लेखकांची लेखन प्रेरणा होती. १९२० च्या नंतरचा काळ हा अनेकार्थाने महत्त्वाचा आहे. याच काळात महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चलाफ हा मंत्र दिला. याचा परिणाम राजकीय आणि सामाजिक जीवनावर झाला. मराठी साहित्यातून ग्रामीण जीवनदर्शन घडविले पाहिजे. या हेतूने ग्रामीण जीवनावरील कादंबरी लिहिली गेली.

अशा पद्धतीने ग्रामीण जीवनाच्या विविध प्रेरणांचा मागोवा घेतला जाऊ शकतो. तौलनिकदृष्ट्या विचार करता आता दलित कादंबरीच्या प्रेरणांचा स्थूलमानाने विचार करणे प्रस्तूत ठरते. एकंदरच दलित साहित्याचा विचार करता त्याचे प्रेरणास्थान हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. विद्रोह, वेदना आणि नकार ही दलित कादंबरीची प्रेरणा आहे. गावखेड्यातील दलित बांधवांवरील अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी तसेच गावगाड्यातील दलितांचे स्थान दर्शविण्यासाठी दलित कादंबरीची निर्मिती झाल्याचे आढळते. यातूनच शंकरराव खरात यांच्या 'फुटपाथ नं.१' झोपडपट्टी इ. कादंबऱ्यांमधून शहरी वास्तव्याचे भीषण दर्शन घडते. तळागाळातील लोकांचे दुःख इतरांसमोर मांडणे ही देखील एक प्रेरणाच दिसून येते. विसाव्या शतकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्ती लढ्यामुळे दलितांना तयांच्या अस्तित्त्वाचा अर्थ उमगू लागला. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची जाणीव होऊ लागली. त्यांना नवे आत्मभान आले. यातीलच काही दलित शिकूल सवरून पुढे आले. काही लेखक झाले, काही कवी झाले. यापैकीच कादंबरीकारांनी आपल्यावर हजारो वर्षे झालेल्या अन्यायाल वाचा फोडण्यासाठी लेखणी हाती उचलली. हजारो वर्षांचा अन्याय, दुःख, दुःखाचे स्वरूप, दुःखाची तीव्रता, दुःखाचे चटके सर्वांपुढे उघडे करून दाखवावे या हेतूने दलित कादंबरीची निर्मिती झाल्याचे आढळते. खेड्यातील महार-मांग वाड्यातील दुःख सर्वांना कळावे, महार-मांग वाड्यात आपण कसे आणि किती प्रकारे दुःख भोगतो आहोत हे सांगण्यासाठी दलित कादंबरीचा जन्म झाला आहे असे म्हणता येते. यादृष्टीने अण्णाभाऊ साठे, उत्तम बंडू तुपे, बा.स.हाटे, केशव मेश्राम, माधव कसबे, हिं. गो. बनसोडे, नामदेव कांबळे, माधव कोंडविलकर, बाबुराव बागूल इ. च्या कादंबऱ्याकडे पाहता येते. प्रेरणेच्या पातळीवर ग्रामीण कादंबरी आणि दलित कादंबरीचा

विचार करता डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे असे एकंदरच सर्व दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहे. तर ग्रामीण साहित्याचे प्रेरणा स्थान हे महात्मा गांधीकडे न्यावे लागते. कारण १९२० नंतरच्या देशाच्या राजकीय पटलावर गांधीजींचे नेतृत्त्व जन्मल्यानंतर त्यांनी तरुणांना दिलेली हाक ही शहरी तरुण लेखक वर्गाला प्रेरणास्थान ठरू लागली त्यातूनच खेड्याकडे जाऊन शहरी मध्यम वर्गीय लेखकांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण केल्याचे आढळते. याशिवाय याच काळात साम्यवादाचाही पगडा पडलेला असल्याने यामधूनही ग्रामीण साहित्यावर त्याचा प्रभाव पडला यामधूनही ग्रामीण जीवन चित्रण करणारी मार्क्सवादी कादंबरी जन्माला आली. गांधी विरुद्ध आंबेडकर अशी प्रेरणास्थानांची उघड उघड बितावणी करणो तसे अवघड आहे. कारण दलित कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी यामधील सीमारेषा अत्यंत पुसट आहेत. मुळामध्ये दोहोंची केंद्रे एकच आहेत. ती म्हणजे ग्रामीसंस्कृती त्यामुळे अतिशय पुसट रेषेच्या आधाराने ही विभागणी करावी लागते. एकीकडे अण्णाभाऊ साठे हे ग्रामीण कादंबरीकार ठरतात. तर १९६० च्या दशकात जन्माला आलेल्या दलित साहित्याच्या प्रवाहामध्ये ते दलित कादंबरीकार ठरतात. शंकरराव खरातांच्या बाबतही तेच ठरते. याशिवाय दलितेत्तर लेखकांनी निर्माण केलेल्या कादंबऱ्या जाणिवेच्या पातळीवर वेगळ्या ठरतात. मग त्यांना दलित कादंबरीमध्ये स्थान द्यावयाचे की नाही? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. हेच सूत्र ग्रामीण कादंबरीलाही लावता येते. शहरी मध्यम वर्गीयांच्या ग्रामीण कादंबऱ्या जाणिवेच्या पातळीवर वेगळ्या ठरतात. मग त्यांना ग्रामीण म्हणायचे का? प्रादेशिक कादंबऱ्यांचा प्रश्न असाच महत्त्वाचा आहे. एकंदर सर्वच प्रादेशिक कादंबऱ्या त्या एका अर्थाने कादंबऱ्या त्या एका अर्थाने ग्रामीणच आहेत. दलित कादंबरी ही अन्याय, अत्याचार या विरुद्ध आवाज उठविणारी आहे. तर ग्रामीण कादंबरी त्या तुलनेत अधिक सोशीक वाटते. सहन करणे, हाच त्यातील पात्रांचा स्वभाव आहे. दलित कादंबरीतील पात्रे ही बंडखोर दिसतात. ग्रामीण पात्रं ही नियतीशरण होतात. याउलट दलित कादंबरीतील नायक हा बंडखोर बनताना दिसतो. याशिवाय पावसावर अवलंबून राहणारा ग्रामीण कादंबरीतील नायक शेवटी हवालदिल होतो. तो झुंजत नाही, दुश्मन समोर दिसत असताना तो त्यावर हल्ला करत नाही. या अर्थाने तो सोशीक दिसतो. असे तुलनात्मक दृष्ट्या दलित आणि ग्रामीण कादंबरीचे बरेचसे भेद दाखविता येतात.

दलित कादंबरीमध्ये जातीनिहाय चित्रण केलेले आढळते. महार समाजाचे चित्रण केवळच करणाऱ्या कादंबऱ्यांची यादी यादृष्टीने पाहणे महत्त्वाचे ठरते.

ग्रामीण कादंबरीमध्ये अशाप्रकारे एका विशिष्ट जातीचे चित्रण केल्याचे आढळत नाही. गावगाड्यातील एकंदर सर्वच जाती जमातीचे चित्रण त्यामध्ये येते. याशिवाय प्रादेशिक कादंबऱ्यांचा विचार करता त्यामध्ये देखील गावगाड्यातील जाती येतात. यादृष्टीने सराई पाणकळा, तुंबाडचे खोत, धग, इंधन या कादंबऱ्यांचा विचार करता येतो.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खेड्यातील लोकांना शिक्षणाची संधी प्राप्त झाल्याने तळागाळातील नवशिक्षित लिहू लागला. आपापल्या भागाचे, प्रदेशाचे चित्रण त्यामधून पुढे येऊ लागले. दलित कादंबऱ्याच्या बाबतीतही हेच झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून पुढे आलेला नवशिक्षित मग तो ग्रामीण असो वा शहरी आपापली दुःख, व्यथा, वेदना कादंबऱ्यांच्या माध्यमातून मांडू लागला फरक एवढाच की इथे केवळ वेदनांचे रडगाणे नाही तर प्रसंगी बंडखोरी आहे, नकार आहे. परिस्थिती सोबत झुंजण्याची तयारी आहे. दलित कादंबरीमध्ये दलितांच्या उद्योगाचे, व्यवसायाचे, गावकीच्या कामाचे चित्रण येते, दलितांच्या वस्तीचे, घरादाराचे चित्रण मोठ्या प्रमाणात येते. याशिवाय दलितांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढी-परंपरा यांचेही मोठ्याप्रमाणावर चित्रण येते. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिराफ, भीमसेन देठे यांची 'इस्कोट', उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा', माधव कोंडविलकर यांची 'छेदफइत्यादी कांदबऱ्या यादृष्टीने पाहणे महत्त्वाचे ठरते. ग्रामीण कादंबरीमध्ये ग्रामजीवनासंबंधीचे प्रश्न विस्ताराने विचारले गेले आहेत. त्यामध्ये अतिवृष्टी, दुष्काळ, उपासमार इ.प्रश्न ग्रामीण कादंबरीमध्ये मोठ्याप्रमाणावर हाताळले गेले आहेत. आशयाच्या-आविष्काराच्या पातळीवर विचार केल्यास दलित कादंबरीचा आशय हा जातीनिहाय स्वरूपाचा आहे. आविष्काराची पद्धती तपासली असता एकंदर सर्वच दलित कादंबऱ्यामध्ये त्या त्या जातीनिहाय बोली भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला आढळतो. तर ग्रामीण कादंबरीतील भाषा ही ग्रामीण बोलीच आहे. थोड्याफार फरकाने भाषाशैलीच्या बाबतीत दलित आणि ग्रामीण कादंबरी एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटाव्यात एवढी साम्यस्थळे आपल्याला आढळतात.

अशाप्रकारे वातावरण निर्मिती भाषाशैली, पात्ररचना, प्रसंग चित्रण या बाबतीत ग्रामीण आणि दलित कादंबरी यामध्ये साम्य भेद निश्चितच दाखविता येतात. अशाप्रकारे दोन्ही प्रकारांचा केंद्रबिंदू जरी एकच 'ग्रामीणफ असला तरी आविष्काराच्या पद्धती भिन्न आहेत हे जाणवते.

* * *

# ग्रामीण व दलित कादंबऱ्यातील राजकीय स्थित्यंतराचा तौलनिक परामर्श

–प्रा. डॉ. सीताराम निघूट

समाजातील बदलांचा आणि स्थित्यंतराचा सूक्ष्म आणि यथार्थ शोध घेण्याचा प्रयत्न ग्रामीण आणि दलित कादंबरी वाङ्मय प्रकारात साहित्यिकांनी घेतलेला आहे. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. या उक्तीप्रमाणे समाजातील वास्तव कादंबरीकार चित्रित करतो. अनेक केंद्री असल्यामुळे घटनांचा, काळाचा विशालपट त्यात येतो.

समकालीन राजकीय स्थित्यंतराचे कोणते पडसाद कादंबरीत दिसतात त्याचा तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात केला आहे. सद्य:स्थितीतील राजकारण, त्याने स्वरूप आपल्या नजरेसमोर आहेच. आज राजकारणाचा अर्थ बदलला आहे. राजकारण ही सेवा न राहता व्यवसाय बनला आहे. व्यावसायिक सूत्राचा वापर आज राजकारणात होताना दिसत आहे. एकूणच आजचे राजकारणात होताना दिसत आहे. एकूणच आजचे राजकारण हे मूल्यहीनतेकडे झुकलेले पहावयास मिळते. तरुण वर्ग या राजकारणाचा बळी ठरत चाललेला आहे. लेखकाचाही समाजात वावरताना राजकारणापासून अलिप्त राहता येत नाही. लेखक आणि नागरिक या दोन्ही भूमिकेतून तो राजकारणाकडे पाहतो. त्याला व्यक्ती म्हणून जगत असताना आलेले अनुभव तो कांदबरीतून मांडतो.

बदलत्या राजकारणाचे आणि स्थित्यंतराचे चित्रण रा.रं.बोराडे यांची 'आमदार सौभाग्यवती' कादंबरी करते. ग्रामीण भागातील पती–पत्नींचा राजकीय जीवनात प्रवेश केल्यानंतरचा आलेख या कादंबरीत बोराडे चित्रित करतात. राजकारणातील खेळी, डावपेच, गटबाजी, एकमेकांना शह देणे या राजकीय घटना या कादंबरीत आहेत. या संदर्भात प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक द.ता.भोसले म्हणतात, ग्रामीण कादंबरीचा पट मोठा करण्याचे व बदलते गघमवास्तव सवंग रंजनाच्या आहारी न जाता निष्ठापूर्वक प्रकट करून ग्रामीणांचे भावजीवन नेमकेपणाने व्यक्त करण्याचे मोठे कार्य रा.रं.बोराडे यांच्या कादंबऱ्यांनी केले आहे. द.ता.भोसले याचे मत अतिशय रास्त आणि योग्य आहे. कारण ग्रामीण वास्तव कवेत घेऊन मांडणी करणारा हा ग्रामीण लेखक आहे.

राजकीय आणि कौटुंबिक असे दोन पदर या कादंबरीस लाभले आहेत. स्त्रियांनी राजकारणात प्रवेश केल्यानंतर त्यांनी पतीच्या आज्ञेप्रमाणे वागले पाहिले.

पुरुषाच्या हातने बाहुले बनले पाहिजे. या पुरूषी वृत्तीचा सुमित्राबाई झटकतात. मुत्सद्दी राजकारणी असणाऱ्या चिमणरावांना वाईट वाटते. पत्नीच्याच विरोधात ते मतदार – संघात असंतोष पसरवितात. कौटुंबिक संघर्ष वाढत जातो. शेवटी या कुटुंबातील घडी विसकळीत होते. थोडक्यात असे म्हणता येईल की, 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत रा.रं. बोराडे यांनी महत्त्वाकांक्षा आणि सूडाचे राजकारण याचे प्रभावी चित्रण केले आहे. तसेच राजकारणातील खेळी, नाट डावपेच, विविध वृत्ती, प्रवृत्ती यांचे चित्रण मोठा खुबीने केले आहे.

'बारोमास' ही सदानंद देशमुखांची अतिशय गाजलेली कादंबरी. या कादंबरीतून सदानंद देशमुख ग्रामीण भागातील भ्रष्ट राजकारण चित्रित करतात. राजकारणाबरोबरच शेतकऱ्यांच्या आत्महत्या, ग्रामीण भागातील समस्या, प्रश्न, ग्रामीण लोकांची फरफट इ. गोष्टींनाही त्यांनी मुखर केले आहे. ऐंशीनंतरच्या राजकीय परिस्थितीचा होणारा मूल्यहीनतेकडील प्रवासाचे चित्रण समर्थपणे ही कादंबरी मांडते. राजकीय बदलाचे वारे खेड्यापर्यंत कसे पोहोचले, राजकारणामुळे खेडे कसे उद्ध्वस्त होत आहे, तरुण वर्ग कसा फरफटला जातो. याचे मोठे विदारक चित्रण या कादंबरीत पाहवयास मिळते. राजकारणामुळे खेड्यातील जीवनावर फार मोठा परिणाम झाला आहे. खेड्याच्या विकासात आजच्या राजकारणाचा मोठा अडसर निर्माण झाला आहे. या सर्व परिस्थितीचे सूक्ष्मपणे चित्रण सदानंद देशमुख यांनी केले आहे.

राजकीय स्थितीचे चित्रण 'ताम्रपट' (१९९४) या कादंबरीत रंगनाथ पठारे सूक्ष्मतेने करतात. या कादंबरीत लोकशाही, राजकारणातील मतलबी वृत्ती – प्रवृत्ती, समाजातील जागृती, सत्ताकारण, राजकारण्याची लबाडी, विविध खेळ्या, डावपेच, दुर्जनांची वाढती संख्या, पैसा व सत्ता चे समीकरण अशा वास्तवाचे चित्रण ही कांदबरी करते. 'गांधारीचे डोळे' (१९८५) या कादंबरीत डॉ.नागनाथ कोतापल्ले यांनी मूल्यहीन राजकारणाची आजचे राजकारण, त्यातील हिडीसपणा, आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांची होणारी कुचंबणा मांडतात. राजकारणातील अपप्रवृत्तीवर प्रकाश टाकणारी ही कादंबरी आहे. 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही डॉ. वासुदेव मुलाटे यांी कादंबरी सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे प्रभावी चित्रण करते. सहकार क्षेत्रतील हिडीस राजकारण, विविध वृत्ती-प्रवृत्तीचे चित्रण ही कादंबरी करते. 'टारफुला', 'झिंगाड', 'खांदेपालट', 'राहू-केतू', 'एस ई झेड', या कादंबऱ्यातून राजकारणात शिरलेल्या अपप्रवृत्ती मूल्यहीनता याचे चित्रण वास्तववादी वाटते.

राजन गवस यांची 'तणकट' (१९९८) साली प्रसिद्ध झालेली कांदबरी विविध ताणतणाव, दलित आणि सवर्ण यांच्यातील राजकारणाचे विविध पैलू,

नेत्यांचा भंपकपणा, शोषणाचे नवे संदर्भ याचे चित्रण करते. या कादंबरीत दलित राजकारणाचे चित्रण अधिक दिसते. दलित चळवळ, क्षुद्र राजकारण, दलितांना फसविणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राजकारणात वापर, याचे चित्रण राजन गवस हे सखोल चिंतनातून मांडतात. योगीराज वाघमारे यांची 'सभापती' ही कादंबरी दलित-सवर्ण यांच्यातील राजकारणाचे चित्रण करते. ही कादंबरी दलितांना सत्ता मिळते. परंतु त्यांना हाती सत्तेचे सूत्र असून ही कसे फसविले जाते. याचे चित्रण मोठे मर्मभेदक आहे. राजकारणातील कुटिल कारस्थानी, खेळी, डावपेच याचे चित्रण कादंबरीत आलेले आहे. गणेश औटे यांची 'भिरूड', 'रौंदाळा' या कांदबऱ्यातून गावपातळी वरच्या राजकारणाचे चित्रण आढळते. जातीयता, संघटना, राजकारणातील बारकावे, मूल्यहीनता, यांचे स्वरूप या कादंबऱ्या उलगडत होत्या. रमेश शिंदे यांची 'निशाणी डावा अंगठा' ही कादंबरी विनोदी शैलीत ग्रामीण राजकारणातील वास्तव साकारते.

बदलत्या राजकीय परिस्थितीचे, मूल्यहीनतेच्या राजकारणाचे, वास्तवदर्शी प्रतिबिंब वरील कादंबऱ्यातून उमटले आहे. आजचे राजकीय वास्तव मोठे चिंतनीय आहे. त्याचे चित्रण निर्भीडपणे कादंबरीकारांनी चित्रित केले आहे. सत्तेचा गैरवापर, नैतिकतेची चाड नसणे, सत्तेचा हव्यास, महत्त्वाकांक्षा, सूडाचे राजकारण, मूल्यहीनता, याचे दर्शन या कादंबऱ्यातून दिसते राजकारणाच्या मुळाशी जाण्याचा व त्यातील वास्तव नेमकेपणाने टिपण्याचा प्रयत्न ग्रामीण, दलित कादंबरीकारांनी केलेला आहे.

**निष्कर्ष :**

१. ग्रामीण व दलित कादंबरीकारांनी बदलत्या राजकारणातील वास्तव आपल्या कादंबरीत मांडण्याचा केलेला प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह आहे.
२. राजकारणातील विविध वृत्ती - प्रवृत्ती, डावपेच, खेळी या गोष्टी प्रभावीपणे अधोरेखित केलेल्या आहेत.
३. राजकारणाचे अधिक सूक्ष्म व तपशीलवार चित्रण दलित, ग्रामीण कादंबऱ्यातून दिसते.
४. मूल्यहीनतेकडे वेगाने घसरणारे राजकारण अनेक कादंबऱ्यातून चित्रित झालेले दिसते.
५. जागतिकीकरण, शेतकऱ्यांची होणारी फरफट, आत्महत्या, जातीयता, भ्रष्ट राजकारण याचे चित्रण मोठे प्रभावी वाटते.

* * *

# मराठवाड्यातील ग्रामीण दलित कादंबरी तौलनिक समीक्षा

– प्रा.डॉ.नवनाथ चौधरी

**प्रस्तावना :**

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. १९५० मध्ये देश प्रजासत्ताक झाला. १९४७ मध्ये स्वातंत्र्यानंतर मराठी जीवनमानात लोकशाहीमुळे नवपरिवर्तन होऊ लागले. मार्क्स म.गांधी याच्या तत्त्वज्ञानास नवे परिमाण देण्याचा प्रयत्न लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता या तत्त्वांचा लोकशाही समाज व्यवस्थेत स्वीकार केला गेला. सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. स्वांतत्र्यानंतर पंचवीस वर्षापर्यंत नवशिक्षित पिढी शिक्षणाने परिपक्व झाली. स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्यमूल्याची मानवी जीवनाशी तुलना करून लोकशाही व्यवस्थेला पारखण्यास सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतर जीवनात बदल न झाल्याने या उद्देशाने स्वातंत्र्य मिळवले होते त्याचा विशेष प्रभाव व परिणाम सर्वसामान्य माणसाच्या मनावर होत गेला. साहित्यातील स्थिती म्हणावी तशी समाजोपयोगी नव्हती. कलावादी साहित्याने साहित्याचे स्वरूप व्यापून टाकले होते. जूनी मूल्ये, जुने मानदंड समाजासाठी महत्त्वाची नव्हती .

**प्रवाहप्रेरणा :–**

पिढ्यान् पिढ्या सोसलेला अन्याय, अत्याचार, समाज व्यवस्था, जाती व्यवस्था, शोषण, जुलूम यांना कंटाळलेली समाज स्थिती स्वातंत्र्यानंतर सहन करण्यास असमर्थता व्यक्त करू लागली. याचे प्रेरणास्त्रोत सामाजिक सुधारणा, सामाजिक चळवळी आणि म.फुले, डॉ. आंबेडकर याच्या साहित्यातून आणि कार्यातून शोषित समाजाने प्रेरणा घेतली. जुने बदलण्याची, समाज परिवर्तन घडवण्याची तयारी होऊ लागली. पारंपरिक जीवन व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष केल्या शिवाय होऊ शकणार नाही ही जाणीव प्रबळ होऊन या उत्तुंग भरतीचा म्हणजे अस्वस्थ जाणिवांचा आविष्कार म्हणजे स्वातंत्र्योत्तर प्रवाह होत. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, कामगार साहित्य हे साहित्य प्रवाह काय किंवा मुस्लीम, जैन, ख्रिशन यांचे साहित्य प्रवाह काय हे सर्वच समाज व्यवस्थेत कोणत्या ना कोणत्या प्रकारची कोंडी, कुचंबणा, अन्याय, शोषण, दैन्य, दुःख, उपासमार, उपेक्षा यांच्या कैचीत कुंचबणाऱ्या लोकसमूहाचे होते? या सर्व

समाजांना हवी होती जीवनमानात समता, हवे होते स्वातंत्र्य सन्मानाने जीवन जगण्याची आस त्यांची होती. यांना संपुर्ण समाज एकात्म पातळीवर हवा होता. जाती धर्माचे गटतट त्यांना नको होते.

मानवतावादी दृष्टी त्यांना प्राप्त होत होती. विश्व पातळीवर मानवसमूह एकत्र आणण्याची या समाजाची धडपड होती. त्यास शब्दरूप देऊन त्याचा आविष्कार करण्याचा प्रयत्न म्हणजे संपूर्ण सामाजिक परिवर्तन होय. याच प्रेरणेतून साहित्य निर्मिती होऊ लागली. नवे जीवन, नवा आविष्कार, नव्या कल्पना, नव्या संकल्पना साहित्यातून व्यक्त होऊ लागले. नवजीवनविषयक दृष्टिकोन व्यक्त होऊ लागल्यामुळे जुन्या कल्पना, जुने विचार यांना धक्के बसू लागले. प्रस्थापितांना बाजूला सारण्याचा प्रयत्न होऊ लागला. मराठी साहित्यास हे प्रवाह नवे वाटत होते. स्वतःचे स्वरूप सिद्ध करण्यासाठी धडपडत असलेल्या मराठी साहित्याने स्वीकारण्यास घाई केली नाही. पण समाज प्रवाही असतो. समाजातील परिवर्तन साहित्यातून प्रतिबिंबित होऊ लागले. कारण साहित्यात अंतिमतः मानवी मनाचे, जीवनाचे आणि समाजाचेच प्रतिबिंब उमटत असते. साहित्य आणि समाज यांचा असा परस्परावांबी संबंध लक्षात घेऊन मराठी कांदबरी या साहित्य प्रकाराची थोडक्यात वैशिष्ट्ये विशद करणे गरजेचे वाटते.

कांदबरी हा मराठीतील अत्यंत महत्त्वाचा प्रकार मानला जातो. कांदबरी साहित्य प्रकाराच्या उगमापासून आज पर्यंत अनेक प्रवृत्ती आणि प्रवाह धारण करत कांदबरी या प्रकाराने आपले स्वतःचे वेगळेपण जसे जपले आहे तसे आपले स्वरूप ही रेखीव करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वच साहित्य प्रकारांना आपल्या कक्षेत घेणारा फक्त कांदबरी हाच प्रकार आहे. समाज आणि कांदबरी यांचे अत्यंत जवळचे नाते मानले जाते. मानवी समूह आणि जीवनपद्धती यांना आविष्कृत करणारा महत्त्वाचा कला प्रकार म्हणजे कांदबरी होय.

समाज वास्तवातील सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, धार्मिक, शैक्षणिक, ध्येयात्मक समाज मानसिक इ. महत्त्वाच्या घटकावर विशेष प्रकाश टाकणाऱ्या कादंबऱ्यांची नोंद वाड्मयेतिहास आवर्जून घेत असतो.

कांदबरी हा मानवी समूहाचा संपूर्ण जीवनपट व्यक्त करणारा कलाप्रकार मानला तर माणसाचे जगणे आविष्कृत करणारा साहित्य प्रकार म्हणजे कांदबरी होय. संपूर्ण जीवन समाज, निसर्ग वातावरण याबरोबर मानवी संस्कृती, व्यवसाय, भाषा, राहणीमान, सण उत्सव, विधिपरंपरा, मानवी जीवन जगण्याच्या पातळीवर

संघर्ष या सर्व बाबी लेखक कलावंताच्या रोमरोमात भिनलेल्या असतात. या जीवनातील अनुभवांना आविष्कृत करणारा लेखक मूळातच समाजाचा घटक असतो. यावरून कांदबरी या कलाप्रकाराचा पट लक्षात येण्यास मदत होईल. मानवी जीवन जगण्याच्या पातळीवरील पट उलगडताना लेखक कलावंताची सर्जकता जे रूप धारण करते ते कलाकृतीचे स्वरूप असावे अशी अपेक्षा असते. आपल्या अनुभवातील सजगता आणि अनुभव आविष्कृत करण्याचे कौशल्य यांचे भान केवळ कलावंताच्याच ठिकाणी असते. विशिष्ट काळ, परिस्थिती, समाज जीवन, समाज परिवर्तन यासर्व घटकांना सोबत घेऊन कलावंतास कलाकृती मूर्त करावी लागते. विस्तीर्ण पसरलेल्या समाजात परिवर्तनाबरोबर नावीन्यपूर्ण घटनाही घडू शकतात. त्याचे पडसाद समाजमनावर उमटतात. समाज जे नवे असेल ते स्वीकारून जे जुने असेल ते बाजूला सारणारा असाला तरी जुने पूर्णपणे नाहीसे होतच नाही. नव्या तत्त्वांना रुजण्यास काही कालावधी लागतो तो पर्यंत यास सातत्य हवे असते.

यादृष्टीने ग्रामीण आणि दलित साहित्य प्रवाहाविषयी थोडक्यात विवेचन मांडून प्रस्तुत प्रवाहातील कांदबरीचा तुलनात्मक विचार मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यानंतर वीस-पंचवीस वर्षाच्या कालावधीनंतर स्वातंत्र्यातील नष्ट न होणारी जाती व्यवस्था आणि वाढते शहरीकरण, खेड्यातील हालअपेष्टा, उपेक्षित जीवन उपासमार यांना कंटाळून फुगत चाललेली शहरे तेथील बकालपणा माणूस माणसापासून पोरका होत चालल्याची जाणीव, व्यक्तीचा आत्मकेंद्रित स्वभाव या सर्व घटकांचा परिणाम मानवी जीवनमानावर पडू लागला. गुलामगिरीचे लाचार वंचित जीवन जगण्यापेक्षा संघर्ष करून, लढा उभारून नवीन जीवनपद्धती रुजवण्याच्या प्रयत्नातून ग्रामीण दलित साहित्य प्रवाह आकार घेऊ लागले या दोन प्रवाहा बरोबर इतरही प्रवाह या सोबत असतील विस्तार भयामुळे त्यांचा विचार मी बाजूल ठेवून ग्रामीण आणि दलित साहित्याच्या प्रवाहाविषयी विचार मांडले आहेत.

देशातील ऐंशी टक्के जनता खेड्यात राहते. शेती हा मुख्य व्यवसाय शेतीशी निगडीत इतर उपव्यवसाय यातून बारा बलुतेदारी आणि आलुतेदारी पद्धती रूढ झालेली. गावगाडा या संकल्पनेत हे सर्व बसत होते. मानवी जीवन सामूहिकपणे व्यक्त होत होते. त्यास छेद बसत गेला. या सामाजिक परिवर्तन होत गेले. नवी जीवनपद्धती विद्रोह आणि नकार यातून घडू लागली. अन्याय,

अत्याचार, शोषण, जुलूम यास कलावंत शब्द अनुभवाद्वारे आविष्कृत करू लागले. वंचिताचे अनुभव कलारूप धारण करू लागले. अनुभव अनुभवाची आविष्कार पद्धती परंपरागत साहित्यास नवी असली तरी बदलत्या समाज जीवनास प्रेरणा याद्वारे मिळत होती. समाजाचे भरण पोषण याद्वारे होत होते. त्यामुळे सामूहिक अभिव्यक्ती, घाट केवळ कांदबरी हाच कलाप्रकार आविष्कार करण्यास सक्षम होता. पण ग्रामीण आणि दलित साहित्य प्रवाहांनी सामूहिकतेपेक्षा स्वअनुभवास प्राधान्य देऊन अनुभवातील वैश्विकता अधिक व्यक्तिनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण मराठी माणसाला सुखाचे दिवस येतील असे वाटत होते. पण लवकरच त्यांचा अपेक्षाभंग झाला. ग्रामीण साहित्याने समाजाच्या समांतर प्रवाह ठेवल्यामुळे ग्रामीण साहित्याची प्रेरणा सामूहिक राहिली.

दलित आणि ग्रामीण साहित्य चळवळीने महाराष्ट्रातील जनतेला काय दिले? या प्रश्नाचे उत्तर असे की, साठोत्तरी प्रवाहानेच शोषण मुक्त समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. दलित ग्रामीण लोकजीवनाचे वाङ्मय दर्शन घडविले लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तत्त्वांचा अभाव व्यक्त करून ती रुजवण्यासाठी वाङ्मयातून आग्रह धरला. माणसाला सर्वश्रेष्ठ मानणारी संकल्पना समोर ठेवली. दारिद्रय, दास्य, पिळवणूक, अन्याय, अत्याचार, जुलूम या विरोधात आंदोलने उभारून सामाजिक न्याय संकल्पना रुजवण्यासाठी वाङ्मयाला आधार केले. माणूस व त्यांच्या भावभावना यांना वाङ्मय रूप दिले.

मराठवाड्यातील ग्रामीण दलित कांदबरीचा तुलनात्मक विचार करण्या अगोदर कांदबरी या वस्तूतील मूल्यविचार आणि समीक्षा यावर प्रकाश टाकणे अगत्याचे वाटते. कांदबरी हा जीवन प्रवाहाबरोबर वाहत वाढत जाणारा प्रकार मानला जातो. घटना, कथानक, पात्रे, निवेदन, निवेदन शैली, भाषा, वातावरण इ. घटकांनी कांदबरीचा आदिबंध तयार केला जातो. पात्राचे जीवन, इच्छा, आकांक्षा, जीवन जाणिवा, नीती, मूल्य तत्त्वविचार या आधारे घडत असते. कांदबरी हा साहित्य प्रकार घटनाप्रधान असल्यामुळे पात्राचे जगणे कलावंताचे जगणे असते. त्यांच्या अंगी असणारा मूल्य विचार नीती अनीतीच्या कल्पना त्याच्या असतात.

लेखकच आपल्या कलात्मक गरजेनुसार व मूल्यभावानुसार निवेदन पात्रे, घटना आदी घटकांना एकात्म, संघटित करत असतो. बदलत्या परिस्थितीनुसार आणि आधुनिक युगात प्रस्थापित मूल्य व्यवस्थेविरुद्ध केलेली बंडखोरी ही

प्रवृत्ती कांदबरी प्रकारात प्रकर्षाने जाणवते. जीवनातील सकारात्मकता जीवनाला पोषक असते. साहित्यातील मूल्यविचार हा समाजातील माणसाच्या मूल्यापासून सुरू होतो.

साहित्यातील मूल्यविचार हा अखेरीस संस्कृतीतील मूल्य विचार असतो. त्यामुळे संस्कृतीला बळ मिळते. यादृष्टीने कांदबरी प्रकार जीवन मूल्यांच्या जडण घडणीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानावा लागेल.

समूह जीवन, निसर्ग जीवनमान यांचे एकात्मरूप कांदबरीमध्ये अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे मानवी जीवनातील चढउतार, काळ, परिस्थिती, भोवताली घडणाऱ्या घटना वास्तव पातळीवरून आविष्कृत जरी होत असल्यातरी त्या कलात्मक रूप धारण करत असतात. कांदबरीतील आविष्कार, समीक्षा पद्धतीच्या कसोटीला उतरतात का? यादृष्टीने मराठवाड्यातील दलित ग्रामीण कांदबरीचा तौलनिक विचार मांडणार आहे.

मराठवाडा या नामाभिधानाने ओळखला जाणारा भूप्रदेश महाराष्ट्रात १९६० मध्ये बिनशर्त समाविष्ट झाला. तत्पूर्वी, निजामशाहीत खितपत पडलेल्या मराठवाड्याने जे दु:ख भोगले ते स्वातंत्र्यानंतरही कमी झाले नाही. निजामशाहीतील मागासलेपण अजूनही कमी झाले नाही. समाजाचे, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक अध:पतन सारखेच होत राहिले. मराठवाड्याचा पारतंत्र्य काळात विकास झाला नाही. तसा आजही नाही. ज्या मराठवाड्यात निजामशाहीत उर्दू राजभाषा होती तेथे मराठी वळचणीला उभी होती. सर्वसामान्य माणसाला मराठी भाषेतून व्यवहार करण्यास मुभा नव्हती. तीच परिस्थिती सामाजिक स्तरांची होती. मराठवाड्यातील माणूस आडगळ, अडाणी, अशिक्षित, खेडवळ अशी वेळोवेळी अवहेलना पावणाऱ्या भूप्रदेशाने आज ज्यांच्या जन्मस्थळाच्या पायथ्याशी विचार शांतपणे ग्रहण करत आहात. त्या छत्रपती शिवरायांचे घराणे मराठवाड्यातील मराठीचे आद्यकवी मुंकुदराज, आद्यकवयित्री महदंबा आणि कितींतरी संत मराठवाड्यातील तेथील उदारता, परोपकारी वृत्ती, माणसामाणसातील प्रेमळपणा सहजपणे लक्षात येतो. भौगोलिक सुबत्ता आणि निसर्गाने भरभरून धारण केलेले मनोहरी रूप सहजपणे मोहीत करून जाते. मूळातच वेगळा सुभा निर्माण करण्याची किंवा वेगळेपण मांडण्याची इच्छा नसूनही ती मांडावी लागते. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजमने सिद्ध व्हायला जागा नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात याला वेग आला. साहित्य क्षेत्रात मराठवाड्याने भरीव कार्य करण्याचा प्रयत्न

केला. मुस्लीम राजवटीतील जुलूम, अत्याचार, शोषण, प्रादेशिक पातळीवर व्यक्त होऊ लागले. बी.रघुनाथ, वि.शं.पारगावकर, श्री.रं.कुलकर्णी, लक्ष्मीकांत तांबोळी, रा.रं.बोराडे, ना.धो.महानोर, शरद देऊळगांकर, दि.गो.मुंढे, विजय सिरसाट, रंगनाथ तिवारी, भगवान काळे, गो.गो.कुलकर्णी, त्र्यबंक आसरडोहकर, दिगंबर कुलकर्णी, बाबू बिरादार, बाबा भांड, डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, महावीर जोंधळे, डॉ.वासुदेव मुलाटे, गणेश आवटे, रेखा बैजल, शेषराव मोहिते, भीमराव वाक्चौरे, बा.ह.कल्याणकर, लक्ष्मीकांत देशमुख, बाबुराव गायकवाड, बा.बा.कोटंबे, नागनाथ पाटील, राजेंद्र मलोसे, मदन काळे, मथू सावंत, अनुराधा वैद्य, भालचंद्र देशपांडे, शांता जोशी, प्रकाश देशपांडे, राजीव उन्हाळे, सुधाकर, डोईफोडे, कविता महाजन, जनार्दन वाघमारे या आणि इतर कांदबरीकारांनी मराठवाड्यातील कांदबरी सामर्थ्यशील बनवण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण आणि दलित कांदबरीच्या दृष्टीने ही भूषणावह बाब मानावी लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात बी. रघुनाथ यांचेपासून सुरू झालेल्या मराठी कांदबरीचा प्रवाह आजही सामर्थ्यानिशी आविष्कृत होतो आहे. समाज, काळ, परिस्थिती, निसर्ग, वातावरण या घटकांचा विचार करत हा प्रवाह पाहतो आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील काही महत्त्वाची सामाजिक परिवर्तने मराठी कांदबरीने कितपत आविष्कृत केली याचा थोडक्यात विचार कांदबरीच्या अनुषंगाने करावयाचा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य मिळवण्याच्या उद्देशाने समाज जागृती, प्रबोधन करण्याचा प्रयत्न साहित्यिकांनी केला. बी. रघुनाथ यांनी ओ म्हणे लढाई संपली, आडगावचे चौधरी, जगाला कळलं पाहिजे या कांदबऱ्यातून जसे सामाजिक वास्तव व्यक्त होते तसे हिंदू मुस्लीम संघर्ष व्यक्त होतात. प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देणाऱ्या स्वामी रामानंद तीर्थ यांनी व्यवस्थेविरूद्ध पुकारलेल्या विद्रोहाचे दर्शन घडते. रझाकार आणि ग्रामीण भागातील सरंजामशाहीचे स्वरूप काही कांदबऱ्यातून येते. खु.शा.घोरपडे यांची संघटना, वसंत देशपांडे यांची निराक्षीत तरुणी या कांदबऱ्या समाजाकडे पाहण्याची निजामाची क्रूर नजर आणि निजामशाहीशी लढताना सर्वसामान्य माणसाच्या जीवनाची होरपळ व्यक्त होताना दिसते. नवरात्र संपले या श्री.रं.कुलकर्णी यांच्या कांदबरीने निजामी राजवटीला जनतेने मातीत मिसळल्यानंतर रझाकारी चळवळीतून मुक्त झालेल्या समाजाचे चित्रण येते. वि.शं.पारगावकर यांची अंतरिता. ललाट, कालचक्र, शेवगावेडा झाला, पांढरी माती, गोंदण, निगुडा, या कांदबऱ्यानी समाातील विविध जातीतील ताणतणाव, स्वातंत्र्योत्तर काळातील

परिवर्तने, एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास व्यक्त केलेला आहे. लक्ष्मीकांत तांबोळी यांनी दूर गेलेले घर या कांदबरीतून समाजातील शोषित अन्याय सहन करणाऱ्या वर्गासोबत, धार्मिक स्थितीत संस्थानांची वाढती संख्या, समाजाची उदासीनता व्यक्त होते. कृष्ण कमळ या कांदबरीतून समाजातील होऊ घातलेले परिवर्तन अचूकपणे टिपण्याचा प्रयत्न केला आहे. रा.रं.बोराडे यांची पाचोळा, चारापाणी, आमदार सौभाग्यवती, महानगाव, शिका तुम्ही हो शिका, इथं एक गांव होतं, मरणदारी, नामदार श्रीमती या कांदबऱ्यातून स्वातंत्र्यानंतरच्या सामाजिक परिवर्तनाचा बारकाईने चिकित्सक पद्धतीने आढावा घेतलेला आढळतो. खेडी बदलू लागली. गावगाडा कोलमडून पडला. दळणवळणाची साधने वाढली, शिक्षण प्रसारामुळे खेड्यातील मुले शिकू लागली. त्यांना आत्मभान आले. शेतकरी दुष्काळात आपल्या जनावरांना जगवण्यासाठी कसरत करू लागला शेती व्यवसायात पडत चाललेली दरी, शासनाकडील योजना सर्व सामान्य माणसापर्यंत पोहचत नाहीत याची खंत, शासनाविरुद्ध बंड, राजकीय व्यवस्थेत होऊ घातलेले समाजाचे शोषण असे विविध सामाजिक प्रश्न मांडण्यात बोराडे यशस्वी ठरले आहेत. सरंजामी परंपरा, ग्रामीण भागातील माणसा माणसातील पीळ, संघर्ष, चित्रित होत जातो. १९७०-८० या काळात सामाजिक प्रश्न, समस्या, परिवर्तन, स्वातंत्र्यातील फोलपणा, दुष्काळ, शोषित समाजातील दु:ख, उपासमार शोषण, शिक्षण, सहकार, राजकारण मानवी पातळीवरील सर्वच विषयांना समस्यांना कांदबरीने स्पर्श केला. उपेक्षितांचे जीवन उज्ज्वल होण्याऐवजी शोषणाच्या नव्या तऱ्हा लेखनातून व्यक्त होऊ लागल्या. आजही शोषण करणारे घटक समाजात आहेत. विजय सिरसाट यांनी कुस्ती, काळगर्भ दलित-सवर्ण ताणतणाव यांचे चित्रण येते. दलित आणि सवर्ण एकाच गावपातळीवर गावगाडा मध्ये येतात याचे चित्रण काळगर्भ कांदबरीतून येते. बाबू बिराजदार यांनी धावड मातीचे पाय, गोसावी या कांदबऱ्यातून मानवी जीवनातील गूढ अतर्क्य अनुभवाचा आविष्कार केलेला आहे. वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळ्या ही कांदबरी सामाजिक परिवर्तनातील महत्त्वाचा दुवा मानावा लागेल. सहकारी चळवळीची झालेली दुर्दशा आणि राजकारणी मंडळीनी सहकार चळवळीचा केलेला स्वाहाकार सामाजिक अध:पतन व्यक्त करताना आढळते. शिक्षणातीन अनागोंदी, शिक्षणसंस्थातीन भ्रष्टाचार, धनदांडग्यानी चालू ठेवलेले शोषण, यांचे चित्रण कांदबरीतून येते बाबा भांड यांची दशक्रिया, तंट्या भील्ल, नागनाथ कोतापल्ले

पराभव, मध्यरात्र, गांधारीचे डोळे या कांदबरीतून माणसाचे जगणे नितीचे असले तरी त्याला पराभूत व्हावे लागते ही मूळ जाणीव व्यक्त करून जाते. ग्रामीण भागातील उपेक्षित समाजाला शोषणमुक्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणारेच वेळ आल्यानंतर कशी जातीपातीच्या राजकारणावर येतात. याचे विदारक चित्रण यातून येते. गणेश आवटे यांची चुकार ही कांदबरी शिकून सुशिक्षित झालेल्या बेकारीत खितपत पडलेल्या तरुणांची कहाणी नियती, नशिब हे माणसाच्या प्रगतीचा कसे आड येते याचे उत्तम दर्शन घडते. आग-बाबूराव गायकवाड, गायरान-राजेश कांबळे, कोयता सरदार जाधव, असं जगणं तोलाचं-शेषराव मोहिते, रानखळगी-भीमराव वाक्चौरे, गराड, वा.ह.कल्याणकर यांची अंधेर नगरी, डायलिसिस-मदन काळे, राहूकेतू-मथू सावंत - जि.प.निवडणूकातील राजकारण, जिनगाणी-विधवा स्त्रीयांचे प्रश्न, माध्यम-अनुराधा वैद्य-स्त्री जीवनाचा वेग, आणि धरणीकंप होत राहीला -किल्लारी भूकंप, शांता जोशी -भावलीचा गांव स्त्री जीवनातील कुंचबना, गव्हानी-उसतोड मजुरांच्या मूलांची शिक्षणातील कुतरओढ, प्रकाश देशपांडे -बारदाना, बदलत्या समाजाचे चित्रण, काचकांगऱ्या बखर राजीव उन्हाळे -आधुनिक शेतकऱ्याला येणारे आत्मभान, बखर एका खेड्याची जनार्दन वाघमारे-खेड्यातील परिवर्तनाचे चित्रण करते. आणखी काही कांदबऱ्या सांगता येतील परंतु विस्तार भयापोटी सर्व कांदबरीकारांचा येथे उल्लेख करून त्यांचे कांदबरीकार हे नामाभिधान कायम ठेवून काही तपशील नोंदवले आहेत. मराठवाड्यातील कादंबरी स्वातंत्र्य पूर्व काळात स्वातंत्र्य मिळण्यासाठी जशी व्यक्त होत होती. तशी मुक्ती संग्रामानंतर बराच काळ स्वातंत्र्याची महती, अनुभव मांडत होती. बहुसंख्य कादंबऱ्यांनी वास्तवाचे भान ठेवून वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मराठवाड्यातील निसर्ग वातावरण यांचा आविष्कार केलेला आहे. ग्रामीण आणि दलित याच्या प्रश्नांना व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी जीवनात विविध पातळीवर होणारे परिवर्तन आविष्कृत केले आहे. राजकारण, समाज, धर्मकारण, शिक्षण, वैद्यकीय, सहकार सभेतील विविध वृत्ती प्रवृत्तींचा वेध घेतलेला आहे. बदलत्या काळातील खेड्यातील जीवन पद्धती, विविध रंपरा यांचा आविष्कार केलेला आढळतो. समाजातील अन्याय, अत्याचार शोषण, जुलूम यांचे वाभाडे काढून दास्य मुक्त होण्यासाठी कादंबरी प्रयत्न करते आहे.

* * *

# एकविसाव्या शतकातील दोन ग्रामीण कादंबऱ्या 'जमीन' आणि 'बोडखी'

– डॉ.कीर्ती मुळीक

एकविसावे शतक सुरू झाले आहे. जागतिकीकरण होऊ लागले आहे. नवे विचार, नवी संस्कृती रुजू पाहत आहे. मूल्य संस्कृती ऱ्हास पावू लागली आहे आणि माणसं देखील यंत्रवत मनाची होऊ लागली आहेत. नाती विसरली जात आहेत, माणुसकी ओसरत आहे पण माणसाच्या मनातील स्वार्थ, मत्सर, लोभ वाढत चालला आहे. त्याला स्वतःच्या भौतिक विकासाचा हव्यास लागला आहे आणि त्याबाबतीत तो इतरांशी स्पर्धा करीत आहे. आज खेड्यापाड्या पर्यंत शिक्षण पोहोचले असले तरी या शिक्षणाने माणसाला मनाची समृद्धी दिलेली दिसत नाही, उलट त्याच्या मनाच्या तळाशी बसलेली वासना, विकृतीची कासवं सूर मारून वेगाने वर येऊ लागली आहेत आणि माणसाच्या कृतीतून आपलं अस्तित्व दर्शवू लागली आहे. माणसाच्या मनाची अशी उलाघाल वाढत चालली आहे आणि ती त्याला फक्त आत्मनाशाकडे खेचत चालली आहे. राजन खान यांच्या 'जमीन' आणि प्रतिमा इंगोले यांच्या 'बोडखी' या ग्रामीण कादंबऱ्यांमधून आपल्यासमोर हे वास्तव उभे राहते.

'जमीन' ही कादंबरी जमिनीपायी उद्ध्वस्त झालेल्या चार भावंडांची कथा सांगते. थोरला 'चंदू', मधला 'राघू', त्यानंतर सविता, आणि तिच्या पाठीवर धाकटा अशोक – त्यांचं आडनांव येळकंदे. हे येळकंदे कुटुंबीय चाळीस पन्नास उंबऱ्यांच्या बारक्या वाडीत राहत असलेलं, त्यांची चाळीस एकराची जमीन सारी जिरायती, पण पाऊसच नसल्याने उजाड, वैराण बनलेली. साऱ्या गावाची हीच तऱ्हा. त्यामुळे जमीन असून निरुपयोगी. कुठंतरी मोलमजुरी करून पोटापुरतं आणायचं आणि जगत राहायचं. 'आपण जिवंत आहोत, जगतो आहोत, हाच त्यांच्या जगण्याचा मुख्य आनंद' त्यामुळे जमिनीकडे सर्वांचे दुर्लक्ष परिसरातील बहुतेक खेड्या, पाड्यांची, वाड्या, वस्त्यांची अशी दशा होती. चंदू येळकंदेचं घरही त्याला अपवाद नव्हतं.

या जमिनीचा येळकंदे कुटुंबीयाला उपयोग झाला तो सविताच्या लग्नाच्या वेळेस. तिन्ही भावंडांची लाडकी बहीण असणाऱ्या सविताचे लग्न एका शाळामास्तराशी ठरवले जाते आणि त्या लग्नासाठी मारवाड्याकडे जमीन

गहाण ठेवून तीन हजार रुपयांचे कर्ज काढले जाते. आज सविताच्या लग्नाला सतरा वर्षे होऊन गेली आहेत. मुलंबाळं झाली आहेत. तिच्या भावांचे संसारही पोराबाळांनी फुलले आहेत. पण अजूनही या भावांची कमाई हे कर्ज फेडण्यात खर्च होत आहे आणि त्याने हे तिन्ही भाऊ घायकुतीला आले आहेत. पण बहिणीवरच्या प्रेमापोटी ते हे सहन करीत आहेत. अशात एक दिवस मारवाडी त्यांच्या घरी येतो आणि 'तुमच्या कर्जाचा बोझा दोन लाखाच्या वर गेला आहे. ते कर्ज फेडा नाहीतर जमीन मला द्या,' असे सांगतो. ते ऐकून भाऊ हतबल होतात आणि सविताच्या नवऱ्याकडे मदत मागतात. पण मतलबी भावोजी त्याला नकार देतात, 'मारवाडी आताच कसा जमीन मागू लागला. इतकी वरसं गप कसा होता', हे कोडं हळूहळू या भावंडांच्या लक्षात येऊ लागतं. पडीक जमिनी असणाऱ्या गावांमध्ये जमिनी ताब्यात घेऊन काही विकासाचे प्रकल्प राबवावेत अशी सरकारी योजना आखली गेलेली असते. याची कुणकुण मारवाडीला लागते. जमिनीला आता चांगला भाव येणार, हे तो हेरतो आणि गावातील जमिनी तो आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करू लागतो. शहरातून देखील काही सरकारी चाकरमाने गावातील लोकांना दलाली देऊन त्यांच्याकरवी जमिनी विकत घेण्याचे उद्योग करू लागतात. जगदाळे हा असाच एक सरकारी चाकर. येळकंदे भावंडांना हाताशी धरून तो जमिनी विकत घेऊ लागतो आणि त्या बदल्यात त्यांना भरपूर दलाली देऊ लागतो. त्याच्याशी बोलता बोलता चंदू, राघू आणि अशोकला जमिनीचे मोल लक्षात येऊ लागते आणि त्यांना त्यातील व्यवहार समजू लागतो. दारात येऊन दमदाटी करणाऱ्या मारवाडयाला ते हुसकावून लावतात आणि जमिनीची किंमत वाढत जाणार आहे, हे लक्षात येऊन जमीन न विकण्याचा निर्णय घेतात.

गावात पैशाच्या लोभाने अनेकांनी जमिनी मारवाड्याला, सरकारी चाकरमान्यांना विकलेल्या असतात. एक दिवस जिल्हाधिकाऱ्याचं 'सरकार गावातील तीन हजार एकर सलग जमिनीचं अधिग्रहण करणार असल्याचं आणि एकरामागं जमिनीला दहाहजार रुपये भाव देणार असल्याचं' फर्मान येतं. हा भाव ऐकून ज्यांनी पंधराशे रुपये भावानं जमिनी विकलेल्या असतात, त्यांच्यावर पश्चातापाची पाळी येते, ते हळहळू लागतात तर जमीन न विकलेल्यांना आनंद होऊ लागतो. अशा वातावरणात सविता माहेरपणासाठी म्हणून घरी येऊन मुक्काम टाकते. तिच्या येण्यामागची कारणं माहीत नसणारी तिची भावंडं तिच्या

येण्याने आनंदित होतात. तिच्यासाठी घरात गोडधोड शिजवले जाऊ लागते. जमिनीचे गोंधळ गावात सुरू असतात. जनजागृती संघटनेचा नेता गावात येऊन लोकांची सभा घेतो आणि 'जमिनीला लाखाचा भाव मिळू शकतो. तोपर्यंत सरकारला जमिनी विकू नका. आपण लढू' असे आवाहन करतो. भरपूर लाभाच्या आशेने सारा गाव त्याच्या पाठीमागे उभा राहतो. जमिनीचे हे लाभ लक्षात घेऊन सविता सासरी निघून जाते नि चारच दिवसांनी नवऱ्यासह पुन्हा घरी येऊन उभी राहते. 'मुलीचा संपत्तीतील वाटा' ती मागू लागते. जमीन विकल्यावर तिच्या चौथ्या हिश्श्याचे पैसे आपल्याला मिळावेत, अशी मागणी सविता आणि तिचा नवरा करू लागतात. यामुळं सारं घरदार अचंबित होतं. सविताला समजावण्याचे प्रयत्न होतात पण ती आपल्या मागणीवर ठाम राहते. साऱ्या घरादाराच्या आनंदावर विरजण पडते. जगदाळेचा सल्ला घेतला जातो. थोडा दम भरून सविताकडून जमिनीचा ताबा सोडला असं लिहून, अंगठा मारून घ्या, असा जगदाळे सल्ला देतो. तिन्ही भावंडांना तो पटतो. बाकी घरादारांच्या नकळत ते हा कारभार उरकण्याचा निर्णय घेतात. सविता आणि तिच्या नवऱ्याला गोड बोलून गावाबाहेरच्या जंगलात ते घेऊन जातात आणि तेथील झटापटीत या तिन्ही भावंडांकडून सविता आणि भावोजींचा खून होतो. तिन्ही भावंडांना तुरुंगात टाकले जाते आणि म्हातारे आई-वडील हतबल होऊन ज्या जमिनीची चाळीस लाख रुपये किंमत येऊ शकणार होती, ती जमीन पोरांचा जीव फासातून सोडविण्यासाठी जगदाळ्याला पाच लाखाला विकून टाकतात. जगदाळे निघून जातो आणि घरामध्ये सर्वत्र खिन्न उदासी भरून राहते.

फ्लॅशबॅक पद्धतीने राजन खान यांनी या कादंबरीला सुरूवात केली आहे. झाडाला लटकलेले एका स्त्रीचा आणि एका पुरुषाचा देह जंगलात औषधी मुळ्या गोळा करण्यासाठी गेलेल्या वैदुला दिसतात आणि तो जंगलाबाहेर येऊन आरडाओरडा करू लागतो. अशी खान यांनी सुरुवात केली आहे. या स्त्री, पुरुषाच्या मृत्यूचे रहस्य त्यांनी शेवटाला उलगडले आहे. 'रहस्यप्रधान, ग्रामीण, वास्तववादी कादंबरी' असे जमीनचे वर्णन करता येईल.

खेड्यामध्ये विकासाच्या सरकारी योजना येतात पण या वाहत्या गंगेत प्रथम राजकारणी आणि सरकारी चाकरमाने हात धुवून घेतात. मनाजोगा खेळ झाला तर ठीक अन्यथा ते या योजना रखडवत ठेवतात. 'हेच आपल्या देशाचं राजकारण आणि हेच राजकारण्यांचे विकासाचे धंदे' २ हे राजकारण स्पष्ट करीत

कादंबरीचे कथानक पुढे सरकते. या कुणालाही खेड्यातील गरीब जनतेचे भले नको आहे. आपली तुमडी कशी भरता येईल आणि त्यापायी या गरीब जनतेला भुलवणं हेच त्यांचे उद्योग कादंबरीभर पहावयास मिळतात. खरे पाहता खेड्यापाड्यातील समस्यांवर त्वरीत उपाययोजना अंमलात यावी, यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करून सामान्य माणसाच्या हातात सत्ता दिली गेली. पण तो या सत्तेचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करू लागला आणि सारी मूल्ये पायदळी तुडवू लागला. ढासळणाऱ्या या मानवी मूल्यांचे चित्रण राजन खान यांनी ताकदीने केले आहे.

DADASAHEB RUPWATE ... LIBRARY AKOLE 422601

हे कथानक केवळ येळकंदे कुटुंबाची कथा या एकाच अंगाने पुढे न जाता समाज व्यवस्थेचे अनेक कंगोरे स्पष्ट करीत पुढे जाते. किंबहुना राजन खान यांना हे कंगोरेच स्पष्ट करावयाचे असावेत आणि त्यासाठी त्यांनी येळकंदे कुटुंबाची कहाणी मांडली असावी. झाडाला लटकणारे देह पाहण्याची प्रत्येकाची उत्सुकता, त्यासाठी धडपडत लावणीत उतरणे, संपूर्ण येळकंदे कुटुंब आणि सर्व सदस्यांमध्ये असणारे जिव्हाळ्याचे संबंध, गावामधील वैराण जमीन आणि त्या जमिनीकडे पाहण्याची लोकांची उदासीनता, जगदाळे आणि राघूची पहिली भेट, जमीन विकण्याच्या घडामोडी, या घडामोडींमुळे गावात निर्माण झालेले उत्सुकतेचे आणि उत्साहाचे वातावरण, गावात होऊ लागलेल्या सभा, सविताच्या निर्णयाने कुटुंबात निर्माण झालेला ताण, त्या दोघा पती-पत्नीची सविताच्या तिघा भावांबरोबर झालेली झटापट, बहिणीच्या मृत्यूने भावांना फुटलेले रडू, पोलीस पंचनामा, हतबल येळकंदे कुटुंब आणि जगदाळेने त्याचा घेतलेला फायदा अशा सर्व गोष्टी खान रंगवत, कधी संवादातून तर कधी सविस्तर वर्णन करीत सांगत जातात. 'आजची आज मजा करून घ्या, उद्याचं अल्ला मालिक', 'आमचं कुठलं वो नशीब माहेर गबर असन्याचं! आन असतं तरी आमी पैशासाठी तिथं उंबरा चढायला गेलो नस्तो,' 'जावयाकडन पैसं घेतलं तर पावण्यारावळ्यांत काय विज्जत ऱ्हाईल? पावना मोडून खायला नको,' असे वाक्यप्रचार आणि म्हणींनी भरलेले संवाद पानोपानी दिसून येतात.

या कादंबरीतील जगदाळे हा चार गावचं पाणी प्यालेला, व्यवहार जाणणारा माणूस आहे. त्यामुळे त्याचे संवाद हे केवळ एकमेकांशी बोलणे या पद्धतीचे नसून बोलताबोलता तो मनुष्यस्वभाव, मानवी व्यवहार यांचे स्पष्टीकरण देताना दिसतो. सविता तिच्या वाटणीचा हिस्सा मागते आहे, हे चंदूकडून

समजल्यावर तो म्हणाला, 'तुमच्या घरात असं काही होईल असं मला वाटलं नव्हतं. तुमचं घर वेगळचंय. पण शेवटी सर्वांचेच पाय मातीचे असतात. पैसा दिसला की माणसं नाती गुंडाळून ठेवून जातीवर जातात.... पार चेवंदा झालाय आता नात्यांचा. बहीण भाऊ, भाऊ भाऊ, आईबाप आणि मुलं एकमेकांना ओळखेनाशी झालीत. जमिनींना भाव येणं हे पापच झालंय'३ सविता आपली बाजू मांडताना म्हणते, 'नोकरदार मान्साची बायकूय मी. आसलं जगनं लई वाईट. समदं जगनं त्येच्या कलानं घ्यावं लागतं. लाचार जिंदगी असती नोकरदाराच्या बाईची. तो करील तशी फरपट सोसावी लागते.' या सर्व संवाद लेखनातून खान वाचकांना जगरहाटी माहीत करून देतात आणि त्यातून कादंबरी वाचकांच्या मनाची पकड घेत राहते.

विकास प्रकल्पाच्या नावाखाली सरकार खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेऊ लागले आहे. पण यामध्ये काय महाभारत घडत असते याचा सून्न करणारा अनुभव 'जमीन' ही कादंबरी देते. खेड्यापाड्यात मालकीची जमीन असणे हे देखील किती गंभीर आणि जीवघेणे असू शकते, याची प्रचिती या कादंबरीत येते.

'बोडखी' या कादंबरीत प्रतिमा इंगोले यांनी कामवासनेने आंधळे झालेले पुरुष आणि त्यात बळी गेलेल्या स्त्रिया यांची कहाणी सांगितली आहे. काळ कितीही पुढे गेला तरी माणसाच्या मूळ प्रेरणा बदलत नाहीत. स्त्री विषयीची वासना पुरुषाच्या मनात सतत ठाण मांडून बसलेली दिसते. हाती असलेल्या सत्तेच्या जोरावर, संधी मिळेल तेव्हा, स्त्रीच्या दुर्बलतेचा, असाहाय्यतेचा फायदा घेऊन तो तिचे शील लुटू पाहतो, तिचा भोग घेतो. उपकाराच्या ओझ्याने दबली गेलेली स्त्री अशा प्रसंगी काही करू शकत नाही. नंतरही ती या संदर्भात कुणाशी बोलू शकत नाही, याचे कारण तिचे मन पुरुषापेक्षा जास्त संवेदनशील असते. आपल्या नात्याचा, अब्रूचा, समाजाचा ती विचार करीत राहते. कधीतरी तिच्या बापानेच कामराक्षस बनून तिचा उपभोग घेतलेला असतो. तो तिच्याशी असणारं बापाचं नातं विसरतो पण ती मात्र त्याच्याशी असणारं लेकीचं नातं विसरू शकत नाही. वडिलांची इज्जत, त्याची समाजातील प्रतिष्ठा ती तरी जपू पाहते. म्हणूनच त्या बापाला पुढे पश्चात्ताप बुद्धीने म्हणावं लागतं. 'तिनी कोनाला सांगितलं नाही. जीव गेला तरी सांगितलं नायी.....' त्यावेळेस त्याचे डोळे तुडुंब पाण्याने वाहत राहतात. रंगनाथ पाठारे यांच्या

'दुःखाचे श्वापद' या कादंबरीतील उल्हासबाईची ही कहाणी मनात घर करून राहिली. तोच अनुभव प्रतिमा इंगोले यांच्या 'बोडखी' या कादंबरीतील कौसल्याने दिला.

ही कौसल्या गावातील पोलीस पाटलाचा पाशवी अत्याचार सहन करीत राहते. तुरुंगात नाहक डांबलेला नवरा आणि घरी एकाकी असणारी, तरुण वयात पदार्पण करणारी मुलगी गोदावरी हिच्याकडे पोलीसपाटलाने कामवासनेने अंध झालेली आपली नजर वळवू नये यासाठी तिने स्वतःचा हा दिलेला बळी आहे. प्रतिमा इंगोले यांनी या कादंबरीतून आजच्या विद्रूप समाज व्यवस्थेत स्त्रीच्या नशिबात येणारा क्रूर, पाशवी भोगवटा स्पष्ट केला आहे. स्त्रीचे दारुण दुःख वाचकांना जाणवले जावे, अशी अपेक्षा त्या कादंबरीतील आपल्या मनोगतात व्यक्त करतात. ही कादंबरी त्यांनी 'काळ्या मातीत राबूनही उपासमार ओसणाऱ्या व इच्छा नसताना घरदार सोडावे लागणाऱ्या, आणि असह्य झाल्यावर आत्मयज्ञ करणाऱ्या माझ्या ग्रामीण बांधवांना तसेच भगिनींना...' अर्पण केली आहे. या सर्वांविषयी असणाऱ्या आत्यंतिक कळवळ्यातून इंगोले यांनी लेखन केल्याचे जाणवते.

'बोडखी' कादंबरीची सुरूवात डोम्या चांभाराच्या गत आठवणींनी होते. हा डोम्या चांभार आपली पत्नी कौसल्या, मुलगी गोदावरी आणि मुलगा प्रकाश यांच्यासह प्लॅटफॉर्मवर गाडीची वाट पाहात थांबला आहे. रात्र असल्याने डोम्याच्या भरवशावर बाकी कुटुंब निर्धास्त होऊन झोपी गेलेलं. डोम्याला मात्र झोप येत नाही. त्याला त्या निर्मनुष्य प्लॅटफॉर्मवर भयाण वाटत आहे. काळजीनं काळवंडलेल्या आपल्या मनाची तो समजूत घालू पाहत आहे. पण तरीही 'भूतकाळाच्या विचाराने त्याचा थरकाप होत होता, भविष्यकाळाच्या विचारानंही त्याचा थरकाप होत होता आणि वर्तमान काळही त्याला दचकवत होता' हळू हळू तो शांत होत गेला आणि त्याच्या उघड्या डोळ्यांपुढे आपल गाव, आपला पुरा, आपलं घर, आपलं गतजीवन जसंच्या तसं साकार होऊ लागलं. फ्लॅशबॅक पद्धतीने कथानक पुढे सरकू लागते.

डोम्याने मोठ्या उमेदीने प्रकाशला शाळेत घातलेले असते आणि त्याच्या उज्ज्वल भविष्यकाळाची स्वप्नं तो पाहात असतो. या स्वप्नांना तडा जातो ते घरी पोलीस येण्याने. प्रकाशच्या मारवाडी मित्राच्या घरी चोरी झालेली असते आणि ते सोने पोलीसांना डोम्याच्या घरी सापडते. खरे तर काळ्या

जादूच्या नादी लागून मारवाडी मित्र कमल किशोरनेच ते प्रकाशच्या घरी आणून ठेवलेले असते. पण हे माहीत नसलेला डोमा चक्रावून जातो आणि प्रकाशला आता तुरुंगात डांबतील या भीतीने चोरीचा आळ स्वतःवर घेतो. डोमाची खानगी तुरुंगात होते आणि तिथूनच या घराचा विस्कोट होऊ लागतो. गावाचा पोलीस पाटील या घराचा ताबा घेतो, प्रकाशला खोटी सहानुभूती दाखवून रात्री घराबाहेर पाठवतो आणि कौसल्येची शिकार करतो. कौसल्या पार कोसळते, उद्ध्वस्त होते. जिवंतपणीच ती हे मरण दररोज भोगू लागते. पोलीस पाटलाचा हा जाच तिला आता रोज सहन करावा लागतो.

पुढे जेलरसाहेबांच्या मदतीने डोमाची सुटका होते. घरी आल्यावर त्याला सर्व परिस्थितीची जाणीव होते आणि तो गाव सोडण्याचा निर्णय घेतो या निर्णयाने त्याने साऱ्या कुटुंबाला दहशतीतून, गुलामीतून एक प्रकारे मुक्त केलेले असते. तरीही त्यांच्या भावी जीवनाबद्दल प्रतिमा इंगोले वाचकांसमोर प्रश्नचिन्ह उभे करतात. कादंबरीचा शेवट त्यांनी पुढीलप्रमाणे केला आहे. 'खरं तर गावातल्या एका लांडग्याला भिऊन मुंबईला निघालेल्या डोम्याला मुंबईत असे असंख्य लांडगे आहेत हे कुठं ठाऊन होत'

कौसल्या, गोदावरी आणि मारवाडीची रखेल अशा तीन स्त्रियांची कहाणी यात येते. मारवाडीची रखेल ही गावातील एका नवबौद्धाची सतरावर्षाची कोवळी मुलगी आहे. पोलीसपाटील आणि मारवाड्याने संगनमत करून या नवबौद्धाला तुरुंगाची भीती दाखवलेली असते आणि तिथून सुटका करणाऱ्या बदल्यात ही मुलगी मागिलेली असते, या मुलीला इच्छा नसताना मारवाडीची रखेल म्हणून गावाबाहेरील जंगलातील एका एकाकी हवेलीत दिवस कंठावे लागतात. तिथे मारवाडी आणि पोलीसपाटील यांच्या कामांध वासनेला तिला रोज बळी पडावे लागते. या मुलीने लहान वयातच जग ओळखले आहे. ती म्हणते, 'कुठीई गेलं तरी आता माया नशिबी हेच हाये. त्येच्या परिस अथीच रायलं तं निदान मारवाडी मायी म्हातारपनाची सोय तरी लावून दीन. अरे! हे मानसं बाईच्या आंगाचे लचके तोळतेत लचके. कोल्हे, कुत्रे पुरले, पन मानसं नाही पुरले.'

'बोडखी' मधून इंगोले यांनी एक अस्वस्थ कुटुंबाची मानसिकता आणि खेड्यातील स्त्रियांच्या वाट्याला येणारे भयावह जीवन यांचे प्रभावी चित्रण केले आहे. यातील प्रत्येक पात्र लेखिकेने आत्मीयतेने साकार केलेले असल्याने ते

सजीव आणि प्रत्ययकारी झाले आहे. त्यांची मानसिकता आंदोलने, मनातील आक्रोश आणि परिस्थितीमुळे आलेली अगतिकता लेखिकेने टिपली आहे.

या कादंबरीत पानोपानी अटीतटीचा संघर्ष, नाट्य दिसते. अनेक घडामोडींतून कथानकाला विलक्षण गती मिळाली आहे. त्यामुळे वाचक कादंबरी वाचताना खिळून राहतो. वऱ्हाडी बोली, लोकगीतांचा आणि म्हणींचा केलेला कलात्मक वापर हे ही या कादंबरीचे एक प्रभावी स्थान आहे. कादंबरीला त्यातून एक वेगळे सौंदर्य प्राप्त झालेले आहे.

**संदर्भ टीप :**


१) राजन खान : 'जमीन', 'मैत्रेय प्रकाशन', विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ५७,प्रथम आवृत्ती जून २०१२, पृ.२५.
२) तत्रैव, पृ.७६
३) तत्रैव, पृ.८८
४) तत्रैव, पृ.१००
५) प्रतिमा इंगोले, 'बोडखी', 'सोनल प्रकाशन', अमरावती, प्रथमावृत्ती, जन २००९, पृ.२३.
६) तत्रैव, पृ.३०४
७) तत्रैव, पृ.२८२


* * *

# 'तहान' व 'सूड' या कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास

–प्रा. माया तानाजी शिंदे

१९ व्या शतकात महाराष्ट्रात जे विचारमंथन सुरू झाले त्या विचारांचे केंद्र माणूस होते. माणूस–निसर्ग–समाज–विश्व–माणूस–कुटुंब यांचा शोध विचारवंत घेऊ लागले, त्यातून असे अपेक्षित दिसते मानवांचा सर्वांगीण विकास.

१९६० नंतर ग्रामीण साहित्याची नवी पिढी नव्या भूमिका घेऊन मांडतांना दिसतात आणि डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानापासून प्रेरणा घेऊन दलित साहित्याने आपली वाटचाल सुरू केली आणि प्रस्तापित साहित्याला आव्हान दिले. महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांनी मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन हे मूल्य श्रेष्ठ मानले. माणूस महान आहे आणि माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असा आग्रह या विचारवंतानी धरला. महात्मा फुले यांनी आपल्या विचारातून मूलग्रामी मानवतावाद मांडला, त्यांचे कार्य केवळ सुधारणावादापुरतेच मर्यादित नव्हते, त्यांचा प्रवास बंडखोरीपासून व सम्यक परिवर्तनापर्यंत होता. त्याप्रमाणे त्यांनी आपले कार्य आरंभिले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्य मानणारी त्यांची वैचारिक भूमिका होती.

ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने माणसांचे साहित्य आहे. माणूस स्वतःला बदलू शकतो तसेच तो आपल्या भोवतीचे वास्तव विचाराने आणि कृतीने बदलू शकतो हे प्रमुख विचारसूत आहे.  तसेच पाहिले तर, बदल हा मानवी जीवनाचा धर्म आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, बदल हाच इतिहासाचा अर्थ आहे. ही वैचारिक भूमिका लक्षात घेऊन ती आचारणात व कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा या उद्देशाने सदानंद देशमुख यांची 'तहान' व बाबुराव बागूल यांची 'सूड' या कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास करीत आहे.

ग्रामीण साहित्यात केवळ ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवून चालणार नाहीतर ग्रामीण जीवनाचे अर्थपूर्ण विश्लेषण करावे लागेल. एखादी कादंबरी केवळ ग्रामीण जीवनातील प्रश्न मांडून थांबणार नाही तर त्या कादंबरीतून प्रश्नाचे समग्र विश्लेषण केलेले असते.

१९६० नंतर ग्रामीण कादंबरी खऱ्या अर्थाने बहरास आली. या कादंबऱ्यातून प्रामुख्याने खेड्यातील पारंपरिक, व्यावसायिक, कष्टकरी, भटके

आणि दलित यांचे दुःख चित्रणावर भर दिलेला असल्याने संपूर्ण ग्रामीण संवेदना शब्दांकित करण्यात साठ नंतरची कादंबरी यशस्वी झालेली दिसते. 'स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली तरी देखील अनेक खेडी आजही पाण्यावाचून तळमळतांना दिसतात. हे ग्रामीण वास्तव पाणीटंचाईच्या भीषण प्रश्नाबाबत सदानंद देशमुख एक ग्रामीण 'तहान' या कादंबरीत साकार करतांना दिसतात. म्हणून ती एक लक्षवेधी कादंबरी म्हटली जाते.

'सूड' या कादंबरीतील 'जानकी' ही स्वतःवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारून स्त्रीत्त्वच नाकारतांना दिसते. तिला आलेले आत्मभान, स्त्रीत्त्वाची जाणीव 'स्त्री देहाची झालेली विटंबना सहन होत नाही, ती पुरुषाच्या पाशवी वृत्तीला कंटाळलेली आहे म्हणून स्त्रीत्त्व नाकारून पुरुष होण्याचे ठरविते. पुरुष होता आले नाही तर जीव देण्याची भाषा करते.

या दोघ-ग्रामीण सदानंद देशमुख-'तहान' व बाबुराव बागूल-'सूड' या दलित कादंबरी यांचा विचार करता पाणी टंचाईचे भीषण वास्तव तहानमध्ये लेखक साकार करतात. तर जानकीच्या माध्यमातून बाबुराव बागूल पुरुषाच्या पाशवी वृत्तीचे दर्शन घडवताना दिसतात. दोघांच्या कादंबऱ्यातील प्रश्न भीषण आहे. प्रश्न फक्त वेगळे आहे. त्यांच्या कादंबरीतील आशयाचा विचार करता पाणी टंचाईने उद्ध्वस्त झालले ग्रामीण जीवन हे 'तहान' चे मध्यवर्ती आशयसूत्र आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली असली तरी आपली खेडी पाण्यावाचून तळमळतांना दिसतात. पिण्याच्या पाण्यासाठी उन्हाळ्याच्या सुरूवातीपासूनच बायका-माणसं रात्रंदिवस रानोमाळ भटकतात. रात्र-रात्रभर जागून कोरडे झालेले हातपंप मारून घामात निथळून निघतात. तळ गाठलेल्या विहिरीतल्या डबक्यातून ओंजळ-ओंजळ पाणी उपसून आणतात. पाण्यासाठी सैरावैरा होतात. निसर्गाची अशी अवकृपा झालेल्या वैराण वातावरणात जगणाऱ्या माणसांची मने देखील तशीच रखरखीत आततायी होऊन किडून जातात ही वस्तुस्थिती आहे. पाणी टंचाईने होरपळलेल्या मानवी जीवनाचे त्यातून प्रत्ययकारी दर्शन घडते.

'सारंगपूर' सारख्या दहा-पंधरा हजार लोकवस्तीच्या खेड्यात 'तहान' चे कथानक आकाराला आलेले आहे. या खेडेगावाची संख्या १५ हजाराच्या आसपास असली तरी गावात कायमस्वरूपी पाणीटंचाई आहे याची दोन कारणे त्यातले पहिले कारण म्हणजे सरकारी पातळीवरील दिरंगाई. लाल फितीच्या

चक्रव्यूहात अडकलेल्या सारंगपूरच्या पाणी प्रश्नावरील अनेक योजना फायलींच्या स्वरूपात धूळ खात पडल्या आहेत. सरकार दरवर्षी सारंगपूरचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी कृती–आराखडा जाहीर करतो. त्यासाठी पुरेसा निधीही उपलब्ध करून देते पण अजून तरी त्याला पूर्णत्त्व आलेले नाही. परिणामतः सारंगपूरच्या पाणी प्रश्नाचे घोंगडे तसेच भिजत पडलेले आहे. अवघ्या गावासाठी दोन बोअर उपलब्ध आहेत, त्यावर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा विचार केला तर त्यातील तफावत आणि पाण्याच्या प्रश्नाची उग्रता लक्षात येते.

पाणी टंचाईच्या या दिवसात विविध पातळीवरील आपली तहान भागविण्याचा प्रयत्न करणारे अनेक महाभागही दिसून येतात. अभावग्रस्ताला अडचणीत पकडून बनवा–बनवी करून आपला स्वार्थ साधून घेण्यासाठी असे टगे गावागावातून नेहमीच धडपडत असतात. अशा मूल्यहीन समाज व्यवस्थेत आपली जीवनमूल्ये जोपासणारा एक अटळ संघर्ष सध्याच्या विघटनकाळात करावा लागत आहे. त्यांचा हा संघर्ष जशा भाळी आलेल्या भयावह परिस्थितीशी आहे. तसाच तो भौतिक सुखाच्या मायावी मृगजळामागे धावून महाकाय शून्य हाती येणाऱ्या सैरभैर मनोवृत्तीच्या तरुण पिढीशी सुद्धा आहे. त्यातून त्यांच्या वाट्याला येणारा ताण त्यांची घुसमट करून गुदमरून टाकणारा आहे. अशा तणावग्रस्त अवस्थेत जगणारी राघोजी शेवाळेची व्यक्तिरेखा अस्वस्थ करून सोडते. या कादंबरीतल्या कथानकातील संघर्षाचे स्वरूप दोन पातळ्यांवर व्यक्त झालेला दिसतो. प्रतिकूल निसर्ग आणि मूल्यहीन माणसे अशा दोन पातळ्यांवरील हा संघर्ष आहे.

तर 'सूड' ही कादंबरी एका भीषण वास्तवाचे दर्शन घडविते. या कादंबरीतील नायिका जानकी म्हणते, या दुःखातून स्त्री देहातून, पापातून आपली कधीच सुटका होणार नाही? मरेपर्यंत आपण अशी भोग्य स्त्रीच राहू? तिचे दुःख खरे आहे. एक तर ती स्त्री आणि दुसरे म्हणजे दलित स्त्री.

जानकी ही सूड या कादंबरीची नायिका. एका मुरळीची मुलगी, वेश्यांचा धंदा स्वीकारलेली मुरली आणि जानकीला धंद्याला लावणारी आई! मटणाच्या उधारीत सासूने तिला रसूलला विकले आणि रसूलने जानकीला बकरी विकावी तशी नायकिणीला विकली. नायकिणीने तिला धंद्याला काढली. तिच्यावर अनेक रंगाच्या, वयांच्या पुरुषांची झुंबड येऊन पडली. आलेल्या प्रत्येकाला ती आपल्याला या नरकपूरीतून सोडविण्याची विनंती करीत होती.

पण कुणाला तिची दया आली नाही. उलट वासना तृप्तीचे सुख मिळविण्यासाठी ते झडपडत. जानकीच्या आईने तर धंदाच सुरू केला होता. ती जानकीला सरळ सांगत होती. "कंच्या गधडीने सत्पण शिकावलं, अग, भरात आलीस, सुरू कर मजा कर", हा सगळा व्यभिचार इच्छा नसताना, शरीराचा बाजार जानकीला मांडावा लागला. त्यातून एका तरुणाच्या साहाय्याने सुटून ती बाहेर आली आणि 'ज्वालाप्रसाद' बनून ती हिंडत-हिंडत स्वामीजींकडे आली आणि सांगितले. मी माझे स्त्रीत्त्व गंगेला अर्पण केले आता मी स्त्री नाही. कधीच होणार नाही, पुरुष होता आले नाही तर मी जीव देईन. स्वामीजी जानकीच्या मनात परिवर्तन घडवून आणीत होते. वासनेच्या थोड्या देखील स्पर्धाने स्वामीजी मलीन झालेले नव्हते. जानकीच्या मनात परितर्वन घडवून आणीत होते. तिच्या संपूर्ण नग्न लखलखीत सरळ देहाकडे पाहूनही त्यांच्या मनात वासना अंकुरली नाही, तर त्यांचे मन आनंदाचे भरून गेले. जानकीलाही आश्चर्य वाटले. जेवतांना ती म्हणाली, "स्वामी तुम्हांला एवढा कसला आनंद झालाय?" ते म्हणाले तू सत्य स्वरूपात आलीस म्हणून, दंभात सुटलीस म्हणून.

"बस, एवढंच, मी स्त्री झाल्याचा आनंद म्हणू काय?"

"म्हण वाटल्यास, पण केवढे मोठे ओझे तू वागवित होतीस?"

"किती कठोरपणे, स्वतःवर सूड उगवित होतीस?"

तिच्या देहाचे, सौंदर्याचे एवढे प्रसन्न निर्मळ कौतूक कोणीच केले नव्हते. चिखल तुडवावा तसे तिला अनेकांनी तुडविले होते त्यामुळे स्वामीजींचे कौतूक ऐकून हजार जन्म स्त्री होऊन तो आनंद ऐकावा, पाहवा असे तिला वाटत होते.

या कादंबरीत व अन्यत्र बागुलांचा एक महत्त्वाचा प्रश्न आहे तो हा की हाडामांसाची माणसे दानवासारखी का वागतात? हा प्रश्न आजचा देखील आहे. आजही अशा अनेक घटना घडत आहे, या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेणे म्हणजे या कादंबरीचे यश मानावे लागेल.

कथानकातील घटना व्यक्तीच्या स्वभावातून आकारत असतात. अशाच व्यक्तिरेखा 'तहान' मध्ये सदानंद देशमुख व 'सूड' मध्ये बाबुराव बागूल साकारतांना दिसतात. 'तहान' मध्ये बबन शेवाळे, राघोजी शेवाळे, रामकोर, रत्ना, नंदू आळशी, सोमनाथ हावरे, प्रमोद नवले व जनसमुदाय व त्यांचे जीवन या व्यक्तिरेखा 'सूड' कादंबरीतील, जानकी नायिका, जानकीची आई, रसूल

आणि जानकीचे ज्वालाप्रसाद होणे आणि तिला भेटलेला स्वामीजी या व्यक्तिरेखा व त्यांच्या जीवनातील संघर्ष हा कशासाठी चाललेला संघर्ष आहे.

त्यात बबन शेवाळे हा भौतिक सुखांच्या मागे लागून सैरभैर झालेल्या तरुण पिढीचा प्रातिनिधिक आहे. बापाबरोबर वर्षभर शेतात राबराबूनही पैसा हातात न पडणाऱ्या बबनला पाण्याच्या धंद्यात दिवसाकाठी हजार पंधराशे रुपये रोख मिळू लागतात. तो पैसा कमाईचा असल्यामुळे मोडायचेही स्वातंत्र्य एकूणच त्याच्या प्रवृत्तीत आमूलाग्र बदल त्यातून त्याला व्यसन जडते. दारू मटनाच्या पार्ट्यांत पैसा खर्च करू लागतो. रत्नाच्या प्रेमात पडतो. बबन शेवाळे च्या रूपाने व्यक्त होणारी ही तरुण पिढी चंगळवादी प्रवृत्तीची आहे. भौतिक सुखा-समाधानलाच धन्यता मानणारी आहे. पैशाच्या मागे लागलेली जनावरांच्या जीवाचा विचार न करणारी भूमीतील पाणी शोषून-शोषून स्वतःचा मतलब साधणारी ही पिढी आहे. वेळप्रसंगी ती मूल्यहीन ही होतात ही माणसे शेवटी संकटात सापडून उद्ध्वस्त होतात.

जानकीच्या आईची व्यक्तिरेखा ही चंगळवादी वृत्तीची आहे. बबन हा बैलांच्या जीवावर हंबिऱ्या आणि पाखऱ्याच्या जीवावर पैसा कमवितो तर सूडमध्ये जानकीची आई ही जानकीच्या देहावर पैसा कमवून चैन करते. ती आपल्या मुलीला जानकीला म्हणते, ''तुला कंच्या गधडीनं हे सत्पण शिकावलं, अग, भरात आलीस सुरू कर, मजा कर'' हा सगळा व्यभिचार शरीराचा बाजार जानकीला मांडावा लागला.

राघोजीची व्यक्तिरेखा साकार करतांना राघोजी नव्या पिढीला हतबल झालेला दिसतो त्याची अवस्था दोरी तुटलेल्या पतंगासारखी आहे. राघोजीची पत्नी रामकोर राघोजीला झिडकारून ही येणाऱ्या प्रवाहात सामील होते. राघोजीला तो प्रवाह मानवत नाही. इतरांच्या नजरेनं तो बाजूला फेकला जातो आणि मग बदललेल्या जमान्याच्या अनुभवांनी तो प्रत्येक वेळी जखमी होतो. बायको-मुलगा पैशाच्या नादानं वहावत गेले आहेत असे त्याला वाटते. त्यांच्यामध्ये इळ्याभोपळ्याचे नातं निर्माण होतं. नव्या जमान्याच्या तीव्र झटका त्याला पहिल्यांदा बायकोकडूनच बसला आहे.

'सूड' मधील नायिका जानकी ही स्त्रीत्त्वाला जपणारी चारित्र्य सांभाळणारी. परंतु परिस्थितीने तिला हतबल केली आहे. त्यामुळे ती मानवाच्या पाशवी वृत्तीला बळी पडते. त्यामुळे पुरुष जातीबद्दल तिला घृणा वाटते. ती

आपल्या स्त्रीत्त्वाला जपताना दिसते. स्त्रीत्त्व जोपासताना दिसते, स्वतःची आई एवढी क्रूर, मूल्यहीन असेल, स्वतःच्याच मुलीला आपला देह विक्रय करून चैन करायला सांगणारी आई याची कल्पनाही तिला नसेल. जिने जन्म दिला व तिच्या संरक्षणाची जबाबदारी तिच्यावरच असताना तीच आपल्या मुलीला धंद्याला लावते. इच्छेविरुद्ध देहभोग म्हणजे बलात्कार म्हणून बाबुराव बागुलांची नायिक बंड करून उठते. मानवाच्या पाशवी वृत्ती विरोधात बंड करताना दिसते. फक्त बंडच करत नाही तर स्त्री पण नाकारताना दिसते. तिला पुरुष व्हायचे असते असे ती स्वामीजींना सांगते. ते तिच्या मनात परिवर्तन घडवून आणतात, तिला असा स्वामी भेटतो त्यामुळे तिला तिचे स्त्रीत्त्व गवसते.

तहानची भाषा संवादासाठी ग्रामीण बोलीभाषा व निवेदनासाठी वेगळी प्रमाणभाषा अशी दुहेरी भाषा जरी लेखकाने वापरलेली असली तरी यातील प्रमाणाचा भेद राखला असल्यामुळे लेखकाची भाषा विसकळीत व कृत्रिम वाटत नाही.

'सूड' ची भाषा म्हणजे बागुलांच्या लेखणीच विलक्षण सामर्थ्य आहे. बागुलांचे साहित्यलेखन माणुसकीच्या तत्त्वज्ञानाशी प्रतिबद्ध आहे. कोणतेही अलंकार प्रतिमांचा वापर करताना दिसत नाही, त्यांची भाषा आक्रमक, संपूर्ण विद्रोह. व्यक्त करण्यास लागणाऱ्या ताकदीची भाषा. म्हणून 'सूड' मधील नायिका बंड करतांना दिसते. स्त्रीत्व नाकारताना दिसते व पुरुष होण्याची इच्छा व्यक्त करते म्हणून बंड व नकार यांना पेलणारी व बळ देणारी भाषा बागुलांच्या साहित्यात आहे.

या दोनही कादंबऱ्या यशस्वी झाल्या असून समाज मनामध्ये जागृती व बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य, झोपलेल्याला जागं करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. दोनही कादंबऱ्या, वाङ्‌मयीन कसोटीला तर उतरलेल्याच आहे पण मानवी जीवनमूल्य व नैतिकमूल्यांच्याही कसोटीवर उतरल्या आहे. त्या वाचताना माणसाचे ह्रदय हेलावून जाते व विचार करायला भाग पाडते हे सामर्थ्य त्या कादंबऱ्यांचे आहे.

**निष्कर्ष–**

१) अलीकडे पर्यावरणाचे संतुलन बिघडले याला कारण मानवच आहे.
२) पर्यावरणाशिवाय जीवन नाही आणि स्त्री शिवायही जीवन नाही.

३) स्त्रीने जर स्त्रीजन्म नाकारला तर!

४) 'पर्यावरण' सुरक्षित नाही, 'स्त्री' ही सुरक्षित नाही.

५) सूड ही कादंबरी एका भीषण वास्तवतेचे दर्शन घडविते, तर तहान पाणी टंचाईचे वास्तव चित्रण साकार करते.

६) मूल्यहीन समाज व्यवस्थेत आपली जीवनमूल्ये जोपासणारे व नैतिक मूल्य जोपासणारे माणसं अजूनही आहेत.

७) स्त्री कडे उपभोग्य वस्तू म्हणूनच बघितलं जाते.

८) पुरुषांची वासनावृत्ती बळावते आहे म्हणून अघटित घटना घडत आहे.

९) माणूस हा महान आहे, त्यांच्या हातातील कर्तृत्त्वावर भरोसा आहे. माणूस हाच विश्वाच्या जडणघडणीचा एकमेव कर्ता कमविता आहे. जे काही घडेल ते त्याच्यामुळे, जे काही थांबेल ते त्याच्यामुळे.

* * *

# 'हकिकत आणि जटायू', 'जातवन': या कादंबरीमधील दलित जीवनाचा वेध

– प्रा.केतकी भोसले

१९६० नंतर मुस्लीम आणि दलित साहित्यप्रवाहाला सुरूवात झाली. यात प्रवाहात कादंबरी, कथा, कविता, नाटक, आत्मचरित्र असे वेगवेगळे साहित्यप्रकार उदयाला आले. त्यात कादंबरीनेही मोलाची भर घातली. मुस्लीम आणि दलित साहित्यातील कादंबरीने दलित जीवनाचा घेतलेला वेध मी माझ्या शोधनिबंधातून मांडणार आहे. 'हकिकत आणि जटायू' ही केशव मेश्राम यांची तर 'जातवान' ही राजन खान यांची कादंबरी आहे. या दोन्ही कादंबऱ्या दलिताना सहन कराव्या लागणाऱ्या वेदना, त्यांची जातीय अंगाने होणारी पिळवणूक, दलितानी केलेले धर्मांतर त्या धर्मांतरीत असल्याची वेदना ही 'जातवन' व 'हकिकत आणि जटायू' या दोन्ही कादंबऱ्यामधून मांडलेली आहे.

मराठीतील कादंबरी वाङ्मयप्रकाराची परंपरा दिडशे वर्षाहून अधिक आहे. बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीपासून सुरू झालेला हा वाङ्मयप्रवाह वेगवेगळी वळणे घेत स्थिर होत आहे. सुरूवातीच्या काळात काहीसे रंजनपर आणि सामाजिक आशय हाताळणारी ही कादंबरी गेल्या पन्नास वर्षामध्ये वास्तववादी लेखनाकडे झुकली आहे. विश्राम बेडेकर, बा. सी. मर्ढेकर यांनी कादंबरीच्या रचनातंत्रामध्ये अभिनव प्रयोग केले आहे. ग्रामीण जीवनाच्या चित्रणाबरोबर दलित, आदिवासी, भटके असे समाजघटक कादंबरीतून आपले अस्तित्त्व दाखवू लागले. परंतु मराठी कादंबरीच्या क्षेत्रात मुस्लीम लेखकांचे योगदान अगदीच कमी आहे. १९३० च्या काळातील 'अबला' या अमीन सय्यद यांच्या कादंबरीचा उल्लेख आढळतो. मराठी कादंबरी वाङ्मयात मुस्लीम मराठी कादंबरीचे स्थान सहारा वाळवंटातील 'ओयासिस' सारखे आहे.

केशव मेश्राम यांनी कादंबरी लेखनही केले. त्यांच्या 'हकिकत आणि जटायू' या लघुकादंबरीची पहिली आवृत्ती १९७२ मध्ये प्रकाशित झाली. पी. पी. एच. बुकस्टॉल, मुंबई यांनी प्रकाशित केली. त्यांनी आपल्या समाजातील व्यक्तीचे जीवनदर्शन घडवले आहे? त्यांनी जे भोगले अनुभवले यातूनच त्यांची हकिकत आणि जटायू ही कादंबरी आकाराला आली आहे. दलितांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय व त्यांची जगण्याची वेदना मेश्राम चित्रित करतात.

'हकिकत आणि जटायू' हे एका लघुकांदबरीचे दोन भाग आहेत. मेश्रामांची 'स्व' ची जाणीव यातून प्रतीत होताना दिसते. या कादंबरीच्या प्रस्तावनेत मेश्राम म्हणतात, ''हकिकत जितकी माझी स्वत:ची आहे, तितकीच व्यापक अर्थाने माझ्यासारख्या अनेकांची आहे. जी मुले बालपण वाट्याला येण्याआधीच सटकवली जातात, वस्तीबाहेरच्या किचाड्यात जमेल तसे जगायाला लागतात, चिखल उडवित बेदरकारपणे खेकडे-झिंग्या-बेडके पकडतात आग ओकणाऱ्या सूर्याला नाक खाजवित चिडवितात रंध्रारंध्रातून ठिपणाऱ्या घामाने सूर्य तापता विझवितात, प्रेतापुढे फेकले जाणरे पैसे कोपरे, ढोपरे व घोणे फोडून जमा करतात, त्याच पैशाचे बकाबका चणे-फुटाणे खातात, पाणी ढोसतात मिळेल त्या ठिकाणी कामा जगण्याच्या खुणा जुळवतात, गुन्हेगारीचा श्रीगणेशा काहींना येथूनच न लिहिलेल्या हकिकती अशाचा काहीशा असतील हकिकत मधला मी ह्या सर्व भोगांचा अनुभवी व संवेदक आहे.

'हकिकत' मधील जी माणसे भुजंग मेश्रामांनी चित्रित केलेली आहेत, ती सर्व त्यांच्या रक्ताची आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाले पण दलितांना स्वातंत्र्य मिळाले का? जातीयतेचा जो पडदा आहे तो दूर झालेला आहे का? असा प्रश्न जते निर्माण करतात, जे अनुभवले ते आडपडदा न ठेवता त्यांनी समरसून भडभडून सांगितले आहे हे त्यांचे आत्मपर लेखन आहे. मेश्राम म्हणतात हकिकत नव्वद पेक्षाही अधिक टक्यांनी माझी आहे. त्यात कल्पनेला स्थान जवळजवळ शून्य आहे. दुसऱ्याबद्दल कशाला बोलायचे? आपल्या खरेखर लिहून या सणकेतूलन हकिकत झाली. हकिकत ही मेश्रामांची स्वत: नमूद केल्यामुळे त्यांच्याच दु:खाची, कष्टाची, मिळालेल्या जाणिवेची व जातीयतेची आहे.

'जटायू'मध्ये जातीयतेमुळे दलितांना कसा त्रास सहन करावा लागतो याचे चित्रण आले आहे. महार व मांग या दलित समाजामध्ये महार मांगाना हीन लेखतात अशाच मांग समाजातील मानाने जगू पाहणारा अभिमान या तरुणांची ही कहाणी आहे. त्याच्या स्वप्नांची त्याच्या जीवनाची कशी धुळधाण होते हे यात आले आहे. समूहजीवन चित्रित करण्याच्या घाट जटायूला आहे. जातीयतेमुळे होणारी नायकाची कुचंबणा, हालअपेष्टा, त्याचे दु:ख त्यांनी चित्रित केले आहे.

आत्मपरलेखन मराठी साहित्यात विपुलप्रमाणत आहे पण त्याला उच्चस्वतरीय जन्मजातीची झालर आहे. मेश्रमांचे हे आत्मचरित्रपर लेखन व्यक्तीपर,

आत्मपर आहे. समूहस्पर्शी आहे. अशा दोन स्तरावर आहे. मेश्राम केवळ स्वत:चे जीवन चित्रित करीत नसून दलित जातीचे जीवन चित्रित करतात. या कादंबरीतील स्वीकृत तत्त्वांचा कालपटाचा नवेदनाच्या समजशक्तीचा व सोशीकतेच्या अंतरंगाचा आवाका मांडते. त्यावरून मेश्रमांच्या लेखनाची शक्तीही समजते.

स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकात प्रकाशित झालेली ही कादंबरी दलितांची स्थिती, दलित तरुणांचे होणरे हाल, जातीयता व अंधश्रद्धा यामुळे दिलतांचे उद्ध्वस्त होणारे संसार यांचे चित्र मेश्राम यांचे जिवंत चित्रण करतात. म्हणून दलित वाङ्मयाला या कादंबरीने श्रेष्ठतव प्राप्त झाले आहे.

'जातवान' या कादंबरीमध्ये दलितांच्या धर्मातंराचा प्रश्न हाताळलेला आहे. गावाच्या पातळीवर दलितांवर होणऱ्या अन्यायाचा आणि त्यांचे माणूसपण नाकरणयाचा प्रकार होतो. जीव वाचविण्यासाठी ही माणसं गाव सोडून निघून जातात. वर्षानुवर्षे निर्माण केलेला संसार उघड्यावर सोडून त्यांना जावे लागले आणि त्यांच्या या भयभीत मन:स्थितीत अगतिकतेला आणि हतबलतेला फायदा घेण्यासाठी हेतूने धर्माचे काही ठेकेदार आपल्या स्वार्थासाठी त्यांना मुस्लीम धर्म स्वीकारण्याचा आग्रह करतात. तुम्ही आमचा धर्म स्वीकारा अशी आमिषे दाखवून एका मोठ्या समूहाला मुस्लीम धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जाते. तात्कालिक फायदा पाहून घेतलेला हा निर्णय कालांतराने दूर्दैवी ठरतो. धर्मांतरीत झालेले दलित कोणाचेच राहात नाहीत. दलितांतून गाहेर पडून मुस्लीम धर्म स्वीकारला म्हणून दलित त्यांना आपलेसे करीत नाहीत आणि धर्मांतरीत मुसलमान म्हणून दलित ओहत ही भावना प्रबळ असल्यामुळे मुसलमान त्यांना ज़वळ करीत नाहीत राजन खान उद्ध्वस्त दलितांच्या जीवनाचे आणि मानसिकतेचे दर्शन 'जातवान' या कादंबरीतून घडवितात.

'जातवन' मधील घटना गतिमान आहेत. या घटनांचे चित्रण करताना अशा घटना घडविल्या जातात आणि त्या पाठीमागे विशिष्ट अशी विचारसरणी असते याची जाणीव राजन खान या कादंबरीतून करून देताता.

राजन खान आपल्या कादंबरीतून वर्तमान वस्तुस्थितीचा वेध घेतात. अनेक दलित धर्मांतर करतात ते स्वत:च्या वाटेला आलेले दारिद्रय जातीयता, व्यथा-वेदना नष्ट होतील, मुस्लीमांसारखे जीवन आपल्याला लाभेल, त्यांच्यामध्ये जातीयता नसते, या जाणिवेने. पण वास्तव परिस्थिती त्यांच्या वाटेला निराळी

येते. म्हणून धर्मांतरीत दलितांचा झालेला अपेक्षाभंग राजन खान यांनी आपल्या कादंबरीतून चित्रित केलेला आहे. तर केशव मेश्राम यांनी तत्कालीन दलित जीवनाचा वेध आपल्या कादंबरीतून घेतलेला आहे. भारताला स्वातंष्य मिळाले तरी दलितांना मात्र स्वातंत्र्य मिळालेले नाही. दलितांची उद्ध्वस्तता, पिळवणूक थांबलेली नाही. माणसाच्या मनातून जोपर्यंत 'जात' नावाचे पिशाच्च्य जात नाही तोपर्यंत 'दलित' आणि 'दलितत्त्व' जात नाही असे मेश्राम यांना वाटते. म्हणून राजन खान व केशव मेश्राम या साहित्यिकांनी आपल्या कादंबरीतून दलित जीवनाचा घेतलेला हा परामर्श अनंतकोटीचा म्हणावा लागेल.

* * *

# दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास
## मेलेलं पाणी आणि गोतावळा

–डॉ.विजया पाटील

**प्रास्ताविक :–**

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्याचे अनुभवक्षेत्र, भाषाक्षेत्र विस्तारले. साहित्यविषयक जाणिवांमध्ये काही मूलभूत बदल झाले. मराठी साहित्यविचार अधिक सूक्ष्म झाला. या काळात साहित्यसृष्टीला साहित्यातील सौंदर्याचे व घटकांचे विशेषत्त्वाने भान आले. साहित्याचे केंद्रच बदलले. भारतीय साहित्यात कधीच न आलेल्या बहुसंख्यांक जनसमूहाच्या व्यथा–वेदना, परिघाबाहेरचे दुर्लक्षित, उपेक्षित असे अनुभव साहित्यात येऊ लागले. जीवननिष्ठ, परिवर्तनवादी साहित्य आणि त्यांच्या चळवळी निर्माण होऊ लागल्या. साठोत्तरी काळात मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी असे प्रमुख वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. या साहित्यप्रवाहांनी मराठी साहित्याचे अनुभवविश्व समृद्ध केले.

**दलित आणि ग्रामीण साहित्य:–**

ज्या साठोत्तरी मराठी वाङ्मयप्रवाहांनी मराठी साहित्याला समृद्ध आणि प्रगल्भ केले त्यात दलित आणि ग्रामीण साहित्यप्रवाहांचा वाटा मोलाचा आहे.

दलित साहित्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संगटित व्हा, संघर्ष करा' या मूलमंत्राबरोबरच गौतमबुद्धांच्या 'तुम्हीच तुमचे प्रकाश व्हा' या शिकवणीचा प्रभाव दिसतो. ग्रामीण साहित्यात म. फुल्यांच्या कृषकनिष्ठ चिंतनाचा प्रभाव दिसतो. भाहरेतर, कृषिनिष्ठ, कृषिअधिष्ठित अशा जीवनाचे प्रतिबिंब असणारे सगळेच साहित्य ग्रामीण साहित्याला आपले वाटते. या दोन्ही साहित्यप्रवाहांमध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक या साहित्यप्रकारांचे विपुल लेखन झालेले दिसते. 'कादंबरी' या अनुभवाचे व्यापक रूप चित्रित करणाऱ्या साहित्य प्रकारासंदर्भात दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार केला असता दलित आणि ग्रामीण साहित्यातील वेगळेपणा ठळकपणे लक्षात येऊ शकेल.

१९७० नंतरच्या काळातील दोन दिग्गज साहित्यिकांच्या कादंबऱ्यांची तुलना करून दलित आणि ग्रामीण साहित्याचे वेगळेपण मांडता येईल. दलित

साहित्यातील अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी' आणि ग्रामीण साहित्यातील आनंद यादव यांची 'गोतावळा' या कादंबऱ्यांचा अभ्यास करून विवेचन करता येईल. अशोक व्हटकर यांच्या 'मेलेलं पाणी' या कादंबरीत दलित माणसांच्या जगण्याचे वास्तव चित्रण केलेले आहे. गावाबाहेरचे उपेक्षित जीवन जगणाऱ्या अनेक जमातींपैकी एक असणारी जमात म्हणजे ढोरजमात. चांभारांना कातडी पुरविण्याचे काम ही जमात करते. गावात मेलेले ढोर महार ओढून नेतात त्याचे कातडे ढोर जातीच्या लोकांना पुरवतात. ढोर लोकांचा धंदा म्हणजे जनावरांची कातडी रंगवण्याचा. परंपरेने आलेला हा अत्यंत घाणेरडा धंदा या लोकांना करावा लागतो. घाणीचे काम करावे लागत असल्याने अवतीभवती पसरलेली घाण, चिखल, माशा, डास, दुर्गंधी याचे त्यांना काहीही वाटत नाही. चुन्यात काम करणे धोकेदायक असूनही पोटासाठी ही माणसं अंगावरची कातडी, केस जाळत काम करत असतात. पारंपरिक व्यवसाय, अज्ञानीपणा, दैववादी प्रवृत्ती यामुळे हीनपणाची भावना घेऊन जगत असतात. याचे प्रत्ययकारी चित्रण अशोक व्हटकरांनी केले आहे.

पूर्वजन्मीच्या पापामुळे हीन जातीत जन्माला आलेलो असल्याची जाणीव कायम उराशी बाळगून बिचकून राहणारे ढोर जमातीतले लोक गावातल्या निवडणुकीच्या राजकारणात नाईक–देसाई–जिनगोंडा यांच्या रस्सीखेचेत न अडकता भिवून अलिप्त राहतात. ढोरवाड्याने निवडणुकीवर बहिष्कार घातला ही गोष्ट प्रस्थापितांना अपमानकारक वाटते. या अपमानाचा सूड घेण्यासाठी सरपंच दादाजी नाईक त्यांच्या पोटापाण्याचा स्त्रोत असणाऱ्या ओढ्ययाजवळच्या कातडी धुण्याच्या चुनाड्या गावातल्या लोकांसाठी घातक असल्याचा बनाव करून तालुक्याला तक्रार नोंदवतो. या मग्रूर, मस्तवाल आयुष्याचे कधीही न संपणारे लाखाचे भांडवल असणाऱ्या मराठा समाजाचे बिरुद, या बिरुदाचा वापर करून मिजासीने वागणाऱ्या सरपंच दादाजीचा जुलूम, अन्याय निमूटपणे सहन करतात. जातीच्या कमीपणाने खजील होऊन अत्यंत लाचारीने जीवन जगतात.

स्वातंत्र्य मिळून इतकी वर्ष झालीत तरी, लोकशाही प्रस्थापित झाली असली तरी जातिभेदाच्या, वर्णभेदाच्या, स्पृश्य अस्पृश्यतेच्या भिंती अजूनही खोलवर रुजलेल्या आहेत. प्रस्थापितांकडून हे चालूच आहे. पण स्वतंत्र भारतात जनतेच्या रक्षणासाठी नेमणूक झालेल्या हुकीरेसारख्या पोलीस अधिकाऱ्याकडूनही अशीच अपमानास्पद, तुच्छतेची, सापत्नभावाची वागणूक दिली जाताना दिसते.

अस्पृश्य म्हणवल्या जाणाऱ्या महार, मांग, चांभार, ढोर या जातींमध्ये आपसात उच्च निचतेची भावना अजूनही टिकून असल्याचे दिसते. ढोर स्वत:ला महारांपेक्षा श्रेष्ठ मानताना कादंबरीत दिसून येतात. ढोरा चांभारांना कातडी कमावणे, कातड्याच्या वस्तू बनविणे अशाप्रकारचा व्यवसाय तरी आहे पण म्हारामांगांना तोही नाही. त्यामुळे त्यांची होणारी कुचंबणा व्हटकर हारळ्या महाराच्या निमित्ताने अधोरेखित करताना दिसतात. यल्लापा ढोर कणवेपोटी घासातला घास महारा मांगांना देताना दिसतो. अजूनही गावात ढोरांसाठी वेगळी विहीर आहे. कुणीतरी मेलेले अर्भक ढोरांच्या विहिरीत टाकल्यामुळे पंचनामा होईपर्यंत ढोरांना दैनंदिन वापरासाठी पाणी घेता येत नाही. महारांच्या विहिरीवरूनही ते पाणी घेऊ शकत नाहीत. पाणी म्हणजे जीवन आणि या जीवनाच्या गरजपूर्तीसाठी त्यांना त्रस्त व्हावे लागते. यल्लापा बाळगोंडाच्या विहिरीवरून पिण्यापुरते पाणी घ्यायला जातो तर विहीर बाटवायला आला म्हणून जीव जाईस्तोवर मारहाण करतात. अर्धमेला करतात. स्वतंत्र भारतात आजही अमानुषपणे दिली जाणारी वागणूक पाहून वाचक सुन्न होऊन जातो. प्रस्थापितांचा दुट्टपीपणाही व्हटकरांनी उजेडात आणला आहे. ढोरांचा स्पर्शही न चालणाऱ्या देसायांच्या बाबुरावला ढोराच्या रंजीवर पाशवी अत्याचार करताना आसुरी आनंद मिळतो. कादंबरीतील बापू या शिकून सवरून जातीच्या दलदलीतून बाहेर पडू पाहणाऱ्या तरुणालाही जातीच्या संदर्भाचा फटका बसतोच. मामलेदारच्या परीक्षेत पास होऊनही त्याचे आडनाव, त्याची जात आडवी येते आणि त्याला नोकरी मिळत नाही. त्याची बुद्धिमत्ता, हुशारी सर्व मान्य करूनही त्याने ढोर जमातीत जन्म घेतला आहे म्हणून शेवटी ढोरासारख्या नरक यातना जगत राहणे क्रमप्राप्त असल्याचे जाणवून दिले जाते. म्हणूनच की काय ढोर लोकांना माणसात जमा केले जात नाही. जातिभेद, अस्पृश्यता, मारहाण, हीन राजकारण, दहशत, स्वत:तच फाटाफूट, घाबरट हीनदीन प्रवृत्ती, तथाकथित बड्या जातींची घमेंडी वृत्ती, गरीब ढोरांच्या धंद्यावरचा आघात यांनी सुन्न होणाऱ्या बापूच्या निमित्ताने अशोक व्हटकरांनी एक जळजळीत सत्य शब्दबद्ध केले आहे. धरणाच्या तळाशी साचून राहणाऱ्या 'डेड वॉटर' 'मेलेल्या पाण्या' प्रमाणे समाजमनात साकळलेले जातीपातीचे, स्पृश्य अस्पृश्यतेचे आडमुठे विचार अनेकांची आयुष्ये उद्ध्वस्त करत असतात. हे सत्य एका यल्लापा ढोर, त्याचे कुटुंब आणि त्याची जमात यांच्या वेदना चित्रित करून अशोक व्हटकर यांनी शब्दांकित केले आहे. त्या निमित्ताने माणसामाणसातील नात्यांचा अनेकपदरी

शोध त्यांनी घेतला आहे. बापूसारखा या जमातीतला शिकून माणूसपणाची जाणीव झालेला तरुण याविरुद्ध आवाज उठवतो. नव्या विचारांनी झपाटून आपल्या जमातीतील मेलेल्या मनांना जाग करू पाहतो. पण त्याची सर्व बाबतीत निराशा होते. त्याचे हात अपुरे पडतात. बापूसारखे सुशिक्षित, विचारी, माणूसपणाची जाणीव झालेले उमदे हात हीच या जमातीची गरज आहे याची भेदक जाणीव या कादंबरीतून सर्वांनाच व्हटकरांनी करून मराठी ग्रामीण कादंबरीला नवे परिमाण प्राप्त करवून देणारी आनंद यादव यांची 'गोतावळा' ही अनेक अर्थांनी गाजलेली लक्षणीय अशी ग्रामीण कादंबरी आहे. कृषिसंस्कृतीवरील यंत्रसंस्कृतीचे आक्रमण हा विषय तरल संवेदनशीलतेने आनंद यादवांनी साकारला आहे. कोल्हापूर-कागल परिसरातील एका खेडेगावात सालगडी म्हणून शेतकाम करणाऱ्या नारबाची ही आत्मकथा आहे. शेतीवरती यांत्रिकीकरणाचा जो परिणाम झाला त्यामुळे जुन्या संस्कृतीतील मूल्य हरवत जाऊन माणसा-माणसातील संबंध दुणावले आणि रुक्ष व्यवहाराकडे व्यवस्था झुकू लागली. याचे संवेदनशील चित्र यादवांनी रेखाटले आहे. मराठी माती आणि संस्कृती याचे खोलवर ठसे या कादंबरीतून व्यक्त होतात. शेतातल्या मातीत अव्याहत राबणारा माणूस ज्याच्यासाठी शेतजमिन हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे असा माणूस शेतमजूर हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. बदलणाऱ्या वास्तवाचे चित्र अत्यंत संयत आणि नेमकेपणाने व्यक्त झालेले आहे.

एखाद्या पैलूदार हिऱ्याकडे पाहताना जशा विविध छटा दिसतात तशा गोतावळामधून जीवनाच्या विविधांगी छटा प्रत्ययाला येतात. प्राणीसृष्टीचे अनोखे दर्शन घडवतानाच ते यंत्रसंस्कृतीचे शुद्ध ग्रामीण जीवनावर आलेले सावट दाखवितात. दिवसातील विविध रंग, ऋतुचक्र जेवढ्या सहजपणे येते तेवढ्याच सहजतेने क्षुधा आणि काम या आदिम प्रेरणांवर प्रकाश टाकलेला दिसतो. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून नारबाच्या मनातली खळबळ मांडली आहे. शेतमजूर हा या कादंबरीचा नायक चित्रित करून यादवांनी सर्वसामान्य, दुर्लक्षित, उपेक्षित माणसाला नायकाच्या स्थानी आणले आहे. शेतमळ्यात रात्रंदिवस थांबून कष्ट करणारा नारबा हा शेतमजूर त्याचे जीवन कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. ऋतुचक्रानुसार वर्षभर चालणारी शेतीच्या कष्टाची कामे बदलत जातात. त्याबरोबर निसर्गाची रूपेही बदलत जातात. शेतमजूर स्वत:ला शेतीच्या कामांमध्ये कसा झोकून देतो. हे नारबाच्या रूपाने दाखवले आहे. आईबापाविना पोरका असलेला

पोर रामू सोनवडेच्या शेतात कामाला म्हणून राहतो. चार वर्षात नारबाचे लग्न लावून देतो म्हणणारा रामू दिलेला शब्द पाळत नाही. लग्न करून दिले तर नारबा मन लावून झोकून देऊन काम करणार नाही या स्वार्थापोटी नारबाचे लग्न लावून देत नाही. त्याची फसवणूक करतो. जिव्हाळ्याने शेतावर प्रेम करून राबून वीस वर्ष नारबा कष्टाची कामे करतो हाडाची काडं करतो. गुराढोरांबरोबर तोही एक ढोर होऊन जातो. पण तो आपले माणूसपण विसरू शकत नाही. माणूस म्हणून तो एकटा पडत जातो. त्यातूनच तो आपल्याभोवती आपली सहवासाची गरज भागविण्यासाठी गुराढोरांचा, पशुपक्ष्यांचा निसर्गातल्या विविध मानवरहित घटकांचा गोतावळा निर्माण करत जातो. त्या गोतावळ्याशी भावनिकदृष्ट्या इतका एकरूप होतो की, माणसापेक्षा त्याला तेच अधिक जवळचे वाटतात. स्वार्थी रामू सोनवडेकडून नारबाचा फक्त वापर करून घेतला जातो. आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि लैंगिक अशा अनेक अंगांनी नारबाचे शोषण होताना दिसते. त्याच्या घामाची, कष्टाची, माणूसपणाची योग्य कदर केली जात नाही. तो फक्त जगत असतो. आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी ट्रॅक्टर आणायचा म्हणून मालकाच्यादृष्टीने नारबाची आणि त्याच्या गोतावळ्याची गरज संपते. जसजसा गोतावळा नष्ट होत जातो तसतसा नारबाही उद्ध्वस्त होत जातो. नारबाने निर्माण केलेले विश्व उपयोगितावादी यंत्रसंस्कृतीच्या आगमनामुळे क्रमाक्रमाने उद्ध्वस्त होत जाते. एक एक करून नारबाचे सर्व भावबंधच जणू तुटत जातात. हे उद्ध्वस्त होणे एका परीने नारबाचे असते तसे ते कृषिसंस्कृतीचेही असते. नारबाची ही कथा म्हणजे कृषिसंस्कृतीच्या पराभवाची कथा आहे असे चंद्रकांत बांदिवडेकरांनी म्हटले आहे ते समर्पक आहे. एकप्रकारे प्रातिनिधिक रूपात शेतमजुराचे अस्तित्वच धोक्यात येते. पारंपरिक दृष्टीने चालत आलेला शेती व्यवसाय संपतो. व्यवहारवाद प्रभावी ठरतो. शेतमजुराच्या शोकांतिकेबरोबर दीर्घकालीन पारंपरिक शेतीचा ऱ्हासही कादंबरीतून व्यक्त होतो. स्वातंत्र्य मिळाले तरी शेतमजुरांचे दुःख संपलेले नाही. त्यांना स्वातंत्र्याच्या मुक्त वातावरणात सोयी, सवलती मिळून त्यांच्या विकासासाठी संधी उपलब्ध व्हायला हव्यात. त्याऐवजी अजूनही ही वेठबिगारी सुरू आहे ही गोष्ट भयाण करणारी आणि विचार करायला भाग पाडणारी आहे. स्वातंत्र्य, लोकशाही या संकल्पना गावीही नसणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांचे दैन्य, दुःख आणि दारिद्र्य यांचे हृदयद्रावक चित्र आनंद यादवांनी प्रभावीपणे चित्रित केले आहे.

वरील दोन्ही प्रवाहातील कादंबऱ्यांमधून जीवनाच्या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रकाश टाकलेला दिसतो. दोन्ही कादंबऱ्यांचा विषय माणूस, माणसाचे माणूसपण हा दिसतो. ज्याकडे लक्ष दिले जात नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर परिस्थिती बदलेल अशी अपेक्षा होती. पण अजूनही पिढ्यापिढ्यांचे मनावरील संस्कार पुसले जात नाहीत आणि माणसाला माणूस म्हणून वागविले जात नाही. स्वार्थापायी मानवतेला पायदळी तुडवले जात आहे. तळागाळातल्या दुःखाने पिचलेल्या माणसाचे जीवन, त्याचे दुःख, वेदना, समस्या साहित्याचे विषय बनले आहेत. मोठ्या संख्येने असणाऱ्या या पिडितांचे दुःख, दैन्य जगासमोर आणले गेले असून त्यासंबंधी विचार करायला भाग पाडण्याचे सामर्थ्य या कादंबऱ्यांमध्ये आहे.

* * *

# “झाडाझडती आणि अस्वस्थनायक तुलना”

– प्रा.लता पवार

विश्वास पाटील यांची ग्रामीण कादंबरी 'झाडाझडती' आशय वाघेठाण तालुक्यातील जांभळी बुद्रुक हे वाघजाई नदीकाठी वसलेले गाव. बाळू बापू नावाच्या दोन डोंगरांच्या खोऱ्यात जांभळी खुर्द, विबेवाडी, कातोडवाडी, फणसावडं, इरळेवाडी, साजुली अशी छोटी छोटी अनेक गावे वसलेली. निसर्गरम्य परिसर नदीकाठची समृद्ध शेती, शेतीच्या आधाराने जगणारी पुष्ट जनावरे. या गावाला लाडूबा नावाचा देवाचा डोंगर आहे. काळुबाई नावाची ग्रामदेवता आहे. ग्रामस्थांची त्यांच्यावर गाढ श्रद्धा आहे. एकदा देवी गावच्या गुरवाच्या स्वप्नात आली व तिने दृष्टांत दिला. सर्वांनी माझ्या घर बांधले मी मात्र उन्हापावसात तुमचं रक्षण करते. माझं मंदिर बांधा परंतु ते एका रात्रीत पुरं करा नाहीतर तुमचं गाव बुडेल मंदिर बांधायला लागणारा दगड लाकूडफाटा त्याच रात्री दिवस बुडल्यावर जमा करायचा होता. काही लोक नको नको म्हणत असताना सर्वांनी मिळून मंदिर बांधले मात्र थोडी कौलं पसरायची राहिली आणि सुर्य उगवला. आता गाव बुडणार या धसकीने ग्रामस्थ भयभीत झाले.

काही वर्षांनी वाघजाई नदीवर धरण बांधण्याची योजना मंजूर झाली. जांभळी बुद्रुक व आजबाजूच्या सर्व गावांना तेथून हाकललं गेलं, त्यांची घरं पाडली उभी पिकं नांगरली लोकांनी प्रचंड विरोध केला. काहीनी जीवही दिला. परंतु शासनाच्या ताकदीपुढे त्यांचे काही चालले नाही. नाईलाजाने गाईगुरं मातीमोल भावाने विकली. संसाराची बोचकी वाहण्यासाठी वाट पाहून पाहून एखादी गाडी मिळे त्यामुळे निघालेला लाकूडफाटा मध्यस्थांनीच लुटून नेला. डोळयासमोर सगळं भुईसपाट झालं. त्याच्या मोबदल्यात किरकोळ रकमा मिळाल्या ते घेण्यासाठीही हजार चकरा, दिवस दिवस तिष्टत बसावे लागे. नियमात बसणाऱ्यांना वेगवेगळया ठिकाणी थोडी थोडी जमीन मिळाली त्यामुळे गाव विस्कळित झाले. मिळणारी जमीन गावकुसाबाहेरची खडकाळ बरड होती. कागदोपत्री मिळाली तरी मूळ वहिवाटदार आणि बाजूचे जमीनवाले डुख धरुन हाकलायला टपलेले. बायकामुलं सामानाचं बोचकं घेऊन उघड्यावर बसलेल्या यांना घरं बांधायला लाकूडफाटा नाही. मुलांना शाळा नाही, पिण्याचे पाणी

नाही, सार्वजनिक विधीला जागा नाही. मुल मेले तर पुरायला जागा नाही. म्हातारे मेल्यावर जाळायला स्मशान नाही. स्थानिक रहिवासी म्हणून कुठे नोंद नाही. उपरे म्हणून कोणी सोयरिक करायला धजत नाही. इतर कागदपत्र नाहीत म्हणून नोकरीही मिळत नाही. उपरे आपल्या गावात नको म्हणून प्रत्येक गावातील लोकं यांना हुसकून लावण्यासाठी प्रयत्नशील. नवीन ग्रामपंचातीत नोंदी करणे, दाखले घेणे, मोबदला मागणे, नवे रेशनकार्ड, जमीन कागदपत्र इ.साठी तलाठ्याची वाट पाहणे, मध्यस्थी दलाल आणि गावगुंड यांच्या पाळतीवरच सहकारी विलंब आणि भ्रष्टाचाराने बरबटलेल्या व्यवस्थेपुढे भीक मागताना उघड्यावर राहिलेल्या तरुण मुली सुनांची चिंता, रोजची चूल पेटण्यासाठी, सधन घरातील स्त्रियांनाही आता मजूरी शोधावी लागत होती. कागदोपत्री तर याच्या जमीनीचा लाभ वाटप, अंगठे उठवणारे गोंधळून गपगार झालेले. ज्या ग्रामदेवतेवर गाढ विश्वास होता तीही पाण्याखाली गेली होती. देशाच्या विकासासाठी ज्यांच्या जमिनी हिसकावून घेतल्या त्यांच्या घरादारावरुन नांगर फिरवला अशी माणसे तळहातावर जीव घेऊन काळाशी झुंज देत चिवटपणे जगत राहतात. त्यांच्या जगण्यामरण्याच्या संघर्षाची ही कहाणी म्हणजे ''झाडाझडती''.

मुळात झाड हे दुःखाचं प्रतिक. झाडाझडती म्हणजे झाडांनी दिलेली झडती, पूर्वजन्मीची पापे या जन्मी फेडणे. खेडयात झाडं धरणे याचा अर्थ भूताने वा अज्ञात शक्तीने झपाटणे, न संपणरे दुःख देणे. अशा न संपणाऱ्या दुःखाची ही कहाणी म्हणजे झाडाझडती. या ग्रामीण कादंबरीतून धरणग्रस्तांच्या समस्यांचा वेध घेतलेला आहे. या कादंबरीचा कोणी एक व्यक्ती/नायक नाही. तर संपूर्ण गावच सर्व जातीधर्म स्त्री–पुरुष, पशूपक्षी, प्राणी, झाडंझुडपे, दगडमाती, पाणी यासह आपापल्या ठिकाणी नायकत्त्व करीत आहे. कारण या सगळयाचे दुःखभोगसारखे आहेत. त्यांच्या उद्ध्वस्ततेच्या भावना त्यांचा संघर्ष बिंदू समान आहे. देशाचा विकास होण्यासाठी धरण बांधले त्यात यांच्या जीवनाची आहुती दिली जाते. हे धरणग्रस्त प्रतिकात्मक आहे. यंत्रयुगामध्ये देशाचा विकास करताना अशा शेकडो गावांना वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या कारणांनी विस्थापित व्हावे लागले. त्या सगळयांच्या समस्यांचे प्रातिनिधिक स्वरुप म्हणजे ही ''झाडाझडती''.

आगतिक झालेल्या कष्टाळू नितीमान परंतु अडाणी सामान्य माणसांची त्यांना संपवू पाहणाऱ्या अधिकार धुंद माणसाशी चालणारी ही एकांगी एकाकी

झुंज आहे. अधिकारशाही, भ्रष्ट राजसत्ता गुंडगिरी वापरुन निसर्गाला हवे तसे वापरायला निघालेली माणसांची बकासुरीवृत्तीचे दर्शन यातून घडते. स्वार्थापोटी माणूस त्याच्या नकळत मानवी मूल्यांना तिलांजली देतो. या कांदबरीमधून माणसांच्या उपजत वृत्ती, प्रवृत्तींची विकृतीचे दर्शन घडते.

निसर्गाशी एकाग्र होवून जगणाऱ्या निसर्ग आणि भूमिपूत्रांचे जग यंत्रयुग कसे उद्ध्वस्त करीत आहे. विकासाच्या नावाखाली हळूहळू पण निश्चितपणे माणसाचे जग भकास होत चालले आहे. हे सगळ्यांच्या बाबतीत घडत आहे. घडणार आहे. फरक फक्त आधी जात्यातले नंतर सुपातले एवढाच राहील.

घट्ट रुजलेली जुनी मूल्य व्यवस्था मोडीत काढून नवी व्यवस्था रुजवताना अनेकांचे बळी जात आहेत याचे कोणाला सोईरसुतक नाही. विश्वास पाटलांनी सूक्ष्म पातळीवरुन त्याची दखल घेतलेली आहे. या कांदबरीतील वातावरण संपूर्णता ग्रामीण आहे. कांदबरीत धरणग्रस्तांच्या समस्येचे केंद्र बिंदू असले तरी निसर्गापासून विस्थापित झालेल्या माणसांच्या दुःख भोगाचे दर्शन समांतरपणे घडत राहते. बाह्य संकटांशी झुंजता झुंजता या लोकांतील आपआपसातील नातेसंबंधावर त्याचा परिणाम होतो. कधी ती एकमेकांच्या भेटीसाठी, कोणाच्या अंतीम इच्छापूर्तीसाठी व्याकूळ होतात तर कधी एकमेकांपासून दुरावतात. आजार रोगराईने मृत्यूमुखी पडतात अशाप्रसंगी त्यांची आतली माया अधिक दृढ होताना दिसून येते. उदा. आवडाबाई व तिला सख्या भावासारखे सहकार्य करणारा तिचा मावसभाऊ सुभानजी यांच्या नातेव्यवहारातील मानवता.

माणसातील स्वार्थी वृत्ती वाढत गेली, ती पिढयान् पिढया चालत आलेल्या व्यवहार मूल्यांना क्षणात नाहीसे करून कसे राक्षसी रुप धारण करते त्याचे दर्शन गोईंदा तुका या दोन भावांचा चुलता श्रीपती याच्या रुपातून दिसते. तसेच श्रीपतीचा मुलगा लाला जाधवच्या वृत्तीतूनही दिसते. मिळालेल्या जमीनीवर राबवून पिक काढू पाहणाऱ्या हैबतीला त्याच्या जनावरासह ठार मारणाऱ्या धोंडीरामाच्या कृतीतून दिसते.

मानवी जीवनातील कोणत्याही प्रकारच्या संघर्षात स्त्रीची इज्जत लुटणे, बाई म्हणून तिला कोंढीत पकडणे वेगवेगळया पद्धतीने वेगवेगळया पातळीवर तिचे शोषण करणे हा जणू निसर्ग नियमच झाला आहे. मग ती दलित स्त्री असो वा सवर्ण. झाडाझडतीमध्ये दोन मुलांची आई असलेल्या शेवंतीची गावगुंड संधी साधून इज्जत लुटतात. (तर मंजिरीसारखी हेच सारे राजीखुशीने करते) किंबहुना

पुरुषप्रधान व्यवस्था ते करवून घेते. धरणग्रस्तांचे नेतृत्त्व करणाऱ्या खैरमोडे मास्तरांना सतत संकटांचा सामना करावा लागतो. या कादंबरीतील खैरमोडे मास्तर कोयना परिसरातील धरणग्रस्तांच्या शाळेवरुनच बदलून आलेले त्यामुळे त्यांना समस्यांची पाळमुळं माहीती. या माणूसकी असलेल्या विचारी व तळमळीच्या माणसाला प्रशासकीय अधिकारी दलाल, गुंड, आमदार, खासदार, सरपंच सर्वांचा झाडून विरोध. देशमुख साहेबरावसारखा माणूसकी असलेला एकमेव कलेक्टर त्यांना सहकार्य करतो. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी धरणग्रस्थांची कसे वागावे याचा जणू आदर्श नमूनाच पाहायला मिळतो. परंतु त्यांची उचलबांगडी होते आणि धरणग्रस्तांच्या पालवलेल्या आशा धुळीला मिळतात.

दलितांमध्ये भटके विमुक्त आदिवासी या जशा जाती आहेत. तशीच धरणग्रस्त विस्थापीतांची ही एक नवीन जात तयार झाली आहे. त्यांना शीव नाही म्हणून संस्कृती नाही ते उपरे म्हणून त्यांच्या सुख-दुःखाबद्दल कोणाला देणे घेणे नाही. त्यांच्या जमीनीवर धरण उभे राहीले. तरी धरणाच्या लाभ क्षेत्रातील लोक त्यांना हुसकून लावण्यासाठी झटतात. अशाप्रकारे ते सर्वत्र कायम शोषित होत राहतात. येथे दलितांच्या आणि या शोषितांच्या दुःखाचे स्वरूप सारखेच असल्याचे दिसून येते.

**कांदबरीची भाषा :-**

त्या परिसरातील ग्रामीण बोली आहे जी त्यांच्या जगण्याची आणि जीवनाभिव्यक्तीची वाहक आहे. त्यातील शब्दप्रतिमा म्हणी वास्तवाचे दर्शन घडवतात. उदा. व्यक्तीची नावे, आवडाई, बनूबाई, नकुसा, रुपा, मंजी, शेवंता, कंठाबाई, हिरा, मास्तरीण, फुला, सुभान, गुणवंता, हैबती, श्रीपती, दिगूअण्णा, कुशापा, सावळेराम वशा भोसला, खैरमोडे गुरुजी, शिंगाडे, बाबेराव, झांजडवाडकर, गोम्या, कोळी, बंडू न्हावी, शिवा चांभार, ज्ञानू शिंपी इ.

**प्रतिमा :-**

हाल्यासारखा भरलेला गुबगुबीत, चिपाडासारखे गाल, बारीक डोकं, आणि फेंदरं नाक, रंग हाल्यासारखचं तुकतुकीत, गावचं काळीज धाकधूक करीत होत. ब्यां ब्यां करीत शेरडं डोंगरावरुन शेपट्या उडवीत धावत येत होती. बदा बदा गळणारा पाऊस, रगतभात, गाववैरी, गठूळ, फिसफिस, खलाटी

फेसाटी, मसणमाळ, हाटवटी, बुकाणा, मुस्काट, धडपा, मूठभर गांव आणि करंगळी एवढा त्यो मास्तर,इ.

म्हणी :–

आधी धरण मगचं मरण, उतरा नि भात खाईना कुतरा, उघड्यापाशी नागडं गेलं आणि रातभर थंडीनं मेलं. शिप्यांला दोरा घिसाडयाला ऐरण, चांभाराला आरी तसा शेतकऱ्याला बैल, वीज कोयनेला, समृद्धी महाराष्ट्राला, आणि भिकेची थाळी धरणग्रस्तांना, उपरं ते उपरं भुकतयं कुतरं, आये कवासा आलास, रातचा आलू, आमी येऊ वंगाळ झालं, पत्या न्हाय असा घाईवर येवू नगं रं पूता। रान धुंडाळलं अशी ग्रामीण बोली हे ग्रामीण कांदबरीचे वैशिष्ट्य या कांदबरीतील लाडूबाचा डोंगर, बाळू बापूचा डोंगर, काळुबाईचा दृष्टांत, करड्या पखाची कोंबडी हे ग्रामीण माणसाती अंधश्रद्धा आणि पारंपारिक आदिबंध स्पष्ट करतात.

अस्वस्थ नायक(उत्तम कांबळे) ही दलित कादंबरी आहे. या कादंबरीचा नायक प्रशांत देसाई हा खुल्या प्रवर्गातला आहे. याच्या वडिलांनी होतं नव्हतं ते शेत विकून त्याच डी.एड. च शिक्षण पूर्ण केले. प्रशांत नोकरीसाठी शहरात येतो. मित्राने भाड्याने घेतलेल्या मोडकळीच्या खोलीत राहतो. ठिकठिकाणी अर्ज करूनही कुठेच नोकरी मिळत नाही. तेव्हा तो प्रत्येक दुकान, ऑफीस, शाळा, समाजसेवी संस्था ते अगदी दारुच्या अड्ड्यावरही नोकरीसाठी प्रयत्न करतो. नोकरीसाठी फिरत असताना त्याला कोणीच थारा देत नाही. तो कोणतेही काम करायला तयार असतो परंतु नोकरी मिळत नाही. शहरातील माणूसकी शून्य व व्यवहार, भ्रष्टाचार, स्वार्थ लोलुपता गुंडशाही, राजकारण, धर्मकारण, या साऱ्यांचा प्रशांतला नव्याने परिचय होत जातो. आदर्श मुठीत घेऊन चालणारा प्रशांत घडणाऱ्या घटना संदर्भात स्वतःशीच अखंड बोलत राहतो. शिपाई कंपाऊंडर, जुगार, मटका, दारुचा अड्डा अशा ठिकाणीही नोकऱ्या करतो. भाकरी ते नोकरीच्या चक्रात भरकटताना त्याला अतिशय विदारक अनुभव येतात. डॉक्टरांनी प्रेमात फसवलेली नर्स त्याला भेटते. स्वतःची वासना शमविण्यासाठी त्याला नादी लावणारी विधवा भेटते. तेथून निसटल्यावर दंगलीत सापडून पोलीसांचा मार खातो, शेवटी स्मशानातला नैवेद्य खाऊन पोटाची आग विझवतो. प्रौढ साक्षरता वर्ग चालवण्याचा प्रयत्न करतो. संप, मोर्चे, निदर्शणे करणाऱ्यामध्ये सामील

होतो. प्रशांत सतत मनाशी बोलत राहतो. त्यात नितिमूल्यांच्या ऱ्हासाची चिंता आहे. यांत्रिकीकरण चंगळवाद, भांडवलशाहीचा विकृत विकास, माणसावर मात करण्यासाठी संगणकाचे झालेले प्रयत्न, माणसे तोडण्यासाठी पुढे येऊ पाहणारा धर्मांधपणा, दारिद्र्य, भूक, भ्रष्टाचार, पिळवूणक, असुरक्षितता, भय अशा अनेक प्रकारच्या कातरीत अडकलेल्या माणसांचा प्रतिनिधी म्हणजे प्रशांत देसाई. शेवटी फिरत फिरत तो एका दुर्गम खेड्यात पोहचतो जिथे शाळा आहे पण शिक्षण नाय. तिथे जावून प्रशांत त्या मुलांना शिकवितो. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, पर्यावरणाचा वेध घेणारी ही कादंबरी आहे. माणूस आणि त्याच्या भावना व त्याला मिळणारी उपेक्षिताची वागणूक मन हेलावून टाकणारी आहे. या कांदबरीतील प्रशांत देसाई ची समस्या व त्याला येणारे अनुभव धरणग्रस्तांच्या अनुभवाशी मिळते जुळते आहेत. दोघांकडे जग उपेक्षेच्या नजरेने पाहताना आढळून येते. सतत असुरक्षिततेच्या दबाबाखाली राहणारा प्रशांतही भाकरीसाठी भटकतच राहतो.

या कादंबरीतील प्रशांत हा आजच्या सर्वसामान्य तरुणांचा प्रतिनिधी आहे. बदलत्या परिस्थितीत सर्वत्र स्वार्थी वृत्ती, सुखलोलुपता यामुळे भ्रष्टाचार बोकाळला आहे. नुसतं शिक्षण घेऊन नोकरी लागत नाही. तुमच्याकडे कर्तृत्त्व असलं तरी कोणी नोकरी देत नाही. कोणतेही काम करायची प्रशांतची तयारी आहे. अगदी मजूर, भंगी इत्यादी परंतु ते मिळत नाही. ज्या मित्राच्या खोलीत प्रशांत थांबतो तिथेही डास, ढेकणांची चढाओढ. त्यात घरमालक घरभाडे मागतो. प्रशांतकडे कशालाच पैसे नाहीत. वणवण करून पाय दुखतात. मालक खोली सोडायला सांगतो. या कांदबरीतील नायकाची आई वारलेली आहे. मित्राकडे राहून तो दंगलीतील पोलीसांचा मार खातो. प्रशांतला धरणग्रस्तासारखेच मानवाच्या वृत्ती प्रवृत्तीचे दर्शन घडते. निवेदनाच्या प्रथमपुरुषी, द्वितीय पुरुषी अशा पद्धती वापरलेल्या आहेत. नायक शिक्षकाचे शिक्षण घेतलेला आहे. त्यामुळे भाषा बोलीच्या जवळ जाणारी नागर भाषा आहे. नायकाच्या चिंतनपर स्वगतातून समाजातील इतरांच्या समस्येचे स्वरुप उघड होते. माणसाच्या स्वार्थी वृत्तीतून सहानुभूती शून्य वागण्यातून दुःख निर्माण होते. माणसाबद्दल प्रशांत म्हणतो "असहाय्य आणि भुकेल्या माणसांचा गैरफायदा घेऊन तो जोपर्यंत दुसऱ्यावर वासनेच्या काटेरी पांघरुन घालायचं थांबणार नाही. त्याला माणूस म्हणू नये. पोटात भूक असताना शाब्दिक तत्त्वज्ञान कामाचं नसतं". एकेठिकाणी

पंतप्रधानांचे भाषण चालू असते त्यात राष्ट्र उभारणीसाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा असे म्हणतात तेव्हा प्रशांत मनातल्या मनात म्हणतो आमच्या पोटातील आतड्यांची वळवळ पंतप्रधानांला दिसली असती तर. शिक्षण घेऊनही प्रशांत अस्वस्थ आहे. पोटासाठी वणवण फिरतो आहे. परंतु कुठेच थारा मिळत नाही. जातीची सवलतही नाही. या नायकाच्या माध्यमातून बदलल्या पर्यावरणात सगळयांचे जिवन कसे अधांतरी झाले आहे. याचे चित्रण येते. प्रशांतच्या स्वगतातून समाजातील अनेकानेक समस्यांची मालिकाच पुढे येत राहते. उदा. आज बेकार कुत्र्यासारखं आयुष्य जगत आहेत. बेकारीमुळं तरुणांची प्रतिष्ठा संपली, काहींनी आत्महत्या केली. काहींची लग्न होत नाहीत. काही गुन्हेगारी मार्गाकडं तर काही व्यसनाकडं वळत आहेत. या राखीव जागांनी आमचे पंख कापले आहेत. आमची उमेद हिरावून घेतली आहे. एकीकडं मी बेकार दुसरीकडं बाप निवृत्त. आमच्या साऱ्या कुटुंबालाच उपाशी मरावं लागेल. अशा तऱ्हेने ग्रामीण आणि दलित या दोनही कादंबऱ्यामधून उपेक्षित वंचितांचे दुःख आलेले आहे. या दोन्ही कादंबऱ्यामधून माणसाच्या दुःखभोगाचे दर्शन घडवणे हा समान धागा आलेला आहे. ग्रामीण किंवा दलित दोन्हीकडे संघर्षकाळात किंवा एरवीही स्त्रीवरील अत्याचार आहेतच. धरणग्रस्त ही नवीनच जात तयार झाली आहे. या सर्व जातीधर्माचे लोक मोडतात. दोन्ही कादंबऱ्यामधून आलेली सामाजिक परिस्थिती थोड्याफार फरकाने वेगळी असली तरी सारखेच आहे. दिवसेदिवस आपत्ती आल्यावर माणसातल्या वृत्ती प्रवृत्तींचे घडणारे दर्शन माणसातील संवेदना नष्ट होत असल्याचे, माणसातील माणूसपण हरवत चालल्याचे स्वार्थी वृत्ती, भ्रष्ट वृत्ती बोकळत चालल्याचे साहित्यकृतीतून दिसून येते. दलित कांदबरीमधून जसे गाव कुसाबाहेरचे जग आहे. त्यांचे शोषण करणाऱ्यांचा जातीवर्ण व्यवस्थेचे जाळे आहे. तसेच सर्व जातीत सामावलेल्या भ्रष्टाचाऱ्यांचे दलालांचे, मग्रूर प्रशासकीय अधिकाऱ्यांचे, वासनांधाचे जाळे ग्रामीणतेतही आहे. दोन्ही कादंबरीतील दुःखभोग मानवाच्या संकुचित वृत्तीतून त्याच्या स्वार्थपर विकृतीतून निर्माण झालेले आहेत. एकाची हावरट विकृत वृत्ती, दुसऱ्याच्या दुःखाला कारण होते. दोन्ही कांदबऱ्यामधून आलेल्या भाऊबंदकी, नाते संबंधाचे स्वरूप, माणसाच्या इच्छा आकांक्षा प्रेम इ. चे स्वरुपचे थोड्याफार फरकाने स्वाभाविक प्रवृत्तीचे आहे.

आज दलितांना कायदयाने हक्काच्या काही सवलती उपलब्ध झालेल्या आहेत. उदा. मोफत शिक्षण, विद्यावेतन, नोकरीतील राखीव जागा इ. ग्रामीण भागात काही सवर्ण कठीण दारिद्र्यात पिचत आहेत. मात्र त्यांना सवलती नाहीत त्यामुळे त्यांची सगळयाबाजूने कोंडी होते.

ग्रामीण कादंबरीतून नैसर्गिक आपत्ती, दारिद्र्य, कष्ट, उपासमार या गोष्टीमुळे विशेषतः शेतकरी किंवा मजूर वर्गाचे हीन दीन जीवनदर्शन घडते. दलित आणि ग्रामीण दोन्ही कादंबरीतील माणसांना आर्थिक दारिद्र्यामुळे दुःखाला तोंड द्यावे लागते. त्याचबरोबर अडाणीपणा, आळस, नाकर्तेपण, व्यसन, अंधश्रद्धा या गोष्टीही त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरताना दिसून येतात.

दोन्ही साहित्यिकांना माणसातील माणूसपण महत्त्वाचे वाटते. त्यांच्या दुःखाला वाचा फोडणे महत्त्वाचे वाटते. दोन्ही साहित्यिकांनी सामान्यतला सामान्य माणूस साहित्याच्या केंद्रस्थानी आणला. त्याच्या मूक भावनांना वाचा फोडली म्हणूनच परंपरेपेक्षा वेगळ्या अंगाने जाणारे ग्रामीण दलित साहित्य मानवमुक्तीसाठी दुःखमुक्तीसाठी प्रयत्न करणारे साहित्य आहे. असे असले तरी दोघांच्या दुःखाच्या कारणामध्ये मूलगघही फरक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची दलितमुक्ती चळवळ हे दलित साहित्याची प्रेरणा आहे तर महात्मा फुलेंचे विचार हे ग्रामीण साहित्यलेखनामागची प्रेरणा आहे. दोन्ही साहित्यप्रकारांचे लेखन सामाजिक बांधिलकीतून होताना दिसून येते. त्यातून एक सलग अर्थपूर्ण विश्व निर्माण झालेले आहे. या कादंबऱ्यामधून लेखकाच्या जिवनाविषयक दृष्टिकोन स्पष्ट झालेला आहे. येथे गृहीत धरलेल्या दोन्ही कांदबऱ्यामधून समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र आणि तत्वज्ञानाचेही दर्शन घडते. त्यामुळे या ज्ञानशाखांच्या आधारे या दोन्ही कादंबऱ्याचा अभ्यास करता येवू शकतो. दोन्ही कादंबऱ्यामधून बहुकेंद्री अनुभवाला एकजीनसी स्वरुप प्राप्त झालेले आहे. दोन्ही कादंबऱ्यांचे शीर्षके आशयाशी नाते सांगणारी आहेत. दोन्ही कांदबऱ्याचे लेखक व्यापक समाजामध्ये प्रतिष्ठित प्रसिद्ध आणि जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहेत.

* * *

# २००० नंतरच्या ग्रामीण व दलित कांदबरीतील नायकांच्या संघर्षाचे चित्रण (बारोमास व राघववेळ)

– प्रा.मीरा देठे

**प्रस्तावना :**

१९६० नंतर मराठी साहित्य प्रवाहात सर्व सामान्य माणसांच्या जीवनाचे समस्यांचे दुःखाचे चित्रण करणारा दलित साहित्य व ग्रामीण साहित्य प्रवाह दाखल झाला.येथून पुढे खऱ्या अर्थाने ग्रामीण कांदबरी लेखनाला सुरुवात झाली असे असले तरी म.फुले यांनी शेतकऱ्यांचे दुःख–दैन्य 'शेतकऱ्यांचा असूड' (१८८३) या ग्रंथातून मांडले आहे. थोडक्यात ग्रामीण जीवनचित्रणाचा स्पर्श मराठी साहित्याला महात्मा फुले यांनी घडविला. पण त्यावेळी मध्यमवर्गाचा पगडा असलेल्या मराठी साहित्याने महात्मा फुल्यांची व त्यांच्या साहित्याची उपेक्षाच केली.

ग्रामीण साहित्य प्रवाहाने उपेक्षित–वंचित असलेला ग्रामीण माणूस साहित्याच्या केंद्रभागी आला. आनंद यादव रा.र. बोराडे, उद्धव शेळके यांनी अस्सल ग्रामीण लेखनाला सुरूवात झाली. या मंडळींना ग्रामीण जीवनानुभव असल्यामुळे त्यांच्या कांदबऱ्या ग्रामीण कांदबरी लेखनाचा लक्षणीय टप्पा ठरला येथून पुढे वास्तववादी कांदबरी लेखनाला सुरूवात झाली.

१९९० नंतर संपूर्ण देशातच मोठे स्थित्यंतर घडून आले. या स्थित्यंतराचा परिणाम ग्रामीण कांदबरी वरही झाला. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांचा स्वीकार केल्याने वर वर पोषक वाटणारी ही गोष्ट खेड्यांच्या विकासास व पडझडीस नाशास कारणीभूत ठरले. १९९० नंतर खेड्यात बदलाचे वारे वाहू लागले. वीज़ रस्ता, शाळा, महाविद्यालये, आरोग्यकेंद्रे दळणवळणाच्या सुविधा आल्या त्याचप्रमाणे राजकिय सामाजिक आर्थिक शैक्षणिक क्षेत्रातही बदल घडून आले पण ग्रामीण माणूस हे बदल पचवू शकला नाही. बदलामुळे गावचे गावपण हरपले राजकारणाने गाव नासविले. गटा–तटाच्या राजकारणाला सुरूवात झाली. सत्तेच्या हव्यासापोटी जातीयता संपण्याऐवजी उग्र झाली. स्त्रियांवरील अन्याय अत्याचार कमी होण्याऐवजी वाढू लागले.

हरितक्रांतीचे दुष्परिणाम अधिक उग्र झाले. खते, पाणी, कीटकनाशके, संकरित बी बियाणे यांच्या अतिरिक्त वापरामुळे जमिनी नापीक होऊ लागल्या

तर दुसरीकडे उत्पादन खर्च वाढला पण उत्पादन खर्चाच्या तुलनेत बाजारभाव नगण्य मिळू लागला. व्यापारी दलाल यांच्या संगनमताने शेतकर्‍यांचे शोषण वाढले. भ्रष्टाचार, सेझ, महागाई, दुष्काळ यामुळे ग्रामीण माणूस मुळापासून उद्ध्वस्त झाला. आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय त्याच्यापुढे शिल्लक राहिला नाही.

दलित जीवन चित्रणामुळे मराठी कांदबरी आशयदृष्ट्या समृद्ध झाली या कादंर्बयामधून वेदना, विद्रोह, नकार, दुःख यांचे प्रतिबिंब दलित लेखकांच्या लेखणीतून ध्वनित झाले आहे. दलित कांदबरीकारांनी वैशिष्ट्यपूर्ण कांदबरीलेखन करून दलित समाजालाच नव्हे तर समग्र समाजव्यवस्थेला आत्मभान, आत्मजाणीव, आत्मशोध घेण्यास प्रवृत्त केले. इतर समाजव्यवस्थेपेक्षा दलित समाजव्यवस्थेचे जीवनानुभव वेगळे आहेत. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार धारेमुळे दलित कांदबरीला एक वैचारिक बैठक प्राप्त झाली आहे. या वैचारिकतेतूनच ती सकस झाली. म्हणूनच दलित कांदबरी वरचढ व श्रेष्ठ ठरली आहे.

दलित कांदबरीमध्ये वेदना, विद्रोह, नकार, दुःख, स्वातंत्र्य समता, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता यांचे प्रतिबिंब उमटताना दिसते. वेदनेतूनच विद्रोहाचा जन्म होतो आणि विद्रोहतूनच नकाराची भाषा पुढे येते.

**दलित कांदबरी व ग्रामीण कांदबरी तौलनिक स्वरूप :**

१९६० नंतर मराठी साहित्यात मोलाची भर घातलेल्या साहित्य प्रवाहांपैकी दलित व ग्रामीण साहित्य प्रवाहास महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागाचे समस्यांचे जीवनाच चित्रण ज्या ग्रामीण साहित्यात येते त्यात ग्रामीण भागाचा जीवनाचा अविभाज्य घटक म्हणून गावाकुसाच्या बाहेर राहणाऱ्या अस्पृश्य दलित वर्गाच्या दुःखाला वाचा फोडणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय गाव गाड्याचा एक घटक म्हणून त्याचा विचार होतो. दोन्ही साहित्याच्या प्रेरणांचे स्वरूप भिन्न असले तरी समस्या ह्या १९९० नंतरच्या साहित्यात सरमिसळ झालेल्या आहेत.

१९९० नंतर जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांच्यामुळे ग्रामीण व दलित समस्या ह्या एकत्रितपणे जरी दिसत असल्या तरी ग्रामीण शेतकरी जीवनाचे चित्रण शेती, शेतीशी निगडित समस्या, महागाई, सेझ, दुष्काळ, बेकारी यांच्याशी निगडित आहेत. पण दलित जीवनातील समस्या

वरच्या समस्येशी निगडित आहेतच पण त्या सोबत जातीयव्यवस्था, समाजव्यवस्था, परिस्थितीतीमुळे उद्भवलेली समस्या, ग्रामीण व्यवस्थेने येणाऱ्या समस्या या सर्वांना घेऊन आलेल्या आहेत.

### १. ग्रामीण कांदबरीतील नायकाचे संघर्षात्मक चित्रण :

ग्रामीण जीवन निसर्ग निर्भर आणि धर्ममूलक बनल्याने खेडुतांची मने नियती, दैव आणि देवशरण बनलेले आहे. त्यातून ग्रामीणांच्या ठिकाणी अनेक प्रकारच्या श्रद्धा, समजुती, संकेत आणि लोकरूढी लोकप्रथा व परंपरा रूढ झालेल्या आहेत. काळी पांढरी शेती, शिवार, रान, डोंगर नद्या तळी आणि रानातील पशुपक्षी यांना त्यांच्या जीवनात स्थान आहे. लोकजीवन व लोकसंस्कृतीतून त्यांच्या समूह मनाची विशिष्ट घडण झाली आहे.

उदा. 'बारोमस' चा उलगडा करताना सदानंद देशमुख म्हणतात. शेतकऱ्याच्या जीवनाला बारोमास वेढून असणाऱ्या जन्मजात वेदनांच्या हुंकारातून ही कांदबरी आकाराला आली आहे. माझ्या सभोवतालचा ओलांसुका ग्रामीण परिसर हेच तिचे प्रेरणास्थान आहे.

अमलापूर हे गावच या कांदबरीचा नायक आहे. अभावगृस्त परिस्थितीमुळे झडून गेलेली माणसं संकटाच्या दाढेत सापडलेली शेती जुनी नवी पिढी यांच्यातील वित्तीय आणि भावनिक तणाव परंपरागत आणि नवीन शेती सांस्कृतिक भावनिक कौटुंबिक कलह असे घटक आहेत.

### समाजाविरुद्धचा संघर्ष :

ग्रामीण समाजव्यवस्था ही अठरापगड जातींनी बनलेली असून प्रत्येक जातीची घरे गावच्या कोणत्या दिशेला कोणत्या ठिकाणी असावीत या विषयीचा पूर्वीपासून दंडक ठरलेला होता. ते खेडे आजही आहे शंकरराव खरात यांच्या मते–गावतटाच्या बाहेर महार, मातंग, लोहार यांची वस्ती कायम स्वरूपी दिसतात. तो गाव वसल्यापासून ते शतकांनुशतक तिथचं ठाण मांडून आहेत. गावकुसाबाहेरील ही महार, मातंग अन लोहार यांची वस्ती म्हणजे कायमची पक्क्या स्वरूपात असलेली अस्पृश्यतेची स्मारके आहेत. ही पूर्वी अस्पृश्य मानलेल्या समाजाची वस्ती गावाच्या पूर्वभागात थोडसं दक्षिणेकडे झुकती अशी वसलेली आहे.

स्पृश्य-अस्पृश्य असा भेद करणारी ही भारतीय खेड्यांची रचना धार्मिक समजुतीतून बनली असल्यामुळे स्वांतत्र्योत्तर काळातही ती तशीच टिकून आहे. म्हणून दलित जीवन जाणिवांचा आविष्कार करताना वातावरणाची पार्श्वभूमी म्हणून 'राघववेळ' मध्ये त्याचे औचित्यपूर्ण रेखांटन कलेले आहे.

**परिस्थिती विरुद्धचा संघर्ष :**

'बारोमासचा नायक एकनाथ हा एम.ए.बी.एड आहे. प्राध्यापकाची नोकरी मिळावी म्हणून खूप ठिकाणी प्रयत्न करतो पण डोनेशन देण्यासाठी पैसे नसल्याने त्याला नोकरी मिळत नाही. त्याचे शहरातील मुलीशी अलकाशी लग्न होते. बी.एस्सी. झालेली बायको त्याच्याशी एकरूप होऊ शकत नाही. शेती करताना येणाऱ्या समस्या आणि डोक्यावरची बेकारीची टांगती तलवार घेऊन तो जगतो. घरात समजून न घेता वावरणारी पत्नी. गुंड प्रवृत्तीचा भाऊ यांच्या कचाट्यात 'एकनाथ' जगतो. महागाई, दुष्काळ, दारिद्रय यांच्या विरुद्ध जगण्याचा तो प्रयत्न करतो.

'राघववेळ' मधील 'रघू' हा ही दारिद्रयात जगतो. शाळेत जावे, खूप-खूप शिकावे अशा त्याच्या आईच्या इच्छेला तो पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. पण फी चे पैसे भरण्यासाठी आई अयशस्वी होते.

**जात व्यवस्थेविरूद्धचा संघर्ष :**

नामदेव कांबळे यांनी आपल्या 'राघवेळ' कांदबरीत वालंबी नावाच्या मांग जातीतील स्त्रीची कुटुंबकथा सांगताना तिच्या जीवन जगण्याच्या धडपडीतून तिचे आणि तिच्या गावगाड्याचे संबंध अधोरेखित केले आहे. उपासमारीची वेळ आली त्यावेळी ती आपल्या जातीतील इतर स्त्रियांप्रमाणे आपले शरीर सवर्ण पुरुषांच्या स्वाधीन करत नाही. केवळ मदतीसाठी ती शील गहाण टाकत नाही.

बारोमास हा जातीय संघर्ष नाही तर तो श्रीमंत-गरीब, शेतकरी-व्यापारी, शेतकरी-सावकार यांच्यातील संघर्ष आहे. एकनाथचा 'भाऊ बारावीपर्यंत शिकल्यावर शेतकी डिप्लोमा करतो. पण नोकरी मिळत नाही डोनेशन भरता येत नाही म्हणून कधी शेत विकण्याचे ठरवतो. तर कधी गुप्तधन सापडावे हा विचार करतो. हे शक्य नाही हे लक्षात आल्यावर अखेर रात्रीच्यावेळी हायवेवर (रोडवर) उभा राहून येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्यांना लुटतो आपला मळा गहाण ठेवून दोन

लाख रूपये कर्ज घेतो. त्यातील एक लाख सुरेश साठे मार्फत आमदाराच्या पी.ए.ला देतो. त्यातून त्याला ग्रामसेवकाची नोकरी तर मिळत नाही पण फसवणूक झाली हे समजल्यावर तो आत्महत्येचा प्रयत्न करतो.

**अस्तित्वासाठीच संघर्ष :**

'बारोमास' मधला नायक एकनाथ हा सुशिक्षित आहे नोकरी न मिळाल्याने नाईलाजाने शेतीकडे वळतो आहे. शेतीत नवनवीन प्रयोग करत असताना तो दुष्काळ, अनियमित पाऊस, महागाई यांच्या विळख्यात सापडतो आणि त्याचा स्वतःच्या अस्तित्त्वासाठीचा संघर्ष सुरू होतो. कुटुंबात परंपरागत विचारांची आई व शहरातील आधुनिक विचारांची पत्नी यांना तो समजावून सांगू शकत नाही. छोटा भाऊ डोळ्यादेखत गुंड बनतो. फसवला जातो पण त्याला तो सावरू शकत नाही. त्यामुळे आपण स्वतः स्वतःच्या कुटुंबातील स्थान मोठ्या भावाची जबाबदारी. आईची वडिलांची असणारी अपेक्षापत्नीची त्याच्याकडून असणारी अपेक्षा. शेवटी पत्नी माहेरला निघून जाणे व भावाचा आत्महत्येचा प्रयत्न यात 'एकनाथ' मी कोण?' हे शोधत राहतो.

तर राघववेळ मध्ये 'रघू' हा अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मॅट्रिकची परीक्षा पास होतो. सुट्टीत तो मोलमजुरीचे कामे करून पैसे मिळवतो व मिळेल ते काम करून वालंबीला (रघूची आईला) हातभार लावतो. जन्माने मांतग समाजातील असल्यामुळे उच्चवर्णीयांच्याकडून अपमानाचे क्षण त्याला पचवावे लागतात. बकालसरांच्याकडून झालेला अन्याय त्याच्या संवेदनशील मनावर ओरखडा उमटवतो. तो अंतर्मुख होतो. पण त्याचवेळी सोनकर सरांच्याकडून मिळालेली मदत त्याच्या मनाला उभारी देते. माणुसकीचा सुखद अनुभव शिक्षणाच्या संस्काराबरोबरच त्याचे मन प्रगल्भ करतो. मातंग समाजातील गावकीची कामं करून अपमानित जगणं या विरुद्ध त्याच्या मनात प्रचंड चीड निर्माण होते. माणूस म्हणून स्वाभिमानाने स्वंतत्रपणे जगण्याचा त्याला अर्थ सापडतो.

**स्वातंत्र्यसाठीचा संघर्ष :**

'एकनाथ' व 'रघू' हे दोघेही दोन सामाजिक स्तरातून आलेले आहे, सुशिक्षित आहेत. विचारी आहे. डोळसपणे जगाकडे पाहणारे आहे. भल्या-बुरा अनुभव पाठीशी आल्याने आपल्या हाती आलेले काम प्रामाणिकपणे पूर्ण

करण्यावर त्यांची श्रद्धा आहे. 'माणूस' म्हणून जगताना त्यांच्या विचारांमुळे स्वातंत्र्य माणूस हा वैचारिक लढा त्यांच्या मनात सतत सुरू आहे. मग तो कौटुंबिक असो वा समाजाबरोबरचा असो त्या-त्या विचारानुरूप प्रामाणिकपणे जगण्याचा ते प्रयत्न करताना. स्वातंत्र्याच्या या विचारामुळे त्यांना आपल्यावर झालेल्या अन्यायाची चीड आहे. त्या अन्यायाने ते पेटून उठतात.

**समारोप :**

सदानंद देशमुख यांची 'बारोमास' व नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' या दोन्ही कांदबरी २००० नंतरच्या २१ व्या शतकातील गघमव्यवस्था, समाजव्यवस्था दाखवणाऱ्या कांदबऱ्या आहेत. बदलत्या समाजव्यवस्थेचा प्रस्तुत कादंबऱ्या विचार करतात.

* * *

# २००० नंतरचे पाडा व कटुसत्य कादंबरीचा सामाजिक व राजकीय तुलनात्मक अभ्यास.

– प्रा. डॉ. शारदा मोरे

जागतिक पातळीवरील साहित्य क्षेत्रात आज तुलनात्मक साहित्य ही शाखा मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. अनेक देशात व भाषांमध्ये तुलनात्मक साहित्याचा गंभीरपणे विचार सुरू आहे. मराठीमध्येही काही प्रमाणात तौलनिक साहित्याभ्यास सुरू झाला आहे. तुलना मानवी जीवनव्यवहारातील अपरिहार्य असा घटक आहे. नेहमीच्या जीवन व्यवहारात माणूस तुलना ही करीतच असतो. कारण तुलना करणे हा माणसाचा नैसर्गिक स्वभाव आहे. माणूस हा स्वत:मधील व दुसऱ्यामधील सामर्थ्य, मर्यादा, गुण अथवा दोष निश्चित करत असतो.

मानवी जिवन मूल्यात्म अंगाने समृद्ध बनवणे हा साहित्याचा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्न समोर ठेवून केला तर ते अधिक उपयोगी ठरते.

दोन किंवा अधिक, मग त्या एका भाषेतील असतील किंवा वेगवेगळ्या भाषा, प्रांत वा देशातील असतील अशा साहित्यकृती, साहित्यिक किंवा साहित्य प्रवाहांचा तुलनेला प्राणभूत तत्त्व मानून परस्परांमधील साम्य भेदांची व सामर्थ्य-मर्यादांची नोंद घेत केलेला अभ्यास. ज्यात अशा साहित्यातील अनेकविध प्रकारच्या परस्पर संबंधांचा, एकमेकांवरील प्रभावांचा, आदान-प्रदानाचा व त्यांवर झालेल्या भौगोलिक, धार्मिक, तत्त्वज्ञानिक, राजकीय, सामाजिक घटकांच्या प्रभावांचा, त्यातील परस्पर संबंधांच्या एका वैश्विक अशा मानवतावादी भूमिकेतून केल्या जाणाऱ्या साहित्याभ्यासास तौलनिक साहित्य असे म्हणावे. (तुलनात्मक साहित्य आणि विश्वकुटुंबाची घडण- डॉ. अनंत राऊत) तुलनात्मक साहित्य ही अशी अभ्यास शाखा आहे की जी माणसाला जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत व देश या मर्यादित कक्षांमधून बाहेर काढते आणि संपूर्ण जगातील लोकांना त्यांच्या साहित्य संस्कृतीच्या माध्यमातून आत्मियतेने समजून घेते.

परस्परांच्या साहित्य-संस्कृतीतील व वर्तमानातील उणिवा भरुन काढण्याची प्रेरणा देते, असे डॉ. अनंत राऊत म्हणतात. साठोत्तरी कालखंडात ग्रामीण व दलित साहित्य हे महत्त्वाचे प्रवाह निर्माण झाले. या दोन प्रवाहातील समकालीन कादंबरीचा तौलनिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कटुसत्य (२००३) ही सामाजिक विषमतेच्या विरुद्ध आणखी एक पाऊल टाकणारी दलित जाणिवा दर्शविणारी कादंबरी आहे. या कादंबरीचे लेखन म्हणजे खानदेश परिसरात निर्माण झालेली कादंबरी होय. सामाजिक विषमतेचे चटक्यांची जखम एवढी खोलवर आहे की त्याच्या वेदना कटुसत्य कादंबरीतून व्यक्त होताना दिसतात. चातुर्वण्याधिष्ठीत समाजरचनेने केलेल्या अन्याय व अत्याचारामुळे त्रस्त झालेल्या दलित समाजाने आपल्या दुःखाला वाचा फोडली त्याचा प्रत्यय कटुसत्य कादंबरीत येतो. या कादंबरीत राजकीय, सामाजिक, आर्थिक वैशिष्ट्य दिसून येतात. या कादंबरीतील सामाजिक दर्शन पुढील प्रमाणे –

**सामाजिकता :–**

कादंबरीच्या सुरूवातीलाच चंदनगावाचे वर्णन येते. पाच–सहा झोपडींची मातंगांची वस्ती चंदनगावात आहे. राधाला मुलगा होतो तेव्हा रामा आनंदाने म्हणतो, वंशाला दिवा हवा होता. किती दिवसांनी आपल्या खानदानात मुलगा झालाय. मुलगा वंशाचा दिवा मानणे ही समाजाची मानसिकता होती. दलितांच्या सामाजिक स्तरावर ज्यांचे जगणे पूर्णतः नाकारले गेले आहे अशा मातंग समाजाचे जीवनदर्शन अत्यंत भेदकपणे मांडले आहे. उदा. गावात कोणी मेलं म्हणून बाहेर, बाजूच्या खेड्यावर निरोप देण्यास मांगाने जावे. आळीपाळीने ते काम करीत असत. मांगाच्या बायकांचे दर महिन्याला अमावस मागणे. गावातील बायकांना वाटते मांगीणीला अमावस दिल्याने सगळी इडा–पिडा घरातून जाते अशी समज असणे, गावात मौत झाली तर घराघरातून फुले (लाकडे) गोळा करणे. त्यासाठी बैलगाडीला बैल मिळाले नाही तर स्वतःला जुंपून लाकडे गोळा करणे, गटारी साफ करणे, मेलेल्या जनावरांची कातडी सोलणे, चामड्याचे व तागाचे दोर बनविणे, वाजंत्री वाजविणे, गावात दवंडी पिटवणे, चावडीवर हजर राहणे असे काम मातंग समाजाला करावी लागत. हे समाजदर्शन प्रकाश रायते या नायकाच्या माध्यमाने घडते. लेखकाने मातंग समाजाची व्याख्या दिली आहे.

चामड्याचे व तागाचे दोर बनविणे, केरसुण्या बनविणे, वाजंत्री वाजविणे यासारखे व्यवसाय करू न कसेबसे पोट भरणे आणि सतत दुःखाचे दर्शन घेणारी दुःख पिऊन जगणारी व भविष्याच्या कल्पनेने भयावह जगणारी जात म्हणजे मातंग सध्याच्या जातीवर्णव्यवस्थेत हीन समजल्या जाणाऱ्या मातंग समाजाची

अतिप्राचीन कालखंड व प्राचीन कालखंडात थोरगाथा कशी गायली जात होती याचे स्पष्टीकरण दिले आहे. उदा. जलजंबू हा मातंग समाजातील विद्वान महापुरुष होता. मातंग ऋषी यांना जातीमुळे अस्तित्वाला धक्का पोहचला होता. सोपाक नावाचा बौद्ध भिक्षुक मातंग होता. बुद्धकाळात कोसल देशाचा राजा सम्राट प्रसेनजीत हा मातंग राजा होता. मात्र सध्याच्या कालखंडात या मातंग समाजावर गुन्हेगारीचा शिक्का कायमचाच मारला गेलेला दिसतो. हे लेखकाने अत्यंत खेदाने मांडलेले आहे. घरात अठराविश्व दारिद्र्य नांदत असल्याने मातंग गावातून शिळपाकं मागून आणून पोटाची खळगी भरत असत.

गावात खंडोबाची यात्रा असली म्हणजे गावातील उकीरडे मातंगांनीच साफ करावी लागत. खंडोबाला बोकडाचा नैवेद्य देताना बोकडाचा बळी दिला जात असे. तेव्हा बोकड कापल्यावर त्याच्या रक्ताची धार घरी घेऊन जाऊन रक्ती खायला मिळत असे. सवर्ण बायकांनी खंडोबाला चढवलेला नैवेद्य नवस फेडण्यासाठी सोडलेले कोंबडे, अंडी, लिंबू हे मिळविण्यासाठी मातंगाची नागड्या–उघड्या पोरांची झुंबड उडत असे. तेव्हा सवर्ण बायका त्यांना शिव्याशाप देत असत. इतके भयानक व विदारक समाजदर्शन या कादंबरीतून घडते.

या कादंबरीचा नायक प्रकाश याला त्याची आई राधा शाळेत घालायला जाते तेव्हा पांढरपेशा शाळामास्तर त्यांच्याकडे आढ्या पाडून पाहतो. शाळामास्तरचा संतप्त चेहरा पाहून प्रकाशचा थरकाप होतो. शाळेच्या पटांगणात प्रार्थनेसाठी एकत्रित आलेल्या विद्यार्थ्यांमधून प्रकाशला बाहेर काढून दूर उभे केले जाते. शाळेचा पहिलाच दिवस असल्याने तेथील नियम न पाळल्या गेल्याने शाळामास्तर बेदम मारतो. त्यामुळे शाळेत जाणे नको असे प्रकाश ठरवतो.

गावात खंडोबाच्या यात्रेला तमाशा मागवला जात असे, तेव्हा तगतराव टाकण्यासाठी पाटलांचीच बैलजोडी लागत असे. तमाशा पाहत असताना प्रकाश पांढरपेश्या समाजाच्या मुलांजवळ चुकून बसला असता तेथे त्याला कानशिलात मारुन दूर बसविले जाते. तमाशाच्या हजेरीच्यावेळी, तगतराव मिरवायच्या वेळी लोक गाडीत बसलेल्या नृत्यिकेची टिंगल उडवित होते. स्त्रीपात्र रंगविणारे, पुरुषांची टिंगल–टवाळी उडविणाऱ्या गावकऱ्यांना पाहून प्रकाशचे मन हेलावत होते.

शाळामास्तरला घाबरुन शाळा सोडल्यावर घरीच अभ्यास करून प्रकाश लिहिणं वाचणं शिकतो. दुर्दैवाने प्रकाशच्या वडिलांचा हात गिरणीत

जखमी होतो. त्याला ते काम सोडून यावे लागते. त्याच्या जागेवर प्रकाश जातो. शहरात गिरणी कामगार कामगार नेता, प्रसिद्ध लेखक अशी त्याची ख्याती होते. त्याच्या जीवनात सुमित्रा जोशी ही येते. प्रेमाचा रंग चढता चढता तो भंगही पावतो. कारण येथेही प्रकाशला जातीय विषमतेचे चटके सोसावे लागतात. सुमित्रा जोशी ही शाळा मास्तरचीच मुलगी असल्याने या प्रेमाला शाळामास्तराचा विरोध होतो. सुमित्राला समजविताना तो म्हणतो, प्रकाश रायते हा प्रख्यात लेखक असला तरी तो अस्पृश्य आहे. पुन्हा तो पुढे म्हणतो, पाप केलं आहे त्यानं, तो एक दलित आहे. त्याच्याबरोबर आपल्यासारख्या उच्चवर्णीय माणसाने राहणं शोभत नाही. पुढे प्रकाश रायतेला उत्तर देताना म्हणतो, बरं तुमचं मत काय होतं की, तिने जात-पात धर्म सोडून अस्पृश्यातील अस्पृश्य ते पण मांगाच्या प्रकाश रायतेबरोबर लग्न करायला हवं होतं? असे अपमानास्पद वाक्य बोलून प्रकाश रायतेचे मानसिक खच्चीकरण करतो.

पुढे विवाहित झालेली सुचित्रा मात्र प्रकाशला जाता जाता सांगते, मी तुला कदापि विसरणार नाही पण यापुढे खरा प्रकाश बनायचंय, समाजाला प्रकाश द्यायचाय, जर मी तुला विसरले नाही तर तुझाही जीव माझ्यात गुंतलेला असेल म्हणून समाजाला प्रकाश देण्यासाठी व तुझ्या सुखासाठी मला तुला विसरावं लागेल. सुचित्रा जोशीचे हे वाक्य प्रकाश रायतेला प्रचलित समाजव्यवस्थेला टक्कर देण्यासाठी सज्ज करतं व संपूर्ण गावात समाजपरिवर्तन आणण्यासाठी कटिबद्ध होतो.

**रायकीयता :-**

कटुसत्यमध्ये पन्नास वर्षापूर्वीची कथा असल्याने गिरणी कामगार चळवळ चित्रित झाली आहे. प्रकाश शहरात गिरणी कामगार म्हणून काम करतो. एकदा गिरणी कामगारांनी सोयी, सुविधा, वेतनवाढीची मागणी केली असता मालकवर्गाकडून नकार येतो. तेव्हा न्याय हक्कासाठी कामगार एकत्र येतात. या कामगार वर्गाचे नेतृत्त्व प्रकाश रायते करतो. कामगार लढ्याचे बारकाईने अभ्यास करणे, कामगारांचे बेमुदत संप पुकारणे, प्रकाशला व्यवस्थापकाने चर्चेसाठी आत बोलावणे, एकट्या प्रकाशला लाच देण्याचा प्रयत्न करणे, संप माघारी घेण्यास सांगणे, प्रकाशने व्यवस्थापकावर टीका करणे, वर्तमानपत्रात बातमी छापणे, प्रकाश कामगार नेत्याचा खरा नायक बनणे. या सर्व गोष्टींचा

विचार केला असता तत्कालीन कामगार व मालक यांच्यातील संघर्ष दिसून येतो.

**पाडा:–**

ही कादंबरी अशोक कोळी यांची असून ह्या कादंबरीत चांगदेव तापीकर या शेतकऱ्याची संघर्षमय कहाणी आहे. पाडा ही कादंबरी बदलत्या काळानुसार कृषिप्रधान ग्रामीण सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडविते. पाडा ही २००६ मध्ये खानदेश परिसरात साकारली गेलेली कादंबरी. या कादंबरीतले प्रमुख पात्र चांगदेव तापीकर हा केळी उत्पादक शेती व्यवसायावर कौटुंबिक गुजराण करणारा शेतकरी. या कादंबरीतून सामाजिक व राजकीय पैलूंचे दर्शन घडते.

**सामाजिकता :–**

कादंबरीच्या सुरूवातीलाच चांगदेवाची मुलगी सुनिता हिला पहायला पाहुणे येतात. मुलगी पाहण्याचा कार्यक्रम होतो. दुसऱ्या बैठकीत लग्न जुळवण्याचा कार्यक्रम होतो. समाजात हुंडा पद्धत असणे, हुंड्याची रक्कम कमी करण्यासाठी घासाघीस करणे, एकदाचे लग्न जमणे, मुलीच्या लग्नासाठी पैश्यांची जमवा जमव करणे, पैश्यांची सोय झाली नाही तर सुनिताचे लग्न मोडणे, पैशांअभावी बहिणीकडे मुलगी देणे, जावयाला नोकरी लावण्यासाठी पैसे कबुल करणे ते पैसे न दिल्यामुळे सुनिताचा बळी जाणे, कार्यक्रमाच्या वेळी भाऊबंदकी बोलावणे याच भाऊबंदकीमध्ये तंगडे ओढण्याची स्पर्धा असणे, ग्रामीण भागात सुख–दुःखात एकत्र येणारा समाज दिसतो. कमळाबाई चांगदेवाच्या आंदोलनापायी त्रस्त होते. ती हाय मोकून रडते. तेव्हा गावातील बायका तिच्याजवळ बसतात. तिची समजूत काढतात.

**राजकीयता:–**

या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे खेडोपाडी घुसलेले राजकारण. या राजकारणाचे वास्तव चित्रण पहायला मिळते. गावातील जयभगवती फ्रुटसेल सोसायटी जुनी सहकारी संस्था. दरवेळी या संस्थेचे चेअरमन बाबासाहेब बिनविरोध निवडून येतात. मात्र यंदा विरोधकांनी तोंड वर काढल्याने निवडणुकीचे वारे या गावात वाहू लागतात. तेव्हा निवडून येण्यासाठी उमेदवारांचे गुप्त बैठका घेणे, अफवा पसरविणे, नेत्यांचे आदेश येणे, जिल्हास्तरीय नेत्यांचा हस्तक्षेप

वाढणे, थेट आमदार खासदारांचा वापर होणे, त्यानंतर विरोधी उमेदवारांचे सहकारी फोडणे, नात्यागोत्याचा आडोसा घेणे, भावकीचा धाक दाखवणे, गावकीचं राजकरण पुढे करणे, गावात मतदारांची यादी बनविणे, माणसांची जुळवाजुळव करणे, गावात मोटारींच्या घिरट्या वाढणे, दैनिकांचे रकाने भरणे, पोस्टर, बॅनर पत्रकांनी गावाच्या भिंती सजवणे कार्यकर्ते इर्षेला पेटणे, हॉटिल ढाबे गच्च भरणे, सारा तालुका ढवळून निघणे हे राजकीय वर्णन वाचल्यावर गावागावामधील राजकारण निवडणुकीचा प्रसंग डोळ्यासमोर उभे राहतात. गल्लीगल्लीतील राजकारण, गटबाजी, पक्षबाजीचे कुरुप व बिभित्स रुप पहावयास मिळते.

चांगदेव तापीकर कुटुंब सांभाळता सांभाळता शेतकऱ्यांच्या समस्यांचा विचार करतो व शेतकरी संघटना निर्माण करून आंदोलन छेडतो. खेडेगावातील भारनियमन एक समस्या, शेतीमालास मिळणाऱ्या भावाची अनिश्चितता यासाठी आंदोलन करून शासकीय अधिकाऱ्यांशी झगडतो व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देतो. पण हे करत असतांना कुटुंबप्रमुख व शेतकरी कार्यकर्ता ही भूमिका पार पाडत असतांना अंतर्बाह्य होरपळला जातांना दिसतो. चांगदेव संकटांना तोंड देतो. त्याच्यावर आर्थिक संकट कोसळते. पैशाअभावी आजारी पत्नी कमळाबाई मरते. बहिणीला जावायास पैसे न दिल्यागेल्यामुळे मुलगी जळून मरते आणि शेवटी सरकारी कर्मचाऱ्यांवर चालून गेल्याचा गुन्हा म्हणून तुरुगात जाऊन बसावे लागते.

**साम्य व भेद :-**

तुलनात्मक अभ्यास किंवा चिकित्सा करताना ज्या दोन साहित्यकृतींची तुलना केली जाते तेव्हा त्यामधील साम्य व भेद यांची नोंद घेणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीने पाडा व कटुसत्य या दोन साहित्यकृतीतील साम्यभेद पुढीलप्रमाणे-

**साम्य :-**

पाडा व कटुसत्य ह्या दोन्ही साहित्यकृती समकालीन असून खानदेश परिसरात निर्माण झालेली आहेत. खानदेश परिसरातील बोलीचा प्रभाव दोन्ही कादंबऱ्यांवर झालेला दिसतो.

पाडा व कटुसत्य या दोन्ही कादंबरीतील नायक संघर्षमय जीवन जगतांना दिसतात. दोन्ही नायकांना आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय

अडचणींना तोंड द्यावे लागते. आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत असताना त्यांना सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

LIBRARY AKOLE 422601

दोन्ही कादंबरीतील नायक संघटनेचे नेतृत्त्व करताना दिसतात. पाडा कादंबरीतील चांगदेव तापीकर हा शेतकरी संघटनेचे नेतृत्त्व करतो तर कटुसत्य मधील प्रकाश रायते गिरणी कामगार संघटनेचे नेतृत्त्व करताना दिसतो. पाडा मधील चांगदेव तापीकर मुलीच्या लग्नासाठी पैशांचा बंदोबस्त करताना दिसतो. तर कटुसत्य मधील प्रकाश रायते आपल्या लहान बहिणींच्या लग्नासाठी पैसे जमा करतो. पाडा मधील चांगदेव तापीकर याला त्याची पत्नी कमळाबाई उभारी देण्याचा प्रयत्न करते. आंदोलनात भाग घेऊ नये असा सल्ला देते. तर कटुसत्य मधील प्रकाश रायते याला त्याची प्रेयसी सुचित्रा जोशी ही जीवन जगण्यास उभारी देते. तसेच आंदोलन किंवा उपोषण करु नये असाही सल्ला देते.

दोन्ही कादंबरीतील नायकासमोर सामाजिक, आर्थिक, राजकीय संकटे हात जोडून उभी दिसतात. लग्न जोडणे, त्यासाठी पैसा गोळा करणे, कष्ट करणे, हालअपेष्टा सहन करणे, पैशाअभावी मुलीचे लग्न मोडणे, जावायास नोकरीसाठी पैसे न दिल्या गेल्यामुळे मुलीचा बळी जाणे, ह्या समस्या पाडा कादंबरीत चित्रित होतात, तर कटुसत्य मध्ये चातुर्वण्याधिष्ठीत समाजरचनेने केलेल्या अन्यायामुळे सामाजिक स्तरावर ज्यांचे जगणे पूर्णत: नाकारले गेले अशा दलितांची सामाजिक परिस्थितीचे दर्शन येथे घडते. प्रकाश रायतेला शाळेत हिनतेची व अन्यायाची वागणूक मिळणे, आर्थिक विषयमतेमुळे कोणतेही साफसफाईचे काम करणे. मेलेले ढोर सोलणे, पुढे शहरात जाऊन प्रसिद्ध लेखक झाल्यावरही प्रकाश रायतेची दलित म्हणून हेटाळणी करत जावाई करून घेण्यास शाळा मास्तराचे नाकारणे याचे वास्तव सामाजिक चित्रण घडते.

भेद :-

पाडा व कटुसत्य या दोन्ही कादंबरी समकालीन असल्यातरी पाडा कादंबरी आजचा ग्रामीण प्रश्न, परिस्थिती मांडताना दिसते. शेतकऱ्याच्या नव्याने निर्माण झालेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्या सद्यस्थितीतील रेखाटले आहे. कटुसत्य या दलित कादंबरीत पन्नास वर्षापूर्वीचा काळ रेखाटला आहे. त्यामुळे त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थीतीचे चित्रण आलेले आहे.

पाडा कादंबरीत चांगदेव मुलीच्या विवाहाचे खास करून हुंड्याविषयी फार चिंतीत असतो. पाडा देऊन पैसा उभा करु इच्छितो मात्र आंदोलनामुळे हा बेत त्याचा फसतो व मुलीचे लग्न मोडते. तेथूनच चांगदेव अस्वस्थ झालेला दिसतो. पैसे (हुंडा) अभावी मुलीचे लग्न मोडते. हुंडा हा समाजाला लागलेली कीड आहे हे प्रत्ययास येते. कटुसत्य मध्ये प्रकाश रायते आपल्या बहिणीचे लग्न करण्यासाठी मजुरी करून पैसा गोळा करतो व बहिणीचे लग्न करतो. दलित समाजात हुंडा पद्धती नसल्याने त्याच्या बहिणीचे लग्न सहज होते. चांगदेव जवळ उदरनिर्वाहासाठी शेती आहे. प्रकाश रायते जवळ मोल मजूरीशिवाय काहीही नाही.

पाडा या कादंबरीतील चांगदेव सामाजिक, राजकीय, कौटुंबिक व आर्थिक संघर्ष करतो मात्र शेवटी अपयशी ठरतो. पैशाअभावी मुलीचा बळी जातो. बायकोचा मृत्यू होतो. म्हैस मरते केळी कापत नाही म्हणून सरकारी कर्मचाऱ्यावर चालून जातो. चेअरमन बाबासाहेब विश्वासघात करतो हे लक्षात येते व हताश झालेल्या चांगदेवाला तुरुंगात जाऊन बसावे लागते. कटुसत्य मधील प्रकाश रायते दलित असल्याने त्याला लहानपणीच हिनतेचे चटके सहन करावे लागतात. बापाचा हात निकामी झाल्याने गिरणीत त्याला काम करावे लागते. काम करून गावी असलेल्या आई वडीलांचे भरणपोषण करतो, बहिणीचे लग्न करतो, लेखक बनतो, कामगार संघटनेचा नेता बनतो, आंदोलन, उपोषण करतो. यशस्वी होतो, मात्र जात आडवी आल्याने सुचित्रा जोशी बरोबर विवाह होऊ शकत नाही तेव्हा प्रेमवैफल्य झाल्याने प्रकाश रायते निराश होतो तेव्हा सुचित्रा जोशी त्याला भेटायला येते व म्हणते च्यापुढे तुला खरा प्रकाश बनायचं आहे. समाजाला प्रकाश द्यायचा आहे. समाजाला प्रकाश देण्यासाठी व तुझ्या सुखासाठी मला विसरावं लागेल. सुचित्राचे हे वाक्य प्रकाश रायते जगण्याची उमेद निर्माण करते व समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रकाश रायते कटीबद्ध होतो.

२००० नंतरचे ग्रामीण व दलित कादंबरीत तोचतोपणा कमी झालेला असून नव्याने निर्माण झालेल्या समस्या कादंबरीत येऊ लागल्या. यात एक नवी वाट नवी दिशा त्यांनी स्वीकारलेली दिसते.

* * *

# दलित-ग्रामीण कादंबरीतील संघर्षमय जीवन सांगणाऱ्या अनुक्रमे कोंडी (बाबुराव बागूल) व पाचोळा (रा.रं. बोराडे)

-डॉ.सौ.उज्ज्वला एस.देवरे

आधुनिक काळातील सर्वांत जास्त वाचला जाणारा साहित्य प्रकार म्हणजे कादंबरी होय. 'यमुना पर्यटन' या बाब पद्मनजी यांनी लिहिलेल्या मराठी कादंबरीनंतर कादंबरी लेखनात अनेक स्थित्यंतरे झाली. पारतंत्र्य काळातील गुलामगिरी, स्वातंत्र्याकांक्षेने प्रेरित झालेले दुसऱ्या महायुद्धानंतर तसेच स्वातंत्र्याप्राप्तीनंतर बदललेले सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय जीवन यांचे पडसाद त्या त्या काळातील कादंबऱ्यांतून उमटले. त्याचपद्धतीने मराठी साहित्यातून ग्रामीण जीवनाचे दलित वास्तवाचे दाहक अनुभव व्यक्त होऊ लागले. ग्रामीण समाजातील सर्व माणसे; मग ती शेतकरी असो, दलित असो, स्त्रिया असले त्यांचे जीवन हजारो वर्षापासून सुरू होतो. परंतु प्रस्थापित समाजात त्याच्याशी देणे-घेणे नव्हते. या लोकांचे 'जगणे' त्यांनीच लिहिल्यावर प्रस्थापित समाज खडबडून जागा झाला. मराठी साहित्याने कादंबरी, कथा, कविता, नाटक, आत्मकथन या प्रकारातून ७०% लोकांचे जीवनाची अनुभूती देण्यास सुरूवात केली. त्यातही ग्रामीण व दलित कादंबरीने शतकांच्या जाचात भरडल्या गेलेल्या माणसांची मने, भावना, कुचंबणा, दुःख, उपहास, अपमान, वेदना, भूक, उपासमार, कष्ट, स्त्रियांचे दुय्यम स्थानावरील जगणे, सावकारी पाश, वर्णभेद यांना वाचा फोडली.

## दलित कादंबरी :-

दलित कादंबरीचा विचार करण्यापूर्वी दलित साहित्याची प्रेरणा विचारात 'यावी लागते. दलित साहित्याच्या प्रेरणेचा मूलश्रोत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी दलित समाजासाठी केलेले प्रबोधन आहे.

दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्यांना समानतेने वागवावे, दलितांच्या आर्थिक, सामाजिक सुधारणा घडाव्यात. दलितांचे दुःख, दैन्य,

दारिद्रय, अज्ञान नाहीसे व्हावे, धर्म जातींच्या नावाखाली दलितांचे शोषण, त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होऊ नयेत यासाठी डॉ.आंबेडकर यांच्या पूर्वी महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी वि.रा.शिंदे, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेले कार्य हीच मूलत: दलित साहित्याची एक महत्त्वाची प्रेरणा ठरते.

दलित कादंबरीमध्ये ना.रा.शेंडे, आण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, शंकरराव खरात, नामदेव ढसाळ, सुधाकर गायकवाड इत्यादी अनेक लेखकांनी दलित जीवनातील भूक, गरिबी, शोषण, अगतिकता, लाचारी, गुलामी, वेठबिगारी, शैक्षणिक समस्या, दारिद्रय अवैध धंदे, गुन्हेगारी प्रवृत्ती, संस्कारशून्य जीवन, गटारपाण्यासारखी वाहणारी अर्वाच्च्य शिवराळ भाषा इ. चे ठळकपणे चित्रण केले आहे.

दलितांच्या समस्यांचे जसेच्या तसे चित्रण, दलितांच्या विचार-भावना प्रकटवणारे दलितांनीच लिहिलेले साक्षात जीवन चित्रण, माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाचा महत्त्व देणारे, माणसाचा महान मानणारे, जातिश्रेष्ठत्त्वाचा कठोर विरोध करणारे विचार दलित साहित्यिकांनी मांडले. हजारो वर्षे यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृशांनी त्यांच्याच वर्गातील लोकांचे साहित्य निर्माण केले.

दलित चळवळींच्या माध्यमातून अनेक दलित नेते, कार्येकर्ते तयार झाले. १९६० ते १९७० पर्यंत दलित चळवळ अतिशय वेगाने व जोमाने कार्यरत होती. दलित चळवळीचे प्रामुख्याने असे ध्येय होते की, चळवळीतील अंतिमातला अंतिम घटक म्हणजे अगदी नगण्य माणूस, शेवटचा माणूस व त्याच्यासाठी कोणत्याही वैयक्तिक मानापानाची पर्वा न करता चळवळीत स्वत:चा झोकू न घेणे अत्यंत नि:स्वार्थबुद्धीने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक फळी वरील दशकात निर्माण झाली. मात्र प्रांजळ दलित कार्यकर्त्यांची पुढील काळात फरफट झाली. दलित चळवळींची कादंबरीही मराठी साहित्याचा समांतर अशीच काही अंशी आहे. दलित कार्यकर्त्याचा सुरूवातीला उत्साह, नंतर ढासळणे, कोसळणे, स्वार्थी मतलबी होणे या गोष्टींचे पडसाद दलित चळवळीच्या कादंबऱ्यात दिसतात. हरिभाऊ पगारेंची 'कालिंदी', ज.वि. पवार यांची 'बलिदान' नामदेव ढसाळांची 'निगेटिव्ह स्पेस', शरणकुमार लिंबाळेची 'उपऱ्या', बाबुराव बागूल यांची 'कोंडी' इ. कादंबऱ्यांतून दलित चळवळींवर प्रकाश टाकलेला आहे.

**कोंडी:**

बाबुराव बागूल - बाबुराव बागुलांनी 'कोंडी' कादंबरी लिहून बराच काळ लोटल्यानंतर सन २००० मध्ये तिचे प्रकाशन झाले. 'कोंडी' कादंबरीचा नायक पावन पगारे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी अत्यंत प्रभावित झालेला डॉ.बाबासाहेबांच्या विचारांप्रमाणे स्वत:चे जीवन जगणारा आहे. अत्यंत तरुण, उत्साही व पक्का आंबेडकरवादी, असल्यामुळे तो समाजात दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार, शोषण याविरुद्ध पेटून उठतो. तो खूप वाचन करतो. खूप लिहितो म्हणूनच नाशिकहून मुंबईला राहायला जाताना तो वडिलांना पटवून सांगतो की, नव्या नव्या चळवळी करा, नवी जागा शोधून काढा, पक्ष क्रांतिकारी तत्त्वावर उभा करा. नाहीतर विधायक कामा उभा करा. पण काम काढा ....... अन् मी ते काढणार (पृ.३५, कोंडी)

लेखक बाबुराव बागूल यांनी मुंबईच्या वस्तीचे सुरूवातीपासूनच चित्रण केले आहे. 'कोंडी' मधील लेबर कॅम्पमधील जीवन बाबुराव बागूल प्रत्यक्ष जगले आहेत. एका मुलाखतीत ते म्हणतात. ........ लेबर कॅम्पामध्ये राहणारे सर्व लोक जातीने महार, जवळजवळ सर्वजण बाबासाहेबांचे अनुयायी, कामगार म्हणून डांगे, कम्युनिस्ट पार्टी, लालबावटा यांची माहिती असलेले ....... नाशिक, नगरचे लोक एकमेकांशी वैर करून होते. त्यांच्यात नेहमीच रक्तपात, मारामाऱ्या होत असत..... मारामारी करण्याचा कारणीभूत या प्रत्येक जिल्ह्यातील मवाली असत. .. त्यात कुणाला सट्टा, बिटिंग, पराडा असे अवैध धंदे करीत, त्यासाठी मवाली पोरांची टोळकी जवळ बाळगीत..... कदाचित त्या वेळी आलेली आर्थिक मंदी आणि बेकारी ही सुद्धा त्याला कारण असू शकेल. काळ साधारण १९३६ ते १९३८ हा आहे. (बाबुराव बागूल दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान, पृ. २०१)

मुंबईच्या लेबर कॅम्पमध्ये राहणारे काड सयाजी थोरात हे पावन पगारेचे मामा कट्टर कम्युनिस्टवादी आहेत. आँबेडकरी विचारांच्या पावनचे लग्न मामांच्या मुलीशी सुशीलेशी होते. नाशिकचे जीवन सुशीलेला खूप आवडते. मुंबईच्या बकाल झोपडपट्टीय जीवनापेक्षा नाशिकच्या शांत व आरोग्यपूर्ण वातावरणात ती रमण्याचा प्रयत्न करते. मात्र पावनला मुंबईत नोकरी मिळते. म्हणजे तो प्रयत्न करून मिळवतो. तसेच तो तेथे एम.ए. चाही अभ्यास करतो. सुशीलासुद्धा मुंबईत महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षिका होते. पावनच्या निरागस स्वभावाचा

त्याच्या रंगरूपाचा, विद्वतेचा व त्याच्या चळवळीवरील निष्ठेचा तिला अभिमान वाटतो. परंतु मुंबईच्या झोपडपट्टी जीवनातील धोके तिला माहित असल्यामुळे त्याच्या सुरक्षाविषयी ती सतत चिंता करते. पावन मात्र आपल्या चळवळीसाठी मुंबईची निवड केल्यामुळे आनंदी राहतो. आपल्या नाशिकपेक्षा वेगळ्या जीवनशैलीबाबत समाधान पावतो. लेबर कॅम्पमध्ये संपूर्ण देशभरातून नोकरीधंद्याच्या निमित्ताने आलेले लोक राहतात. संमिश्र जातिपातीचे, धर्माचे लोक एका जागी राहतात. परंतु त्यांच्यात सरव्य नाही. एकसंगती नाही. नागरी सुविधांची पार वाताहत झालेली. कमी पाणीपुरवठा, अस्वच्छ शौचालये, वाहणाऱ्या गटारी, तुंबलेल्या शौचालयातील मलमुत्रयुक्त पाणी झोपड्यांच्या समोरून वाहते. नळावर सतत भांडणे, कचऱ्याचे साजलेले व वाढणारे ढीग, त्यातून नाकाला झोंबणारी कुचकट, कुबट दुर्गंधी, शौचाला जाताना पुरुषांसाठी दिव्य असणे तेथे स्त्रियांचे हाल वेगळेच. एवढेच नाही तर रात्री शौचालयांचा उपयोग दारूच्या भट्ट्या लावण्यासाठी होतो. त्यावरून गटातटात हाणामाऱ्या होतात. दररोज पडणारे खून, होणारे बलात्कार या नित्याच्या घटना आहेत.

पावन हा नावाप्रमाणे मनाने व विचारांनी पावन, निष्पाप आहे. कादंबरीभर त्याची सात्त्विकता, उदातत्ता व्यापून राहते. बाबासाहेब आंबेडकर त्याचे दैवत आहेत. लेबर कॅम्पमध्ये राहायला आल्यावर; तेथील बकाल जीवन पाहिल्यावर पावनला नव्याने शिस्तबद्ध, संस्कारक्षम मने घडवावयाची सुसंधी मिळाल्यासारखे वाटते. नव्याने लेबर कॅम्पमध्ये आंबेडकरी विचारांनी सक्षम बनलेला वस्ती उभी करावी असे वाटते. येथील तरुणांची नागरिक संघटना उभी करण्यासाठी पावन खूप कष्ट घेतो.

पावन कॅम्पात येण्यापूर्वी असे प्रयत्न कम्युनिस्ट विचारांच्या कार्यकर्त्यांनी तसेच आंबेडकरवादी विचारवंतानी अनेकदा केले. परंतु तेथील लोकांच्या मानसिकतेत, जीवन जगण्याच्या शैलीत काहीही फरक पडला नाही. त्यातून चांगले उभे राहण्याऐवजी वाईट घडत गेले. छोट्या कार्यकर्त्यांमध्ये काटाकाटीचे राजकारण उदा. नाशिकचा नाशक्या, नगरचा नगऱ्या अशा भिंती उभ्या राहिलेल्या होत्या. त्यामुळे नव्याने काम हाती घेतलेल्या कोणत्याही कार्यकर्त्याला तेथे काम करूच दिले जात नव्हते. पर्यायाने लेबर कॅम्पमध्ये सुधारणाही कधी घडून आली नाही. उलट कालचा कार्यकर्ता आजचा व्यसनी, रोगीट, कर्जबाजारी असा होऊन घरदार उद्ध्वस्त झालेला असेच चित्र दिसत होते.

आंबेडकरी विचार पावनच्या रोमरोमात भिनलेले आहेत. त्यामुळे तो संधी मिळेल तेव्हा लेबर कॅम्पमध्ये आपल्या विचारांनी तरुणाईची मने वळविण्याचा प्रयत्न करतो. लेबर कॅम्पमध्ये पाणी जाण्याचा प्रश्न उद्‌भवल्यावर तो बोर्ड ऑफिसर नंतर किग्ज सर्कल व त्यानंतर शिंदेवाडी अशा अनेक ठिकाणी फोन करतो. मोर्चा काढण्याचाही निर्णय घेतो. मात्र त्याला मदत करण्याऐवजी सर्व माणसे पक्ष, जातपात काढून भांडणे उकरतात. शेवटी थाळीप्रचार करण्याचा निर्णय होतो. नळावरील भांडणाने रक्तबंबाळ झालेल्या बाईला घेऊन पोलिस स्टेशनला जाण्याचा निर्णय घेणाऱ्यांचा त्याला संताप येतो. म्युनिसिपाल्टीच्या नोकरशाही विरुद्ध तो संतापतो. पण पुढारी त्याला सभा घेण्याची विनंती करतात तेव्हा भाषणास सुरूवात करतो. तो या भाषणाच्या शेवटी म्हणतो, आपण प्रतिकार केल्याशिवाय, आवाज उठवल्याशिवाय, नव्या युगाचे पुढारलेल्या मुंबईचे स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत हे सिद्ध केल्याशिवाय आपणाला काही मिळणार नाही ...... (पृ. १३५, १३६) नागरिक संघटनेची गरज तो स्पष्ट करतो. तसेच बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे उत्तम जीवन प्राप्त करण्यासाठी संघर्ष करावा लागेल. त्याचे भाषण ऐकूनही लोकांच्या मनावर काही परिणाम होत नाही. लोक पुढाऱ्यांच्या मागे धावतात ते पाहून पावन खचतो. तरीही शेवटी त्याच्या प्रयत्नांमुळे लेबर कॅम्पात पाणी येते. त्याला चळवळीपासून परावृत्त करणे, त्याच्या मित्रांना त्याच्यापासून तोडणे असे प्रयत्न करून पावनचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न सातत्याने होत राहतो. पण पावनना मेलेले रक्त शरीरातून काढून शरीर सतत सज्ज ठेवायचे असते. म्हणून अज्ञान, अनास्था आणि उदासीनता, जुने संस्कार या शत्रूंविरुद्ध पावन युद्धाला सतत तयार होत असतो.

प्रत्यक्ष त्याची पत्नी त्याच्या चळवळीच्या कार्याचा विरोध करते. तिला समजावताना तो म्हणतो, सुशीला, तसं नाही, पण त्या वस्तीत सर्वांचीच नाकेबंदी झालेली आहे. प्रत्येकजण कोंडीत सापडलेला आहे. त्यातून सुटायचे कोणालाच सुचत नाही. का सुचत नाही. कसली कोंडी आहे ते कळायला मार्ग नाही. पण आहे एवढे खरं.

पावनला पुढारीपणाची, दिखाऊपणाची हाव नाही तर शुद्ध अंत:करणाने लेबर कॅम्पातील अज्ञानाचा अंधार दूर करायचा आहे. तो पत्नीलाही नाउमेद न होता आशावादी होण्याचा प्रयत्न करण्यास सांगतो. त्याचे शत्रू वाढतात. त्याच्या अंगातील पांढरा शर्ट पाहून, आईच्या मृत्यूचे शल्य वागविणारा लाल्या

पावनच्या मानेवर सुरी ठेवतो. परंतु पावनला मारत नाही. कॅम्पातील शंकर सुद्धा पावनला मारण्याचा प्रयत्न करतो. येथे शक्ती खर्च करूनही काही उगवणार नसल्याचे पाहून पावन ही कोंडी कशी फोडावी याचा विचार करतो. केशव शिंदे सारखा मित्र पावनला रत्नाची उपमा देतो. तो पत्राने कळवितो की, तुम्ही जरी अभिमन्यू आहात तरी अंत ठरलेला आहे ...... म्हणून अर्जुन होईपर्यंत थांबा. शिका डॉक्टर व्हा, तुमची या विषयातील ध्येये पुरी करा मग कार्य हाय लेव्हलवरून सुरू करा.

तो कम्युनिस्टचा जावई असल्यामुळे, काही जण त्याच्यावर संपूर्ण विश्वास टाकायला घाबरतात. तर आंबेडकरवादी लोकांना त्याचे पोटतिडकीने वागणे वरपांगी वाटते. शेवटी तर पावनच्या जीवावरच बेतणार अशी परिस्थिती उद्‌भवते. दारू वाल्यांच्या विरोधात तो करत असलेल्या चळवळीतून सर्व दारू वाले एकत्र होऊन पावनच्या चाळीला वेढा देतात. पावन पगारेला आमच्या हवाली करा अशा आरोळ्या मारतात. नेमका त्यावेळी पावन पगारे व त्याची पत्नीही घरी नव्हते. त्याच्या कृत्यातील प्रामाणिकपणा लक्षात न घेता त्याला हानी पोहोचवण्यापर्यंत लोक मजल मारतात. पावनला त्याचा मित्र सांगतो...... पगारे, एक मित्र म्हणून सांगतो, या पशुंसाठी काही करू नका. तुम्ही शिकणं मोठ्या जागेवर जाणं आणि तुमची मुलबाळं सुधारणं ही देखील अस्पृश्यता घालविणं आहे. तुम्ही तेच करा. आणि होता होईल तर असं करा. वडील, आपली जंता राहत तिथे राहू नका. निष्कारण आदरचे आणि वैराचे बळी होता. यातील निष्कारण आदराचे आणि वैराचे बळी होतात. या कांबळेच्या उद्‌गारता एका सच्च्या कार्यकर्त्याच्या जीवनाचे सार एकवटलेले आहे. एकाच वेळी एक व्यक्ती एकाच समाजातील काही घटकांसाठी आदरार्थी होते. तर काही घटकांसाठी वैरी होते. आदर करणारे वैराने सूडाने पेटलेल्यांपेक्षा कमजोर ठरतात व चळवळीचा नारा यांच्यासाठी, यांच्यात आत्मभान यावे यासाठी सुरू केलेला असतो. तेच नेमके चळवळीच्या म्होरक्यालाच रोषाचा केंद्रबिंदू मानून त्याचा खातमा करतात. अशावेळी तोच कार्यकर्ता जो चळवळी समजून घेणाऱ्यांच्या आदरास पात्र होतो. अशी सदाचारी, सुशील माणसे, क्रांतिकारकांच्या रक्षणासाठी तोकडी पडतात. म्हणून कांबळेच्या शेवटच्या उद्‌गारात पावनबद्दलचा अभिमान, आदर तर दिसतोच परंतु त्याच्यासारख्या पाणिदारपणा नसल्यामुळे त्याच्या खांद्याला खांदा लावून लढण्याची त्याचे रक्षण करण्याची हिंमत नसल्यामुळे असमर्थताही कांबळे व्यक्त करतो.

अनंत अडचणींना सामोरे जाऊनही पावनला लेबर कॅम्पमध्ये संघटना निर्माण करावीशी वाटते. अशा उच्च ध्येयाने प्रेरित झालेल्या सच्च्या नायकाची कथा बागूल यांनी साध्या पण ओघवत्या भाषेत मांडली आहे.

पावनला त्याची स्वप्ने पूर्ण होण्यास, लेबर कॅम्पमधील लोकच सहकार्य करीत नाहीत. त्यांची संपूर्ण विनाशाची असलेली जीवनशैली बदलण्याची मानसिकता बळगत नाहीत. उलट पावनच्याच जीवावर उठतात. अशा विचित्र कोंडीत पावन सापडतो. पावनचे त्या लेबर कॅम्पमध्ये एक नवे युग स्थापन करण्याचे स्वप्न केवळ स्वप्नच होऊन उरते.

नेहमी वास्तवदर्शी लेखन करणाऱ्या बाबुराव बागूल यांनी कादंबरीच्या कलावस्तूपेक्षा मानवी जीवनाचे महत्त्व सांगितलेले आहेच. त्याचबरोबर जीवनातील विविध ताणतणाव मानवी मनाची कशी उलघाल करतात. योजलेला ध्येयवाद आणि प्रत्यक्षातले उग्र भीषण वास्तव परिस्थिती 'कोंडी' करून व्यक्तीला भोवऱ्यात अडकवून ठेवते याचे मनोवेधक आणि वास्तव चित्रण 'कोंडी'त आढळते.

संघर्ष हाच 'कोंडी' ह्या कादंबरीचा आत्मा आहे. ही कादंबरी नावाप्रमाणेच पावन असलेल्या एका निष्ठावंत कार्यकर्त्याच्या धडपडीची प्रयत्नांची आणि संघर्षमय वातावरणातील आहे. त्यातील व्यक्त होणारे संभाषण, वादविवाद, भांडणे, काह, गटा-तटाचे राजकारण यातून ती ओघवती होते. काव्यात्मकता हा बागुलांच्या भाषा शैलीचा विशेष गुण आहे. या कादंबरीतही तो दिसतो. स्वत: पाहिलेल्या अनुभवलेल्या आणि भोगलेल्या वास्तवाचे यथार्थ चित्रण करण्याचे बागुलांचे सामर्थ्य आहे. काव्यात्मक वाक्यांची जागोजागी केलेली पेरणी याचे उदाहरण आहे.

दलित चळवळींचा परिणाम दलित कादंबरी लेखनावर झाला. दलित कादंबरीत निराळेपण आले. हे निराळेपण तिच्या तळागाळातील स्वकीयांच्या, तसेच अन्य पीडितांच्या वेदनांना प्रकट करण्यात एकवटलेले आहे. असे चित्र 'कोंडी' त दिसते. क्रांतीचे चाक अर्धेच फिरले. आसासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांती होऊच शकत नाही. ते चक्र आम्हीच फिरवू ........ असे म्हणणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हा विश्वास सुरूवातीला घेऊन निघालेला पावन पगारे अखेर स्वकीयांच्याच विरोधाच्या 'कोंडी'त सापडतो.

**ग्रामीण कादंबरी :**

१९२० ते १९४० या कालखंडात अनेक कादंबऱ्या लिहिणाऱ्या अनेक लेखकांची पाळेमुळे ग्रामीण भागात रोवलेली होती. बालपण खेड्यात व उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने शहरात वावर होता. ह.ना. आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा, धनुर्धारी यांची पिराजी पाटील ही कादंबरी यातून ग्रामीण परिसराचा प्रकट केले. १९४२ मध्ये गांधीजींनी 'खेड्याकडे चला' ही हाक दिली. याचा परिणाम कादंबरी लेखनावरही झालेला दिसतो. १९४० ते १९६० या काळात ग्रामसंस्कृतीचे चित्रण व्यंकटेश माडगूळकर, गो.नी. दांडेकर, श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांतून होऊ लागले. मात्र या मंडळीचे बालपण खेड्यात व नंतरचे वास्तव्य शहरात होऊ लागले. म्हणजे त्यांचे अनुभवविश्व ग्रामीण होते तर त्याच्या अभिव्यक्तीवर नागर साहित्यादर्शाचा ठसा उमटलेला होता.

**पाचोळा :**

रा.र.बोराडे (१९७१) ही ग्रामीण भाषेत लिहिली गेलेली मराठीतील पहिली कादंबरी आहे. देश स्वतंत्र झाला. राज्यांची निर्मिती झाली. जुन्या गोष्टी भूतकाळ जमू लागल्या. तसेच जुने रोजगारही बुडू लागले. बलुतेदारी नाहिशी होऊ लागली. शहरांतील रोजगार लोकांना आकर्षित करू लागले. शहरीकरणाने जोर धरला व खेडी खिळखिळी होऊ लागली. शहरीकरणाने ढासळणाऱ्या ग्रामीण व्यावसायिकाचे हाल होऊ लागले याचे दर्शन 'पाचोळा' मधील गंगाराम शिंप्याच्या रूपाने डोळ्यासमोर उभे राहते.

पाचोळा ही मराठवाड्यातल्या एका खेड्यातील गंगाराम आणि पारबती या शिंपीकाम करणाऱ्या कुटुंबाची शोकांत कहाणी आहे. स्वत: पारबती ही कहाणी सांगते आहे. तिचे पहिले वाक्य बरं चाल्लं व्हतं कुनाचं एक नव्हतं का दोन नव्हंत ...... अशी समाधानाच्या सुरात करताना दिसते. तसेच वर्ण्य विषयाला आडवळण न घेता सरळच हात घालते. पारबती ही व्यक्तीरेखा ग्रामीण विभागातील स्त्रीचे वास्तव आणि प्रातिनिधिक चित्रण घडविणारी आहे. दारिद्र्य, अज्ञान, कष्ट, उपासमार आणि मुले यांनी पिचलेल्या आणि शेवटी निष्क्रिय झालेल्या नवऱ्याचा संसार स्वत:च्या हातावर तोलताना ही स्त्री आपल्या एकाकी हातांनी जीवनसंघर्षाचा, नियतीला येइला त्या परिस्थितीला सामोरे जाताना दिसते.

ओढग्रस्तीला संसार सांभाळत जीवन जगणाऱ्या पारबतीच्या कौटुंबिक जीवनात गावातील धनदांडग्या गरडामुळे वादळ निर्माण होते आणि त्यात या गरीब कुटुंबाची पाचोळ्यासारखी वाताहत होत जाते.

लातूरच्या शिंप्याकडून फॅशनेबल कपडे शिवून मागविणारा गावातील श्रीमंत आसामी गरडू आपल्या पोराकरवी गंगारामकडे जुने धोतर दंड घालायला पाठवितो. पोरंग अत्यंत उद्धटपणे गंगारामशी बोलतं. त्यामुळे गंगाराम ते क्षुल्लक काम नाकारतो. येथेच श्रीमंत विरुद्ध गरीब अशी वर्ग संघर्षाची ठिणगी पडते. गाव दुसरी मशीन आणीन तवाच दंड घालून धोतर नेसेन अशी प्रतिज्ञा करत गरड इर्षेपोटी दुसरा शिंपी गावात आणतो. त्याचा आपल्या घरात दुकान थाटायला जागा देतो आणि त्या घटनेमुळे आधीच डबघाईत आलेला गंगारामला व्यवसाय पूर्णपणे उद्ध्वस्त करतो.

गंगाराम बेरकी नाही. तो काळाची पावलं ओळखू शकत नाही. मुलाची इच्छा नसताना तो बळजोरीने त्याला शिवण व्यवसाय शिकायला सांगणाऱ्या गंगारामला मुलाची भानाची या व्यवसायबद्दलची अनास्था पाहून दु:ख होते. मात्र गंगाराम तापट स्वभावाला आणि जिद्दी आहे. मुलगा शहरातून शिवणकाम शिकून आला की, आपल्याकडेही फॅशनेबल कपडे शिवून घेण्यासाठी येतील. असे त्याला वाटते व भानाचे शालेय शिक्षण संपवून, त्याच्या मनाविरुद्ध त्याला लातूरला शिवणकाम शिकायला पाठवतो. भाना शिवणकाम करण्यास नाईलाजाने जातो व थोड्याच दिवसात तेथील शिंप्याशी भांडून गावी परततो. भानाचे हे वर्तन पाहून स्वत:ची प्रकृती अत्यंत प्रतिकूल असूनही गंगाराम स्वत: नव्या तऱ्हेचे शिवणकाम शिकायला, सिद्ध होतो. खूप मेहनत करतो. त्याच्या तब्बेतीची हेळसांड होते त्याला क्षयरोग होतो. इच्छापूर्ती न झाल्याने गंगाराम अधिक संतापी होतो. भानाने त्याचा अपेक्षाभंग केला म्हणून भानाचा राग करतो, तर बापाने आपल्याला आवडत असलेले काम म्हणजे शाळेत जायचे बंद केल्याने भाना बापाला दोषी समजतो. त्यात एका पोरीच्या छेडछाडीचा आरोप भानावर आल्याने गंगारामचे व भानाचे भांडण होते आणि भाना समदयानालाच हे धंदे सुचायलेत म्हणून बापाला सुनावतो. जीवनात चारही बाजूंनी अपयशी ठरलेला गंगाराम क्षयरोगात एक दिवस मरण पावतो.

गरडासारख्या श्रीमंत व रगेल माणसाशी मिळतेजुळते न घेता, त्याला डिवचून, आव्हान देणारा तापट, हट्टी व परिस्थितीचा सारासार विचार न करणारा

गंगारामसारख्याच तारकटलेला, घुम्या व हट्टी त्याचा पौगंडावस्थेतील मुलगा भाना यांच्या वादात दोलायमान स्थितीत सापडलेली पारबती हताश होते. आपल्या दरिद्री संसारात मोलमजुरी हातभार लावणारी पारबती कुणाच्या अध्यातमध्यात नसलेली स्त्री आहे. त्याची शिवणकलेतील मर्यादा तिला माहीत आहे. आधुनिक व्यवसायाशी त्याला दुरान्वयाने संबंध नाही. तसेच सारासार विचार करण्याची त्याची कुवतही नाही. त्यामुळे क्षुल्लक घटनेच्या रूपाने, गरडाच्या मुलाने दिलेल्या दुरुत्तरांमुळे त्याचा अहंकार दुखावतो. शाळेत उत्तम गुण मिळवणाऱ्या मुलाच्या, भानाच्या भवितव्याचा विचार न करता त्याला शाळेतून काढून घेतो व त्याला न आवडणारे शिंपीकाम त्याच्यावर लादतो. वास्तविक एका मुलाचे बोलणे गंगारामसारख्या प्रौढ गृहस्थाने एवढे मनावर 'घ्यायला नको. त्यांच्या वादात सामोपचार घडविण्याचा अगतिक प्रयत्न पारबती करते. त्यामुळे जास्तच इर्षेला पेटून गंगाराम पुढचे पाऊल उचलणे आणि स्वत:बरोबरच कुटुंबाचीही वाताहत करून घेतो.

थोडक्यात पारंपरिक गावगाडा उद्ध्वस्त होत असल्याची वेदना रा.रं. बोराडे यांनी 'पाचोळा' कादंबरीत चित्रित केली आहे. हेकेखोर, स्वाभिमानी अर्धकुशल कारागीर गंगाराम, त्याची समजदार सोशिक बायको पारबती तारुण्याच्या उंबरठ्यावर उभा असलेला मुलगा भाना आणि तानी नावाची मुलगी अशा कुटुंबाचा प्रमुख एका एक व्यवसाय (शिंपीकाम) करतो. त्यातून आर्थिक कोंडी होऊन ताण, समस्या निर्माण होते. धनदांडग्या गरडाशी लढा देण्याचा तो प्रयत्न करतो. अस्मिता जपण्याचा प्रयत्न करतांना गंगारामचा बळी जातो. 'पाचोळा' कादंबरीतील, निवेदन-संवादांनी घटनाप्रसंगाना दृश्यरुप लाभते. तसेच हेच, लकबी, म्हणी, वाक्प्रचार, उपमा-प्रति मादी ग्रामीण वातावरण पोषक ठरतात.

'पाचोळा' कादंबरी ग्रामीण जीवनाचे, तेथील वर्गभेदाचे चित्रण करतानाच 'गंगारामचीं' समस्या कोणा एका खेड्यातील विशिष्ट व्यक्तीची, विशिष्ट व्यावसायिकाची समस्या न राहता एकूणच ग्रामीण समाजव्यवस्थेतील सर्वच व्यावसायिकांचे आधुनिक काळात होत असलेले उच्चाटन त्यांच्यातील कमतरता, येणारे वैफल्य याचे चित्रण करते.

'कोंडी' आणि 'पाचोळा' या कादंबऱ्यातील नायक अनुक्रमे पावन पगारे आणि 'गंगारम शिंपी' आपआपल्या आयुष्यात संघर्ष करतांना दिसतात. पावनाचा संघर्ष दलितसमाजाचा संघटित करून त्यांच्यातील अज्ञान, गैरसमज,

अंधश्रद्धा दूर व्हाव्या, त्यांनी शिक्षणाची कास धरावी. स्वआरोग्य संपन्न जीवन जगावे. आंबेडकरांनी सांगितले त्या तत्त्वज्ञानाचे परिशीलन करावे यासाठी आहे. आंबेडकरी चळवळ जनमाणसात रुजावी. स्वतंत्र भारताच्या मंबई महानगरात दलितानांनी ताठ मानेने जगावे यासाठी पावन प्रयत्न करतो. त्याच्या सभोवती राहणाऱ्यांपैकी काहींना पावनची तळमळ समजते तर काहींना त्यात राजकीय स्वार्थ आढळतो. आपल्याच लोकांकडून पावनची भावनिक 'कोंडी' होते. 'पाचोळा' मधील गंगाराम परिस्थिती संघर्ष करतो त्याने स्वतःच श्रीमंत वर्गाच्या गरडाशी संघर्ष ओढवून घेतला, त्यात आव्हान दिले. या आव्हानात गंगारामची कुटुंबासह फरफट होते व वर्गीय संघर्षात त्याची 'पाचोळ्या' सारखी गत होते. पावन समाजबांधवांसाठी, त्यांच्या हितासाठी संघर्ष करतो तर गंगाराम गावातील बड्या धेंडाविरुद्ध संघर्ष करतो दोन्ही संघर्षात हार स्पष्ट दिसते. पावनला सामाजिक जीवनात विरोध होऊन तो हतबल होतो. गंगारामचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होऊन तो अखेर मृत्यू पावतो. एकूणच दलित कादंबरी 'कोंडी' आणि ग्रामीण कादंबरी 'पाचोळा' यांव्दारे पावनच्या हातात उद्ध्वस्त होण्याशिवाय काही लागत नाही. त्याच्याच समाज बांधवांकडून त्याचे खच्चीकरण होते. तर 'पाचोळा'त गंगारामचे गावातील एका श्रीमंत माणसाला दिलेल्या आव्हानातून कुटुंबाचे अतोनात नुकसान व स्वतःचा मृत्यू होतो.

वरील दोन्ही कादंबऱ्यात पावनसारखा सतशील माणूस व गरिबीतही स्वाभिमान जपणारा गंगाराम पराजयाचे, अपमानाचे धनी होतात. पावनला मोठे अपयश येते तर गंगारामच्या जीवनाची अखेर होते.

* * *

## हाल्या हाल्या दुधू दे! (बाबाराव मुसळे) व श्राद्ध (उत्तम कांबळे) समाजवास्तव व राजकारणाचा बळी ठरणाऱ्या दोन अस्वस्थ नायकांची शोकांतिका,

– प्रा. अनिता हिंमतराव तायडे

१९६० नंतर मराठी साहित्यात खऱ्या अर्थाने बहुजनांचे साहित्य आकार घेऊ लागले. गावकुसाबाहेरचा समाज, सर्वसामान्य माणूस, याच समाजातील स्त्रियांच्या जगण्याचा वेध घेण्याचा प्रयत्न बहुजनांमधूनच लेखन करणारे साहित्यिक घेऊ लागले. 'ही सारीच अभिव्यक्ती जे भोगले-सोसले ते व्यक्त केले' या पातळीवर असल्यामुळे त्यात अभिजातता अधिक प्रखर दिसते.

एकूण समाजमनाचा हा अविष्कार ग्रामीण व दलित साहित्य म्हणून उदयास आला. दुर्लक्षित, उपेक्षित, वर्षानुवर्ष दास्यात राहिलेल्या, आर्थिक विषमतेचा बळी ठरणाऱ्या माणसाचा, त्याच्या वेदनांचा हा उत्स्फुर्त उद्रेक आहे. मुठभर लोकांच्या हातातले खेळणे होण्यापेक्षा 'स्व' आत्मभान जागे होणाऱ्यांचे हे सारे साहित्य होय.

अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, रणजित देसाई, शंकर पाटील, हमीद दलवाई, रा.रं. बोराडे, आनंद यादव, ना.धों महानोर, चंद्रकुमार नलगे, द.ता. भोसले, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले या लेखकांनी ग्रामीण साहित्य चळवळीला आपल्या ग्रामीण कांदबरीमधून साऱ्या अर्थाने बळ दिले. गावगाडा, बोली, माणूस, त्याची विचारसरणी, गावातील कुटील राजकारण, सावकारी विळखा, नात्या-नात्यांमधील फसगत, स्त्रियांचे शोषण, आर्थिक विषमता यांचे वास्तव चित्रण ग्रामीण कांदबरीने केले.

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आबेंडकरांनी महार, मांग, चांभार, शूद्र शेतकरी, भटके-विमुक्त, आदिवासी, वंचित व स्त्री या सर्वांच्या मानव-मुक्ती लढ्याचे नेतृत्व करीत दलित चळवळ उभारली. समाजव्यवस्थेपासून तोडून बाजूला टाकलेल्या माणसाला आत्मभान येऊन जगण्याचे मर्म समजले. दलित साहित्याच्या माध्यमातून चळवळ अधिक प्रभावी बनली. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, ना.रा. शेंडे, हरिभाऊ पगारे, नामदेव व्हटकर, ज.वि. पवार, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, उत्तम कांबळे या देलत साहित्यिकांनी

समाजाने वाळीत टाकलेल्या माणसांचे जगणे चित्रित केले. समतेच्या विचारांची नव्याने साहित्यात पुनर्मांडणी केली. दलितांचा हुंकार चळवळीच्या, साहित्याच्या माध्यमातून दृश्यमान झालेला दिसतो.

पहिल्या व दुसऱ्या पिढीच्या ग्रामीण व दलित साहित्यिकांनी 'माणसाच्या जगण्याचा परिपाठच' साहित्यात मांडला हे खरे मात्र तिसऱ्या पिढीच्या लेखकांनी बदललेल्या सामाजिक परिस्थितीचा, जागतिकीकरणाच्या रेट्याचा, राजकारणातील संघर्षाचा बदललेल्या सामाजिक प्रश्नांचा, सामान्य माणसाच्या शोकांतिका अवस्थेचा विचार प्रकर्षाने मांडला.

बाबाराव मुसळे यांनी आपल्या पहिल्याच कांदबरीत 'चिमणी चिमणी खोपा दे, हाल्या हाल्या दुधू दे! या लोकपरंपरेतील गीतातील 'चिमणी' व 'हाल्या' या प्रतिमांचा सूचक, उपरोधिक वापर करीत समाज वास्तवाचे चित्रण केले. 'हाल्या' कधीच दूध देत नाही. त्याप्रमाणेच शेतकऱ्यांच्या मागची संकटे काही केल्या दूर जाणार नाहीत. खेड्यातील शेतकऱ्याची या दुष्टचक्रातून सुटका नाही. दिवसेंदिवस या सापळ्यात अडकत जात त्याचा प्रवास अखेर आत्महत्येपर्यंत होतो. 'हाल्या' हा समाज व्यवस्थेसाठी प्रतीक म्हणून वापरलेला शब्द.

न्यानबा हा कांदबरीचा नायक. एक कनिष्ठ शेतकरी. वयात आलेल्या लेकीच्या लग्नाची काळजी न्यानबा व त्याची बायको आनसा दोघांनाही असताना आनसाच्या भावाच्या मध्यस्थीने सोबाचे लग्न धडधाकट घरात ठरते. त्या तोलामोलाची आर्थिक ऐपत नसतांनाही केवळ मेव्हण्याच्या आश्वासनाला बळी पडत मुलीचे लग्न न्यानबा ठरवतो. मात्र हुंड्याचे पैसे देतो म्हणणारा मेहुणा ऐनवेळी काखा वर करतो. स्वार्थीपणाने न्यानबाला सावकाराच्या दारात उभे करतो. 'सावकार पैसे देतो म्हणतात, पण काही वावराशिवाराची खरेदी करुन द्या म्हणतात' (पृ.४) असे म्हणून तो न्यानबाला सावकाराच्या दावणीला बांधतो. न्यानबा संतोबा सावकाराकडून पाच हचार रुपयाचे कर्ज घेतो आणि तीन एकर रान एका वर्षाच्या सोडखरेदीवर सावकाराच्या नावे करून देतो.

सोबाच्या लग्नानंतर न्यानबा व आनसाला मोठ्या जबाबदारीतून मुक्त झाल्यासारखे वाटते. सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी न्यानबा 'एच फोर' कापूस शेतात लावतो. ते 'बी' सोबाचा सासरा पुरवितो. सोसायटीतून खते, औषधे मिळविण्यासाठी कारकुनाला कमिशन द्यावे लागते. न्यानबाचा व्यवहार गावकऱ्यांना पटत नाही तेव्हा ते न्यानबाला टोचून बोलतात. त्यामुळे न्यानबा गावकऱ्यांपासूनही

दूर जातो. गावापासून तुटलेला न्यानबा पूर्णपणे सावकाराच्या सापळ्यात अडकतो. जमिनीच्या मोजणीच्या वेळी पांडेबुवाच्या लुच्चेपणामुळे व सावकाराच्या दंडुकीशाहीमुळे अपमानासह दोन हात जमीन त्याला सोडून द्यावी लागते. गावातील रखमीकडून सोबाच्या मामानेच सावकाराचे नाव पुढे करुन न्यानबाला कर्ज दिले हे रहस्य उलगडते. आनसाचा भाऊ सावकराच्या व्यवहारात, सोबाच्या लग्नात, व औतासाठी बैल देण्याच्या बाबत साऱ्याच प्रसंगी पैशासाठी त्यांची फसगत करतो. दुसरीकडे सोसायटीच्या कारकुनाच्या ५०० रुपयांच्या गंडवण्याने ग्यानबाच्या घरावर जप्ती येते.

कर्ज काढून सोबाचे लग्न केल्यावर ती सुखात असेल अशी अपेक्षा न्यानबाला असते. मात्र सासऱ्याच्या वाईट कृत्यांमुळे सोबा तिच्या नवऱ्यापासून दूर जाते. संसार अर्धवट राहतो. तिच्यावर खोटे आरोप होतात. गावातील लोक सोबा व तिच्या नणंदेच्या दिराबद्दल गैरसमजापोटी त्यांना मारझोड करतात. सोबा गावातल्याच एका विहिरीत जीव देते. तिचा नवरा वेडा होतो. सोबाच्या दुःखद वैवाहिक जीवनाची विल्हेवाट लागते. न्यानबा यामुळे अधिकच खचतो. शेतातला कापूस वाया जातो. सावकार कोर्ट–कचेरी ची भीती त्यांना दाखवितो. त्यावेळी न्यानबा सारा संताप आनसाला मारून तिच्यावर काढतो. सावकाराशी चाललेल्या या संघर्षात व त्यातील भीतीतच न्यानबाची शेवटाकडे वाटचाल होते. शोकांतिकेतील आणखी एक भाग म्हणून न्यानबाला घशाचा कॅन्सर होतो. आनसा व मुलगा प्रकाश जवळ नसताना या संघर्षामुळे त्याचा मृत्यू होतो. गरीब न्यानबा दंडलिशाहीचा बळी पडतो.

न्यानबाचा मानसिक संघर्ष संपूर्ण कांदबरी भर वाचकाला अस्वस्थ करतो. एकीकडे भ्रष्ट व्यवस्थेची पाळेमुळे, सावकारी पाश व दुसरीकडे जवळच्या लोकांनी केलेला विश्वासघात त्याच्या दुरावस्थेला कारणीभूत ठरतो. सोसायटीची व खताचं परमीट मिळविण्यासाठी भ्रष्ट सरकारी यंत्रणेचे वाईट अनुभव घेतांना न्यानबा म्हणतो, ''या नवकरीवाल्या समद्या लोकायचं असंच हाये. गरीबागुरीबाचा कोणी वालीच नाही'' (पृ.४२) न्यानबाच्या बोलिण्यातून त्याची अस्वस्थता सातत्याने प्रकटते.

आर्थिक व्यवहारात सोबाच्या लग्नापासून न्यानबा प्रत्येक पावलावर फसत जातो. सर्वसामान्य शेतकऱ्यांना धनाढ्य सावकार दंडेलशाही व लुच्चेगिरी करून उद्ध्वस्त करतात तर सरकारी यंत्रणेतील कारकून शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा,

भोळेपणाचा व विश्वासाचा गैरफायदा घेऊन लुबाडतात याचे दर्शन न्यानबा या नायकाच्या शोकांतिकेतून घडते. स्वतःच्या नशिबी आलेल्या यातने बाबत न्यानबा म्हणतो, ''आणि हाल्याले दूध मागत राहिले आणि शेवटी सगळा सत्यानाश पहावा लागला. पोरगी गर्भासंग मेली, जावई येडा झाला, आनसा कुठे आहे माहीत नाही. काय फायदा झाला या उटारेटीचा? आपल्यामुळे कोणाला सुख लाभलं नाही म्हणून आता आणि आणखी जगणं म्हणजे पाप वाढविणे हाये'' त्यांच्या अंतरंगांची जखम या वाक्यातून भळाभळा वाहते व वाचकाच्या मनाला चटका लावत राहते.

बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' चा नायक न्यानबा प्रत्येक खेड्यातल्या शेतकऱ्याचा संघर्ष मांडतो, 'हाल्या' हे दास्याचे प्रतीक आहे. ज्या दास्यातून मुक्ती मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न न्यानबा करतो. परंतु मुक्ती न मिळता त्यात जास्तीत जास्त रूतत जातो. सावकारी व सरकारी यंत्रणारूपी हाल्याखाली ग्यानबा दुधासाठी आपल्या संसाराची विल्हेवाट लावतो. सुखाचा शोध घेता घेता केवळ संगनमताचा व कावेबाज राजकारणाचा बळी ठरणारा नायक भीषण कडवट प्रखर समाज वास्तवाचे भाष्य कादंबरीत करीत राहतो.

उत्तम कांबळे स्वातंत्र्यानंतर जन्मलेले आणि फुले-शाहू-आंबेडकर-मार्क्सचे नातं आकलन झालेले, समाज पिरवर्तनाची एक स्पष्ट भूमिका मांडणारे साहित्यिक. दलित-पीडितांच्या जीवनाचे भोग अक्षर बद्ध करणारे लेखक. जागतिकीकरणात शोषितांची स्थिती मांडणारे लेखक म्हणून नवे संदर्भ देणारे उत्तम कांबळे सामान्य माणसाच्या भाकरीची तीव्रता प्रकर्षाने मांडतात. जागतिकीकरणासह वर्तमानाचे मंथन, दलित-आदिवासी-भटके-ओबीसी-देवदासी-मजूर यांच्या जीवनाचा अवकाश त्यांच्या साहित्यात दिसतो.

समाज परिवर्तनाच्या विविध चळवळींनी सामाजिक आशय भक्कम केला. महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळींनी सामान्यांचे उत्थापन केले. उपेक्षितांचा परिपूर्ण विचार येथे केंद्रस्थानी मानून समानतेच्या नव्या व्यवस्थेला निर्माण करणे येथे अपेक्षित होते. मात्र स्वातंत्र्यानंतर सारे उलटेच झाले. जात वास्तव, आर्थिक विषमता, राजकारण यांची तीव्र चढाओढ वाढतच गेली. शोषणाचे नवे शास्त्र तयार झाले. आत्मसन्मानाची लढाई संपविण्याचे प्रयत्न नव्या शोषणशाहीने व्यवस्थित केले.

स्वार्थप्रेरित अनैतिक संवेदना फोफावल्या व सामान्य माणसाची परवड वाढली. शोषित, पीडित, उपेक्षित मागास जाती-जमाती यांच्यात परिवर्तन होण्याऐवजी आपआपसात लढत राहण्याची सोय नव्या शोषणशाहीने केली. 'श्राद्ध' ही कादंबरी अशाच अर्थकारण, राजकारण, धर्मकारण व समाजकारणातील स्वार्थ व संकुचित वृत्तीला बळी पडणाऱ्या 'आबा'ची शोकांतिका होय.

'श्राद्ध' कादंबरीचा नायक आबा कांबळे. वयाच्या पंधराव्या वर्षी शरणगुपी गावातून पळ काढून मुंबई गाठतो. शिक्षणाची आवड असूनही म्हारांच्या नशीबी गावकीच असल्यामुळे वडील पाटलाच्या घरी कामासाठी आबाला पाठवितात. गुराढोरांसारख्या जीवनाचा त्याला तिरस्कार येतो व पळ काढून आबा मुंबई गाठतो. पाच वर्ष हॉटेलात नोकरी, नंतर मिलमध्ये नोकरी करीत आबा दहा वर्षांनी गावांकडे येतो. त्याचवेळी डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी सारा देश ढवळून निघत होता. आबा चळवळीत सामील होतो. चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश अशा अनेक लढ्यामध्ये सहभागी होतो. आबाला बाबासाहेबांबद्दल प्रचंड ओढ. डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूने आबा व्यथित होतो. त्यांच्या मृत्यू पश्चात दलित चळवळ व रिपब्लिकन पक्षाची उडालेली शकलं आबाला होरपळून काढतात. दलित पँथरची यशस्वी वाटचाल आबाला बाबासाहेबांचे स्वप्नपूर्ती झाल्याचे दिवास्वप्न दाखविते. आबा गावी परततो.

शरणगुपीत समाजातील लोकांचे मागासलेपण महार-मांग-चांभार यांचे विघटितपण संपविण्यासाठी आबा 'सहकार तत्वाचा' स्वीकार करीत. दूध डेअरी काढतो सर्व जाती आबाच्या नेतृत्वाखाली काम करतात. आर्थिक उन्नती, परिवर्तन आणि विकास येण्याचा मार्ग आबाला दिसतो. मात्र पारंपरिक व्यवस्थेतील गावपुढाऱ्यांना आपले अस्तित्व धोक्यात आल्यासारखे वाटते आबा कांबळेच्या भीमराव कांबळे या पोराला फुस लावून गावचा पाटील फोडतो. दलितांमध्ये झुंज सुरू होते. दुध डेअरीसह सोसायटी व इतरही संघटन संपते. आबाच्या डोळ्यांदखित गावात मागास जातींभोवती पूर्वीचीच चौकट निर्माण होते.

गावात व आबाच्या घरातच दोन गट तयार होऊन निवडणुकीचे वातावरण तयार केले जाते. भीमराव विरुद्ध आबा अशा फळ्या तयार होतात. प्रचाराच्या दिवशी पाटलांच्या भीमराव रुपी सोंगटीला मात देऊ शकणाऱ्या आबाला दगडफेक करून जखमी केले जाते. आबा कांबळे रक्तबंबाळ अवस्थेत कोसळतो व त्यातच त्याचा अंत होतो. गावातील जातीचे राजकारण, गटबाजी

घडवून आणून पाटलाची वर्णव्यवस्था आबाचा बळी घेतो.

हाल्या हाल्या दुधू दे! मध्ये बाबाराव मुसळे 'ग्यानबा'च्या माध्यमातून एका गरीब अल्पभूधारक शेतकऱ्याची दयनीय अवस्था मांडतात. सरकारी सोसायटीतील अधिकारी यांची लाचखोरी व दडपशाहीच्या सावकारी सापळ्यात अडकलेला 'न्यानबा' हा अख्ख्या शेतकरी, कष्टकरी समाजाचा शोकांतिक विचार पुढे ठेवतो. मूल्यहीन-स्वार्थी समाजाची वास्तव भीषणता न्यानबा आपल्या मृत्यूने दाखतितो.

तर श्राद्ध मध्ये स्वातंत्र्यांनतरही जात वास्तवाचे, दर्जाहीन राजकारणाचे समाज विकासावर होणारे परिणाम मानवी मूल्यांची होणारी पायमल्ली 'आबा कांबळे' यांच्या माध्यमातून अस्वस्थ करतो.

या दोन्ही कादंबऱ्यामधील नायक वेगवेगळ्या समाजस्थितीत, पार्श्वभूमीवर वावरत असले तरी समाजाच्या प्रचंड दुटप्पीपणाच्या धोरणांचा फडशा पाडतात. न्यानबा कौटुंबिक सुखासाठी झटतो तर 'आबा' समाज परिवर्तनासाठी मात्र दोहोंचा अंत या स्वार्थी मानवी वृत्तीमुळे, सत्ता लालसेमुळे, मनांत खोलवर रुजलेल्या जातव्यवस्थेमुळे होते हे नक्की. 'न्यानबा व आबा' यांची जीवन व्यथा खोट्या, भ्रामक, ध्येयहीन मानवी संस्कृतीला छेद देत नैतिक मूल्यांचे अधिष्ठान, माणुसकीचे महत्त्व प्रकर्षाने मांडतात.

* * *

# बनगरवाडी व फकिरा या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास

–प्रा.डॉ.किशोर एन. सोनवणे

साहित्य हे त्याच्या विशिष्टतेमुळे लक्षात राहते आणि त्यांच्या सार्वभौमिकतेमुळे अमर ठरते. तुलनात्मक साहित्याचा अभ्यास शिक्षणाच्या क्षेत्रात २० शतकाच्या पूर्वार्धात अमेरिकन विद्यापीठातून झाला.

ग्रामीण हा या साहित्याचा संस्कृतिविशेष आहे. मुळात भारतीय संस्कृतीच्या अभिजन–बहूजन अशा ज्या दोन संस्कृतिधारा आहेत. त्या धारेपैकी बहुजन संस्कृती धारेचेच जे साहित्य ते ग्रामीण साहित्य होय. ग्रामीण भारताचा भाषिक आविष्कार म्हणजे ग्रामीण साहित्य होय.

दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हरविला गेला आहे. ज्यांच्या जन्माचे त्यांच्या वाट्याला या समाज रचनेत एकाच प्रकारचे जीवन आले आहे. माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरिले गेले आहे. ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले गेले आहे ते दलित. दलित साहित्य हे अशा समाजगटातील व्यक्तींच्या अनुभवांन अभिव्यक्त करणारे असते.

बनगरवाडी ही ग्रामीण कादंबरी व फकिरा ही दलित कादंबरी यांचा तुलनात्मक अभ्यास या निबंधाच्या स्वरूपात मी येथे केलेला आहे.

बनगरवाडी ही कादंबरी २१ सप्टें १९५५ मध्ये प्रकाशित झाली व फकिरा ही कादंबरी १९५९ मध्ये प्रकाशित झालेली आहे.

**कादंबरीचा नायक :–**

बनगरवाडी कादंबरीचा नायक – मास्तर – राजाराम विठ्ठल सौंदणीकर

फकिरा कादंबरीचा नायक – फकिरा – फकिरा राणोजी मांग

बनगरवाडीचा नायक व्यंकटेश माडगुळकर यांनी स्वतः जीवन अनुभवातून ते पात्र निर्माण केलेले आहे. तसचे अण्णाभाऊ साठेंनी फकिरा हे पात्र ऐकून रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

कथानक :-

दोन्ही कादंबऱ्यांमध्ये प्रारंभ - मध्य - शेवट या तंत्रानुसार कथानक तयार केलेले दिसते. बनगरवाडी कादंबरीची सुरुवात 'दशम्यांची पिशवी पाठीला मारून मी बनगरवाडीला निघालो होतो. अद्याप सर्वत्र काळोख भरून राहिला होता' तर फकिरा कादंबरीची सुरुवात 'सूर्य मावळला होता. त्यांचा किंचित प्रकाश पश्चिमेच्या किनारीवर राहून गेल्यामुळे एक गुलाबी धांदोटी पसरली होती.' [४] दोन्ही कादंबरीची सुरुवात दिवस व रात्र अशी आहे. बनगरवाडीची सुरुवात दिवस सुरू झाल्याने आहे तर फकिराची सुरुवात रात्र झाल्याने आहे.

बनगरवाडीतील मास्तर धनगर लोकांची पोर शिकविण्यासाठी बनगरवाडीला गेला आहे. तर फकिरातील फकिरा मांग जमातीतील लोकांसाठी लढतो आहे. दोन्ही नायक लोकांच्या कल्याणासाठी व भल्यांसाठी झटताना दिसतात.

वातावरण निर्मिती :-

बनगरवाडीतील वातावरण निर्मिती ही व्यंकटेश माडगुळकरांनी आपल्या लेखणीच्या आधारे अतिशय सुंदरतेने रेखाटली आहे. 'माळावरून गार झोंबरे वारे वाहू लागले, चांदण्याचे तेज कमी झाले बाभळी एरवडासारख्या झुडूपांचा ओळख येणारा वास जाणवू लागला'[५] 'अंधकारमय होत होता. सूर्यानं सर्व कळांनी जग जितकं लखलखीत केलं'[६]. या दोन्ही उदाहरणातून बनगरवाडीतील वातावरण रूप गंधासह प्रकट होते. तसे फकिरात जाणवत नाही.

पात्रे :

बनगरवाडी कादंबरीत प्रमुख पात्र- मास्तर आहे. दादू बालट्या हे खलपात्र आहे. कारभारी, रामा बनगर, शेकू, आयबू, सता, काकुबा ही पात्र आहेत. अंजी व शेकूची बायको ही दोन स्त्री पात्र आहेत.

फकिरा -

या कादंबरीत फकिरा हे प्रमुख पात्र आहे व खोत हा खलनायक आहे. विष्णुपंत कुलकर्णी शंकरराव पाटील, राणोजी मांग इ. प्रमुख पात्र आहेत. दादू बालट्या व खोत व इंग्रज सरकार हे या दोन्ही कादंबऱ्यांच्या नायकांना त्रास देण्याचे काम करतात.

**निवेदन शैली –**

बनगरवाडी कादंबरीतील निवेदन शैली मी च्या खिडकीतून केलेली आहे. तर फकिरा या कादंबरीचे निवेदन त्रयस्त निवदेन पद्धतीने केलेली आहे. व्यंकटेश माडगुळकरांनी जे अनुभव व समाज निरीक्षण केलेले होते त्यानुसार त्यांनी हे मांडले पण अण्णा भाऊ साठे यांना माहिती ऐकून ती कादंबरी लिहिली आहे.

'दशम्यांची पिशवी पाठीला मारून मी बनगरवाडीला निघालो होतो' (पृष्ठ क्र १)

'वाटेगावचं अस्तित्व नाहीसं झालं' (पृष्ठ क्र. १)

**संवाद :–**

कोन, मास्तर बसलाय का?

होय, या

भाकरी खाल्लीस का?

नाही, खाईन आता (पृ. १२ बनगरवाडी)

'कोण चाललंय ते?'

मी हाय राणुजी मांग

ये की, पान खाऊन जा. रात केलीस?

वाईच रात झाली' (पृष्ठ ३ फकीरा)

दोन्ही कादंबऱ्यांतील संवादातील साचा एकच वाटतो. संवाद साधताना आपण नाटकांच्या पात्रांची ओळख करतो. तशी संवादातून बनगरवाडीतील पात्रांची ओळख होते. तशीच फकिरातही होते.

**संघर्ष :–**

बनगरवाडीतील खरा संघर्ष– मास्तर व दादू बालट्या यातील आहे व फकिरा कादंबरीतील संघर्ष मांग जातीला जगवण्याचा आहे.

'हसू नकंस मास्तरा! ही हसण्यासारखी गोष्ट न्हाई. तू नवा आला हायेस. नीट आपलं काम कर. गावात चबाढब करू नकंस' ( पृष्ठ १७ बनगरवाडी)

'कवा आम्ही सलामत व्हतो?, आईच्या पोटातनं भाईर आल्यापासनं नव्हं, आईच्या पोटात व्हतो, तवापासनं रक्ताचं घोट घेतोय, लढतोय.' (पृष्ठ १४५ फकिरा)

बनगरवाडीतील मास्तर धनगर लोकांना चांगले सांगतो व फकिरातील फकिरा आपल्या मांग जमातीबद्दल चांगले करण्यासाठी इंग्रज सरकारपाशी संघर्ष करतो. त्यांचा खजिना लुटतो. दोन गावांतील जोगिणी आणण्याबद्दलचा हा संघर्ष असतो. या संघर्षाची परिणती शेवटी शरण जाण्यात होते.

**भाषाशैली :–**

बनगरवाडीतील निवेदन हे नागरी मराठी भाषेतील आहे. पण संवादातील भाषा ही माणदेशातील प्रादेशिक बोली आहे. उदा. 'काय अंडीवाला हायेस का गा?' (पृष्ठ ८ बनगरवाडी) या बोलीभाषेतला मगाफ वैशिष्टपूर्ण आहे.

ते ऐकून फकिरा राणोजींकडे वळून म्हणाला, 'आन की गा ती वाटी हिसकून' (पृष्ठ ८ फकिरा) या कादंबरीतील भाषाशैली निवेदनात नागरी मराठीचा वापर केलेला आहे. दोन्ही कादंबरीत बोलीभाषेतील गा हे वैशिष्टपूर्ण लावलेले दिसते. अण्णाभाऊ साठेंनी मानवी जीवनातील व निसर्गातील सौंदर्याचे अनेक रंग घेऊन लालित्यपूर्ण भाषा वापरलेली आहे. व्यक्तिगत जीवनामध्ये अत्यंत उपेक्षित असणारा हा कलांवत मात्र साहित्यात अत्यंत श्रीमंत आहे. निसर्गातील तरलता विविधता अण्णाभाऊंच्या मनाला मोहरून टाकते. ते भाषेला दुधारी शस्त्राप्रमाणे वापरतात.

* * *

**समाजचित्रण :–**

बनगरवाडीमध्ये धनगर समाजाचे चित्रण केलेले आहे. धनगर समाजातील रूढी परंपरा अंधश्रद्धा, जत्रा यांचे वर्णन केलेले आहे. मेंढरे, बैल, कुत्रे, व्हला इ. पशुप्राण्यांचे संदर्भ येतात, बाजरी, मटकी, तुरी भुईमुग इ. पिकांच्या पूर्ण हंगामाचे वर्णन येते व ३० ते ३५ घराचा हा समाज तेथे आहे.

फकिरा कादंबरीमध्ये मांग समाजाचे चित्रण केलेले आहे. मांग समाजातील परंपरा जत्रा यांचे वर्णन केलेले आहे. घोडे, घुबड, पिंगळा, नाग, व्हला, मुंगुस, साप इ. पशु प्राण्यांचे वर्णन केलेले आहे. जोगिणी गावातून जाऊ द्यायच्या नाहीत हा गावाचा रिवाज. गावासाठी जोगिणी आणणारा मांग समाजाचे चित्रण केले आहे. 'मांग कधीच कुणाचा खून करीत न्हाय, कणसं खुडून प्वाट भरतं तसं मुंडकं मारून भरत न्हाय' (पृष्ठ ४७) असे सांगणारा मांग समाजाचे वर्णन केलेले आहे व हा समाज तेथे पन्नास घरांचा आहे.

दोन्हीही कादंबऱ्या तोलामोलाच्या आहेत. बनगरवाडीत प्रादेशिक भाग वर्णन करून ग्रामीण संस्कृतीचा ठसा त्या उमटविला आहे. फकिरा या कादंबरीत मांग समाजाची वेदना वे विद्रोहाची भूमिका महत्त्वाची वाटते. फकिराच्या मानाने बनगरवाडी एक मैलाचा दगड वाटते. कारण बनगरवाडीच्या चौदा आवृत्त्या प्रकाशित होऊन इंग्रजी, गुजराथी, हिंदी, उर्दू, तमीळ, तेलगू, कन्नड, पंजाबी, बंगाली, उडिया, जर्मन भाषेत भाषांतर झालेली ती मराठीत एकमेव कादंबरी आहे.

निष्कर्ष :-

१) बनगरवाडीतील नायक धनगर लोकांच्या उद्धारासाठी काम करतो

२) फकिरा कादंबरीतील नायक मांग लोकांच्या उद्धारासाठी काम करतो

३) फकिरा कादंबरीपेक्षा बनगरवाडी कादंबरी एक मैलाचा दगड ठरली.

४) बनगरवाडीपेक्षा फकिरा ही कादंबरी वातावरण निर्मिती व निवेदन अतिशय प्रतिभाशालीपणे रेखाटली आहे.

५) व्यंकटेश माडगुळकरांपेक्षा अण्णाभाऊ साठे यांचे शब्दवैभव श्रेष्ठ वाटते.

* * *

# दलित आणि ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास
## ('त्रिशंकू' अरुण साधू, 'मेड इन इंडिया' पुरुषोत्तम बोरकर)

**–प्रा.कल्पना गावडे**

या कादंबऱ्याच्या अनुषंगाने तौलनिक साहित्याभ्यासाच क्षेत्र फार व्यापक आहे. ते सर्वसमावेशक आहे असे म्हटलं तरी ही अतिशयोक्ती ठरू नये. कारण तौलनिक विश्लेषण, आकलन पद्धतीचा अवलंब किंवा तिचा उपयोजन अनेक निकषांच्या सहाय्यात आणि विविध अंगानी साहित्याच्या क्षेत्रात होताना दिसतं. भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, भाषिक स्थिती आणि नाती, तौलनिक अभ्यासाला पायाभूत ठरतात. कालखंड, विषय, प्रांतिक, मिथक, मांडणी शैली घाट, साहित्य प्रकार अशांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो.

प्रस्तुत शोधनिबंधात 'त्रिशंकू' अरुण साधू यांची कादंबरी आणि 'मेड इन इंडिया' पुरूषोत्तम बोरकर यांच्या कादंबरीचा तुलनात्मक विचार करत असताना त्रिशंकू या दलित कादंबरीचे कथानक हे मुंबईसारख्या नागर पार्श्वभूमीवर घडताना दिसते. त्यात आजच्या सुशिक्षित दलित तरुणाची त्रिशंकू सारखी अवस्था झाल्याचे चित्रण येते. तर 'मेड इन इंडिया' या कादंबदीला ग्रामीण प्रादेशिकतेच्या पार्श्वभूमीवर कथानक घडते. या कादंबरीतही आजच्या सुशिक्षित ग्रामीण तरुणाची झालेली वाताहतीचे चित्रण येते. नागेश कांबळे व पंजाबराव यांच्या जीवनातील अस्वस्थताच फक्त आलेली नाही तर समूहमनाची आहे हे पुढील मांडणीतून दिसून येईल.

### दलित आणि ग्रामीण कादंबरीची स्वरूप निश्चिता :–

दलित आणि ग्रामीण कादंबरी यांचे अगदी घनिष्ट नाते आहे. दोन्ही कादंबऱ्याच्या मुळाशी प्रामुख्याने ग्रामीण जनजीवन महत्त्वाचे ठरते. दलित आणि ग्रामीण कादंबरी यांचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करायचा झाल्यास एक मूलभूत फरक स्पष्ट होतो. तो म्हणजे ग्रामीण कादंबरीतील व्यक्तीवर ग्रामीण व्यवस्थेचे ग्रामीण चौकटीचे संस्कार व परिणाम असतात. तसेच दलित व्यक्तीवरही या व्यवस्थेचे परिणाम झालेले असतात. दलित कांदबरीत व्यक्त होते ती अस्पृश्य वर्गाची स्थिती गती.

ग्रामीण कादंबदीमध्ये प्रतीत होणारे ग्रामीण जीवनातील महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे कृषिक्षेत्र. ही कृषक संस्कृती ग्रामीण समाजजीवनाचा कणा आहे. अन्याय, दलित्य, विषमता, पोरकेपणा, अशिक्षितता, दुःख, यातना, धर्माची चौकट, परंपरा रूढींची चौकट, पीडा, आर्थिक शोषण, राजकीच अवहेलना, भूक दारिद्र्य या विविध जाणिवा दलित कादंबरीत व्यक्त होताना दिसतात. आत्मसन्मानाची जाणीव हा दलित समाजजीवनाचा कणा आहे.

'त्रिशंकू' ही कादंबरी राज प्रकाशन संस्थेने १९७९ ला प्रकाशित केली. २४१ पृष्ठसंख्या असलेल्या कादंबरीचे कथानक एकूण बत्तीस उपप्रकरणात विभागलेले आहे. अरुण साधूंच्या एकूणच कादंबरी लेखकातील 'त्रिशंकू' ही एक अर्थहीन कादंबरी मानली जाते. परिवर्तन, पुरोगामीमूल्य आधुनिकता यांचा संस्कार झालेल्या एका सुशिक्षित आणि संवेदनशील दलित तरुणाचा अभिजन संस्कृतीत झालेला कोंडमारा सांधूनी या कादंबरीत अत्यंत सूक्ष्मणपणे आणि समर्थपणे कोंडमारा चित्रित केले आहे.

'मेड इन इंडिया' ही पुरुषोत्तम बोरकर यांची श्रीविद्या प्रकाशन संस्थेने १९८७ ला प्रकाशित केली. १५२ पृष्ठसंख्या असलेल्या कादंबरीचे कथानक समकालीन समाज परिस्थितीचे आणि ग्रामीण प्रादेशिकतेचे धावते समालोचन असे काहीसे किस्सेवजा स्वरूप आहे. कथानकात वरवर विसकळीतपणा जाणवत असला तरी त्यामागे अंतर्गत सुसंगती आहे. एका पदवीधर तरुणाचे सूक्ष्म निरीक्षण आहे. हा आजच्या तरुण पिढीत प्रतिनिधी पंजाबराव गरसोळीकर सरपंच, ग्रामपंचायत गरसोळी खुर्द घरातील गावातील, परिसरातील लोकशाही शासनव्यवस्थेतील कटू अनुभव आणि दिसलेली माणसे प्राणी यांच्याविषयी तिरसटपणे निवेदन करतो.

### ''त्रिशंकू'' कादंबरीच्या कथावस्तूचे स्वरूप –

अरुण साधूंनी ''त्रिशंकू'' मधून आजच्या सुशिक्षित दलित तरुणाची अस्वस्थता जागर पार्श्वभूमीवर मांडली आहे. 'स्थळ' म्हणून या कादंबरीला 'मुंबई' या शहराची व्यापक पार्श्वभूमी लाभली आहे. अफाट गर्दीने भरलेल्या मुंबई शहराच्या पार्श्वभूमीवर या कादंबरीचे कथानक घडते. विसरता न येणारा आपला वारसा आणि नव्या उच्चवर्गात पूर्णत्वाने सामावले जाण्याची इच्छा या द्वंद्वात 'त्रिशंकू' बनलेला तरुण येथे केंद्रस्थानी आहे. त्याने आपली मुळे छाटली

आहेत आणि फांद्या दुसऱ्या जगात विस्तारल्या आहेत. त्याने आपल्या समाजाचा आधार सोडला आहे. पण दुसऱ्या समाजाने त्याला अजून, उंबऱ्याच्या आत येऊ दिलेले नाही. त्यामुळे त्याची कला, प्रेम आणि नैतिक मूल्ये या सर्वांचीच अधांतरीची अवस्था झाली आहे. या तरुणाच्या अनुषंगाने दलित चळवळीची अनेक अंगोपांगे प्रकाशित करीत ही कादंबरी दलित संवेदनशीलतेचे प्रत्ययकारी दर्शन घडवते.

'त्रिशंकू' ही व्यक्तिप्रधान कादंबरी नाही. ती समूहप्रधान कादंबरी आहे. तरीही तिच्यात नागेश कांबळेला काहीसे अधिक महत्त्व आहे. इंदू कोलटकर, वैशाली पंडित, ताई, भगवान जगदाळे, भाऊसाहेब, मिसेस प्रधान बाई, राजा कोलटकर यासारखी अनेक पात्र येथे आहेत. त्यांच्या जीवन कहाण्या एकमेकांत मिसळतात. त्यातून त्यांच्या मनाची 'त्रिशंकू' अवस्था अधोरेखित होत असतानाच कादंबरीचे कथानकही विकसित होत जाते.

२) **व्यक्तिचित्रणाचे विशेष :–**

**नागेश कांबळे:–** दलित कुटुंबामध्ये वाढलेल्या आणि स्वातंत्र्यानंतरच्या वाढत्या शिक्षण प्रसारामुळे उच्च विद्याविभूषित झालेला नागेश कांबळे हा व्यवसायाने चित्रकार आहे. दलित कवी म्हणूनही त्याची ख्याती आहे. नागेशचे बरेचसे आयुष्य मुंबई शहरात 'ताई' वैशाली यांच्यासारख्या उच्चवर्णीयांच्या सहवासात गेले असल्यामुळे त्याला त्या जीवनाची ओढ आहे. बऱ्यापैकी आर्थिक उत्पन्न असणारी नोकरी आणि वरळीला स्वतःचा फ्लॅट असूनही नागेश समाधानी नाही. स्वतःच्या समाजापासून जाणीवपूर्वकच दूर राहण्याचा प्रयत्न करतो. स्वतःची स्वतःच्या समाजाशी असलेली नाळ त्याने जाणीवपूर्वक तोडून टाकलेली आहे. दुसरीकडे नागेश ज्या उच्चवर्णीयाच्या दलितेतर समाजात मिसळण्याचा प्रयत्न करतो. तो त्याला स्वतःमध्ये मिसळून घेण्यास तयार नाही. त्यामुळे त्याची धड इकडेही नाही आणि धड तिकडेही नाही अशी 'त्रिशंकू' अवस्था झाली आहे.

जीवनात आवश्यक तेवढे यश मिळूनही आपण खडकावर पडलेल्या पावसाप्रमाणे कोरडे ठणठणीत आहोत. ही भावना नागेशच्या मनात घर करुन बसलेली आहे. तो एकलकोंडा बनला आहे. अशी एकटेपणाची भावना उचंबळून आली की, तो लांब लांब सुस्कारे टाकतो. त्या सुस्काऱ्यामागे तशी अनेक कारणे दडलेली असतात.

इंदू कोलटकर आणि वैशाली पंडित या दोन मध्यमवर्गीय तरुणीमुळे नागेशची 'त्रिशंकू' अवस्था अधिक टोकदार झालेली आहे. इंदू कोलटकर ही नागेशच्याच जातीतील एक चुणचुणीत सुशिक्षित तरुणी. तिच्याशी नागेशची चांगली मैत्री आहे. ती स्वतःदेखील नागेशवर मनापासून प्रेम करते. त्याच्याशी विवाह करावा अशी तिची सुप्त इच्छा आहे. ही इच्छा फलद्रूप होण्यासाठी ती स्वतःहून नागेशची ओळख वाढवते. तीही कविता करते. अर्थात त्या खास नागेशसाठीच असतात. त्या कवितांच्या निमित्ताने त्या दोघांमधील मैत्री अधिक घनिष्ठ होते.

नागेशला मात्र इंदू मुळीच आवडत नाही. ती देखणी नाही म्हणून नव्हे तर ती त्याच्याच जातीची आहे. म्हणून स्वतःच्या जातीच्या उदास भूतकाळी आठवणी देखील नागेशच्या अंगावर शिसारी आणते. म्हणून तो जाणीवपूर्वक इंदूपासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या अंतर्मनाची जाणीव नसलेली इंदू मात्र त्याच्यापासून दूर जाऊ इच्छित नाही. ती सतत त्याच्या अवती भवती त्याच्या सहवासात राहण्याचा प्रयत्न करते. इंदूचे प्रेम झिडकारणाऱ्या नागेशला हवी आहे ती फक्त वैशाली पंडित. उच्चवर्णीयात मिसळून जाण्याचा मार्ग आहे. वैशाली त्याच्याशी जवळची मैत्री करूनही त्या मैत्रीच्या मर्यादा ती ओलांडीत नाही. म्हणून नागेश मनोमन चिडचिडा होतो. त्याची 'त्रिशंकू' अवस्था होते.

२) **ताई** : विधवा असूनही कधीही दुःखी दिसत नाही. त्यांचा क्लब आहे. मान्यवर लोक तिथे येतात. ताईने दुःख मनोमन पचवून त्यांचा दृष्टिकोन सर्वसमावेशक बनलेला असावा. ताई म्हणजे एक विसावा आहे. वेळ, पैसा आणि स्वतःलाही इतरांसाठी खर्ची केले आहे. एवढे असूनही कोकिळेचा आवाज ऐकल्या नंतर अस्वस्थ होतात. स्वतःचा त्याग करून खोटेपणाने इतरांचे प्रश्न स्वतःचे मानून नंतर त्याचीच सवय करून त्यागमय, प्रेमळ, असा सामाजिक कार्यकर्तीचा आदर्श निर्माण करणारे ही स्वतःच 'त्रिशंकू' अवस्थेची जाणीव झालेल्या मध्यमवर्गाची कृती आहे. ताईच्या व्यक्तिमत्त्वातून ती ठळकपणे व्यक्त होते.

३) **वैशाली पंडित** :– ही उच्चवर्गातील अनेक सामाजिक कार्यात सहभाग होणारी, वैशालीचे स्वतःचे अगणित प्रश्न, वेदना केवळ स्वतःशीच ठेवू पाहते. लग्नाचा प्रयोग आणि विवाहबाह्य कुणाबरोबर तरी राहण्याचा प्रयत्न करून बघितला आहे.

४) **भगवान** : दलित पुढारी, क्रांतीची भाषा बोलणारा आहे.

५) **इंदू कोलटकर** :– नागेशची शरीर संभोग करते आणि जाताना हाती काही लागले नाही याची खंत तिच्या मनात निर्माण होते.

६) **जगदाळे** :– व्यक्तिचित्रणात गतिमानता दिसते.

**३) भाषाशैली :–**

'त्रिशंकू' च्या निवेदनासाठी अरुण साधूंनी त्रयस्थ निवेदन पद्धत वापरली आहे. वर्णन, संवाद, भाष्य, विस्तारत जाणारे हे निवेदन घटना आणि प्रसंगाची कलात्मक गुंफण करण्याच्या दृष्टीने खूपच वेधक उतरले आहे. प्रमाण भाषेचा वापर केला आहे आणि अनेक भाषिक रूप कादंबरीत येतात.

उदा. 'धूळ खात पडणे', 'नावा रूपास येणे', 'कान टवकरणे', 'जळात राहून माशांशी वैर', 'तोंड दाबून बुक्यांचा मारा', 'इकडे आड तिकडे विहिर', अशी कितीतरी भाषिक रूप वाक्यांच्या संदर्भात अधिक परिणाम साधतात.

४) आशयसूत्राची विविधता :– जातीयतेचे आशयसूत्र मध्यमवर्गीय दलितांच्या समस्येभावेती या कादंबरीच्या कथानकाची गुंफण असली तरी त्या अनुषंगाने दलितांची दूरवस्था, त्यांच्यावर होत असलेले परंपरागत अन्याय त्याचे स्वरूप, त्याचे इतरांपेक्षा वेगळे असलेले कुटुंबजीवन, दलित चळवळ, दलित साहित्य व त्याचे स्वरूप, दलित – दलितेतरामधील विविधांगी संघर्ष, राखीव जागावरून निर्माण झालेल्या समस्या याचा नि अशा अनेक अंगानी दलित जीवनाचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

**लेखकाचा दृष्टिकोन :–**

त्रिशंकूवत बनलेल्या मध्यमवर्गीय दलित आणि दलितेतर समाज, जगण्या भोगण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा, त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न, दलित चळवळ आणि तिचे स्वरूप, जुन्या नव्या जाणिवांमधील संघर्ष, बदलत चाललेली मानवी जीवनमूल्य, स्त्री पुरुषांमधील परस्पर संबंध, वेगवेगळ्या घटकांना स्पर्श करणाऱ्या या कथानकातून आजच्या त्रिशंकूवत बनलेल्या मध्यमवर्गीय समूहजीवनाचा एक उत्कट अनुभव प्रत्ययास येतो. तो जिवंत आणि प्रत्ययकारी आहे.

**'मेड इन इंडिया' कादंबरीच्या कथासूत्राचे स्वरूप :-**

कलाशाखेत पदवीधर असलेल्या पंजाबला वशिलेबाजी भ्रष्टाचाराच्या काळात नोकरी मिळत नाही. शिक्षणामुळे त्याचा आत्मविश्वास वाढलेला नाही. स्वतःच्या सुमार गुणवत्तेची त्याला चांगली कल्पना आहे. त्याच्या घराण्यात पिढीजात सरपंचपद असते. परंतु त्याला बोगसबाजीच्या राजकारणात आणि वातावरणात रस नसताना बापाच्या इच्छेखातर राजकारणात येणे भाग पडते. या गलिच्छ प्रवाहात आल्यानंतर तो समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. गावाच्या रस्त्यावरील सांडपाण्याच्या डबक्यांचे तो शोष खड्डे करू पाहतो. त्यात त्याला अपयश येते.

दारुबंदी योजना, राबविण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो. जुगार मटका, ब्ल्युफिल्म-व्हिडिओ बंद व्हावा म्हणून खूप प्रयत्न करतो. परंतु मंत्री - आमदार खासदार दोन नंबरच्या अवैद्य धंद्यावाल्यांवर कृपादृष्टी असल्याने त्याला ते अशक्य होते.

वृक्षारोपण, कुटुंब नियोजन याबाबतीत ही त्याला कटू अनुभव येतात. बापाने विष खाऊन आत्महत्या केल्यावर तो सरपंच पदाचा राजीनामा देतो. पिढीजात शेती व्यवसाय करायला लागल्याने त्याची आर्थिक परिस्थिती उत्तम असूनही त्याची सोयरिक जमत नाही. कारण आजच्या तरुणींना नोकरीवाला नवरा हवा तर हुंड्यासाठी बाप काळ्या आणि तिरळ्या मुलीशी त्याला लग्न करायला सांगतो. गावातील लोक त्याला घनचक्कर म्हणू लागलात. कारण शेतीधंद्यात जो जम बसवू शकत नाही. तो समकालीन परिस्थितीचे निरीक्षण करतो.

तेव्हा त्याच्या लक्षात येते की, 'दाम करी काम' अशी स्थिती निर्माण झाली आहे. सर्वत्र भेसळ, भ्रष्टाचार वाढला आहे. लोक व्यसनाधीन, जुगारी, आळशी, छंदीफंदी, कर्जबाजारी बनले आहेत. लोकशाही समाजव्यवस्थेचा अंत त्याला दिसू लागला असे प्रस्तुत कादंबरीचे कथानक आहे.

**२) व्यक्तिचित्रांचे विशेष :**

**१) पंजाबराव गरसोळीकर :-** पंजाबराव साहेबराव गरसोळीकर पाटील हा पदवीधर तरुण आहे. शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही म्हणून तो शेती करण्याचा निर्णय घेतो. वडील त्याला बोगस बाजीच्या राजकारणात भाग

घ्यायला लावतात. त्याच्या आदर्शाची समाजात किंमत होत नाही. लोकांचा दृष्टीने तो घनचक्कर ठरतो. तर शिकलेल्या मुली आणि त्यांचे पालक शेती करणाऱ्या पंजाबला पसंत करीत नाही. बाप हुंड्यासाठी तिरळ्या काळ्या मुलीशी लग्न करण्याचा सल्ला देतो. राजकारणात भाग घेऊन तो वैफल्यग्रस्त होतो. वडिलांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्यानंतर स्वतःचा मृत्यू त्याला समोर दिसू लागतो.

२) **साहेबराव पाटील** : हे खानदानी महत्त्वाकांक्षी, आशावादी, मानपान, सेवेचे ढोंग करणारे आहे. मुळात चांगुलपणा त्यांच्या रक्तातील गुण आहे. ते दानशूर-उदार, अव्यवहारी, मोठ्या मनाचे, सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होणारे आणि पाहुणचार करणारे आहेत. पंजाब 'वयला त आळमाप देइन अन् सरकला त घरदार खनून काढीन, जेव्हळा दिलदार तेव्हळाच खप्पी' (पृ.१५) ते नोकरी गुलामगिरी, मानतात. नोकरी करणे, ब्राम्हणांचे काम आहे असे ते म्हणतात. बापू नेहरू शेजारी समाधीचे स्वप्न जागेवर ठेवून सोने नाणे, जमीनजुमला जुगारात गेल्याने एन्ड्रीन पिऊन ते आत्महत्या करतात.

३) **मांगीलाल सेठ** :- हा हुशार ऑल राऊंडर, हिशोबी, निर्व्यसनी, जनतेला व्यसनी, जुगारी आळशी बनविणारा, आडमाप खाऊन तब्येत वाढलेला स्वार्थी माणूस आहे. जनतेची अचूक नाडी ओळखून राजकारण्याची मदत घेऊन अमाप संपत्ती मिळविली आहे. पैशाच्या जोरावर गावपातळीवरील राजकारणात भाग घेण्याच्या प्रयत्न तो करतो. परंतु त्याला ते शक्य होत नाही. कारण पिढीजात पाटील घराण्यात असलेले सरपंच पद काढणे त्याच्या आवाक्या बाहेरचे असते. प्रस्थापितांविरोधी तो अयशस्वी होत असला तरी अवैध धंद्यामध्ये प्रस्थ निर्माण केले आहे.

४) **नथ्थू** : हा एक पोरका बालवयापासून गावात लहान सहान काम करणारा बायल्या आहे. पाटलाच्या घरातील घरगडी म्हणून काम करतो.

५) **अप्पा मास्तर** : वंशाचा दिवा लावण्यासाठी अकरा मुलींना जन्म देणारा शिक्षक आहे.

६) पंजाबची आई, साधी भोळी प्रेमळ आणि श्रद्धाळू स्त्री आहे. तर येवद्याची पाहुणीबाई गोष्टी वेल्हाळ आहे. सूर्यभान थोरात गंपलास बुढा आहे. कादंबरीतील व्यक्तिरेखांवर विदर्भातील मागासलेपणाचा अज्ञानाचा प्रभाव पडलेला दिसतो.

३) **भाषाशैली :–**

वैदर्भीय जीवनदर्शन घडविणारी पात्रमुखी निवेदन पद्धतीने सांगितलेली ही कादंबरी कॉमेंट्री (धावते समालोचन) आहे. वऱ्हाडी बोलीभाषेतून तिचे निवेदन व संवाद एकजीव होऊन अवतरले आहेत. केवळ वऱ्हाडीच नव्हे तर प्रंमाण मराठी हिंदी इंग्रजी शब्दांचा मुक्तहस्ताने लेखकाने केलेला वापर स्वाभाविकच वाटतो. कारण कादंबरीचा नायक शिक्षण दूरदर्शन आकाशवाणीचे धेडगुतरी संस्कार झालेला पदवीधर आहे. घटना, प्रसंग या शब्दांच्या मिश्रणातून जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. संवाद सहज स्वाभाविक वाटतात.

१) बोली भाषेतील शब्द : वऱ्हाडी बोलीत प्रमाणभाषेतील 'ळ' ह्या अक्षराऐवजी 'य' येतो. (उदा. डोळा–डोया) तसेच 'ड' ऐवजी 'ळ' येतो. (उदा. माडी–माळी) संबरपट्टा : वतन, तिथंबः तमाशा, बफरे– संतापे, हळे–कावळे, सज्ञान–जोशपूर्ण, बुहाच्या–अपशकुनी, गोदरी, हागीनदारी

२) इंग्रजी –डॅड, अन्सरे, 'ब्लड इज थिंकर' दॅन वॉटर (पृ.१२), साइडइफेक्ट लिट्रेच्यर.

**ग्राम्यता व शिव्यांचा वापर** : उसकी माफा ओसका, च्युत्थासार्खी भसळीचे, शेंदळी शान, हेळांबे, इंचिमाय बहीण, भयतातीले ससरीच्या मायचा कांन कोंडा इच्या मायले इ. शिव्यादेखील आशयानुरूप आल्याने अश्लील ग्राम्य वाटत नाही.

४) वऱ्हाडी बोलीत रुसलेल्या म्हणी, वाक्प्रचारांचा, उपमा, प्रतिमांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर करून वास्तवाचे सुसंगत दर्शन घडविले आहे. उदा. 'दोघांच्याही येलाले बोलका, शेंड्याले बुळूख, 'फक्त आमाले पाहा अन फुल वाहा, 'धंदे सामने दोस्तानो नया भारुमे', सबडे बडा रुपैय्या', 'धांडाधुन्डा खाये अन हाल्या संड राहये' 'येळा बनून पेढे खाल्ले, 'उचलली जीभ की लावली टाऊले',

४) आशयसूत्राची विविधता :– राजकीय आशयसूत्र – भारतीय घराणेशाहीच्या सत्तेचे हे प्रसतिनिधिक चित्र आहे. लेखकाने विदर्भातील एका खेड्याची राजकीय पार्श्वभूमी चित्रित करतानाच राज्य देश पातळीवरील पार्श्वभूमीकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

**आर्थिकतेचे आशयसूत्र** :– सूर्यचुली आल्या, धनिक धनवान झाले, गरिबाला प्राथमिक गरजा पुरविणे, अशक्य झाले.

**सांस्कृतिकतेचे आशयसूत्र** :- पैसा सर्वश्रेष्ठी ठरला असला तरी काही जुन्या रूढी टिकून असलेल्या दिसतात.

नवरात्रात देवीचा भंडारा, मार्गशीर्षमध्ये दत्तजयंतीचा भंडारा, भरीनाथ आणि परिव्याबाची यात्रा, रामनवमी, हनुमान जयंती, रमज्यान ईदचा खीरखुरमा, आशयसूत्र आधूनिकतेचे :- अनीती अनाचार, व्याभिचाराचे प्रमाण वाढले, बुआयामी हा बिनभांडवली धंदा सुरू झाला. मातृभाषेपेक्षा इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढले. अधिकारी आणि शेतकरी यांना एकमेकांबद्दल जिव्हाळा प्रेम वाटत नाही. आत्मीयता वाटत नाही. मोठाली स्वप्न नाही. मन, मुरदाड झालेली दिसतात. डॉक्टरांची वृत्ती समाजसेवेऐवजी धंदेवाईक बनली.

सामाजिकेचे आशयसूत्र :- समस्त ग्रामस्त, राजकारणी, सुशिक्षित बेकार तरुण, भोंदुबाबा जुगारी, दारुडे, शिवसेना, दलित पॅंथरचे कार्यकर्ते यांच्या उल्लेखातून कादंबरी समूहजीवनाचे दर्शन घडविले आहे.

५) **लेखकाचा दृष्टिकोन** : लेखकाला समकालीन परिस्थितीचे विदारक चित्र रेखाटावयाचे आहे. लोकशाही समाजव्यवस्थेतील ऱ्हासपर्व लेखकाने विनोदी शैलीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. २) सहकारमध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तींच्या अनुषंगाने शोध घेण्याचा प्रयत्न बोरकरांनी केला. ३) सहकाराचे सडलेले किडलेले जग उभे करण्याचा प्रयत्न लेखक करू पाहतो.

**समारोप :-**

शहरी लोकांच्या ढोंगीपणामुळे भ्रमनिरास झालेला पंजाबराव ग्रामीण जीवनाशी आपली तुटू पाहणारी नाळ जोडण्याचा मनपूर्वक प्रयत्न करतो आहे. तर नागेश कांबळे स्वतःच्या समाजापासून जाणीवपूर्वक अलग राहण्याचा प्रयत्न करतो. स्वतःची स्वतःच्या समाजाशी असलेली नाळ त्याने जाणीवपूर्वकच तोडून टाकली आहे.

'त्रिशंकू' कादंबरीचा कालावधी दहा दिवसांचा आहे. लेखकाने त्रयस्थ निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. कादंबरीचा प्रारंभ आणि शेवट या दोन प्रसंगामध्ये विरोधाभास आहे. कादंबरीच्या सुरुवातीचा मलूल सूर्य आणि शेवटचा आग ओकरणारा सूर्य यशातून नागेशची मनःस्थिती ठळकपणे प्रत्ययास येते. भूतकाळात रमणे ही मध्यमवर्गीयांची आजची अवस्था आहे. वर्तमान काळाला

वास्तवाला धैर्याला सामोरे जाण्याचे धाडस त्याच्यात नाही याचा प्रत्यय ही कादंबरी देते.

रूढार्थाने कथानकाची पूर्तता ही कादंबरी करीत नाही. उदा. इंदू कोटकर व देशपांडे यांचे पुढे काय होते? मिसेस प्रधान मृत्यूच्या दाढेतून वाचतात का? त्याचे जगदाळे वर कोणते परिणाम होतात. ताई वैशाली पंडित यांच्या जीवन कहाण्या कोणती वेगळी वळणे घेतात? अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरे शेवटी मिळत नाहीत.

वेगळा विषय, रेखीव व्यक्तिचित्रे कथानकाची गतिमानता आशयानुकूल प्रतीकात्मक भाषाशैली आणि प्रसंग रेखाटनातून प्रकट होणारी वास्तवता आदी वैशिष्ट्यामुळे 'त्रिशंकू' कादंबरी वाचनीय झाली आहे. साधूंनी त्यात धंदेवाईक प्रसिद्धी लालसा अशा तांत्रिकतेच्या पातळीवर जो रंग भरण्याचा प्रयत्न केलेला आहे तो निश्चितच फसला आहे. त्याचाच एक भाग म्हणून लैंगिकतेचे भडक आणि गरजेपेक्षा अधिक चित्रण कादंबरीत येते. उदा. पृ.क्र. ९० आलेले वर्णन, वैशाली पंडितचे पृ. क्र. १५० वरील वर्णन, नागेश, आणि इंदू यांच्यातील पृ.क्र. २०६ ते २०८.वर आलेले वर्णन. या वर्णनात प्रसंगातील वास्तवता टिपण्याऐवजी वाचकांच्या भावना कशा चाळवल्या जातील यावर अधिक भर दिलेला दिसून येतो.

'त्रिशंकू' च्या कथानकात सत्याला लिहिण्याइतपत समर्थ अनुभव असूनही साधूला मात्र त्या अनुभवाला यथायोग्य न्याय देता आलेला नाही. म्हणूनच त्रिशंकू ही दलितेतर लेखकाने निर्मिलेली दलित जीवनानुभव प्रकट करणारी कादंबरी.

* * *

# फकिरा व गोतावळा या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास

–प्रा. संदीप भास्कर पाटील

मराठी साहित्याचे क्षितिज विस्तारत असताना साहित्याचे वेगवेगळे आकृतिबंध आपल्या समोर येत आहेत. त्यात कथा, नाटक, कविता यांच्या सोबतच ग्रामीण आणि दलित साहित्य लेखकांनी कादंबरी या साहित्यप्रकाराला आविष्कृत होण्यासाठी पसंती दिलेली दिसते. प्रत्येक साहित्यप्रकाराची बलस्थाने असतात आणि यावरच त्याची योग्यता ठरते. 'फकिरा' आणि 'गोतावळा' या कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास करीत असतांना दलित आणि ग्रामीण साहित्याची भूमिका समजून घेणे क्रमप्राप्त ठरते.

१९६० नंतरची शिक्षित पिढीने अनुभवलेले ग्रामीण जीवन साहित्यात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. तेथील शेतीनिष्ठ व्यवस्था निसर्गावरचे अवलंबित्त्व, तेथील रांगडेपणा, तेथील शोषण या सर्व हकिगती सांगायला सुरूवात केली आणि ग्रामीण साहित्यातून खरे ग्रामीणत्त्व दिसू लागले.

"कृषिकेंद्रित निसर्गसन्मुख व्यवस्था म्हणजे ग्रामीण साहित्य होय" – डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांनी ग्रामीण साहित्याची केलेली व्याख्या या अर्थाने पटते.

ग्रामीण साहित्यात जसा ग्रामीणत्त्व हा धागा महत्त्वाचा आहे त्याचप्रमाणे गावकुसाबाहेर राहणाऱ्या वस्तीला देखील शिक्षणाचा स्पर्श झाल्याने तेथून संवेदना व्यक्त होऊ लागल्यात वर्णव्यवस्थेच्या विरुद्ध ऐल्गार करणारी मनुवादाला नाकारणारी पिढीचा उदय होतांना जे साहित्य निर्माण झाले ते दलित साहित्य होय.

अर्थात या साहित्याच्या मुख्य प्रेरणास्थान हे क्रांतीसूर्य डॉ. भिमराव रामजी आंबेडकर हेच आहेत. फकिराकार अण्णाभाऊ साठे म्हणतात "जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव."

"आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवन विषयक दृष्टिकोनांआधारे स्वतःच्या व स्वतः भोवतील वास्तवाचा शोध घेण्याच्या प्रकट इच्छा शक्तीचा आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय" – डॉ. दत्ता भगत.

उपरोक्त दिल्याप्रमाणे दलित आणि ग्रामीण साहित्याच्या निर्मितीच्या मागे असलेल्या भूमिका आहेत. त्या अनुषंगानेच मी प्रस्तूत निबंधात गोतावळा

या ग्रामीण कादंबरीचा व फकिरा या दलित कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

गोतावळा ही डॉ. आनंद यादव यांची ग्रामीण कादंबरी असून हिचा निर्मिती काळ १९७१ असा आहे. तर फकिरा ही अण्णाभाऊ साठे या मातंग समाजाच्या लेखकाने लिहिलेली कादंबरी असून हिचा निर्मितीकाळ १९५९ असा आहे.

**कादंबऱ्यांचे नायक**

गोतावळा या कादंबरीचा नायक नारबा असून फकिरा या कादंबरीचा नायक फकिरा राणोजी मांग हा आहे. गोतावळा मधील नारबा कोल्हापूर कागल परिसरातील शेतगडी असून डॉ. आनंद यादव यांनी अनुभवातून निरीक्षणातून साकार केलेले हे पात्र आहे तर अण्णाभाऊ साठे यांनी ऐकिव माहितीच्या आधारे फकिरा उभा केला आहे.

**कादंबऱ्याचे कथानक**

दोन्ही कादंबऱ्यांचे कथानक प्रारंभ, मध्य व शेवट या तंत्रानुसार तयार करण्यात आले आहे. गोतावळा या कादंबरीची सुरूवात ''ढोरांच्या वैरणी रचत हूतावं रानातली समदी पिकं खळ्यावरनं घराकडं गेलेली'' अशी होते, तर फकिरा या कादंबरीची सुरूवात ''सूर्य मावळला होता त्याचा किंचीत प्रकाश पश्चिमेच्या किनारीवर राहून गेल्यामुळं एक गुलाबी धांदोटी पसरली होती'' अशी होते. दोघंही कादंबरीची सुरूवातीचे प्रसंग वेगवेगळे आहेत. गोतावळात सूर्योदयानंतरची स्थिती आहे. तर फकिरात सूर्यास्त आहे.

गोतावळा या कादंबरीत यंत्र संस्कृतीने कृषी संस्कृतीवर केलेले अतिक्रमण आणि या अतिक्रमणामुळे नारबाचा गोतावळा उद्ध्वस्त होत असताना नारबाची कशी घालमेल होते याचे प्रभावी चित्रण आहे, तर फकिरा या कादंबरीत फकिरा हा गावकुसाबाहेरील मांगाच्या कपाळावर जन्मतः मारलेला चोर हा शिक्का व दैन्य दास्य उपासमारीमुळे तसेच इंग्रजी जुलमी सत्तेच्या व वर्णव्यवस्थेच्या जात्यात दुहेरी भरडल्या जाणाऱ्या लोकांसाठी लढताना दिसतो आहे.

**वातावरण निर्मिती**

गोतावळा या कादंबरीतील वातावरण निर्मीती करत असतांना डॉ. आनंद यादव यांच्या समृद्ध लेखणीचा कस लागलेला आहे. कोल्हापूर कागल परिसरातील वातावरण हूबे हूब उभे करण्यात त्यांना पूर्ते यश आले आहे.

''आभाळात वांझ ढग आलेल. अजूनबी वावटूळं न्हाई का वादळ

न्हाई ....'' तर फकिरातील ''वारणेपासून कृष्णेपर्यंतचा तो सलग सुपीक प्रदेश अंधकारमय होत होता'' या दोन ओळीतून गोतावळीतील वातावरण निर्मीतीची ढब व फकीरातील वातावरण निर्मीतीची पद्धत अधोरेखित होते.

**पात्रे**

गोतावळा या कादंबरीत प्रमुख पात्र नारबा असून सोबत अनेक सह पात्रे आहेत त्यात मालक-मालकीन, गंग्या, सित्या यांच्यासह पाडी, सोन्या, कोबडा, चाण्या असे प्राणी चे स्वभावविशेष डॉ. आनंद यादव यांनी जीवंतपणे चित्रित केलेले आहेत.

फकिरा या कादंबरीत फकिरा हे प्रमुख पात्र आहे व खोत हे खल पात्र आहे. विष्णुपंत कुलकर्णी, शंकरराव पाटील, राणोजी मांग इ. प्रमुख पात्रे आहेत. गोतावळात मालक तर फकिरात इंग्रज सरकार नायकांना त्रासदायक आहेत.

**निवेदनशैली**

गोतावळा या कादंबरीचा निवेदक स्वतः नारबा असून फकिरा या कादंबरीचे निवेदन त्रयस्थ पद्धतीने झाले आहे. गोतावळात दिस कलतीला आल्यावर मालक मळ्याकडं नारोळ निवद घेऊन आला असे निवेदन आहे तर फकिरात वाटेगावच अस्तित्त्व नाहीसं झालं असे त्रयस्त निवेदन आहे.

**भाषाशैली**

गोतावळा कादंबरीतील भाषा ही कोल्हापूर कागल परिसरातील असून बोलीभाषेचा वापर केलेला आहे. ''असल्या उन्हाळ्यात न्हाई गड्या. एकदा सोडलं की, पाडं उगचंच उन्हाळाभर मन घालत बसतयं''

ते एकून फकिरा राणोजीकडे वळून म्हणाला ''आन की गा, ती वाटी हिसकून''

फकिरा या कादंबरीतील भाषाशैलीत नागरी मराठीचा वापर केलेला आहे: पण संवादात्मक रचनेला प्रादशिक बोलीचा मुलामा आहे. दोघंही कादंबऱ्यात बोलीभाषेचा वापर करण्यात आला आहे.

**समाजचित्रण**

गोतावळा या कादंबरीमध्ये नारबाचे भावविश्व असलेले शेती शिवार गुरे ढोरे यांच्या चित्रणासह तेथील मालक हा गावगड्यातील केंद्रस्थानी असलेला शेतकरी असून कोल्हापूरला कोर्ट कचेरीची कामे करण्यासाठी तो फिरत असतानाचे चित्रित करून ग्रामीण व्यवस्थेतील लोकांच्या जीवनातील पेच प्रसंग व संघर्ष चित्रित झाला आहे. सोबतच नारबाचा गोतावळाचे चित्रण डॉ.आनंद यादव यांनी प्रभावीपणे केले आहे.

फकिरा कादंबरीमध्ये मांग समाजाचे चित्रण केलेले आहे. मांग समाजातील प्रथा परंपरा जत्रा यांचे वर्णन केलेले आहे. घोडे, घुबड, पिंगळा, नाग, व्हला, मुंगूस, साप इ. पशू प्राण्यांचे वर्णन केलेले आहे. जोगिणी गावातून जाऊ द्यायच्या नाहीत हा गावचा रिवाज. गावासाठी जोगीणी आणणारा मांग समाजातील नायकाचे चित्रण आहे.

"मांग कधीच कुणाचा खून करीत न्हाय. कणंस खुडून प्वाट भरतं तसं, मुडकं मारून भरत न्हाय" असे निक्षून सांगणारा पन्नास घरांचा मांग समाज या कादंबरीत आहे.

दोघंही कादंबऱ्या आपआपल्या पातळीवर तोलामोलाच्या आहेत. गोतावळात ग्रामीण भावविश्व साकारले तर फकिरातून जगण्यासाठीचा मांग जातीचा संघर्ष समोर येतो. दोन कादंबरीच्या आवृत्त्या निघाल्या असून त्यांनी समाज मनावर अधिराज्य गाजवले आहे. दोन लेखकांना मराठी साहित्यात मानाचे स्थान आहे. फकिरा-ही बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस तर गोतावळा-घरातील सात भावंडांना समर्पित केलेली आहे. फकीराला राज्यशासनाचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे तर गोतावळाकार डॉ.आनंद यादव पूणे येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

दोन्ही कादंबऱ्या प्रचंड यशस्वी झाल्या असून कादंबरीच्या वाङमयीन वैशिष्ट्याच्या कसोट्यांवर खऱ्या उतरल्या आहे. वाचकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य दोघात आहे.

## निष्कर्ष :-

१. गोतावळातील नारबा हा कृषी संस्कृतीशी पाईक आहे.
२. गोतावळात कृषी संस्कृतीवर यंत्रसंस्कृतीचे अतिक्रमण झाले आहे.
३. ट्रॅक्टरच्या आगमनाने नारबाचा गोतावळा उद्ध्वस्त झाला आहे.
४. जन्माने दलित असून सुद्धा लढवय्यापणा जन्मजात कसा असतो. हे फकिराच्या माध्यमातून सिद्ध होते.
५. गोतावळाच्या तुलनेत फकिरातील संघर्ष हा अधिक गडद आहे.
६. गोतावळातील संघर्ष हा भावनिक असून फकिरातील संघर्ष हा सामाजिक आहे.

* * *

DADASAHEB RUPWATE SCIENCE ARTS COMMERCE LIBRARY AKOLE 422601 DIST AHMEDNAGAR

# चौथी क्रांती व तणकट या दोन कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास.

-प्रा.डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर

**प्रास्ताविक -**

प्रस्तुत शोधनिबंधात तौलनिक साहित्याची तुलना न करता दलित लेखक श्रीराम दुर्गे यांची चौथी क्रांती (२००७) व ग्रामीण कृषिजन लेखक डॉ. राजन गवस यांची तणकट (१९९८) या दोन कादंबरीमधील आशय, विषय आणि दलित ग्रामीण समाजाच्या व्यथा, वेदना, विद्रोह या बद्दलच्या समान जाणिवा या शोधनिबंधात अधोरेखित करीत आहे.

**चौथी क्रांती व तणकट मधील आशय विषय -**

श्रीराम दुर्गे व डॉ. राजन गवस या दोनही फुले आंबेडकरवादी कादंबरीकारांनी म. जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक प्रमेय प्रमाण मानून प्रस्तुत कादबंरी लेखन केलेले आहे. या संदर्भातील गृहीत विचार म्हणजे या दोनही कादंबरीतील नायक फुले-आंबेडकरांची भाषा बोलतात. फुले- आंबेडकरांच्या विचारानुसार आचार व व्यवहार करतात. म. जोतिराव फुल्यांनी शिक्षणाचे जे महत्त्व जाणले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला शिका, संघटित व्हावा, व संघर्ष करा हा संदेश दिला. या शिक्षण विषयक क्रांतिकारी संदेशाचे अतिशय काटेकोरपणे पालन या दोनही कादंबरीतील नायक (भिवा मोरे व कबीर कांबळे) करताना दिसतात.

चौथी क्रांतीमधून श्रीराम दुर्गे यांनी कैकाडी या भटक्या जमातीचे चित्रण केले आहे. कैकाडी जमातीचे अस्तित्व, त्यांचा रोजगार, कामधंदा, मुलांचे शिक्षण, शिक्षणाबद्दलचा नकारात्मक दृष्टिकोन, भटक्याविमुक्तांचे गावभवरेपण, जमात पंचायतीचे कायदे कानून, सवर्णांचा दृष्टिकोन, उच्चवर्णीयांचा दृष्टिकोन, भटक्यांची मुले, त्यांचे आरोग्य, जमातपंचायतीचे आदेश झुगारणे, त्यामुळे कैकाडी पालावर व कुटुंबावर वाळीत पडणे इ. अनेक प्रश्न-समस्येला ही कादंबरी वाचा फोडते.

कैकाडी या भटक्या विमुक्तांच्या जात पंचायतीने या कादंबरीतील रघू व भीमाच्या कुटुंबावर वाळीत टाकले आहे. रघूने आपल्या भिवा या मुलाला शाळेत दाखल केल्यामुळे कुटुंबावर वाळीत येते. रघूची विवाहित मुलगी

LIBRARY

समीलाही तिच्या नवऱ्याने काडीमोड दिली. जात पंचायतीने याही समस्येचा न्याय-निवाडा केलेला असतो.

भटक्यांच्या जातपंचायतीची भीती, दहशत इतकी जाचक आहे की, यामुळे रघू व भिमीचे कुटुंबच नव्हे, तर पालातील संसार उद्‌ध्वस्त होतो. भटक्यांच्या जातपंचायतीचा दंडकच इतका विलक्षण आहे, की सामान्य माणूस यामुळे हतबल आणि असाह्य होतो. परंतु या कादंबरीतील भिवाचे वडील रघू मात्र आपल्या मुलाला शिक्षण देऊन त्याचे भविष्य उज्ज्वल करण्याची आकांक्षा त्यांच्या ठिकाणी दिसते. गावातील सवर्णवर्गीय, उच्चवर्णीय, जात-धर्म रक्षकांनी मात्र रघूच्या संसारावर, भिवाच्या शिक्षणावर सक्त पाहारा आहे. परंतु या उच्चवर्णीयांच्या ज्ञानबंदी, शिक्षणबंदीच्या विरोधात बंड, विद्रोहाचा अंगीकार रघू व त्यांचा मुलगा भिवा आणि विशेषतः यांना मार्गदर्शन करणारे कांबळे मास्तर या सर्वांनी स्वीकारला आहे.

गावातील उच्चवर्णीयांचे वर्चस्व, त्यांची हुकूमशाही, त्यांचा वरचष्मा, प्रभुत्व झुगारून रघू व कांबळे मास्तरांनी भिवाला प्राथमिक शिक्षणानंतर विद्यालयीन शिक्षणासाठी बाहेरगावी वसतिगृहामध्ये पाठवून शिक्षण पूर्ण केले. नंतर उच्चशिक्षण घेऊन मराठी विषयाचे प्राध्यापक होण्याचे भिवाचे स्वप्नही साकार झाले. एवढेच नव्हे तर आपल्या ज्ञानाचा, शिक्षणाचा, बुद्धीचा आपल्या समाज बांधवांना फायदा व्हावा, त्यांना शिक्षण द्यावे पर्यायाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला विचार शिका, संघटित व्हा व संघर्ष करा या विचाराचे बीजारोपन करण्यासाठी प्रा. भिवा रघू मोरे यांनी भटक्या-विमुक्तांची संघटना स्थापन केली. या संघटनेच्या नेतृत्त्वाखाली भटक्या-विमुक्तांना संघटित करण्याचे प्रयत्न सुरू झाले. अस्तित्व, अस्मिता, स्वाभिमान, सन्मान, गुन्हेगारीकरण रोखणे, शिक्षण, प्राथमिक गरजांची पूर्ती यासाठी प्रयत्न सुरू झाले. भटक्या-विमुक्तांच्या सर्व संघटनेचे एकत्रीकरण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्धधर्माचा स्वीकार करणे यासाठी भटक्या विमुक्तांना संघटित करण्याचे प्रयत्न सुरू झाले. महाराष्ट्रात उपराकार लक्ष्मण माने यांनी भटक्या-विमुक्तांना ज्या बौद्ध धर्माची वाट दाखविली. त्या घटनेचं प्रतिबिंब या कादंबरीत उमटलेलं आहे.

कृषिजन ग्रामीण लेखक डॉ. राजन गवस यांनी लिहिलेल्या तणकट मधील कबीर कांबळे हा नायक मला चौथी क्रांती मधील भिवा सारखा समानवृत्तीचा बंडखोर नायक वाटतो. कारण कबीर सुद्धा अस्पृश्य समाजातला

एकमेव उच्चशिक्षित, समाजभान असलेला, समाजातील ग्रामीण, दलित वर्गावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचा जाब विचारणारा बंडखोर तरुण आहे. कबीरला भिवासारखीच अन्याय-अत्याचाराची प्रचंड चीड आहे. तणकट मधील ग्रामीणतेत स्वतःला सहकाराचा रक्षक समजणारा बाळासाहेब शेडबाळे आहे. हा बाळासाहेब अन्यायी वृत्ती प्रवृत्तीचा आहे. सहकारात त्याने केलेल्या आर्थिक घोटाळ्याविरुद्ध कबीरनेच आवाज उठविला होता. कबीर महाविद्यालयात असताना दलित समाजाबद्दल दलितांच्या शिष्यवृत्ती व आरक्षणाबद्दल अपशब्द वापरणाऱ्या प्रा. गंजेकरांना क्षणाचाही विलंब न करता हजरजबाबीपणा दाखवून प्रतिउत्तर दिले होते.

गावगाड्यातील सवर्ण आणि अस्पृश्य समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, धार्मिक इ. क्षेत्रातील घटना-प्रसंग, उपक्रमातून जे ताण-तणाव निर्माण होतात याबद्दल बंडाची, विद्रोहाची भूमिका घेणारा तणकट मधील कबीर हा भिवासारखा समान वृत्तीचा भोक्ता आहे. समान नाते या दोन कादंबरीतील पात्रांमध्ये आहे, असे वाटते. कारण दोन कलाकृतीतील समान विषय, आशय, व्यक्तिरेखा, पात्रे, घटना, प्रसंगाची चर्चा करणे, चिकित्सा करणे, विश्लेषण, संश्लेषण करून काही एक समान सूत्र मांडणे हेच तौलनिक साहित्याभ्यासाला अपेक्षित आहे, असे वाटते.

**या दोन कादंबरीतील व्यथा, वेदना, विद्रोहाचे चित्रण -**

श्रीराम दुर्गे यांच्या चौथी क्रांती या कादंबरीतून महाराष्ट्रातील गावगाड्याबाहेरील उपेक्षित फिरस्ते म्हणून गावगाडाकार त्रि. ना. अत्रे यांनी ज्यांची गणना केली त्या भटक्या-विमुक्त, गुन्हेगार जमातीचे जीवन चित्रण केले आहे. ४७ प्रमुख जमातीपैकी कैकाडी या प्रमुख भटक्या जमातीतील रघू व भिमी यांच्या कुटुंबाची कहाणी, त्यांचे अस्तित्वाचे प्रश्न, गावभवरेपण किंवा मुलाच्या शिक्षणासाठीचे स्थिरावलेपण, या परिणामातून रघू व भिमीच्या संसारावर कैकाडी जमात पंचायतीने टाकलेला बहिष्कार मराठी वाचकांना अस्वस्थ करणारा आहे. अभिजन व सवर्ण समाजातील नेते, पुढारी कार्यकर्ते, शिक्षक या सर्वांचाच भटक्या-विमुक्तांबद्दलचा नकारात्मक दृष्टिकोन या कादंबरीत प्रतिबिंबित होतो आहे. परिणामी प्राथमिक गरजांपासून माणुसकी, मानवतेच्या हक्कापासून हा समाज आजही २१ व्या शतकात पारतंत्र्यात आहे. या पारतंत्र्याचा आक्रोश,

व्यथा, वेदना, दुःख आणि या याबद्दलचा विद्रोह या कादंबरीत ध्वनित होतो.

डॉ. राजन गवस यांच्या तणकट मधूनही गघमपातळीवरील अस्पृश्य समाजाचे प्रश्न, अस्मितेतून निर्माण होणारे ताण-तणाव अधोरेखित होतात. युगमहामानव डॉ. आंबेडकर यांच्या जयंती, पुण्यतिथीच्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे चित्रण या कादंबरीत आहे. गघम विभागातील स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, या संस्थेवरील उच्चजातीय प्रतिनिधी, त्यांचे राजकीय डावपेच, आर्थिक गैरव्यवहार या कादंबरीतून आविष्कृत होते. या संदर्भात जाब विचारणारा अस्पृश्य समाजाचा प्रतिनिधी कबीर कांबळे हा या कादंबरीचा बंडखोर नायक आहे.

**निरीक्षणे –**

१) २० व्या व २१ व्या शतकांत दलित-ग्रामीण तरुणांना जी अस्मिता व आत्मभान प्राप्त झाले त्याचा शाब्दिक हुंकार म्हणजे या दोन कादंबरीची निर्मिती होय.

२) कार्यकर्ता लेखक ही दलित-ग्रामीण साहित्याची देणगी आहे. उक्ती आणि वृत्तीमधील सुसंगती या वाङ्मयीन प्रवाहातील साहित्यिकांना लाभली आहे. याचे प्रत्यंतर या दोनही कलाकृतीतून अधोरेखित होते.

३) दलित समाजाच्या अस्मितेचे बंडखोर रूप यात आहे.

४) २१ व्या शतकातही भटक्या-विमुक्तांचा अस्मितेपेक्षा अस्तित्वाचा लढा यात अधोरेखित होतो.

५) विशेषतः महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्तांचे बौद्ध धर्मांतर आणि त्या बद्दलचा कृती कार्यक्रम आणि त्याचे वाङ्मयीन, सांस्कृतिक पडसाद चौथी क्रांती मधून अधोरेखित होते.

* * *

# आमदार सौभाग्यवती व 'सभापती' या कादंबऱ्यातील राजकारणाचा तुलनात्मक अभ्यास

–प्रा.डॉ.अनिल गर्जे

रा. रं. बोराडे आणि योगीराज वाघमारे या दोन प्रथित यश ग्रामीण व दलित साहित्यिकांच्या 'आमदार सौभाग्यवती' व 'सभापती' या कादंबऱ्यातून समाजातील नवे प्रश्न, समस्या, ताणतणाव व आजचे राजकारण याचे चित्रण प्रभावीरित्या रेखाटले आहे. 'आमदार सौभाग्यवती' व 'सभापती' या राजकीय कादंबऱ्यांनी ग्रामीण व दलित साहित्याच्या प्रांतात लक्षणीय भर घातली आहे. या दोन्ही लेखकांनी आधुनिक राजकीय जीवनावर व राजकीय स्थित्यंतराचा मार्मिक वेध घेत कादंबरीचे लेखन केले आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनातील राजकीय जीवनाशी ओळख होते.

'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत ग्रामीण भागातील पती पत्नींचा राजकीय जीवनात प्रवेश केल्याचा आलेख चितारण्यात आला आहे. चिमणराव जाधव व सुमित्रा जाधव यांच्या जीवनातील राजकीय व कौटुंबिक घटना-प्रसंग गुंफून रा.रं. बोराडे यांनी ग्रामीण राजकीय जीवनातील कौटुंबिक संघर्षाबरोबरच आजचे राजकारण चित्रित केले आहे. प्रा. डॉ.भास्कर शेळके यांच्या मते, ''राजकारणातील खेळी, राजकारणातील डावपेच, राजकारणातील गटबाजी, एकमेकांना शह देण्याचे प्रयत्न अशा काही राजकीय घटना या कादंबरीत आहेत. आधुनिक राजकीय क्षेत्रातील 'स्त्री' आरक्षाच्या आशयाचा एक नवा प्रयोग बोराडे यांनी कादंबरीत रेखाटून राजकीय क्षेत्रातील पुरुषांची मक्तेदारी मोडीत काढाली आहे. हेच या कादंबरीचे फार मोठे यश आहे. या मताशी मी सहमत आहे. कारण राजकारणात पडलेल्या कुटुबातील काही घटना प्रसंग आणि राजकीय जीवनाचा कौटुंबिक जीवनावर होणारा परिणाम याचे चित्रण 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत बोराडे यांनी प्रभावी केले आहे.

राजकीय महत्त्वाकांक्षा हे या कादंबरीचे मुख्यसूत्र आहे. द.ता. भोसले यांच्यामते, आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत चिमणराव आणि सुमित्राबाई या दोन प्रमुख व्यक्तिरेखा असुन कथानक त्यांच्या भोवतीा खेळते. त्यामुळे त्यांच्या सहवासात येणाऱ्या अन्य व्यक्तिवर अधिक प्रकाश पडू शकला नाही. परंतु

कोणतीही कलाकृती रेखाटताना संपूर्ण स्वातंत्र्य हे कलाकाराचे असते. त्यामुळे अशी टीका तेवढीशी ग्राह्य वाटत नाही.

चिमणराव जाधवांचे तिकीट नाकारल्याने सुमित्राबाईंना राजकारणात येण्याची संधी मिळते. त्या प्रचंड मताधिक्याने निवडून येतात. सुमित्राबाईंने आपल्या कलाने वागावे आपल्या हातातील बाहुले म्हणून रहावे असे त्यांना वाटते. परंतु त्यांचा हेतू असफल होतो. चिमणराव मतदार संघात पत्नीविरोधी असंतोष निर्माण करतात. विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या विरूद्ध आघाडी उघडून विधानसभा बरखास्त करण्यातही ते यशस्वी होतात. आपल्या इच्छेनुसार पत्नी वागत नाही. त्यामुळे तिच्याविरुद असंतोष निर्माण करून तिला पुन्हा राजकारणात वाव राहणार अशी परिस्थिती निर्माण केली जाते. एका अर्थाने पुरुषांच्या स्त्रीवरील वर्चस्वाची कथा या कादंबरीत लेखकाने वेगळ्या ढंगाने विकसित केली. डॉ.वासुदेव मुलाटे यांच्या मते, राजकीय महत्त्वाकांक्षा असलेल्या आणि राजकारणात सक्रीय सहभाग असलेल्या व्यक्तीचे कौटुंबिक जीवणचित्रणही आमदार सौभाग्यवती या कादंबरीत केले आहे. त्यामुळे राजकीय आणि कौटुंबिक जीवन असे दोन पदर या कादंबरीला लाभालेले आहेत.

थोडक्यात राजकारण कसे असते? राजकारणातील डावपेच कसे खेळले जातात. राजकारणातील विविध वृत्ती प्रवृत्ती कशा असतात? राजकारणातील सत्तेच्या हव्यासापायी माणूस आपले कौटुंबिक जीवन कसे उद्ध्वस्त करतो, नाती गोती विसरुन नात्या गोत्यानेच राजकारण कसे करतो? अशा अनेक प्रश्नांची उकल रा.रं. बोराडे यांनी आपल्या 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत कलात्मकतेने केली आहे. तसेच राजकारणी व्यक्तीचे, त्यांच्या वृत्ती प्रवृत्तीचे, त्यांच्या महत्त्वाकांक्षेचे आणि सुडाच्या राजकारणाचे अत्यंत प्रभावी दर्शन या कादंबरीत घडविले आहे.

'सभापती' ही दलित लेखकाने लिहिलेली दलित राजकीय जीवनावरील वास्तववादी पण आगळीवेगळी कादंबरी आहे. आजचा सर्वच समाज मूलयहीन, स्वार्थी, श्रेष्ठ तत्त्वांना व थोर विभूतींना विसरालेला आहे, याचे दर्शन या कादंबरीत घडते. स्वातंत्र्यानंतर काही दलितांना राजकारणात व सत्तेत पदे मिळाली. त्यामुळे त्यांचे दरिद्री जीवन जाऊन ते वैभवाचा उपभोग घेऊ लागले याचे चित्रण या कादंबरीत आहे. सभापती धर्मराज हे याचे उदाहरण आहे. गवंडीकाम करणारा, लग्नसराईत बॅंड वाजविणारा धर्म्या सभापती झाल्यावर

त्याचे सर्व जीवनच बदलून जाते. याविषयी पिराजी म्हणतो, काय त्याच्या आयला एकेकाचं नशीब असतंय झोपडीतून उठविलं अन् बंगल्यात आणून बसविल. एक म्हणता दोन मजली बंगला, घरासमोर मोटार काय दारात शिपाई उभा, घरात मोलकरीण, बसायला सोफासेट, झोपायला पांग, गादी, मरदाणी, लाईट, पंखा, अंघोळीचं घरातच, पायखानाबी तिथं बसल्या जागी हाजीर. कुठं कुठं म्हणून जावं लागत नाय, कुणाला काय कुणाला काय म्हणायचं असलं तर फोन हाल्या. कुणालाबी कवाबी बोला.

स्वार्थी, सत्ताधारी दुबळ्या, अडाणी, अशिक्षित दलित माणसाच्या हातात सत्ता देतात, पण त्याचे खेळणे करतात. कावेबाज व धूर्त राजकारणी स्वत: हवी तशी सत्ता वापरतात. धर्मराजला सभापती असूनही त्याचं बुजगावणं करतात. धर्मा अडाणी असल्यामुळे त्याचा पी.ए. त्याला फसवतो. समाजकल्याण अधिकारी फसवतो. जिल्हा परिषद अध्यक्ष त्याचा वापर करतो. याविषयी स्वत: धर्मा म्हणतो, काय आपला उपयोग? माझ्या खात्यातलं बजेट अधिकाऱ्यांनी मला सांगितलं नाही. माझ्यापासून लपवून ठेवलं आपण या पदाला पात्र नाहीत. नुसते सह्याजीराव आहोत असं म्हटलं तरी चालेल. आजच्या दलितसमाजाचा उद्धार करणारे सर्वच नेते हे अत्यंत स्वार्थी झाल्याचे चित्र यात दिसून येते.

आजचे राजकारण 'सभापती' आणि 'आमदार सौभाग्यवती' या कादंबऱ्यांतून प्रतिबिंबीत झाले आहे. स्वार्थासाठी काँग्रेस दलितांचा उपयोग करते. सत्ताधारी धर्मराज सभापतीला फसवतात. त्याच्या अडाणी, दुबळेपणाचा फायदा उठवतात. पिराजी, दासू, अशोक हे दलित राजकारणीसुद्धा स्वत:च्या स्वार्थासाठी धर्माचा बळी देतात. आजचे ढोंगी राजकारण, त्यातील डावपेच मोठ्या ताकदीने 'सभापती' कादंबरीत योगीराज वाघमारे उभे करतात. तसेच 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत रा. रं. बोराडे यांनी राजकारणात स्त्रियांनी प्रवेश केल्यावर त्यांची होणारी कोंडी याचे चित्रण केले आहे. त्यांना स्वतंत्र निर्णय घेता येत नाहीत. घेतो तर पतीचा अहंकार जागा होऊन शिगेला जातो याचे मर्मभेदक चित्र रेखाटले आहे. स्त्रीने निवडून आल्यानंतर पुरुषाच्या हातचे बाहुले बनले पाहिजे. एखाद्या स्त्रीने विरोध केला तर पुरुष तिच्या विरोधी बंड करून उठतो. तिला संपवण्याची भाषा वापरतो. तिची कोंडी केली जाते. भावनिक कोंड मारा केला जातो. तिला वेठीला धरले जाते. एक ना अनेक अडचणी तिच्यापुढे पुरुष निर्माण करतो. तिचा हक्क हिसकवला जातो. कधी कधी तिला बेघर केले जाते.

एकीकडे पुरुषी वर्चस्वाचा वरचष्मा स्त्रीया राजकारणावर तर दुसरीकडे सवर्णांचा वरचष्मा दलितांच्या राजकारणावर यांचे चित्र या कादंबऱ्यांत उठावदारपणे आले आहे. राजकारणात शिरलेल्या अपप्रवृत्ती व्यक्तिगत स्वार्थाचा आलेले महत्त्व, कमालीची वाढलेली महत्त्वाकांक्षा याचे चित्रण या दोन्ही कादंबऱ्यातून दिसते. प्रा. रामचंद्र काळुंखे यांच्या मते, राजकीय नाट्य, घडामोडी आणि राजकारणातील डावपेच रा. रं. बोराडे यांनी अतिशय सामर्थ्याने उभे केले आहे.

**निष्कर्ष :**

१. बदलत्या राजकीय वास्तवाचे प्रतिबिंब या दोन्ही कादंबरीतून उमटलेले आहे.
२. या कांदबऱ्यांतून अस्वस्थ करणारे राजकीय वास्तव चिंतनीय आहे.
३. कुरूप आणि मूल्यभ्रष्ट जातीय राजकारणाचे चित्रण करताना नैतिकता केंद्रस्थानी आणली आहे.
४. या दोन्ही कादंबऱ्यांतून मूल्यहीन राजकारणाचे दर्शन घडविले आहे.
५. 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीत स्त्रीची राजकारणात होणारी कोंडी, मूल्यहीन गढूळलेले राजकारणाचे चित्रण दिसते. तर 'सभापती' या कादंबरीत राजकारणातील विविध वृत्ती-प्रवृत्ती, डावपेच, कुटिलकारस्थाने यातून होणारी स्थिती याचे चित्रण दिसते.

* * *

# दलित ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचे चित्रण : तौलनिक विचार

–डॉ.भास्कर शेळके

ग्रामीण, स्त्रीवादी, जन, देशी–कृषी इ. साठोत्तरी प्रमुख साहित्य प्रवाह असलेतरी स्वातंत्र्यपूर्व काळातही त्यांच्या काही पाऊलखुणा दिसतात. विशेषत: दलित ग्रामीण साहित्याच्या स्वातंत्र्यपूर्व ते २००० पर्यंतच्या कादंबरीतील स्त्री चित्रण स्वरूप येथे अभिप्रेत आहे, त्यानंतरचे चित्रण मात्र बदलत गेल्याचे चित्र दिसते. या शोधनिबंधात साधारणपणे २००० पर्यंतच्या दलित ग्रामीण कादंबरीतील मराठी स्त्रीचे चित्रण एवढी मर्यादा घातली आहे. त्यासाठी काही प्रातिनिधिक कादंबऱ्या उदाहरणादाखल अभ्यासल्या असून महाराष्ट्रातील प्रमुख प.महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भातील दलित ग्रामीण कादंबरीतील 'स्त्री' चित्रणाचा विचार केला आहे.

पश्चिम महाराष्ट्र मुळातच क्रांतिकारक, विकासाच्या योजना, राजकीय, सामाजिक, आर्थिक वर्चस्वाचे केंद्र असलेतरी स्वातंत्र्यपूर्व काळ ते आजपर्यंतची स्त्री 'मुकी'च आहे. तिच्या भावभावनाचे चित्रण तितक्या समर्थपणे झालेले दिसत नाही. ती कष्टाळू, संसारदक्ष, संस्कारक्षम, श्रद्धाळू, घर/सर्वस्व मानणारी, पतिनिष्ठ, दबलेली उपेक्षित अशीच दलित ग्रामीण कादंबरीतून चित्रित झाली आहे. याचे कारण समाजवास्तवात दिसते. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटते, साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. हे मान्य केल्यानंतर ते स्त्रीजीवन चित्रणाबाबत सार्थ वाटते.

पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील 'स्त्री' चित्रणाचा परामर्श घेताना ना.वि.कुलकर्णी यांच्या 'कसे दिवस जातील' (१९२५) या कादंबरीचा जाणीवपूर्वक विचार करावा लागतो. महात्मा गांधी विचारांच्या प्रभावातून त्यांनी लेखन केले असले तरी 'खेड्याकडे चला' असे सुचविताना कादंबरीकार 'स्त्री' चित्रण ही दुय्यमत्त्वाच्या वास्तवातून साकारतात. सावकाराने जमीन व गावकऱ्यांनी घर हस्तगत केल्यानंतर दुष्काळात जगण्यासाठी मुंबईला जाणाऱ्या कुटुंबातची ही परवड आहे. या कादंबरीतील संवेदनक्षम, रखमा रूपवान, गुणवान पती परमेश्वर मानणारी, फुटक्या नशिबाला दोष देणारी आहे. शोषित, सहनशील, कष्टाळू, नम्र, श्रद्धाळू असली तरी देशावरील मोकळ्या वातारणातील रखमा मरणप्राय

दु:ख भोगते. व्यसनी नवरा, बहकलेला मुलगा यांचा सांभाळ करण्यासाठी ती खाणावळ चालविते.

'शिपाई' (१९२५) ही ना.वि.कुलकर्णी यांची दुसरी महत्त्वाची कादंबरी आहे. निराबाई ही खेड्यातील निराधार, बाणेदार, सोशीक, परिस्थितीला सामोरी जाणारी, आशावादी स्त्री आहे. नवऱ्याचा मृत्यूच्या बातमीने गळ्यात धोंडा बांधून विहिरीत जीव देणारी प्रेमळ, निष्पाप गजरा तर मल्हारीची खंबीर विधवा आजी ही एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. मंजुळा देखणी, सालस मुलगी आहे.

र.वा.दिघे यांनी 'पाणकळा' (१९३९), सराई (१९४३) निसर्गकन्या रानजाई (१९४६) गानलुब्धा मृगनयना (१९५६) 'आई आहे शेतात' (१९५६) पड रे पाण्या (१९५८), कार्तिकी (१९६९) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत, 'पाणकळा' मध्ये गहिनाजीची सुंदर बायको पारू ही पतिनिष्ठ आहे. रंगेल रंभाजीचा तिच्यावर डोळा आहे, तरीही त्याच्या श्रीमंतीला न भाळता ती गरिबीतही समाधान मानते, भुजाबाची बायको जानकीप्रमाणेच ती खानदानी, मर्यादाशील व कष्टाळू स्त्री आहे. त्यांच्या इतर कादंबऱ्यातील स्त्रीचे असेच चित्रण येते.

ग.ल. ठोकळांनी 'गावगुंड' (१९४६) 'ठिणगी' (१९६३) आणि 'टेंभा' (१९८२) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. पिसाळ फौजदाराची मुलगी 'लीला' ही खानदानी ताठा असलेली तर 'पारू' ही गुणाजीची बायको ग्रामीण स्त्रीचा अस्सल नमुना आहे. ग्रामीण संस्कृती-परंपरा यांचे मिश्रण तिच्या व्यक्तिमत्त्वात आढळते, माहेर सासरबद्दल अभिमान बाळगणारी ही खानदानी निर्मळ मनाची स्त्री आहे.

म.भा. भोसले यांनी 'समरांगण' (१९४१), 'उघड्या जगात' (१९४७), 'एका आईची लेकरं' (१९५१), 'घसरगुंडी'(१९६३), 'कायापालट'(१९६६) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत, त्यांच्या 'उघडया जगात' या कादंबरीतील काकासाहेब सावकाराची मुलगी 'चंद्रा' आपले मुके प्रेम सखाराम या तरुणास अर्पण करते. चंद्राची आई 'सावित्रीबाई' प्रेमळ आहे. शोषित, बलात्कारीत, सहनशील 'हौशा' व तिची विधवा आई सारजा यांचेही चित्रण कादंबरीकाराने केले आहे. स्त्रीचे शोषण हे ग्रामजीबनाचे अविभाज्य अंग तत्कालीन परिस्थितीत कादंबरीकाराने चित्रित केले आहे. गरीब श्रीमंत कोणत्याही घरातील स्त्रीला

मूक वेदना सोसाव्याच लागतात, आजही त्यात फार फरक पडला असे दिसत नाही.

विभावरी शिरूरकरांची 'बळी' (१९५०) मध्ये प्रकाशित झाली. विषय आणि जीवनचित्रणाचे स्वरूप वेगळे असले तरी आबाची आई 'चांगुणा' ही मुलांना जगविण्यासाठी इंग्रज सोजिरापुढे आपली हाडं टाकते, यातून तिची कुटुंबवत्सलता दिसते, व्यभिचाराचा येथे लवलेशही नाही. गो. नि. दांडेकर यांची 'पवनाकाठचा धोंडी' ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. 'सारजा' ही धोंडी हवालदाराची मर्यादाशील, परंपराप्रिय, सोशीक पत्नी तर कोंडीची बायको 'सरू' ही देखील प्रेमळ, समजंस, सोशीक आहे.

धोंडी-कोंडीचा संघर्ष येथे महत्त्वाचा असल्यामुळे सारजा, सरू या स्त्रियांना दुय्यमस्थानीच लेखकाने ठेवलेले दिसते. व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी'(१९५५) मध्ये धनगरांचे भावविश्व रेखाटले असले तरी त्यातील अंजी, शेकू या मराठमोळ्या, कष्टाळू, भोळ्या, श्रद्धाळू, निष्पाप अशा रेखाटल्या आहेत. त्यांच जग-वागणं कारभाऱ्यावरच अवलंबून आहे, तसेच अण्णाभाऊ साठे, 'फकिरा', 'वारणेचा वाघ', आणि इतरही कादंबऱ्यामधून स्त्रीचे चित्रण करताना दिसतात. ग्रामजीवनातील स्त्रियांचे स्थान दुय्यमच असल्याचे त्यातूनही दिसते. 'फकिरा' हिरो ठरतो, पाटील-कुलकर्णी यांच्या भावभावना रेखाटल्या असल्यातरी 'स्त्री' चित्रणाचा अभावच आहे, तर 'वारणेचा वाघ' मधून सोना, सुगंधा, सुभद्रा, सई, बणबाई, यांनाही गौणस्थानीच ठेवलेले दिसते.

रणजित देसाई, 'बारी' (१९५९), 'माझा गाव' (१९६०), 'समिधा' (१९७९) पैकी 'माझा गाव' मधून स्वातंत्र्यपूर्वकाळातील खेडे चित्रित केले आहे. येथेही स्त्रियांना दुय्यमत्त्व बहाल केले आहे. नीतिमत्तेची चाड असलेल्या 'काळी', 'उमा' चित्रित केला आहे. काळी ही सौभाग्याचे मरण मागणारी तर 'उमा' ही खानदानी घरातील स्त्री पतीच्या रंगेलपणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न करते, दिरावर आईप्रमाणे माया करते, सत्त्वशील घराण्याची प्रतिष्ठा जपणारी, प्रेमळ, व आज्ञाधारक सुसंस्कृत आहे. शंकर पाटील यांनी 'टारफुला' (१९६४) मधून सुभानराव पाटलाची विधवा, निपुत्रिक पत्नी पाटलीणबाई चित्रित केली आहे, तर दि.बा.मोकाशी यांनी 'स्थळयात्रा', 'देव चालले' (१९६१) 'पालखी', 'आनंद ओवरी' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'देव चालले' मधील बालविधवा सीताकाकू पुतण्यांवर प्रेम करणारी, मायाळू, समजदार व

श्रद्धाळू आहे. प्रेमाचा एकएक धागा जोडला, सर्व धागे निसटले, शेवटी 'देवा' चा धागा निसटल्याने ती अस्वस्थ, उदास होते, वृत्तीने कणखर असूनही तिच्या श्रद्धेला तडा गेल्याने ती विफल होते.

आनंद यादवांच्या 'एकलकोंडा' (१९५९), गोतावळा, (१९७१), 'नटरंग' (१९८०), 'झोंबी' (१९८७), 'नांगरणी' (१९९०) 'घरभिंती' (१९९२) इतर कथा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. स्वत:ची आई, आणि ग्रामीण स्त्रिया व त्यांच्या कथा-कविता कादंबऱ्याच्या केंद्रस्थानी आहे, 'गोतावळा' मध्ये रामू सोनवडे यांची बायको आणि मुलगी यांचे अस्पष्ट चित्रण येते, कारण मुळात ग्रामजीवनात स्त्रीचे स्थानच अनुलेखनीय, दुय्यम असते, त्यामुळे या व्यक्तिरेखा ठसठसीत असणे केवळ अशक्यच आहे, मुलीला स्थळ पाहण्याचा उल्लेख फक्त येतो, तिचे रंगरूप, भावभावना, इच्छा अकांशा लेखक चित्रित करीत नाही. अर्थात नारबाचे भावविश्व अधोरेखित करणे हेच त्यांना अभिप्रेत आहे, हेही लक्षात घ्यावे लागते.

उत्तम बंडु तुपे यांच्या 'इंजाळ' (१९८४) 'झुलवा' (१९८६), 'काळोखी' (१९८८), 'खाई' (१९८८), 'चिपाड' (१९८९), 'खुली' (१९९१), या सहा कादंबऱ्या आहेत. गाव आणि शामा त्यांच्या इंजाळ कादंबरीत केंद्रस्थानी असल्यामुळे त्याची आई पुतळा, पत्नी जगी, लता-आशा या मुली, शांता, सीता, जमनी या बहिणी या गौणस्थानी आहेत. बा.ग. केसकरांच्या 'कुणांच्या खाद्यांवर' (१९८४) या कादंबरीच्या केंद्रस्थानी सहकारी साखर कारखानदारीतील शोषण असल्यामुळे मल्हारीची बायको सुरवंता वहिणी या ऊसतोडणी मजूर स्त्रियांचे चित्रण स्वाभाविकपणे दुय्यमस्थानी जाते. श्रमाच्या पलीकडे त्यांना जग नाही, सुरवंता स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करते, न्याय-अन्याय तिला समजतो, तिचीही वाताहात केसकरांनी रेखाटली आहे. या कष्टाळू बाया 'सांगितल्या कामाच्या आणं दिल्या भाकरी लुगड्याच्या धनी' असे स्वत:ला समजतात, आपले शोषण होते याचे त्यांना भान नाही, कारण साहित्य हा समाजाचा आरसा, प्रतिबिंब आहे, जे समाजवास्तव तेच साहित्यात आविष्कृत होते, त्यामुळे आशा वाताहत झालेल्या प्रातिनिधिक 'सुखंता'च सर्वच कादंबऱ्यामधून भेटतात.

राजन गवस 'चौंडक' मधून जोगतिणीचे भावविश्व चित्रित करतात. सुली, बायजा, शेवंता, गंगूबाई, तानू, फुली या देवदासी जोगतिणी आहेत,

अंधश्रद्धेमुळे स्त्रियांची होणारी समाजमान्य वाताहत येथे केंद्रस्थानी आहे. अज्ञान, देवावरील श्रद्धा, निष्पाप जोगतिणीचा कोंडमारा, देवदासींचे मानसिक शारीरिक शोषण समाजमान्य आहे, हे येथील घटनाप्रसंगातून अधोरेखित केले आहे. आनंद पाटील 'कागूद आणि सावली' मधून ग्रामजीवनातील समस्यांवर भाष्य करतात, येथे नानी, आजी, आई या व्यक्तिरेखा गौणच आहेत. तसेच 'सावली'तील तानू, आंबू, जना या जावा कष्टाळू, आहेत. घरातील त्यांचे स्थान नगण्यच आहे, त्यांचा भावनिक कोंडमारा होतो. सोशीक स्त्रियांच्या त्या प्रतिनिधी आहेत. याप्रमाणे रामचंद्र पठारे याच्या 'पाचर' (१९८९) मधून आधुनिकता आणि जातीय संघर्ष अधोरेखित करताना परिवर्तन काळात येथे स्त्रीचित्रणाचा अभावच दिसतो.

कोकण-गोव्यासह जीवनचित्रण कादंबरीकारांनी केले असले तरी 'भावीण' व 'पडघवलीतील' स्त्रीचित्रणाइतके ठसठसीत स्त्रीचित्रण इतर कादंबऱ्यांमध्ये दिसत नाही. अर्थात 'स्त्री'चित्रण करणे हा उद्देश त्या कादंबरीकारांचा असेलच असेही नाही याकडे दुर्लक्ष करता येत नाही. र.वा.दिघे यांच्या 'सराई' मधील राजसबाई, सुभद्रा, मनोरमा, बय, लाडी आणि 'आई आहे शेतात' मधील नातू सातपुते यांची कष्टाळू आई, बहिष्कृत सगुणा, तिची आई जिजा, बनूताई, पुतळाबाई, या सर्वजणी जिद्दी, कष्टाळू, हिशोबी खानदानी, प्रेमळ तर राही-रखमा, बायजा, येसूताई, बाबरीबाई या सर्वच गौण व्यक्तिरेखा आहेत.

वि.वा.हडप यांच्या 'अन्नदाता उपाशी' (१९४६) मधील जमना पतिनिष्ठ, सोशीक, कष्टाळू स्त्रीची प्रतिनिधी आहे. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या 'मांडवी तू आटलीस?' मध्ये अशोक वर प्रेम करणारी लीना, तसेच हिरा, काकी या धर्मांतरित कुणबी स्त्रिया आहेत. तर 'भावीण'ही ब.भ.बोरकरांची गोमंतकीय पार्श्वभूमीवरील शेवंता भाविणीच्या आत्मबलिदानाची कथा आहे. रंजना, कमळी या अन्य गौण व्यक्तिरेखा आहेत. त्यांची स्वीकारशीलता, व्यवहारी शहाणपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न बोरकरांनी केला आहे. 'हद्दपार' ही श्री. ना. पेंडसे यांची कादंबरी आहे. लक्ष्मी ही दवणेप्रभू घराण्यातील विनयवती, घराण्याबद्दल अभिमान असलेली, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी, कामसू सुस्वरूप आणि प्रेमळ आहे, तर गारंबीचा बापू मधील बंडखोर राधा, व्यभिचारी यशोदा, यमी, मावशी या वेगवेगळ्या मुशीतील स्त्रिया आहेत. गो.नी.दांडेकरांनी 'पडघवली' मधून अंबू वहिनीला निवेदकच केले आहे. श्रद्धाळू, कष्टाळू,

सद्वर्तनी अंबू शेवटी अगतिक होऊन मुलाकडे जाण्याचा विचार करतो. अक्की, कुशात्या या सामान्य स्त्रिया तर शारदा ही व्यभिचारी रेखाटली आहे. 'सारे प्रवासी घडीचे' मधून जयवंत दळवी यांनी नरूची विधवा आई, व्यभिचारी दुर्गाबाय, मणी जपणारी श्रद्धाळू आजी, वामनदाजीची उचापती करणारी बायको, कुरडी बाया, या स्त्रियांचे नगण्यत्वच चित्रणातून दिसते. 'इंधन' कादंबरीतून हमीद दलवाई, हिंदू-नवबौद्ध, मुस्लीम संघर्षाचे चित्रण करतात. भाबी आणि लक्ष्मी या श्रद्धाळू तर इतर स्त्रियांचे व्यभिचाराचे चित्रण दलवाई करतात.

'मराठवाडा' हा प्रदेश मुळातच मागासलेला आहे. आजही या प्रदेशाच्या अनुशेषाचा प्रश्न अनुत्तरीतच आहे. स्वाभाविकच येथील जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा परामर्श घेताना स्त्रियांचे स्थान दुय्यमच असल्याचे दिसते. बी. रघुनाथ हे मराठवाड्यातील महत्त्वाचे कथा-कादंबरीकार, त्यांनी 'आडगावचे चौधरी' मध्ये सरंजामी, जहागीरदारांचे तीन पिढयांचे चित्रण येते. स्त्री चित्रणाला वावच नाही. त्यांच्या घराण्यातील स्त्रीचा विद्रोह करू शकत नाहीत. उघड्या डोळयांनी पुरुषांचे रंगढंग पाहतात. वहिणी सारख्या स्त्रिया कुंकवाचे रक्षण करण्यासाठी धडपडतात.

'पाचोळा' ही रा.रं. बोराडे यांची महत्त्वाची कादंबरी, खऱ्या अर्थाने मराठवाड्यातील स्त्रीचे चित्रण कथा कादंबरीतून बोराडे यांनी केले आहे. 'पाचोळा' मधील गंगारामची बायको पार्वती ही प्राप्त परिस्थितीत सुख मानणारी, संसाराची परवड थांबविण्यासाठी धडपडणारी दूरदृष्टीची धीर गंभीर सोशीक, समंजस, मर्यादाशील, प्रेमळ व कष्टाळू रेखाटली आहे. 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीतून स्त्रीच्या वाट्याला आलेले सुखदुःख अधोरेखित केले आहे, ती पुरुषप्रधान व्यवस्थेची बळी ठरते. आजही महिला विधेयकास मान्यता मिळत नाही. यातून स्त्रीची उपेक्षाच ध्वनीत होते. तसेच ना. धों. महानोर यांनी 'गंधारी' मधून गुलाबबाई, हौसा, जाईबाई, सारजा, शेवंता यांना दुय्यमत्त्वच बहाल केले आहे. 'गणगोत' या गणेश आवटे यांच्या कादंबरीतून 'आंजू' ही सासुरवाशीण सोशीक, समजंस संयमी तर तिची रांगडी सासू, अल्लड नंनद सुशाबाई, आंजूची आजारी हतबल आई साकारली आहे. 'विषवृक्षाच्या मुळया' मधून वासुदेव मुलाटे यांनी विश्वनाथ तरटे ची पत्नी स्मिता प्रेमळ, सुखदुःखात साथ देणारी, तर आई कर्मठ, रेखाटली आहे. सुंदर तरुणी माधुरी जोगळेकर चंचल असलेली दिसते.

विदर्भ प्रदेश निसर्गसमृद्ध व आर्थिक मानसिकदृष्ट्या दुर्बल आहे. या प्रदेशातील जीवनचित्रण करताना स्त्रियांचे चित्रण नगण्यच दिसते. गो.नी. दांडेकरांच्या 'पूर्णा मायची लेकरं' मध्ये बयिराम ढोमण्याची आई आलोकाबुढी, पत्नी मनकर्मा या साध्या सरळ, श्रद्धाळू आहेत. त्यात आलोकाबुढी कर्तबगार, जहांबाज, हेकट, तर्कट, बडबडी, स्पष्टोक्ती आणि काळ्या आईवर श्रद्धा असणारी, तर मनकर्पा आळशी, झोपाळू खास वऱ्हाडी स्त्रीची प्रतिनिधी आहे. उद्धव शेळके यांच्या 'धग'ची नायिका कौतिक ही कष्टाळू साहसी, परंपराप्रिय आणि प्रेमळ आहे. बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' मधील न्यानबाची बायको आनसा, मुलगी सोबा यांच्या जीवनातील संकटाची मालिका चित्रित केली आहे. आनसा व्यवहारी, सोशीक, समजदार, शहाणी, खानदानी, निष्ठावान, कष्टाळू, सरळमार्गी तर सोबा ही नैतिकता जपणारी, निष्कपट, इज्जत इभ्रत जपणारी, शालीन निष्पाप, अबोल, खचलेली आईवडिलांच्या गैरमर्जीस कारण ठरलेली, सरळमार्गी, विरहव्याकूळ आहे. पुरुषोत्तम बोरकरांच्या 'मेड इन इंडिया' मध्ये राजकारणाचा वारसा असेल्या कुटुंबातील स्त्रियांना दुय्यमत्त्व बहाल केले आहे. प्रतिमा इंगोले यांनी 'बुढाई' आणि 'पार्टटाईम' मधून 'स्त्री' चित्रण प्रभावीपणे केले आहे.

### निष्कर्ष –

१. विषय विवेचनासाठी निवडलेल्या दलित ग्रामीण कादंबऱ्या या मराठी स्त्रीचे चित्रण करण्यासाठी लिहिलेल्या आहेत असे नाही.

२. जाणीवपूर्वक स्त्रीचित्रणाचा कादंबरीकारांचा उद्देशही नाही, जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून स्त्री चित्रण येते.

३. लेखकाने केलेले जीवनानुभवांचे चित्रण हे त्याच्या कल्पनासामर्थ्यासह, लेखकाच्या लेखन प्रकृतीनुसार आविष्कृत झालेले असू शकते.

४. कादंबरीतून चित्रित झालेल्या स्त्रिया प्रामुख्याने कुटुंबवत्सल, सोशीक, प्रेमळ, न्याय–अन्यायाची किंवा 'स्त्रीपुरुष' समानतेची जाणीव नसलेल्या श्रद्धाळू, रीतिरिवाज, परंपरा, संस्कृती जपणाऱ्या आहेत. रुढीमुळे स्त्री जीवनाची फरफट होते.

५. स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे, याची त्यांना जाणीवही नाही. दिल्या घरी पडेल ते कष्ट करण्याची त्यांची मानसिकता दिसते.

६. 'स्त्री' व्यक्तिचित्रण प्रधान दलित ग्रामीण कादंबरी अपवादानेच दिसते.
७. अन्याय-अत्याचार सोसणारी, पडेल ते कष्ट करणारी प्रामाणिक स्त्री असेच मराठी स्त्रीचे चित्रण कादंबरीत येते. ती स्थितिशील दिसते, तर अन्य समाजातील स्त्रिया या परिवर्तनाला सामोऱ्या जाताना दिसतात.
८. स्वातंत्र्यपूर्व काळ ते आजपर्यंतही तिला स्वातंत्र्य, जागतिकीकरण, शिक्षण प्रचार-प्रसार यांची देखील जाणीव नाही. पुरुषप्रधान समाजात सर्वत्रच स्त्रीची अनेकांगी उपेक्षा होतच असते.तिच्या भावभावना किंवा दु:खाकडे सन्मानपूर्वक पाहिजे जात नाही. तिची प्रतिष्ठा जपत नाहीत. तिच्यावर सतत अन्यायच केला जातो. तिच्याकडे माणूस म्हणून पाहणे आवश्यक आहे.
९. संस्कृती रक्षण करणाऱ्या या स्त्रीया मात्र स्त्रीशोषण करतात.
१०. अन्यसमाजातील स्त्रिया मात्र बंडखोरी करतांना दिसतात. मात्र मराठी स्त्रियामध्ये बंडखोरी करण्याची क्षमता विकसित झालेली दिसत नाही. या परिस्थिती शरण तर अन्य स्त्रिया या परिवर्तनशील दिसतात.
११. अनेक स्त्रियांचे वर्णन येते पण त्या कुणाची तरी आई, पत्नी, मुलगी, सून अशा अर्थाने, त्यामुळे तिला स्वतंत्र चेहरा, व्यक्तिमत्त्व लाभत नाही. अर्थात जे फडके, खांडेकरांनी केले तेच स्त्रीच्या बाबत याही लेखकांनी केले असे म्हणावे लागते.
१२. कोकणी मराठी 'स्त्री' कजाग, भांडखोर, स्पष्टोक्ती असलेली दिसते. त्याप्रमाणे प. महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील स्त्रीचे चित्रण येत नाही. प्रदेशाचे संस्कार त्यातून स्पष्टपणे दिसतात.
१३. राजकारण-समाजकारणात असलेल्या कुटुंबातील स्त्रियांचे चित्रण नगण्य दिसते. त्यांना स्वत:चा आवाजच नाही.

* * *

# मराठी ग्रामीण आणि दलित निवडक कादंबऱ्यांतील स्त्रीचित्रणांचा तौलनिक अभ्यास

-प्रा.डॉ.संगीता नरेंद्र लांडगे

**प्रास्ताविक**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी साहित्यामध्ये जे विविध वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले; त्यामध्ये विशेष करून ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्याचा प्रवाह मान्य पावले ते त्यांच्या वेगळेपणामुळेच. मराठी वाङ्मयात महत्त्वपूर्ण स्थान मिळालेल्या या साहित्यप्रवाहांमुळे मराठी वाङ्मय समृद्ध झाले. मराठी वाङ्मयाच्या कक्षा व्यापक बनल्या असे म्हणता येईल.

**ग्रामीण आणि दलित कादंबऱ्यांतील स्त्रियांचा तौलनिक अभ्यास**

ग्रामीण साहित्यातील विविध कादंबऱ्याचे वाचन करत असताना त्यामध्ये स्त्रीदु:खाचे वेगवेगळे पदर उलगडले.तसेच दलित साहित्यातील स्त्रीचित्रण मनाला अस्वस्थ करत गेले. ग्रामीण स्त्रिया सामाजिक दृष्टीने दलित स्त्रियांपेक्षा फारशा उपेक्षित नसतात. त्यांना समाजात स्थान असते. दलित कादंबऱ्यांतील स्त्रियाबद्दल सांगायचे झाले तर ती समाजात जातीमुळे उपेक्षित असते. समाजात दलित स्त्रीचे दुहेरी शोषण होते. एक स्त्री आहे म्हणून आणि दुसरे ती दलित समाजातील स्त्री आहे म्हणून. समाजात तिला मान नसतो. समाजातील लोक तिच्याकडे काहीवेळा उपभोगाचे साधन म्हणूनही पाहतात. समाजात मिळणारी वागणूक तिला ग्रामीण स्त्रीच्या तुलनेत अत्यंत हीन असते. उदा. मुक्ती मधील राधा पाटलांच्या घरी चहा, पाणी पिताना तिला लांबून दिले जाते. तिच्या स्पर्शाचा विटाळ मानला जातो. ती ज्या ठिकाणी बसते तेथे पाटील बायकोला पाणी टाकायला सांगतात. उलट बायकोने उशीर करताच ते तिला मारहाण करतात. मात्र तिचा उपभोग घेताना पाटलाला ती चालते. या कादंबरीत गावचा पाटील विठा महारीन, राधा चांभारीन यांचा उपभोग घेतो. ती त्याला स्वत:चीच मालमत्ता वाटते.

ग्रामीण आणि दलित स्त्रीचे कौटुंबिक स्थान दुय्यम आहे. विवाह, हुंडा, अपत्यजन्म, गरोदरपण, असाध्य कष्ट, पती आणि मुले यांच्या संबंधाने होणारा कोंडमारा, पतीचा तापटपणा, व्यासनाधीनता, बाळंतपण या सर्व गोष्टींना तिला सामोरे जावे लागते. स्त्रियांना काम करून आले तरी घरी सुख नसते. उदा.

कौतिक कितीही थकली तरी तिला सुख मिळत नाही. दुबळा नवरा आणि उनाड मुलगा यामुळे तिला खूप कष्ट करावे लागते. मात्र तिच्या कष्टाला घरात मोल नसते. तसेच पाचोळा तील पारबतीचेही आहे.

तसेच दलित कादंबरी 'खुळी' मधील मैना सासूच्या पायात दुःखी होते. खाई मधील सावरी सासऱ्याच्या वाईट प्रवृत्तीने बदनाम ठरते. त्यातही नणंद-नीला आणि दीर माधव तिला सुख देतात. परंतु शेवटी नवऱ्यामुळे ती गावाच्या तावडीत सापडते आणि सर्वस्व गमावते. तिला मायेचे कोणीच नसते. या दोघींनाही कौटुंबिक सुख मिळत नाही. हीच स्थिती हारण, कौतिक, पारबती या ग्रामीण स्त्रियांची दिसून येते.

ग्रामीण कादंबऱ्यांतील आणि दलित कादंबऱ्यांतील स्त्रीचित्रणाची कौटुंबिक स्तरावर तुलना करता असे दिसते की, दोन्ही ठिकाणच्या स्त्रिया दुय्यम आहेत. त्यांना कमी अधिक फरकाने सारख्याच प्रसंगांना तोंड द्यावे लागते आहे. त्यांना कोणत्या ना कोणत्या कारणाने दुःखच पदरी येते. यातील कोणत्याच स्त्रीला कौटुंबिक सुख नीट लाभले नाही.

दोन्ही ठिकाणी काही नायिका अल्पशिक्षित, तर काही अडाणी अशा रेखाटल्या आहेत. भारतीस समाजात एकंदरीतच स्त्रीचे स्थान गौण आहे. स्त्री शिक्षणाविषयी उदासीनता आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाबाबत असणारी कमालीची अनास्था दिसते. आणि हीच अनास्था, अज्ञान ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीमध्ये मांडले आहे. त्यात प्रामुख्याने रंगनाथ पठारे यांच्या 'हारण' या कादंबरीत दिसून येते. मात्र हारण कादंबरीत आणि मुक्ती कादंबरीत लेखकाने सुधारित विचार आणल्याचे जाणवते.

व्यवसाय, जात यानुसारच समाजामध्ये भेद पडतात आणि त्यांचे वेगळेपण ठरते. दोन्ही ठिकाणच्या स्त्रियांचे व्यवसाय हे जात आणि शेतीशी निगडित असल्याचे दिसून येतात.

ग्रामीण आणि दलित स्त्रीच्या मनावर अंधश्रद्धेचा जबरदस्त पगडा दिसतो. बऱ्याच गोष्टी ती अंधद्धेपोटी करत असते. अंगारे, धुपारे, उतारे ह्या गोष्टी त्या सर्रास करताना आढळतात. अंधश्रद्धेपोटी स्त्रीला सोडून दिले जाते. याचे उदाहरण चंद्रकुमार नलगे यांच्या 'अगीनफूल' कादंबरीत पहावयास मिळते. चौंडकं या कादंबरीतील सुलीला देवाला सोडले जाते. धग मध्येही कौतिकची शांदूलबुवावर श्रद्धा असते. एक दिवस तिच्या मुलीला जास्त अफू होते. तेव्हा

ती बेशुद्ध पडते. त्यावर उपाय म्हणून कौतिक, मी तुझ्या नावानं पाच बस्तरवार करीन पुडच्या बस्तरवारपासून.... (पृ. ७२) असे शादुलबुवाला साकडे घालते. मालतीगंधा मध्ये मालतीच्या अंगाला विळखा घातलेल्या नागाला विश्राम मारून टाकतो. तेव्हा तात्या म्हणतात., छे:! छे:! अभद्र! या घराचा फार जुना राखणदार आज मेला घराचं छप्परच गेलं (पृ. १०७) या ठिकाणीही अंधश्रद्धा दिसते.

दलित कादंबरी 'खुळी' मध्ये आलेली अंधश्रद्धा फार भयानक आहे. ही कादंबरीच संपूर्ण अंधश्रद्धेने व्यापली आहे. यातील मैनाची सासू भारजा ही देवदेवस्कीच्या खुळाने पछाडलेली असते. गावातील भगतावर तिची मर्जी असते. प्रत्येक गोष्टीत तिला भगताची कृपा वाटते. मैनाला बरेच वर्ष मूलबाळ होत नाही. तेव्हा मैना डॉक्टरकडे तपासून येते. याचा तिच्या सासूला भयंकर राग येतो. ती मैनाला म्हणते, माझ्या भगताकडं माग. त्याच्या ठाणकावर जा. त्यो सांगतुया की गुण. त्याला तुपाची गरज न्हाय. रूप दावतुया. (पृ. ७१) 'झुलवा' कादंबरीतील येलू परंपरेप्रमाणे आपल्या शिकलेल्या मुलीला जोगतीण बनविते. अशाप्रकारे ग्रामीण आणि दलित दोन्ही कादंबऱ्यांतील स्त्रियांमध्ये अंधश्रद्धा, परंपरा, अनिष्ठ चालीरीती यांचा जबरदस्त पगडा पहावयास मिळते. मूल बरे व्हावे, मूल व्हावे यासाठी त्या नवस करताना दिसतात. तर मैनासारख्या काहींना ते पटत नाही, पण घरातील लोकांमुळे त्यांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो.

पती-पत्नीमधील संबंध अत्यंत नाजूक आणि शारीरिक जवळिकीशी निगडित असतात. परंतु अशी ही शारीरिक जवळीक कधी कधी स्त्रीला असहाय्य होते. तरीही तिला नवऱ्याला आपले शरीर स्वाधीन करावे लागते. प्रतिष्ठा लाभलेला बलात्कारच स्त्रीला सहन करावा लागतो. अशा वेळी तिची होणारी कोंडी 'हारण' या कादंबरीतून दिसून येते.

एकंदरीत ग्रामीण, दलित स्त्रीपात्रांचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले की, पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना कुटुंबात आणि समाजात दुय्यमस्थान असते. कुटुंबात तिच्याकडे फारसे कोणी लक्ष देत नाही. तसेच तिच्या कष्टाचे चीज, मोल कोणी करत नाही. ही स्त्री कुटुंबासाठी रात्रंदिवस झटते. तरीही तिची ससेहोलपट, घुसमट, कोंडमारा होत राहतो. परंतु ती घुसमट तिला कोणापुढे मोकळेपणे व्यक्त करता येत नाही. पुरुषप्रधान संस्कृतीने तो अधिकार तिला

दिला नाही. तिला घरात दुय्यमस्थान देऊन आपलाच हेका पुरुष चालवताना दिसतात. म्हणजे ही स्त्री पुरुषप्रधान संस्कृतीची बळी आहे, असे दिसून येते. याचे प्रभावी स्त्रीदर्शन 'धग' (उद्धव शेळके) आणि पाचोळा (रा.रं.बोराडे) या कादंबऱ्यांतील स्त्रियांवरून लक्षात येते. या स्त्रिया ग्रामीण विभागातील स्त्रीचे वास्तव आणि प्रातिनिधिक चित्रण घडविणाऱ्या स्त्रिया आहेत. दारिद्र्य, अज्ञान, कष्ट, उपासमार आणि पोरवडा यांनी त्या पिचलेल्या आहेत. निष्क्रिय, हेकेखोर, हट्टी, तापट, नवऱ्यामुळे कधीकधी संसार स्वत:च्या हातावर पेलताना त्यांची घुसमट होते. तरीही एकाकीपणे जीवन संघर्षाला, नियतीला त्या टक्कर देत, झुंजत राहतात. यात उद्धव शेळके यांच्या धग मधील कौतिक अधिक प्रभावी वाटते. ही स्वत: कष्ट करत घरादाराला काम मिळवून देते. परंतु नियतीमुळे तिची होरपळ होते, धग होते. ती धग तिला जीवनातून उठविते, तिला वेडी बनविते.

यातील सर्व स्त्रियां शेतकरी जीवन जगणाऱ्या, तर बहुतेक स्त्रियां शेतमजूरच आहेत, असे दिसते. त्यांचे कष्ट, जीवन जगण्याची पद्धत, धडपड ही प्रत्येकीची वेगळी असली तरी शेती हे केंद्र आहे. त्या केंद्राशी त्या सर्वजण समान वाटतात. त्यातही उद्धव शेळकेच्या धग मधील कौतिक प्रभावी रेखटलेली दिसते.

ग्रामीण स्त्रीदर्शनाबद्दल प्रसिद्ध लेखक डॉ. आनंद यादव लिहितात, १९२५ ते १९९५ या सत्तर वर्षाच्या काळातील ग्रामीण साहित्यातील ग्रामीण स्त्रीचे दर्शन विविध प्रकारचे आहे. ग्रामीण समाजाच्या गाभ्यातील स्त्रीची विविध रूपे पकडण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी आपापल्या परींनी केलेला आहे. ग्रामीण समाज जीवनाचे वास्तव दर्शन घडविण्याची प्रमुख प्रेरणा या सहित्याने सतत जोपासली आहे. त्याचेच फलित म्हणून स्त्रीदर्शनाकडे पहावे लागते. अशा प्रकारे ग्रामीण स्त्री साहित्याच्या प्रांतातही प्रभावी ठरलेली दिसते.

दलित स्त्री एकूण समाजात ग्रामीण स्त्रीपेक्षा दुय्यम आहे. एक स्त्री म्हणून आणि दुसरे दलित स्त्री म्हणून तिचे दुहेरी शोषण होताना दिसते. ग्रामीण स्त्रीपेक्षा तिला समाजात लाचारीने, अजीजीने जीवन जगावे लागते. सर्व उच्चवर्णीय लोक तिला वाटेल तसे अपमानास्पद बोलत राहतात. तिला समाजात ग्रामीण स्त्रीच्या तुलनेत अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळते. उच्चवर्णीय ग्रामीण स्त्री, दलित स्त्रीला मान्यता द्यायला तयार नसते. म्हणूनच त्यांच्यात फरक आहे. उच्चवर्णीय स्त्री स्वत:ला वर्णाच्या आधारे श्रेष्ठ समजते. तर दलित स्त्रीला ती

कनिष्ठ लेखते. दलित स्त्रीकडे समाज कधीकधी उपभोगाचे साधन म्हणून पाहतो. ती जर विधवा असेल, आधारहीन असेल तर तिच्यावर जबरदस्ती केली जाते. उदा.मुक्ती कादंबरीतील राधावर गावातील पाटील जबरदस्ती करतो. दलित स्त्री ही चारित्र्य जपणारी असते. मात्र समाजात तिला कधीकधी चारित्र्याने जगता येत नाही.

दलित लेखकांनी दलित स्त्रीपात्रे विशेष प्रभावी दाखविलेली आहेत. विशेष व्यक्तिमत्त्व आणि बंडखोरीचे जीवन जगणाऱ्या या स्त्रियांना परिस्थितीने बंडखोर केले आहे. रा.ग.जाधव जानकीविषयी म्हणतात, अगदी बालपणापासूनच मनाची, आत्म्याची ही बंडखोरी ती अनुभवत आहे. जीवनाच्या क्षेत्रातील बंडखोरांना केवळ परिस्थितीच घडवीत नाही, ते बंडखोरीची घडण घेऊनच जन्मतात. म्हणूनच गंगू बंडखोर ठरत नाही. पण जानकी बंडखोर जन्मते. बाबुराव बागूलांच्या सूडमधील या स्त्रिया आहेत. जानकीची आई गंगू परिस्थितीने स्वत:वर लादलेले जीवन जगण्यासाठी जानकीलासुद्धा प्रवृत्त करते, मात्र परिस्थितीवर मात करून जानकी स्वत:चे स्त्रीत्वच झुगारून देण्याचा प्रयत्न करते. अशी बंडखोरी ग्रामीण स्त्रीत दिसत नाही.

तसेच समाजात माणूस म्हणून जगण्याचा मान ज्या बाबासाहेबांच्या विचाराने आणि कार्याने दिला ते विचार दलित स्त्री स्वीकारते. आणि ज्या धर्माने तिला आजपर्यंत छळले, दुःखाशिवाय काहीच दिले नाही, त्या धर्माचा त्याग करून राधासारखी स्त्री बौद्ध धर्माचा स्वीकार करते. आणि शेवटी मुक्ती मिळविते. अशी स्त्री जे.जी. माने यांच्या मुक्ती या कादंबरीत पहावयास मिळते.

परंपरेने, धर्माने लादलेले जीवन नको असतानाही तिला ते नाईलाजाने स्वीकारावे लागते. तेव्हा ते जीवन नाकारण्यासाठी स्त्रीला बंडखोर बनावे लागते. अशी बंडखोरी आपणास उत्तम बंडू तुपे यांच्या झुलवा या कादंबरीत पहावयास मिळते. यातील जगन जोगतीण परिस्थितीने हतबल झालेली असली तरी, शेवटी ती यल्लम्मा देवीचा मुखवटा पुराच्या पाण्यात टाकून देते. हे तिच्या बंडखोर पणाचे लक्षण आहे.

ग्रामीण आणि दलित स्त्रीपेक्षा समाजात उपेक्षित ठरलेल्या मुरळी, भावीण, जोगतीण, तमाशा कलावंत अशा स्त्रियांचे जीवन फार वेगळे आहे. रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, चालीरीती यांच्या त्या बळी ठरतात. त्यांना घरसंसार, मुलेबाळे, नातेवाईक असे काहीच वाट्याला येत नाही. समाजाच्या दृष्टीने त्या

उपेक्षित, बदनाम ठरतात. समाजही अशा स्त्रियांकडे केवळ उपभोगाचे साधन म्हणून पाहत असतो. तर इतर स्त्रिया त्यांच्यांकडे पाहून नाक मुरडत असतात. धर्माच्या नावाखाली या स्त्रीची समाजात विटंबना होते. मंदिरातील पुजारी, गावातील प्रस्थापित वर्ग, अधिकारी यांच्या वासनेला त्यांना बळी पडावे लागते. तिला उपजीविकेचे कोणतेच साधन नसते.. अशावेळी तिला देवाच्या नावाने दारोदार भीक मागावी लागते. तीही पुरेनाशी झाल्यावर शरीरविक्रय करून तिला जगावे लागते. मग अशा स्त्रिया वेगवेगळ्या रोगांना बळी पडतात. कधी त्यांच्यावर अत्याचार होऊन त्यांना जगणे असह्य होऊन जाते.

त्यांना लग्नही करता येत नाही. त्यांच्याशी कोणी लग्न करत नाही. प्रथम तिचे देवाशी लग्न लावले जाते. नंतर मात्र तिला कोणातरी श्रीमंत पुरुषाशी झुलवा लावता येतो. तेव्हा तिला मिळणारा दर्जा रखेलीपेक्षा फारसा वेगळा नसतो. परंतु सर्वच स्त्रियांचा झुलवा होतो, असेही नाही. आणि झाला तरी टिकतोच असे नाही. अशा वेळी तिला मात्र रस्त्यावर मावे लागते. झुलवा लावणारा तिचा बायकोप्रमाणे सांभाळ न करता तिला रखेलीचा दर्जा देतो. तिच्या पोटापाण्याची तो काहीच व्यवस्था करत नाही. केवळ तिचा उपभोग घेणे एवढाच त्याचा हेतू असतो. स्त्रीही कधीकधी क्षणिक सुखासाठी अशा पुरुषांना जवळ करते. इतर वेळी ती इतरांना शरीर विकून आणि जोगवा मागून पोट भरते.

तिला लग्न करता येत नसल्याने संसारही थाटता येत नाही. तिला मुलेबाळे होतात ती अनौरस म्हणून जगतात. त्यांना सामाजिक दर्जा नसतो. काहीच्या वाट्याला तर तेही सुख येत नाही. जर त्या सुसंस्कृत कुटुंबातील असतील आणि त्यांना अंधश्रद्धेपोटी देवीला सोडले असेल तर तिला मुलाला जन्मही देता येत नाही. उदा. चौंडकं मधील सुली, शांता जोगतीण यांना मुलांना जन्म देता येत नाही. म्हातारपणीचा आधार म्हणून त्या आपल्या मुलींना जोगतीण बनवून जगण्याचे साधन तयार करतात. उदा.झुलवातील मेलू. अशा स्त्रिया आपणास. झुलवा, सूड या कादंबऱ्यात भेटतात. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला घरात आणि समाजात दुय्यमस्थान असते. ती शिकली, नोकरी करू लागली तरी तिला पुरूषांपेक्षा दुय्यम मानले जाते. उपेक्षित स्त्रीकडे तर समाज अतिशय तुच्छतेने पाहतो. अशाही परिस्थितीत त्या समाजाला विरोध करून समाजात ताठ मानेने जगू पाहतात आणि आपले समाजात वेगळे स्थान निर्माण करतात. ग्रामीण कादंबरीमध्ये 'देवकी', 'चौंडकं', 'डाळिंबाचे दाणे', 'भंडारभोग' या कादंबरीमध्ये

आलेल्या स्त्रिया आपापल्या परीने जीवन जगतात. देवकी ही भावीण असून आपल्या शीलाचे रक्षण करते. स्त्रीच्या शीलाला समाजात अतिशय महत्त्व असते. म्हणून ते जपण्याचा ती अटोकाट प्रयत्न करते. आपली विटंबना होणार, असे दिसताच ती आत्महत्या करायला जाते. बालमित्र बाबीकाकाची भेट होऊनही त्यागी वृत्तीने ती त्यांच्याजवळ राहते. एक स्त्री म्हणून स्त्रीमूल्यांची जपणूक करणारी खंबीर स्त्री वाटते. स्त्रीत्वाचा आदर करणारी वाटते.

चौंडकंमधील सुली आपल्या स्त्रीत्वाला जपते. मात्र स्त्रीसुलभतेनुसार ती बबन्याच्या प्रेमात पडते आणि घसरते. याठिकाणी घसरलेल्या स्त्रीचे ती प्रतिनिधित्व करते. डाळिंबाचे दाणेमधील लीला, शालू, कौशल्या, शकू आणि बकू, शेवंता, काळे भगिणी-कुमुद-मनोरमा या प्रत्येकजणींना समाजात स्त्री म्हणून वेगळे स्थान नाही. केवळ उपभोगाचे साधन म्हणून समाज त्यांच्याकडे पाहतो. आणि त्याही गरज पडेल तशा आपले स्त्रीत्व विकतात. याला अपवाद काळे भगिनी आहेत.

तर सूडमधील जानकी ज्या स्त्रीत्वामुळे उपभोगाचे जीवन वाट्याला आले आहे. त्या स्त्रीत्वाचाच ती त्याग, नाश करू पाहते. ते स्त्रीत्वच ती नाकारते. परंतु अलखनिरंजन स्वामींच्या सहवासाने तिला पुन्हा आपले स्त्रीत्व गवसते. त्यावेळी तिच्या देहाचे, सौंदर्याचे एवढे प्रसन्न, निर्मळ कौतूक कोणीच केले नव्हते. चिखल तुडवावा तसे तिला अनेकांनी तुडवले होते. त्यामुळे स्वामीजींचे कौतूक ऐकून हजार जन्म स्त्री होऊन तो आनंद ऐकावा, पाहावा असे तिला वाटत होते. (पृ.५४-५५) एक स्त्री म्हणून जानकी श्रेष्ठ, कणखर वाटते. तसेच इतर स्त्रियांपेक्षा ती वेगळी ठरते.

**समारोप**

अशा प्रकारचा तौलनिक अभ्यास हा साहित्य समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो. साहित्य समजावून घेणे म्हणजेच, साहित्याचा अभ्यास करणे असा होतो. त्यामुळेच साहित्याच्या अभ्यासामध्ये तौलनिक साहित्याभास अंतर्भूत होतो. याचा प्रत्यय येऊ शकतो.

* * *

# ग्रामीण आणि दलित कांदबरीतील स्त्री चित्रण :- एक तौलनिक अभ्यास

-डॉ.नवनाथ येठेकर

१९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण आणि दलित हे दोन साहित्य प्रवाह दाखल झाले. त्यानंतरच खऱ्या अर्थाने कांदबरीला मराठी रुप हळू हळू प्राप्त होत गेले. कांदबरी हा जीवनव्यवहाराबरोबर प्रवास करणारा प्रवाही असा सहित्यप्रकार आहे. जीवन व्यवहाराच्या केंद्रस्थानी मनुष्य असतो. मनुष्याच्या सादप्रतिसादांनीच जीवनाला रंगढंग प्राप्त होतात. समाजाचे खरे दर्शन व्यक्तींच्या कृतीउक्तीद्वाराच घडत असते. त्यामुळेच कांदबरी हा साहित्यप्रकार समाजप्रतिबिंब उमटवण्यासाठी अधिक सोपस्कर वाटतो. कांदबरीची संरचना, घटना, कथानक, पात्रे, निवेदनशैली, भाषा इत्यादी घटकांनी उभी राहते.

ग्रामीण आणि दलित कादंबरीतील काही पात्रे विशेष लक्ष्यवेधी वाटतात. विशेषत: स्त्रीपात्रे नैसर्गिक तसेच मानसिकदृष्ट्या खूप समृद्ध वाटतात. ग्रामीण आणि दलित विश्वाच्या केंद्रस्थानी स्त्री पात्रेच दिसून येतात. कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनाचे यथार्थ चित्रण किंवा स्पष्टीकरण त्या व्यक्तीच्या जीवनाच्या सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेतल्यावाचून देता येत नाही. हे ध्यानात घेऊन ग्रामीण आणि दलित कादंबरीतील स्त्रियांची शोषिकता, त्यांचे दारिद्रय, दु:ख, दैन्य, भूक इत्यादी बाबी वाचकाला अंतर्मुख करणाऱ्या आहेत. त्या अनुषंगाने प्रस्तुत लेखात ग्रामीण आणि दलित कादंबरीच्या या दोन विश्वातील स्त्रियांच्या विविध प्रश्नांचा शोध या तौलानिक अभ्यासातून घ्यावयाचा प्रयत्न आहे.

१९६० नंतर मात्र स्त्रीदर्शनाच्या दृष्टीने ग्रामीण साहित्यात परिवर्तन झालेले दिसून येते. ग्रामीण स्त्रीदर्शन आनंद यादव, रा.रं.बोराडे, उद्धव शेळके, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे या लेखकांनी प्रभावीपणे घडविण्याच्या प्रयत्न केलेला दिसून येतो. रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा' ही सर्वात यशस्वी व शोकात्म कादंबरी आहे. 'पारवती' ही या कादंबरीतील नायिका आहे. तिच्या आयुष्यात गरडाच्या रुपाचं वादळ येते आणि एक ग्रामीण स्त्रीमनाच्या साधेपणाचे, स्वाभाविकतेचे सौंदर्य या व्यक्तिरेखेला प्राप्त होते. तिचे अवघे जीवनच पाचोळयासारखे हेलकावे खात जाते. अशिक्षित पण जीवनातील वेदनेने, ती समंजस आणि शहाणी बनते. नवऱ्याने स्वत:ची कुवत न ओळखता ईर्षेने

आरंभलेला झगडा पारवती हताशपणे पाहते. नवरा आणि मुलगा यांच्यासाठी तुटणारे तिचे मन, तिची असहाय्यता, सोशीकपणा, कधी नवऱ्यावरचा राग मुलीवर काढणे आणि पश्चातापाने होरपळणे, नवऱ्याच्या संशयी स्वभावाने होणारी होलपट, घुसमठ हे बोराडे यांनी उठावदारपणे रंगवले आहे. एका स्त्रीच्या संसाराच्या वाताहतीची चटका लावणारी ही कादंबरी मनात घर करून बसते. स्त्रीजीवनाचं दुःख यातून त्यांनी चित्रित केलेलं आहे.

उद्धव शेळके यांच्या 'धग' कादंबरीतील 'कौतिक' या 'नायिकेला घरातल्या कुरबुरीने माहेरचा आश्रय सोडावा लागतो. गाव सोडावं लागल्यावर कौतिक नवऱ्याला धीर देते, ''तुमी गवत कापान त मले पेंडी बांधाची कायची सरम आये'' असे म्हणून नवऱ्याला प्रत्येक संकटात साथ देते. तिच्या जिद्दीला संकटे पुरून उरतात. पती-मुले यांचा संसारात कसलाही हातभार नसतानाही एकटी सर्व संकटांचा सामना करते. पैशाविना साधी-साधी सुखही पारखी होतात. मनातल्या इच्छा मारून जगावं लागतं. कितीही काबाडकष्ट केले तरी तिला अपयशालाच तोंड द्यावे लागते. जगण्यातल्या प्राथमिक प्रश्नाने तिचे जीवन त्यातच बरबाद होते. ग्रामीण स्त्रीच्या नशिबी कितीही संकटे उभी राहिली तरी तिची प्रयत्नांची पराकाष्ठा चालूच असते. संसाराचा भार संपूर्णपणे पेलण्याची क्षमता या स्त्रीमध्ये दिसून येते. आपल्या पतीवरील निष्ठा, मुलांवरील माया, ढोरकष्टाची तयारी भोळेभाबडेपणा, स्वत्त्व, जिद्द अशा छटांनी कौतिक अविस्मरणीय व्यक्तिचित्र साकारते. दारिद्रयाने ही कष्टाळू, हिंमतीची बाई पार थकून जाते. जीवनाच्या धगीने होरपळून जाते, भ्रमिष्ट होते.

श्री.ना.पेंडसे यांच्या कादंबऱ्यात कोकणमधील खेडयाचे चित्रण येते. त्यांच्या 'एल्गार' कादंबरीत आत्या म्हणते,''रघू हसिनेसारखी बाई मिळायची नाही. नवऱ्याची काळजी घेणारी'' ग्रामीण भागात जी स्त्री नवऱ्याची काळजी घेते ती श्रेष्ठ स्त्री मानली जाते. बाईच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्या नवऱ्याची काळजी घेणे होय. ग्रामीण स्त्री ही नवऱ्याने कसलेही व कितीही दुष्कर्म केले तरी त्याच्यासाठी पदर पसरणारी, त्याच्या कुकर्मावर पाखर घालणारी रणजित देसाईच्या 'बारी'मध्ये दिसून येते.

१९६० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यातील स्त्री ही पारंपरिक ग्रामीण स्त्रीचे भावगर्भ वास्तवदर्शन घडविणारी आहे. रूढीने चालत आलेली आदर्श मूल्ये जपणारी, सर्वस्व अर्पण करून स्त्री मूल्यांची जोपासना करणारी, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सतत कुटुंबासाठी संघर्ष करणारी, स्वतःच्या भावनां-अपेक्षांना मुरड घालणारी स्त्री चित्रणे कादंबऱ्यात ठायी-ठायी दिसून येतात.

दलित कादंबऱ्यांतील स्त्री अन्याय, अत्याचार, छळ सहन करणारी आहे. ती शोषित, भरडली जाणारी, पिळली जाणारी स्त्री आहे. ती सतत राबणारी, नवऱ्याच्या सुखात सुख मानणारी, अहोरात्र त्याची सावलीसारखी सोबत करणारी स्त्री आहे. ती नवऱ्याची मुलाबाळांची, फुटक्या-तुटक्या संसाराची काळजी करणारी, त्याला जपणारी सोशिक मनाची स्त्री आहे. स्वतः श्रम करून, झिजून नेटाने संसारिक आहे. पती व्यसनी-दुबळा, आळशी असला तरी प्रत्येक प्रसंगी खंबीरपणे संघर्षासाठली तिला सिद्ध रहावे लागते.

बाबुराव बागुलांची 'सूड' ही कादंबरी आकाराने लहान असती तरी वाङ्मयीन गुणसामर्थ्याने महान कलाकृती आहे. 'सूड' ची नायिका 'जानकी' ही एका मुरळीची लेक आहे. वास्तव जीवनाच्या आगीत ती अक्षरशः होरपळून निघते. तिच्यावर वयात आल्यापासून पाशवी लैंगिक व मानसिक अत्याचार झालेले आहेत. तिची आईच ''मुरळीच्या पोरीला कसली आली आहे अब्रू?'' असा सवाल जानकीला करते. म्हणजे दलित स्त्रियांना जणू अब्रूच नसते, अशी मानसिकता समाजाची बनलेली दिसते. जानकीला मुरळीचे जीवन नको असते. परंतु जानकीने धंदा करावा म्हणून तिची आई तिला जंगजंग पछाडते. मटणाची उधारी वसूल करण्यासाठी रसूल तिला ठेवतो. वेश्या म्हणून ती विकली जाते. तिच्या नाजूक देहाची परवड, तिच्या भावना लक्षात न घेता तिच्या वरील अत्याचार चालूच असतात. या सर्व अत्याचारामुळे एके क्षणी तिला स्त्रीत्त्वाची चीड येते. स्वतःच्या स्त्री जन्माचा सूड घेण्याचा निश्चय करते. जानकीचा संघर्ष आत्मशोध आणि माणुसकीच्या प्रस्थापनेसाठी असतो. यातूनच ती पुरुषत्व मिळण्याचा अट्टाहास करते. जानकीची खरी व्यथा माणूसपण नाकारल्याची आहे. 'मी ही एक माणूस आहे. आणि तसं स्विकारा हा तिच्या आत्म्याचा टाहो आहे. ''जानकी ही नायिका दलितांची. असले अमानुष अत्याचार घडणार आणखी कुणावर? दलितांची स्त्री कुणाच्याही मालकीची. असली जानकी ह्या कादंबरीची केंद्रबिंदू आहे'' बागुलांनी जानकी ही व्यक्तिरेखा चित्रित करताना दलित स्त्रियांचंच जगणं म्हणजे जणु आदिम जगणंच असल्याचे सिद्ध केले आहे.

शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी' कादंबरीत झोपडपट्टीतील विश्व चित्रित केले आहे. त्यात झोपडपट्टीचे ओंगळ दर्शन, मद्यपी दादा मंडळी, त्यांची अरेरावी व स्त्रियांची छेडछाड, त्यातून होणारी हाणामारी पोलिसांच्या धाडी, अशा वर्णनातून झोपडपट्टीतील 'हातभट्टीचे' चित्रण साकारले आहे. 'गिरजा' ही कादंबरीतील नायिका आहे. ती एक सरळवृत्तीची स्त्री आहे. मद्यपी सर्जादादा आणि त्याचे सहकारी तिथे नंगानाच करतात. गिरजाचा पती तिच्यावर संशय

घेतो. तेंव्हा ती नवऱ्याला सांगते, 'मी आगीतन चालत होते. पण अब्रूला ढका लागू दिला न्हाय. मी खऱ्या बिजाची म्हणून, खऱ्या धर्मानं वागली नसती, तर तुमच्या माघारी, या लोकांच्या माघारी मला कवाच फूटपायरीला बसावं लागलं असतं, मी खऱ्यापणानं, जगली,' यावरून झोपडपट्टीच्या ओंगळवाण्या विश्वात राहून गिरजा चारित्र्य संपन्न वाटते. मनोभावे पतिनिष्ठा जपणारी एक शीलवान दलित स्त्री खरात रेखाटतात. गिरजाचे चारित्र्य हीच तिची श्रीमंती जाणवते.

दलित कादंबऱ्यांतून स्त्री–व्यक्तिरेखा या आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक जीवनात अत्यंत संघर्ष करणाऱ्या आहेत. या स्त्रिया स्वतःच्या संसारात आनंद फुलविण्यासाठी संघर्ष करताना व खपतांना दिसतात नशिबी येईल ते दुःख निमूटपणे सोसणाऱ्या स्त्रियांचे चित्रण दिसून येते. पोटासाठी असाहाय्य झालेल्या स्त्रियांची अब्रू लुटणारे कामपिपासू लोक, झोपडपट्टीतील ओंगळविश्वात स्त्रियांचा शील रक्षणार्थ होणारा कोंडमारा यांचे वेधक चित्रण दलित कादंबऱ्यात दिसून येते.

ग्रामीण कादंबरीतील स्त्री व दलित कादंबरीतील स्त्री यांचा तुलनात्मक विचार करता असे दिसून येते की, या दोन्ही विश्वातील स्त्रिया पुरुषसत्ताक व्यवस्थेचा बळी ठरलेल्या आहेत.

## निष्कर्ष :–

१. ग्रामीण स्त्रीची पारंपरिक अनिष्ठ अशा पुरुषप्रधान बंधनातून सुटका होताना दिसत नाही.
२. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचा ग्रामीण स्त्री बळी ठरते.
३. पुरुष स्वैरवर्तनी असला तरी स्त्रीला मात्र पातिव्रत्याचे बंधन पाळावेच लागते.
४. दलित स्त्री सतत काबाडकष्ट करणारी, आपल्या लेकरांवर पाखर घालणारी, कणखर बाण्याची व प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी दिसते.
५. दलित स्त्री अंधश्रद्धा, दैववाद, कर्मकांडे यांच्या गर्तेत पूर्णपणे अडकेलेली दिसते.
६. दलित स्त्रियांवर अन्याय –अत्याचाराने कळस गाठलेला दिसून येतो.

* * *

# ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्रियांचे प्रश्न–तुलनात्मक अभ्यास

–प्रा.सौ.मंगल डोंगरे

स्वातंत्र्योत्तर काळात सार्वत्रिक शिक्षणामुळे ग्रामीण समाजात स्थित्यंतर झाले. त्यातून ग्रामीण व दलित साहित्याची चळवळ उभी राहिली. या दोन्ही चळवळींना छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा होती. ग्रामीण संस्कृतीतील वास्तव मांडण्याचा प्रयत्न दोन्ही चळवळींनी केला. कृषीप्रधानता हा खेड्याचा आत्मा आहे. ग्रामीण व्यवस्था अठरापगड जातींनी बनलेली आहे.

गावगाड्याचे स्वरुप पाहता शेतकरी व बारा बलुतेदार हे शेतीव्यवसायाशी निगडित होते. कारण दलित साहित्याचा गाभा ग्रामीण जीवनाशी निगडित आहे. ग्रामीण साहित्याने शेतीजीवनाचे व शेतकऱ्यांच्या सुखदुःखांचे वर्णन केले व दलित साहित्याने आपल्या उपेक्षित जीवनाचे चित्रण केले. ग्रामीण आणि दलित साहित्यातून रूढी परंपरा, रीतिभाती यामध्ये विज्ञानाची प्रगती, पंचायतराज, नवे कायदे, राखीव जागा यामुळे बरेच परिवर्तन झाले. ग्रामीण जीवनातील हे परिवर्तन मांडण्याचा प्रयत्न डॉ.आनंदराव यादव, रा.रं.बोराडे, उद्धव शेळके, श्री.ना.पेंडसे, र.वा.दिघे, व्यंकटेश माडगूळकर, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, विश्वास पाटील, आण्णाभाऊ साठे, शंकर सखाराम, गणेश आवटे यांनी केला आहे.

### स्त्रियांचा संघर्ष

दुःख, दैन्य, दारिद्र्य, समस्या, अडचणी, आपत्ती, नियती यांच्या कचाट्यात सापडलेल्या दलित किंवा ग्रामीण पुरुषांची पत्नी म्हणून जगताना स्त्रियांची घुसमट होते. त्या अगतिक होतात. कामभावनेच्या पूर्तीसाठी तिची होणारी कोंडी, निर्णयप्रक्रियेत स्वातंत्र्य नसणे, अशिक्षित असल्यामुळे परावलंबी जिणे ग्रामीण व दलित स्त्रियांना जगावे लागते. रा.रं.बोराडे व बाबुराव बागूल यांच्या कादंबरीत स्त्री संघर्ष आला आहे.

### निरक्षरता

ग्रामीण कादंबरीतील व दलित कादंबरीतील स्त्रिया बहुतेक निरक्षर आहेत. बनगरवाडीतील शेकूची बायको निरक्षर आहे. पण धिप्पाड व ताकदवान असल्यामुळे बैलाप्रमाणे नांगर ओढण्याचे काम करते.

**नियतीशी संघर्ष**

रा.रं.बोराडे यांच्या पाचोळा कादंबरीची नायिका शिंपी कुटुंबातील पारबती ओढग्रस्तीचा संसार सांभाळते. पण गरडासारख्या नियतीपुढे तिच्या संसारात वादळ निर्माण होते. तिच्या संसाराची वाताहत गंगारामच्या तापट स्वभावामुळे होते. उद्धव शेळके यांच्या धग कादंबरीची नायिका कौतिक प्रतिकूल परिस्थितीशी झुंजते. आळशी नवरा व उनाड मुलगा यांना सावरताना ती अखेर पराभूत होते. संपूर्ण ग्रामीण जीवनाचा अकांत साक्षात सादर करणारी ही शोकांतिका आहे. 'गटूळं' या रविंद्र बागडे यांच्या दलित कादंबरीतील नारायणची पत्नी उर्मिला सात वर्षाची असताना तिच्या वडिलांनी आईला सोडून दिले. त्यानंतर आजोबांनी आईचे लग्न दुसऱ्या माणसाबरोबर लावून दिले. तिला आईबरोबर राहण्याची इच्छा असून आजोबा तिला जाऊ देत नाहीत. आई वडील जिवंत असूनही तिला पोरकेपणाने जगावे लागते.

**आत्महत्या :–**

**संशयी नवरा**

विश्वास पाटील यांच्या 'आंबी कादंबरीतील नायिकेलेलग्न ट्रक ड्रायव्हरबरोबर लावून दिले जाते. पण तो तिच्यावर संशय घेत असल्याने शेवटी ती मुलीसह आत्महत्या करते.

**व्यसनाधीन नवरा**

'गटूळं' या रविंद्र बगाडे लिखित कादंबरीमध्ये नारायणचे वडील सतत दारू प्यायचे. त्यांची आई सावित्री चार मैल चालत जाऊन मार्केट धून भाजी विकत आणून बाकड्यावर विकत असे. सात पोरांचा सांभाळ आणि संसार ती बाकड्यावर करीत असे. दारुड्या नवरा रोज भाजीचे पैसे पळवून नेऊन दारु पिऊन येथे तेथे पडत असे. म्हणून माहेरी खेड्यात मुलांना शाळेत घालता येईल म्हणून ती जाते पण तेथेही तिच्या नवऱ्यात काही सुधारणा होत नाही.

**विधवा स्त्रिया**

गो.नि.दांडेकर यांच्या 'शितू' कादंबरीची नायिका दुर्दैवी आहे. एकापाठोपाठ तिचे तीन नवरे मरतात म्हणून तिला पांढऱ्या पायाची ठरवले जाते. 'इळनमाळ' या अशोक पवार यांच्या भटक्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीत भटकंतीत अनेक पुरुष अपघातात व नैसर्गिक आपत्तीत बळी पडतात त्यामुळे बऱ्याच स्त्रिया विधवांचे आणि भटक्यांचे जीवन जगत आहेत. उदा. निर्मला व सयझल.

**बंडखोर स्त्री**

बाबुराव बागूल यांच्या दलित कादंबऱ्यांमध्ये बंड करण्याचा प्रयत्न 'सूड' कादंबरीतील नायिकेने केलेला आहे. जानकी उर्फ ज्वाला ही मुरळीची मुलगी. जीवन वास्तवाच्या दाहक आगीत होरपळून निघालेली मनस्वी आणि लोकविलक्षण स्त्री. मानसिक व शारीरिक अत्याचाराला बळी पडल्यामुळे दुःखाग्नीने ती पेटून उठते आणि पुरुषाचा (साधुचा) वेश धारण करून ती घराबाहेर पडते. मुरळीच्या लेकीला कसली आली आहे अब्रू! असे म्हणणाऱ्या आईला ती धुडकाऊन लावते व शाश्वत अंतिम सत्याचा शोध घेते.

'इळनमाळ' अशोक पवार यांच्या काबंदरीतील राधाला तिच्या नवऱ्याने एक मुलगी झाल्यावर सोडून दिले. लग्नात नोकरी लावून देतो असे तिच्या वडिलांनी कबूल केले होते. पण नोकरी न लावल्यामुळे राधा मुलीला घेऊन भटक्यांची वस्ती असलेल्या वडिलांकडे येते. वस्तीवरील मारुतीबरोबर तिची मैत्री होते. गावोगाव साड्या विकून ती गुजराण करते. भटक्यांच्या जातीत अनेक पोटजाती असतात. तिची जात बेलदाराची नसल्यामुळे मारुतीबरोबर तिला लग्न करता येत नाही. शिवाय मारुती अविवाहीत असल्यामुळे जात पंचायत त्यांच्या लग्नाला विरोध करते. पण मारुतीच्या प्रेमापोटी ती सर्व रुढी, परंपरा, चाकोरी,जातपंचायतीचा निर्णय झुगारून लावते व शेवटी ती मारुतीला सर्वस्व मानते.

**फसवणूक**

'गव्हाणी' कादंबरीतील सुशिला पारुमावशीजवळ असलेल्या शिंदेला भाऊ मानते पण तोही उसाच्या खोपटात कोणी नाही असे पाहून तिच्यावर अतिप्रसंग करू पाहतो. पण ती रात्रभर खोपटाबाहेर थांबते व सकाळी वस्ती सोडते. केशव मेश्राम यांच्या 'हकिकत आणि जटायू' काबंदरीतील निर्मला अण्णाबाबाच्या कठोर, मतलबी, निर्दयी जाळ्यात अडकते आणि तिचा शेवट शोकात्म होतो. भटक्या स्त्रिया सतत व्यवसायाच्या निमित्ताने भटकत असतात. तेव्हा त्यांची अनेकदा फसवणूक होते.

'हल्या हल्या दुधू दे' कादंबरीतील शोभा सरळ स्वभावाची आहे पण तिचीही फसवणूक होते. 'आग' बाबुराव गायकवाड यांच्या कादंबरीतील सरुला नोकरी लावतो म्हणून त्यांच्याच जातीतील काकतकर नावाचा तरुण तिला शहरात घेऊन जातो व वेश्येकडे ठेवतो. तेथे तो तिला वेश्या व्यवसायाला लावतो. काकतकरने तिची आणि तिच्या आईची फसवणूक केलेली असते.

**अगतिक स्त्रिया**

नामदेव कांबळे यांच्या 'राघवेळ' कादंबरीतून 'वालंबी' ही शेतमजुरी करते. ऐन पावसाळ्यात पोटाची खळगी भरण्यासाठी तिला ज्वारीच्या बदल्यात आपले शरीर द्यावे लागते. कृषीनिष्ठ जीवन जगणाऱ्या गावगाड्यातील शेतकरी व बलुतेदार यांच्यामध्ये परस्परसंबंध असतात. शेती हे प्रधानमूल्य असते.

'इळनमाळ' या कादंबरीतील सर्वच स्त्रिया भटकेपणामुळे अगतिक झालेल्या आहेत. त्यांची तीन दगडाची चूल तीन दिवसांची असते. दर तीन ते चार दिवसांनी त्यांचे स्थलांतर होत असल्याने संसार उभा करणे, मांडणे आणि पुन्हा मोडणे यामध्ये त्या जेरीस येतात. व्यसनी नवरे मारहाण करतात, संशय घेतात. पोलीस भटक्यांना गुन्हेगार म्हणून पकडतात. बायकांनाही पोलीस स्टेशनला नेऊन बलात्कार करतात. नवऱ्याच्या त्रासाप्रमाणेच सततच्या भ्रमंतीत बाहेरच्या पुरुषांकडून त्रास सहन केला जातो. मीरा, सखू, येनीबाई, सोनी राधा या अगतिक स्त्रिया आहेत. जातपंचायतीच्या आदिम अवस्थेत असणारा कायदा आजही २१ व्या शतकात माणसांच जगणं असह्य करते.

**निष्कर्ष**

दलित कादंबरीतील स्त्री पात्र ही अनुशंगाने आलेली आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण कादंबरीची नायिका स्त्री आहे. दलित कादंबरीत स्त्री जीवनदर्शनाला प्राधान्य नाही. बहुतेक सारे साहित्य पुरुषप्रधान आहे. परिवर्तनाच्या अनेक लाटा आल्या पण दलित स्त्री मनावर त्याचा परिणाम दिसून येत नाही. दलित्त्वाच्या जाणीवेबद्दल जेवढे बोलले जाते त्या तुलनेने दलित्त्वाच्या निर्मूलनासाठी कार्यवाही झाल्याचा दाखला मिळत नाही. ग्रामीण दलित साहित्य परंपरेने एकाच कृषीसंस्कृतीची अंगे आहेत. बहुजन समाजाची जागृती करणे हा त्यांचा हेतू आहे. या दोन्ही चळवळीतील साम्यभेद स्पष्ट झाल्यास उद्याच्या मराठी साहित्याचे भवितव्य उज्ज्वल होईल. दलित कादंबरी दुःखी, वंचित, उपेक्षित ठेवणाऱ्या व्यवस्थेला नाकारते. विद्रोहाचा आवाज एकवटते. बंडखोर होते त्या मानाने ग्रामीण कादंबरीतील स्त्रिया सहनशील सोशीक आहेत. ग्रामीण कादंबरीतील स्त्रिया आणि दलित कादंबरीतील स्त्रिया दुःखी कष्टी आणि परिस्थितीने पिचलेल्या आहेत. स्त्रियांच्या मूक वेदनांना आणि बदललेल्या हुंदक्यांना संवेदनशीलतेने आणि संयमाने चित्रित करण्यात ग्रामीण व दलित कादंबरीकार यशस्वी झाले आहेत.

* * *

# ग्रामीण व दलित कांदंबरीतील स्त्रियांचे चित्रण

–प्रा.मनिषा कांबळे (बनसोड)

ग्रामीण व दलित साहित्य हे मुख्यत: माणसाच्या जीवनाचे साहित्य आहे. कारण रोजच्या जगण्यातले वास्तव अनुभव दोन्हीही साहित्यातून प्रत्ययास येताना दिसते. गावकुसातील व गावकुसाबाहेरील असे गावाशीच निगडित असणारे वास्तवचित्रण दोन्हीही साहित्य प्रवाहातून झालेले दिसते. फरक एवढाच की ग्रामीण साहित्यापेक्षा दलित साहित्यातून जगण्याची वेदना अधिक प्रभावी स्वरूपात आली व त्याबद्दलचा प्रक्षोभही आला. मराठी साहित्यात 'प्रक्षोभरस' या दलित साहित्याने दिला. दोन्ही साहित्यात वेदना हा समान धागा आहे. परंतु वेदनेचे स्वरूप मात्र समान नाही. दोन्ही साहित्यप्रवाहात सामाजिक बांधिलकी जोपासली आहे हे निर्विवादच आहे. ग्रामीण आणि शहरी जीवनातील दाहक विषमता, सामाजिक अन्याय, उपेक्षा, वेचना दलित साहित्यातून मांडण्यात आली तर ग्रामीण साहित्यात शेतकरी वर्गाची दयनीयता, त्यांचा बदलता आर्थिक स्तर, बदलते ग्रामजीवन, त्यातून आलेली वैफल्यता याचे प्रामुख्याने चित्रण येताना दिसते. ग्रामसंस्कृतीतल्या अंतर्गत वेदना मांडण्याचा प्रयत्न ग्रामीण साहित्य करते तर प्रस्थापितांविरुद्ध विद्रोह, परिवर्तनाची भूमिका, समता स्वातंत्र्य आणि बंधुता या त्रिसूत्रींचा पुरस्कार दलित साहित्य करताना दिसते. दारिद्र्यातील दाहकता, निसर्गाची अवकृपा, शेतीप्रधान संस्कृतीतील सत्य, जीवनातील वेगवेगळे प्रश्न, कृषी उत्पादनातून जन्माला आलेली यांत्रिक संस्कृती, समूहनिष्ठेचा प्रादुर्भाव हा ग्रामीण साहित्याने पुरस्कार केला. एका प्रवाह आपल्या मातीशी नाळ जोडतो आहे तर दुसरा प्रवाह जातिव्यवस्थेच्या विरोधात आपला विद्रोह मांडतो आहे. असे असले तरी ग्रामीण व दलित साहित्यात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाचा संदेश असणे ही सुद्धा तेवढीच महत्त्वाची गोष्ट आहे. शेतकऱ्यांची वेगळी दु:खे व दलितांची वेगळी दु:खे असे समीकरण न मांडता दोघांच्याही वेदनाचा सहचर्यांना विचार करणे संयुक्तिक ठरते.

या सगळ्या वाटचालीत स्त्रियांचे म्हणून एक वेगळे स्थान ग्रामीण आणि दलित साहित्यात पहावयास मिळते. दोन्ही साहित्यात स्त्री कोणत्या स्वरूपात रंगवलेली आहे याचाही आढावा घ्यावा लागतो. महात्मा गांधीच्या

खेड्याकडे चला या संदेशामुळे सामाजिक व राजकिय परिवर्तनाचा हेतू घेऊन अनेकांनी ग्राम परिवर्तनाचा वसा घेतला. ग्रामीण शिक्षण, अस्पृश्यता, गग्रमसफाई या प्रश्नांकडे लक्ष दिले परंतु महिलासुधार किंवा महिलांचे प्रश्न याकडे मात्र दुर्लक्ष झाले. त्यामुळे ग्रामीण कांदबरीत येणारे स्त्रीचे चित्रण हे पारंपारिक पद्धतीनेच आलेले आहे. आपल्या कौटुंबिक सामाजिक, सांस्कृतिक, वैवाहिक अशा सर्वच जीवनाला धर्माचे अधिष्ठान आहे आणि त्यामुळेच हे सर्व प्रकारचे जीवन एका विशिष्ट मनस्थितीत स्वीकारावे लागते. त्याला पर्याय ठेवलेला नाही. जिथे यातून पर्याय निघतो तिथे मग समाजाने, वाईट चालीची, भ्रष्ट, रखेल, स्वैरवर्तनी, तसेच अबला, निराधार अशी तिची वर्गवारी केलेली दिसते. भारतीय संस्कृतीत स्त्री एक तर देवी नाहीतर दासी श्रेणीतच ठेवली जाते. तेच मोजमाप ग्रामीण साहित्यातील स्त्रिचित्रणातही दिसते. लहानपणापासूनचे संस्कार, त्याने बळकट झालेल्या श्रद्धा आणि बाई म्हणून परावलंबीय या गोष्टी ग्रामीण साहित्य वाचताना लक्षत आल्याशिवाय राहत नाहीत. ग्रामीण स्त्रिला नवरा हा मोठा आधार वाटत असतो. तो तिच्या कुंकवाचा धनी असतो. तिची सारी भिस्त त्याच्यावरच असते. ग्रामीण कांदबरीतील पती-पत्नी यांच्या नातेसंबधातली सगळी चित्रे एकारलेल्या याच संस्कारानी बद्ध झालेली दिसतात. नवऱ्याच्या अस्तित्त्वाचे भान कादंबरीकार विविध प्रसंगातूनही आणून देण्याचा प्रयत्न करीत असतात. याचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामीण स्त्रीच्या भावविश्वाचा तो केंद्रबिंदू असतो असेच म्हणावे लागते. घराविषयीच्या स्त्रियांच्या भावनावेगळ्या असतात. घर म्हणजे नवरा, मुलेबाळे हे सुखी असतील तर घराला घरपण येते ही तिची भावना स्त्रीच्या या भावनेचे चित्रण ग्रामीण कांदबरीत समरसून झालेले दिसते. धग आणि पाचोळा या कादंबरीत संसार उभा करण्यासाठी केलेल्या धडपडीचे वर्णन येते. बदलत्या ग्रामजीवनात तिची होणारी कसरत हा ग्रामीण कादंबऱ्यांच्या विषय झालेला दिसतो. वात्सल्य ही भावना पुरूषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक पटीने तीव्र असलेली ग्रामीण कांदबऱ्यांमध्ये आढळते. ग्रामीण कादंबरीतील स्त्रिचित्रणावर लेखकाच्या परंपरागत दृष्टीकोणाचा प्रभाव असलेला दिसून येतो. चाकोरीबाहेरची स्त्री आणि तिचे वेगळे भावविश्व ग्रामीण कादंबरीत रंगविता आलेले नाही. ग्रामीण कादंबऱ्यामधून मांडलेली ग्रामीण स्त्रीची समस्या आणि तिची मानसिकता संस्कृतिचा मूळ स्त्रोतातूनच निर्माण झालेली आहे. बनगरवाडी, महानदा, इंधन, पाचोळा, या कादंबऱ्यामध्येही हेच दिसून येते. ग्रामीण स्त्रिच्या वाट्याला

वेगवेगळ्या कारणाने एक बंदीवास आलेला आहे. समाजपुरूषाचे नितीनियम, चारित्र्य, जातिव्रत्य अशा संस्कृतीतून निर्माण झालेल्या कल्पनातून तिची तुलना केलेली दिसते. ग्रामीण समाजजीवनात याच वास्तवाचे कलात्मक पातळीवर दर्शन घडते. आणि तो प्रयत्न काही कादंबरीकारांनी केलेला दिसतो.

गावगाड्याशी निगडित निसर्ग आणि माणूस, जुने खेडे जाऊन नव्या खेड्याची निर्मिती शहराच्या संपर्काने बदलेले खेडे, बाह्यांगाने बदलणारे खेडे चित्रित झाले पण त्यातला पारंपरिक सामाजिक आयाम फारसा बदलला नाही. परंतु काही कादंबरीकारांनी मात्र स्त्रीचे करारी असे स्वरूप चित्रित केलेले आहे.

उदा. 'उघड्या जगात' या कादंबरीतील अत्याचाराचा सूड घेणारी हौशा. किंवा नवऱ्याच्या खुनाचा बदल घेणारी (आगीन फुल) मधील सावित्री, नाऱ्या नवऱ्याचा त्याग करणारी (नटरंग) मधील दारकी, दैहिक विटंबनेने पेटून उठलेली बायजा, नवऱ्याचा मान आणि आपला आत्मसन्मान जपणारी शयामची आई या सर्व स्त्रिया निरक्षर आहेत. स्त्री स्वातंत्र, तिचे स्वत्त्व, तिचा आत्मसन्मान, स्त्रीत्त्वाचे भान याबदल्या त्यांना गंधही नाही. तरीही माणूस म्हणून विशिष्ट समाजवर्तुळाची बूज राखून त्या विरोधी पवित्रा घेतात. त्यांच्यातल्या स्त्रित्त्वाची ठिणगी इथे चमकून आलेला दिसते. खास स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी किंवा दु:खासंबंधी चित्रण करण्याऱ्या काही स्त्री लेखिका ग्रामीण साहित्यात लिहिताना दिसतात. त्यात प्रामुख्याने प्रतिमा इंगोले, मथू सावंत, अनुराधा गुरव, वैशाली कोल्हे, शुभदा मुंजे किंवा आनंद पाटील, तानाजी पाटील हे आहेत. प्रतिमा इंगोले यांची बुढाई, मथु सावंत यांची 'राहू केतु' यात गघमवास्तवाचे वेगळे चित्रण येते. त्याचप्रमाणे अनुराधा गुरव यांची कादंबरीत स्त्री जीवन विषयक चिंतन, आजच्या कुटुंबव्यवस्थेचे चित्रण, विधवेच्या कौटुंबिक ताणतणावाचे वास्तव प्रकट करते, परंतु स्त्री लेखिकांची वाणवा ग्रामीण साहित्यात आहे हे सत्य मात्र नाकारता येत नाही.

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला दुय्यम स्थान असते. घरातील माणसे कितीही सुशिक्षित किंवा सुसंस्कारित असतील तरीसुद्धा आजही स्त्रीचे शोषण होताना दिसते. एक म्हणजे स्त्री म्हणून उपेक्षित व दुसरे म्हणजे दलित म्हणून उपेक्षित असं दुहेरी उपेक्षितपण तिच्या वाट्याला येत असते. समाजातील लोकांकडून तसेच प्रस्थापित समाजाकडूनही तिचे शोषण होतच असते. या सगळ्या व्यवस्थेत पिचून गेलेली स्त्री वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका समाजात

पार पाडत असते. कधी कुटुंबवत्सल तर कधी आक्रमक, कधी परिस्थितीला शरण जाणारी, कधी परंपरेला छेद देऊन स्त्री जन्म नाकारणारी, कधी प्रस्थापित परंपरा आणि संस्कृती यांना लाथाडणारी अशी वेगवेगळ्या स्वरूपात ती दिसते.

दलित कादंबऱ्यामध्ये अशी स्त्रियांची विविध रूपे पहावयास मिळतात. अण्णा भाऊ साठे यांच्यापासून कल्पना जाधव ते अलीकडील आयदान सारख्या आत्मचरित्रात्मक कादंबरीपर्यंत स्त्रियांचे वेगवेगळया स्वरूपाचे चित्रण दलित कादंबरीत आलेले आहे. अण्णभाऊंची घंदन', चिखळातले कमळ, चित्रा, मूर्ती या कादंबऱ्यामधून अण्णाभाऊंनी शहरी आणि ग्रामीण वातावरणाची सांगड घातली पण ग्रामीण वातावरणाची चाकोरी मात्र सोडली नाही. अण्णाभाऊंनी स्त्रीविषयक सामाजिक प्रश्न आपल्या कादंबऱ्यांतून मांडले आहेत. विविध तऱ्हेने आणि ढंगाने स्त्रियांच्या समस्या मांडण्याच्या प्रयत्न त्यांनी केला आहे. 'चिखलातले कमळ' यासारख्या कादंबरीतून अण्णा भाऊ स्त्रीला एका वेगळ्या समाजातून सर्वसामान्यात आणतात तिला सामाजिक दर्जा प्राप्त करून देतात. स्त्रीने तिचे जीवन बदलेले पाहिजे हे अण्णाभाऊंना अपेक्षित होते त्यामुळे त्यांनी सामाजिक प्रश्न हाताळलेल्या कादंबऱ्यांचे शेवट सुखकारक आणि स्त्रियांच्या बाजूने केले आहेत. वाघ्या-मुरळी संस्कृतीचे अत्यंत सूक्ष्म व वास्तवादी चित्रण फक्त अण्णाभाऊच समाजासमोर मांडू शकतात. तसेच भाविणी, जोगतिणी, रखेल्या ह्या उपेक्षित स्त्रीजीवनाचे लेखन ते धीटपणाने करतात.

'विलासिनी' या ना.रा.शेंडेंच्या कादंबरीत अध्यात्म अद्‌भुतता व रहस्यमयता आणि त्यातून संस्कृती व सामाजिकता यांचे दर्शन केलेले आहे. त्याचबरोबर शशिकांत शेंडे यांची (आणि तीला जाग आली) कादंबरीही शिक्षणाने स्वावलंबी झालेल्या स्त्रियांना कामाच्या ठिकाणी कोणता त्रास सहन करावा लागतो याचे चित्रण करते. आजची ज्वलंत समस्या ते इथे मांडताना दिसतात. सर्वात महत्त्वाची बाबुराव बागूल यांची 'सूड' ही कादंबरी एका बंडखोर स्त्रीची वास्तववादी समस्या मांडणारी आहे दलित स्त्रियांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते व त्या संकटांमध्ये तिचा होणारा कोंडमारा नंतर बदलाची परिवर्तनाची अपेक्षा ठेवतो. बाबुराव बागुलांनी नुसतीच वेदना मांडणारी नायिका येथे उभी केली नाही तर त्या परिस्थिती विरोधात बंड करणारी नायिका उभी केली आहे. दलित कादंबरीत ही घटना क्रांतिकारक पद्धतीने आलेली दिसते. या कादंबरीतील जानकी नंतर ज्वालाप्रसाद म्हणून वावरते. तिथे हे



DN4012

परिवर्तन तिच्या आयुष्यातील घटनांचे परस्परविरोधी चित्रणातून उठावदार केलेले दिसते. बाबुराव बागूल यांनी ही समाजव्यवस्था आणि संस्कृती यांच्या संचिताची विकृती 'सूड' या कादंबरीतून जानकीच्या जीवनातून व्यक्त केलेली आहे. दलित साहित्यात कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकारामध्ये जानकीसारखी नायिका जगावेगळा निश्चय करून त्याग व मान करण्याचा प्रयत्न करते. हे अधापही इतर कादंबऱ्यामध्ये आढळत नाही. अशोक व्हटकर, उत्तम बंडू तुपे, बळवंत कांबळे, सुगंधा शेंडे, यांच्या कादंबऱ्यांमधून देवदासी व असहाय्य स्त्रिया यांचे चित्रण येताना आढळते. त्यानंतर भीमसेन देठे यांची घक्री' ही कादंबरी सामाजिक दुःखाकडे लक्ष वेधताना दिसते. इस्कोट या कादंबरीत जाणवणारे प्रेम, वास्तवादी वातावरण चक्रीमध्ये जाणवत नाही. एक जीवघेण्या दलदलीतून स्वत:सहित अनेक स्त्रियांना बाहेर काढण्याचा प्रयत्न इथली नायिका करताना दिसते. 'कसरत' ही सुशीला सकपाळ यांची कादंबरी कष्टाच्या ढिगाऱ्याखाली पिळलेली दलित समाजातील स्त्री किती कसरतीने आपला संसार चालवते याचे चित्रण केलेले आहे. स्त्रीच्या व्यक्तिविकासाला मर्यादा असतात किंवा त्या पडतात याचे उदाहरण कसरतमध्ये अनुभवास येते. त्याचप्रमाणे कल्पना जाधव यांची उपेक्षिता ही कादंबरी दारिद्र्य, जुन्या सामाजिक रूढी, परंपरा यातून तिचे जे धिंडवडे निघतात त्यावर बनलेली आहे. यातली नायिका सरला अतिशय धैर्याने, खंबीरपणे आणि निर्भयपणे, कधी सोशीकतेने आपल्या आयुष्याला वेगळी कलाटणी देते व आपल्या जीवनात परिवर्तन अपेक्षिते.

सारांश ग्रामीण व दलित कादंबरीत आलेले स्त्रीचित्रण त्या त्या लेखकाच्या स्त्रीकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातून साकार झालेले दिसते. कुठे ते परिस्थितीशरण आहे, कुठे पारंपरिक आहे, कुठे स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू म्हणून केलेले आहे. कुठे स्त्रीच्या करारीपणाचे आहे, कुठे तिच्यातल्या सहनशीलतेचे आहे, कुठे तिच्या वैयक्तिक भावविश्वाचे आहे तर कुठे तिच्या बंडखोरीचेही आहे, तिच्या माणूस म्हणून जाग्या झालेल्या अस्मितेचे ही आहे. या सगळ्यांचीच सरमिसळ ग्रामीण आणि दलित कादंबरीत झालेली दिसते. कारण 'गघम' या एकाच सामाजिक परिप्रेक्षात या कादंबऱ्या घडलेल्या आहेत कुठे नुसतीच वेदना आहे तर कुठे त्या वेदनेतून निर्माण झालेला विद्रोह ही आहे. त्यामुळे ग्रामीण व दलित कादंबऱ्यातून आलेले चित्रण हे विविध पातळ्यांवर आपल्याला अभ्यासावे लागते.

* * *

## ग्रामीण कादंबरी 'इथे फुलांना मरण जन्मता' व दलित कादंबरी 'चक्री' मधील स्त्रीचित्रणाचा तुलनात्मक अभ्यास :

–प्रा.निशा भंडारे

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये ग्रामीण आणि दलित साहित्याचा प्रवाह मान्य पावला तो त्याच्या वेगळेपणामुळे. मराठी वाङ्मयात त्यांना महत्त्वपूर्ण स्थान मिळालेले आहे. मराठी साहित्याच्या संशोधन क्षेत्रातही आजपर्यंत ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्याचा विविधांगी अभ्यास झाला आहे. ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्री चित्रणाचा तौलनिक अभ्यास प्रधान असल्याने त्यांना केंद्रस्थानी ठेवून विवेचन केले आहे.

**ग्रामीण कादंबरी : 'इथे फुलांना मरण जन्मता' – द.ता.भोसले**

द.ता.भोसले हे ग्रामीण साहित्याचे अभ्यासक समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहे. 'इथे फुलांना मरण जन्मता' ही त्यांची पहिली कादंबरी आहे. ही कादंबरी प्रथम कुलकर्णी ग्रंथाकारच्या पंडितराव कुलकर्णी यांनी प्रकाशित केली. एकूण ११९ पृष्ठांची आहे. नायिका प्रधान कादंबरी आहे. धर्म आणि मानवी जीवन, धर्म आणि त्याचे कर्मकांडात्मक विधी, तत्त्व आणि आचार, धर्ममूल्ये आणि व्यक्तिविकास यांच्या परस्पर संबंधाविषयी आहे. लेखक स्वतः याविषयी म्हणतात, ''कर्मकांडात्मक धर्मरूप अनेकांच्या ऐहिक जीवनाला करकचून आवळत असते. तेव्हा तर उन्नत करणारा धर्मवीर नि स्वाभाविक स्वरूपात फुलणारे लौकिक जीवन यांच्या नात्यातला पोकळपणा मला अधिक तीव्रतेने जाणवून जातो, मग श्रेयस आणि प्रेयस काय यांचे उत्तर शोधताना मी पार गोंधळून जातो. प्रसंगा प्रसंगाने ठळक होत गेलेल्या स्थूलचिंतनाला शब्दरूप लाभण्यासाठी वास्तव जीवनात एक निमित्त घडले. त्यांच्या मनातील अनेक प्रश्नांचे उत्तर त्यांनी वाचकांवर सोडले आहे. उदा.एखाद्या व्यक्तीने स्वतःची श्रद्धा सफल होण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीवर ती लादावी का? तसा त्या व्यक्तीचा अधिकार असतो काय? अगदी जन्मदाता असला तरी? माणसाचे लौकिक जीवन श्रेष्ठ की त्या जीवनाला स्थैर्य देण्यासाठी निर्माण केलेला धर्म श्रेष्ठ?''

**कथानक :**

कादंबरीची सुरूवात लेखक त्यांचा मित्र पंडित आपली दिवाळीची सुट्टी संपवून टाकळीवरून दौलतापूरला कॉलेजसाठी जात होते. वाटेत कापशी गावचे नारायण पाटील त्यांच्या मुलीला रमाला शहर दाखवण्यासाठी निघालेले आहेत. गप्पांच्या नादात शहर लवकर आल्याची जाणीव पाटलांना होते. ते मुलीला शहर दाखवायला आलेत असे, सांगतात तेव्हा लेखकाला त्यांचे कौतूक वाटते, नाही तर आपला बाप सदान्कदा शिव्या अन् उपदेश असा विचारही मनात येतो. बापाच्या डोळ्यात अपत्यप्रेम मावत नाही असं उगीचच वाटत. शहरात कुठे राहणार अशी विचारणा केल्यावर पाटील सांगतात, मुक्तीपंथाच्या मठात महाराजांकडे हे ऐकल्यावर लेखक व त्याचा मित्र पंडित आम्हीही तेथेच जेवायला असल्याचं सांगतात. पाटलाला अजूनच आनंद होतो. चालता चालता रमा अनेक प्रश्न विचारते त्यावरूनच तिचा अल्लडपणा जाणवतो. ती फक्त पंधरा-सोळा वर्षांची असते. ७ वी पर्यंत शिकलेली गुडघ्यापर्यंत साडी नेसलेली बालिशपणा चेहऱ्यावरून जाणवतो. तिला शहराविषयी आकर्षण वाटत सात आठ दिवस तिचे वडिलांबरोबर आनंदाने जातात रोज गमती जमती सांगते. खरेदी दाखवते आणि एक दिवस पाटील म्हणतात, ''तुला आवडलयं ना मग इथच राहायच मी गावाला घरी जाणार तू महाराजांच्या सेवेत राहयचं'' हे ऐकल्यावर ती खूप रडते नाही नाही, म्हणते मला आई-आजी-भाऊ आवडतात.

मठामध्ये दामोदर पंत, राजाक्का, भानुमती, यशोदा अनेक सेवक सेविका असतात. मठातील वातावरण रंगेलपणाही दिसतो. पंत स्त्रीलंपट स्वभावाचा आहे तर भानामतीला अनैतिक संबंधातून दिवस जातात ती गर्भ पाडण्यासाठी पैसे मागायला लेखकाच्या रूमवर येते. लेखकाकडे, त्याच्या मित्राकडेही पैसे नसतात. पण काही दिवस ती मठात दिसत नाही. खूप दिवसानंतर परत दिसते. रमाकडून तिने पैसे घेतल्याचे कळते. रमाने गावात काय तरी भानगड केली असेल म्हणूनच पाटलाने आपली लाडकी एकूलती एक मुलगी मठात ठेवली असे विचार दोघांच्या मनात येतात. पण काही दिवसानंतर पाटील परत खरेचसं सामान घेऊन मठात येतो. सगळीकडची आवराआवर झाल्यावर रमाच्या खोलीतून आचार्य, राजाक्का आणि पाटलांचा कुजबुजण्याचा आवाज येतो. मंदिराच्या पायऱ्यांवर दोघं बसून ऐकतात. परंतु रामक्का ऐकत नाही ती म्हणते, स्वामींची

सेवा नको, तेव्हा सगळेजण तिला खोलीत कोंडून ठेवतात. जेवण देत नाहीत. परंतु दोन दिवसानंतर स्वतः रमा तयार होते. भक्तीनींची पूजा केली जाते. त्या सगळ्या गोंधळात उपाशी राहण्याने ती चक्कर येऊन पडते. पाटील पैसा, धनधान्य मठाला पुरवत असल्याने, रमाचे लाड होत असतात. इतर बालकांसाठी ती स्वयपांक घरात जात नाही. पुस्तक वाचत बसते. गावात फेरफटका मारते. विरंगुळ्यासाठी कुत्र्याचं पिल्लू आणते. प्रश्नांवर प्रश्न विचारणारी चौकस कन्या आणि आताची रमा यात जमीन अस्मानाचे अंतर वाटते. तिची बडदास्त ठेवली जाते. राजाक्का खास दिमतीला राहते. पंत वाचनाबद्दल सुचवतात पंत तत्त्वज्ञानाची माहिती देणाऱ्या कथा सांगण्यास सुरूवात केली पण लेखकाने आणलेल्या पुस्तकात तिचा रस असतो. पंत तिचा हात धरतात तेव्हा रमा तितक्याच शांतपणे म्हणते, ''बस्स! झाल समाधान, वाटल्यास हाही हात धरा! दुसराही हात पुढे करते, तुम्हाला बरं वाटत असेल तर, धरा आश्रमात हीच शिकवणूक असते वाटत?'' रमाचा टोला वर्मी लागतो. त्याला मेल्याहुन मेल्यासारख होतं. मुलं अभ्यासात गुंग होतात मार्च महिना जवळ येतो. उन्हाळा मी म्हणू लागतो. वार्षिक परीक्षेची तयारीत अधून मधून मठात वेळ घालवतात रमाला खूप बोलायचं असत तिला अजूनही संसाराची ओढ असते. पंडितला वाटतं हिने एका दृष्टीनं सुतकी जीवन फेकून दिलं. याबद्दल आनंद वाटे पण पुढची पायरी गाठल्या बद्दल विषादही वाटतो. मधल्या काळात सदोबाची जत्रा झाली. कुस्त्याचा फड रंगला रात्री तमाशानं कैफ चढवला. गावात घरात शिकलेली पोरं म्हणुन गांवकरी मान देतात दोघेही चांगल्या मार्कांनी पास होतात. मठातही पेढे घेऊन आले पण रमा दिसली नाही. पंजाबवरून मठात आलेल्या तरुण लखमसिंग व भानुमती बरोबर रात्री अपरात्री फिरताना दिसली. दोघांनी खूप समजावण्याचा प्रयत्न केला. पण रमा बेफान झाली होती. चांगल वाईट तिला कळत नव्हतं. सूडाच्या भावनेने ती स्वतःला वाईट मार्गावर नेत होती. दोघंही बोलत नाही व लखमसिंग बरोबर हिंडलेल आवडत नाही म्हणून ती अधिकच त्यांना हिणवते. तिच्या डोक्यात एकच विचार असतो संसार आणि मूल. तिची आई व्हायची इच्छा अधिकच प्रबळ झाली.

सुधाकर गावातील सधन घरचा मुलगा लेखक व पंडितचा मित्र असतो. त्याच्या साह्याने लखमसिंगला मारतात समज देतात रमाच्या नादी लागू नको. तो घाबरतो महाराजांच्या कानावरही कागाळी करतात त्याला परत

पंजाबला पाठवतात. रमा अधिकच पिसाळते. बदनाम होण्याचे सगळे मार्ग अजमावते. भडक मेकअपमध्ये फिरते आणि एक दिवस राजाक्काला ती आई होणार असल्याचं आनंदाने हसत हसत सांगते. मठात स्मशान शांतता पसरते. नारायण पाटलाला तातडीने बोलवतात. सगळे समजावतात ती हट्ट सोडत नाही. सगळ्यांच्या वर संशयाची सुई फिरते आणि शेवटी राजाक्काला स्मरण झालं आणि तिनं म्हटल, अहो, लखमसिंग असावा. मी ही त्याला खूपदा पाहिला रमेबरोबर, अहो तो तसा इरसाल पोरगा होता. पंतान माहिती पुरविली. तिला विचारल्यावर ती गप्प बसते. राजाक्का म्हणाली, अहो, तिला काय विचारता, तोच तो दिवसभरात असायचा रमेबरोबर. पण हे खोट असल्याचं रमा सांगते. तेव्हा पाटील संतापून लाथाबुक्क्याने मारतो मातीत पडलेली रमा किंकाळ्या मारीत आई! आई! मेले गं, मला कुणीतरी वाचवा हो. म्हणून टाहो फोडते, हुंदके देते, तेव्हा पाटील गरजतात. आता सांग? वाचा उघड तुझी. एवढं मन ताब्यात नव्हत तुझ्या. इतका निमूटपणे मार खाणारी रमा आवेशाने बोलते, तुमचं तरी असतं ताब्यात? या वयात सुद्धा तुम्हाला संसार करावासा वाटतो. मग मी तर तरुण आहे. मला नाही वाटत करावा? का नाही लग्न केलं माझ? का घातल मला नरकात अन् माझी फसवणूक केली. मी तुमचं काय पाप केलं होत?

महाराज ह्या प्रसंगातून सोडण्याचा रामबाण उपाय करतात. राजाक्काच्या कानात काहीतरी बोलतात आणि जालीम औषध आणायला सांगतात. राजाक्का रमाला औषध म्हणून देते अन् रमाचा मृत्यू होतो. पाटलानं म्हणलेल खरं ठरलं होत. लेखकाने व त्याच्या मित्राने पंडितने मठाचं जेवणं सोडल मठाकडं पाठ फिरवली.

## दलित कादंबरी : 'चक्री' – भीमसेन देठे

भीमसेन देठे एक प्रथीतयश कवी, कथाकार, नाटककार, कादंबरी लिहिणारे दलित साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची चक्री ही कादंबरी संस्कृती प्रकाशनाच्या सुनिता राजे पवार यांनी प्रकाशित केली. एकूण २६८ पृष्ठांची आहे लेखकाच्या मनात लहानपणापासून दगडी या स्त्रीच करारी व्यक्तिमत्त्व खोलवर रुतलेल होतं ते आधी कथारूपाने १९८७ मध्ये दिवाळी स्त्री विशेषंकात दगडी नावाने प्रसिद्ध झालं. वाचकांना आवडलं यानंतर १९९४ सालच्या

महाराष्ट्रातील जळगांव येथे पेटलेल्या वासनांकांडाच्या किती तरी स्त्रियांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली. वाढलेला उपभोगवाद, हिंसाचार विध्वंस थांबणार कधी? ह्या प्रश्नांच्या आक्राळ विक्राळ चक्रात 'चक्री' ची निर्मिती झाली. समग्र स्त्री जात दलितांपेक्षाही दलित आहे.

कथानक :-

कथेला सुरूवात होते ती मुंबई मधून निवेदन तृतीय पुरुषी आहे. पवार गुरुजींच्या सूत्रानुसार कादंबरीला सुरूवात होते. एस.टी.चा प्रवास, मुंबईचे महानगरीय वातावरण गुरुजी विचारांच्या तंद्रित स्वतःशीच पुटपुटतात सेहचाळीस वर्षे मनात बाळगलेल गुपित अजून किती वर्षे तसेच ठेवायचे? आता आपण पंचाहत्तरी गाठली माधवला त्याच्या आईबद्दल सांगायला हवे. तो आपल्यालाच वडील समजत आहे. आयुष्यभर तिच्या वाट्याला आलेल्या भोगवटा शेवटी तरी मरताना तिला सुखाने मरू दे आणि मुंबई सेंट्रलला एस.टी. लागल्यावर गुरुजी उतरतात आणि कामाठीपुऱ्यात जातात. (वेश्या वस्तीचे सर्व वर्णन येथे केले आहे पण बिभत्स वाटत नाही इतक्या संयमाने केले आहे) आणि जमना त्यांचे स्वागत करते. जमनाही म्हातारी झालेली दिसते. ती दगडी आता येथे नाही तर, तिने गावा बाहेर चेंबूरला एका टेकडीवर महिलाश्रम काढला आहे व तेथे लघुउद्योग केंद्र चालविते अशी माहिती देते. गुरुजींना मनोमन आनंद होतो की, दगडी वेडातून शहाणी झाली तिला हरवलेली दिशा सापडली दगडी डगमगली नाही. नरकात राहून लढाई जिंकली.

गुरुजी तिला भेटण्यासाठी निघतात. त्यांना चैत्यभूमीचे दर्शन घ्यायचे असते ६ डिसेंबर वातावरण पूर्ण आंबेडकरीमय झालेलं. दोन महिन्याच्या बाळापासून ते मृत्यूच्या कुशीत शिरू पाहणाऱ्या म्हाताऱ्यापर्यंत दर्शनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेला अफाट जनसमुदाय पवार गुरुजीही त्या गर्दीत मिसळले गेले ते अवाक् होऊन पाहत होते. निरनिराळ्या ठिकाणी सभेसाठी मंच उभारलेले दलित पँथर, रिपब्लिकन, मुक्तिसेना साऱ्यांची भाषणे जोर जोरात सुरूहोती. येणाऱ्या भीमअनुयांना पाणी, जेवणाची सोय दिसत होती. त्यांना राहूलची आठवण झाली. राहूल माधवचा मुलगा तो ही पुढारी झालेला. त्याची भेट होत नाही. गुरुजींना दगडीला भेटण्याची ओढ लागली होती आणि समोरून एका मिरवणुकीचे नेतृत्त्व करीत दगडी हातात निळा झेंडा घेऊन एक हात वर करून घोषणा देत होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर... झिंदाबाद! गुरुजींनी पाहिले वय झालेली म्हातारी सुरकुत्या तोंडावर पसरलेल्या केस सफेद झालेले पण चेहऱ्यावरचा तो पूर्वीचाच दिमाख कायम होता. दोघांचे बोलणे विचारपूस होते. डोळ्यातून अश्रूंचा बांध मोकळा होतो. माधवची, राहूलची चौकशी झाल्यावर बरोबरच्या बाया अचंबीत होतात. दगडा सारखं काळीज असलेल्या या बाईला हा माणूस भेटल्याबरोबर कसं रडू फुटलं, याचाच विचार करत होत्या.

दगडी गुरुजींना म्हणते, वाटेत हौसाचं एक काम करू मग जाऊ आणि हौसाच्या झोपडीवर दगडीने धक्का मारला हौसाच्या नवऱ्याने दार उघडलेच नाही तीन–चार लाथा घातल्या, आवाज दिला तेव्हा कुठे त्याने झोकांड्या खात दार उघडले. कौन है? म्हटल्यावर दगडी गरजली तुझी आय त्याच्या थोबाडीत धाडदिशी वाजवली त्याच्या सोबत एक तरुणी होती ती उठली. दगडीने तिला ओळखले. सुंदरे कामाठी पुऱ्यातील धंदा सोडून दुसऱ्याचा संसार मोडायला आलीस काय इथ? तीने मावशी मला माफ कर असं विनवलं हौसेच्या नवऱ्याने दगडीचे पाय धरले. हे सगळ गुरुजींना नवं असलं तरी दगडीच्या ते अंगवळणी पडलं होतं. हौसाच्याच घरी तिला रात्र काढायला सांगितली. रात्री १२ वाजता कुठं जाणार याची जाणीवही दगडीला होते. सगळ्यांनी रात्र तिथेच काढली आणि सकाळी चेंबूरला आश्रमात गेले. दगडी मुलाच्या सोन्यासारख्या संसारात जायला नको म्हणते. गुरुजी तिला म्हणतात, अग तू तर मोठ्या समाजसुधारकांपेक्षाही किती चांगली कामे करतेस, पण तुझं अडाणी तत्त्वज्ञान आहे तसचं आहे. तिचा महिलाश्रम म्हणजे बऱ्यापैकी पाच झोपड्या तेथे पिंपळाच्या सावलीत पाच पाच बायकांचा एक गट वेगवेगळी कामे करण्यात गर्ग येथे दगडी मानवतावादी विचार अनुभवातून मांडते. गुरुजी, ज्याला जाळातच ढकललं त्याला चटक्याचा तरास कळतो. मी जळल्ये, भाजल्ये, होरपळल्ये या पोरींनी त्या वणव्यात जाऊ नाय. त्यांनी आपली अब्रू विकू नाय. यांनी घाम गाळावा, कष्ट करावं अन् आपलं पोटं भराव.. त्या नरकापासून, त्यांना लांब ठेवण्यासाठी मी धडपडत्ये. माझ्या धडपडीस यश येईल असं वाटतं गुरुजी या विचाराने चक्रावून जातात. गुरुजींना वाटतं आपण आयुष्यभर शाळेतली पोरं हाकत आलो. शिक्षण तिसरा डोळा! दगडी किती किती महान होती. त्यांना दगडी आभाळाएवढी दिसू लागली. विचारात गढलेल्या गुरुजींला दगडी भानावर आणते. गुरुजी म्हणतात मास्तर मी होतो का तू? दगडी म्हणते तुमीच होता की,

मी आपली आडाणी दगड रात्रीच्या साळंत शिकवताना तुमीच म्हणाला व्हताना, दगडी तू नावा परमाणं दगड आहेस दगड. असे तरुणपण एकत्रं घालवलं नाही आता म्हातारपण तरी एकत्र घालवू असा विचार बोलून दाखवतात. तीन चार दिवस आश्रमात राहतात. गुरुजी गेल्यावर दगडी एकटीच चांदण्यांनी भरलेलं आकाश पाहता पाहता भूतकाळात आपल्या गांवच्या आठवणीत गढून गेली.

रांजणगांव भागूजी त्याची बायको राधा त्यांची मुलगी दगडी रात्रीच्या शाळेत पवार गुरुजींकडे शिकायला जात पवार गुरुजी सातार्‍याकडचे महारवस्तीत राहून लोकांना आंबेडकरांविषयी सांगत. हळू हळू त्यांना दगडी आवडायला लागली होती. दुष्काळ पडतो. दुष्काळात भागूजीचे निधन होते. राधाला पवार गुरुजी व दगडीच्या जवळकीचा संशय येतो ती गरिबीचे जीवन जगत असते पण इज्जतीला घाबरत असते. खरं तर पवार गुरुजी दगडीशी लग्न करणार असतात पण त्यांच्या मोठ्या बहिणींची लग्न झाल्यावर तो पर्यंत ते हे प्रेमही व्यक्त करीत नाही आणि दगडीचं गुरुजींकडे जाणं बंद केलं जातं. याच गावातील अनसा नावाच्या विधवेचा मुलगा दौलत हा मुंबईला काम करतो व शिकतही असतो. अनसाबाई आणि राधा नणंद भावजयांसारख राहत भागूजी मेल्यावर राधेला अन् दगडीला आधार मिळतो. दौलतला दगडी दादा म्हणते असते. त्याच गावात रावसाहेब नावाचा रंगेल पाटील त्यांची प्रेमळ सोज्वळ बायको सुगंधा शिकलेली गुणी घरंदाज असते. गांव तिला वयनीसायब म्हणून मान देतात. दौलत नेहमी पत्रातून गुरुजींशी संवाद साधतो व आंबेडकरी चळवळीबद्दल, नामांतराबद्दल लिहीत असतो. गुरुजी व दौलत यांच्या माध्यमातून सगळ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कळतात. रावसाहेबांची वाईट नजर दगडीवर पडते. तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा डाव वयनीसाब उधळून लावतात. चिडलेला रावसाहेब हंटरने बायकोला मारतो. पंचवीस वर्षे झालेली मुलबाळं नाही ह्या दुःखात असलेली माउली आपल्या वडिलांच्या नावाला बट्टा लागू नये म्हणून सहन करत राहते.

मधल्या काळात दौलत आपल्या मित्राचं गुलाब काळेच स्थळ दगडीला आणतो गुरुजीला हे कळतं त्यांच पत्र दौलतला मिळत नाही. त्या आधीच दगडीचं लग्न मुंबईच्या गुलाब काळेशी होते. दगडी सुखात असते पण मनात कुढते तिच्या मनात गुरुजींच प्रेम असतं पण नियतीपुढे काहीच चालत नाही. दोन एक वर्ष सुखाची जातात. सासू आहे, सासरा नाही अशी तीनच माणसं गावातून एकदम मुंबईतील सगळ्या गोष्टी अंगवळणी पडता पडता एक दिवस

काळ घाला घालतो. गुलाबचा रेल्वेतून पडून अपघाती मृत्यू होतो. सासू तिला पांढऱ्या पायाची म्हणून हाकलते. दगडी परत रांजणगांवला येते. राधाचेही निधन होतं दगडी अनसाकडे राहते. थोड्याच दिवसात कळतं दगडी गरोदर आहे. लोक नांव ठेवतात विधवा बाई गरोदर, अनसा पण दगडीला खोदून खोदून विचारते ती रानात रावसाहेबांच्या तावडीतून सुटली तो प्रसंग अनसाला आठवतो पण दगडी सांगते नाही मी पवित्र आहे. वयनीसायबांनी मला वाचवलं होतं हे बाळ आमच्या प्रेमाच आमच्या नवराबायकोच्या सहवासातीलच आहे. मी त्याला वाढवणार शिकवणार असं ती धीराने बोलते.

गावात काही वाईट माणसंही असतात. शंकर महार त्यातील एक त्याची मुलगी तारा वाया गेलेली मुलगी दोघे मिळून जात पंचायत बसवतात. सुगंधा वहिनी न्यायनिवाडा करतात. दगडीच्या पाठीशी उभ्या राहतात. नवऱ्या विरुद्ध आवाज उठवतात. त्यानंतर रावसाहेब आपल्या पत्नीला मारून विहिरीत टाकतो. त्यांचा मृत्यू होतो. शंकर गांव सोडून जातो व सूडाच्या भावनेने पेटून उठतो. इकडे दगडीला मुलगा होतो. चार पाच महिने होतात. शंकर मुंबईवरून एका माणसाला घेऊन येतो तो तिच्या सासूचा लांबचा भाऊ म्हणुन ओळख सांगतो व घ्यायला आलो म्हणून मुंबईला नेतो. पण घरी न नेता कामाठीपुऱ्यात वेश्याव्यवसायाची मालकीन चंपा मौसीला विकतो. येथे तिच्या जीवनाची फरपट सुरू होते.

इकडे कामाठीपुऱ्यात ज्युडो कराटे शिकवायला एक जपानी बाई आली तिचं खरं नांव कुणालाच माहित नव्हतं. तिच्या निळ्या डोळ्यावरून तिला सगळे निलूताई म्हणत. दगडी ज्युडो कराटे शिकते आणि तिच्यात मेलेला आत्मविश्वास पुन्हा जागा होतो. टपलेल्या गुंड गिधाडांवर ती वीजेसारखी तुटून पडते. एक दिवस चंपाचा खून होतो. सगळ्यांची जबाबदारी दगडीवर येते. अशीच एक मुलगी गावावरून फसवून आणली जाते. दगडी तिला पैसे देऊन परत पाठवते. जमना व हेमाला विचार पडतो असं केलं तर कस होणार पण दगडी निश्चय करते व कोठा विकून स्वाभिमानाचे जीवन जगायला सुरूवात करते. ह्या विचारातून ती बाहेर पडते. बरीच रात्र झालेली असते. ती गुरुजींबरोबर जायला तयार होते. माधव आता नामांकित कॉलेजमध्ये प्राध्यापक असतो. सूनबाई शाळेत शिक्षिका नातू राहुल चळवळीत पुढारी होतो. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर होते.

त्याला अटक होते पण सुटकाही होते. माधव व सूनबाई दगडीला आईच्या रूपात स्वीकारत नाही. राहूल मात्र खूप खूष असतो. गुरुजींकडून सगळी गोष्ट समजल्यावर तो आपल्या आजीच्या कतृत्त्वापुढे नम्र होतो. थोडे दिवस दगडी तेथे रहाते. पण उच्चभ्रू वातावरणात आपला मुलगा व सून आपले नाहीत याची जाणीव होऊन ती पुन्हा मुंबईला जाते. पण जाताना घराबाहेर एकटी पडत नाही तर गुरुजीही असतात. हे राहुलला कळल्यावर तोही घर सोडतो व मुंबईला या दोघांना भेटतो. पण दगडी मूक होते. राहुल तिला आई म्हणून हाका मारतो आणि माझ लेकरू मला भेटलं! अस म्हणून राहुलच्या कानशिलांवरून बोटे मोडते तिच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहतो. आश्रमातील भगिनी आनंदून जातात. पवार गुरुजी स्वतःशीच म्हणाले, होय दगडी बोलायला लागलीय आई हा शब्द ऐकण्यासाठी ती आयुष्यभर तळमळत होती. आई या दोन अक्षरांनीच तिची गेलेली वाचा परत दिली. राहूलच्या प्रेमाने ओथंबलेल्या त्या हाकेनं तिचे ओठ नकळत विलग झाले. ती बोलू लागली.

तुलना :–

इथे फुलांना मरण जन्मता यामधील रमा आध्यात्मिक मठात असून, आपल्यावर काबू करू शकली नाही. वासनेला बळी गेली केवळ पुरुषसत्तेचा सूड उगवण्यासाठी स्वतःचे आयुष्य संपवून टाकते. तर चक्रीमधील दगडी कामाठीपुऱ्यात वासनेच्या वखवखलेल्या माणसांमध्ये राहून मनाने शुद्ध राहिली. केवढा हा विरोधाभास दोघीही पुरुषप्रधान संस्कृतीच्याच बळी.

**भाषाशैली** :

चक्रीमध्ये ग्रामीण, नागर, मिश्र भाषा दिसते. दलित भाषा दिसते अनेक संवादामधून जीवनावर भाष्य केलेले दिसते. उदा.माधव आईला स्वीकारत नाही याला गुरुजी स्वतः जबाबदार समजतात. माझचं काही चुकलं असाव. पाहिजे तसे संस्कार करता आले नसावेत. गुरुजी तुमचं काय बी चुकल नाय. कवा कवा झाडाला फळ कसं येईल ते झाड वाढवणाऱ्या माळ्याला बी कळत नाय. त्यात गुरुजी तुमी तरी काय करू शकला असता? हेमाला दगडी गावातील गोष्टी सांगताना पवार गुरुजी विषयी सांगते. महार असल्याचं सांगते. हेमा तर ब्राम्हण जातीतून आलेली तेव्हा हेमा म्हणते, सर्व धर्म समभाव सर्व जाती सम

भाव। कोणी कोणाच्या धर्माचा द्वेष करीत नाही. कोणी कोणाच्या जातीला श्रेष्ठ कनिष्ठ मानत नाही. सगळी समानता। कोणत्या राजकारण्याला खऱ्या अर्थाने समानता पाहायची असेल तर त्यांनी इथली समानता पहावी. आपली जात एकच बाईची! उपरोधित शैलीत जातीयतेचे बोलके उदाहरण यात दिसते.

**इथे फुलांना .... भाषा शैली**

ग्रामीण बोलीचा वापर मधे मधे केलेला दिसतो. संपूर्ण कादंबरी प्रमाण भाषेत प्रथम पुरुषी निवेदन आहे. गरिबीचे बोलके विचार, आमच घर म्हणजे अन्नधान्य सोडून खाली सर्वांनी भरलेलं दुःख, वैताग, विवंचना अन् कर्ज त्यामुळे निदान एक दिवसाआड तरी उपवास घडत असे. पाप पुण्याचं गणित सार जग पापानं, अन्यायान आणि बळबजरीने भरलेले आहे. जिकडे तिकडे पापांचे हात लवथवताहेत. निष्पाप मनाचे लचके घेतले जात आहेत. असा भास होत होता. एक बाप आपल्या लाडक्या कन्येला तिच्या मनाविरुद्ध बळजबरीनं संसाराचा त्याग करायला सांगतो.

* * *

# ग्रामीण व दलित साहित्यातील स्त्रीजीवन

–प्रा.भाऊसाहेब गव्हाणे

मानवी जीवनाची जडणघडण ही सामाजिक अंगाने होत असते. कारण मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्याच्या एकंदरीत व्यक्तिमत्त्वामध्ये समाज डोकावताना दिसून येतो. व्यक्तीच्या वर्तनावर भोवतालच्या वातावरणाचा परिणाम दिसणे क्रमप्राप्त असते असे म्हणता येईल. सामाजात असणारी परंपरा मूर्त आविष्कार साकार करण्याचे काम मानव करत असतो. इ.स. १९६० नंतर ग्रामीण व दलित साहित्याचा प्रवाह जोर धरू लागला. ग्रामीण भागातील उपेक्षित समाजाला यामध्ये स्थान मिळू लागले. अनेक लेखकांनी हे सामाजिक वास्तव स्वत: अनुभवले असल्याने त्यामध्ये वास्तवाची तीव्रता दिसून येऊ लागली. या साहित्यातील स्त्री उपेक्षित घटकाचे प्रतिनिधित्व करताना दिसू लागली. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये ही स्त्री आपले अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडताना दिसून येते. सभोवतालच्या समाजाचे असलेले दडपण तिच्यावर दिसून येते. त्यातून तिची एक विशिष्ट प्रकारची मानसिकता तयार होते. आपले विश्व एवढेच आहे त्याच्याबाहेर आपण जाऊ शकत नाही अशी तिची मनोभूमिका तयार होते. साहजिक मराठी ग्रामीण व दलित कादंबरीमध्ये एक व्यक्तिरेखा म्हणून चित्रित झालेल्या स्त्रीचे भावविश्व तिची मानसिकता पती, कुटुंब, मुलंबाळ यांच्याशी असलेले तिचे नातेसंबध तिच्या आशा आकांशा या सर्व गोष्टी पारंपरिक मूल्यांशी जोडलेल्या दिसून येतात. असे म्हणावे लागते. 'स्त्री' एक माणुस आहे तिला ही काही स्वातंत्र्य दिले पाहिजे या गोष्टी सोयीस्करपणे विसरल्या जातात. ग्रामीण भागात निरक्षरता आणि पारंपरिक अंधविश्वास यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये हे प्रमाण स्त्रीच्या बाबतीत अधिक जाणवते. पुत्र म्हणजे वंशाचा दिवा, नवरा म्हणजे देव, बाईचा जन्म म्हणजे मागल्या जन्माची शिक्षा, बाईच्या जातीला हे शोभत नाही असे अनेक संस्कार तिच्यावर नेहमी केले जातात यातूनच तिची एक मानसिक घडण तयार होत असते.

चंद्रकुमार नलगे यांच्या 'अगीनफूल' कादंबरीतील सावित्री हे पात्र म्हणते, ''स्त्रीने सगळं मनात ठेवायचं असतं, भोगायचं असतं, जमेल तसं जगायचं असतं. चंदनासारखं आयुष्य चंदनासारखं झिजावं उगळावं, जळत

रहावं'' यातून स्त्री आपले भावविश्व प्रकट करते. जणू काही नियतीने हे भोग तिच्या वाट्याला दिलेले आहेत तशी मानसिकता तयार झालेली दिसते. दुसऱ्यासाठी जगणे व आपले अस्तित्व त्यामध्ये मिसळणे ही तिच्या जगण्याची इतिकर्तव्यता दिसून येते. श्री.ना. पेंडसे आपल्या कादंबरीमध्ये स्त्रीजीवन चित्रित झाले आहे. त्यांची 'एल्गार' ही कादंबरी हिंदू-मुस्लीम संघर्षाचे चित्रण करते. तरी देखील त्यातील स्त्री आपल्या नजरेत भरून जाते. या कादंबरीतील आत्या म्हणते, ''रघू हसिनेसारखी बाई मिळायची नाही. नवऱ्याची काळजी घेणारी'' यातुन स्त्रीचे श्रेष्ठत्व स्पष्ट होते. परंतु ती नवऱ्याची काळजी घेण्याच्या अनुषंगाने नवरा हा तिचा परमेश्वर आहे आणि त्याची काळजी तिने घेतलीच पाहिजे नाहीतर सामाजिक रोषाला सामोरे जावे लागते. भारतीय स्त्रीच्या कपाळावर संस्कारमूल्य म्हणून जी मुद्रा उमटलेली आहे ती पुसण्याचे धाडस स्त्री करतेच असे नाही. 'रथचक्र' सारख्या कादंबरीमध्ये त्या नायिकेला आपला नवरा आधारवड वाटतो. तिच्या मनातील परस्वाधीनतेची भावना प्रकट होताना दिसते. ग्रामीण भागातील स्त्रीला आपण सधवा किंवा सौभाग्यवती आहोत याचा अभिमान वाटतो. याचेही चित्रण साहित्यात येताना दिसते. कारण आपल्या समाजात वैधव्य पाप समजले जाते. नामदेव ढसाळ यांच्या 'हाडकी हाडावळ!' या कादंबरीतील बायजा एके ठिकाणी म्हणते, ''कायेच्या बाय न्हायी पोरे! अगं नवरा जवळ असला की लई आधार वाटतो. बघ अंगात म्हणतात ना कुंकवाशिवाय भांगाला आणि नवऱ्याशिवाय भानवशीलाला शोभा न्हाय'' यातील पात्र पुरुषसत्ताक पद्धतीलाच जणू मोठेपणा देते. नवरा नसेल तर तिच्याकडे पाहण्याचा समजाचा दृष्टिकोन बदलतो. नवरा तिचा आधार असला तरी कुंकवाचा तो धनी आहे. तो कसा आहे, तो कसा आहे, काय पराक्रम करतो याच्याशी तिला काही देणंघेणं असलेले दिसत नाही. नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' या कादंबरीतील या कादंबरीतील विधवा वालंबी ही महत्त्वाची व्यक्तिरेखा 'आई' म्हणून आपल्याला जास्त भावते. तिची धडपड आपल्याला थक्क करून टाकते. अडचणीवर मात करताना अनेक संकटे येतात. परंतु ती हार मानत नाही. यातील हरणी, वाळंबी या स्त्री एकमेकींच्या सुख दु:खात आधार देणाऱ्या दिसून येतात. पायलीभर ज्वारीसाठी हरणीला गोपाळ देशमुखाकडून लैंगिक अत्याचार सहन करावा लागतो. ना.धो.महानोर यांच्या 'गांधारी' कादंबरीमध्ये एक वास्तव स्त्रीजीवन येते. यातील जयवंताची म्हातारी आई म्हणते ''दोन वर्स संसार केलाय त्यानं पोरीशी ते आल्याशिवाय

राहणार नाही. त्याच्याच नावावर पोर बसुन ठेवीन ''. यातील सत्य हे आहे की तिचा नवरा नपुंसक आहे. परंतु तो परपुरुषाशी संबंध ठेवण्यास संमती देतो. परंतु जयवंताला ते मान्य होत नाही. स्त्रीमध्ये असणारा स्वाभिमान या ठिकाणी अधोरेखित होतो. असेच काही स्त्रीजीवनाचे भावविश्व 'बनगरवाडी या कादंबरीमध्ये दिसून येते. उद्धव शेळके यांच्या 'धग' कादंबरीतील कौतिक असो वा रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' कादंबरीतील पारबती असो यांच्या जीवनामध्ये संघर्ष आहे. तो त्यांच्या म्हणण्यानुसार नियतीने आणला आहे. परंतु पुरुषातील नाकर्तेपणा या संघर्षाला कारणीभूत आहे असेच म्हणावे लागते. 'कैतिकचा' मुलगा भीमा तर पारबतीचा मुलगा भाना व नवरा यातील हे पुरुष काम न करणारे आहेत. त्यामुळे या स्त्रियांचा जीवनसंघर्ष कठीण होताना दिसतो. यातील पारबती आपले पाचोळापण मान्य करते. परंतु नवऱ्याने व मुलाने काम करावे हे तिला प्रामाणिकपणे वाटते आहे. एक आशावादी ग्रामीण स्त्री यातून समोर येते. अशोक व्हटकर यांची '७२ मैल' ही तळागाळातील दलित जीवनचित्रण करणारी कादंबरी आपल्याला वेगळ्या स्त्रीविश्वाचा आविष्कार घडवते. नवऱ्याने टाकलेला स्त्रीला उपेक्षित जीवन जगावे लागते. तिच्याकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन या ठिकाणी स्पष्ट होतो. यातील राधा महारणीचे जीवनचित्रण ही हृदयाचा ठाव घेते. नवरा तुरुंगात गेल्याने सहा मुले बरोबर घेऊन ती एकटीच जीवनप्रवास करते. या प्रवासामध्ये तीन मुलांचा मृत्यू होतो. दैन्य, दुखः, दारिद्रय हे स्त्री जीवनालाच जास्त जवळचे असतात. हे वास्तव सत्य आहे. चि.त्र्यं.खानोलकर यांच्या 'कोंडुरा' कादंबरीतील नियती, रूढी, परंपरा, धार्मिकता यामध्ये अडकलेली स्त्री दिसून येते. यातील अनुसया, सुतारीण, पार्वती या अंधश्रद्धाळू आहेत. त्यांची कोंडुऱ्यावर श्रद्धा आहे. हमीद हलवाई यांच्या 'इंधन' कादंबरीत तो आणि ब्राम्हणकन्या सुमती यांच्या भावविश्वाचे नाजूक प्रेमसंबधाचे दर्शन घडते. स्त्रीमनातील भावनांचे याद्वारे प्रकटीकरण होताना आढळते. जयवंत दळवींच्या 'महानंदा' मध्ये एका भाविणीच्या मुलीची ससेहोलपट स्पष्ट होते. जे. जी माने यांच्या 'मुक्ती' कादंबरीतील 'स्त्री' विधवा असून ही समाजव्यवस्थेविरुद्ध करारीपण व्यक्त होते. बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीतील आनसा आपल्या संसाराची मोट बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न करते. आजारी नवरा मुलगी सोबा हिचा मृत्यू खलप्रवृत्तीचा सावकार, खुनसी भाऊ या सर्व आघाड्यांचे दुखः एकटी पचविण्याचा प्रयत्न करते. शेवटी ती

पाचोळ्यातील पारबती प्रमाणे खचलेली दिसते. राजन गवस यांच्या चौंडक, भंडारभोग या कादंबऱ्यातून देवदासीच्या समस्यांचे चित्रण येते. देवाला वाहिलेल्या स्त्रिया यांना समाजामध्ये स्थान नाही. त्यांच्याकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन कसा वाईट आहे याचेही चित्रण येथे रंगनाथ पठारे यांच्या 'दुखाचे श्वापद' कादंबरीतील स्त्री ही सामाजिक अंगाने पुढे येते. दुखा:चे सावट सतत या स्त्री मनावर अधिराज्य गाजवताना दिसून येते. कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' कांदबरीमध्ये स्त्रीजीवनाचे भावविश्व प्रकट होताना दिसून येते. यातील आनंदी ही श्रद्धाळू आहे. वैधव्य येऊनही संघर्षातून जीवन जगते अल्पशा जमिनीच्या तुकड्यावर जगणाऱ्या माणसांना अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींच्या मागे आयुष्यभर लागावे लागते. अन्न हीच त्यांची गरज संपत नाही. गणेश आवटे यांच्या 'गणगोत' या कादंबरीतील अंजू आपल्याला एका सासुरवाशीनच्या रूपात पहावायास मिळते. नवऱ्याच्या मारझोडीला कंटाळून ती आडात जीव देण्याचा प्रयत्न करते. शेजारी पाजारी चांगल्या वाईट प्रतिक्रिया नोंदवतात. सासू अप्रतिष्ठेच्या भीतीपोटी तोंड बडवून रडण्याचा प्रयत्न करते. ग्रामीण भागातील हुंडा पद्धती यांचे वर्णन येथे पहावयास मिळते. यातुन एक सोशीक, संयमी, समंजस सासुरवाशीन येथे पहावयास मिळते. स्त्रीची परतंत्र स्थिती तिची बंधनग्रस्थता, बाप ज्याच्या दावणीला बांधीन ती तिची जन्माची दावण तरीही ती विद्रोह करीत नाही. हे वास्तव ती स्वीकारण्याचा प्रयत्न ती करते. अंजूची आई जात्यावर ओवी म्हणते त्यातून मुलीवर जणू संस्कार करते. ती म्हणते "भ्रताराचा राग जसा इस्त्याचा इंगुळ, बाई नेनते गं माझे त्याची मर्जी सांभाळ" यातून नवरा हा पुरुष आहे. त्याची मर्जी सांभाळली तर कष्टाचा भार कमी होईल मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' मध्ये कोरकूंच्या जीवनातील समाजवास्तव प्रकट होते. केरू फुलय यांची प्रेमकथा असल्याने त्यामध्ये स्त्रीविश्व साहजिकच आविष्कृत होते. बा.ग.केसकर यांच्या 'कुणाच्या खांदयावर' या कादंबरीत स्त्रीजीवन वेगळया अंगाने पुढे येते. यातील सुरवंता, गंगु, शालन या स्त्रिया येतात. सांगितल्या कामाच्या व दिल्या भाकरीच्या अशी त्यांची अवस्था आहे. पुरुषाच्या कारभारात लक्ष घालण्याची त्यांची हिंमत नाही. दिवसभर राबायची कामास उशीर झाला तर निमुटपणे नवऱ्याचा मार खायचा अशा त्या सोशीक असलेल्या दिसतात. तरण्या ताठ्या स्त्रियांवर मुकादम, बागायतदार बलात्कार करतात. परंतु इभ्रत जपण्यासाठी या सर्व स्त्रिया आतल्या आत हे दुख: पचवतात. हे वास्तव

सांगण्याचा प्रयत्न येथे दिसून येतो. उत्तम बंडू तुपे यांच्या इंजाळ, झुलवा या कादंबऱ्यामधून स्त्रीजीवन त्यातील कटू अनुभव प्रकट होताना दिसतात. रणजित देसाई यांची 'माझा गांव' मध्ये काही स्त्रिया दिसून येतात. त्यातील उमा ही रावबाची पत्नी भोसल्यांची खानदानी कन्या आहे. आज्ञाधारक, सुसंस्कृत, श्रद्धाळू गृहिणी आहे. घराण्याची प्रतिष्ठा मोठी वाटत असल्याने रावबाच्या अनैतिक संबधाविषयी तोंड उघडत नाही. रावबा निर्दोष सुटावा म्हणून देवासमोर हात जोडून डोळे मिटून बसते. देवावर अभिषेक करते. यातून तिची पतिनिष्ठा दिसून येते. अण्णाभाऊ साठे यांच्या वारणेचा वाघ, 'आवडी' अशा काही कादंबऱ्यातुन एक स्त्रीविश्व प्रकट झालेले दिसते.

ग्रामीण व दलित साहित्यातील स्त्री ही उपेक्षित आहे. दलित किंवा दलितेतर त्यांच्या व्यथा, वेदना, उपासमार दुख: आणि दैन्य एकाच स्वरूपाचे दिसून येते. दलित साहित्य याच दुख: दैन्याचा व अश्रूंचा आविष्कार करते. आजचे ग्रामीण साहित्य त्यातील नवीन लेखक वर्ग याच दुखा:चा आणि दैन्याचा आविष्कार करताना दिसते. दलित साहित्यात येणारा अस्पृशतेचा अनुभव वगळला तर ग्रामीणतेचे दुख: देखील तेच आहे. दोन्हीही साहित्य एकाच सामाजिक परिघात जन्म घेताना दिसून येतात. 'स्त्री' कोणतीही असली तरी तिच्या दुखा:ची जात-कुळी स्थुलमानाने एकच मानता येते.

* * *

# 'निवडक दलित-ग्रामीण कादंबरीतील देवदासी प्रथेचे आर्त चित्रण'

-प्रा.डॉ.एन.डी.पवार

भारत देशाची संस्कृती फार प्राचीन आहे. भारतीय संस्कृतीत अनेक चालीरीती परंपरेने चालत आलेल्या आहेत. यातील काही प्रथा चांगल्या तर काही समाजास घातक ठरल्या आहेत. काळाच्या ओघात काही प्रथा टिकून आहेत तर काही नष्ट झालेल्या आहेत. या प्रथांपैकी देवदासी ही प्रथा आहे. भारतातील वेगवेगळ्या प्रांतांत देवदासींना निरनिराळी नावे रूढ आहेत. त्यामुळे त्यांच्या नावांमागे तेथील सांस्कृतिक संदर्भ दिसून येतो. कर्नाटकात त्यांना 'बसवी' आंध्रप्रदेशात काही भागात 'बोगम' तर काही प्रांतात 'सानी' असे म्हणतात. मध्यप्रदेशात देवदासींना 'कसबी' किंवा 'गायन' म्हणतात, ओरिसातील 'गुणी' आणि बंगालमधील 'वैष्णवी' या देवदासी नसल्या तरी विशिष्ट देवळाशी त्यांची बांधिलकी नसली तरी इतर बाबतीत त्यांचे वर्तन देवदासीसारखेच असते. देवदासी अथवा जोगतीण, जोगता (स्त्री-पुरुष), रेणुका अथवा यलम्मा या देवीला वाहिले जातात. द.महाराष्ट्र व उ.कर्नाटकात ही प्रथा मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते.

महाराष्ट्रात खंडोबाला वाहिलेल्या मुरळीची तुलना देवदासी बरोबरच होते. जेजुरी भागात यांची संख्या जास्त आहे. कोकणातील 'भावीण' आणि 'देवदासी' यांच्यात खूप साम्य आहे. प्रदेशानुसार नावे वेगवेगळी असली तरी त्यांची कार्ये समान आहेत. या सर्व देवाच्या सेविकांना देवदासी असे म्हटले जाते. डॉ. एम. जी. कुलकर्णी म्हणतात, 'देवाच्या नावे अगर देवळाच्या सेवाचाकरी करिता वाहिलेल्या स्त्रियांना देवदासी हे नाव दिलेले आहे हे नाव महाराष्ट्रात आणि कर्नाटक सीमाभागात विशेषत: बेळगाव जिल्ह्यात आणि गोव्यात अधिक प्रमाणात आहे.' म्हणजेच या प्रातांत देवदासीचे प्रमाण जासत असल्याचे दिसून येते.

देवदासीचे ज्यांच्या कार्यावरून स्थूलमानाने दोन वर्ग पडतात.

१) नृत्य, गायन, वादन यात कुशल अशा कलावंतिणी या वर्गात येतात. या स्त्रिया अतिशय बुद्धिमान, सुस्वरूप, प्रामाणिक व देवभोळ्या असतात.

२) देवळातील झाडलोट, सडासमार्जन, दिवेसफाई, पालखीची व्यवस्था, देवावर चवऱ्या ढवळणे इ.प्रकारची कामे या वर्गातील देवदासी करतात.

अलीकडच्या कालखंडात देवदासींना विशिष्ट देवळात जन्मभराची चाकरी मिळत नाही. देवस्थानची स्थिती व करमणुकीची साधने बदलली, समाज भौतिक साधनांकडे आकर्षित झाला देवदासी मागे पडल्या. औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाने कला प्रर्दालाला बाजारी स्वरूप आले. १९३४ मुंबई सरकारने तर १९८३ ला कर्नाटक सरकारने देवदासी प्रथेला बंदी घालणारा कायदा केला. परंतु त्याची अजूनही कडक अंमलबजावणी होताना दिसत नाही.

स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबऱ्यांमध्ये मानवी जीवनाचे वास्तववादी चित्रण येऊ लागले. समाजाच्या समस्या, प्रन आणि जीवननुभूती मांडणारे लेख येऊ लागले. मानवी जीवनाचे चढउतार कांदबऱ्यात रेखाटले. समाजात उपेक्षित समजल्या जाणाऱ्या गटाचे उदा.आदिवासी, दलित, कामगार शेतकरी इ.व्यक्ती कादंबरीचे नायक होऊ लागले. असाच देवदासींचा वर्ग ही उपेक्षितच. त्याचे चित्रण करणाऱ्या कांदबऱ्याही बऱ्याच आहेत. उदा. भा.वि.वरेकर 'कुलदेवत'(१९३८), मधु मंगेश कर्णिक 'देवकी' (१९६२), जयवंत दळवी 'महानंदा' (१९७३) राजन गवस घौंडकं' (१९८५), 'भंडारभोग' (१९८८), उत्तम बंडू तुपे 'झुलवा' (१९८६), महादेव मोरे 'वर आभाळ खाली धरती', अनिल अवचट 'वाघ्यामुरळी', श्रीराम दुर्गे 'घडई' इत्यादी कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. परंतु या शोध निबंधात देवदासीचे जीवनचित्रण करणाऱ्या राजन गवस आणि उत्तम बंडू तुपे यांच्या कादंबऱ्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**चौंडकं :**

राजन गवस यांची १९८५ मध्ये प्रकाशित झालेली, देवदासींच्या जीवनातील व्यथांना न्याय देणारी घौंडकं' ही कादंबरी आहे. याचा प्रत्यय वाचकांना कादंबरीच्या अर्पणपत्रिकेतूनच येतो. 'भंडारा माखल्या कपाळाखाली ठुसठुसणाऱ्या वेदनाग्रस्त रेषा सांभाळून डोंगराची वाट चालणाऱ्या असंख्य देवदासींच्या चौंडक्यातून फुटणाऱ्या हुंदक्यांना....' याचा प्रत्यय कादंबरी वाचताना वेळोवेळी आल्याशिवाय राहत नाही. चौंडकं हे देवदासींचे वाद्य आहे. या वाद्यातून निघणारा आवाज हा एका अर्थाने देवदासीचा हुंदका असतो. तिची वेदना असते. या वेदनेलाच लेखकाने कादंबरी वाहिली आहे.

मुलीच्या केसांत बट झाली म्हणून तिला यल्लमाच्या पायावर घालणाऱ्या एका भोळ्या भाबड्या कुटुंबाची ही कथा आहे. बायजा व सुबाना हे मोलमजुरी करून आयुष्य जगणारे कुटुंब, सुली ही त्यांची एकुलती एक मुलगी. संसारात

या येत नाही. रोज समस्याच समोर उभ्या असतात. यामुळे हे कुटुंब पूर्णपणे त्रासलेले आहे. सुलीचे केस विंचरताना बायजाचा हात दुखावतो. केस विंचरताना हात का दुखावा हा बायजासमोर उभा राहिलेला प्रश्न. या प्रश्नाची उकल करण्यासाठी हे कुटुंब हिटणीच्या अक्काबाई जोगतीणकडे जाते. तिच्या अंगात यल्लमा येते आणि सुलीला देवदासी करण्याचा आदेश देते. सुलीच्या जीवनाची अधोगती येथून सुरू होते.

देवदासींचे विवाह, त्यातील धार्मिक विधी, त्यांची गाणी, अंगात येणे, कौल लावणे या गोष्टी लेखकाने हुबेहूब वर्णन केल्या आहेत. देवीची परडी आणि गळ्यात चौंडकं अडकवून दारोदार जोगवा मागणाऱ्या सुलीवर, तिच्या तारुण्यावर गावगुंडांच्या नजरा असतात, आपण देवाची एवढी सेवा करतो तरी आपल्या वाट्याला हे दु:ख का? हा प्रश्न सतत सुलीला भेडसावतो. देवदासीच्या उपेक्षित जीवनाचे समर्थ दर्शन या कादंबरीतून घडते. बोलीभाषेचा अतिाय सहजसुंदर वापर केलेला आहे. कथेची मांडणी पकड घेते. या कादंबरीविषयी प्रा.एस.एम.कानडे म्हणतात, घौंडकं हे एक व्यथाशिल्प आहे. देवदासीच्या व्यथावेदनांचे, त्यांच्या भाव-भावनांचे, विकार-कामनांचे, त्यांच्या मानसिक कुचंबणेची ही यथार्थ अभिव्यक्ती आहे. तसेच देवदासीविषयीच्या लोकमानसाचेही हे पारदर्शी प्रतिबिंब आहे. देवदासीच्या कर्मकहाणीचा रूपबंध म्हणजे चौंडकं. अतिाय कमी पृष्ठसंख्येत देवदासीचे वास्तव जीवन राजन गवस यांनी समर्थपणे उभे केले आहे. म्हणून देवदासीच्या जीवनावरील दर्जेदार कादंबरी म्हणून या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.

**भंडारभोग :**

राजन गवस यांची १९८८ मध्ये प्रकाशित झालेली जोगत्याच्या जीवनावरील कादंबरी. जरी जोगत्याच्या जीवनावर आधारित असली तरी प्रसंगानुरूप देवदासींचेही चित्रण कादंबरीत आढळते. त्यामुळे काही कादंबरीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. या कादंबरीतील तायप्पा या जोगत्याच्या जीवनात येणाऱ्या जोगतिणी आढळतात. कल्पनेपेक्षाही भीषण असे जोगत्याचे जगणे गवस यांनी कादंबरीतून चित्रित केले आहे. तायप्पाची मानसिक आंदोलने लेखकाने प्रत्ययकारी टिपलेली आहेत. स्त्रीवेषात फिरण्याची तायप्पाला लाज वाटते. त्यामुळे 'जोगत्यानं जोगत्यासारखं वागावं, लईबी पुरुसपना करू नये' अशी लोकांची बोलणी पचवावी लागतात. जोगत्याच्या अनोखी जगाच्या चित्रणाबरोबरच देवदासीचे जगणे या कादंबरीत आले आहे. पारव्वा, रत्नव्वा, कमळी इत्यादी देवदासींचे

चित्रण या कादंबरीत आहे. पारव्वा देवदासी एक ठिकाणी म्हणते, 'ह्या वाटंला (देवदासीच्या) आलां की कसलंही वझं हलकं व्हतं'. या कादंबरीतील प्रत्येक देवदासी आनंदाने ही प्रथा स्वीकारते. देवदासी प्रथेला कसलाही विरोध करत नाही. या कादंबरीविषयी सौ.आशा पाटील यांचे मत समर्थनीय आहे. त्या म्हणतात, 'जोगत्यांच्या मनोवस्थेचे, शारीरिक स्थितीचे, बदलत्या सहज प्रवृत्तीचे, त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनाचे, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे अत्यंत प्रभावकारी व अस्वस्थ करून सोडणारे वर्णन वाचकांना भंडारभोग मध्ये वजाधवयास मिळते.

**झुलवा :**

१९८६ मध्ये प्रकाशित झालेली उत्तम बंडू तुपे यांची ही कादंबरी देवदासीचे जीवन वाचकांसमोर साकार करते. कादंबरीत कर्नाटकातील यल्लमा देवीला सोडलेल्या देवदासीचे चित्रण केले आहे. परंपरेने चालत आलेली देवदासीची प्रथा आपल्या मुलीने पुढे चालवावी असे यलूला मनोमन वाटते. जगन ही यलूची मुलगी देखणी, प्रामाणिक, हुशार, अभिनयसंपन्न इत्यादी गुणांनी परिपूर्ण आहे. शिक्षणाची तिला आवड आहे. शिकून नर्स व्हावे आणि रुग्णांची सेवा करावी ही तिची प्रबळ इच्छा आहे. त्यामुळे आपल्या आईचे मत जगन नाकारते. परंपरागत चालत आलेल्या देवदासी व्यवसायाला ती नकार देते. देवदासी प्रथेविरुद्ध बंड करून उठते. परंतु त्याचा काहीच उपयोग होत नाही. समाजापुढे तिला हार पत्कारावी लागते. शेवटी समाजाने दाखवलेल्या वाटेनेच तिला जाणे भाग पडते. समाज जगनला स्वतंत्रपणे जगू देत नाही. जगन विचारी आहे. ती म्हणते, 'आईनं कवा याच देवावर लगीन लावलं आसंल हे त्यालाबी ठावं नसंल. आता आय आन् परसू ह्या देवासंगट माझं लगीन लावणार, आईगत मलाबी जोगतीण हुनशान जग टकुरीवर घेऊन 'यल्लमाचा जोगवा' म्हणून दारोदार भीक मागावी लागणार. आय नि बाप दोघंबी बापाचं नाव न्हाय, त्यातनं मी जलामली, माझ्यातनं कोणतरी जलम घेणार, त्याला बाप? का आपल्यागतच त्यो बी बिनबापाचा? त्याची आय आपुन बापबी आपूनच, माझ्या आईगत मीबी जोगतीण होणार. अशाप्रकारे जगन आपल्या जगण्याची कैफियत मांडत आहे.

जयंत हा गावातील प्रतिष्ठित अश मोठ्या घरातील मुलगा आहे. त्याचे जगनवर वरवरचे प्रेम आहे. जगनचा केवळ शारीरिक उपभोग हवा आहे. तिची संपूर्ण जबाबदारी घेणे तो नाकारतो. लग्नाला नकार देतो. जयंतमुळे जगन बदनाम होते. तिला शाळा सोडणे भाग पडते. नाईलाजाने आईने चालवलेला व्यवसाय स्वीकारण्याची वेळ तिच्यावर येते. जगन परमेश्वराचा द्वेष करते. ती म्हणते,

'आई यल्लमा, तू आदिशक्ती, तू आदिमाता. तू बल्या झाडाला आग लावती, तर ह्या जोगत्याच्या जगाला आग लाव. ही आमच्यातनं उगवत, वाढत चाललेल्या नव्या जातीची कवा राख हुनार? यल्लमा, तू पतिव्रता, तू माझा, तू पिता, तू भर्ता, तू योगिनी, तू जोगिणी, येवढं तुझं थोरपण, तू जोगती, तुझ्या दासी, त्यांच्या नशिबात ह्यो वनवास का? दासीला नसतो पती, तरी तिला पोरं कशी हुती? म्हणजेच देवदासी प्रथा नष्ट व्हावी असे जगनला वाटते. देवदासी प्रथा हे केवळ ढोंग आहे. देवदासीला समाज आपल्या सोयीसाठी देवाच्या नावाखातर राबवून घेत आला आहे. हे जगनला पटत नाही. जगन जरी हा मार्ग बदलण्याचा प्रयत्न करते तरी समाज तिला या वर्तुळातून बाहेर पडू देत नाही.

जगन झुलवा लावते; परंतु तो फार काळ टिकत नाही. त्यामुळे आयुष्याच्या अखेरपर्यंत तिला देवाची सेवा करत जगणे भाग पडते. दळवींच्या 'महानंदा' मधील नायक बाबुली देवदासीबरोबर लग्न करावयास तयार असतो. बोरकरांच्या 'भावीण' मधील ह्षी शेवंता देवदासीशी लग्नास तयार होतो. मात्र 'झुलवा'तील जयंत देवदासी जगनचा केवळ उपभोग घेतो. लग्नास नकार देतो. 'झुलवा' या कादंबरीतून तुपे यांनी जगन या देवदासीची व्यथा समर्थपणे मांडली आहे.

**काही निरीक्षणे :-**

१) या कादंबऱ्यांचा आधार घेता भारत देशात देवदासी प्रथेत बळी पडलेल्यांत गरीब व दलितांचे प्रमाण प्रचंड आहे.

२) नवस, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, जट येणे, आराज, गरिबी, फसवणूक इ.कारणांमुळे अल्पवयीन मुलां-मुलींना देवाला वाहिले जाते. हे दिसून येते.

३) यात बळी पडलेल्या सर्वच देवदासी वेशा-व्यवसाय करीत नाहीत. परंतु वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांमध्ये देवदासीचे प्रमाण मोठे आहे. काही देवदासी अनैतिक मार्गाचा अवलंब करून जीवन कंठीत असतात. यांचे संदर्भ सापडतील.

४) बहुसंख्य देवदासींना या प्रथेतून मुक्त होण्याची इच्छा असेल परंतु त्या संबंधीची उपाय योजना व सामाजिक जागृतीचा अभाव कटाक्षाने जाणवतो.

५) देवदासी प्रथा निर्मूलनाच्या पुनर्वसनाच्या बाबतीत राष्ट्रीय स्वरूपाच्या कायद्याची गरज आहे.

* * *

# ग्रामीण व दलित कादंबरीतील स्त्रियांची भाषा

–डॉ. सुनंदा थोरात

भाषा हा शब्द 'भाष 'म्हणजे बोलणे या अर्थाने येतो. 'मराठीचे भाषाशास्त्र' या ग्रंथात भाषा व मानवी जीवन यांच्यातील संबंध विशद करताना म्हटले आहे की, भाषा ही मुळात स्वतःच्या मनातील विचार किंवा भावना व्यक्त करण्यासाठी जन्मलेली असते. आपल्याला जे काही सांगायचे आहे किंवा ज्या भावना व्यक्त करायच्या आहेत त्या आपण भाषेतून व्यक्त करतो. मनात उठणारे विचारतरंग सुसभावना आर्शा आकांक्षा, सुख–दुःख, क्रोध या भावना त्याचे प्रकटीकरण ज्या माध्यमातून होते ते माध्यम म्हणजे भाषा होय.

लेखकाच्या मनात जेव्हा एखादी कलाकृती आकार घेत असते तेव्हा त्या आकारातून तिची अशी भाषा सिद्ध होत जाते. ग्रामीण कादंबरी जन्माला येताना ती ग्रामीण भाषेतून जन्माला येते. उदा.'धग' उद्धव शेळके, 'पाचोळा' रा.रं.बोराडे, जीवन अनुभवांशी निगडित भाषा असेल तर कलाकृती अधिक सजीव, सशक्त, परिणामकारक होऊ शकते. उदा. 'पाचोळा' 'धग' या कादंबऱ्या पृष्ठ संख्येने छोट्या असल्या तरी 'पाचोळा' तील उस्मानाबादी बोली व 'धग' मधील व हाडी बोली यामुळे या कादंबऱ्या आपले वेगळेपण टिकवून राहिल्या आहेत. ग्रामीण जीवनातील वास्तव उभे करताना लेखकाला त्या जीवनाचे अपरिहार्य असे जे भाग घटक असतात ते टाकता व टाळता येत नसल्याने ग्रामीण कादंबरीत ग्रामीण भाषेचा वापर केलेला असतो.

ग्रामीण कादंबरीतील भाषेचा विचार करताना कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा हे प्रदेश लक्षात घेणे आवश्यक आहेत. उदा.पश्चिम महाराष्ट्रातील बोलींचा प्रभाव असणाऱ्या कादंबऱ्या 'बळी', 'बनगरवाडी', 'गोतावळा', 'झोंबी'., 'बारी', ' माझा गाव', 'उलट चालिला प्रवाहो.' कोकणी बोलींचा प्रभाव असणाऱ्या कादंबऱ्या 'सराई'., 'आई आहे शेतात'. 'गारंबीचा बापू'. 'पडघवली', 'इंधन.' मराठवाड्यातील बोलींचा प्रभाव असणाऱ्या कादंबऱ्या 'पाचोळा', 'गांधारीचे डोळे', 'विषवृक्षाच्या मुळया' विदर्भातील बोलींचा प्रभाव असणाऱ्या कादंबऱ्या 'धग़' 'झेलझपाट'. 'भंडारवाडी' वगैरे.

## ग्रामीण कादंबरीतील स्त्रियांची भाषा

भाषा आणि समाज या दोन गोष्टी एकरूप झालेल्या असतात. समाजजीवनाचा ठसा त्या त्या भाषेवर उमटलेला असतो. भारतीय समाजव्यवस्थेत पुरूषप्रधान संस्कृतीचे विशेषतः ग्रामीण भागात तर ते जास्तच तीव्र असल्याने ग्रामीण स्त्रीचे जीवन आपल्या कुटुंबापुरतेच मर्यादित झालेले दिसते. ग्रामीण स्त्रीला सामाजिक चालीरिती अनिष्ट रूढी, परंपरा, सतत संघर्ष यांना तोंड द्यावे लागते. या सर्व गोष्टींशी झगडताना आपले कुटुंब, पती, मुलेबाळे एवढेच मर्यादित तिचे विश्व असते. स्त्रीच्या भाषेवर साहजिकच या जीवनाचा संस्कार स्वाभाविकपणे होत असतो.

स्त्री स्वभावतःच भावनाशील असते. आणि ही भावनाशीलता ग्रामीण स्त्रियांमध्ये जरा जास्तच असते. त्यामुळे तिचे प्रेम, राग, दुःख हे सर्व व्यक्त करण्याची तिची तऱ्हा उत्कट असते आणि या उत्कटतेचा परिणाम तिच्या भाषेवर होऊन तिची भाषा ठसकेबाज बनलेली असते. त्यासाठी विविध वाक्यप्रचार, वैशिष्ट्यपूर्ण शब्द, म्हणी, शिव्या यांचा वापर करीत असते. तिची भावना परिणामकारकपणे व्यक्त करण्याच्या आवेशातून ग्रामीण स्त्रीच्या भाषेचे वेगळेपण जाणवते. माया, ममता, प्रेम, त्याग स्वतः झिजण्याची वृत्तीकुटुंबाच्या हिताची काळजी, परमेश्वरावरील श्रद्धा रूढी परंपरावरील विश्वास, असूया, क्रोध, दयाबुद्धी या संमिश्र भावनांचा आविष्कार ग्रामीण कादंबरीतील स्त्रियांच्या भाषेतून दिसून येतो. प्रादेशिकतेनुसार त्या त्या प्रदेशातील स्त्रियांच्या भाषेतील शब्द, वाक्प्रचार, म्हणी, शिव्या इ.चे वेगळेपण जाणवते.

## ग्रामीण कादंबरीतील स्त्रियांच्या भाषेतील म्हणी वाक्प्रचार व शिव्या

ग्रामीण कादंबऱ्यामध्ये म्हणी व वाक्प्रचार यांच्या वापरातून ग्रामीण कादंबरीच्या संरचनेत एक प्रकारचा सजीव अनुभव साकार होतो.मराठीत असलेले वाक्प्रचार विविध स्वरूपाच्या म्हणी ह्याच मुळात समाजजीवनातील अंतरंग शोधण्यासाठी पूरक आणि पोषक ठरणाऱ्या आहेत. त्यातून विषय व आशय एका वाक्यात स्पष्ट करण्याची हातोटी लक्षणीय स्वरूपाची असते. त्यातील काही शब्दसंहती इतक्या समर्पक व आकर्षक असतात की त्या ताबडतोब लोकप्रिय होतात. इतकेच नव्हे तर त्या पिढयान् पिढया समाजातील व्यवहारात उपयोगात आणाव्या लागतात. त्यांनाच वाक्प्रचार व म्हणींचे स्वरूप प्राप्त होते. या म्हणी व वाक्प्रचार म्हणजे जीवनातील कडूगोड अनुभवातून सुखद

व दुःखद प्रसंगातून जाणवणारे जीवन असते.

LIBRARY AKOLE 422601

वाक्प्रचार व म्हणी यांच्या वापराने भाषेचे सौंदर्य वाढते. ती आवडीने वाचली ऐकली जाते. म्हणी व वाक्प्रचारांचा वापर मुळातच संवेदनाक्षम असणाऱ्या स्त्रियांच्या भाषेत प्रकर्षाने होतो. स्त्रीच्या अंतरंगीचे नाना भावनातरंग व्यक्त करायला ती म्हणी व वाक्प्रचारांचा आधार घेते. आपले बोलणे स्वतःच्या खास शैलीत बोलते.

ग्रामीण कादंबऱ्यांत स्त्रियांच्या भाषेत मोठया प्रमाणात शिव्यांचाही वापर केलेला दिसून येतो.

'शिवी म्हणजे अपशब्द, अभद्र वाक्य' अशा अर्थाने भावनावेगाचे अंतिम टोक शिव्यांच्या रूपाने गाठलेले असते. त्यात विशेषतः अनावर राग व्यक्त झालेला असतो. त्यामुळे शिव्यांमध्ये सामाजिक शिष्टाचार, नैतिकता यांना कोणत्याच प्रकारचे स्थान नसते. सामाजिक संस्काराच्या चाकोरीला शिव्यामुळे छेद जातो व मनावर प्रचंड आघात केला जातो. त्यामुळे म्हणी, वाक्प्रचारांप्रमाणेच साहित्याचे प्रांतात शिव्यांचेही महत्त्व लक्षात घ्यावे लागते.

**वाक्प्रचार**

'सुतावरून स्वर्गाला जातायसा' (साध्या गोष्टीवरून खूप मोठया गोष्टीकडे जाणे) शंकर पाटील. 'त्या मेल्याची कायतरी वाट लावा तवा माजा जीव थंडगार हुईल' (समाधान मिळणे) गो.नी.दांडेकर. 'आज या गोष्टीचा कंडका पडून जाऊ दे.' (एखाद्या गोष्टीचा निकाल लावणे) भंडारभोग –राजन गवस. 'लंकेच्या पार्वतीचं राज्य आलं' (दारिद्र्य वाट्याला येणे) झोंबी–आनंद यादव. 'पोट पिकत नाही म्हणून काय झालं' (मूल न होणे) झाडाझडती –विश्वास पाटील.

मराठवाड्यातील बोलीभाषेवर विशेषतः स्त्रियांच्या भाषेत उच्चारात उर्दू फारसी भाषांचा प्रभाव जाणवतो.

**म्हणी**

''पाण्यात राहून माशांशी वैर करून चालत नाही'' धुंगरू– शंकर पाटील.

''ज्येचं करावं बरं ते म्हणतं माझंच खरं'' धुंगरू– शंकर पाटील.

''कानी कत्राणी नि वाणीन झाली उताणी'' (अनावर हसू येणे.) कोकणातील स्त्रिया 'मेल्या' ही शिवी वापरताना दिसतात.

लबाड खुडक्या रांडा (अंडी न घालणाऱ्या कोंबड्यांसाठी) गधड्या, सटवी इ.या शिव्या खास कोकणी आहेत.

शिव्या

भवान्या (वणवण भटकणाऱ्या) कमीच्या वानाच्या (संस्कारहीन) अशा अर्थाने या शिव्यांचा वापर विदर्भात केला जातो.

घिरण्या, दोडा (द्वाड या अर्थी) सोदया (बदमाश,लुच्चा) लाजमोड्या अशा शिव्यातून रागाला वाट करून दिली जाते.

पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रियांच्या भाषेत प्रमाण भाषेचा वापर जास्त केला जातो. सीमावर्ती स्त्रियांच्या भाषेवर त्या त्या भाषेचा प्रभाव दिसून येतो. उदा.भंडारभोग चौंडक-राजन गवस यातील स्त्रियांची भाषा कन्नड भाषेकडे झुकणारी आहे. तर नगर मराठवाडा परिसरातील मराठीवर उर्दू फारसी भाषेचा प्रभाव जाणवतो.

एकूणच स्त्रिया आपल्या मनातील भावनेची उत्कटता प्रगट करताना अल्पाक्षरी भाषेचा वापर करतात. त्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण शब्द, वाक्यप्रचार, म्हणी यांचा यथायोग्य वापर करतात. त्यांच्या भाषेतून त्यांचे कुटुंब, शेती, मजुरी अशा मर्यादित विश्वातील आशय व्यक्त झालेला दिसतो. इतर स्त्रियांच्या तुलनेत कोकणी स्त्रियांची भाषा जास्त परखड आहे. आजच्या स्त्रीमुक्तीच्या पार्श्वभूमीवर साहित्यातील स्त्रियांच्या भाषेतील निर्भीडपणा बंडखोरपणा ग्रामीण कादंबऱ्यातील स्त्रियांच्या भाषेत अभावानेच दिसतो. राग व्यक्त करताना ही स्त्री शिव्या देताना दिसते. परंतु स्वत्त्व जाणीव अथवा स्वाभिमानासाठी ती अशी बंडखोरी करीत नाही. प्रेमळ आणि रागीट असे दोन स्त्री स्वभाव ग्रामीण कादंबरीतील भाषेतून प्रकट झालेले आहेत.

## दलित कादंबरीतील स्त्रियांची भाषा

डॉ.आंबेडकरांच्या विचारांनी भारलेल्या व आत्मभान जागृत झालेल्यांकडून साहित्यनिर्मिती होऊ लागली. मराठी दलित कादंबरीने दलित स्त्री जीवन सर्वांगाने दर्शविले असल्याचा पडताळा त्यातून येतो. मराठी ललित कादंबरीतील वास्तवाला आणि सामाजिकतेला नवा अर्थ दिला तो दलित कांदबरीने. खेड्यापाड्यातला शेतकरी, शहरी कामगार, शोषित, आदिवासी, अस्पृश्य आदींच्या समस्यांना दलित कादंबरीनेच जाणीवपूर्वक वाचा फोडली. समर्थपणे झुंजणारी स्त्री दलित कादंबरीने वाचकांपुढे आणली उद्याच्या आशादायक स्वप्नांचा व उज्ज्वल

भविष्याचा वेध घेणारी स्त्रीही चित्रित केली. मराठी कादंबरीतील प्रेम, प्रणय, अश्लीलता दूर सारून मराठी वाचकवर्गाला लैंगिक कामुक आकर्षणापासून मुक्त करून जे जग आजवर दुर्लक्षिलेले होते त्या जगाची नव्याने ओळख दलित कादंबरीने करून दिली.

दलित कादंबरीने स्त्रीच्या अंगविक्षेपापासून अवर्णनीय सौंदर्यापासून आणि कामोत्तेजक वर्णनापासून मराठी वाचकाला दूर नेऊन खरे स्त्री जीवन दर्शन घडविले. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही दलितांचा होणारा छळ, त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, राजसत्तेचा, धर्मसत्तेचा प्रभाव रूढींचे दडपण, स्पृश्यांचा दलितांविषयी असलेला आकसत्यातून दलितांचे होणारे खच्चीकरण इ.च्या चाकाखाली भरडून निघालेला हा दलित समाज आहे. अशा दलित समाजातील स्त्री 'स्त्री' म्हणून तर दलित आहेच परंतु दलित म्हणूनही अन्यायग्रस्त आहेच. अशा शोषित दलित स्त्रीला सहानुभूतीचा विषय बनविण्यापेक्षा तिला संघर्षप्रवण करण्याचे, तिला झुंजार बनविण्याचे, तिच्या हाती शस्त्र देण्याचे बळ अण्णाभाऊ साठेशंकरराव खरात, बाबुराव बागूल आदींनी केले आहे. तिच्यातील बंडखोरीसहित मराठी वाचकांपुढे आणून दलित कादंबरीकारांनी कादंबरीतील स्त्रीपात्राला एक नवे क्रांतीकारी रूप दिले आहे. स्त्रीचा त्याग प्रेम, वात्सल्य, कौटुंबिक समस्या, प्रेमविवाह, स्पृश्य, अस्पृश्य, प्रतारणा, मीलन आदीं विषयांभोवती फिरणाऱ्या कथानकाला कारागिरी देऊन दलित स्त्रीचे विकृत रूप भावीण, वेश्या, देवदासी, मुरळी आदींच्या बाबतीत साकारले गेले. तिच्या अंतरंगात धुमसणारा ज्वालामुखी वाचकांपुढे आणण्याचे कसब दलित कादंबरीने केले आहे.

मराठी दलित कादंबरीत झालेले स्त्रीचित्रण दलित स्त्रीच्या अपेक्षा उंचावणारे आहे. नीतिमत्तेच्या गोष्टी न करताही संस्कृतीनैतिकता जपणारे आहे. पोटासाठी कष्ट करावेत पण गुलामी लाचारी नसावी हा मूलमंत्र जपणारे आहे. कोणावर अन्याय करायचा नाही आणि कोणाचा अन्याय सहन करायचा नाही हे त्यांचे ब्रीद आहे. ही स्त्रीपात्रे कधी अगतिक होतात पण आपलं दु :ख उगाळत बसत नाहीत. कधी समाजव्यवस्थेशी तर कधी निसर्गाशी झगडून स्वतःचे स्त्रीपण उंचावून जातात. अण्णाभाऊंच्या नायिका. खरातांची गिरिजा.बागुलांची जानकी या अशाच स्वतःचे माणूसपण सिद्ध करीत उंच पातळीवर पोहोचलेल्या स्त्रिया आहेत. या स्त्रियांनी भोवतालच्या दलितेतर समाजाचे सुष्ट आणि दुष्ट तर सांगितलेच पण स्वतःच्या समाजाच्या काही उणिवा-जाणिवाही स्पष्ट केल्या

आहेत. अण्णाभाऊ साठे यांच्या नायिकांनी तर दलित स्त्रीजीवनाला आणि चित्रणालाही एक वैशिष्ट्यपूर्ण असा वेगळा आयाम दिला आहे.

या दलित कादंबऱ्यातील स्त्रियांची भाषा परिस्थितीनुरूप कधी हळवी बनते तर कधी रणरागिणीचा आवेश धारण करताना दिसते.

उदा. तुझ्या अब्रूची होळी करणाऱ्या जगाची होळी होईपर्यंत तू जग.

चित्रा –अण्णाभाऊ साठे

ती वेश्या नाही. ती माझ्याकडे आली आहे आणि माझ्या आईने पाठवली आहे. तिला मी वेश्या होऊ देणार नाही. यातून जनरलला ठणकावणाऱ्या सोनाचा निर्धार व्यक्त होतो.

फकिराला उपदेश करणारी त्याची आई म्हणते चांगली माणसं जोडावी. वाईटाची संगत करू नये. माणसाला मरान कधीतरी येनार पण मेल्यानंतर नाव चांगुलपन उरतं. यातून आईच्या मनातील मुलाबद्दलची माया व्यक्त होते. (फकिरा–साठे)

का म्हणं माज्या नवऱ्याला धरलं? आवं ती गोड्या तेलाची बाटली हाय? असं पोलिसांना तावातावानं सांगणारी खरातांची गिरिजा मला का झोपडपट्टीतली अशी तशी बाय समजतोस? अशा शब्दात स्वतःचा परिचय करून देते.

मी मी म्हणणाऱ्या मी पाणी पाजलंय? तू किस झाडका पत्ता आलास? असा प्रश्न विचारण्यास ती घाबरत नाही. (हातभट्टी– शंकरराव खरात) स्त्री जन्माचा तिरस्कार करणारी जानकी मला मोक्ष नको. मला फक्त कधीच स्त्रीजन्म नको आहे. अशा शब्दात मुरळीचे दुःख व्यक्त करते. (सूड– बाबुराव बागूल)

म्हणी

दलित कादंबरीतून जशा नव्या जाणिवा प्रकट झाल्या त्याप्रमाणे पारंपरिक बोलीप्रमाणे म्हणींचा वापर केला आहे.

उदा. डोळ्याआड मसाण पाड.

भट म्हणतो भटणीला अख्खा वरडा चटणीला यातून भाषेचा ठाशीवपणा मनावर ठसवला जातो.

काटं खायला व्हान नि गालिच्यावर चालायला पाय दलित कादंबरीला वेगवेगळ्या प्रांताची भाषा संस्कृती आणि लय लाभलेली आहे.

काही प्रतिमा

एकंदरीत, अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील नायक नायिका परिस्थितीला शरण न जाता, धैर्याने सामोरे जाणाऱ्या, संकटे हसतमुखाने झेलणाऱ्या आहेत. त्यांची स्त्रीपात्रे कमकुवत नाहीत. त्यांच्या सर्वच नायिका बंडखोर आहेत. एकीपेक्षा एक सरस आहेत. 'माणूस' म्हणून चुका करणाऱ्या, तोल सावरणाऱ्या, इतरांच्या माणुसकीपूर्ण व्यवहाराने स्वतःतील दुर्गुण सुधारू पाहणाऱ्या चुका सावरणाऱ्या आहेत. उदा.राधा, चित्रा, सोना, चंदन दुर्गा, वैजयंता वगैरे त्यांच्या काही नायिका शौर्याचे दुःखाचे पाईक म्हणून येतात. 'लेकीने दिल्या घरी वा व्यल्या घरी मरावे' हे त्यांना अजिबात मान्य नाही. त्या बंड करून उठतात उदा.आवडी, रत्ना, सुलभा, सई वगैरे.

असभ्यते विरुद्ध. अन्याय –अत्याचाराविरुद्ध त्या शस्त्र हाती घेतात. उदा. हरणा सगुणा चंद्रा या अब्रूसाठी, सूडासाठी हाती शस्त्र घेतात. त्यांच्या नायिका या गावकुसाबाहेर राहणाऱ्या अडाणी अशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांची भाषा ग्रामीण ढंगाची ठसकेदार व परखड आहे.

बाबुराव बागुल यांच्या 'सूड' मधील पुरुषस्पर्शाची शिसारी आलेली जानकी स्वतःचे स्त्रीत्व नाकारताना गुरूच्या निष्कपट, निष्पाप प्रेमामुळे बदलून जाते. अस्तित्वासाठी संघर्ष आणि समानतेसाठी झुंज या दोन गोष्टी तिच्या आक्रमक व जहाल भाषेतून व्यक्त झाले आहेत.

एकूणच दलित कादंबरीतून आलेले स्त्रीचित्रण हे दलित स्त्रीजीवनाचा आलेख साकारणारे आहे. मुळूमुळू रडणारी खाली मान घालून अन्याय सहन करणारी, नशिबाला दोष देणारी, दिल्या घरी मरावे हा मंत्र जपणारी अशी स्त्री दलित कादंबरीत आढळत नाही. त्यामुळे या स्त्रियांची भाषाही बंडखोर स्पष्ट आक्रमक मनातील भावनांना मुक्तपणे वाट करून देणारी आहे. कुटुंब, नातीगोती, समाज परंपरा. यांची बंधने झुगारून देणारी त्यांची भाषा आहे.

* * *

## चळवळ व ग्रामीण दलित कादंबरी

–प्रा. उमा उत्तम कांबळे

**ग्रामीण चळवळ व ग्रामीण कादंबरी**

ग्रामीण कादंबरीतून ग्रामीण कादंबरी लेखकांनी कोणते ग्रामीण प्रश्न मांडले त्या प्रश्नाचे गांभीर्य त्या प्रश्नामुळे ग्रामीण साहित्य चळवळ व परिवर्तन यातून ग्रामीण साहित्यात घडलेले बदल याविषयीचे संशोधन येथे करण्यात आले आहे. महात्मा फुले, महात्मा गांधी, विठ्ठल रामजी शिंदे, मुकुंदराव पाटील, कृष्णराव भालेकर यांनी ज्या प्रकारचे लेखन केले त्यातून कोणते प्रश्न मांडले आहेत, तीच परंपरा पुढे लेखकांनी आपल्या लेखनात आणली की नाही, त्या प्रेरणास्थानी असणाऱ्या लेखक समाजसुधारकांचे विचार तत्त्वज्ञान व त्यातून ग्रामीण साहित्य लेखन ग्रामीण चळवळ याचे चळवळीत व साहित्यात दिसणारे प्रतिबिंब कादंबरीतून येणाऱ्या विषयांच्या माध्यमातून शोधण्यात आले आहे. कारण मराठीतील १९६० नंतरच्या ग्रामीण साहित्य चळवळीतील साहित्यिकांच्या साहित्याचे वेगळेपण असा चिंतनात्मक व्रतस्थपणे चळवळीच्या साहित्याचे वेगळेपण सांगण्यासाठी कादंबरी लेखनातून ग्रामीण भागात उभी राहिलेली चळवळ व साहित्य यांचा अनुबंध शोधण्यात येणार आहे.

उद्धव शेळके यांची 'धग' ते नागनाथ कोत्तापल्ले यांची 'गांधारीचे डोळे' या सर्वच ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबरी लेखनामधून ग्रामीण जीवनाचे प्रदेशाचे, निसर्गाचे, कुटुंबातील नातेसंबंध, सुखदुःख, बारा बलुतेदारीमधील सर्व समाज यांच्या विषयीचे चिंतन, दुष्काळ, आत्महत्या, शेतीचे प्रश्न, यंत्रसंस्कृतीमुळे जगण्याची उमेद न ठेवता हताश होणारे नायक, परिवर्तनाचा स्वीकार न करता आपल्या आयुष्याची शोकांतिका करून घेणारे नायक, नायिका तौलनिक साहित्याची संकल्पना ग्रामीण आणि दलित कादंबरी संदर्भात दिसतात, प्रथा, परंपरा व अंधश्रद्धा, धार्मिकता येते. राष्ट्रीयत्वाची भूमिका विशिष्ट समाजातील प्रश्न व कार्यकर्ता याचे अत्यंत अपवादात्मक अशाच स्वरूपाचे चित्रण या कादंबरीतून आलेल्या प्रश्नावरून लक्षात येते. या लेखकांनी ग्रामीण साहित्यात अशा स्वरूपाचे मांडलेले प्रश्न व वास्तवातील ग्रामीण जीवनातील असणारे प्रश्न यामध्ये अत्यंत तफावत जाणवते. त्यामुळे चळवळ या शब्दाचा अर्थ लक्षात घेता, ग्रामीण जीवनातील चित्रण त्यातून निर्माण झालेले प्रश्न व प्रत्यक्ष चळवळ या मध्ये विसंगती आहे. ग्रामीण

साहित्याची चळवळ तर महात्मा फुले यांच्या कालखंडापुरतीच व त्यांच्या सत्यशोधक चळवळीच्या अनुयायांपर्यंतच मर्यादित राहिल्याचे लक्षात येते. त्यामुळे ग्रामीण जीवनातील प्रश्न या कादंबरीतील लेखक मांडतात, परंतु ग्रामीण चळवळीचे प्रश्न या कादंबरीतून आले असे संशोधनाने म्हणता येत नाही. केवळ ग्रामीण प्रदेशाचे चळवळ ही नावापुरते दिसते. प्रत्यक्ष येते ते ग्रामीण प्रदेशाचे वरवरचे जीवन असे म्हणावे लागते.

महात्मा फुले यांच्या काळापासून ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. १९६० पर्यंत जे ग्रामीण साहित्य निर्माण झाले ते रंजनपर होते. फडके, माडखोलकर यांच्या प्रेरणेने लिहिलेले, र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ यांचे साहित्य स्वरूप पाहता ते रंजनपर होते. याच काळात नवकथेतून प्रयोगशील, मनोविश्लेषणाच्या दृष्टिकोनातून नागर कथा कादंबरीतून आली. त्यामुळे कादंबरीमध्ये प्रस्थापित लेखनाचे संकेत, प्रस्थापित अभिरुची आणि ग्रामीण साहित्य निर्माण झाले. प्रस्थापित अभिरुचीशी, संघर्षाची भूमिका घेणारी चळवळ साहित्यात का निर्माण झाली नाही हा प्रश्न निर्माण होतो. कारण ग्रामीण साहित्यिकांच्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागातून जन्मलेली पिढी वाचन लेखन करू लागली होती. तिला आपला गाव, गावातील माणसे आणि त्यांचे वास्तव भोवतीच्या ग्रामीण साहित्यात कुठेच नाहीत हे लक्षात आले. ग्रामीण जीवन तर नव्हतेच ग्रामीण कृषिकेंद्रिततेचे स्वरूपही पूर्णत: बदलले होते. लेखकाला वाटले आपण ग्रामीण भागात अनुभवलेले वास्तवाचे स्वरूप उलगडून पाहावे. त्या वास्तवामागे असणाऱ्या वास्तवाचा शोध घ्यावा. यासाठी ग्रामीण साहित्यिकांनी वास्तवाच्या मागच्या वास्तवाचा व अस्सल ग्रामीण जीवनानुभवाला साहित्यात उतरविण्याच्या दृष्टीने ग्रामीण साहित्याला चळवळ म्हटले पण ती चळवळ साहित्यातून येणारे विषय, मांडलेले प्रश्न यातून नायकांनी परिवर्तनासंबंधी घेतलेली भूमिका यात कोठेही दिसत नाही.

कारण ज्या कृषिव्यवस्थेचा गौरव केला जातो तिचेच धिंडवडे निघतात याला कारणीभूत तत्कालीन परिस्थिती राहते. महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ, जमिनीचे छोटे छोटे तुकडे, सुशिक्षित बेकारी, बी-बियाणे, नवी खते, निवडणुका असे अनेक प्रश्न होते. या सगळ्या प्रश्नातून अस्वस्थ असणारे शेतकरी कुटुंबाच्या समस्या, ग्रामीण स्त्रियांचा संघर्ष, भूमिका, कौटुंबिक नातेसंबंध, उत्सव, जत्रा आर्थिक व सामाजिक प्रश्न. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागात होणारे परिवर्तन त्यातून गावातील बारा बलुतेदार व सर्वच वर्गातील लोकांची

माणूस म्हणून असणारी भूमिका बळीराजाच्या राज्याची संकल्पना जी अस्तित्वात असूनही का नष्ट झाली या सर्व प्रश्नांची उत्तरे व त्यातून चळवळ म्हणून ग्रामीण जीवनातील विविध जाती जमाती वर्ग, स्त्रिया यांचे प्रदेशाशी, गघमव्यवस्थेशी, नैसर्गिक आपत्तीशी असणारी झुंज त्यातून मनाला येणारी अवकळा व परिस्थितीची दाहकता या मराठी ग्रामीण कादंबरीतून चित्रित झालेली नाही कारण जीवनामध्ये जेव्हा जेव्हा परिवर्तन होते, असंतोष निर्माण होतो, विषम स्वरूपाचे वातावरण असते तेव्हा तेव्हा जगभरात चळवळी निर्माण झाल्या आहेत. पण त्याचे प्रतिबिंब मराठी ग्रामीण साहित्याच्या चळवळीत उमटलेले दिसत नाही.

खरे तर महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड लिहिले तेव्हापासूनच महाराष्ट्राच्या आणि भारताच्याही ग्रामीण भागात असंतोषाला प्रारंभ झाला होता. ग्रामीण भागात अनेक प्रश्न निर्माण झाले होते. त्याचे उद्रेकही भारताच्या ग्रामीण भागात झाला होता. १९ व्या शतकात ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांनी उठाव केले होते. 'डेक्कनरॉयटस्' या नावाने ते ओळखले जातात. प्रामुख्याने सावकारशाही विरुद्धचे हे उठाव होत होते. शेतकऱ्याचा आसूड निर्माण होण्याचे हेही एक कारण होते. संपूर्ण भारतभर असे उठाव झालेले दिसतात. उदा.१८७० मध्ये बंगालमध्ये शेतमजुरांचा, कुळांचा उठाव झाला. १८७५ मध्ये शेतकऱ्यांचा उठाव महाराष्ट्रात झाला. १९१७ मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेला चंपारण्याचा लढा आहे. १९२२ मध्ये मोपल्याचे बंड झाले. १९२३ पासून १९२८ पर्यंत आंध्रप्रदेश, गुजराथ (बार्डोली) मध्ये शेतकऱ्यांची आंदोलने झाली. यावरून १८७० ते भारताला स्वांतत्र्य मिळेपर्यंत ग्रामीण भागातील शेतकरी सतत लढत होते. आपला असंतोष ते प्रकट करत होते. स्वातंत्र्यानंतरही हे लढे चालूच होते. १९४७ ते १९४९ या काळात जमीनदार आणि कुळे यांच्यातील संघर्ष उत्तरप्रदेशात पेटल्याचे दिसते. १९४६-४७ मध्ये महाराष्ट्रातील वारल्यांचा लढाई महत्त्वाचा आहे. १९४६ ते १९५० या काळात बंगालमध्ये 'तिभागा' चळवळ झाली होती, ती कुळांचीच. याच काळात तेलंगणा आंदोलन झाले. याच कालावधीत त्रिपुरा व मणिपूर या भागातही शेतकरी आंदोलन पेटले होते. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांचे लढे झाले त्यातून वैरागचा गोळीबार झाला.

यावरून हे स्पष्ट होते की मागील सव्वाशे वर्षात कोणत्या ना कोणत्या कारणावरून ग्रामीण भागात लढे होत होते. यात कित्येक शेतकऱ्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे, परंतु या असंतोषाची नोंद मराठी ग्रामीण कादंबरीत

कुठेच सापडत नाही.

दुष्काळ जसे महाराष्ट्रातील चळवळीला तत्कालीन कारण म्हटले जाते. तसे शरद जोशी यांची शेतकरी संघटना यासंघटनेने १९७२-७३ च्या काळात शेतकरी संघटनेद्वारा शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी लढे केले व त्यातून त्यांनी भारत व इंडिया यामध्ये देश विभागला हेही सांगायला सुरूवात केली पण ग्रामीण साहित्यात अशा संघटनांची भूमिका येत नाही. त्यामुळे ग्रामीण साहित्याची चळवळ निर्माण होण्याची बीजे या महाराष्ट्रात होती पण लेखकांनी कादंबरीच्या अथवा ग्रामीणांच्या शेतात ती पेरलीच नाहीत त्यामुळे ग्रामीण साहित्याने केवळ ग्रामजीवन चित्रण करण्यावर भर दिला. चळवळीचे साहित्य म्हणून ग्रामीण कादंबरीची निर्मिती केली नाही.

ग्रामीण कादंबरीने कोणते विषय व कोणत्या प्रश्नांना स्थान दिले ते आपण यापूर्वी पाहिलेच आहे त्या संशोधनाने हे सिद्ध होते की येणारे विषय व प्रश्न ग्रामीणांचे वरवरचे म्हणजे कुटुंब, शेती, आई, राजकारण, सहकार, यंत्रयुग यांच्याशी निगडित राहतात. परंतु वास्तवाचा स्वीकार करून अस्सल वास्तविक पातळीवरचे जीवन कुठेच दिसत नाही. ते महात्मा फुले यांच्या अनुयायी व सत्यशोधक चळवळींपुरतेच मर्यादित राहते.

महात्मा फुले यांनी आपल्या लेखनातून इथल्या समाजव्यवस्थेची उत्पत्ती सांगून माणूस म्हणून असलेले हक्क कोणीही कधीही व कुठेही नाकारू शकत नाही. ही त्यांची भूमिका मांडली. विषय समाजव्यवस्थेच्या व श्रम विभागणीच्या मुळाशी असलेल्या हितसंबंधांवर प्रकाश टाकला. जातिभेद निराकरण, अस्पृश्यता निवारण आणि स्त्रीपुरुष समतेचा साक्षेपी पाठपुरावा केला. शिक्षण, प्रबोधन, कायदा, व्यवसाय मुक्ती, संघर्ष, सत्यधर्माचरण अशा मार्गांचा समताधिष्ठित समाजाच्या प्रतिष्ठापनेसाठी कसा वापर करता येईल याचा सूक्ष्म विचार केला, शोषणपर समाजरचना ज्या ब्राह्मणी व वर्णश्रेष्ठत्ववादी विचारप्रणालींवर आधारित होती तिला पर्यायी समतावादी शूद्र विचारप्रणालीची मांडणी केली. सत्यशोधकी जलशांच्या माध्यमातून पदे, लावण्या रचल्या गेल्या. त्यात सत्यशोधकी जलशांच्या माध्यमातून बघ्राण व मारवाडी स्त्रियांवर जी अभद्र टीका होती गेली तिचा जाहीर निषेध सत्यशोधकांनाही करावासा वाटला.
वरील सर्व गोष्टी प्रेरणास्थानी असताना त्याविषयीचे लेखन व विचार यातील कोणतीही भूमिका ग्रामीण साहित्याने स्वीकारली नसल्याचे साहित्यावरून सिद्ध होते. त्यामुळे ग्रामीण साहित्याने कादंबरी लेखनातून गघमाशी निगडित विषयांची

मांडणी केली असली तरी देखील ग्रामीण चळवळीचे साहित्य निर्माण केले नाही हेही लक्षात येते. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे ग्रामीण साहित्य उपलब्ध आहे परंतु ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे लेखन झालेच नाही हे स्पष्ट होते.

**दलित चळवळ व दलित कादंबरीलेखन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेळे मराठी साहित्यक्षेत्रात, स्वातंत्र्योत्तर कालखंडात दलित साहित्याचा प्रवाह सुरू झाला, त्याचवेळी चळवळीच्या कादंबरीकरांनी महत्त्वपूर्ण अशा कादंबऱ्यांचे लेखन केले. ज्यात चळवळ व दलित कादंबरी यांचा अन्योन्य संबंध असल्याचे पाहता येते. कारण चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या हे लक्षात आले होते की, वर्षानुवर्षांपासून दलितांना गुलाम बनविले आहे. ही गुलामगिरीची बंधने त्यांना दु:ख वेदना सहन करायला लावतात. त्यामुळे त्यांचा आवाज दाबून टाकतात. म्हणून दलितांना मुके बनवले आहे, त्यांच्या वाट्याला गावकुसाबाहेरचे अपमानित जगणे आले. अज्ञानी राहिलेल्या या समाजावर प्रस्थापित व्यवस्थेने अनन्वित अत्याचार केले. त्यामुळे दलितांना नरकमय यातना सोसाव्या लागल्या. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या चळवळीच्या कार्यकर्त्यांना स्वातंत्र्याचा प्रकाश मार्ग दाखवला. त्यांच्या प्रेरणेने अस्मिता जागृत झाली व दलित चळवळीतील लेखकांची मने वर्षानुवर्षेची गुलामगिरीची बंधने झुगारून लावण्यासाठी लेखन करू लागली. त्यातून दलितांच्या सामाजिक भावना, समाज वास्तवता, आत्मभान याविषयी कादंबरीलेखन सुरू झाले. या पिढीने परंपरागत कादंबरीपेक्षा वेगळे लेखन केले आहे. त्यामुळे चळवळीतून येणाऱ्या साहित्यातील विषय हे प्रस्थापित व्यवस्थेला झुगारून लावल्याचे होते. कारण चळवळीत राहणारा लेखक हा समाजवास्तवाचे भान ठेऊन दलित कादंबरीचे लेखन करत होता. हे लेखन करण्यामागचा उद्देश समाज जागृती, समाजपरिवर्तन, विषमतावादी व्यवस्थेला विरोध सर्वत्र स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवतावाद पसरवणे हे होते. ते साहित्यातून म्हणजेच कादंबरी लेखनातून मांडल्यामुळे दलित सामाजाला स्वअस्तित्वाचं भान येत गेले. व दलित माणसे आत्मशोध करू लागली. म्हणून चळवळ व दलित कादंबरी लेखन एकच असल्याचे लक्षात येते. जसे समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटते असे प्रस्थापितांनीच सांगितले व साहित्य हा समाजाचा आरसा आहे. परंतु परंपरागत साहित्यामधील कादंबरी, नाटक, आत्मकथने लेखनात या दलित समाजाचे चित्रण चुकूनसुद्धा झाल्याचे आढळत नसल्यामुळे आपली वेदना आपले दु:ख या

चळवळीच्या कार्यकर्त्यांनी मांडण्यास सुरूवात केली व चळवळीसाठी कविता, कथा, कादंबरी नाटक, आत्मकथने लेखन झाल्याचे लक्षात येते. मग अण्णा भाऊ साठे 'फकिरा' हा नायक का निर्माण करतात, कारण अण्णा भाऊ साठे ज्या लोकांसाठी साम्यवादी चळवळ उभी करत होते. त्या लोकांचे जगणे म्हणजे 'फकिरा' सारख्या व्यक्ती होत. लेखकाने 'फकिरा' नायक घडविला नाही तर तो समाज वास्तवात अस्तित्वात होता, त्याला कादंबरीच्या माध्यमातून जिवंत रूप देऊन वेदना विद्रोह मांडला आहे.

लेखक फकिरा, चोर, दरोडेखोर, लुटारू हे कलंक लावलेल्या प्रस्थापित व्यवस्थेचा नायक साकारतो. कारण वास्तवात फकिरा होता. कारण इथल्या प्रस्थापित व्यवस्थेला दलितांधील फकिरासारख्या कित्येकांना माणूस म्हणून जगण्याचे हक्कच नाकारले होते. म्हणून हे जगणे दलितांच्या वाट्याला आहे याचे कारण प्रस्थापित व्यवस्था म्हणून चळवळीचा लेखक फकिरा साकारतो, ते साहित्यिक मूल्य वाढवण्यासाठी अथवा प्रसिद्धीसाठी नव्हे तर याही समाजात परिवर्तन होणे गरजेचे आहे. त्यांना चोरी, दरोडेखोरी, अनीतिमान जगण्यापासून परावृत्त करून मूलभूत गरजा पुरवणे आवश्यक आहे. म्हणून चळवळ व दलित कादंबरी म्हणजे घरातीलच कर्त्या माणसाने आपल्या घरातील दुःख तेच संपूर्ण दलित समाजाचे आहे हे सांगितले आहे.

शंकरराव खरात 'हातभट्टी' मधून गिरीजाचे व्यक्तिमत्त्व साकार करतात. कारण दलित स्त्रीलाही अब्रू असते हे सांगणारे आहे व नानासारख्या विद्रोह करणारा नायक आहे. कारण दलित स्त्रीची अब्रू लुटण्याचा कोणी विचार जरी केला तरी त्या व्यवस्थेला संपविण्याचा विचार आहे. जुलमी व्यवस्थेला नकार देण्याची भूमिका नानाच्या रूपात समोर येते. चळवळीचाही माणूस अन्यायाविरुद्ध नेहमी लढतो म्हणून नानाने कोणाला तरी मारले म्हणून दुःख व्यक्त न करता अन्याय सहन करणार नाही, तो अन्याय नाना संपवतो ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची कृती तो करताना दिसतो.

बाबूराव बागूल 'सूड' जानकीच्या रूपातून दलित स्त्रीला अनुभवावी लागणारी वेदना, दुःख साकारतात. पण या दुःखाबरोबर पुरुषसत्ताक व्यवस्थेला विरोध करणारी नायिका साकार होणे हीच एक चळवळ आहे. कारण दलित समाजातील जानकी ही मुरळीची पोर असल्यामुळे या पुरुषीव्यवस्थेने व संस्कृतीने तिच्यावर अनन्वित अत्याचार केले. तिला शारीरिक, मानसिक यातना दिल्या आहेत. ती पुरुषी वर्चस्व नाकारताना सतत सूड घेण्याची भाषा बोलते, म्हणून

चळवळीच्या लेखकाने जानकी साकारली ती केवळ वेश्याव्यवसायावर प्रकाश टाकण्यासाठी नव्हे तर दलित समाज असो अथवा कोणत्याही मानवतावादी समाजात स्त्रीवर अन्याय अत्याचार होत असताना त्या व्यवस्थेला विरोध करणे, नकार देणे, विद्रोह करण्यासाठी व त्याचबरोबर मानवतावादी समाजरचना करण्यासाठी जानकी सर्व स्त्री वर्गाचे प्रातिनिधिक रूप आहे. ती एक प्रतिमा आहे. कारण स्त्री केवळ भोगवस्तू नाही. ती या समाजाला समज देत आहे. मग हे पूर्वी कधीच निर्माण झाले नाही. कारण चळवळीचा लेखक स्वत:विषयी न लिहिता समाजाचे दु:ख, समाजाचे प्रश्न हेच या संपूर्ण मानवतावादी जीवन जगणाऱ्यांचे प्रश्न मांडतो व चळवळीच्या माध्यमातून आपले लेखन करतो.

केशव मेश्राम आपल्या धगधगत्या आयुष्याची हकिकत, या 'हकिकत' कादंबरीतून सांगणारा चळवळीचा कार्यकर्ता आहे. हे सांगणे म्हणजेच चळवळीचा उद्देश सफल करणे आहे. कारण हकिकत मध्ये वाईट, अन्याय, अत्याचार, गुलामी, अज्ञान, दारिद्र्य ही सर्व रूपे स्वत:चीच असल्याची तो हकिकत मधून सांगतो आहे. कारण हकिकतही चळवळीच्या माणसाने भोगलेल्या वेदनांचा प्रत्यय आहे.

जटायूच्या माध्यमातून मेश्रामांना दलित समाजाला अज्ञान, अंधश्रद्धा, गुलामगिरीतून बाहेर काढायचे आहे हा चळवळीचा उद्देश येथे साध्य होतो. कारण चळवळ ही अनिष्ठ रूढी परंपरांना विरोध करण्यासाठीच आहे. माणुसकीच्या नावाला कलंक बनू पाहणाऱ्या व्यवस्थेविरोधी आवाज उठवण्याऱ्या अभिमानाला पोलीस पकडून नेतात. ही दलित समाजाची वास्तव घटना आहे. कारण अघोरी कृत्याला नकार देणारा अभिमान हा दलित चळवळीतील कार्यकर्ते जे विज्ञाननिष्ठ दृष्टी स्वीकारून अनिष्ठ प्रथा मोडू पाहतात, त्यांचे प्रातिनिधिक रूप आहे. कारण हे दुर्दैवाने दलितांच्याच वाट्याला आले, पण ते सहन न करता नकार, विद्रोहाच्या माध्यमातून मानवतेसाठी चळवळीचा लेखक लेखन करताना दिसतो. कारण या चळवळीच्या लेखकाने हे केले नसते तर दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रकाशाची दाखवलेली वाट विझून गेली असती, म्हणून कादंबरीच्या माध्यमातून चळवळीचा उद्देश साध्य होताना दिसतो.

अशोक व्हटकर यांच्या 'मेलेलं पाणी' या कादंबरीतून ढोर जमातीचे चित्रण आहे. उच्चवर्णीयांच्या विषमतावादी विकृत व्यवस्थेळे अनेकांची उद्ध्वस्त झालेली आयुष्ये दिसतात. यातील यल्लप्पा या नायकाला पिण्याच्या पाण्यासाठी करावा लागणारा संघर्ष येतो. हा एकट्या यल्लप्पाचा प्रश्न नसून अस्पृश्य म्हणून

दलितांना वर्षानुवर्षे पाणवठ्यावर पाणी न दिल्यामुळे जे अपमानाचे अवहेलनात्मक जीवन जगावे लागले याचे चित्रण येते. 'मेलेलं पाणी' ही कादंबरी दलित समाजाचे वास्तव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे अस्पृश्यांसाठी खुले केलेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाची आठवण करून देणारी आहे. चळवळीच्या कार्यकर्त्याने मेलेलं पाणी म्हटले, कारण वर्षानुवर्षे भूक, तहान, याने व्याकूळ झालेला व उद्ध्वस्त झालेला दलित समाज आहे. म्हणून वास्तव जीवनातील घटनाप्रसंग कादंबरीचा विषय म्हणून व्हटकर निवडतात. इथे चळवळ व साहित्य यातील संबंध स्पष्ट होतो कारण चळवळ साहित्यात साधन बनून लेखक वापरत आहेत. नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' या कादंबरीतून मांग समाजाची यातना आहे. त्यात भूक, शोषण, अत्याचार आहे. 'वाळंबी' ही नायिका असून भुकेची विवंचना आहे. गावगाड्याने यांना केवळ अपमानित जीवन अनुभवाला दिले. मांग समाजातील आर्थिक प्रश्न 'रघू'च्या शिक्षणाची फीच्या निमित्ताने येतो. कौशी ही वाळंबीची मुलगी. तिची सासू अतोनात छळ करते. धनगराचा प्रकाश गिरणीचं धान मागायला गेल्यावर अतिप्रसंग करतो. या कादंबरीतील तीनही घटना संवेदनशील माणसाला चळवळ करायला लावणारे आहेत. कारण दारिद्र्यात, शारीरिक, मानसिक, शोषण या समाजाला वर्षानुवर्षे अनुभवास आले आहे. म्हणून दलित चळवळीच्या लेखकाने आपल्या समाजाचे प्रश्न मांडले आहेत. चळवळ व साहित्य वेगळे नाही कारण दलितांच्याच वाट्याला हे आले ही व्यवस्था बदलायला हवी व नवे परिवर्तन घडवून आणणे व विषमतावादी समाजरचना करण्यासाठी चळवळीचा लेखक साहित्याला हत्यार बनवून आपले लेखन करतो आहे.

**ग्रामीण कादंबरीचे निष्कर्ष :**

१) ग्रामीण कादंबरीनेही ग्रामीण कथेप्रमाणे ग्रामीण जीवनावर भाष्य केले आहे.

२) ग्रामीण चळवळीची कादंबरी ग्रामीणांशी निगडित नाही केवळ ग्रामीण साहित्याची चळवळ हे नाव मेते.

३) ग्रामीण कादंबरीतून ग्रामीण संघर्ष, प्रश्न येत नाहीत, त्मामुळे ग्रामीण साहित्य व चळवळ या दोन्ही विसंगती जाणवते.

४) ग्रामीण कादंबरीतून बदललेले जीवनमान उंचावलेले दिसते. खेडी सुधारलेली दिसतात. सुधारित खेडी, उपनगराला जोडलेली दिसतात. त्यामुळे ग्रामीण चळवळीचे स्वरूप स्पष्ट होत नाही.

५) वास्तववादी ग्रामीण साहित्य निर्माण करण्याची जबाबदारी ग्रामीण साहित्यिक पुढच्या पिढीवर ढकलून देताना दिसतात.

६) ग्रामीण कादंबरीमध्ये परंपरा व प्रेरणेच्या दृष्टीने चळवळीचा विचार व बांधिलकी आलेली नाही.

७) ग्रामीण कादंबरीचे प्रेरणास्थान असणारे महात्मा फुले प्रेरणा हेतू, उद्देशांच्या दृष्टीने ग्रामीण साहित्य निर्माण झाली नाही.

८) ग्रामीण चळवळ न होता केवळ ग्रामीण जीवनाचे चित्रण ग्रामीण कादंबरीतून मांडले गेले आहे.

## दलित कादंबरीचे निष्कर्ष :

८) ग्रामीण च

१) दलित कादंबरीचा प्रवाह सक्षमपणे आलेला नाही, परंतु दलितांचे वास्तव जीवन चित्रण मांडण्यात मराठी दलित कादंबरी यशस्वी झाली आहे.

२) दलित चळवळीची कादंबरी वेदना, विद्रोह, प्रस्थापित, परंपरागत समाजव्यवस्थेला नकार व मानव्यतेची प्रतिष्ठापना आहे.

३) दलितांना सहन कराव्मा लागणाऱ्या नरकमय यातना यांचे चित्रण दलित कादंबरीतून होते.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित मने जागृत झाली. त्यातूनच लादलेल्या दास्यविरुद्ध, अस्मिता जागृत झालेली मने, कादंबरीच्या माध्ममातून आवाज उठवतात.

५) दलित कादंबरीतून शैक्षणिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक प्रश्न समोर येतात.

६) दलित कादंबरीचे उगमस्थान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतिकारी तत्त्वज्ञान आहे.

७) दलित कादंबरीने स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, मानवतावादी नवे परिवर्तनवादी जग निर्माण करण्याचा संदेश दलित कादंबरी देते.

* * *

# ग्रामीण साहित्य चळवळीत कादंबरीचे योगदान

-प्रा. संदीप चपटे

मला असे वाटते की, १९६० पासून ग्रामीण साहित्याची चळवळ मूळ धरू लागली. शेती आजवर मध्यमवर्गीय साहित्याचे उपांग म्हणून वाढणाऱ्या ग्रामीण साहित्याला या चळवळीने एक नवी दृष्टी आणि अस्मिता दिली. त्यामुळे भाषा, सामाजिक दर्जा, साहित्यपरंपरा इत्यादींविषयी १९५० पूर्वी न्यूनगंड बाळगणारे ग्रामीण साहित्य १९६० नंतर एका अभिनिवेशाने वाटचाल करू लागले. भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, अरुण साधू यांनी सामाजिक कादंबरीचा अर्थपूर्ण आविष्कार घडविला. दलित साहित्य चळवळीप्रमाणे ग्रामीण साहित्य चळवळीलाही तात्त्विक अधिष्ठान देण्याचे प्रयत्न झाले. गोतावळा, पाचोळा या ग्रामीण कादंबऱ्यांतील सामाकितेचा उठाव देणारी, नवी आकलने मांडणारी समीक्षा लेखन होऊ लागले.

परंतू १९६० नंतर ग्रामीण व्यावसायिक, भटक्या जमाती, देवदासी, दलित, कष्टकरी, भूमिहीन शेतमजूर यांच्याकडे साहित्यिकांशी नजर वळली आणि त्याचे चित्रण कादंबरी-वाङ्मयातील समर्थपणे होऊ लागले. दु:ख, द्रारिद्रय यांनी पिचलेल्या तळागाळातल्या माणसाचे कण्हणे त्यात ऐकू येऊ लागले. ऐंशीनंतरच्या लेखनात हा सूर जास्त भेदक आणि तीव्र झाला. या कादंबरीत राजकीय नेते, सहकार क्षेत्रातील उच्चपदस्थ, शासकीय अधिकारी यांचा वावर वाढला. दुष्काळ शेतकऱ्यांची आंदोलने, राजकारणाचे बदलते रंग, निवडणुकांच्या चित्तरकथा, नवजागृत समाजाची शिक्षणाची ओढ, नवशिक्षिकांच्या मनाची घुसमट, बेकारी, सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचार, प्रशासकीय यंत्रणेचे अंतरंग अशा कितीतरी गोष्टींचे यथार्थ चित्रण ग्रामीण कादंबरीतून होताना दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण जीवन ढवळून काढणाऱ्या स्थित्यंतराचा वस्तुनिष्ठ व समग्र आलेख एकोणविसशे साठ व त्यांनंतरच्या ग्रामीण कादंबरीत मोठ्या प्रमाणात गखला गेला.

आधुनिकीकरणापूर्वीचे स्वस्थ, परंपरागत स्थितिशील गघमजीवन एकोणविसशे साठ पूर्वीच्या कादंबरीत दिसते. आधुनिकीकरण, शुद्धीकरण, यांत्रिकता यांचा परंपरागत ग्रामजीवनावर जो आघात झाला त्याचे चित्रण साठ

ते ऐंशीमधील ग्रामीण कादंबरीत दिसते. त्यात कधी वृत्तीगांभीर्य आहे, तर कधी झुरणीची भावविवश मन:स्थिती आहे. संक्रमणात जे जुने नष्ट होत चालले आहे त्यावर या कादंबरीकारांचा अधिक भर आहे. साठनंतरच्या ग्रामीण कादंबरीत जे जे नष्ट करता येत आहे त्या विध्वंसक शक्तींच्या चित्रणावर अधिक भर आहे. बदलणाऱ्या परिस्थितीचे चटके बसलेल्या नव्या पिढीच्या लेखकांनी बदल घडवू पाहणाऱ्या शक्तीचे अंतर्भेदी दर्शन घडविले. परंपरागत जीवनरहाटींचा ग्रास घेणाऱ्या नव्या संस्कृतीचे उघडेनागडे स्वरूप स्पष्ट करून दाखविण्यावर त्यांनी भर दिला. मराठी ग्रामीण कादंबरी वर्गीय संघर्षाच्या आणि संक्रमणकारी शक्तींचा वेध घेण्यात गुंतली. १९५० ते १९६० पर्यंतच्या काळात महाराष्ट्रात नवनव्या घटना घडत होत्या. जागतिक घटितांचे परिणाम जिल्हा-तालुक्यापर्यंत आणि गावाशिवारापर्यंत धडकत होते. स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतरचे परिणाम आणि सत्ता प्राप्तीसाठीच्या ओंगळ स्पर्धा जीवघेण्या ठरत होत्या. गधमपंचायती, जिल्हा परिषदा, सहकारी चळवळी आणि निवडणूकप्रधान राजकारण ग्राम-इलाख्यात शिरले. लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, शिक्षण याचबरोबर राष्ट्रीय नियोजनाचे स्वरूप प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जाणवू लागले. यंत्रयुगाचे आगमन, महागाई या नव्या समस्यांनी माणूस भयचकित झाला होता. भाषावार प्रांतरचना, कूळकायदे - कसेल त्याची जमीन, धरणे, कॅनॉल, पुलाची बांधकामे, नवे रस्ते, तालुका पातळीवरील महाविद्यालयाच्या स्थापना आदी विकासातील क्रिया-प्रतिक्रिया घडत होत्या. नवीन बी-बियाणे, खते, नवी औजारे, मशागतीच्या नवीन पद्धती, संकरित गुराढोरांची पैदास, कृषि विद्यापीठे, वृत्तपत्रे, रेडिओ, सिनेमा, नाट्यगृहे या सगळयांचा जीवनमानावर होणारा परिणाम जाणवत होता. अडल्या नडलेल्यांची मुलं चार अक्षरं शिकून चाकरमानी बनत होती. अलगदपणे खेड्यातून घरादारातून निसटून शहरात स्थिरावत होती. वाचण्या-लिहिण्याची कला आपले विचार मांडण्याचा प्रयत्न करीत होती. द. मा. मिरासदार यांची साहित्यदृष्टी परंपरेला जुळवून घेत आपले अनुभव व्यक्त करीत होती. व्यंकटेश माडगूळकर यांच्या लेखणीचे रसायन काहीसे वेगळे होते. प्रयोगापेक्षाही प्रामाणिक अनुभवाचे व्यास देणेपण लेखणीचा धर्म सांगणारे होते. माणदेशी माणसं आणि बनगरवाडीतला दुष्काळ आजही एक वेगळा अनुभव देऊन जातो.

स्वातंत्र्योत्तर काळात मानवनिर्मित दुष्काळाचे आगमन नित्याचेच झालेले दिसते. या देशाचे दारिद्रय कोरडवाहूत पिकते आहे. तसे शहरी भागातील

झोपडपट्टीचे दारिद्र्य हे ग्रामीण विभागातील अनेकविध शोषणाचा परिणाम म्हणूनच सांगता येणारे आहे. शेतीच्या शोषणातून झालेल्या औद्योगिकीकरणाचा पहिला फटका स्वाभाविकपणे शेतीवर कष्ट करणाऱ्या समाजाला आणि ग्राम-इलाख्यालाच बसणारा आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच राजकीय श्रेष्ठत्वाचा नवा आविष्कार औद्योगिक पट्ट्यातच एकवटू लागला. पोट हाती घेऊन शेतकरी शहराकडे जाऊ लागले. नवशिक्षित शेती व्यवसाय सोडून कामगार म्हणून मिळेल त्या शहरातील झोपडपट्टात प्रपंच थाटू लागले. ग्रामीण भागात यंत्रयुगाच्या परिणामाचे आणि बदलत्या जीवनामानाच्या रेट्यातून उद्‌गारित होणाऱ्या प्रश्नांचे भान काही अपवादात्मक ग्रामीण लेखकांच्या ध्यानी आले तसेच त्या त्या समस्या त्यांच्या या प्रत्यक्ष अनुभवाचाच भाग बनलेल्या होत्या. त्यात प्रामुख्याने डॉ. आनंद यादव, रा. रं. बोराडे, उद्धव शेळके, चंद्रकुमार नलगे, द. ता. भासले, इ. या नावाचा जाणीवपूर्वक उल्लेख करावा लागतो. गोतावळा, पाचोळा, धग इ. या मधून ग्रामीण भागाची आणि ग्रामीण मानसिकतेची सूक्ष्म स्थित्यंतरे त्यांनी नोंदविली.

हिंदू समाजव्यवस्थेने पोसलेली जातीयता आणि त्यातून नाकारालेले माणूसपण यासाठीचा संघर्ष वरपासून खालपर्यंत संघटित होत होता. नकार मानवता आणि विद्रोह या सूत्रांचा अंगीकार करून दलित साहित्याची बांधणीही या काळात होऊ लागली. बाबुराव बागूल, नारायण सुर्वे, दया पवार, नामदेव ढसाळ आदी लेखकांच्या आत्माविष्काराने साहित्यनिर्मिती होऊ लागली. यातील कार्यकर्ते हेच दलित साहित्यिक म्हणून नावारूपाला आले. साहित्यिक आणि कार्यकर्ता असे स्वरूप दलित साहित्याच्या चळवळीने सिद्ध केले आणि मराठी साहित्याला व समीक्षकांना नवे आव्हान दिले. त्यामुळे समाजातील शोषित आणि उपेक्षितांना भान आले. आत्मविश्वास प्राप्त होऊन शिक्षणातून आलेल्या नव्या दृष्टीने आपल्या अस्तित्वाची, जगण्याची पारंपरिकता कळून आली.

१९७५-८० या काळात व नंतर महाराष्ट्रात एकूणच चळवळीच्या साहित्यासंबंधी भूमिका मांडणारी आणि लेखन करणारी नवी पिढी उदयास आलेली दिसते. आज ग्रामीण शोषणाचे अनेकविध पैलू अनुभवातून, अभ्यासातून, सहचारी विचारातून जाणवत-भावत चाललेले आहेत. ग्राम-विद्रोहाची एक नवी मांडणी त्यातून प्रल्गभपणाने मुखरीत व्हावी. अनुभवाची विविधता, भाषेचे वेगळेपण आणि निरनिराळ्या स्तरातून व्यक्त होणारे आशय आज साहित्यातून

दिसत आहेत. शेतकरी आंदोलने, शैक्षणिक धोरणाने केलेला विश्वासघात, राजकारणाने झालेले गुन्हेगारीकरण, बेसुमार दारिद्रय आणि बेकारी, स्त्री-शोषणासंबंधीची अत्याचारी मानसिकता, विकार, विकृती आणि वासना चाळविण्याचा धंदेवाईकपणा इ. प्रकारची अनेक आव्हाने नव्या ग्रामीण लेखकांच्या समोर उभी आहेत. ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान व्यक्तिसापेक्ष स्वरूपाचे नाही, तर सामान्यांच्या शोषणाचे हत्यार त्या त्या काळात चालविले त्या त्या काळातील सामान्य कष्टकऱ्यांच्या बाजूने उभे राहण्याचे तत्त्वज्ञान ग्रामीण साहित्याच्या चळवळीला महत्त्वाचे वाटत आले आहे.

* * *

# दलित-ग्रामीण साहित्य चळवळ एक तुलनात्मक विचार

-प्रा.डॉ.जया जितेंद्र कदम

## तुलनात्मक अभ्यासाचे महत्त्व

आज तुलनात्मक साहित्याभ्यासा'ला बरेच महत्त्व प्राप्त झालेले दिसते. तुलनात्मक साहित्य म्हणजे 'कम्पॅरिटिव्ह लिटरेचर' ही साहित्याभ्यासाची नव्याने विकसित झालेली आंतरविद्याशाखीय पद्धती आहे. आपल्याकडे दोन भाषांतील साहित्याची तुलना ही एक पद्धती म्हणून प्रतिष्ठित झालेली दिसते. उदा. दलित व निग्रो साहित्य, मराठी व संस्कृत साहित्य, कानडी व मराठी साहित्य. अशी एका भाषेतील साहित्याची दुसऱ्या भाषेतील साहित्याशी, त्यांच्यातील तुलनात्मक बळ लक्षात घेऊन, तुलना केली जाते. परंतु याचा अर्थ असा होत नाही की, एकाच भाषेतील वेगवेगळ्या साहित्याचा अभ्यास तुलनेसाठी वर्ज्य आहे. त्या दोन घटकांमध्ये साम्य आणि भेद सारख्याच सामर्थ्यानिशी येत असतील तर एका भाषेतील भिन्न प्रवाहांतील साहित्याचीही तुलना करता येते. आपल्याकडे दलित व ग्रामीण साहित्याच्या संदर्भात असे दिसते की, या दोन प्रवाहांतील साहित्य निर्माण करणाऱ्या समाजघटकांची सामाजिक, सांस्कृतिक स्थितीगती भिन्न आहे आणि हे भिन्नत्व त्यांच्या साहित्यामधून स्वाभाविकपणेच आविष्कृत होताना दिसते. त्यामुळे जाणिवेच्या दृष्टिने या दोन प्रवाहांतील साहित्यांमध्ये वेगळेपण जाणवते. परंतु या दोन्ही प्रवाहांना समान तत्त्वात आणणारे अनेक दुवेही आढळतात.

र.बा. मंचरकर 'तुलनात्मक अभ्यासा'च्या संदर्भात म्हणतात की, ''तुलनात्मक अभ्यास एकभाषिक साहित्याचाही होऊ शकतो. एकाच साहित्यकृतीची दुसऱ्या साहित्यकृतीशी, एका लेखकाची दुसऱ्या लेखकाशी, एका वाङ्मयप्रकाराची दुसऱ्या वाङ्मयप्रकाराशी, एका प्रवाहाची दुसऱ्या प्रवाहाशी तुलना करावी लागते.'' मंचरकरांच्या या विधानावरून असे दिसते की, केवळ दोन वेगळ्या भाषांमधील साहित्याचीच तुलना केली जाते असे नाही तर एकाच भाषेतील दोन महत्त्वाच्या साहित्यधारातील साहित्याचीही तुलना होऊ शकते. कारण ''तुलना केवळ विरोध किंवा भेद यावर आधारलेली नसते. साम्य हाही तुलनेचा विचारणीय घटक असतो.'' तुलनेमध्ये प्रामुख्याने भिन्नतेमधील साम्य आणि साम्यातील भिन्नता यांचा शोध घेतला जातो. परंतु केवळ साम्य-भेदाची

नोंद घेऊनच आपल्याला थांबता येत नाही तर ज्या घटकांची तुलना केली जाणार आहे; त्या दोन्ही घटकांवर एकमेकांच्या विचारांचा, प्रवृत्तींचा काही परिणाम होतो का? याचा शोध घेऊन निष्कर्ष काढावा लागतो. कारण असा पद्धतशीरपणे घेतलेला शोध आपल्याला निश्चित अशा निर्णयापर्यंत घेऊन जातो. यातूनच साहित्यातील वास्तवाचा, सत्याचा आणि सौंदर्याचा बोध होऊ शकतो. आस्वादक समीक्षेमध्ये अंतःस्फूर्त प्रतिक्रियेवर विसंबून राहावे लागल्याने तिच्यामध्ये व्यक्तिसापेक्षता येऊ शकते. तुलनात्मक साहित्याभ्यासामध्ये मात्र साहित्याचा अभ्यास तटस्थपणे व वस्तुनिष्ठपणे करता येतो. या दोन्ही प्रवाहांची तुलना करताना अनेक अभ्यासकांनी यांच्यात मूलतःच सामाजिक, सांस्कृतिक पातळीवर भेद असल्याचे स्पष्ट केले आहे. काहींनी यांच्यातील साम्य आणि भेद लक्षात घेऊन त्यांना सीमारेषेवर ठेवले आहे, तर काही अभ्यासकांनी यांच्यातील साम्याला महत्त्व दिलेले दिसते. एकंदरीत, दलित व ग्रामीण प्रवाहातील साहित्यातील साम्य-भेदांविषयी अनेक मान्यवर अभ्यासकांनी चर्चा केली आहे. काहींनी या दोन्ही प्रवाहांमध्ये साम्य असल्याचे सांगितले आहे. काहींनी हे दोन्ही प्रवाह मूलतःच भिन्न असल्याचे सांगितले, तर काही अभ्यासकांनी हे दोन्ही प्रवाह सीमारेषेवरचे असल्याचे स्पष्ट केलेले दिसते. मराठी साहित्य हे अनेक वाङ्मयप्रवाहांनी समृद्ध झालेले आहे. त्यापैकी दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य हे दोन सशक्त प्रवाह आहेत. या दोन्ही प्रवाहांतील साहित्यामागे प्रामुख्याने चळवळीचे पाठबळ होते. त्यामुळे दलित आणि ग्रामीण कांदबरीचा तुलनात्मक अभ्यास करण्यापूर्वी या प्रवाहांतील चळवळींचा थोडक्यात परामर्श घेणे आवश्यक आहे. दलित साहित्य चळवळ दलित साहित्य हे दलित चळवळीतून उदयाला आले आहे. दलित चळवळ आणि साहित्य यांचा परस्परसंबध स्पष्ट करताना डॉ. कृष्णा किरवले यांनी म्हटले आहे की, ''दलित चळवळ आणि साहित्य यांचे अभिन्नत्व असून परस्परनिर्मितीवरही त्यांचा प्रभाव दृढ झालेला दिसतो.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या आत्मसन्मानासाठी सुरू केलेल्या चळवळीचा विस्तार स्वातंत्र्योत्तर काळात विविध अंगानी झालेला दिसतो. वास्तविक पाहता डॉ. बाबासाहेबांपूर्वी सुद्धा संत चोखामेळा, संत रोहिदास हे साहित्यातून दलितांचे दुःख मांडत होते. परंतु त्यांची कृती वैयक्तिक स्वरूपाची होती. दलित बहुजनांची चळवळ म. फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्यापासून सुरू झाली आणि तिला व्यापक वैचारिक व कृतिप्रवण भान डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांनीच दिले. त्यामुळेच दलित साहित्याचा मुख्य प्रेरणास्रोत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. या साहित्य चळवळीचा हेतू माणसाला बंधमुक्त करण्याचा होता. ही चळवळ सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ आहे. ही वर्गवाद आणि वर्णवादाच्या विरोधातली आहे. परंतु या चळवळीचा पहिला टप्पा हा वर्णवादाच्या विरोधातला आहे. वर्णवादाचे पूर्ण उच्चाटन झाल्याशिवाय वर्गलढ्यास सुरुवातच करता येणार नाही. मग वर्गवाद की वर्णवाद? या संभ्रमात दलित साहित्यिकांमध्ये मतभेद होऊ लागले. तर काही साहित्यिक हे दोन्हीही संघर्ष एकात एक मिसळून लढत असतात, असे मानू लागले. खरे तर, डॉ.बाबासाहेबांनी परिवर्तनाच्या चळवळीत 'दलित' ही संज्ञा अतिशय व्यापक अर्थाने वापरली होती. त्यांनी रिपब्लिकन पार्टीची स्थापना करण्याचा मनोदय व्यक्त केला तेव्हा तिच्यामध्ये अनूसूचित जाती-जमाती, नवबौद्ध, अन्य मागासवर्गीय, श्रमिक, भूमिहीन शेतमजूर, स्त्रिया इत्यादींचा समावेश करावा असे म्हटलेले आहे. परंतु आज आपण अशी परिस्थिती अनुभवत आहोत की, दलितांची चळवळ म्हणजे पूर्वास्पृश्य महार आणि सध्याच्या बौद्धांची चळवळ. या जातींव्यतिरिक्त इतर बऱ्याचशा जाती, जमाती आंबेडकरी चळवळीचा फक्त फायदा घेतात. पण या व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. याला काही मोजके अपवादही असू शकतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित साहित्य चळवळीला गतिशीलता प्राप्त करून दिली. परंपरागत रूढींना, धर्मग्रंथांना नाकारून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता यांचा स्वीकार केला. पण त्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. या संघर्षाचे प्रतिबिंब दलित साहित्यात पाहायला मिळते. डॉ. आनंद यादव यांनी या चळवळीचे महत्त्व सांगताना म्हटले की, "ही चळवळ साहित्याला सर्वांगीण समाजपरिवर्तनाचे हत्यार (प्रभावी साधन) मानणारी जीवनवादी चळवळ होती." मराठी साहित्याला अपरिचित असणारा आशय आणि दाहक जीवनानुभव विद्रोही भावनेनिशी परखडपणे अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य चळवळीकडूनच दलित साहित्याला मिळाले. जीवनाचा गर्भितार्थ सांगणाऱ्या आणि प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या या चळवळीला आंबेडकरांनंतर मात्र तोलामोलाचा नेता मिळाला नाही. सत्तास्पर्धेच्या राजकारणामुळे फाटाफूट निर्माण झाली. दलितांमधील अंतर्गत गट वेगवेगळ्या भूमिका घेऊ लागले. परिणामी दलित चळवळीला विस्कळित स्वरूप प्राप्त झाले. आजही आपल्याला डॉ. बाबासाहेबांचे नाव

घेऊन कितीतरी संघटना आपण बाबासाहेबांचे कार्य पुढे नेत आहोत असा दावा करतात. परंतु खरोखरच आंबेडकरांना अभिप्रेत असणारे परिवर्तनाचे विचार घेऊन या संघटना पुढे चालल्या आहेत की, केवळ स्वत:च्या फायद्याचा विचार केला जातो? याचे उत्तर बऱ्याच अंशी होकारात्मक द्यावे लागते.

या संदर्भात डॉ. कृष्णा किरवले यांनी दलित चळवळीतील द्वंद्व स्पष्ट करताना म्हटले आहे की, "महाराष्ट्रात दलित चळवळ आज स्थिर झालेली असली तरी अलीकडे वाढलेल्या अंतर्गत कलहामुळे या चळवळीच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक आघाड्यांवर ग्रहण लागलेले दिसून येत आहेसत्तेसाठी आणि खुर्चीसाठी दलित नेतृत्वात गटबाजीने गाठलेला कळस सर्वांस ज्ञात आहेच पण धार्मिक क्षेत्रात व सांस्कृतिक क्षेत्रात त्याचे पडसाद उमटलेले दिसून येतात."

दलित चळवळीविषयीचे हे वास्तव लक्षात घेऊन तिचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी अनेक दलित साहित्यिकांनी प्रयत्न केले. या संदर्भात डॉ.योगेंद्र मेश्राम यांचे विधानही महत्त्वपूर्ण वाटते. ते दलित चळवळीचे महत्त्व स्पष्ट करताना म्हणतात की, "दलितांची वाङ्मयीन चळवळ मात्र तिच्यात शिरलेल्या काही प्रमादासहसुद्धा समाजाभिमुख राहिली आहे. एवढेच नव्हे, तर त्यांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा साऱ्या चळवळींमागची प्रेरणा एक प्रभावी साधन आहे. तसेच ह्या चळवळीला गतिशील ठेवणारी, तिला लढ्याचे पथ दर्शवणारी आणि पथदिग्दर्शनाचे संस्कार करणारी समाजजीवनाची एक सामर्थ्यवान तात्त्विक, वैचारिक सामग्रीही ती असल्याने विशेष महत्त्व पावली आहे. अशी ती दलित साहित्याची चळवळ आपल्या प्रेरणांमुळे ध्येयमार्गापासून भरकटून जाताना शिथिल होता कामा नये." अर्थात, मेश्राम यांनी दलितांच्या साहित्यात समाजपरिवर्तनाचे फार मोठे सामर्थ्य असल्याचे सांगितले आहे आणि ते सर्वमान्यही आहे. समाजातील विषमता दूर करून माणसाला 'माणूस' म्हणून दर्जा देण्याचे श्रेय दलित चळवळीला आहे. दलित चळवळीने सर्व प्रकारच्या व्यवस्थेशी बंड करून विद्रोह पुकारलेला होता. साहित्यानेही ही भूमिका घेतली. म्हणजेच, दलित साहित्याला चळवळीपासूनच प्रेरणा मिळाली.

एकंदरीत, चळवळ कोणतीही असली तरी तिला स्वत:चे असे विशिष्ट ध्येय, धोरण, उद्दिष्ट आणि अंतिम लक्ष्य असते. दलित चळवळीने सुद्धा अंतिम लक्ष्य ठेवले आहे, ते म्हणजे समाजपरिवर्तनाचे; समाजातील विषमता दूर करून

माणसाला 'माणूस' म्हणून दर्जा देण्याचे. 'एक माणूस–एक मूल्य' हा सिद्धांत डॉ. बाबासाहेबांनी परिवर्तनाच्या चळवळीत महत्त्वाचा मानला. तोच सिद्धांत दलित साहित्यानेही प्रमाण मानला. ग्रामीण साहित्य चळवळ ग्रामीण साहित्याची चळवळ साधारणपणे १९७७ च्या सुमारास अस्तित्वात आली. ही चळवळ सुरू झाल्यानंतर तिच्यावर अनेक आरोप केले गेले. परंतु ते आरोप चुकीचे आहेत, याचे समर्थन डॉ.आनंद यादव, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले या ग्रामीण चळवळीतील अभ्यासकांनी केले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते, ''दलित साहित्याला शह देण्याच्या हेतूने ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. हे खरे नाही जीवन संघर्षाचे, परिवर्तनाचे संदर्भ असल्याशिवाय जशी वाङ्मयीन चळवळ उभी राहू शकत नाही. तसेच केवळ अनुकरणामधून आणि शह देण्याच्या हेतूमधूनही कुठलीही वाङ्मयीन चळवळ उभी राहू शकत नाही. उलट दलित साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्याची चळवळ समान उद्देशाने निघाल्या आहेत, असे म्हणावे लागते.'' कोत्तापल्ले यांच्या वरील विधानातून असे प्रत्ययाला येते की, दलित आणि ग्रामीण या दोन्ही चळवळी एकमेकांच्या विरोधात उभारलेल्या नाहीत, एवढेच झाले की दलित चळवळ अगोदर निर्माण झाली आणि त्यानंतर ग्रामीण चळवळ उदयाला आली. ग्रामीण साहित्य चळवळीच्या संदर्भात जे आक्षेप घेतले गेले किंवा या संदर्भात मराठी साहित्य व्यवहारामध्ये वेळोवेळी जे प्रश्न उपस्थित करण्यात आले; त्यांचा समग्र विचार डॉ. आनंद यादव यांनी केलेला आहे. उपस्थित केलेल्या प्रश्नांना, आक्षेपांना त्यांनी उत्तरे दिली. तसेच, आधुनिक ग्रामीण साहित्य चळवळीची भूमिकाही स्पष्ट केली. ''आधुनिक ग्रामीण साहित्याची ही चळवळ एकूण मराठी साहित्यालाच वर्तमान वास्तवाचे व्यापक आणि कलात्मक रूप देऊ पाहणारी, मराठी समाजातील एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना आहे. आजवरच्या मराठी साहित्याची संकुचित बैठक बदलून नवी व्यापक बैठक तयार करू पाहणारी ही चळवळ आहे. साहित्यनिर्मितीला पाश्चात्त्य सन्मुख शहरी केंद्रातून मुक्त करून देशी 'मराठी संवेदनाच्या' ग्रामीण भागात व तेथील साधारणाच्या मनात तिचे केंद्र निर्माण करावयाचे आहे.'' याचाच अर्थ असा की, डॉ.आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्य चळवळ मराठी साहित्याचाच एक भाग मानली. मराठी साहित्यविश्व व्यापणारी ही एक महत्त्वपूर्ण चळवळ उभारावी लागली असल्याचेच ते वेळोवेळी सांगत गेले.

'ग्रामीण साहित्य' हा मराठी साहित्याचाच एक भाग असूनही ग्रामीण

माणसाचे चित्रण अत्यल्प प्रमाणात आणि रोमँण्टिक किस्सेवजा स्वरूपात केले गेले. त्यामुळे समग्र मराठी माणसाचे प्रश्न किंवा समस्या मराठी साहित्यातून येत नव्हत्या. केवळ शहरातील पांढरपेशा मध्यमवर्गीय जीवनाचे प्रतिबिंब मराठी साहित्यातून प्रत्ययाला येत असे. ज्या भारत देशात जवळ जवळ ७० टक्के 'माणूस' खेड्यावर राहतो. उरलेला शहरात राहणारा ३० टक्के माणूस खेड्यावर पोसतो. त्या खेड्याचे, ग्रामजीवनाचे चित्रण धूसर स्वरूपात आविष्कृत होत असेल तर मराठी साहित्य कुठेतरी एकाच ठिकाणी त्याच-त्याच विषयावर घुटमळते, कल्पनेवर जगते, स्वप्नरंजनात अडकते असे वाटणे साहजिकच आहे. अशा या वाटण्यातूनच ग्रामीण साहित्य चळवळीची निर्मिती झाली.

या चळवळीने आधुनिक ग्रामीण लेखकांना प्रबोधन, मार्गदर्शन करणे हीच मुख्य भूमिका ठेवली होती. ''ग्रामीण चळवळ नव्याने जागृत झालेल्या समाजाच्या खालच्या स्तरातील साहित्यिक तरुणांपुढे नव्या समाज-मांडणीचे प्रश्न, समस्या, स्थिती-गती मांडते. त्या तरुणाला त्याच्या स्वत्वाचे भान देते, त्याचे व्यक्तिमत्त्व या दिशेने घडविण्याचा प्रयत्न करते. अशा नव्या युगाला सामोऱ्या जाणाऱ्या व्यक्तिमत्त्वातून त्याचे साहित्य आकाराला यावे, अषी अपेक्षा ग्रामीण चळवळ करते.'' असे डॉ. आनंद यादव ग्रामीण चळवळीच्या उदयासंदर्भात त्यांचे विचार व्यक्त करताना दिसतात. एकंदरीत ग्रामीण चळवळीने १९७० दरम्यानच्या नवशिक्षित, उच्चशिक्षित अशा ग्रामीण पिढीला जाणीवपूर्वक आत्मभान देण्याचे महत्त्वाचे काम केले. पण विशम समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची भूमिका या चळवळीने घेतली नाही. एकूणच, ग्रामीण चळवळीनंतर ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदलले. ते नव्या जाणिवा घेऊन आले. ग्रामीणांच्या वाट्याला दुःख, दैन्य, दारिद्र्य येते. याचे वास्तव चित्रण चळवळीपूर्वीच्या साहित्यातून येते. तर असे दुःख, दैन्य, दारिद्र्य ग्रामीणांच्या वाट्याला का येते; याचा शोध चळवळीनंतरचे साहित्य घेऊ लागले. त्यामुळेच अगोदरच्या ग्रामीण साहित्यापेक्षा चळवळीनंतरच्या ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदललेले दिसते. त्यात अधिक लढाऊपणा, बंडखोरपणा आलेला दिसतो. ''केवळ ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणे येथे अभिप्रेत नाही तर या 'वास्तवामागचे वास्तव' चित्रित करणे हा आता हेतू झाला आहे. म्हणूनच ग्रामीण चळवळीनंतर येणारे वाङ्मय अनेक अर्थाने वेगळे झालेले आहे.'' हे डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे विचार योग्य असल्याचे प्रतीत होते. कारण ग्रामीणं साहित्य चळवळीनंतर नव्या जाणिवेने लेखन करणारे

अनेक लेखक निर्माण झाले. केवळ वास्तवाचे लेखन न करता वास्तवामागचे वास्तव शोधण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. दलित साहित्य चळवळीने प्रस्थापित विशम समाजरचनेविरुद्ध विद्रोह पुकारून 'माणूस' असण्याचे आत्मभान दिले; तर ग्रामीण साहित्य चळवळीने कृषि-संस्कृतीत वाढलेल्या माणसांच्या सुखदु:खांना वाचा फोडून संरजामशाही विरोधी संघर्ष करण्यासाठी ग्रामीण संवेदनशीलतेच्या अंगाने नवी जाणीव दिली. त्यामुळे समाजपरिवर्तनासाठी निर्माण झालेल्या आणि नव्या जाणिवेसहित निर्माण झालेल्या या दोन्ही प्रवाहांमधील साहित्य चळवळी स्वागतशील अशाच आहेत. दलित व ग्रामीण लेखिकांचे कथावाङ्मय या चळवळींनंतरचे असल्याने त्यांच्या कथासाहित्यावर चळवळीचा काही परिणाम झाला का? हे पाहण्यासाठी या चळवळींचे स्वरूप आणि त्या पाठीमागच्या भूमिकेचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. वास्तविक पाहता, चळवळी या वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. उदा.धार्मिक, राजकीय, सामाजिक वगैरे. परंतु ''साहित्याची किंवा साहित्यिकांची जेव्हा चळवळ बनते. तेव्हा तिला सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात एक विशेष अर्थमूल्य व संदर्भ प्राप्त होतो.'' दलित व ग्रामीण साहित्य चळवळ ही विशिष्ट भूमिका, विशिष्ट प्रयोजन घेऊनच अस्तित्वात आलेली आहे. आजच्या मराठी साहित्याला अनुभवाचा कसदारपणा बहाल करणारे जे विविध प्रवाह निर्माण झाले, त्यात दलित साहित्याच्या खालोखाल ग्रामीण साहित्याचाही उल्लेख केला जातो. दलित व ग्रामीण साहित्याचे तुलनात्मक स्वरूप मांडताना रा. ग. जाधव यांनी जी व्यापक भूमिका मांडली, ती महत्त्वपूर्ण ठरते. ते म्हणतात की, ''दलितता व ग्रामीणता या दोन चाकांवर आज उद्याच्या मराठी साहित्य-समीक्षेचा रथ धावत राहिला, तर केशवसुतांना अभिप्रेत असलेला 'साकल्याचा प्रदेश' मराठीला पादाक्रांत करता येईल.'' त्यांच्या विधानातून त्यांनी या दोन्ही प्रवाहांमधील साहित्यातून अभिव्यक्त होणाऱ्या सामर्थ्याला महत्त्व दिले आहे. नव्या जाणिवांची बीजे पेरणाऱ्या या दोन्ही प्रवाहांतील साहित्यातून येणारे जीवनाशय वेगळ्या जाणिवा घेऊन येणारे आहेत.

* * *

# निवडक मराठी कादंबरीतील राजकारण संदर्भ आणि सहकार चळवळीचे प्रतिबिंब – एक विवेचन अभ्यास

–प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी

मराठी साहित्यातील विशेषतः कादंबऱ्यातील राजकीय विषयांचा अभ्यास करताना व राजकारणाचे सहकार चळवळीचे विविधांगी चित्रण करणे व त्या अनुषंगाने ग्रामीण राजकारणाचा शोध घेणे या लेखाच्या संदर्भात उद्‌बोधक ठरते. ग्रामीण जीवन, सहकार, राजकारण, शिक्षण संस्था आणि सेझ यांचा समग्रतेने अभ्यास करता येतो. इ. स. २००७ साली प्रसिद्ध झालेली शंकर सखाराम यांची कादंबरी हे उत्तम उदा. होय २००६ मध्ये सरकारने सेझ ची घोषणा केली. आणि बघता बघता ग्रामीण जनतेच्या पिकाऊ शेतजमिनी खाजगी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट कंपन्यांच्या (विकासाच्या नावाखाली) ताब्यात जाऊ लागला. त्या विरुद्ध आंदोलनेही झाली. एकूणच जागतिकीकरणामुळे सहकाराचे खाजगीकरण होताना. ग्रामीण जीवनाला नवे आया प्राप्त झाले. नवे गुंठेमंत्री निर्माण झाले. सहकारला गळचेपी लागली. राजकारण शिक्षण, सहकार आणि बाजारपेठा, तसेच ग्रामीण लोकांचे राहणीमान पैसा केंद्रित झाले. भ्रष्टाचाराला पालवी फुटली या विषयी लिहिताना शिक्षण क्षेत्रही काळवंडले. 'सर्वप्रश्न अनिवार्य' व 'निशाणी डावा अंगठा' ह्या रमेश इंगळे यांचा कादंबरीत ग्रामीण भागात परीक्षांमध्ये केली जाणारी कॉपी आणि त्या निमित्ताने चालणारे बरे वाईट प्रकारचे राजकारण अपप्रवृत्ती हा या कादंबऱ्यांचा विषय असून यातून शिक्षणव्यवस्थेवर जळजळीत वास्तव वास्तवतेने भाष्य केले. भ्रष्ट शिक्षण व्यवस्थेवर या कादंबऱ्या नेमकेपणाने बोट ठेवतात. 'निशाणी डावा अंगठा' या कादंबरीला महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार मॅजेस्टिक प्रकाशनाचा जयवंत दळवी पुरस्कार तसेच सर्व प्रश्न अनिवार्य ह्या कादंबरीलाही रमेश इंगळे अभादकर यांना मराठी साहित्य विश्वातील महत्त्वाचा विभावरी पाटील अनुकूल पुरस्कार प्राप्त झाल्याची नोंद आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्वीकारलेली लोकशाही प्रणाली. सत्तेचे विक्रेंद्रीकरण, निवडणूक शिक्षणाचा प्रसार शासकीय योजना, यासह सहकारी चळवळ, माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार, यांचा प्रभाव समजून घेता येतो. राजकीय सत्ता स्पर्धा त्यामुळे ढवळून गेलेले ग्रामीण जीवन, सहकार चळवळ, साखर कारखाने यांनी बदललेले आर्थिक परिमाण, गावागावातील जातिधर्माचे राजकारण,

यात्रा-जत्रा, क्षण समारंभ, भाऊबंदकी, भ्रष्टाचार, यांचेही सक्षम व समर्थचित्र ग्रामीण कादंबऱ्यांचा विषय झाला. आजही जागतिकीकरणाचा प्रभावाने शेतीमालासाठीची काही ग्रामीण लोकांचे बदललेले राहणीमान, जीवनशैली, तरुण पिढीचा राजकारणातील सहभाग, राजकीय गुन्हेगारी, सहकार कायदे, आरक्षण, यामुळेही संपूर्ण ग्रामीण जीवन बदलत पहायला मिळते. राजकारणामुळे सहकार व समाज व्यवस्थेत झालेले स्थित्यंतर ग्रामीण कादंबरीचा केंद्रबिंदू होताना बदलते अर्थकारण समाजव्यवस्था सेझचा प्रभाव देखील निरीक्षणातून नोंदवता येतो. विशेषतः दिल्लीचे राजकारण, ग्रामीण स्थानिक राजकारण, प्रादेशिक, राज्यस्तरीय राजकीय दिशा कृषिकेंद्रित अर्थव्यवस्थेला, विकास प्रगती विषयक धोरणाला कसे लागू झाले याचेही प्रतिबिंब विविध ग्रामीण कादंबरीत पडले आहे.

लेखक वासुदेव मुलाटे यांच्या ग्रामीण सहकार चळवळींवर आधारित 'कादंबरीत सहकार' क्षेत्रातील भ्रष्टाचारावर नेमके बोट ठेवलेले वाचायला मिळते. त्या कादंबरीचे नाव 'विषवृक्षाच्या मुळ्या' असे असून या वास्तववादी कादंबरीत सहकाराचे अधःपतन व त्यास लागलेली विषारी फळे यामुळे एकूणच समाजजीवन कसे किडत आहे. याचे चित्रण आलेले आहे. विदर्भातील झाडीपट्टी भागातील कवी रमानंद उर्फ हिरामण लांजे यांच्या 'आठवणीतील गावकूस' (२०१२) या कादंबरीतही मुख्यतः सामाजिक सलोखा साधताना मागासवर्गातील तरुण मंडळी आणि सवर्ण समाजातील पुढारी यांतील संघर्ष व त्यातून होणारा ताण तणाव चित्रित केल्याचे वाचायला मिळते.

लेखक अशोक कौतिक कोळी यांचा 'कुंधा' (२०११ इ.स.) या कादंबरीचा विषय आहे. गावातील झगडा, तंटा, निवडणुकीतील राजकारण यासह जागतिकीकरणाने ग्रामीण जीवन संस्कृतीची बिघडलेली लय, शोषण संस्कृतीला बळी पडलेली माणसे यातून कादंबरी घडत गेली आहे. 'शेती' आणि 'शेतकरी' यांच्या भविष्यावर प्रश्न निर्माण होताना सत्ताकरणाशी झुंजणारा शेतकरी याचे ठसठशीत उठावदार चित्रण आले आहे. सत्तास्पर्धेतील झुठी वृत्तीमुळे ग्रामीण जीवनाला सुरूंग लागतो. ग्रामव्यवस्थाच बरबाद होते. याचा अनुभव हा या कादंबरीत वाचायला मिळतो. विशेषतः देवराम बापूंचा कापसासंबंधीचा आक्रोश गावातील राजकारण, निवडणुका, यातून माणसा माणसांचा झालेला विचका रसिक वाचकांना अस्वस्थ करून झोडतो. शोषण करणारा भागवत शेठ, परिस्थितीपुढे असहाय्य झालेला दगा मास्तर, वतनदार

सरपंच, व त्यांचेशी संबंधित शासकीय पदाधिकारी यांचेतील सत्ता संघर्ष सत्तांधता, सायजाबाईची खंबीर व्यक्तिरेखा, मात्र आधाबाई, कविता, अलका या स्त्रियांना नसणारे स्वातंत्र्य या कादंबरीत अधोरेखित झाले आहे. परंपरावादी मधुराबाई गावरहाटीत अडकून पडते हे सर्व तावडी भाषेत रेखाटले आहे.

साहित्यिक कादंबरीकार राजन गवस यांच्या 'धिंगाणा' आणि 'कळप' या कादंबऱ्यांमध्येही राजकारणाचे प्रतिबिंब पडले असून त्यांच्याच 'तणकट' कादंबरीचा विषय ग्रामीण जीवनातील मूल्यहीन राजकारणातील गती मांडली आहे. सहकारी संस्था वाढविताना त्यांना लागलेली भ्रष्टाचाराची कीड याकडेही लक्ष वेधले. गावातील भ्रष्ट राजकारणाची दिशा आणि दशा त्यांच्या 'तणकट' कादंबरीत वाचायला मिळताना राजकारणातील गट तट दलित सवर्ण समाज संघर्षही दाखविला. वर्तमान राजकाराणातील मुख्य भ्रष्टतेवर ही कादंबरी समर्थपणे भाष्य करते. या कादंबरीतील बाळासाहेब शेडवाळे सारखी माणसे सहकारी संस्थांमधून स्वार्थाने बरबटलेली दाखविली. सहकार चळवळ आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या रुपाने राजकारणाची गंगा खेड्यापाड्यात पोहोचली तरी राजकारण, भ्रष्टाचार यांमुळेही ग्रामीण जीवन पोखरले गेले. त्याचे प्रतिबिंब साहित्यात शोधता येते.

रवींद्र शोभणे यांच्या 'पडघम' २००७ कादंबरीत १९७५ ची अणीबाणी हा विषय असून एकछत्री काँग्रेसचा सत्तेला अणीबाणीच्या घटनेने शह दिला. त्यानंतर सर्वच क्षेत्रात घडून आलेले स्थित्यंतर पर्यायाने सर्वसामान्य माणूस आपल्या जगण्यातून तुटत गेला. या आशयावर ही कादंबरी बेतली आहे.

त्यापुर्वी श्री. ना. पेंडसे यांच्या 'एल्गार' (१९४९) कादंबरीत कोकणातील साखरपेडी गावातील राजकीय घटनांमुळे शांततामय गाव जिवनात संघर्षाची ठिणगी पडते व कादंबरी भडक घटनांच्या आहारी जाते. असे दाखवले आहे. तसेच उपरोक्ष रवींद्र शोभणे यांची कोंडी (१९९२) कादंबरी प्रामुख्याने एक तरुण युवकाच्या मनातील राजकीय पातळीवरील माणसाविषयीचा द्वेष वर्णिलेला आहे. गावातील निवडणुकीत हिंसाही या कादंबरीत वाचायला मिळते.

याशिवाय आंबेडकरी चळवळीच्या संदर्भात निवडक दलित कादंबरी लेखनाचा परामर्श घेताना महाडच्या सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, पुणेकरात धर्मांतर व त्यांमुळे दलितांना आलेले आत्मभान राजकीय जाणिवा हा या कादंबरीचा विषय आहे. तसेच मनुस्मृतीचे दहन. यासह दुसऱ्या बाजूने डॉ. बाबासाहेबांचे राजकीय विचार व कार्य यांचेही दलित कादंबरीत प्रतिबिंब पडले

आहे. मुख्य म्हणजे धर्मांतर. धर्मांतरानंतरचे प्रश्न, आरक्षण, न्यायहक्क, स्वातंत्र्य समता, बंधुता, मूल्य, बौद्ध धर्माच्या विचारांचे तत्त्वांचे पालन असे विविधांगी चित्रण करणाऱ्या कादंबरीची निर्मिती लेखन झाले असून त्यामध्ये धर्मांतर जातिव्यवस्था विषमता, वर्णवाद, वर्गवाद, याबाबतचे विश्लेषण आंबेडकरी दृष्टीकोनातून चित्रित झाले आहे. युगविधान (१९८३) बा. स. हाटे, महाडचा सत्याग्रह. 'इस्फोट' भीमसेन देठे (धर्मांतरानंतरचे प्रश्न) 'निष्ठा' (१९८१) (अ.श्री.लोखंडे आंबेडकरी चळवळ) 'बलिदान' (ज.वि.पवार) दलित मुक्ती लढा), 'श्राद्ध' (उत्तम कांबळे धर्मांतरानंतरचे प्रश्न) कार्यकर्ता (मुरलीधर जाधव – आंबेडकरी चळवळ) या शिवाय योगेंद्र मेश्राम (माझा गाव कुठाय? – धर्मांतरानंतरचे प्रश्न व दलित सवर्ण संघर्ष) बाबुराव गायकवाड 'आग' (नामांतर चळवळ) अशा विविध कादंबरी लेखनाचा निर्देश करता येतो.

स्वातंत्रोत्तर काळात दलित समाजात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय दृष्टीने झालेले, बदल कादंबरीत डोकावतात. आंबेडकरी चळवळीशी संबंधीत कादंबऱ्यांचा उल्लेख करताना अस्पृश्यतेचे चित्रण 'मेलेलं पाणी' (अशोक व्हटकर १८८२ पाण्याची समस्या) 'आग' (बाबुराव गायकवाड – बाबुराव सरकुंडे १९९६, नामांतराचा प्रश्न), 'ईस्कोट' (भिमसेन देठे धर्मांतराची पार्श्वभूमी) 'कार्यकर्ता' (मुरलीधर जाधव – १९८४), 'कुस्ती'(विजय शिरसाट – १९८२) 'कोंडी' (बाबुराव बागूल – २०००) 'काळगर्भ' (विजय शिरसाठ – १९९०) या चार कादंबऱ्यात आंबेडकरी विचारांचे आत्मभान प्राप्त झालेले तरुण कार्यकर्ते आहेत. याशिवाय 'कृष्णपक्ष' (पांडुरंग कदम – १९९१) 'राघववेळ' (नामदेव कांबळे – १९९७) 'उन सावली' (नामदेव कांबळे – १९९७), 'साजरंग' (नामदेव कांबळे – १९९९) 'आग' (बाबुराव सरकुंडे – १९९६), जातीला जात वैरी (ना. म. शिंदे – १९९०), या कादंबऱ्याचे नायकही आंबेडकरी विचारांचे प्रतिनिधिक ठरतात. धर्मांतरानंतरचे बदलते दलित जीवन – त्यातील बरे वाईट अनुभव दलित लेखकांनी घेतलेले दिसतात. चळवळीतील संघटन – सामान्य दलित कार्यकर्त्यांची झालेली फरफट स्वार्थी, मतलबी, तत्वहीन, दलित नेतृत्त्व, दलित जिवनाला प्राप्त झालेले मध्यमवर्गीय पांढरपेशेचे स्वरूप या गोष्टी देखील दलित लेखकांनी दाखविल्या. यापैकी राघव वेळ कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार, तसेच इतरही दलित आंबेडकरी विषयांवरील कादंबऱ्यांना शासकीय व विविध पुरस्कार मिळाले असल्याची नोंद आहे. धर्मांतर, जातिवर्ग वर्णवाद, वर्गवाद यांनाही स्थान मिळालेल्या काही कादंबऱ्या वाचायला मिळतील.

* * *

# दलित आणि ग्रामीण साहित्य: लेखिकांच्या कादंबरीचा अभाव कारणमीमांसा

-डॉ.प्रतिमा इंगोले

ग्रामीण भागात स्त्रियांचे शिक्षक आणि आर्थिक स्वावलंबन अभावानेच आढळते. त्यामुळे सहाजिकच लेखनही कमी आढळते. कारण मनव्या स्त्रीचे शिक्षण, लेखन आणि आर्थिक स्वावलंबन हेच तीन महत्त्वाचे मंत्र आहेत.फ आता यावर असा युक्तिवाद करता येईल की, खेड्यातील स्त्री अपरिहार्यपणे शेतात काम करते. तेव्हा तिला मजुरी मिळते. तेव्हा ती आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली पण याला काही अर्थ नाही कारण ती कमाई करते पण स्वतःच्या कमाईचा विनियोग स्वतःच्या मताप्रमाणे करू शकत नाही. याला कारणे काहीही असोत. पुरुषप्रधान व्यवस्था वा तिने स्वीकारलेली कुटुंबाची जबाबदारी वा तिचे मातृहृदय पण ती स्वतःपेक्षा इतरांचा विचार जास्त करते आणि माणूस म्हणून पूर्ण मुक्त होऊ शकत नाही. त्यामुळेच फक्त स्वतःपुरता विचार करीत नाही.

आजकाल तळागाळात शिक्षण पोहचले तेव्हा असा दुसरा महत्त्वाचा युक्तिवाद करता येईल की, ग्रामीण भागातील मुलीही आता शिकलेल्या आहेत. पण यातही तथ्य नाही. कारण मुलींचे शिक्षण आजही निदान ग्रामीण भागातून मुलांच्या तुलनेत दुय्यमच मानले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रीला बौद्धिक प्रगल्भता अभावानेच प्राप्त होते. बौद्धिक प्रगल्भतेसाठी शिक्षणच आवश्यक असते आणि त्यातही मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल असे शिक्षण आवश्यक असते. अर्थातच शिक्षणातून असा व्यक्तिमत्त्व विकास साधला जावा हा उदात्त हेतू अभावानेच आढळतो. कारण समाज जसा पुरुषप्रधान आहे. तशीच शिक्षण व्यवस्थाही पुरुषप्रधान आहे. कारण कोणत्याही शिक्षणमंडळात अथवा अभ्यासक्रम समितीवर पन्नास टक्के स्त्रिया नसतात.. परिणामी शिक्षणक्रमात पुरुषी दृष्टिकोनच प्रभावी ठरतो. समाजात पुरुषाला जशी स्त्री हवी तशीच घडविली जाते. शिक्षणाचेही असेच आहे. पुरुषाला जितपत स्त्रीचा व्यक्तिमत्त्व विकास अपेक्षित असतो. तितकाच तो घडविला जातो. हे उघड सत्य आहे. कारण शिक्षण व्यवस्था ही समाजातील प्रभुत्वशाली विचारसरणीला अधिमान्यता देऊन ती रुजविण्याचे काम करीत असते. आपली शालेय अभ्यासक्रमाची

पुस्तकेही उच्च जातवर्गीय पितृसत्ताक मूल्ये रूजवितात. त्यामुळे स्त्री कणखर होण्याऐवजी सोशीकच होत जाते. परिणामी आपला आवाज उठविणे, आपली मते मांडणे, आपली भूमिका स्पष्ट करणे, आपल्यासाठी अवकाश प्राप्त करणे, ठोस भूमिका घेऊन इतरांना मार्गदर्शन करणे हे अपवादानेच घडते. कारण त्याची मूळे आर्थिक स्वावलंबनात, शिक्षणांच्या संस्कारात, सामाजिक, सांस्कृतिक वातावरणातूनच पोषणमूल्ये स्वीकारीत असतात. कार्ल मार्क्सने आर्थिक संबंधाने समाजव्यवस्थेचा पाया मानले व संस्कृती, शिक्षण, राजसंस्था व धर्म यांना इमल्याचा भाग मानले. आर्थिक संबंधामध्ये बदल झाले तर इमारतीमध्ये आपोआपच बदल होती, कारण संस्कृती, शिक्षण व राजकारणाचे स्वरूप आर्थिक संबंधावरून ठरत असते.

आपण पाहतो खेड्यातून स्त्री मजूर तरी असते किंवा गृहिणी तरी असते. सातबारा तिच्या नावावर नसतो. त्यामुळे तिच्या कमाईला प्रतिष्ठा नसते व कष्टाला किंमत नसते. जशी नोकरी करणाऱ्या स्त्रीला पगार मिळून प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यातही पुरुषाला वेगळा रोज आणि स्त्रीला वेगळा रोज मिळतो. त्यामुळे तिच्या मनातील दुय्यमत्त्वाची भावना दृढ होते. ग्रामीण भागातून राजकारणात जरी आरक्षणामुळे तिचा शिरकाव झाला तरी तिथेही कारभार पुरुषच करतात. तिला निर्णय घेऊ देत नाहीत आणि एकंदर समाजात स्त्रियांमध्ये न्यूनत्त्वाची भावना वाढीस लागते. परिणामी ती लेखनासारख्या आत्मप्रगटीकरणाच्या माध्यमाकडे न वळता कुढत राहते. अॅन्थोनिओ ग्राम्चीने असे सांगितले की, समाजातील प्रभुत्त्वशाली वर्ग हे केवळ सैनिकी बळावर वर्चस्व कायम राखत नाहीत तर त्याचसोबत विचारप्रणाली हे त्याचे महत्त्वपूर्ण साधन असते. उच्च वर्गाची विचारप्रणाली ही विविध माध्यमाद्वारे लोकांमध्ये रुजविली जाते. त्यात शिक्षण, धर्म, संस्कृती राज्यसंस्था इ.चा समावेश असतो. या प्रभुत्त्वशाली वर्गाची विचारप्रणाली जेव्हा दुय्यमवर्गीयांकडून स्वीकारली जाते. तेव्हा अजाणतेपणी ते स्वतःच स्वतःच्या दास्यत्त्वाला संमती देत असतात.

वरील पार्श्वभूमीवर लेखिकांचा अभाव का आहे हे स्पष्ट होते. आता दलित आणि ग्रामीण या दोन्ही कादंबरीची पार्श्वभूमी ही ग्रामीण वा निमशहरीच जास्त असते. शहरातून ही माणसे स्थलांतर करून आल्यावरचा संघर्ष मांडूही शकतील पण तशी शक्यता कमी दिसते. कारण शहरातून ग्रामीणत्वाच्या आणि जातीपातीच्या खुणा पुसट होत जातात. जितक्यातच त्या ग्रामीण भागातून ठसठशीतपणे दिसून येतात. त्यामुळे त्याला वर्णसंघर्षाचे स्वरूप लाभण्यापेक्षा

वर्गसंघर्षाचे स्वरूप जास्त लाभते.

**दलित आणि ग्रामीण साहित्यः–**

दलित आणि ग्रामीण साहित्य हे आजच्या मराठी साहित्य विश्वातील महत्त्वाचे व दमदार साहित्य प्रवाह आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वामुळे दलितांना अन्यायाची जाणीव झाली. वर त्यांना राज्यघटनेचे संरक्षण मिळाले. त्यामुळेच त्यांच्या लेखणीला धार चढली. वेदना, विद्रोह आणि नकार या त्रिसूत्रींनी मंडित दलित साहित्याने सर्वांनाच आकर्षूण घेतले. पण तत्पूर्वीच ग्रामीण साहित्याची निर्मिती सुरू झाली होती. खरे तर या दोन्ही साहित्यातून समता, बंधुता आणि मानवता यांचा उद्‌घोष दिसून येतो. कारण ग्रामीण साहित्य कृषिकेंद्रित असते आणि कृषिकेंद्रित समाजरचना गावगाड्यावर आधारित असते. गावगाडा निर्माण होण्याचे मुख्य कारण सर्वांना सोबत घेऊन चालणे हेच होते. पण नंतर वर्णभेदाच्या भिंती घालण्यात आल्या. त्या तीव्र करण्यात आल्या. त्याला काय कारणे आहेत. हा इथे विषय नाही. पण गावगाड्याच्या मुळाशी मानवता आणि बंधूता नक्कीच होती. ग्रामीण माणूसही आज पीडित आहेच. त्याच्यावरील अन्यायाचे स्वरूप जरी वेगळे असले तरी तोही त्रस्तच आहे. ह्याचीही कारणे काय आहेत. हा इथे विषय नाही. पण आतापर्यंत अस्पर्श विषय आणि आतापर्यंत अपरिचित असणारे वातावरण तसेच आतापर्यंत दुर्लक्षित असणारे वास्तव या दोन्ही साहित्यातून प्रखरपणे पुढे आले एवढे मात्र नक्की. त्यामुळे या साहित्याला डावलून जर समाजासाठी होतो. असे आपण म्हणत असे तर प्रथम याच साहित्याचा उपयोग व्यापक मानवहितासाठी होऊ लागला आणि ह्याच साहित्याने साहित्याला व्यापकत्त्व बहाल केले असे आपण म्हणू शकू. आतापर्यंत उपेक्षित असणाऱ्या मानवी घटकांच्या उत्थानासाठी साहित्याचा खऱ्या अर्थाने उपयोग होऊ लागला. साहित्यविश्वात वेगळीच सळसळ होऊ लागली. साहित्य खऱ्या अर्थाने सार्थ झाले. स्तरास्तरांपर्यंत झिरपले

**दलित आणि ग्रामीण कादंबरीः–**

मराठी साहित्यविश्वामध्ये कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराला श्रेष्ठ मानले गेले आहे. जागतिक पातळीवरही कादंबरीचीच दखल घेतली जाते असेही दिसून आले आहे. पण दलित आणि ग्रामीण साहित्य प्रवाहात कादंबरी हा वाङ्‌मयप्रकार क्षीण असलेला जाणवतो आहे. अर्थातच इतर वाङ्‌मयप्रकारांच्या तुलनेत वरील विधान केले आहे.

कादंबरी म्हणजे जीवनावरील महाभाष्य असे साधारणतः समजले जाते. आपण ज्या जगामध्ये राहतो ते जग लांबी, रूंदी आणि उंची या त्रिमितीने बांधलेले असते. तशीच कादंबरीही याच त्रिमितीने बद्ध असते. यातील पहिला अक्ष व्यक्ती-समाज हा असतो. व्यक्ती ही समाजाची अविभाज्य घटक असतेच. पण हे नाते व्यक्ती-संस्था-समाज अशा पद्धतीने विस्तारित होत असते. यातील संस्थांचे कादंबरीचा दुसरा अक्ष व्यक्ती-आकलन हा असतो. आता कादंबरी व्यक्तीकडूनच वाचली जाते. तेव्हा व्यक्तीलाच तिचे आकलन होते आणि या आकलनाचा प्रभावही व्यक्तीवरच पडतो. तिसरा अक्ष व्यक्तिकाल ह्यांचा असतो. त्या त्या काळाशी अनुरूप अशा व्यक्ती त्या त्या काळाशी सुसंगतपणे कादंबरीत चित्रित व्हायला हव्यात. तरच त्या आकलन होऊ शकतील आणि कादंबरी लेखनाचा चौथा अक्ष खुद्द लेखकच असतो. म्हणजेच लेखकर स्वतः एक व्यक्ती म्हणून कादंबरीमध्ये वावरत असतो. प्रत्येक व्यक्तिरेखेचा एक अंश म्हणून अस्तित्त्वात असतो. या चार गोष्टी कादंबरीमध्ये यथायोग्य संवाद साधून असतात. तेव्हाच ते महाभाष्य ठरते.

खरे तर दलित जीवन हाच कादंबरीला पुरून उरणारा समर्थ असा महाभाष्याचा विषय आहे. तरीही समर्थ दलित कादंबरी आणि तिची सलग परंपरा आपल्याला पाहायला मिळत नाही. उलट समर्थ दलित कादंबरीची सुरुवात लेखिकांनीच केलेली दिसून येते. १९२५ मध्ये श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची मश्याम सुंदरफ ही पहिली दलित कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतर १९३८ मध्ये वि.स.खांडेकरांची मदोन मनंफ प्रसिद्ध झाली. १९४२ मध्ये मपारिजातकाची फुलेफ १९४२ मध्ये ही वि.वा. हडप यांची कादंबरी प्रसिद्ध झाली. पण त्याच दरम्यान १९४२ मध्ये गीता साने यांची मधुके आणि गहिवरफ ही कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीत अस्पृश्यता निवारण्यासाठी स्पृश्यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. असे ठरविले आहे. त्यानंतर १९४३ मध्ये ममहापूरफ ही विठ्ठल दत्तात्रय चिंदरकर यांची कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यानंतर नंबर लागतो तो विभावरी शिरूरकर यांच्या १९५० साली प्रकाशित बळीचा. त्या कालखंडातील अस्पृश्य व गुन्हेगाव समजल्या जाणाऱ्या मांग-गारुडी या जातीचे चित्रण करणारी ही कादंबरी मैलाचा दगड ठरली आहे आणि ती एका लेखिकेने लिहिली आहे.

ह्या काळात आणखीही काही कादंबऱ्यांमध्ये दलित जीवन येते, त्यात वा.म.जोशी यांची इंदू काळे व सरला भोळे (१९३४) ग.त्र्यं. माडखोलकर यांची चंदनवाडी (१९४३) साने गुरुजी यांची रामाचा शेला (१९४४) ना.सी.फडके

यांची प्रतिज्ञा(१९४१) माझा धर्म(१९४६) ग.ल. ठोकळ यांची गावगुंठ(१९४६) या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. या काळातील दलित लेखकाने लिहिलेली एकमेव कादंबरी टंगारलेली प्रेतं ही(१९३८) ना.रा. शेंडे यांनी लिहिलेली आहे. त्यानंतरही महानदीच्या तीरावर ही(१९५३) दुर्गा भागवत यांनी लिहिलेली कादंबरीही लेखिकेचीच आहे.

कादंबरीसारख्या व्यापक वाङ्मयप्रकाराच्या निर्मितीसाठी बहुपरिणामात्क, बहुपेडी, अनोकार्थग्राहक, स्वेतरमतसमावेशक अशा चिंतनात्मक दृष्टिकोनाची गरज असते. दलित साहित्यिकांमध्ये आजच्या घडीला ही दृष्टी नसल्यामुळे कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकारची निर्मिती त्यांच्या हातून होऊ शकत नाही. या दृष्टीकोनाची आजच अपेक्षा करणे अकाली ठरणार आहे. असे एक कारण बाळकृष्ण कवठेकर यांनी दलित लेखकांच्या कादंबरी न लिहिण्याबद्दल सांगितले ते लेखिकांना लागू होत नाही. कारण ह्या काळातील तीनही लेखिकांच्या कादंबऱ्या दखल घेण्याजोग्याच आहेत.

लेखिकांच्या कादंबरी अभावाची दुसरी तितकीच महत्त्वाची कारणे आहेत. स्त्रिया कशा परिस्थितीत लिहीत आल्या आहेत. लिहीत असतात हेही तर बघणे आवश्यक आहे. लेखिकांना मिळणाऱ्या अवकाशाचाही विचार करणे आवश्यक आहे. कारण आयुष्यात येणाऱ्या, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुभवांच्या आणि भूत-वर्तमानाच्या आकलनाच्या शिदोरीवर लेखकर लिहीत असतो. या अर्थाने विचार केल्यास समाजात असणारे पुरुष वर्चस्वाचे प्राबल्य पुरुषाच्या अनुभवांच्या कक्षा रुंदावणारे ठरते आणि स्त्रियांचे जीवन त्यांची घुसमट वाढविणारे ठरते. आजच्या विज्ञानयुगातही स्त्रिया आजही जीवनाच्या कित्येक बाजूंपासून वंचित असतात. लष्कर, नौदल, अंत्यसंस्कार, मोठी औद्योगिक क्षेत्रे, यासारखी क्षेत्रे आजही स्त्रीला अनभिज्ञ आहेत. त्यातही प्राप्त क्षेत्रातही स्त्रियांना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास अधिक सक्षमता दाखवावी लागते. अशा परिस्थितीत आयुष्याशी भिडण्यातच त्यांची जास्त शक्ती खर्च होते. त्यामुळे लेखनासारख्या एकाग्रता आणि अवकाश आवश्यक असणाऱ्या उपक्रमासाठी व्यवधान राखणे त्यांना बरेचदा शक्य होत नाही. हेही नाकारता येत नाही.

एकतर स्त्रियांना जगतानाचा दुहेरी कसरत करावी लागते. पूर्वी ती घरात तरी होती पण आता तर घराबाहेर पडू लागली आहे. तेव्हा ही कसरत तिहेरी झाली आहे. जेव्हा अंतर्गत उर्मी स्वस्थ बसू देत नाही. तेव्हाच ती लेखनाकडे वळते. पण अशावेळी तिची कसरत चौहेरी होते. आपल्या अनिवार

लेखन उर्मींची कदर करणाऱ्या स्त्रीला बरेचदा जवळच्यांची नाराजी पत्करावी लागते. समाजाने तिच्यावर टाकलेले कुटुंबाची जबाबदारी एवढी मोठी असते की, ती करकचून आवळली जाते. त्यापलीकडे विचार करू शकत नाही. केला तरी तिला अपराधी वाटते. वा मुलांनवऱ्याची वा नातेवाईकांची नाराजी सहन करावी लागते. ह्यात परत तिची ससेहोलपट होते.

**स्त्री कादंबरीकारांची उपेक्षा:-**

अर्थात ज्या स्त्रिया लिहिताहेत त्या कसदार कादंबऱ्या लिहिताहेत. पण त्यांचीही दखल घेतली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. उलट लेखिकांना कादंबरी हा वाङ्मयप्रकार हाताळता येत नाही असेच मराठी अभ्यासकांचे प्रामाणिक मत आहे. प्रामाणिक शब्द एवढ्यासाठी वापरला की, बरेचदा स्त्रियांच्या कादंबऱ्या न वाचताच त्यावर बोलले वा लिहिले जाते. डॉ.भालचंद्र फडके यांनी तर स्पष्टपणे असे म्हटले आहे की, स्त्रियांचे अनुभव विश्वच थिटेच आहे. त्यामुळे ह्या कादंबऱ्या डिपार्टमेंटल स्टोअरसारख्या वा होल्डॉलसारख्या वाचकांना काय हवे, काय नको ते पाहत असतात. निर्मितीची घाई, व्याजनिष्ठा, अनुभवाला असलेला थिटेपणा, कच्चेपणा, चिंतनाचा अभाव, इत्यादी अनेक दोष मराठी कादंबरी लेखनात आढळतात. अर्थात इथे स्त्रियांच्या कादंबरीलेखनात असे म्हणायचे आहे. पण हे अनुभवविश्व का थिटे आहे. याबद्दल मात्र त्यांनी मत प्रदर्शित केलेले नाही वा त्यांना ते करावेसे वाटले नाही. खरे तर तेच फार महत्त्वाचे आहे. केवळ डॉ.भालचंद्र फडकेच नाहीत तर इतरही भारतीय समीक्षक साधारणतः स्त्रियांच्या कादंबरीची उपेक्षा करतात. प्रसिद्ध लेखक खुशवंत सिंगही दिल्लीत झालेल्या एका पुस्तक प्रकाशन समारंभात स्त्रियांपेक्षा पुरुष लेखक हे गुणात्मक आणि संख्यात्मदृष्ट्या खूपच पुढे आहेत. असे म्हणाले होते. पुढे त्यांनी सलमान रश्दी किंवा विक्रमसेठ यांची बरोबरी करणारे लेखन स्त्रियांनी अद्याप केले नाही. असेही विधान केले होते. लेखिकांच्या साहित्याकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहण्याची अथवा त्यांच्या साहित्याकडे दुर्लक्ष करून ते अनुल्लेखनाने मारण्याची अथवा त्यांच्या साहित्याची उपेक्षा करण्याची अथवा त्याचे श्रेय पुरुषांना देण्याची पुरुष समीक्षकांना सवय आहे.

**बुढाई आणि बोडखीची उपेक्षा:-**

दलित आणि ग्रामीण साहित्यात लेखिकांच्या कादंबरीचा अभाव आहे असे समीक्षक ठासून सांगतात. त्यांच्यादृष्टीने हे विधान होकारार्थी आहे. अशावेळी ज्या काही कादंबऱ्या लेखिकांनी लिहिल्या आहेत. त्यांची तरी यांनी

दखल घेतली आहे का? याचे उत्तर त्याचवेळी नकारार्थी आहे. कारण माझ्याच १९९९ मध्ये प्रकाशित बुढाई कादंबरीचा साधा उल्लेखही मराठी ग्रामीण कादंबरी या डॉ.रविंद्र ठाकूर यांच्या पुस्तकात नाही. अर्थात, आता त्याची दुसरी सुधारित आवृत्ती (२००१) निघाली आहे. त्यात त्यांनी चुकीची दुरूस्ती केली असेल तर कल्पना नाही. पण २००० पर्यंतचा कालखंड विचारात घेऊनही त्यांनी पुण्याच्या नामवंत प्रकाशकाने काढलेल्या राज्य पुरस्कार मिळालेल्या कादंबरीची साधी दखलही घेतली नाही. कारण ती लेखिकेची कलाकृती आहे. बरे ग्रामीण साहित्याचे समीक्षक सोडा पण दलित साहित्याच्या समीक्षकांनी तरी तिची दखल घ्यावी ना तर तिथेही उपेक्षाच आहे. बळी कादंबरीला दलित नायकाचे चित्रण म्हणून जर आपण दलित कादंबरी म्हणत असू तर बुढाईची नायिका गोकर्णा हीही दलितच आहे. मग तिला आपण तोच न्याय का लावू शकत नाही. कारण पुन्हा लेखकांना जातवर्गात तर अडकविले जात नाही? अर्थात, हा आरोप मी व्यथित होऊन करते आहे. बुढाई कादंबरीबद्दलच एका नामवंत समीक्षकांनी मात्र बुढाई ही बळी नंतरची अंगावर येणारी महत्त्वाची कादंबरी आहे. (चंद्रकांत भंडारी महानगर) असे म्हटले आहे. आता आपण बळीलाच जर दलितेतर लेखिकेने लिहिलेली कादंबरी म्हणून दलित कादंबरी मानत नसू तर बुढाईचा प्रश्नच येत नाही. कारण बुढाईची लेखिका दलितेतर आहे. त्यातही उच्चवर्णीय नाही हे उघड सत्य आहे. पण एवढे खरे की, या कादंबरीची दखल ना ग्रामीण साहित्याच्या समीक्षकांनी घेतली ना दलित साहित्याच्या समीक्षकांनी घेतली.

ह्या पार्श्वभूमीवर तर बोडखी उपेक्षित राहणे अधिक स्वाभाविक आहे आणि झालेही तसेच. कारण तिची तर अजिबातच दखल घेतली गेली नाही. बोडखीलाही दोन पुरस्कार मिळालेत. पण समीक्षकांना तिची दखल घ्यावीशी वाटली नाही. बोडखीचीही नायिका कौसल्या ही दलितच आहे. तिचाही संघर्ष जीवघेणा आहे. नष्ट होणाऱ्या बलुतेदारीचे विदारक दर्शन ह्या कादंबरीत घडते पण तीही उपेक्षित ठेवली गेली. पण ना ग्रामीण साहित्याच्या समीक्षकांनी तिची दखल घेतली ना दलित साहित्याच्या समीक्षकांनी तिची दखल घेतली बरं डॉ.रवींद्र ठाकूर यांनी या कादंबरीचीही उपेक्षा केली. कारण त्यांना लेखिकेच्या कादंबरीकडे लक्ष न देण्यात आपली चूक आहे असेही वाटत नाही. कारण तो पुरुष समीक्षकांचा हक्कच आहे. त्यामुळे जशी स्त्री उपेक्षित ठरते. तशीच तिची कलाकृती उपेक्षित ठरते. हे विदारक सत्य आहे. पण असे मी म्हणते असेही नाही

सर्वच लेखिकाच म्हणतात असेही नाही तर पत्रकार स्त्रियासुद्धा असेच म्हणतात.

समाजात प्रत्येकच क्षेत्रात, आपल्या हाती जणू न्यायाचा तराजू आहे आणि बरे वाईट किंवा श्रेष्ठ-कनिष्ठ काय ते ठरविण्याची अधिकारवाणी आपल्याला प्राप्त झाली आहे. अशी पुरुषवर्गाची समजून असते. मग साहित्यक्षेत्र त्याला अपवाद कसे असणार? सर्वच स्त्रिया अगदी कसदार लेखन करतात, असे म्हणता येणार नाही. पण सरसकटपणे, पुरुष लेखकांना लेखिकांपेक्षा सरस ठरवणे हे चूकच आहे. शेवटी गुणवत्ता ही गुणवत्ताच असते. स्त्री म्हणून लेखिकांना सवलत अजिबात नको आहे; पण स्त्री लेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि वाङ्मयीन श्रेष्ठ त्याचे किंवा दर्जाचे निकष लावण्याची पद्धती झापडबंद असू नये. ही अपेक्षा नक्कीच आहे. असे नंदिनी आत्मसिद्धही म्हणतात. किमान जर आपण पुरुष समीक्षक म्हणून जर मिरवून घेत असून तर किमान लेखिकांच्या साहित्याकडे दुर्लक्ष करू नये. एवढी तरी नैतिकता पाळायला हवी. पण तसेही घडत नाही. वर चोराच्या उलट्या बोंबा गत लेखिकांच्या कादंबरीचा अभाव असे म्हटले जाते. वाटल्यास या कादंबऱ्या दखल घेण्याजोग्या नाहीत अशी पुष्टी जोडावी.

लेखिकांच्या कादंबऱ्या दुर्लक्षित ठेवल्या जातात. याचे आणखी एक उदाहरण आहे ते यात्रेकऱ्याचा वृत्तांत ही कादंबरी १८३८ मध्ये प्रकाशित झाली. अर्थात ती शालेय पाठ्यपुस्तकाची गरज म्हणून मिसेस फेरारनी लिहिली. राघोजी जाधव या कुणब्याची ही कथा. या यात्रेत त्यांना खूप सोसावे लागते. तिथे त्याची बायको, मित्र, जावई पटकीला बळी पडतात.पण तो वाचतो पुढे त्याला बटाट्याची लागवड, कापसाची लागवड, मेंढ्यांची लोकर इत्यादीबद्दल माहिती मिळवतो. विलायती नांगराची माहिती मिळवून तो कसा चालवायचा हेही शिकतो. पुढे उसाची कादंबरी ठरते व त्यातील शेतीभाती, यात्राजत्रा ह्यांच्या चित्रणावरून ग्रामीणही ठरू शकते.पण तिचा उल्लेख तसा केला जात नाही. मराठीतील पहिली कादंबरी म्हणून यात्रिक क्रमण ही भाषांतरित कादंबरीचा उल्लेख केला जातो. पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून यमुना पर्यटनचा उल्लेख केला जातो तर पहिली ग्रामीण कादंबरी दिनमित्र या नियतकालिकातून एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ मध्ये बळिबा पाटील या नावाने कृष्णराव भालेकरांनी प्रसिद्ध केली. पहिलावहिला प्रयत्न म्हणून तिला ग्रामीण साहित्याच्या समीक्षकांनी मान्यता दिली आहे.त्यानंतर १९०३ मध्ये प्रकाशित पिराजी पाटील ही धनुर्धारी उर्फ रामचंद्र विनायक टिकेकर ह्यांच्या कादंबरीला ग्रामीण कादंबरीचा आरंभबिंदू मानला जातो.

अर्थात इथे फक्त लेखिकांच्या कादंबऱ्याचा विचार करताना एवढे मात्र ठासून सांगावे लागेल. स्त्रिया लिहू लागल्या. तसे त्यांचे साहित्य वाचून पुरुषही समतावादी दृष्टीने स्त्रियांकडे बघू लागले. आपल्या साहित्यातून संपन्न स्त्री व्यक्तिरेखा चितारू लागले. पूर्वी मराठी साहित्यातून निर्बुद्ध, मुर्ख, बावळट स्त्रियांची चित्रे रेखाटणारे पुरुष स्त्री संसार कसा तोलून धरते किंवा नवऱ्याच्या समस्यांवर कशी उतारा शोधते अशी चित्रणे करू लागले आहेत. याचे श्रेय लेखिकांचेच आहे. मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचित्रण असे स्त्रीसापेक्षच आहे. अनेक दडपणे, अडथळे आणि आरोपांतून मार्ग काढत स्त्रिया लेखन करीत आल्या आहेत. पुढेही करतील. काळ जसजसा पुढे सरकेल तसतशी या लेखनात व्यापकता येईल. नवे विषय, नव्या पद्धती, नवी क्षेत्र स्त्री कादंबरीत येतील. आताही येत आहे. शांता शेळके यांची ओढ (१९५०) ही कोष्टी जीवनावरील कादंबरी आहे. साध्या विषयातही वैविध्य शोधणाऱ्या प्रा.अनुराधा गुरव यांच्या कादंबऱ्या त्यांचे स्त्री-जीवनपर चिंतन तर व्यक्त करतातच पण त्यांची जीवननिष्ठाही व्यक्त करतात. ह्या कादंबऱ्या तशा कौटुंबिक असल्या तरी त्यातून आजच्या दोलायमान कुटुंब व्यवस्थेचे चित्रण येते. त्यांच्या तम विरते कादंबरीमध्ये डॉक्टर पतीपत्नीमधील ताणतणावांचे प्रतिबिंब दिसते. तर दुसऱ्या अंजना कादंबरीत ऐन तारुण्यात विधवा झालेल्या नायिकेचे कौटुंबिक ताणतणाव व्यक्त झालेले दिसतात. तिसऱ्या रात्रीच्या गर्भात या कादंबरीत नायिकेला पती आणि मुलांचा अपघाती मृत्यू सोसावा लागतो. तर चौथी यश-अपयश कादंबरी इनामदारी व्यवस्थेचे पीळ व्यक्त करते. तर पाचवी अकल्पित कादंबरी खेड्यापाड्यात रंगलेल्या राजकीय डावपेचांचे चित्रण करते. या सर्व कादंबरी लेखनातून संघर्षमय जीवन जगणारी पात्र आली आहेत. ही पात्र ताठ भूमिका घेऊन लढत राहतात.

डॉ.प्रतिमा इंगोले यांचा एकमेव ग्रामीण कादंबरी फार म्हणून स्त्री साहित्यांचा मागोवा ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात उल्लेख आहे. ग्रामीण भागातील कितीतरी कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. त्यातल्या एका कुटुंबाची ही प्रातिनिधिक कहाणी आहे, तशीच काळ्या मातीवर ओढवलेल्या दुर्दशेची कथा आहे. वऱ्हाडी वातावरणातील ही नायिकप्रधान कादंबरी पिकाऊ जमिनीवरील अतिक्रमणे व त्याचे घातक परिणाम याकडे लक्ष वेधते. वैदर्भीय लेखिका प्रतिमा इंगोले यांची बुढाई ही ग्रामीण जीवनावरची आणि वऱ्हाडी बोलीतील महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. डॉ.प्रतिमा इंगोले यांची दुसरी महत्त्वाची कादंबरी म्हणजे पार्टटाईम

(२००२) लहान गावातल्या महाविद्यालयीन परिस्थितीभोवती कादंबरीची वीण गुंफली आहे. लहान गावातल्या कॉलेजचे वातावरण ह्या कादंबरीत आहे. शिक्षणाचा प्रसार तळागाळात होऊ लागल्याबरोबर ग्रामीण वातावरण बदलत गेले. त्यामध्ये परत स्त्रियांच्या बाबत दुय्यमताच प्रकर्षाने समोर येत गेली. याच दुय्यमतेचे चित्रण पार्टटाईममध्ये येते. ही कादंबरी वाचून मन विषण्ण होते. स्त्रियांच्या अन्यायाचे, दुःखाचे, वेदनेचे, दिवस अद्यापही संपले नाहीत हे सांगणारी स्त्री इथे भेटते. यातील नायिक अनुराधा हिचे व्यक्तिमत्त्व लेखिकेने चांगले चित्रित केले आहे. अख्खे शिक्षणक्षेत्रच आपल्यासमोर उभे केले आहे. कादंबरी खरोखरीच वाचनीय आहे. अतिशय धीटपणे हवी तेव्हा भाषेला वाकवून स्त्रीवरील अत्याचाराचे एक विलक्षण भेदक चित्रण या कादंबरीत बघायला मिळते. स्त्री एवढं लिहिण्याइतकी धीट झाली. यावरून तिचे भविष्य वाचकांनीच ठरवावे. डॉ.प्रतिमा इंगोले यांची तिसरी महत्त्वाची कादंबरी आहे. आत्मघाताचे दशक (२००९) विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा उद्रेक झाल्यावर आत्महत्याग्रस्त भागात फिरून त्या अनुभवांवर आधारित ही वैचारिक कादंबरी आहे. विदर्भातील शेतकऱ्यांचे भीषण वास्तव या कादंबरीतून साक्षात प्रत्ययास येते. तर त्यांची चौथी बोडखी (२००९) कादंबरी ही उद्ध्वस्त होणारी बलुतेदारी आणि खेड्यातून शिक्षणाचा होणारा बट्ट्याबोळ चित्रित करते. या कादंबरीबद्दल डॉ.द.ता.भोसले प्रस्तावनेत म्हणतात. सशक्त कथावस्तू, जिवंत पात्रचित्रण, सखोल नि समतोल जीवनदर्शन, गतिमान प्रसंगांची बंदिस्त वीणः जीवनातील नाट्य आणि कारुण्य टिपणारी संवेदनशील वृत्ती, उचित कल्पकतेचा उत्तम वापर, अतिश लडिवाळ नि स्वाभाविक संवाद यांसारख्या अनेक वाङ्मयीन गुणांनी या कादंबरीची गुणवत्ता अधिक उंचावली गेली आहे. अधिक गुणसमृद्ध बनली आहे. पण खेदाची बाब म्हणजे ही कादंबरी उपेक्षितच आहे.

डॉ.प्रतिमा इंगोले यांचीच पाचवी कादंबरी नक्षलग्रस्त (२०१३) ही मृत्यूच्या छायेत वावरणाऱ्या माणसांचे काटेरी जीवन रेखाटणारी कादंबरी आहे. तर सहावी राशाटेक (२०१३) ही ग्रामीण कादंबरी माय मातीत जाते आणि माती माय होते हे महत्त्वाचे सूत्र मांडणारी लक्षणीय कादंबरी आहे.

याशिवाय मधू सावंत यांच्या दोन ग्रामीण कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. एक राहूकेतू (१९९९) ही जिल्हा परिषदेच्या राजकारणावर आधारित आहे. ३३% आरक्षणानंतर महिलांना राजकारणात शिरकाव तर करायला मिळाला पण तिथेही डावलले जात असल्याचे अनुभव या कादंबरीत येतात. तर दुसरी

जिनगानी ही विधवा आणि परित्यक्ता यांचे जीववन रेखाटणारी कादंबरी आहे. तर वैशाली कोल्हे (गावंडे) यांची अधातंरी कादंबरी पहिली आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर आधारित अन मृगधारा बरसल्या (२०१०) ही दुसरी कादंबरी आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर आधारित लेखिकांच्या चार तरी कादंबऱ्या आज प्रकाशित झालेल्या आहेत. त्यात डॉ.प्रतिमा इंगोले यांची आत्मघाताचे दशक (२००९), वैशाली कोल्हे यांची अन् मृगधारा बरसल्या (२०१०), इंदु बुरडकर यांची गराडा (२०११) तर शुभांगी भडभडे यांची सुवर्णरेखा (२०१२) अशा कादंबऱ्या प्रकाशित आहेत. ह्याशिवाय शुभदा मुंजे यांची पारूल कादंबरी आणि विजया ब्राह्मणकर यांची यमू (२००९) या कादंबऱ्या स्त्री प्रश्नांवर आधारित आहेत. या ग्रामीण कादंबऱ्यांच्या व्यतिरिक्त सुगंधा शेंडे यांची फिकुजी (१९८७) आणि गावात आलं पानी (१९८७) या दलित जीवनावरील कादंबऱ्या आहेत. पण या कादंबऱ्या नवसाक्षरांसाठी आहेत. तर काही दलित ग्रामीण कादंबऱ्या हिंदीतून ,व इंग्रजीतून लिहिलेल्या आहेत. त्यापैकी कमल तेजस यांची गवाह तथागत ही एक कादंबरी आहे तर दुसरी शेवंताबाई निकम्बे यांनी रत्नाबाई ही (१८९०) इंग्रजीतून लिहिलेली कादंबरी आहे.

ग्रामीण मनोवृत्ती असणाऱ्या स्त्रियांमध्ये दलित साहित्य लिहिणाऱ्या व ग्रामीण साहित्य लिहिणाऱ्या दोन्ही स्त्रियांचा आपणांस समावेश करावा लागेल. कारण दोन्हीही एकाच समाजव्यवस्थेच्या शिकार आहेत. दलित स्त्री शूद्र आहे. तर इतर जातीतील ग्रामीण स्त्रीही शूद्रच आहे. त्यामुळे नागर स्त्रियांच्या तुलनत हे योगदान जास्तच मोलाचे आहे.

तसेही दलित लेखिकांच्या तुलनेतही ग्रामीण लेखिकांचे कादंबरी या वाङ्मयप्रकारातील योगदान जास्त व महत्त्वाचे आहे व पुढेही हे वाढण्याची शक्यता आहे. वरील विवेचनावरून आपणांस काही निष्कर्ष काढता येतील.

**निष्कर्ष:**

१) ग्रामीण भागातून शिक्षण व आर्थिक स्वावलंबन याबाबत स्त्रियांच्या दृष्टिने अभाव आढळतो.
२) शिक्षण लेखन व आर्थिक स्वावलंबन हेच स्त्रीविकासाचे मूलमंत्र आहेत.
३) अभ्यासक्रमातून स्त्री सक्षम होईल असा प्रधान होत नाही.
४) ग्रामीण भागातून स्त्रीच्या कष्टाला व कमाईला प्रतिष्ठा नाही.
५) दलित आणि ग्रामीण साहित्याचे मराठी साहित्यात परिवर्तन घडवून मोलाचे स्थान प्राप्त केले आहे.

६) दलित आणि ग्रामीण साहित्याने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवता यांचा पुरस्कार केला आहे.

७) दलित आणि ग्रामीण जीवन कादंबरीला पुरून उरणारा महाभाष्याचा विषय आहे.

८) स्त्रियांना अनुभवांच्या कक्षा रुंदावण्यास फारसा वाव नाही.

९) समीक्षकांनी स्त्री साहित्याची अवहेलना केली आहे.

१०) दलित आणि ग्रामीण लेखिकांच्या कादंबऱ्या आजही उपेक्षित आहेत.

११) प्रतिमा इंगोले या दुर्लक्षित दलित कादंबरीकार आणि ग्रामीण कादंबरीकार आहेत.

१२) शेतकरी आत्महत्या या ज्वलंत समस्येवर लेखकांपेक्षा लेखिकांच्या कादंबऱ्या जास्त आहेत.

१३) दलित स्त्रिया आणि ग्रामीण स्त्रिया यांच्या मनोवृत्तीत फारसा फरक नाही. त्यामुळे लेखिकांच्या कादंबऱ्यात या सीमारेषा धूसर होत जातात.

१४) मराठी कादंबरीतील लेखिकांच्या योगदानात दलित आणि ग्रामीण लेखिकांचे योगदान जास्त व मोलाचे आहे.

१५) दलित कादंबरीमधील लेखिकांच्या योगदानापेक्षा ग्रामीण कादंबरीमधील लेखिकांचे योगदान जास्त व महत्त्वाचे आहे.

* * *

# रंजनवादी/रंजनप्रधान दलित, ग्रामीण कादंबरी

-डॉ.भास्कर शेळके

मनोरंजनाच्या उद्देशाने प्रस्थापित दलित ग्रामीण लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे जसे अण्णाभाऊ साठे यांनी फकिरा, वारणेचा वाघ या सारख्या अजरामर कलाकृती निर्माण केल्या तशाच त्यांनी अलगूज आवडी, तारा, गुलाम, रानगंगा, रत्ना, रानबोका यासारख्या रंजनप्रधान कादंबऱ्याही लिहिल्या, शंकरराव खरात सारख्या श्रेष्ठ कथा-कादंबरीकारानेही मसालेदार गेस्ट हाऊस, बा.स.हाटे, भोगवटा, व्हटकरांनी अपराधी, सोळाशिणगार उत्तम बंडू तुपे यांनी नाक्षारी यासारख्या रंजनप्रधान कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यामध्ये रंजनाचा उद्देश असली तरी त्यातील आशयसूत्र परवड, फरफट, शोषणाचा सूचन उल्लेख करून जातो.

पाश्चात्त्य साहित्यविचारधारेतूनच मराठी साहित्यामध्ये अभिजातवाद, स्वच्छंदवाद किंवा सौंदर्यवाद, अतिवास्तववाद, अस्तित्त्ववाद हे वाङ्मयीन संप्रदाय निर्माण झाले. लेखकाच्या मनपटलावर कोणत्या विचारसरणीचे संस्कार झालेले आहेत. हे उपरोक्त साहित्य संप्रदायांद्वारे शोधता येते. साहित्य निर्मिती होत असताना साहित्यिकाची भूमिका नेमकी काय आहे? त्याच्या व्यक्तिमत्त्वावर कोणाचा प्रभाव आहे? त्याची विचारसरणी कोणती आहे? लेखकाचा साहित्य निर्मिती मागील हेतू काय आहे? यासर्व प्रश्नांचा मागोवा या साहित्य संप्रदायाच्या आधारे घेता येतो.

सर्व साहित्य संप्रदायाचा उगम एकमेकांच्या विरोधात झाला आहे. अभिजातवादाचा अतिरेक झाला म्हणूनच स्वच्छंदवादाचा उदय झालेला दिसून येतो. अभिजातवादाचे स्वरूप लक्षात घेता असे जाणवते की, आर्थिकदृष्ट्या संपन्न अशाच वर्गाचे येथे चित्रण झालेले दिसून येते, देवदेवता आणि राजे महाराजे यांचेच चित्रण अपेक्षित होते. परंतु अभिजातवादाचा अतिरेक होऊ लागल्यावर त्याला विरोध म्हणून स्वच्छंदवादाचा उदय झाला. सहाजिकच कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला की, तिच्या विरोधात प्रतिक्रिया उमटतातच. अभिजातवादातील साहित्यविशेषांचे अतिरेकामुळे, आग्रहामुळे व त्यांना कर्मकांडातील सांकेतिकता प्राप्त झाल्याने वैगुण्यात रूपांतर झाले. साचेबंदपणा,

नियमांचा जाच, निर्जीव अनुकरण, जीर्णसंकेताचा बडिवार, कलाहीनता, नावीन्याचा अनादर इत्यादी वैगुण्यांचा प्रतिकार करण्यामधून साहित्यक्षेत्रात स्वच्छंदवादांचा उगम झाला

स्वच्छंदवादाला इंग्रजीमध्ये रोमँटिसिझम असे म्हणतात. अभिजातवादाला जसा एक दर्जेदार अर्थ आहे. तसा भारदस्त अर्थ रोमँटिक या शब्दाला नाही. अव्यवहारी, असंभाव्य, अतिरंजित, चमत्कारिक इ. थोडेसे कमीपणाची छटा असलेले अर्थ या शब्दांतून प्रतीत होतात.

स्वच्छंदवादी साहित्यालाच मराठीत रंजनवादी साहित्य असा पर्यायी शब्दप्रयोग केला आहे.मराठी साहित्यात बाळकृष्ण कोल्हटकर, प्र.के.अत्रे, ना.सी.फडके असे अनेक लेखक रंजनवादी प्रवाह गतिमान करण्यात रमले असे दिसून येते.पर्यायाने हाच रंजनवाद मराठी साहित्यातूनच ग्रामीणललित साहित्यात झिरपत आला असे लक्षात येते.

लेखकांना आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्यांच्या अंगी असलेल्या कल्पना सामर्थ्यासह कलाकृतीत प्रकट करीत असतो. हे करीत असताना वास्तवानुभवापेक्षा कल्पना सामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भूतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता या घटकांचाही लेखकाच्या लेखन प्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो.

प्रत्येक लेखकांची लेखन प्रेरणा ही वेगवेगळी असते. ना.वि.कुलकर्णी, र.वा.दिघे, ग.ल. ठोकळ, म.भा.भोसले या लेखकांनी फडके– खांडेकर यांच्या प्रभावाखाली लेखन केले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जीवनानुभवाला रंजक स्वरूपामध्ये मांडण्याची त्यांची धडपड प्रत्ययाला येते. रंजकता आणि कल्पनारम्यता यांचे तंत्र आदर्श मानून आपल्या कथा कादंबऱ्यांमधून ते मांडण्याचा प्रयत्न या लेखकाचा दिसून येतो. त्यामुळे प्रत्यक्ष ग्रामजीवनातील अज्ञान, भयावह दारिद्रय याकडे दुर्लक्ष होते.

उद. र.वा.दिघे यांच्या सराईत वास्तवापेक्षा प्रणय प्रसंग आणि कोर्ट कज्ज्यांचे प्रसंग चित्रणावरच भर दिसतो. काही प्रमाणात पाणकळा याला अपवाद म्हणता येईल. ग.ल.ठोकळांची गावगुंड आणि म.भा.भोसले यांची उघड्या जगात या दोन कादंबऱ्यांत प्रणयप्रसंगावरच भर दिसतो. रंजकता आणि कल्पनारम्यता यांचे तंत्र आदर्श मानले आहे. रणजित देसाई आणि अण्णाभाऊ साठे वेगळ्या वळणाने जात असले तरी कल्पनारम्यता आणि भडक नाट्यात्मकता

यामुळे ते वास्तवापासून दूर जातात. जीवनचित्रणात विविधता असली तरी फडके तंत्राचा प्रभाव त्यांच्या लेखनातही दिसतो. प्रारंभापासून ते आजतागायत फडके तंत्राचा प्रभाव कमी अधिक प्रमाणात ग्रामीण सातत्यावरही दिसतो.

वास्तविक १९६० नंतर ग्रामीण साहित्याचा प्रवाह नावारूपाला आलेला दिसून येतो. त्या अगोदर ग्रामीण साहित्य लिहिले जात नव्हते असे नाही. सुरुवातीच्या काळात ग.ल.ठोकळ, र.वा. दिघे यांनी ना.सी. फडकेच्या तंत्रवादाचा अंगीकार करून मराठी ग्रामीण साहित्यात रंजनवाद आणला. ग.ल.ठोकळांनी ग्रामीण कथा लिहिताना वास्तवापेक्षा नाट्यपूर्ण घटनांना विशेष महत्त्व दिले. केवळ प्रेम प्रकरणे, बारा भानगडी आणि कल्पनारम्य गोष्टीत त्यांची कथा जास्त रमताना दिसते. अद्‌भूतता ही त्यांच्या कक्ष्येत ओतप्रोत भरलेली दिसून येते. निसर्गवर्णन अगर व्यक्तीवर्णनातून काव्य, कल्पकता, रांगडेपणा, रानदांडगेपणा, जुलूम, जबरदस्ती, शक्तीचे प्रयोग या गोष्टीचे प्राबल्य त्यांच्या साहित्यात मोठ्या प्रमाणात दिसून येते. अत्यंत चमकदार, उमपा प्रचुर, दणकेबाज ग्रामीण भाषेतून त्यांची कथा व्यक्त होते. आकर्षक आरंभ, घटनांची मन रमवून टाकणारी मालिका, तसाच चटकदार शेवट असा त्यांच्या कथेचा आदी-मध्य-अंत असतो. वास्तवापेक्षा अद्‌भूतता, व्यक्तीपेक्षा घटना, अर्थपूर्णतेपेक्षा कल्पनाजन्य काव्यमयता, नाट्यपूर्णता यांचे त्यांना आकर्षण फार दिसते. यामुळेच त्यांची कथा ग्रामीण वास्तवापासून, ग्रामीण जीवनदर्शनापासून बाजूला सरकते नि वाचकाच्या मनाची पकड घेत घेत अधिक अधिक मनोरंजक होत जाते.

ग.ल.ठोकळांवर केवळ ना.सी. फडकेचांच प्रभाव होता असे ही नाही. तर इंग्रजी वाङ्‌मयाचाही प्रभाव होता. हे त्यांच्या मनोरंजनवादी प्रवृत्तीच्या लेखनातून दिसून येते. अगदी थॉमस हार्डीचाही त्यांच्यावर प्रभाव जाणवतो. शृंगार-प्रेम याच गोष्टी त्यांच्या लेखणीला जवळच्या वाटल्या. साहित्य हे मानवी जीवनदर्शनासाठी असते. याचा जणूकाही त्यांना विसर पडला की काय असेच जाणवत राहते. म्हणूनच की काय ते मानवी जीवनाच्या दर्शनापेक्षा वाचकांचे मनोरंजन करण्यात रमताना, दिसतात. गावगुंड, ठिणगी, टेंभा आणि त्यांच्या इतर कथा कादंबऱ्याही याला अपवाद नाहीत.

**अण्णाभाऊ साठे:-**

अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी संदर्भात डॉ.रवींद्र ठाकूर लिहितात, गावागावांच्या आणि घराणांच्या आपसातील वैराच्या कहाण्या हा त्यांच्या

अनेक कादंबऱ्यांचा विषय आहे. ही वैरे कधी प्रतिष्ठेसाठी तर कधी अब्रूसाठी खेळली जातात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये संघर्ष आणि त्यातून उद्भवणाऱ्या नाट्यमय घटनांना साहजिकच प्राधान्य मिळते. अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांची रचना अशी रंजनानुकूल आहे. रूपसुंदर नायक-नायिका, प्रणय प्रसंग, रहस्ये, योगायोग हे रंजनाचे सांकेतिक घटक ते टाळू शकलेले नाहीत. अर्थात, फकिरा, वारणेचा वाघ असे काही अपवादही नोंदविता येतात.

**द.ता.भोसले**

प्रामुख्याने ग्रामीण कथाकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या द.ता. भोसले यांनी मी आणि माझा बाप (१९६९) ही उत्कृष्ट ग्रामीण कादंबरी लिहिली आहे. तसेच इथे फुलांना मरण जन्मता (१९८५) ही त्यांची कादंबरी रमा या ग्रामीण युवतीच्या दुर्दैवाची कहाणी आहे. दोन्ही कादंबऱ्यांवर रंजन प्रवृत्तीचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

**चंद्रकांत काकोडकर**

निसर्गाकडे कुणाच्या स्वातंत्र्यासाठी, गोमतका जागा हो (१९५०) अन्नपूण (१९६०) या गोमतकीय प्रादेशिक कादंबऱ्या रंजनवादाच्या प्रभावातून मुक्त होऊ शकल्या नाहीत.

**सुभाष भेंडे**

सुभाष भेंडे यांच्या आमचे गोंय आमकां जाय (१९७०) व जोगीण (१९७४) या दोन कादंबऱ्या गोमंतकीय वास्तव चित्रण करीत असल्या तरी फडके तंत्राचा प्रभाव त्यावर स्पष्ट दिसतो.

**बाबा कदम**

बाबा कदम यांनी विविध स्वरूपाचे कादंबरी लेखन केले आहे. रंजक, कथानकाची निर्मिती हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट असते. राही (१९६९), प्रलय (१९६२), दगा (१९७४) आणि इतरही कादंबऱ्यांना रंजनवादी प्रवृत्ती टाळता आलेली नाही. देवदत्त पाटील यांच्या संघर्ष (१९७९), फेरा (१९७९), व्याध (१९८०), सिद्धनाग (१९८०) या कादंबऱ्या देखील बाबा कदमांच्या कादंबरी

प्रमाणेच आहेत. या संदर्भात डॉ.रवींद्र ठाकूर लिहितात. अण्णाभाऊंच्या कादंबरीतही सनसनाटी घटना येतात. परंतु त्या निदान कधी काळी घडलेल्या असतात किंवा घडू शकतील, अशा तरी असतात. परंतु (देवदत्त पाटील) यांच्या कादंबरीतील घटना केवळ लेखकाच्या कल्पनेतच घडू शकतात. दुसरे म्हणजे अण्णाभाऊंचे कथानक मनोरंजक असले तरी त्यांची ग्रामीण पार्श्वभूमी वास्तव असते. तसेही येथे घडत नाही. येथे ग्रामीण पार्श्वभूमी फक्त कथानकाचे अनुकूल सेटींग एवढ्याच स्वरूपात व प्रमाणात येते. या सर्व कादंबऱ्या शहरी रुचिपालट म्हणूनच उदयास आल्या. अण्णाभाऊ साठे, चंद्रकुमार नलगे, शंकर खंडू पाटील, श्रीपाद काळे यांची कांदबरी फडके रचनातंत्रात अडकलेली दिसते. बाबा कदम, देवदत्त पाटील याला अपवाद नाहीत. त्यांच्या पुढचे पाऊल व.बा. बोधे होय.

सारांशः-

दलित ग्रामीण लेखकांनी रंजनप्रधान कादंबरी लेखन केले वाचकांच्या मागीबर हुकुम हे लेखन झाले. रंजनामागेही शोषण, दारिद्र्याच्या चित्रणाची भूमिका दिसते. रंजनप्रधान दलित-ग्रामीण कादंबऱ्याची संख्या अधिक दिसते. करमणुकीच्या उद्देशाने लिहिलेल्या कादंबऱ्या संख्यात्मकदृष्ट्या अधिक असल्यातरी गुणात्मकदृष्ट्या मराठी साहित्यात भर घालत नाहीत.

* * *

# ग्रामीण आणि दलित कादंबरीतील सामाजिकता एक तुलनात्मक अभ्यास

-डॉ. अपर्णा साबणे

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या सबंध समाजजीवनावरच एक वेगळा परिणाम झाला. मुळात शिक्षणाचे महत्त्व सगळयांना समजायला लागले एक विशिष्ट वर्गातच शिक्षणाची मक्तेदारी होती ती संपून तळागाळातील जनताही शिक्षणाकडे वळली. शिक्षणामुळे समाजातील विचार बदलले. समाजात एक वैचारिक प्रक्रिया सुरू झाली. सहाजिकच साहित्यावरही त्याचा परिणाम झाला. साहित्याच्याही चळवळी सुरू झाल्या. साहित्यातही अनेक प्रकार लिहिले जाऊ लागले. यामध्ये आपल्याला कादंबरी या साहित्य प्रकाराचा विचार करायचा आहे.

ग्रामीण कादंबरीचा विचार करताना महात्मा जोतिबा फुले यांचे लेखन व विचार त्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात. महात्मा फुल्यांचे लेखन तसेच त्यांचे विचार आचार लक्षात घेतले तर जळजळीत विचारांचे प्रेरणास्थान असल्याचे आपल्याला दिसते. महात्मा फुल्यांनी जो विचार मांडला त्यात त्यांनी मांडलेली अर्थनीती धर्माची केलेली चिकित्सा गोष्टी ग्रामीण साहित्याच्या विचारासाठी महत्त्वाच्या ठरतात. महात्मा फुल्यांनी आपल्या लेखनातून तसेच आपल्या व्याख्यानांमधून प्रथमच शूद्रातिशूद्रांच्या व्यथा, वेदना समाजासमोर मांडल्या. अखंड कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडले. जे काही आहे ते नशिबाने मिळालेले आहे हा विचार समाजात रूढ होता त्यावेळी महात्मा फुले यांनी दारिद्र्य हे काही दैवी नाही तर त्याचे मूळ समाज व्यवस्थेत आहे हे स्पष्टपणे सगळ्यांना सांगितले. अध्यात्मापेक्षा, समोर आलेले जीवन महत्त्वाचे आहे. भौतिकतेकडे लक्ष द्या असे ते सांगत होते. सर्वसामान्य माणूस या विचाराने भारला जात होता. ही भूमिका डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी साहित्य निर्मिती केली. ग्रामीण साहित्याची नाळ या विचारांशी जोडली गेलेली आहे.

ग्रामीण साहित्याचे चित्रण करणाऱ्या पहिल्या पिढीचे जे कादंबरीकार होते त्यांच्या साहित्यात ग्रामीण समाजव्यवस्थेतील आर्थिकदृष्ट्या जो वरचा थर म्हणजे जमीनदार, वतनदार, देशमुख किंवा सधन शेतकरी यांच्या चित्रणावर तुलनेने अधिक भर दिलेला आढळतो. त्यातही त्यांचे गूलछबू आणि रंगेल-आडदांडजीवन चित्रित करण्यावर भर दिलेला आढळतो. त्यामागे समाजातील

इतर स्तर कमी चित्रित झालेले दिसतात. दुष्काळाशी तोंड देता देता कर्जबाजारी झालेला छोटयाशा कोरडवाहू जमिनीचा हतबल शेतकरी फारसा आढळत नाही. परावलंबी जीवन जगणारा आणि शोषणाची शिकार झालेला शेतमजूर फारसा चित्रित झाला नाही. शेतीवर अवलंबून असणारे बलुतेदार, फिरस्ते यांना साहित्यात फारसे स्थान नव्हते. 'पाणकळा' सारख्या कादंबरीत र.वा.दिघे यांनी आदिवासी जनतेचे चित्रण केलेले असले तरी त्यांच्या भीशण दारिद्रयावर व निर्दयपणे होणाऱ्या शोषणावर भर दिला आहे असे जाणवत नाही. तेथे प्रेमप्रकरणावरच अधिक भर दिल्यासारखा वाटला, हे विसरता येत नाही. या उलट बोराडे सामान्य शेतकऱ्याच्या जगण्याच्या मूळ प्रश्नालाच हात घालतात. हे जगणे असह्य करणाऱ्या दारिद्रय विवंचना व कौटुंबिक ताणतणाव यांना केंद्र स्थानी ठेवून आपल्या कादंबरीची रचना करतात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप प्रथमदर्शनी वेगळेपणाने उठून दिसते.

१९८० ते १९९१ हा कालखंड ग्रामीण कादंबरीच्या दृष्टीने विशेष असा आहे. डॉ. आनंद यादव यांची 'नटरंग', 'सावट', 'चारापाणी'– रा रं बोराडे, विषवृक्षाच्या मुळ्या वासुदेव मुलाटे. 'पांगिरा', 'झाडाझडती', 'भंडारभोग', 'चौंडक'– राजन गवस, राजन गवस यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होणारी देशीयता हा त्यांच्या कादंबरी संदर्भातला महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्या कादंबरीमध्ये सामाजिक वास्तवाची प्रचंड जाण आहे आणि ती खोलवरची आहे. 'झुलवा'– उत्तम बंडू तूपे, 'कावड'– बाबू बिराजदार, 'हाल्या हाल्या दुधू दे'– बाबाराव मुसळे, अशा कितीतरी कादंबऱ्या या काळात प्रसिद्ध झालेल्या आपल्याला सांगता येतील. प्रत्येकाच्या विषयाकडे पाहिले तरी आपल्याला प्रत्येकाचे वेगवेगळे असलेले विषय तसेच त्यातील समाजीवनाचे वेगळेपण पाहायला मिळेल.

तमाशाच्या जीवनावर आधारलेली डॉ. आनंद यादव यांची 'नटरंग' ही कादंबरी एक वेगळा जीवनप्रवास तसेच नाच्याच्या आयुष्याची भयानक वास्तवता यातून पाहायला मिळते. सुरूवातीस गोतावळा गाजली. परंतु नटरंग चिटपटानंतर खरी लोकप्रियता नटरंग या कादंबरीला लाभली.

द.ता. भोसले यांचे ग्रामीण लेखन महत्त्व पूर्ण आहे. खेड्यात संख्येने मोठा असणारा पण उत्पन्नाने कमी असणारा, थोडीफार कोरडवाहू शेती असणारा व दुसऱ्याच्या शेतावर शेतमजूर म्हणून राबणाऱ्या कुटुंबातील दुःख, दैन्य दारिद्रय उपासमार, नातेसंबंधातील ताणतणाव द.ता. भोसले यांनी चित्रित केले आहेत. 'इथे फुलांना मरण जन्मता' आणि ' मी व माझा बाप' या त्यांच्या कादंबऱ्या

यातील 'मी व माझा बाप' ही कादंबरी मराठीतील पहिली विनोदी कादंबरी आहे.

'विषवृक्षाच्या मुळ्या' ही वासुदेव मुलाटे यांची सहकारी चळवळीचे रूप स्पष्ट करणारी कादंबरी आहे. सहकार चळवळ खरे तर कोणासाठी तर सर्व सामान्य लोकांचा आर्थिक विकास साधण्यासाठी पण या चळवळीतून आधीच सधन असलेल्यांचा कसा विकास साधला जातो, हे विदारक सत्य आपल्याला दिसते. ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांची प्रगती व्हावी, त्यांनी आर्थिक स्थिरता मिळावी यासाठी सहकारी चळवळीचा महाराष्ट्रात जन्म झाला. पण भ्रष्टाचाराबरोबरच सहकारक्षेत्रातील बजबजपुरी, क्षुद्र मनोवृत्तीचा नोकरवर्ग राजकीय स्वार्थासाठी या सहकाराचा होत असलेला वापर आणि विषण्ण असलेल समाजमन याचे चित्र कादंबरीत आहे.

धरणग्रस्तांच्या प्रश्नाला वाचा फोडणारी 'झाडाझडती ही विश्वास पाटलांची कादंबरी धरणाखाली आपले गाव गेल्यानंतरची लोकांची झालेली मनस्थिती पैशापेक्षा प्रिय असेलेली आपली काळी आई तसेच आपले परंपरागत गाव हे लोकांना महत्त्वाचे वाटते. कोणतीही चूक नसताना आपले सर्वस्व सोडून या धरणग्रस्तांना स्थलांतरीत व्हावे लागते. मोठा वृक्ष उपटून दुसऱ्या ठिकाणी लावल्यावर त्या वृक्षाची काय अवस्था होईल? तशी अवस्था या लोकांची होते.

'अंधार इथला संपत नाही' ही सुरेश पाटील यांची कृषक समाजाच्या अवनतीचा सर्वंकष शोध घेणारी कादंबरी आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या यावर विचार करायला लावणारी व समाजभान देणारी ही कादंबरी आहे. वसाहतववादी आधुनिकीकरणाचे अनिष्ट परिणाम आणि त्यातून उद्‌भवलेले कृषिवलांचे नष्टचर्य हे कादंबरीचे केंद्रिभूत तथ्य आहे. बदलत्या ग्रामजीवनाचा वेध या कादंबरीत आहे.

आताच्या काळाचा विचार केल्यास डॉ. प्रतिमा इंगोले यांची 'बोडकी' ही कादंबरी एका चांभाराच्या जीवनाची वाताहात दाखविणारी कादंबरी आहे. मशीनवर चपला शिवल्याने डोमाची झालेली शोकांतिका आहे. घराचा कर्ता पुरुष तुरूंगात गेल्यावर त्याच्या बायकोचा नराधमने घेतलेला फायदा समोर अन्याय होत आहे हे दिसत असूनही गप्प बसणारे शंढ मन या कादंबरीतून आपल्याला दिसते. 'मले वाटते आपलया गावात आपला निभाव लागनार नायी. एक तं आपली जात पायली चांभार अपल्यापेकसी ते लोक उच्चा जातवाले पळतेत आन प्यली लढाई तेच जिंकतेत. त्यातच आपुन गरीब आहो त्यांने आपल्याले मजुरीले म्हना की जोळे इक्याले म्हना दुसऱ्याच्या दाठ्ठयात जानं

भाग हाये. त्यात आपल्यावर आलेल्या आफतीमुळे आन झालेल्या बदनामीमुळे आपुन आंधीच खचलो हावो. तसंच तं कोनाले तोंड दाखवावं वाटत नायी. मंग दोन हात कसे करावं वाटतीन? (बोडखी)

ग्रामीण लेखनाची प्रेरणा जशी महात्मा जोतिबा फुले यांच्यापासून सुरू होते तशी दलित लेखनाची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून सुरू होते. ग्रामीण कादंबरीतून खेड्यातील जनजीवनाचे सुखदु:ख रेखाटले परंतु त्याच खेड्यातील गावकुसाबाहेर असणारा अस्पृश्य समाजाबद्दल केवळ एक जाणीव म्हणून लिहिले. त्या पलीकडे त्याला स्थान दिले गेले नाही.

१९६० नंतर दलित साहित्याचे वळण परंपरागत साहित्यापेक्षा वेगळे होते. साहित्याच्या अभिव्यक्तीत बदल झालेला होता. दलित, अस्पृश्य यांच्या कोंडलेल्या मनाचा एक भावनिक स्फोट दलित कादंबरीतून दिसू लागला. आजपर्यंत सर्वच बाजूने कोंडला गेलेला माणूसच लेखक बनून पुढे आला. सुंदर भावनांनी नटलेल्या कादंबरीला एक राकट स्वरूप प्राप्त झाले. दलित समाज ठळकपणे कादंबरीच्या माध्यमातून समाजापुढे येऊ लागला. मध्यमवर्गीय माणसाचे जीवन कधीच दलितांच्या वाट्याला आलेले नव्हते. समाजात राहूनही तो समाजाच्या बाहेर होता, बहिष्कृत होता. दलितांच्या या भावना एकट्या लेखकाच्या भावना म्हणून आल्या नाहीत तर त्या समूहाच्या भावना म्हणून आल्या. कादंबरीमध्ये जीवनाचे व्यामिश्र दर्शन घडते. त्यामुळेच दलित कादंबरीला हत्याराचे स्वरूप प्राप्त झाले. सामाजिक जाणिवा आपल्या बांधवांमध्ये निर्माण करून त्यांना जीवन लढाईसाठी प्रवृत्त करणे, अन्यायाविरुद्ध पेटून उठायला लावणे ही भूमिका दलित लेखकाची आहे.

मुरलीधर जाधव यांनी 'कार्यकर्ता' या कादंबरीत दलित समाजाला नि:स्वार्थी पुढारीपण लाभत नाही याचे चित्रण केले आहे. "त्याच्या खिशात पैसा नाही पोटात अन्न नाही. सरकारी हॉस्पिटलमध्ये गेला. ओळखी भरपूर, त्यामुळे ताबडतोब औषधपाणी सुरू झाले. पोरगी पाचसहा दिवसांनी पूर्ण बरी झाली. पण त्या रात्री तापात तिला ताबडतोब उपचार झाले नाहीत, त्यामुळे तिची दृष्टी कायमची गेली."(कार्यकर्ता) दलितांमधील ऐक्य टिकविण्यासाठी धडपड करणाऱ्या आंबेडकरी प्रेरणेच्या एका कार्यकर्त्याची ही हकिकत अस्पृश्य आणि स्पृश्य यांच्यातील संघर्ष, दलितांची अवहेलना हे तर आहेच, पण याच बरोबर दलितांनी दलितांमध्ये पाडलेल्या फुटीचे दु:ख जास्त आहे.

'नापत' ही बळवंत कांबळे यांची कादंबरी देवदासींच्या जीवनावर लिहिलेली. संपूर्ण गाव इनामदाराच्या ताब्यात असलेले. इनामदाराचे म्हणणे

म्हारा, मांगांना कधीच टाळता आलेले नाही. पण पारू संपूर्ण परंपरेला छेद देते आणि इनामदाराला कायद्यामध्ये गोवून त्याला पापाचे प्रायश्चित्त करायला लावते. बलुतेदारी पद्धतीने सामाजिक आणि आर्थिक असे दोनही चटके या समाजाला सोसावे लागत होते. ढोरे, म्हशी मेल्याचा म्हारा, मांगांना आनंद होत असे कारण कमालीचे दारिद्रय त्या मेलेल्या जनावरांचे मांस त्यांना त्यातून खायला मिळते. एक दिवस बाहेर पडतो. दलित जन्मभर अन्याय आणि अत्याचार सहन करत होते. पण त्यांनी दुसऱ्या बद्दल कधी तक्रार केली नाही. अर्थात तसे करण्याची हिंमत कोणाची नव्हती. ही दैन्यावस्था नाहिशी होण्यासाठी कोणीतरी पुढे आले पाहिजे यासाठी पारू पुढे येताना लेखकाने दाखविली आहे.

केशव मेश्राम यांची 'हकिकत व जटायू' ही सामाजिक बांधिलकीची कादंबरी आहे. 'हकिकत' ही कादंबरी अकोला जिल्ह्यात महार वस्तत वाढलेल्या अनामिक नायकाचे आत्मकथन आहे. तर 'जटायू' ही ही अभिमानाची कथा आहे. या दोनही लघु कादंबऱ्या आहेत. 'हकिगत' मधील नायक लहानपणापासून समजायला लागले आणि हा नायक शाळेत जाऊ लागला तेव्हापासून तक कॉलेजजीवनापर्यंत जे अनुभव वाट्याला आले ते तसे तसे तसे मांडले आहेत. प्रत्यक्ष रूपाने याला एक जिनसी कथानक नाही. पण आत्मचरित्रात्मक कादंबरी असल्याने जे अनुभव आले ते तसेच्या तसे मांडले आहेत. दलित वस्तीतील मुलगा हा त्यांच्यातील असूनही वेगळा आहे. तो संघर्ष करत शिक्षण घेतो. आपली वस्ती सुधारावी असे त्याला वाटत असते.

'जटायू' या कादंबरीला मात्र एकसंधपणा, एकात्मता, बांधेसूदपणा आहे. ही प्रभावी कादंबरी आहे. ही प्रतीकात्मक कथा आहे. जटायूचे पंख छाटून त्याला जसे घायाळ केले तसेच अभिमानही सर्व बाजूंनी घायाळ झालेला आहे. शिक्षण व सुसंस्कारित असून तो काहीच करू शकत नाही ही त्याची शोकांतिका आहे. 'पोखरण' ही सुद्धा केशव मेश्रामांची वेगळी कादंबरी आहे. आर्यअनार्य यांच्या प्रत्यक्ष संघर्ष परिणामचे चित्रण न करता अप्रत्यक्ष परंतु वेगळ्या पातळीवरून हे चित्रण केले आहे. वसाहतीचे चित्रण वाचताना तेथील कामाचे स्वरूप वाचताना, आपल्याला सहज शेजारच्या घरात डोकवावेसे वाटते.

ग्रामीण कादंबरीचा विचार करायचा झाल्यास असे म्हणता येईल की, ग्रामीण स्थित्यंतराशी निगडित असे महत्त्वाचे विषय ग्रामीण कादंबरीकारांनी समर्थपणे हाताळले. त्याप्रमाणे या स्थित्यंतरामुळे बदललेल्या ग्रामीण मनाचाही या काळातील ग्रामीण कादंबरीकारांनी समर्थपणे वेध घेतला आहे. १९३५

मधील ग्रामीण कादंबरी स्वप्नरम्यतावाद आणि ग्रामोद्वाराच्या प्रेरणेने ग्रामजीवनाचे चित्रण करत होती. साठ नंतर ग्रामीण व्यावसायिक, कष्टकरी मजूर, माळावरच्या भटक्या जमाती, सामाजिक प्रथांनी ज्यांचे जीवन कुस्करून टाकले आहे अशा देवदासी दलितांचे जीवन तसे दु:ख व दारिद्र्य यांनी पिचलेल्या तळागाळातल्या माणसांच्या वेदना व्यक्त करताना दिसते. ऐंशी नंतरच्या कादंबरीत हा सूर जास्त भेदक व तीव्र झाला आहे. या कादंबरीत सहकारक्षेत्रातील उच्चपदस्थ, शासकीय यंत्रणा व अधिकारी, राजकीय नेते यांचा वावर वाढलेला दिसतो. गावाबाहेरच्या भटक्या जमाती आणि ग्रामीण जीवनाची सूत्रे हाती बाळगणारे सत्ताधारी अशा दोन्ही टोकांकडे ती लक्ष देते. या ग्रामीण कादंबरीत उच्चवर्णीयांचे चित्रण अगदी विरळ होताना दिसते. दुष्काळ, शेतकऱ्यांची आंदोलने, राजकारणाचे बदलते रंग, निवडणुकांच्या चित्तरकथा, नवजागृत समाजाची शिक्षणाची आस नवशिक्षितांची ओढाताण, बेकारी सहकारक्षेत्रातील भ्रष्टाचार, शासकीय यंत्रणेचे अंतरंग अशा कितीतरी गोष्टींचे चित्रण या कादंबरीत दिसते. ती अधिक सामाजिक झाली आहे. बदललेले वास्तव, जागरूक लेखक ही त्यामागची कारणे आहेत. या ग्रामीण कादंबरीत निसर्गाला इतके महत्त्वाचे स्थान राहिलेले दिसत नाही. यातील परीसर प्राधान्य उताराला लागलेले दिसते.

दलित कादंबरीने सामाजिक पार्श्वभूमीला मोठे महत्त्व दिले आहे. दलित कादंबरीत समूहमनाचे तसेच समाजातील दलितांचे स्थान याचा विचार केलेला दिसतो. तिच्यात सामाजिक वास्तवावर भर दिलेला असतो. खेड्यातील जीवन, त्यातून होरपळणारे अस्पृश्य यांच्या वास्तवावर ही कादंबरी उभी आहे. दु:खाचा प्रचंड अनुभव घेऊन ते समूहाची जाणीव तितक्यात तन्मयतेन आणि न्यायाने व्यक्त करतात. खरा संघर्ष एका समूहाचा दुसऱ्या समूहाशी नसून मूळ संस्कृतीशी आहे हे लक्षात घ्यावे लागते. दलित कादंबरी सामाजिक आशयाच्या वातावरणातून वास्तवतेची पार्श्वभूमी घेऊन अवतरते. देव, धर्म, जात याबद्दल कोठेही ही माणसे अभिमान बाळगत नाहीत. कोणत्याही दु:खाला समर्थपणे सामोरी जातात. मराठी साहित्याने आजवर जे लिहिले नाही असे काहीतरी अनोखे दलितांच्या जीवनात आहे. जाणिवेत आहे.

* * *

# ग्रामीण दलित कादंबरी आणि समाजपरिवर्तन

-डॉ.दत्तात्रय गंधारे

**प्रास्ताविक -**

१९६० नंतर ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी, आदिवासी असे नवप्रवाह मराठी साहित्यात निर्माण झालेले आहेत. मध्यमवर्गाच्या बाहेर जाऊन समाजाच्या सर्व थरातील जीवनाचे वास्तव चित्रण त्यांनी केले. या नवप्रवाहांनी अठरापगड जातींची सुखदु:खे प्रकर्षाने मांडली. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले नवपरिवर्तन सर्व घटकांना नवी दिशा देणारे ठरले. पिढयान् पिढया सर्व घटकांपासून वंचित असलेल्या समाजाचा हुंकार साहित्यातून दिसू लागला. या नवप्रवाहामागे सामाजिक परिस्थिती होती आणि जीवनाच्या नव्या प्रेरणा होत्या. यातून स्त्रिया, दलित व श्रमिक यांना सामावून घेणारी साहित्यपरंपरा उदयास आली.

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने ग्रामीण, दलित हे नवप्रवाह उदयास आले. या प्रवाहांनी सामाजिक विषमतेचा निषेध करून प्रचलित साहित्याची जगाला ओळख करून दिली. ग्रामीण व दलित साहित्य प्रवाहाने कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मकथन या वाङ्मय प्रकारात लेखन करून समाजवास्तव दाखवून समाजपरिवर्तनाची दिशा दिली. या नवप्रवाहापूर्वी मराठी साहित्याचे लेखक व वाचक पांढरपेशा वर्गातील होते. खेडयाचे, दलितांचे व उपेक्षितांचे चित्रण त्यातून झाले नाही. परंतु नवप्रवाहाने साहित्याला समाजपरिवर्तनाची जोड दिली.

**२. ग्रामीण साहित्य -**

ग्रामीण आणि दलित साहित्याला समाजपरिवर्तनाच्या पुरोगामी चळवळीची प्रेरणा मिळालेली आहे. ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणा महात्मा फुले यांच्या साहित्यापासून दिसून येतात. महात्मा फुले हे रूढ अर्थाने ग्रामीण लेखक नव्हते ते समाजजीवनाचे भाष्यकार आणि सुधारक होते. त्यांनी समाजातील उपेक्षित समाजाबद्दल लेखन केले. आनंद यादव हे महात्मा फुले यांना आधुनिक देशी मराठी साहित्याचे आदय जनक संबोधतात. ग्रामीण अस्मितेचा आविष्कार प्रथम महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातून प्रकट झाला.

महात्मा फुले यांच्यापासून ते कर्मवीर भाऊराव पाटलांनी केलेला शिक्षणप्रसार यातून प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्य निर्माण होऊ लागले. याविषयी डॉ.र.बा.मंचरकर लिहितात, ग्रामजीवनाचे अस्सल अनुभव गाठी असलेल्या या ग्रामीण लेखकांना नवसाहित्याने निर्माण केलेल्या नव्या कलाविषयक जाणिवांचा संस्कार घडला. त्यांच्या एकमेकांतून सामाजिक जाणिवांना कलात्मक रूपसिद्धी देणारे ग्रामीण साहित्य नवसाहित्याने घडविलेल्या परिवर्तनाचा एक भाग म्हणून सामोरे आले. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले यांनी कलात्मक व अस्सल अनुभव असणारी निर्मिती केली. ग्रामीण साहित्यात आत्मकथा व नाटक हे वाङ्मय प्रकार तितकेसे फुललेले दिसत नाही. पण कथा, कविता, कादंबरी हे वाङ्मय प्रकार वाचकांचा ठाव घेणारे ठरले. यातून समाजवास्तव लेखक मांडू लागले.

आनंद यादव, ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ, शंकर बडे, इंद्रजीत भालेराव, सदानंद देशमुख यांसारख्या ग्रामीण कवींनी कवितेतून ग्रामजीवनाचे वास्तव दर्शन घडविले आहे.

ग्रामीण साहित्याची चळवळ १९७० नंतर अधिक गतिमान होत गेली. त्यातून ग्रामीण समाजाचे प्रश्न प्रकर्षाने मांडले जाऊ लागले. ग्रामीण साहित्य गावातील व गावाबाहेरील माणसांच्या व्यथा-वेदना मांडणारे व जाणीवा व्यक्त करणारे साहित्य आहे. तसेच बदलते ग्रामजीवन साहित्यातून प्रकटत आहे.

### ३. दलित साहित्य -

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे सर्वंकष बंड आणि वैचारिक आंदोलन उभारले, त्यातून दलित साहित्याची निर्मिती झाली. १९६० नंतरच्या मराठीतील नवप्रवाहापैकी हा एक महत्त्वाचा प्रवाह मानला जातो. दलित जाणिवेतून निर्माण झालेले दलित जीवनविषयक साहित्य म्हणजे दलित साहित्य होय. दलित साहित्य हे गतिशील चळवळीचे प्रतिबिंब असणारे साहित्य आहे. अशा दलित साहित्याने माणूस हेच मूल्य मानले. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने दलित साहित्याला अधिष्ठान लाभले.

आज दलित साहित्यिक मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. कविता, आत्मकथन या वाङ्मय प्रकारात अधिक लेखन झालेले आहे. याविषयी दया पवार लिहितात, आज तरी दलित साहित्याचे बलस्थाने

कविता आणि आत्मकथने आहेत हे नाकारता येत नाही. अलीकडे 'कोण म्हणतं टक्का दिला' किंवा किरवंतसारखी नाटके हे ही या चळवळीमुळे उपलब्ध झाली आहेत. दलित साहित्याची चळवळ ही आत्मकथनाच्या आवर्तनातून बाहेर पडून ती कादंबरीसारख्या विस्तृत प्रवाहात परावर्तित होतील तेव्हा दलित साहित्याला निश्चित बळ मिळणार आहे. आजच्या पिढीतील दलित कवी, लेखक निर्भयपणे लेखन करू लागले आहेत. यामागे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आहे हे मान्य करावे लागेल. याविषयी ज्योती लांजेवार लिहितात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तीने आणि आंबेडकर नावाच्या विचाराने नवा दलित घडविला. त्यांनी माणसाला आत्मभानाची जाणीव दिली.

कथा, कवितेप्रमाणे दलित कादंबरी लेखन म्हणावे तेवढे झाले नाही.

## ४. ग्रामीण कादंबरी व समाजपरिवर्तन –

फुले–आंबेडकरवादी विचारातून ग्रामीण, दलित, स्त्रीवादी या नवप्रवाहांची निर्मिती झाली. यामागे बदललेली सामाजिक परिस्थिती होती. ग्रामीण व दलित कादंबरीतून समाजपरिवर्तनाचा पट मांडत असता या दोन्ही प्रवाहातील कादंबरीतून परंपरागत व बदलत्या जीवनाचे वास्तव अनुभव उलगडत गेले.

महात्मा फुले यांनी इ. स. १८८३ साली 'शेतकऱ्याचा असूड' हा वैचारिक ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे वर्णन केले आहे. शेतकऱ्यांच्या अवनतीला कारणीभूत असलेली सामाजिक परिस्थिती महात्मा फुले यांनी ग्रंथातून मांडली. या त्यांच्या ग्रंथात कादंबरीचे गुण अवतरले आहेत. याविषयी स.ग. मालशे लिहितात, शेतकऱ्याच्या असूड' चा नावीन्यपूर्ण भाग म्हणजे शेतकऱ्याच्या अवनत स्थितीचे वास्तव चित्र, त्या अवनत स्थितीची केलेली मूलग्राही चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यास्तव सुचविलेली उपाययोजना हा होय. शेतकऱ्याच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीन दीन ग्रहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे ते एखाद्या वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे.

महात्मा फुले यांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडले म्हणून आनंद यादव त्यांना आधुनिक देशी मराठी साहित्याचे जनक मानतात.

ग्रामीण कादंबरीतून समाजपरिवर्तन, ग्रामपरिवर्तन व ग्रामवास्तव

मांडण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९०३ मध्ये धनुर्धारी यांनी 'पिराजी पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी लिहिली. बळीबा हा जातीभेद न मानणारा आदर्श असा माणूस होता. धर्मव्यवस्थेने समाजाची कशी फसवणूक चालविली याचे विवेचन यात आले आहे. यानंतर त्यांनी वाईकर भटजी, पिराजी पाटील या कादंबऱ्या लिहिल्या. पिराजी पाटील या कादंबरीत दुष्काळामूळे शेतकऱ्यांची झालेली वाताहत चित्रित केली आहे. यानंतरच्या काळात ना. वि. कुलकर्णी, साने गुरुजी, यांनी ग्रामीण जीवन उलगडून दाखविले.

मराठी साहित्यात वास्तवाचे अवतरण घडविणारा आणि सामाजिक बदलाशी संवाद साधणारा ग्रामीण साहित्याचा प्रवाह आहे. अण्णाभाऊ साठे (फकिरा) गो. नि. दांडेकर (पवनाकाठचा धोंडी), द. ता. भोसले (मी आणि माझा बाप), उद्धव शेळके (बाईविना बुवा, धग), शंकर पाटील (टारफुला), हमीद दलवाई (इंधन), ना. धो. महानोर (गांधारी), रा. रं. बोराडे (पाचोळा), आनंद यादव (गोतावळा) यासारख्या ग्रामीण कादंबरीकारांनी ग्रमीण संवेदनशीलतेशी अधिक घट्ट असे नाते जोडले. आधुनिकीकरणाने ग्रामीण जीवनात घडणाऱ्या स्थित्यंतराचे दर्शन आजच्या ग्रामीण कादंबरीतून घडते. याविषयी र. बा. मंचरकर लिहितात, आधुनिकीकरणाने कात टाकणारे नवे खेडे हा फारच थोडयांचा चित्रणविषय बनला आहे. शेती, तिचे यांत्रिकीकरण, सुधारणाविषयक समस्या, कायदे, राजकारणाचा वाढता प्रभाव, विविध जाती-वर्ग यांच्या संबंधातील तणाव यांचे चित्रण अपवादात्मकच आहे. भारतीय खेडयांची ही संक्रमणावस्था चित्रित करावयाची तर भक्कम बौद्धिक आकलन व चौफेर अवलोकन हवे. काळाच्या निकटत्त्वामुळे कदाचित आज ते करणे ग्रामीण लेखकांना शक्य होत नसावे. यासाठी बदलत्या खेडयाचे चित्र रेखाटवयाचे असेल तर सर्व प्रश्न साहित्यात येणे गरजेचे आहे. बदलत्या ग्रामजीवनाविषयी आनंद यादव लिहितात, या बदलत्या खेडयांचे सामाजिक वास्तव ग्रामीण साहित्यिकांनी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या साहित्याचे स्वरूप आंतर्बाह्य बदलण्यास मदत होईल हे उघडच आहे. अशा प्रयत्नातूनच घटनांचा अनुभवांचा नवा अन्वयार्थ लागत जातो म्हणून बदलते खेडे आपल्या साहित्यातून आले पाहिजे. बदलत्या ग्रामजीवनाचा आलेख सजगपणे मांडला गेला पाहिजे. आज बदललेल्या समाज वास्तवाला साकारणाऱ्या कादंबऱ्या मराठीत येत आहेत.

## ५. दलित कादंबरी व समाजपरिवर्तन –

सामाजिक व आर्थिक विषमतेतून उदयास आलेले दुःख या वेगळेपणाच्या वेदनेतून, अनुभवातून निर्माण झालेले दलित साहित्य हे इतर साहित्यापेक्षा वेगळे आहे. दलित साहित्यात कथा, कविता, आत्मकथा यावर विपुल लेखन झाले. परंतु दलित कादंबरी फार कमी प्रमाणात लिहिली गेली आहे. १९२५ मध्ये श्री. कृ. कोल्हटकरांनी दलित जीवनाचे चित्रण करणारी 'श्यामसुंदर' ही कादंबरी लिहिली. वि. स. खांडेकर (दोन मनं), वि. वा. हडप (पारिजातकाची फुले), वा. म. जोशी (इंदू काळे व सरला भोळे), विभावरी शिरुरकर (बळी) या लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांतून दलितांचे अनुभवविश्व मांडले आहे.

दलित कादंबरी समृद्ध करणारे अण्णाभाऊ साठे होत. त्यांची 'फकिरा' ही कादंबरी अन्यायाविरुद्ध पेटून उठलेल्या वारणेच्या वाघाची कथा सांगते. अण्णाभाऊंची माणसं समाजाच्या तळागाळातील आहेत. त्यांची भूक, क्रूरता, आगतिकता, वासना, विकार यांची चित्रे ते थेटपणे रंगवितात. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही कादंबरी दलित व ग्रामीण जीवनाचा व्यापक अनुभव मांडते. याविषयी मंचरकर वैशाली लिहितात, फकिरा ही ग्रामीण कादंबरी असली, तरी प्रदेशनिष्ठेने ती मर्यादित झालेली नाही. त्यापलीकडे जाऊन व्यापक मानवी जीवनाचे दर्शन घडविण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. 'फकिरा' ही दलित कादंबरी असली तरी केवळ जातीय जाणिवांनी ती मर्यादित झालेली नाही. जातीय जाणिवांबरोबरच वर्गीय जाणिवांचेही चित्रण 'फकिरा' मधून आलेले आहे. अशी ही अण्णाभाऊ साठे यांची कादंबरी ग्रामीण व दलित जाणिवा मांडता मांडता खुल्या जीवनदृष्टीचा अनुभवही व्यापकपणे मांडत जाते.

१९६० नंतर च्या काळात बाबुराव बागूल (सूड), केशव मेश्राम (पोखरण), अशोक व्हटकर (मेलेलं पाणी), प्रेमानंद गज्वी (जागर), भीमसेन देठे (इस्कोट), मि.शि. शिंदे (अमृतनाक), माधव कोंडविलकर (अनाथ), नामदेव ढसाळ (हाडकी हाडवळा), नामदेव कांबळे (राघववेळ) या काही दलित लेखकांनी दलित जीवनाचे प्रश्न कादंबरीतून मांडले आहेत.

आजही मराठीत दलित कादंबरी मोठया प्रमाणात निर्माण होतांना दिसत नाही. दलित लेखकांनी आपले उत्कट अनुभव आत्मकथनात अधिक मांडले. स्वतः भोगलेले अनुभव त्यांनी आत्मकथनातून मांडले. याबरोबरच कादंबरी वाङ्मयाकडे गंभीरपणे दलित लेखकांनी पाहिल्यास तीही विकसित

होऊ शकते.

वर्णव्यवस्था व जात हे समाजाचे वास्तव रूप आहे. यामुळे माणसाची अवहेलना, वाटयाला येणारे दु:ख दलित कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र राहिले आहे.

परिवर्तनाच्या चळवळीमुळे दलितांना जे आत्मभान आले त्याचा परिणाम म्हणून दलित कादंबरीकार आपल्या सभोवतीचं वास्तव न्याहाळू लागले. त्यांच्या मुक्तीलढयांचा आविष्कार कादंबरीतून येऊ लागला. दलित साहित्याने परंपरेला नकार दिला. त्यातून परिवर्तनाला दिशा मिळाली.

**समारोप –**

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने अनेक नवप्रवाहांचा उदय झाला. त्यात ग्रामीण व दलित साहित्याचे प्रवाह एक प्रेरणा घेऊन उदयास आले. ग्रामीणांच्या हृदयाची स्पंदने महात्मा फुले यांनी मांडली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित साहित्याची निर्मिती झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे दलित साहित्याला नवचेतना मिळाली. दलित साहित्यातून आत्मशोधाचे स्वरूप प्रकट होऊ लागले. साहित्य निर्मिती ही त्याच्या जगण्याशी, त्यामागील जीवनधारणेशी जोडलेली असते. अशा दलित कादंबरीतून वेदना आणि विद्रोहाचा हुंकार आपणाला बघावयास मिळतो. अशा या दलित कादंबरीला समृद्ध करण्याचे काम अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांनी प्रारंभीच केले. दलित कादंबरीतून लेखकांनी आपल्या वाट्याला आलेले दैन्य, दु:ख व दास्य मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांना खतपाणी घालण्याचे काम साहित्याने केले. स्वकालाचे भान व अनुभवाची भाषा मिळाल्यामुळे समाजपरिवर्तनपर साहित्य निर्माण होऊ शकले. एकूणच ग्रामीण व दलित कादंबरी समाजपरिवर्तनाचे नेतृत्व करतांना आपणाला दिसते.

* * *

# 'दलित, ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता'

–प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे

कोणत्याही साहित्याला कलास्वादाच्या पातळीवर एक कलाकृती म्हणून वेगळे स्थान प्राप्त झालेले असते. शिवाय ती साहित्यकृती एक सामाजिक आकृतीबंध स्पष्ट करणारीही असते. म्हणजेच वास्तववादी सामाजिक घटना व घडामोडी संदर्भ त्यामध्ये उमटलेले असतात. त्यामुळे तात्कालीन सामाजिक मनातील आंदोलनांचा आलेख त्यामध्ये पहावयास मिळतो. जीवनातील एखादे क्षेत्र निवडून त्याचे व्यवस्थित आणि बारकाईने चित्रण करण्याची एक प्रवृत्ती १९६० नंतरच्या मराठी कादंबरीमध्ये दिसून येते. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्राचे आणि त्यामधील अपप्रवृत्तीचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या या कालखंडात प्रसिद्ध झाल्या आहेत. या कालखंडातील कादंबरी लेखन नुसते प्रसिद्ध झाले नाही तर खऱ्याखुऱ्या अर्थाने विशिष्ट भूमिका घेऊन अवतीर्ण झाली. त्यामुळे कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व सामर्थ्य स्पष्ट होऊ लागली. अनेक विषय वेगवेगळ्या अंगांनी कादंबरीलेखन बहरुन आले. ही बाब आता सर्वमान्य झाल्याचे पहावयास मिळते.

या कालखंडातील सामाजिक कादंबरीही विविध रुपे घेऊन लिहिली गेली. सामाजिक वास्तवाचे भान या कालखंडातील कादंबरीमध्ये सूक्ष्मपणे व अधिक स्पष्टपणे प्रकट झालेले आहे. सामाजिक वास्तवाची विविध रूपे या कालखंडातील कांदबरीने अधोरेखीत केली. त्यामुळे १९६० नंतरच्या कादंबरी लेखनाचा विचार करताना काही सामाजिक संदर्भ समजून घेणेही महत्त्वाचे वाटते. या कालखंडाचा विचार करावयाचा म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळून एक तप लोटले आहे. देशाचा कारभार स्वकीयांच्या हाती आल्यानंतर देशातील बरेच प्रश्न मिटतील, सामान्य जनता सुखी–समाधानी होईल, अन्न, वस्त्र, निवारा व पाणी देशातील सर्व जनतेला मिळेल. जातीयता नष्ट होऊन बंधू–भावाची संकल्पना रूढ होऊन वृद्धींगत होईल असे तमाम जनतेला वाटले होते. पण यातून एक भ्रमनिरास तोही प्रामुख्याने मध्यमवर्गीयांचा आणि दलितांचा झालेला दिसून येतो. राजकर्त्यांनी व स्वत:चा समाजसुधारक म्हणवणाऱ्या लोकांनी सत्ता, पैसा व नावलौकिकासाठी समाजहीत न पाहता स्वार्थी प्रवृत्तीला बळ दिले. यातूनच

ग्रामीण व दलित जीवनात अनेक प्रश्न व समस्या निर्माण झाल्या. या सर्व सामाजिक वास्तवाचा ग्रामीण, दलित कांदबरी लेखक सामोरा गेला. दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे स्वांतत्र्यानंतर औद्योगीकरणाचे वारे देशात वाहू लागले. त्यातून एक नवेच सामाजिक वास्तव आकाराला आले. ग्रामीण व शहरी लोकांच्या जीवनाचा संबंध एकमेंकाशी येऊ लागला. संवेदनशील व संवेदनाशून्य समाज अशी समाज जीवनाची दोन अंगे पुढे येऊ लागली या सर्व प्रक्रियेतून शहरातील झोपडपट्ट्यांसारखे प्रश्न निर्माण झाले. याचा आविष्कार कांदबरीत झालेला दिसून येतो.

१९६० नंतरचा काळ दलित, ग्रामीण कांदबरीच्या संदर्भात अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. १९४०-५० पासून तिच्यात होत असलेले बदल १९६० नंतर अधिक स्पष्टपणे दिसून येऊ लागला. त्यांचा दलित व ग्रामीण समाजात होत असलेला बदल व त्यांचा जाणिवा कादंबरी लेखनात प्रकट होऊ लागला. भाषा व शैली याबाबत अधिक जागरुक व प्रयोगशील कादंबरी निर्माण होऊ लागली. विशेषत: अण्णाभाऊ साठे 'फकिरा' (१९५९), उदव शेळके 'धग' (१९६०), रणजित देसाई 'माझा गाव' (१९६०), दि.बा.मोकाशी 'देव चालले' (१९६१), वि.शं.पारगावकर 'रथाक्र' (१९६२), भालचंद्र नेमाडे 'कोसला' (१९६३), शंकर पाटील 'टारफुला' (१९६४), हमीद दलवाई 'इंधन' (१९६५) जयवंत दळवी 'चक्र' (१९६३) या कादंबऱ्यातून हा बदा आपणास स्पष्टपणे दिसून येतो. ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात फकिरा, धग, टारफुला, इंधन या वळणावरच्या कादंबऱ्या म्हणाव्या लागतील. याच प्रवाहात १९७० नंतर रा.र.बोराडे, आनंद यादव, ना.धों. महानोर, लक्ष्मीकांत तांबोळी, चंद्रकुमार नागे, महादेव मोरे यांची ग्रामीण कादंबरी सामाजिकता व्यक्त करणारी आहे.

१९६० ते १९७० या दशकात उदयास आलेल्या दलित साहित्य चळवळीने विद्रोही जाणिवेतून गावकूसाबाहेरील आणि शहरामधील झोपडपट्ट्यातून राहणाऱ्या दलितांचे व शोषीतांचे जीवन अभिव्यक्त करण्यास प्रारंभ केला. केशव मेश्राम यांच्या 'हकिकत आणि जटायू' (१९७२) या दोन लघुकादंबऱ्यापैकी 'हकिकत' हे पहिले आत्मकथन म्हणावे लागेल. 'जटायू' मध्ये मांग समाजाच्या दैन्यावस्थेचे चित्रण येते. अशोक व्हटकर यांनी 'मेलेलं पाणी' या कादंबरीत ढोर समाजाच्या स्थितीचे आणि दलित जातीचे आपसातले संबंध कसे दुरावले आहेत याचे चित्रण केले आहे. भीमसेन देढे यांनी 'होरपळ' मध्ये धर्मांतरानंतरच्या

काळात बौद्ध व इतर सवर्ण समाज यांच्यात निर्माण झालेला संघर्ष चित्रित केला आहे. माधव कसबे यांच्या 'नकुल' मध्ये पाटालाचा मुलगा नकुल गावातील दलितांचे प्रश्न सोडवण्यासाठी झटतो. मराठा जातीयवादविरुद्ध दलितांनी दिलेला संघर्ष असे सामाजिक स्वरूप असलेली कादंबरी आहे. भाई तांबे यांच्या 'नियती' या कादंबरीतीन सदा महार हा दलित तरुण धर्मस्वीकारानंतर गावात सांस्कृतिक संघर्षास तोंड फोडतो. जे.जी. माने यांच्या 'मुक्ती' मध्ये चर्मकार समाजातील एका विधवा स्त्रीचे करारीपण व्यक्त करते. प्रेमानंद गज्वी यांची 'घागर' ही कादंबरी ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवर लिहिली गेली असून तिला नायक दत्तू आपल्या पत्नीवर बलात्कार करणाऱ्या पाटालाचा खून करतो. स्वाभिमान जागृत दलित समाजाचे चित्रण हेच बहूसंख्य दलित कादंबऱ्यांचे सूत्र आहे. 'निष्ठा' अशोक लोखंडे यांची व 'पारधी' शंकरराव खरात यांच्या या कादंबऱ्यासुद्धा सामाजिक भान व्यक्त करणाऱ्या आहेत.

दलित कादंबरी सामाजिक जाणीव अभिव्यक्त करते. तसेच याच काळातील बहुतांश ग्रामीण कादंबरीबाबतही हीच वस्तुस्थिती दिसून येते. या कादंबरीला समांतर जाणारा लोकप्रिय ग्रामीण कादंबरींचा स्वतंत्र प्रवाहातील सामाजिकताही स्पष्ट होते.

या कालखंडातील ग्रामीण कादंबरीमधील सामाजिकता पाहवयाचे म्हटले तर उद्धव शेळके (धग), हमीद दावाई (इंधन), रा.र. बोराडे (पाचोळा), आनंद यादव (गोतावळा) या नव्या पिढीतील कादंबरीमध्ये दिसून येते. रणजित देसाई यांच्या 'माझा गाव' मध्ये जमीनदार व बघ म्हण या पांढरपेशा वर्गाचे चित्रण अधिक आले आहे. परंतु उत्तरोत्तर ही प्रवृत्ती कमी होत जाऊन खेड्यातील सामान्य माणूस ग्रामीण कादंबरीचा केंद्रबिंदू बनून तिचा सामाजिकतेचे अंग प्राप्त झाले आहे. हे आपणास उद्धव शेळके, हमीद दलवाई, यांच्यानंतर पुढे आलेल्या रा.र.बोराडे, आनंद यादव, ना.धों. महानोर, सदानंद मोरे यांच्या कादंबरी लेखनात अधिक स्पष्टपणे दिसून येते.

सामाजिक परिवर्तनवादी चळवळी गतिमान झालेल्या या काळात ग्रामीण कादंबरीनेही आपली भूमिका स्पष्ट केली. समतावादी सामाजिक मूल्यांच्या प्रेरणेतून तिला बळ मिळाले. ग्रामीण नवोखकांनी या उर्जेच्या जोरावर ग्रामीण कादंबरी नव्या आयामात लिहिली. त्यामुळे आधीपासूनच समाजाभिमुख असलेल्या ग्रामीण कादंबरीचा नव्या वैचारीक मुल्याची जोड लाभली असे म्हणता येईल.

म्हणजे १९७५ नंतरची ग्रामीण, दलित, कादंबरीही संमिश्र स्वरूपाची राहिली. आनंद पाटील यांच्या 'कागूद' आणि 'सावली' (१९८६) या दोन लघुकादंबऱ्या ग्रामीण कादंबरीचा बोराडे-यादव यांच्यानंतरचा सामाजिकतेच्या दृष्टीने लक्षणीय टप्पा आहे. एखादे शेत खरेदी करताना आणि त्याचे खरेदीखत करून घेताना शेतकऱ्याला किती अडचणींना तोंड द्यावे लागते याचे वास्तवपूर्ण चित्र 'कागूद' मध्ये आले आहे. घटना नित्याची आणि साधीच परंतु ग्रामीण सामाजिकतेचे व त्याच्या जीवनाचे अस्सा दर्शन घडवून जाते. 'सावली' मधील जीवनानुभवही ग्रामीण सामाजिकता स्पष्ट करते. घर बांधून घेण्याच्या व्यापात खेड्यातील एका गरीब कुटुंबाचे प्राण कसे कंठाशी येतात याचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

ग्रामीण संवेदनशीलतेतून लेखन करणाऱ्या उदयोन्मुख ग्रामीण कादंबरी लेखकात पुरुषोत्तम बोरकर हे एक दमदार नाव आहे. त्यांची 'मेड इन इंडिया' (१९८७) ही कादंबरी तिच्या वेगळेपणामुळे चर्चेचा विषय ठरली. कादंबरीत लेखकाने कादंबरीच्या रुपाची तिच्या सामाजिक आशय स्पष्ट विषयांची जबरदस्त जाण दाखविली आहे. बाबाराव मुसळे एका शेतकऱ्याची शोकांतिका चितारणारी यशस्वी कादंबरी म्हणून 'हाल्या हाल्या दुधू दे' चा (१९८५) चा विचार करावा लागतो. या कादंबरीतील सामाजिक जीवनानुभव ग्रामीण जीवनाचा अपरिहार्य भाग आहे. अशोक व्हटकर 'मेलेलं पाणी' मधून ढोर समाजाचे जीवन शब्दरूप केलेले आहे. लेखकाने 'बगाड' (१९८४) ही कादंबरी लिहून ग्रामजीवनाचे एक वेगळे रूप वाचकासमोर ठेवले आहे. जीवघेण्या मार्मिक परंपरामध्ये जखडलेल्या कुटुंबाचे चित्रण करणारी ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे सखोल परिमाण घेऊन येते. नागनाथ कोत्तापल्ले हे एक ग्रामीण साहित्य चळवळीतील एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांच्या 'उलट चालिला प्रवाहे' (१९८५) आणि 'गांधारीचे डोळे' (१९८५) या कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. दलित वस्ती जळीत प्रकरणाची माहिती मिळवण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एका गावात गेलेल्या नारायण काल्लोळीला आजही वर्णव्यवस्थेची गढी तशीच अभेद्य असल्याचा कोलमडून टाकणारा अनुभव येतो. 'गांधारीचे डोळे' मध्ये कोत्तापल्ले यांनी राजकारणाचे हिडीस रूप व त्यातील सामाजिक जाणीवेचे बेगडीपण उघडकीस आणल आहे. राजन गवस 'चौंडक' (१९८५) आणि 'भंडारभोग' (१९८८) या कादंबऱ्या लिहून जोगतिणी आणि त्यांच्या जीवनाचे दुःखभोग चित्रित केले. वासुदेव मुलाटे यांनी ग्रामीण भागातील सहकारक्षेत्र स्वाहाकार क्षेत्र कसे बनले

आहे यांचे वास्तवपूर्ण चित्र म्हणजे 'विषवृक्षाया मुळ्या'(१९८९) ही कादंबरी होय. ग्रामीण भागाचा आर्थिक कायापालट घडविण्यासाठी सहकार चळवळ राबवली जात आहे, असे आपण म्हणतो, पण प्रत्यक्षात खरोखरच तसे घडत आहे का? हा प्रश्न कादंबरीत उभा केला. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राचे ग्रमीण जीवन झपाट्याने बदलत चाचलले आहे. शिक्षणप्रसार, शहरीकरण, आधुनिक सुधारणांचा व विचारांचा प्रसार, दलित समाजाला मिळालेले शासकीय संरक्षण यामुळे परंपरागत ग्रामीण जीवनाचा हादरे बसत आहेत. या ग्रामीण मानसिकतेचा आडवा छेद रामचंद्र पठारे यांनी 'पाचर' (१९८९) या कादंबरीने घेतला आहे. तसेच या कादंबरीतील समाजवास्तवाचे आणि व्यक्तीरेखांचे चित्रण ठसठसितपणे उतरले आहे. 'पांगिरा'(१९९०) आणि 'झाडाझडती' (१९९१) या रूपाने विश्वास पाटील यांनी समकालीन समाजवास्तव प्रकट केले आहे. 'झाडाझडती' या कादंबरीमध्ये धरणग्रस्तांच्या जीवनाचे आशयद्रव्य ताकदीने ओतले आहे. आर्थिक आणि राजकीय बदलात आपले स्वत्त्व हरवलेला दोन गावाची कथा 'पांगिरा' या कादंबरीत चित्रित झाली आहे. 'मंधान' (१९८०) या कादंबरीत बंकट पाटील यांनी तमाशातून नाचणाऱ्या कलावंत स्त्रीयांच्या पडद्यामागील आयुष्याचा वे घेतला आहे. दुष्काळामुळे वाताहत झालेल्या शेतकरी कुटुंबाची कथा हा अरुण साधू यांच्या 'शापित' (१९९०) चा विषय आहे. रंगनाथ पठारे यांनी 'हारण' (१९९०) ही धनगर समाजातील एका देखण्या मुलीच्या दुर्दैवाची कथा आहे. रवींद्र शोभणे हे ग्रामीण वास्तवाचा आविष्कार घडवू पाहणारे आणखी एक नाव आहे. यांच्या 'कोंडी' (१९९२) कादंबरीतून हा प्रत्यय येतो. तानाजी राऊ पाटील यांनी 'आभाळ' (१९९२) या कादंबरीत गोपाळा आणि सजी या शेतमजूर कुटुंबाच्या जीवनाची कथा वर्णन केली आहे. विदर्भातील सारंगपूर सारख्या एका लहानशा गावात पाणीटंचाईमुळे निर्माण झालेल्या दुरवस्थेची कथा 'तहान' (१९९८) या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी सांगितली आहे.

सामाजिकतेचे भान व जाण आसणारी दलित कादंबरी याच कालखंडात लिहिली गेली. खेड्यातील चांभार समाजाचे जीवन इतर दलित जातीपेक्षा काहीसे वेगळे आहे. या समाजाचे जीवन माधव कोंडविलकरांच्या कादंबऱ्यातून आविष्कृत झाले आहे. 'अजून उजाडायचे आहे' (१९८१) या कादंबरीतील देवकी आणि देवजी हे कोणत्याही परिस्थितीत परंपरेला आव्हान न देता शांततेने

जगू पाहणारे कुटूंब आहे. 'द' (१९८२) मध्ये दलित समाजातील प्राध्यापक सुधीर भंडारे आणि त्यांची विद्यार्थिनी यांच्या प्रेमकथेतून दलित जातीमधील भयावह उच्चनीचता लेखकाने वर्णिली आहे. उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा' (१९८६) या कादंबरीमध्ये घावला तर झुलवा नाही तर कुणीबी हलवा' असं जगणं वाट्याला आलेल्या, परंतु शेवटी परिस्थितीविरुद्ध बंड करून उठलेल्या जगन या जोगतिणीची कथा आहे. परिस्थितीच्या चक्रात चिपाडाप्रमाणे पिळ्या जाणाऱ्या संतू या नवशिक्षित तरुणाची वाताहत 'चिपाड' (१९८९) या कादंबरीत तुपे यांनी रेखाटली आहे. 'खुळी' (१९९१) मध्ये त्यांनी देवदेवस्कीच्या खुळाने पछाडलेल्या सासूने निरपराध सुनेच्या केलेल्या छळवादाची कथा वर्णिली आहे.

एकंदरीतच १९६० नंतरच्या ग्रामीण, दलित कादंबरीचा आढावा घेतला आहे. अनेक प्रवृत्ती –प्रवाहांनी गजबजलेल्या आजच्या वाङ्मयीन संस्कृतीत ग्रामीण व दलित कादंबरीचे स्वरूप संमिश्र जाणवते. यामध्ये समकालीन समाजवास्तवाचा सजगपणे सामोरे जाणारा आधुनिक ग्रामीण, दलित कादंबरीचा प्रवाह ठळकपणे उठून दिसतो. सामाजिक वास्तव प्रकट करण्यासाठी निर्माण झालेला वाङ्मय प्रकार हाताळण्यासाठी एक 'सामाजिक दृष्टिकोन' असणे गरजेचे असते. हा दृष्टिकोन येण्यासाठी समाजाचे सखोल आकलन असणे आवश्यक असते. सखोल चिंतन, परस्परविरोधी प्रेरणा समजन घेण्याचा मोकळेपणा, समाजकारण, राजकारण आणि अर्थकारण समजून घेण्याची उदारता कादंबरी लेखकाजवळ असल्याची जाणीव प्रकर्षाने होते. तसेच ग्रामीण, दलित साहित्याची समृद्ध परंपरा पाठीशी असलेली ही कादंबरी भविष्यकाळातही विविध सामाजिक अनुभव क्षेत्रे आत्मविश्वासने अभिव्यक्त करून मराठी कादंबरीतील सामाजिकता अधिक समृद्ध करील.

* * *

# ग्रामीण व दलित कादंबरी – समाजशास्त्रीय आकलन

–प्रा.डॉ. सुभाष दिनकर आंबेर

DADASAHEB RUPWATE SCIENCE LIBRARY AKOLE 422601

## १.१ प्रास्ताविक :–

मराठी साहित्यामध्ये जे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये ग्रामीण साहित्य व दलित साहित्य या दोन प्रवाहांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. खऱ्या अर्थाने वास्तवास भिडणारे हे दोन्ही प्रवाह आहेत. भाषाविषयक वेगळी जाणीव व आशयदृष्ट्या वेगळेपणा ही प्रमुख वैशिष्ट्ये या दोन्ही प्रवाहांची दिसून येतात. मराठी साहित्यास समृद्ध करणारे हे प्रवाह आहेत.

## १.२ साहित्य व समाज सहसंबंध :–

साहित्य हा समाजजीवनाचा आरसा असतो. समाजजीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. साहित्य व समाज यांचे संबंध माती व झाड यांच्याप्रमाणे असतात. समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार म्हणजे साहित्य होय. साहित्यात समाजजीवनाचे चित्रण येते. या चित्रणाबरोबरच साहित्य हे सामाजिक व्यवस्था सुद्धा घडवीत असते. साहित्याचे लेखन करणारा लेखक समाजातच घडत असतो. लेखक जी भाषा लेखनासाठी वापरतो ती भाषाही समाजाचीच देणगी असते. लेखक आपल्या साहित्यातून समाजजीवनाचे, माणसाचे जगणे मांडत असतो. म्हणजेच लेखक, त्याचे साहित्य व त्याचा समाजाशी असणारा संबंध हा अन्योन्य स्वरूपाचा असतो. लेखक ज्या परिसरात राहतो तेथील वाङ्‌यमीन, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक पर्यावरणाचा परिणाम लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. ग्रामीण व दलित लेखकांच्या बाबतीत हे विशेषत्त्वाने लक्षात घ्यावेसे वाटते.

## १.३ साहित्याचे समाजशास्त्रीय आकलन :–

साहित्य व समाज यांचा परस्परसंबंध लक्षात घेतल्यानंतर साहित्याचे समाजशास्त्रीय आकलन करणे सुलभ होते. सामाजिक परिस्थिती साहित्यावर परिणाम करीत असते. सामाजिक व्यवस्था, विविध घटना, प्रसंग, रीतिरिवाज, वर्तनप्रकार, लोकरूढी, लोकाचार, सण, उत्सव, समूहसंघर्ष यांच्यात परस्परसंबंध असतात. कोणत्याही साहित्याचा केंद्रबिंदू हा माणूस असतो. साहित्याचा विषय समाजजीवन, माणसाचे जगणे हाच असतो. साहित्य समाजाचे चित्रण करताना

वास्तवाचे स्वरूप कसे आहे? कसे असावे? याची मांडणी करते. समाजशास्त्र ही ज्ञानशाखा मात्र वास्तव काम आहे? तथ्ये काम आहेत? यावर अधिक भर देते. साहित्य व समाजशास्त्राच्या अभ्यासात समाजजीवन हा एक सामाईक घटक असतो. साहित्यातील संभाव्यता ही समाजशास्त्राला जवळची वाटते.

मॅक्झिम गॉर्की यांच्या मते, मानवी जाणिवेचा विकास तसेच मानवी सहानुभूतीचा विस्तार हा साहित्याचा सर्वोत्कृष्ट गुण आहे तर समाजशास्त्रात समाज व समाजव्यवस्थेत विविध रूपांचा व स्वरूपांचा शास्त्रीय अभ्यास केला जातो.

साहित्याचे समाजशास्त्र हे मानवी समाजजीवनाशी निगडित असल्याने मानवी समाजजीवनाची व्यापकता समोर ठेवून साहित्याच्या समाजशास्त्राचे अध्ययन केले जाते. साहित्याचे समाजशास्त्र साहित्यातून चित्रित होणाऱ्या सामाजिक संघटना, मानवी वर्तन, व्यक्तींच्या भूमिका, दर्जा, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक समूह, सामाजिक व्यवस्था, सामाजिक संस्था, सामाजिक निमंत्रण, सामाजिक परिवर्तन व सामाजिक विघटनाचे अध्ययन करते. साहित्यातून समाजीवनाचे चित्रण येत असते, समाजशास्त्रीय जाणिवेतून साहित्याचे अध्ययन करणे, साहित्याच्या समीक्षेत सामाजिक संदर्भ लक्षात घेणे, सहजसाध्य नसणारे दुवे साहित्यातून शोधणे, सामाजिक घटिते व विसंगती या स्वरूपात साहित्याचा विचार करणे अशी विविध कामे साहित्याच्या समाजशास्त्राची आहेत. साहित्य हे सामाजिक बदलांना चालना देते, साहित्यकृतीचे स्वागत करणे अथवा नाकारणे हे विशिष्ट काळात का घडले? या पाठीमागील सामाजिक मानसिकतेचा शोध घेतला जाता सामाजिकशास्त्राचा आधार घेऊन आधुनिक काळात बरीच साहित्य-निर्मिती झालेली दिसून येते. कोणत्याही लेखनासाठी काही तथ्यांची आवश्यकता असते ही तथ्ये समाजातून त्या विशिष्ट लेखकास प्राप्त होत असतात. उदा. महाभारतात द्रौपदी ही पाच पांडवांची पत्नी दर्शवितात म्हणजेच तत्कालीन समाजात बहुपती विवाहपद्धती अस्तित्वात होती.

### १.४ ग्रामीण व दलित कादंबरी – समाजशास्त्रीय आकलन

समाजरचेनच्या स्तरीकरणाचे विविध आधार असतात. स्तरीकरण हि स्थलकाल आणि समाजपरत्त्वे भिन्न असते. भारतामध्ये स्तरीकरणाचा आधार जात हा आहे. या जातीच्या संरचेनमुळे विषमता जोपासण्यात आली आहे. विविध घटकांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व इतर अधिकार नाकारण्यात

आले. प्रस्थापित व्यवस्था नाकारून नवी समतेवर आधारित असलेली समाजरचना उभारण्याचा आशावाद ग्रामीण व दलित कादंबरी व्यक्त करते. झपाट्याने झालेले परिवर्तन, शिक्षणाचे वाढते प्रमाण, सामाजिक प्रबोधन, ग्रामीण समाजव्यवस्थेतील बदल यातूनच नवीन समाजव्यवस्था निर्माण होत आहे याचे चित्रण ग्रामीण व दलित कादंबरीतून प्रकर्षाने जाणवते. आजचा ग्रामीण लेखक कलाबाह्य प्रेरणांतून मुक्त होऊन लिहितो आहे. अंतर्गत आणि बाह्य रेटा यामुळे या समाजाला नवा आकार, नव्या श्रद्धा येत आहेत. पंचवार्षिक योजनेचा फायदा, धरणामुळे होणारे फायदे-तोटे, जुन्याची होत चाललेली तोडमोड, योजनेची फळे खात बसणारा गावातील पुढारी, शासकीय योजनांचा गरिबांना न झालेला स्पर्श, सत्ता, संपत्ती, गटबाजी आणि व्यसने यामुळे विघटनाकडे झुकलेले ग्रामजीवन, नव्या स्वरूपात जन्माला आलेला शोषकवर्ग, वर्णीय व वर्गीय स्वरूपात उत्पन्न होणारे ताणतणाव, शिकलेल्या पिढीचा नोकरीमुळे झालेला भ्रमनिरास या सर्वांचे चित्रण ग्रामीण साहित्यात येते. ग्रामीण कादंबरीकारांनी याचे चित्रण कादंबरीतून केले आहे. दलित कादंबरीतही एका अंगाने विद्रोह व नकार आहे तर दुसऱ्या अंगाने दलितांना भोगाव्या लागणाऱ्या नानाविध दुःखाचे चित्रण आहे. दलितांची उपासमार, शोषण, अत्याचार, वरिष्ठांचा जाच, फसवणूक, गुंडगिरी, सत्तासंपतीच्या सामर्थ्यांतून त्यांची बंद झालेली वाणी यांचेच प्रामुख्याने चित्रण येते.

आजच्या ग्रामीण कादंबरीतूनही गरीब उपेक्षित शेतमजूर, भूमिहीन, बलुतेदार इ. चे दुःख, शोषण व अत्याचार व्यक्त होते. दारिद्र्य, उपासमार व शोषण जसे दलितांचे होते, तसेच खेड्यात राहणाऱ्या या ग्रामीण शेतमजूर शेतकऱ्यांचेही होते. अस्पृश्यतेचा येणारा वेगळा अनुभव वगळला तर उरलेले सर्वांचे जीवन समान स्वरूपाचे असते. दलित कादंबरीतून जीवनदर्शन होत असले तरी अजूनही जीवनाचे अनेक कंगोरे आहेत. दलित कुटुंबातील ताणतणाव, नव्या जुन्या पिढीतील संघर्ष, मध्यमवर्गीयांची कोंडी, नवे संघर्ष असे इतरही विषम कादंबरीलेखनासाठी आहेत. दलित कादंबरीतून व्यक्त झालेले दलित मन, दलित अनुभव व दलित संस्कृती जाणून घेण्यासाठी समाजशास्त्राचा आधार घेणे गरजेचे आहे.

गो.नी.दांडेकरांनी कोकणातील खेड्याची पडझड पडघवली कादंबरीत मोठ्या शहरांच्या प्रभावाखालील भागातल्या परंपरांवर आधुनिक विचारांचे आक्रमण पवनाकाठच्या धोंडीमध्ये, नाईलाजाने मुंबईला स्थलांतर करावे लागणाऱ्या

ग्रामीण जनतेची कुचंबना रानभुलीमध्ये तर तांबटफुटीमध्ये कोकणाबाहेर शिकल्यामुळे प्रयोगशील बनलेल्या व्यक्तीमुळे गावात घडू शकणाऱ्या बदलांचे वर्णन आले आहे. या कादंबरीत दलित वर्गापैकी एक पात्र खोताला स्पष्टपणे विचारते की, तुमच्या आमच्यात असा कोणता फरक आहे?

व्यंकटेश माडगूळकरांच्या बनगरवाडीत गावाचे सामूहिक विविधरंगी वास्तवचित्रण आलेले आहे. बनगरवाडीचा समाज, तेथील व्यक्ती, निसर्ग, मेंढरे हे सर्व एकजीव होऊन या कादंबरीत वावरताना दिसतात. या कादंबरीत कोणा व्यक्तीला येथे नायक किंवा नायिका न बनवता बनगरवाडी या गावालाच नायकत्त्व दिले आहे.

१९६० मध्ये प्रकाशित झालेली धग ही कौतिक या शिंपी कुटुंबातील स्त्रीची जगण्यासाठी चाललेली धडपड व्यक्त करते. स्वातंत्र्योत्तर काळातील ढासळलेली ग्रामीण अर्थव्यवस्था, सामान्य माणसांचे बळी यांचे दारुण वास्तव या कादंबरीत आहे.

रा. रं. बोराडे यांच्या पाचोळा कादंबरीत स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यातील कारागिरांचे पारंपरिक व्यवसाय कसे मोडकळीस येतात. गंगाराम व पारबती या शिंपी कुटुंबाची शोकांतिका यात आहे. गरडपाटील व गंगाराम यांच्यातील संघर्ष यात आहे. 'सावट' कादंबरीत ग्रामीण अडाणी समाज व उच्चशिक्षणामुळे विचारी झालेली तरुणपिढी यांच्यातील विसंवादी सूर, चारापाणी मध्ये दुष्काळातील शेतकऱ्याची वाताहत, आमदार सौभाग्यवती मध्ये ग्रामीण भागातील विकृत राजकारण इथं होत एक गाव मध्ये किल्लारीत झालेल्या भूकंपाचे व उद्ध्वस्त गावाची स्थितीगती मांडलेली आहे.

आनंद यादवांच्या 'गोतावळा' मध्ये भारतीय कृषिसंस्कृतीवर मंत्रसंस्कृतीचे आक्रमण, गोतावळा उद्ध्वस्त झालेल्या नारबाची मनःस्थिती चित्रित झालेली आहे. नटरंगमध्ये तमाशात नाच्या बनलेल्या गुणाची शोकांतिका आलेली आहे.

पहिली मराठी ग्रामीण विनोदी कादंबरी लिहिणारे लेखक म्हणून द.ता.भोसले यांचा निर्देश करावा लागतो. 'मी आणि माझा बाप' या कादंबरीत बाळू भोसले व त्याचा बाप अशी इरसाल जोडी निवडून अस्सल ग्रामीण वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ही मनोरंजक विनोदी कादंबरी लिहिली आहे.

चंद्रकुमार नलगेंनी देवाची साक्ष मध्ये बदलते ग्रामीण वास्तव टिपले, गस्तमधले जुने परंपरागत खेडे, देवाची साक्षमध्ये धरणग्रस्तांचे चित्रण केलेले आहे.

महादेव मोरेंनी 'झोबडं' मध्ये कारखानदार व विडीकामगार यांच्यातील संघर्ष, कामगारांची ससेहोलपट चित्रित केलेली आहे. टारफुलामध्ये शंकर पाटील यांनी खेड्यातील सत्तासंघर्षाचे चित्रण केले आहे.

१९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीत खेड्यात नव्याने उदयाला आलेल्या वर्गाचे, ग्रामीण जीवनातील स्थित्यंतरे, अस्थिरता, शेतकरी आंदोलने या सर्वांचे चित्रण येते. वासुदेव मुलाटेंनी विषवृक्षाच्या मुळ्यामध्ये सहकारी चळवळीचे स्वरूप, भ्रष्टाचार चित्रित केला आहे. बाबाराव मुसळे यांनी 'हाल्या हाल्या दुधू दे' मध्ये न्यानबाची शोकांतिका, नात्यातील फोलपणा, सावकारीपाश चित्रित केलेले आहे. सदानंद देशमुखांच्या तहान, बारोमास मधून राजकारण, समाजकारण, भ्रष्टाचार, शेतकऱ्याची आत्महत्या याचे चित्रण आलेले आहे.

राजन गवस यांच्या 'चौंडक', 'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' इ. कादंबरीतून ग्रामीण माणसाची कोंडी, शोषण, अनिष्ट प्रथापरंपराचे चित्रण केले आहे.

शेषराव मोहिते यांची 'धूळपेरणी' भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ' भीमराव वाघचौरे यांची 'गराडा' या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा व त्यांच्या जीवनातील भयावह प्रश्न मांडलेले आहेत. प्रकाश देशपांडे केजकर यांची 'बारदाना' ही कादंबरी ग्रामीण माणसाची मूळं अंतिमतः शेतीशीच जोडलेली आहेत हे सांगते. अशोक कुलकर्णी यांची चेअरमन ही कादंबरी सहकार क्षेत्रातील राजकारण चित्रित करते. भालचंद्र देशपांडे यांच्या आणि 'धरणीकंप होत राहिला' व 'अंधार इथला सपंत नाही' या कादंबऱ्यातून माणसांवर कोसळलेल्या नैसर्गिक आपत्तीतही कसा अपहार व राजकारण केले जाते याचे चित्रण आलेले आहे. कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' आणि बालाजी मदन इंगळे यांच्या 'झिम पोरी झिम' मधून बदलत्या ग्रामीण व्यवस्थेत स्त्रियांचा छळवाद कसा संपलेला नाही हे व्यक्त झालेले आहे.

अशोक व्हटकर-'बगाड', मोहन पाटील- 'बस्तान' व 'लिगाड', रविंद्र इंगळे - 'निशाणी डावा अंगठा', अशोक पवार - 'इळनमाळ', कृष्णात खोत - 'रौंदाळा', गणेश आवटे - 'भिरूड', रविंद्र शोभणे - 'पांढर', प्रविण बांदेकर - 'चाळगत'. या कादंबऱ्यांनी खेड्यातील जीवनातील सत्याचे केलेले प्रकटीकरण डोळ्यात अंजन घालणारे आहे.

वरील सर्व ग्रामीण कादंबऱ्यांचे आकलन समाजशास्त्रीय दृष्टीने करणे इष्ट ठरेल. हाच दृष्टिकोन ठेवून दलित कादंबऱ्याचाही विचार केला पाहिजे. ना. रा. शेंडे, अण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात यांनी गावकुसाबाहेरील वस्तीला कादंबरीचा विषय केले. अण्णाभाऊ साठेंनी अधिक वास्तवदर्शी लेखन केल्याचे दिसून येते. 'फकिरा' या कादंबरीचा नायक जातीने मांग पण एका बाजूला जातीतल्या तरुणांसाठी, बायकापुरुषांसाठी त्यांना प्रतिष्ठा मिळावी म्हणून तो संघर्ष देतो आणि हा संघर्ष देता देताच आपले नाते राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीशी आहे हे सिद्ध करतो. केशव मेश्राव यांनी 'हकिकत' आणि 'जटायू' मधून वर्गभेदरचना व वाट्यास आलेली अवहेलना याचे चित्रण केलेले आहे. नायकाच्या मनाचा कोंडमारा कसा होतो याचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण त्यात आलेले आहे.

शंकरराव खरातांनी माणुसकीची हाक, 'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबऱ्यातून आंबेडकरी चळवळीमुळे आत्मभान प्राप्त झालेला तरुण व सवर्ण यांच्यातील संघर्ष चित्रित केलेला आहे. हिं.गो. बनसोडे यांनी 'मुक्तिसंग्राम' मध्ये बौद्ध धर्माचा स्वीकार करणारे दलित व सवर्ण यांच्यातील संघर्ष चित्रित केला आहे. भीमसेन देठे यांनी आपल्या 'इस्कोट' मध्ये सामाजिक, सांस्कृतिक गुलामी नाकारणाऱ्या कुटुंबाचा उच्चवर्णीय कसा छळ करतात याचे चित्रण केलेले आहे. बाबुराव गायकवाड यांनी आग कादंबरीत मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीचे एका गावावर कसे पडसाद उमटले याचा वेध घेतलेला आहे. हरिभाऊ पगारे यांनी 'युगवर्तक' या कादंबरीतून डॉ.आंबेडकरांच्या जीवनादर्श समाजासमोर ठेवलेला आहे. सुशीला भूल यांनी 'सम्बुद्ध' या कादंबरीच्या माध्यमातून तथागत बुद्धांचे जीवनचरित्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या महान कार्याची नोंद हरिभाऊ पगारे - झुंजार, हिं.गो. बनसोडे - आभाळाएवढी, दा. स. गजघाटे - जोतिकांता सावित्री इ. कादंबरीतून घेतलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी रमाई यांच्याही व्यक्तिमत्त्वाचा वेध कादंबरीतून घेतलेला आहे. यशवंत मनोहर यांची रमाई ही कादंबरी.

पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुषांच्या वासनांध वृत्तीमुळे हा स्त्रीदेह नको म्हणणारी व संन्याशाच्या वेशभूषेत वावरणारी जानकी 'सूड' मध्ये बाबुराव बागूल यांनी चित्रित केलेली आहे. उत्तम बंडू तुपे यांची झुलवा ही कादंबरी जोगतिणीच्या

जीवनाचे व संघर्षाचे चित्रण करते, देवदासीचे जीवन बळवंत कांबळे यांच्या नापत मध्ये, जे.जी. माने – मुक्ती इ. कादंबरीतूनही स्त्रियांचे दुःख मांडलेले आहे. दलितांमध्ये परिवर्तन घडवून आणून त्यांच्यात विज्ञानवादी जीवनदृष्टी रुजविण्यासाठी धडपडणाऱ्या दलित तरुणाच्या संघर्षाचे चित्रण अशोक लोखंडे यांच्या निष्ठा कादंबरीत, गरीब मांग, कुटुंबाची करुण कहाणी मांडणारी ना. ब. जाधव यांची 'दे दान सुटे गिऱ्हाण' रमेश इंगळे 'परिवर्तन' भी.सी. शिंदे यांची 'अमृतनाक', अशोक हटकर यांची 'मेललं पाणी' इ. कादंबऱ्याही दलित जीवनावर व उच्चनीच्चतेवर प्रकाश टाकतात.

## १.५ मूल्यमापन :–

ग्रामीण व दलित कादंबरीतून समाजजीवनाचे अनेक प्रश्न मांडलेले आहेत. हे प्रश्न समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजावून घेणे आवश्यक आहे. ग्रामीण व दलित साहित्यप्रवाह हे देशी साहित्यप्रवाह म्हणून ओळखले जातात. समाजातील विविध स्तर, जाती–जमाती, विषमता जागतिकीकरण, शेतीव्यवस्था, सहकार विशेष आर्थिक क्षेत्र, ग्रामीण व दलित जीवनाचे नवे प्रश्न अनेक कादंबरीकारांनी चित्रित केलेले आहे. कादंबरीतील घटना व प्रसंग समजावून घेताना त्यामागील समाजशास्त्र समजावून घेणे महत्त्वाचे वाटते.

* * *

# इंग्रजी वाङ्मयातील दलित ग्रामीण कादंबरीतील व्यथा

—प्रा.चंद्रकांत मंडलीक

**प्रस्तावना :—**

पददलितांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात न्यायासाठी संघर्षाच्या रुपात दलित वाङ्मयाची निर्मिती करून काही संत आणि लेखकांनी उदा.कबीर, रोहीदास, तुकाराम, दादू मालूकम, शहाणोबाई, गुरुनानक, नरसिंह मेहता यांनी पददलितांच्या आवाजाला वाङ्मयात टाहो फोडला. व्ही. रामन यांचे 'अच्छुत की शिकायत' हे भोजपुरी भाषेतील सरकारी दप्तरी नोंद झालेले पहिले वाङ्मयीन पुस्तक आहे. दलित वाङ्मयात अन्यायाने पिडलेल्या व्यक्ती कथेच्या केंद्र स्थानी घेऊन लेखकांनी जुन्या परंपरांना शह देऊन नवीन मूल्य प्रस्थापित करणे, जातीयवाद नष्ट करून नविन समाजाची निर्मिती, सनातन विचारांना मूठमाती देऊन नवीन संकल्पना निर्माण करणे त्याचबरोबर दलितांना मानाचा दर्जा देऊन स्वातंत्र्य, समता आणि बंधूता, या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याचे मोलाचे काम केले.

दलित वाङ्मयाचा विचार करण्यापूर्वी दलित कोणास म्हणावे यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे आहे. दलितांमध्ये अनुसूचित जाती आणि जमाती व नवबौद्ध यांनांच संबोधित करणे योग्य ठरणार नाही तर भूमीहीन, गरीब, होतकरु लोक राजकीय, आर्थिक व धार्मिकतेच्या नावाखाली ज्या महिलांचे शोषण करण्यात आले इत्यादींना दलित समजावे असे सांगितले आहे. (महिदा,२०११:१४)

दलित ही संज्ञा जातीशी संबंधित नाही. पाश्चिमात्त्य राष्ट्रांमध्ये अस्पृश्यानांच दलित समजले आहे. महाराष्ट्रात एकूण अनुसूचित जातींची संख्या ५९ असून त्यात मुख्यत्त्वे महार, मातंग, चर्मकार ह्या जाती संख्येने जास्त असून ढोर, होलार, खाटिक, कैकाडी, डोंब, मेडगी, इ.जातींचा समावेश केलेला आहे. (वराडकर, १९०८:१.८) या जातीमध्ये संख्येने महार ही सर्वात मोठी जात आहे. हरिजन ही संज्ञा अस्पृश्याकरिता महात्मा गांधीजींनी प्रथम प्रस्तापित केली. त्याचा अर्थ 'Children of God' विष्णूचे दुसरे नाव हरी असून म्हणजेच मित्रत्त्व होय.

दलित कुटुंबात जन्माला आलेला किंवा दलितत्तेर व्यक्तिने दलितांवर

लिहिलेल्या कलाकृती दलित वाङ्मय म्हणायचे का? असा प्रश्न उपस्थित होतो. ब्राम्हण व्यक्तिने दलितांच्या संदर्भात घडलेल्या घडामोडीवर आधारित काव्य, कथा, अथवा कादंबरी लिहिली असेल तर त्यास दलित वाङ्मय म्हणता येईल का? अनंत मुर्तीनी लिहीलेल्या 'संस्कारा' कादंबरीत अस्पृश्यतेचा उहापोह केलेला दिसतो. त्याचबरोबर अनेक दलित व दलितेतर साहित्यिक ांनी साहित्याची निर्मिती केलेली आहे; आणि त्यास जगत मान्यता मिळालेली आहे. अनंतमुर्ती हे कॅनडातील बघम्हण कुळातील असल्याने मग त्यांच्या 'संस्कारा' या कादंबरीस दलित वाङ्मयाचा दर्जा देणे योग्य होईल का? दलित लेखकांच्या सभेने मात्र दलित कुटुंबात जन्मलेल्या व्यक्तीने दलितांवर वाङ्मय निर्मीती केली असेल तर त्यास दलित वाङ्मय म्हणूनच संबोधावे असे म्हटले आहे. दलितांच्या वेदना दलितेतर व्यक्तिला समजू शकत नाही याचा आधार देण्यात आलेला आहे.

वाङ्मयात समाजातील लोकांचे दैनंदीन जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. समाजात अशांतता, असमानता, अन्याय इत्यादीमुळे भेदभाव निर्माण झालेला असून दलितांना तुलनेने जास्त भेदभाव सहन करावा लागत आहे. या सर्वांचा परीपाकातूनच २० व्या शतकाच्या शेवटी दलित वाङ्मयाची निर्मीती मराठी, गुजराथी, हिंदी, कन्नडा, बंगाली, पंजाबी इ. भाषेत झाली.

परंपरागत वाङ्मयात राजे, राणी व प्रगत लोकांच्या जीवनाचे चित्रण करण्यात येत असून पददलितांच्या दुःखाना वाचा फोडलेली दिसत नाही. जातीवर आधारीत भेदभावास शंबुका, करण, एकलव्य आणि आंबेडकरांना देखील दुःखाच्या मार्गातून प्रवास करावा लागलेला आहे. कबीर, रोहीदास, तुकाराम, मलुक, गुरुनानक, नृरसिंह मेहता यासारख्या संतांनी दलितांची दुःखे वाङ्मयातून मांडण्यास सुरूवात केली.

'अच्छुत की शिकायत' या पुस्तकाने दलित वाङ्मयाची सुरूवात झाली. स्वातंत्र्याच्या अनेक वर्षानंतर देखील जाती धर्मावर आधारित वर्ण व्यवस्था चालूच राहीली. गौतम बुद्ध, गांधीजी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारत देशातील नविन समाज निर्मितीत महत्त्वाचे योगदान असले तरी सद्यस्थितीत मनु व मनुस्मृतीच्या मार्गाने निर्माण झालेली जाती व्यवस्था जिवंत असल्याचे लक्षात येते. पददलितांना सस्पृश्यतेची वागणूक दिली जात असून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दुर ठेवलेले आहे, आणि म्हणूनच दलित वाङ्मय हक्क व मानवी मुल्यांचा पुरस्कार करताना दिसते.

भारतीय वाङ्मयात प्रामुख्याने राजाराम मोहन रॉय श्री.अरविंद घोष, सरोजीनी नायडू, रविंद्रनाथ टागोर, डॉ. राधाक्रीशनन, डॉ.मुल्क राज आनंद, गिरीश कर्नाड, आर.के. नारायण, निराड चौधरी, खुशवंत सिंग आणि अरुणंधती रॉय यांचा सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचा जवळचा संबंध असून पददलितांचे जीवन, त्यांच्या वेदना, असमानता,त्यांच्या वाङ्मयातून कथित झालेली आहे. मुल्कराज आनंदाच्या 'अनटचेबल' या कादंबरीतून प्रथमच दलितासंबंधीच्या घटनाचे स्पष्टीकरण करण्यास सुरूवात झालेली दिसते.

मुल्कराज आनंदानी 'कुली' (१९३६) 'द व्हिलेज' (१९३९) 'दि रोड' (१९६१) या कादंबऱ्यातून दलितांच्या शोषणावर प्रकाश टाकलेला आहे. 'अनटचेबल' (१९३५) या कादंबरीचे जवळजवळ ३० भाषांमध्ये भाषांतर झाले असून त्यामध्ये 'बाखा' या दलित मुलाला सवर्णाकडून केवळ दलित असल्यामुळे शिव्याशापास सामोरे जावे लागत असल्याचे दिसते.

'बाखा' हा आधुनिक भारताचा १८ वर्षे वयाचा तरुण तडफदार मुलगा दाखविला आहे. केवळ दलित कुटुंबात जन्माला आल्यामुळे त्यांस भंगी काम करावे लागत आहे. गुलामगारापेक्षाही कमी दर्जाची अवहेलना तो सहन करत असल्याचे दिसते. कारण गुलामाला गुलामगिरीतून मुक्ती मिळू शकते, परंतु पददलित हा पददलितच रहात असून धर्म आणि समाज त्याचा तिरस्कारच करतो. (श्रीवास्तव २०११:१७) बाखा यास वाचनाची आणि लिहिण्याची मनापासून आवड व तीव्र इच्छा होती. परंतु केवळ अस्पृश्य असल्याने त्यास शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात आला. सिगारेटचे पाकिट किंवा मिठाईच्या दुकानातून जिलेबी विकत घेताना दोन्ही दुकानदार त्याच्या हाताचा स्पर्श टाळण्यासाठी सिगारेटचे पाकीट व जिलेबी दुरूनच त्याच्या हातावर टाकत असे. हिंदू समाजातील लोकांनी त्याची डुक्कर, कुत्रा असे अपशब्द वापरुन अवहेलना केलेली आहे.

डॉ. भावनी भट्टाचार्यांनी 'ही हु राईडस् द टाईगर' (१९८४) या कांदबरीत बंगालमधील दुष्काळाच्या कालावधीत मंगलनामक सोनाराचे स्वतःच्या उदर निर्वाहासाठी जनतेची केलेल्या फसवणूकीचे प्रक्षेपण केलेले आहे. त्याने स्वतःची सोनार असलेली ओळख देखील लपविलेली आहे. तरी समाज त्याबाबत निष्क्रिय राहीला. परंतु त्याने एका दलित मुलाला मंदीरात आश्रय दिल्याकारणाने मंदीराच्या ट्रस्टींनी जोरदार आक्षेप घेतला व त्यास जनतेने त्यास दगडाने ठेचून

मंदीराच्या बाहेर काढण्याचे विदारक चित्रण लेखकाने केल्याचे दिसते.

दलितांनी प्रेम करणे हा देखील गुन्हा मानला जातो. याचे विवरण अरुणधती रॉय यांनी 'गॉड ऑफ स्मॉल थींग्स्' या अलिकडच्या कादंबरीत केलेले आहे. वेलुथा नामक दलित माणसाने ब्राम्हण विधवेशी प्रेम संबंध ठेवल्याने त्यास जीवनाची आहुती द्यावी लागली असून त्यावर अरुणधतींनी प्रकाश टाकलेला आहे.

दलित व अस्पृश्य हे शब्द समानअर्थी असून धर्माच्या नावाखाली राजकीय व आर्थिक पिळवणूक झालेल्या व्यक्तिंना अनुसरुन वापरले जातात. म्हणून दलित ही जात नसून त्याद्वारे बदल व क्रांती अपेक्षीत आहे. दलित वाङ्मयाचा मुख्य हेतू दलितांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण व दलितांच्या बंद आवाजास वाचा फोडणे होय. 'कुली' मधील मुन्नु खेडवळ मुलगा उदारनिर्वाहासाठी घराच्या बाहेर पडतो त्यासाठी त्याने वेगवेगळ्या ठिकाणी काम केले. परंतु समाजाने त्यास आनंद हा जीवनाचा मूलभूत हक्क मिळू दिला नाही. त्याच्या प्रालब्धाने मात्र मुन्नू गुलामगिरीचा बळी ठरला आहे. जमीनदाराने मुन्नूच्या वडीलांची पाच एकर जमीन गिळंकृत केली. त्यातून निराश्येच्या धक्क्याने त्याचा झालेला मृत्यू, मुलाच्या पालन पोषणासाठी आईवर आलेली भिक मागण्याची वेळ हे सर्व मुन्नूने अनुभवले आहे.

मुल्कराज आनंदाच्या कुली (१९३६) या कादंबरीत सामाजिक दांभिकता, वर्णद्वेष, सामाजिक व आर्थिक अन्याय, श्रीमंत व गरीब यातील दरी, अस्पृश्यांची हिंदू सवर्णांकडून होणारी अवहेलना या सर्वांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. कथानकातील नायक, मुन्नू, प्रामाणिक उदार परंतु बंडखोर वृत्तीचा असून निश्चयी स्वभावाचा आहे. त्याच्या निश्चय व धैर्याला गुलामगिरीमुळे नेहमीच तडा गेलेला दिसतो. मुन्नू शामनगर येथे बाबुनथूरामच्या घरी नोकर म्हणून काम करताना मालकाच्या तिखट स्वभावाच्या बायकोला कंटाळून काम सोडतो, त्यानंतर प्रभा दयाळ यांच्या पिकल कारखान्यात कामगार म्हणून कामास सुरूवात करतो ना करतो तोच कारखाना दिवाळखोरीत निघाल्याने बंद पडतो. भाजी मार्केटमध्ये हमाली, सर्कशीतील मित्रांबरोबर मुंबई येथे जाऊन एका मिलमध्ये अल्पशा पगाराची नोकरी पत्करतो. कामगारांना होणाऱ्या त्रासातून ते संघटित होतात आणि त्यातून होणाऱ्या जातीय संघर्षामुळे काम सोडून श्रीमती मेनस्प्रींग बरोबर सिमला येथे जाऊन नोकर म्हणून कामास सुरूवात करतो. परंतु

नियतीने देखील त्याची निंदाच केली. तेथे मुन्नूचा टी.बी.च्या आजाराने मृत्यू होतो.

वयाच्या अगदी १४ व्या वर्षीच गरीबीमुळे मुन्नूला अगदी माफक जीवनाच्या अपेक्षांकरीता विविध अनुभवांना सामोरे जावे लागल्याचे दिसते. परमेश्वराला प्रार्थना करतो की, 'मला जगायचे आहे, मला माहीती करून घ्यायची आहे, मला काम करायचे आहे.' जीवनाचा पहिला धडा मुन्नूस शहरातील नथूराम यांच्या घरी अनुभवास येतो. त्याच्या लक्षात येते की, त्यास गुलाम झालेच पाहिजे, नोकर म्हणून त्यास विविध प्रकारचे काम केलेच पाहिजे व हे करतांना कोणीतरी शिव्या देणारच, आणि मारणारच

अरुणधती रॉय लिखीत 'दि गॉड ऑफ स्मॉल थींग्ज' या १९९७ मध्ये बुकर पुरस्काराने सन्मानीत केलेल्या कादंबरीत अरुणधतींनी राजकीय परिस्थिती, धर्म आणि अस्पृश्येतवर प्रकाश टाकलेला आहे. भारतात अस्पृश्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीचे चित्रीकरण करून व्हेलुभा या व्यक्तिरेखेद्वारे पददलितांच्या परिस्थितीचे विश्लेषण केले आहे. त्यास लेखिकेने गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज असे संबोधलेले आहे. व्हेल्युथा अस्पृश्य असला तरी सुतार काम करून नवीन वस्तू निर्माण करण्याच्या ध्यासातून त्याने लाकडापासून असंख्य कलाकृती तयार केल्या. परंतु तो अस्पृश्य असल्यामुळे समाजाने त्या कलाकृती स्विकारल्या नाहीत म्हणजेच हिंदू व ख्रिश्चन यांच्याकडून अस्पृश्यांची अवलेहना केली जात असे. (पांडया, कोमल २०११:३६)

* * *

# १९८० नंतरची ग्रामीण व दलित कांदबरी

–प्रा.एस.बी.रणदिवे

**१९८० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी–**

१९८० नंतरची ग्रामीण कादंबरी काही एका वेगळ्या वळणावर उभी असलेली दिसते. स्वांतत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण समाजाचा स्वांतत्र्याने केलेला अपेक्षाभंग, भ्रमनिरास, बेकारी, महागाई, दुष्काळ इत्यादीसारख्या अनेक समस्यांनी ग्रामीण जीवन अधिक भीषण झाले. राजकारणाने ग्रामीण जीवन ढवळून निघाले, जातीयतेने नवे रूप धारण केले. या सर्व समस्या व परिस्थितीमुळे ग्रामीण जीवनदृष्टी बदलू लागली या बदलत्या जीवनदृष्टीचे दर्शन १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरी मधून होते. मराठी ग्रामीण कादंबरीचे क्षितिज १९८० नंतर विस्तारलेले दिसते. १९८० नंतरच्या ग्रामीण कांदबऱ्याचा केवळ संख्यात्मकदृष्टया विचार केल्यास जवळपास त्यांची संख्या दोनशेच्या जवळपास आहे. संख्यात्मकदृष्ट्या विचार केल्यास डॉ.रवींद्र ठाकुर यांनी आपल्या ग्रंथात १९९१ पर्यंतच्या एकूण २२८ ग्रामीण कादंबऱ्याची सूची नोंदविली आहे. १९८० ते १९९० या दशकात जवळपास ७० कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. या सर्व कादंबऱ्याचा विस्तृत परामर्श होणे प्रस्तुत ठिकाणी शक्य नाही. त्यामुळे शक्य तेवढा संक्षेप करून १९८० नंतरच्या काळातील ग्रामीण कांदबरीचे स्वरूप पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

१९८० नंतर अनेक नव्या दमाचे कांदबरीकार या क्षेत्रात झपाट्याने पुढे आले त्यांनी ग्रामीण कादंबरीचा कायापालट घडविण्यास आरंभ केला. आनंद यादव, 'झोंबी' (१९८७) 'नांगरणी' रा.र.बोराडे 'सावट' १९८७ 'आमदार सौभाग्यवती', 'चारापाणी', (१९८९) महादेव मोरे झोंबड, व.बा. बोधे, चांगभलं, बिजली, भूंगा, वेताळ, गजरी, तुणतुण, टिटवी, माडगुळकर करुणाष्टक, गो.नी.दांडेकर तुका आकाशाएवढापण, तुंबाडचे खोत, श्री.ना.पैडसे

याच काळात रंगनाथ पठारे, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, राजन गवस, विश्वास पाटील, सदानंद देशमुख, रवींद्र शोभणे, तानाजी पाटील वगैरे महत्त्वाचे कादंबरीकार बदलल्या समाजवास्तवावर कादंबरीतून प्रकाश टाकत होते. बदललेल्या समाजरचनेला अतिशय अनुकूल असा साहित्य प्रकार कोणता असेल, तर तो कादंबरी आहे असे अभ्यास करताना दिसून येते, समाज

प्रवाहानुसार कादंबरीने वळणे घेतलेली दिसतात. समाजाच्या गरजेनूसार साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार आणि समाजात होणाऱ्या जीवनविषयक विचारांनुसार कादंबरी वळणे घेते असे दिसून येते.

बाबाराव मुसळे यांच्या हाल्या हाल्या दुधू दे, पखाल व वारूळ या तीन महत्त्वाच्या कादंबऱ्या, त्यांच्या सर्वच कादंबऱ्याचे विषय वास्तवादी व गंभीर आहेत. हाल्या हाल्या दुधू दे कादंबरी शेतकी व शेतकरी जीवनाची शोकांतिका चित्रित करते. पखाल या दुसऱ्या कादंबरीतून बलुत्यांच्या मोबदल्यात गावाला पखालाने पाणी पोहचविणाऱ्या कोळी समाजावर नव्या बदलामुळे गाव सोडण्याची पाळी येते, त्याचे व वारूळामध्ये गावगाड्यातील मातंग समाजाच्या दोन पिढ्यांतील अवस्थानंतरचे संघर्षाचे चित्रण ते करतात. एकूणच शेती, गाव, गावकी, भावकी जाती संघर्ष राजकारण, भ्रष्टाचार, दारिद्रय इत्यादी कितीतरी ग्रामीण प्रश्नांना कवेत घेणारी त्यांची कादंबरी वास्तवाचे चित्रण करते.

आंबी, पांगिरा, झाडाझडती, चंद्रमुखी, या विश्वास पाटलांच्या कादंबऱ्या आंबी मधून समाजातील उच्चभ्रू समजणाऱ्या मराठा जातीतील घरंदार जपणाच्या खोट्या अभिमानाचे, परंपरा प्रेरणेचे, स्त्रीच्या दुर्दैवाचे तर पांगिरा मधून खेड्यात होऊ लागलेले बदल शहरीकरणाच्या परिणामांचे व स्थित्यंतराच्या या काळात खेड्यातील चांगल्या बाबी, मूल्ये कशी हरवत चालली आहेत त्याचे समाज निदर्शन येते. मझाडाझडतीफ या त्यांच्या बहुचर्चित कादंबरीतून धरणग्रस्तांच्या प्रश्नांचे वास्तवदर्शी येते. प्रस्तावित पंचनायिकापैकी चंद्रमुखींच्या रूपाने कलावंतिणीची शोकांतिका चित्रित करताना ग्रामीण राजकारणाच्या विकृतीचे रेखाटन करणारी ही कादंबरी वेगळया विषय दृष्टिकोनामुळे लक्षणीय ठरते.

राजन गवस हे या कालखंडातील महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार त्यांच्याजवळ वेगळ्या प्रकारचे अनुभव विश्व आहे त्याला वाचनीय वेधक करण्याची क्षमता आहे. त्यांच्या चौंडक भंडारभोग, कळप, धिंगाणा, तणकट या कादंबऱ्या विशेष लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. चौकटमध्ये देवदासींच्या जीवनाची परवड तर भंडारभोगमध्ये जोगत्यांचे जीवन जगण्याची सक्ती असणाऱ्या तायप्पाची जीवघेणी व्यथा ते साकारतात. धिंगाणा, कळप, तणकट यानंतरच्या कादंबऱ्या ग्रामीण नवशोषितांच्या वेदनेचे प्रभावी चित्रण करणाऱ्या चिंतनशील कादंबऱ्या आहेत. तणकट कादंबरीबद्दल डॉ.पंडित रापरे म्हणतात, तणकट ही कादंबरी गावातील जीवन व गावकुसाबाहेरील जीवन यांचा उभा आडवा छेद घेते आणि खोटी स्वप्ने दाखवणारे, लुटणारे पुढारी सबंध गावाची कशी शोकांतिका

करतात याचेच चित्र आपणासमोर उभे करते. राजन गवस यांनी सामाजिक समस्या कादंबरीच्या व्यापक पटावर मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

रंगनाथ पठारे यांच्या रथ, हारण, ताम्रपट, इत्यादी कादंबऱ्यामधून ग्रामीण स्त्री जीवनाची व्यथा प्रभावीपणे मांडली आहे. सदानंद देशमुख यांच्या तहान व बारोमास या दोन कादंबऱ्या आहेत. तहानमधून मानवी जीवनाचा मुलाधार असणाऱ्या पाणी प्रश्नाभोवती केंद्र कल्पून पाण्यासाठी तळमळणाऱ्या ग्रामजीवनाच्या तळतळायची संघर्ष कथा ते साकार करतात चंगळवादी व तकलादू मुलांच्या नादी लागून फूकट कमाईस ललचावलेल्या बबन शेवाळेंच्या रूपाने आजच्या ग्रामीण तरुणाची मानसिकता व शोकांतिका चित्रित करणारी ही कादंबरी ग्रामजीवनातील स्थित्यंतरामध्ये होऊ पाहणाऱ्या मूल्य संघर्षाचे चित्रण ही प्रभावीपणे करते. बारोमासला नंतरच्या कादंबरीमध्ये नव्या-जुन्याच्या संघर्षाबरोबर शेतकऱ्यांच्या व सुशिक्षित तरुणाच्या जीवनाची बारोमास मध्ये व्यथा ते प्रकट करतात.

शेषराव मोहिते यांनी असं जगणं तोलाचं व धूळपेरणी या कादंबऱ्यातून शेतकरी जीवनाचे दर्शन घडविले आहे. लग्न व त्यासाठी कर्ज, शेतीवर ते फेडण्याची इच्छा व उत्पन्न येऊन ही भाव न मिळाल्याने शेवटी आत्महत्याचा मार्ग पत्करणारा या कादंबरीत हाणमू आजच्या शेतकऱ्याचे प्रातिनिधिक रूप आहे, तर धूळपेरणी त शेती व गावापासून तुटू पाहणाऱ्या श्रीरामाची शेतकऱ्याच्या नव्या पिढीची कहाणी येते.

पुरुषोत्तम बोरकरांच्या मेड इन इंडिया व आमदार निवास रूम नं. ९७५६ या दोन महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. मेड इन इंडिया या कादंबरीमध्ये वर्तमान ग्रामीण जीवनातील राजकारण स्वार्थीवृत्ती शोषणवृत्ती यांचा दंभस्फोट करते.

याशिवाय ज्यांची नोंद करावी अशी काही कादंबऱ्यापैकी मोहन पाटलांच्या लिंगाड, खांदेपालट, बस्तान, साखरपेरा, गणेश आवटे यांच्या गणगोत, चुकार आणि पाणसळ, अण्णा साहेब देशमुख यांच्या गोदडी, फरकट व डोंगराने कात टाकली, रवींद्र शोभणे यांची रक्तध्रूव, कोंडी, बाबा, भांड्यांच्या काजोळ, दशक्रिया अशा कितीतरी कादंबरीकार व कादंबऱ्याचा निर्देश करता येण्यासारखा आहे.

संपत जाधव यांच्या गुलाम आणि राक्षस, वाघनख या कादंबऱ्यातून शिक्षण, सहकार, राजकारण इत्यादी क्षेत्रात निर्माण झालेल्या गुंडाशाहीचे व

शोषक प्रवृत्तीचे दर्शन घडवितात. दिलीप भावमार यांच्या गोवडमधुन खेड्यातून शिक्षणासाठी बाहेर पडणाऱ्या तरुण-तरुणींची कथा प्रकट झाली आहे. ताडा तोडा या कादंबऱ्यातून डॉ.सुभाष राजुळे यांनी ऊस तोडणी कामगारांचे जगणे रेखाटले आहे. कोंदणातील जिणं मध्ये नागनाथ पाटील विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील संस्थाचालक कसे शोषण करतात त्याचे विदारक चित्रण करतात.

तानाजी राऊ पाटलांच्या आभाळ व ऊनसावली या दोन महत्त्वाच्या कादंबऱ्याही या सुमारासच प्रसिद्ध झाल्या ग्रामीण जीवनातील छोटा शेतकरी स्त्रीची वेदना मुखर करणारी त्यांची लेखणी ग्रामीण भाषेचे निवेदन व संवादासाठी सरसकट व प्रत्ययकारी वापर करते तसेच मधू सावंताच्या जिनगानी मधून ग्रामीण स्त्री जीवनाची व्यथा प्रकटते तर ग्रामीण जीवनाला विकृत बनवून गिळंकृत करू पाहणाऱ्या शोषणाचे चित्र त्या राघु केतू कादंबरीत त्या रेखाटतात. चेअरमन अशोक कुलकर्णी, साईनाथ पाचरण, पंचायतराज, शंकर नऱ्हे या अलीकडे आलेल्या कादंबऱ्यातून सहकार, राजकारणाच्या भयावहतेचे व त्यामुळे भरडल्या जाणाऱ्या शेतकरी जीवनाचे भीषण चित्रण येते. राणीवसा, अनुराधा वैद्य गव्हाणी, शांता जोशी, तुरुंगवाडा लक्ष्मीकमळ गेंडाम मआकाफ पुष्पा देशमुख या सारख्या कितीतरी कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनविषयक नवजाणीव प्रकटते.

१९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबऱ्याच्या वाटचालीचे स्थूल स्वरूप असे आहे विभिन्न प्रकृतीच्या आणि वेगवेगळ्या वाटांनी जाणाऱ्या १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीकडे एकत्रितपणे पाहताना काही गोष्टी स्पष्ट होत जातात.

१) १९८० नंतरच्या कादंबरीत सहकार क्षेत्रातील उच्चपदस्थ शासकीय यंत्रणा व अधिकारी राजकीय नेते यांच्या वावर वाढलेला दिसतो. गावा बाहेरच्या भटक्या जमाती आणि ग्रामीण जीवनाची सूत्रे हाती बाळगणारे सत्ताधारी अशा दोन्ही टोकांकडे १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीने लक्ष वेधले आहे.

२) १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीत निसर्गाला इतके महत्त्वाचे स्थान राहिलेले दिसत नाही. त्यातील परिसरप्राधान्य उताराला लागले आहे आणि ग्रामीण साहित्य व कादंबरीही संक्रमणाच्या एका टप्प्यावर आहे, असे जाणवते.

३) परंपरागत जीवनरहाटीचा ग्रास होणाऱ्या नवसंस्कृतीचे उघड नागडे स्वरूप स्पष्ट करण्यावर ही कादंबरी भर देते.

४) १९८० नंतर ग्रामीण कादंबरी संख्यात्मकच नव्हेतर गुणात्मक वाढलेली दिसते चांगल्या कादंबऱ्याची दखल साहित्य अकादमीने घेतल्याचे दिसते उदा. झोंबी, झाडाझडती, राघववेळ बारोमास इ.

५) बदलल्या ग्रामीण जीवनाचे वास्तव कलात्मक चित्रण मराठी कादंबरीत १९८० नंतर स्पष्टपणे येऊ लागते. मेड इन इंडिया ही कादंबरी बदलल्या खेड्याचे वास्तव जीवन दर्शन घडविणारी आहे.

६) १९८० पर्यंत अपवादानेच आढळणाऱ्या स्त्री कादंबरीकारांची संख्या झपाट्याने वाढते आहे. प्रतिमा इंगोले, मथू सावंत, सुनंदा देशमुख, शांता जोशी, संगीता पाटील, लक्ष्मी कमल गेंडाम, अनुराधा वैद्य इ.

७) आधुनिकीकरणाच्या सुधारणेच्या नावाखाली खेड्यापाड्यात अनेक सरकारी योजना आल्या या सरकारी योजनामुळे पार गावे बदलून गेली प्रशांत पोखरकर यांच्या गाव ढासळत आहे या कादंबरीत याचे वास्तव चित्रण येते.

८) ग्रामीण स्थित्यंतराशी निगडित असे महत्त्वाचे विषय या काळातील ग्रामीण कादंबरीकारानी जसे समर्थपणे हाताळते त्याच प्रमाणे या स्थित्यंतरामुळे बदललेल्या ग्रामीण मनाचाही या काळातील ग्रामीण कादंबरीकारांनी समर्थपणे वेध घेतला.

९) दलित कादंबरीत वर्णव्यवस्थेविरुद्धची जाणीव आहे तशी समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करून उठण्याची जाणीव ग्रामीण कांदबरीत दिसत नाही. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, एकूण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची आणि नवी समताधिष्टित समाज रचना उभारण्याची जाणीव ग्रामीण साहित्यात कमी प्रमाणात आहे यात शंका नाही याचे प्रत्यतर येते.

१०) ग्रामीण जीवनातील प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न काही लेखक करीत असलेले दिसतात. ग्रामीण वास्तव आपल्या कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न अलीकडच्या दशकातील एक जमेची बाजू आहे. उदा. आनंद विगकर यांची अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट अस्मानी संकटाच्या छत्रीत वावरणाऱ्या माणसांचे भाव हतबलता कणखरपणा यांचा गंभीर प्रत्ययही कादंबरी देते. या कादंबरी बद्दल डॉ. सतीश कामत म्हणतात, प्रस्तुत कादंबरी ही कलावादी प्रभावातून जीवनवादी संघर्षाकडे आत्मभान जगविण्यासाठी उभी राहिलेली एक अस्सल ग्रामीण कलाकृती आहे.

## १९८० नंतरची दलित कादंबरी

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. समाजामध्ये ज्या काही घडामोडी घटना घडत असतात त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडते १९८० नंतरच्या काळात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात परिवर्तन घडवून आले स्त्री मुक्तीचा विचार, दलित, पँथर विद्यापीठ नामांतराचा प्रश्न, दंगली हत्याकांड, जागतिकीकरण इ. घटनांचा समाजजीवनावर खोलवर परिणाम झाला ग्रामीण भागात अंधश्रद्धा हळूहळू कमी झाली पण ग्रामीण राजकारण समाजकारण यात पूर्णत: बदल झाला विज्ञान तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या वस्तूंचा वापर वाढल्यामुळे मानवी जीवन सुख सोयीची समृद्ध बनले. परंतु नवनवीन समस्याही निर्माण झाल्या या सर्वांचे चित्रण १९९० नंतरच्या दलित आणि ग्रामीण कादंबरीत पाहावयास मिळते.

१९८० च्या दशकात दलित पँथरचा उदय झाला दलितांमध्ये नवा जोम उत्साह निर्माण झाला. एका विशिष्ट वर्गात जन्म घेतल्याने जी उपेक्षितपणाची वागणूक मिळते त्याचेच प्रतिबिंब दलित साहित्यकृतीत पाहावयास मिळते.

इंग्रजी शिक्षणामुळे व मुद्रणकलेच्या शोधामुळे कादंबरी हा साहित्यप्रकार आपण इंग्रजी मार्फत युरोपकडून स्वीकारला आहे. निर्मिती प्रसार आणि वाचन या तिन्ही प्रक्रियावर पाश्चात्त्य संस्कृतीचे मराठी कादंबरीवर खोलवरचे परिणाम झाले आहेत. मराठी कादंबरीचा कालपट दिडशे वर्षाचा आहे आणि त्यामध्ये दलित कादंबरीचा कालपट अवघ्या पन्नास वर्षाचा आहे. या पन्नास वर्षाच्या कालखंडात अभ्यासाच्या आशयाच्या विविध अनुभूतींच्या व संरचनेच्या दृष्टिकोनातून दलित कादंबरीचे तीन टप्पे करता येतात.

दलित साहित्यातल्या पहिल्या पिढीचे प्रमुख लेखक दोनच, शिवराम जानबा कांबळे आणि किसन फागुजी बनसोडे. दुसऱ्या पिढीत लेखन करणारे कथा व कादंबऱ्यातून स्वत:चा परिचय घडवून देणारे असे ठळक कादंबरीकार चार: ना.रा. शेंडे, आण्णा भाऊ साठे, बंधु माधव आणि शंकरराव खरात आणखी कांही कादंबरीकारांनी या पिढीत लेखन केले त्यांत शंकरराव सूरडकर, हि गो. बनसोडे, हरिभाऊ पगारे, ना.ब. जाधव यांचा समावेश होतो. नंतरच्या तिसऱ्या पिढीतले बाबुराव बागूल, केशव मेश्राम आदी कादंबरीकार आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतील कादंबरीलेखनाचे स्वरूप मराठी कादंबरीच्या प्रारंभावस्थेत कल्पनारम्य व रहस्यपूर्ण वाटते.

१८८० नंतरच्या काळातील दलित कादंबरी यात आम आणि

अभिव्यक्तीमध्ये आमूलाग्र बदल झालेली दिसून येते. गौतम बुद्धांनी दिलेली शिकवण म. फुले यांनी संघर्षाची दिलेली जाणीव आणि डॉ.आंबेडकरांनी प्रत्यक्ष संघर्ष करण्याचा दिलेला आत्मविश्वास यातून मिळालेली एक आंतरिक प्रेरणा यानंतरच्या कांदबरीकारांच्या लेखनातून स्पष्ट दिसून येते.

१९८० नंतरच्या दलित कादंबरीकारांचे कादंबरी लेखन विविधांगी स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. यामध्ये दलित सवर्ण संघर्ष दु:खाचे चटके, भीषण दारिद्रय, जाती-पोट जामीतील हेवेदावे खेड्यातील वातावरण गावकुसाबाहेरचे जगणे, असा न अंधश्रद्धा रूढी परंपरा ग्रामव्यवस्थेतील नियम राजकारणासाठी दलितांचा वापर विद्रोह, सूड, परिवर्तन, सम्यक क्रांती, विज्ञाननिष्ठा, आंबेडकरी चळवळ भाषेच्या बाबतीत रूढ संकेतांना धक्के, समाजातील नेते, समाजाची मुक्त अर्थव्यवस्थेत झालेली कोंडी, आरक्षणाचा वाद अशा वेगवेगळ्या विषयांवर कादंबरीलेखन झालेले दिसून येते. ग्रामीण भागातील दलितांना जाती व्यवस्थेबरोबर ग्रामव्यवस्थेचीही संघर्ष करावा लागतो. हक्काची मजुरीही त्यांना वेळप्रसंगी मिळत नाही संपूर्ण गावात त्यांना वाळीत टाकले जाते. महारांना मिळालेली सामूहिक इनामी जमीन बळकावली जाते या सर्व बाबींचे वास्तवदर्शी चित्रण १९८० नंतरच्या कादंबरीकारांनी केले आहे. यामध्ये बाबुराव बागूल यांची अघोरी (१९८३) कोंडी (२०००) माधव कोंडविलकरांचे मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे (१९७९) अजून उजडायचे आहे (१९८१) अनाथ (१९८१) वेध (१९८३) छेद (१९८६) झपाटलेला (१९९०) झपाटलेला देशोधडी (१९९८) हाताची घडी तोंडावर बोट (२००१) सुधाकर गायकवाड यांची शूद्र (१९८०) भीमसेन देठे यांची इस्कोट (१९८०) नामदेव ढसाळ यांची हाडकी हाडवळा (१९८१) निगेटिव्ह स्पेस (१९८७) अशोक व्हटकर यांची मेलेलं पाणी (१९८२) बगाल (१९८४) ७२ मैल (१९८९) प्रेमानंद गज्वी यांची जागर (१९८२) बा.स.हाटे यांची युगविधान (१९८३) युगंधरा (१९८८) बंळवत कोवळे यांची लावत (१९९४) व जोगव्याचे दिवस (१९८३) उत्तम तुपे यांची इंजाळ

(१९८४) झुलवा (१९८६) खाई (१९८८) चिपाळ (१९८९) भस्त (१९९१) उत्तम कांबळे यांची श्राद्ध (१९८६) व अस्वस्थ नायक (२०००) भि.शि. शिंदे यांची उद्ध्वस्त (१९८९) यशवंत मनोहर यांची रमाई (१९९१) नामदेव कांबळे याची राघववेळा (१९९३) ऊनसावली (१९९०) सांजरंग (१९९९) लक्ष्मण गायकवाड यांची वडारवेदना (२०००) वकिल्या पारधी (२००२) जी.के ऐनापुरे यांची अभिसरण (२००२) रिबोट (२००८) यासारख्या अनेक कादंबऱ्यातून

महार, मांग, चांभार, देवदासी, आदिवासी, पारधी, तमासगीर, ढोर, वेश्या, मुरळी, मसनजोगी, अनाथ इ. उपेक्षित समाज जीवनाचे चित्रण येते.

आजची दलित कादंबरी आशय, विषय, पत्रांची नाव, कादंबरीची सुरुवात, शेवट उपकथानक, दृष्टिकोन, वातावरण व भाषा या सर्वांनाच धक्के देत आहे. भाषेच्या बाबतीत तर दलित कादंबरीने भाषा वापरातील रूढ संकेताना नाकारलेली दिसते. दलित लेखकांनी समर्थपणे बोलीभाषेचा वापर करून तसेच आशयाच्या गरजेपोटी अपरिहार्यपणे अश्लील शब्द, शिव्यांचा वापर करून रूढ संकेतांना धक्के दिलेले आहेत साहित्यामध्ये अश्लील भाषा येऊ नये, सत्य, शिव, सुंदरतेचा आविष्कार भाषेमधून व्हावा, त्यातून सौंदर्य निर्मिती व्हावी अशी अपेक्षा ठेवणाऱ्या रूढ संकेताना दलित कादंबरी धक्के देताना दिसते उदा. रिबोट जी.के.ऐनापुरे, अघोरी, बाबुराव बागूल नापत बळवंत कोवळे इ.

साठोत्तरी काळात दलित साहित्याचा प्रवाह विकसित होत गेला. एक विशिष्ट वर्गात जन्म घेतल्याने जी अपेक्षितपणाची वागणूक मिळते, त्याचेच प्रतिबिंब दलित साहित्यकृतीत पहावयास मिळते. दलित साहित्यातील बऱ्याच कलाकृती या आत्मनिवेदनात्मक, आपल्या समाजाचे चित्रण करणारे आहेत. माधव कोंडविलकर यांच्या मअजून उजडायचे आहेफ या कादंबरीत खेड्यातील चर्मकार समाजाचे चित्रण येते. देवजी हा नायक परपंरा प्रिय असून आपल्यावरील अन्यायाविरोधात प्रतिकार न करता सहनशील वृत्तीने जीवन जगतो. शेवटी त्याच्याकडून चोरी घडते व त्याला निंदेला सामोरे जावे लागते. त्यांच्या अनाथ या कादंबरीत दलितांची शिक्षणासाठी धडपड आणि शिक्षणानंतरचा बेकारीचा प्रश्न रंगविला आहे. तर छेद मध्ये दलित जाती मध्ये उच्चनीचता चित्रित केली आहे. दलित साहित्य हा प्रकार सामाजिक चळवळ म्हणून फार महत्त्वाचा वाटतो. या चळवळीचे संस्थापक म.ना. वानखेडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना उत्कृष्ट वाङ्मयीन समज होती. त्यात राजा ढाले, नामदेव ढसाळ गंगाधर पानतावणे हे उत्साही मंडळी असल्यामुळे दलित साहित्य हे एक नवे व्यासपीठ दलितांना मिळाले. १९८० नंतरच्या दशकात दलित पँथरचा उदय झाला.

उत्तम बंडू तुपे त्यांच्या झुलवा मध्ये जोगतिणीचे चित्रण येते. जगण या जोगतिणीचे शिक्षण घेऊन नर्स व्हावे अशी इच्छा आहे. परंतु परिस्थितीमुळे तिला जोगती व्हावे लागते. त्याबद्दल डॉ.रवींद्र ठाकूर म्हणतात, थोडेफार शिकून नर्स व्हावे एवढीच आकांक्षा असलेल्या जगनला प्राप्त परिस्थितीत जोगतीण व्हावे लागते. पावलोपावली तडजोडी करूनही ती सुखी होऊ शकत

नाही. केवळ ऐहिक पातळीवर जगणाऱ्या भोवतालच्या माणसात जगन एकाकी होते. तिचे दुबळे हात परिस्थिती बदल शकत नाहीत. तिची घालमेळ लेखकाने प्रत्ययकारकपणे रेखाटली आहे. तुपेच्या चिपाड मध्ये शिक्षण घेऊन बेकार राहिलेल्या संतूची कहाणी येते नोकरी मिळाल्यावर संतू पोटाला चिमटा घेऊन लग्नासाठी पैसा साठवतो, पण तो पैसा बापाच्या आजारपणात खर्च करायचा का? हा त्याच्या पुढील प्रश्न तुपेंनी प्रभावीपणे रेखाटला आहे. मखुळीफ मध्ये तुपेंनी मदेवदेवस्कीफ चे चित्रण घडविले आहे. १९८२ साली प्रसिद्ध झालेली अशोक व्हटकर यांची मेलेलं पाणी व नामदेव कांबळे यांची मराघववेळफ यातून दलित बहूजन संघर्षाचा आविष्कार दिसून येतो.

शशिकांत तासगावकर यांच्या घराणं तमासगिराचं या कादंबरीत तमाशा कलावंताची जीवनकहाणी येते. विजय शिरसाठ यांच्या मकुस्ती आणि काळगर्भफ या कादंबरीत दलितांमधील राजकारण, उच्चनीचता, भेदभाव आणि त्याचा फायदा घेणारे सवर्ण यांचे प्रत्ययकारी चित्रण येते वैजनाथ कळसे यांच्या मतीन भींतीफ मध्ये ग्रामीण भागातील उच्चनीचता, जातीयवाद, राजकारण, भ्रष्टाचार यांचे चित्रण येते. नामदेव ढसाळांच्या या महाडकी-हाडवळाफमध्ये बलुतेदारीचे चित्रण येते. योगेंद्र मेश्राम यांच्या ममाझं गाव कुठायफ मध्ये दलित सवर्ण संघर्षाचे चित्रण येते. बा.स.हाटे यांच्या मयुगविधानफ मध्ये दलितांचे भूतकालीन जीवन चित्रण येते.

थोडक्यात १९८० नंतरची दलित कादंबरी शिक्षणासाठीची धडपड, बेकारी, जातीयवाद, राजकारण, बलुतेदारी पद्धत, दलित सवर्ण इ.विषयांचे चित्रण करते.

१९८० नंतरची हाडकी हाडवळा ही नामदेव ढसाळ्यांची कादंबरी ही ढसाळांसारख्या दलित पँथर कादंबरी असूनही ती दलित संवेदनेपेक्षा ग्रामीण संवेदनेकडे अधिक झुकते, दलित कादंबरी अशी ग्रामीण कादंबरीशी लगट करताना दिसते. माधव कोडविलकर, केशव मेश्राम, बाबुराव बागूल, अशोक व्हटकर यांच्या दलित कादंबरीतून ग्रामजीवनाचे प्रभावीपणे दर्शन घडते.

याउलट ग्रामीण कादंबरीत दलित संवेदन क्वचितच व्यक्त होते. नव्या ग्रामीण कादंबरीकारांनी वर्गीय जाणिवांची चित्रण केलेले असले तरी ग्रामजीवनातील जातीय तणावांना ते स्पर्श करताना दिसत नाही.

१९८० नंतरच्या दलित कादंबरीकडे पाहताना काही गोष्टी जाणवतात.

१) दलित कादंबरी संख्यात्मकदृष्ट्या कमी असली तरी गुणात्मकदृष्ट्या

मराठी साहित्यात आपला ठसा उमटवणारी आहे. 'राघववेळ' सारख्या कादंबऱ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

२) दलित साहित्यात ज्या काही कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत त्यांचे स्वरूप पारंपरिक मराठी कादंबरीपेक्षा निश्चितच वेगळे दिसते आहे.

३) दलित कादंबरी एखाद्या विषयापेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभवाचाच कलात्मक आविष्कार करण्याकडे अधिक झुकते.

४) दलित कादंबरी सामाजिक जीवनावर, विषमतेवर, जातीय परंपरेवर अधिक प्रकाश टाकते.

५) दलित हाही एक माणूस आहे ते दाखविण्याचा प्रयत्न ह्या कादंबऱ्या करतात.

६) समूह संघर्षाचे चित्रण करणाऱ्या या दलित कादंबरीच्या निर्मितीमुळे मराठी वाङ्मयाचे अनुभव क्षेत्र अधिक विस्तारले, समृद्ध व संपन्न झाले आणि समाजाभिमुख झाले आहे असे असले तरी दलित साहित्यात कादंबरी लेखन म्हणावे तितके झाले नाही. याचे कारण सांगताना डॉ.वसंत डोळस म्हणतात की, दलित कादंबरीकार आपल्या समाजाच्या जीवनाकडे आपल्या समाजाच्या दृष्टिकोनातून पाहू शकतात, पण इतर समाज घटनांशी होणाऱ्या अभिसरणातून येणारी आकलन क्षमता अजून तरी दलित दृष्टिकोनात आलेली दिसत नाही. तसेच कादंबरीसारख्या व्यापक वाङ्मयप्रकारच्या निर्मितीसाठी चिंतनात्मक दृष्टिकोनाची गरज असते. या दृष्टिकोनाच्या अभावामुळे आज दलित साहित्यिकांच्या हातून कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकाराची निर्मिती फारशी होऊ शकलेली नाही. दलित साहित्यातील कादंबरीच्या अभावाचे कारण दलित लेखकाच्या चिंतनाचा अभाव असल्याचे डॉ. वसंत डोळस यांनी स्पष्ट केले आहे. परंतु मला वाटते केवळ चिंतनाच्या अभावामुळे दलित साहित्य मोठ्या प्रमाणात दलित कादंबरी निर्माण होऊ शकली नाही, असे म्हणता येत नाही तर कादंबरीत कल्पकतेचे जग मोठे असते. किंबहुना कल्पकतेला विशेष महत्त्व असते व या कल्पकतेतूनच कादंबरीची सर्जनक्षमता प्रतीत होते. तथापि दलित लेखक कल्पकतेपेक्षा प्रत्यक्ष जीवनाला अधिक महत्त्व देतो.

* * *

# १९८० नंतरची दलित व ग्रामीण कादंबरी

–प्रा.देविदास शेटे

१९४५ नंतर मराठी साहित्यामध्ये जे वाङ्मय प्रवाह निर्माण झाले, त्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य हे महत्त्वाचे दोन प्रवाह आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात हे जास्त साहित्यामधून प्रवाही झालेले दिसून येतात. ग्रामीण आणि दलित या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ग्रामीण साहित्य हे ग्रामीण जीवनाशी निगडित आहे. ग्रामीण भागातील समस्या, ताणतणाव साहित्यामधून चित्रित करणे हा प्रधान हेतू आहे. हे करत असताना ग्रामीण जीवनाशी निगडित असणारा शेतकरी व ग्रामीण समाज यांच्या वाट्याला आलेले दुःख साहित्यामधून ज्या वाङ्मयप्रकारात सविस्तर यायला लागले. त्याला ग्रामीण कादंबरी असे म्हणतात. म्हणजे ग्रामीण भागात जन्माला आल्यामुळे त्यांना जे दुःख सहन करावे लागते. त्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम साहित्याने केलेले दिसते. तसेच दलित साहित्यामधून सुद्धा विशिष्ट जातीत जन्माला आल्यामुळे हजारो वर्ष ज्यांच्यावर अन्याय अत्याचार झाले. माणूस म्हणून जन्माला आले पण माणूस म्हणून जगता आले नाही. अशा एका गावकुसाबाहेरील समाजाचे जे चित्रण साहित्यामधून यायला लागले त्याला दलित साहित्य असे म्हणतात. या दोन्ही प्रवाहात कादंबरी या वाङ्मय प्रकारात जास्त लिखाण झालेले दिसत नाहीत. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी आपल्या साहित्याचा अन्वयार्थ या पुस्तकात म्हटले आहे, की एक तर मराठीमध्ये ग्रामीण वाङ्मय विपुल प्रमाणात निर्माण झालेले असले तरी ग्रामीण कादंबरी मात्र संख्येने अल्पच आहे. पुढे ते म्हणतात १९७० नंतर ग्रामीण कादंबरीची संख्यात्मक वाढ होत असली तरी इतर कादंबरीच्या आणि कथेच्या तुलनेत ती कमीच आहे.

दलित कादंबरीचा विचार करता या साहित्य प्रकाशनात इतर साहित्यप्रकाराच्या मानाने कादंबरी लेखन म्हणावे तसे झाले नाही. याविषयी डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, दलित जीवन चित्रण करणारे अगर दलित लेखकाने लिहिलेले कादंबरी लेखन फारसे नाही. ही वस्तुस्थिती आहे. दलित प्रतिभा प्रथम काव्यामधून प्रकट झाली. (हे होणे स्वभाविक होते) आणि काव्याच्या निकट आत्मकथनामध्ये ती जास्त रमली किंबहुना सगळ्या अनुभवांचा

निचरा आत्मकथनांमध्ये होऊन गेल्यामुळे कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न दलित कादंबरी करांनी केला नसावा.

सुरुवातीच्या काळात ग्रामीण व दलित साहित्यांमधून कादंबरी या वाङ्मय प्रकारात इतर साहित्य प्रकाराच्या तुलनेने कमी प्रमाणात लिखाण झाल्याचे आपणास दिसते.

१९६० नंतरची कादंबरी ही खऱ्या अर्थाने वास्तवाकडे जास्त झुकली आहे. असे आपणास दिसते. या काळात ग्रामीण कादंबरी लिहणारे जे लेखक होते. त्यामध्ये आनंद यादव, उद्धव शेळके, दि.बा. मोकाशी, श्री.ना. पेंडसे, शंकर पाटील, बाबाराव मुसळे, मोहन पाटील, रा.र. बोराडे, ना.धो. महानोर, डॉ.नागनाथ कोत्तापल्ले या सर्वांचा उल्लेख आपणास करावा लागतो.

दलित कादंबरीच्या बाबतीत विचार करता सुरुवातीला अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा. शेंडे, या दलित लेखकांची कादंबरी प्रसिद्ध झाली तरी दलित या संकल्पनेशी त्यांच्या लेखनाच्या प्रेरणा किती जुळतात, हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. दलित कादंबरी लेखनाकडे पाहता काही मोजकीच नावे ठळकपणे लक्षात येतात त्यात बाबुराव बागूल यांची सूड, केशव मेश्राम यांची हकिकत आणि जटायू, नामदेव ढसाळ यांची हाडकी हाडवळा, सुधाकर गायकवाड यांची शूद्र, माधव कोंडविलकर यांची अजून उजाडायच आहे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. खऱ्या अर्थाने १९६० ते १९७० च्या दरम्यान जीवनाच्या सर्व स्तरामधून लेखन करणारे लेखक निर्माण झाल्याचे दिसते. परंतु याचा जास्त परिणाम १९८० नंतरच्या कालखंडात निर्माण झालेल्या ग्रामीण आणि दलित कादंबरीधून दिसून येतो. १९८० नंतरच्या कादंबरीमधून ग्रामीण व दलित जीवनातील अलक्षित जीवनानुभव प्रकट होऊ लागले. आणि साहित्याची व्याप्ती दलित ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी इथपर्यंत जाऊन पोहचली.

या काळात ग्रामीण कादंबरीमध्ये लिखाण करणारे विश्वास पाटील, राजन गवस, यांची 'चौंडक', 'भंडारभोग', अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी', 'बगाड', रविंद्र शोभणे यांची 'कोंडी', बाबाराव मुसळे यांची 'हल्या हल्या दुधू दे', बाबू बिरादार यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या', बा.ग. केसकर, सरदार जाधव यांची 'कोयता', भिमराव वाघचौरे यांची 'रानखळी', रा.र.बोराडे यांची 'चारापाणी' या सर्व लेखकांना ग्रामीण म्हणता येणार नाही. पण ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण त्यांच्या कादंबरी मधून आलेले आपणास दिसते.

१९९० नंतर सदानंद देशमुख व त्यांची 'तहान' ही कादंबरी तसेच २००२ मध्ये आलेली 'बारोमास' ही कादंबरी विश्वास पाटील यांची 'पांगिरा', अरूण साधू याची 'शापित' या सर्व कादंबऱ्यामधून त्यांनी शेती आणि शेतीशी निगडीत ग्रामीण माणूस यांचे कसे बाराही महिने शोषण होते यांचे चित्रण येते. म्हणजेच १९९० नंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनातील दुःख कादंबऱ्यामधून यायला लागले, असे म्हणावे लागले. १९९० पासून आजपर्यंत ग्रामीण कादंबरींची अनेक बदलती रूपे आपणास पहावयास मिळतात. आज ग्रामीण तसेच सर्वच साहित्यावर जागतिकीकरणाचा परिणाम झाला आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनात खूपच मोठे बदल होत आहेत. ग्रामीण जीवनातला खरा माणूस हरवत चालला आहे. प्रत्येक माणूस स्वार्थी झाला आहे. शेती तंत्रज्ञानातील बदल आधुनिक शेती पद्धती औद्योगिकीकरण यामुळे प्रदूषणात झालेली वाढ तसेच निर्सगाचा असमतोलपणा याचा विपरीत परिणाम शेतकरी जीवनावर झाला असूनही अनेक खेडी विस्तापित झाल्याचे आपण पाहतो आहे. या सर्वांचे चित्रण कादंबरीमधून येत आहे व समाजपरिवर्तन होत आहे. १९८० ते २००५ या कालखंडातील दलित कादंबरीचा विचार करता दलित कादंबरी पण कशी बदलत गेली तिने कोणत्या जाणिवा आविष्कृत केल्या तिची परंपरा कोणती तिच्या प्रेरणा कोणत्या व ग्रामीण कादंबरीपेक्षा तिचे वेगळेपण काय होते. खऱ्या अर्थाने ती दलित समस्या मांडत होती का? यांचा विचार करता सुधाकर गायकवाड, नामदेव ढसाळ, बा.स. हाटे, भीमसेन देठे, अशोक व्हटकर, नामदेव कांबळे, पांडुरंग कदम, एकनाथ साळवे, सिद्धार्थ रामटेके, जी.के. ऐनापुरे, कल्पना जाधव, इ. कादंबरीकारांचे लेखन पाहिले तर त्यामधून दलित समाजाच्या खऱ्या समस्या ती मांडते आहे. असे आपणास म्हणावे लागते.

एकंदरीत १९६० नंतरच्या ग्रामीण आणि दलित कादंबरीचा विचार करता, या दोन प्रवाहामधील कादंबरी या वाङ्मयप्रकारात जास्त लिखाण झालेले दिसत नाही. खऱ्या अर्थाने १९६० नंतरच्या दलित व ग्रामीण कादंबरीमधून सुरुवातीला ग्रामीण व दलित जीवनाचे चित्रण यायला लागले. १९८० नंतर तिच्या मध्ये हळूहळू बदल होऊन ग्रामीण व दलित जीवनाच्या समस्या ती मांडू लागली. ग्रामीण जीवनाशी निगडित असणारा शेतकरी व दलित यांच्या वाट्याला येणारे दुःख आणि दारिद्रय यांचे चित्रण कादंबरीमधून यायला लागले. पूर्वीच्या कादंबरीमधील रोमॅन्टिसिझम जाऊन सामाजिकता समस्यांचे चित्रण ती करू

लागली. विशिष्ट जातीत जन्माला आल्यामुळे दलितांच्या वाट्याला आलेले दुःख दलित कादंबरीमधून तर ग्रामीण जीवनाशी निगडित असणारा शेतकरी, दुष्काळ, निसर्गाचा असमतोलपणा, प्रदूषण यामुळे त्यांच्या वाट्याला येणारे दुःख तसेच समकालीन राजकारण, अर्थकारण, धर्मकारण यांचा दलित व शेतकरी यांच्यावर झालेला परिणाम, चळवळींचा परिणाम यांचे चित्रण कादंबरीमधून यायला लागले, पण आज भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये शेतकऱ्यांची व दलितांची काय आवस्था आहे? समाजामधून जातीयता नष्ट झाली का? खरच शेतकरी समृद्ध झाला आहे का? याला जबाबदार कोण? या सर्वांचे चित्रण झाले पाहिजे असे मला वाटते. जागतिकीकरणाला सामोरे जायचे असेल तर जात, धर्म, पंथ, ग्रामीण, दलित याच्या पलीकडे जाऊन विचार करावा लागेल. तरच आपण जागतीक स्पर्धेमध्ये टिकू शकू आणि या सर्वांचे चित्रण कादंबऱ्यामधून येणे गरजेचे आहे असे मला वाटते.

* * *

# मराठी दलित व ग्रामीण कादंबरीतील बदलत्या जीवनाचे चित्रण

-प्रा.डॉ.बाळासाहेब दिघे,

**प्रस्तावना** -

परिवर्तन हे मानवी जीवनाचे एक मूल्य आहे. समाजामध्ये परिवर्तनाचे मुख्य तत्त्वज्ञान मानले जाते. मराठी ग्रामीण व दलित साहित्यामध्ये आजवर अनेक परिवर्तने झाली आहे. दलित कादंबरी ही ज्याप्रमाणे परिवर्तनाचा विचार मांडते त्याप्रमाणे ग्रामीण कादंबरी ही देखील परिवर्तनाचा विचार मांडते. केवळ ग्रामीण साहित्यातून ग्रामीण परिसराचे आणि त्या परिसरात राहणाऱ्या माणसांचे चित्रण, कृषी संस्कृतीचे, खेड्यात राहणाऱ्या सर्वच प्रकारच्या माणसांचे जीवन, त्यांचा संघर्ष, व्यथा-वेदना, आशा-आकांक्षा यातून निर्माण झालेल्या जाणिवा प्रकट केल्या जातात असे नाही दलित कादंबरीद्वारे प्रकट झाल्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये दलित साहित्य व ग्रामीण साहित्य यांच्यारूपाने मराठी साहित्य समृद्ध झाले. मराठीतील दलित साहित्य संपूर्ण देशातील दलित लेखकांना प्रेरणा देणारे ठरले आहे. दलित लेखकांना दलित जीवनाबद्दल आस्था असल्याने हे साहित्य निर्माण झाले आहे असे म्हणावे लागेल. भूक, दारिद्रय, अन्याय, विषमता हा या दोन्ही कादंबरी लेखनाचा मुख्य विषय आहे. दोन्ही साहित्यात ते कमी-अधिक स्वरूपात प्रकट झाले आहे. नवे आशय, नव्या जाणिवा यांनी समाजाला एक नवे भान येऊन अनेक तरुणांनी दलित व ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रामध्ये लेखन करण्यास सुरुवात केली. ग्रामीण जीवनातील अन्याय, विषमता, शोषण, कुटुंबातील हेवेदावे, समाजातील दुभंगलेपणाचे प्रत्ययकारी चित्रण वरील दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यांतून होऊ लागले. सावकारीचे पाश, बेरोजगारी, दुष्काळ, साखरकारखान्यांमुळे निर्माण झालेली सरंजामशाही यामुळे दलित व ग्रामीण कादंबरी माणसांच्या दुःखाची जाणीव हे विषयांचा वाचकांना कमी-अधिक प्रमाणात परिचय दोन्ही कादंबरीलेखनातून करून देण्याचा प्रयत्न झाला.

दलित व ग्रामीण कादंबरीमध्ये खेड्यातील चित्रण केले आहे. दलित कादंबरीच्या रूपाने दलित समाजाचे शोषण करणारा सवर्ण वर्ग दाखविला आहे. त्यांनी दलित समाजाचे वर्षानुवर्षे शोषण केले आहे ही खंत व्यक्त केली आहे.

ग्रामीण कादंबरीमध्ये शेतीत राबणारा शेतकरी हा सावकारांचा, सरकारी अधिकाऱ्यांच्या शोषणाला बळी पडलेला आहे. दलित साहित्यामध्ये दलितांना अपमानाची, विषमतेची वागणूक दिली जाते. त्यांना पोटाला पोटभर अन्न मिळत नाही, अंगावर कपडे मिळत नाही हेच चित्र ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये दाखविले आहे. स्वातंत्र्यानंतर शेतीत राबणाऱ्यांचे जीवन अधिकाधिक दुःखद होत गेले आहे. दोन्ही ठिकाणी शोषण, अन्याय, अत्याचार सहन करणारा वर्ग कादंबरीकारांनी रंगविला आहे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये लढा देऊन जीवनात यशस्वी होणारे नायक दोन्ही ठिकाणी दिसतात. समाजातील विविध स्तरातील दलितांच्या जीवनाचे चित्रण दलित कादंबरीकारांनी केले आहे. शंकरराव खरात–मी माझ्या गावच्या शोधात, ना.रा.शेंडे–काजळी रात्र, हिं.गो.बनसोडे–मुक्तिसंग्राम, ना.बं.जाधव–डॉ.अंजना, बा.स.हाटे–युगविधान, ज.वि.पवार–बलिदान, भीमसेन देठे –घुसमट, इस्कोट, चक्री, सुधाकर जाधव–शूद्र, माधव कसबे–नकुल, उत्तम कांबळे–श्राद्ध, विजय काळे– जागृती, बी रंगराव–सोमा, मुरलीधर जाधव–कार्यकर्ता, बाबुराव गायकवाड–झळ, विलास आंभोरे–आघात, पांडुरंग कदम–कृष्णपक्ष, नामदेव ढसाळ–हाडकी हाडवळा, प्रेमानंद गज्वी– जागर, योगेंद्र मेश्राम–माझं गाव कुठाय?, शरणकुमार लिंबाळे–दंगल, प्रज्ञावंत गौतम–आक्रंदन, अशोक लोखंडे–निष्ठा, कचरू भालेराव–स्मशानभूमी, सुगंधाबाई शेंडे–फिपुली, हरिभाऊ पगारे–कलिंदी, भाई तांबे– नियती, बाबुराव गायकवाड–आग, नामदेव कांबळ–ऊनसावली, माधव कोंडविलकर–अनाथ, अशोक व्हटकर– मेलेलं पाणी, उत्तम बंडू तुपे–झुलवा यासारख्या अनेक कादंबऱ्यांतून दलित जीवनचित्रण पहावयास मिळते.

भीमसेन देठे 'इस्कोट' या कादंबरीमध्ये दामूच्या घराचे वर्णन करताना लिहितात–'दामूचं घर म्हणजे माती दगडाच्या चार भिंती. त्याचीही पडझड झालेली. त्यावर कित्येक वर्षाचे जुनाट वासे. त्याच्यावर खिळ्यांनी ठोकलेले पत्रे. पत्र्यांना कित्येक ठिकाणी भोकं पडलेली, घरात उन्हाळ्यात अंगाची लाहीलाही व्हायची, तर पावसाळ्यात ते जागेजागी गळायचे. सुधाकर गायकवाड 'शूद्र' या कादंबरीमध्ये दलितांच्या वस्तीचे वर्णन करताना लिहितात–'एकमेकांपासून फटकून असल्याप्रमाणे घरे एकमेकांपासून अंतरा–अंतरावर होती. घरांची छपरे गवत व वृक्षफांद्यांनी शेकारलेली असून ती जमिनीकडे झुकलेली होती.' गायकवाड यांनी घरांचे अशा प्रकारचे वर्णन अनेक ठिकाणी वाचवयास मिळते.

माधव कोंडविलकर यांनी 'अजून उजाडायचं आहे' या कादंबरीमध्ये देवजीच्या घरादाराचं वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. 'घरही मोडकं -तोडकचं, तीन बाजूनं दगड-मातीच्या भिंती, पुढे संपूर्ण उघडं. मध्ये अर्धी भिंत घालून स्वयंपाकासाठी ही वेगळी खोली बनविलेली. त्याला दरवाजाही नव्हता, निमित्ताला बाबूंच्या कामट्यांचा एक साधा तट्या लावलेला होता. कुत्रंही मानेनं उडवू शकेल असा!'

अशोक व्हटकर 'मेलेलं पाणी' मध्ये लिहितात, 'त्या गावातील वस्ती भयंकर गलिच्छ स्वरूपाची होती. गाव वेशीच्या आत दूरवर होतं. एखादा मनुष्य वाकूनच आत जाऊ शकेल इतपतच उंच चौकटी असलेली कित्येक दारे ढासळलेल्या मानवतेसारखी कित्येक ठिकाणी वाकली होती. घराची कौले काळीलाल अशी मिश्र रंगाची होती. घरांची, कौलांची शेकारणी न झाल्यामुळे कौलावर 'हराळी' आणि 'शंकरूबा' माजला होता.'

शंकरराव खरात, भीमसेन देठे, केशव मेश्राम, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर यासारख्या अनेक लेखकांनी कादंबरीद्वारे खेड्यातील दलितांच्या जीवनाचे प्रत्ययकारी वास्तव चित्रण केले आहे. सवर्णीय लेखकांच्या दलित जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांतून एवढी प्रत्ययकारिता येत नाही. चिंदरकर 'महापूर' या कादंबरीत लिहितात- 'काही घरांच्या भिंती मातीच्या तर काही कुडाच्या होत्या. बाबूंच्या काठ्या व अर्धवट विणलेल्या टोपल्या, डाल्या, परड्या प्रत्येकाच्या खळ्यात दिसत होत्या. माडखोलकर 'चंदनवाडी' या कादंबरीमध्ये अस्पृश्य अभिमन्यूचे घर स्वच्छ, टापटीप व अंगणात तुळशीवृंदावन होते. त्यात काचेच्या तुकड्यांचे स्वस्तिक होते. गोठ्यात गाई व शेळ्या होत्या असे वर्णन करतात.

सद्याच्या परिस्थितीचा विचार करता आजची शेती पूर्वीप्रमाणे पारंपरिक स्वरूपाची न राहता तिच्यामध्ये दिवसेंदिवस आमूलाग्र स्वरूपाचे बदल होत आहे. भलरी, सुगीचे, मोटेचे गाणे ऐकणे आज दुर्मीळ झाले आहे. पूर्वीचा शेतकरी किंवा दलित बांधव अर्धपोटी राहत होता ही परिस्थिती कितीतरी पटीने बदललेली आहे. पूर्वी समाजात विषमता होती. दलित बांधवांना अपमानचे जीवन जगावे लागत होते ही परिस्थिती आज राहिली नाही. जागतिकीकरणामुळे शेतीमध्ये बदल झाले नाही तर घरोघर टेलिव्हिजनच्या आक्रमणामुळे लोकांची जीवनशैली बदलली आहे. फाटक्या कपड्यात राहणारा शेतकरी आजच्या

काळात चांगल्या कपड्यामध्ये राहत आहे. कांदा-मिरची खाणारा शेतकरी आज चांगले जेवण घेत आहे. हे खेड्यातील सर्वच ठिकाणी हे चित्र दिसते. आज असंख्य शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेण्यासाठी परदेशात जात आहेत काही मुले परदेशातून शिक्षण घेऊन आली आहेत तर काही मुले परदेशामध्ये स्थिरावले आहे. कित्येक शेतकऱ्यांचे धोतरे, फेटे, पैरणी, पायजमे जाऊन शर्ट, पॅण्ट आलेल्या आहेत. शेतकऱ्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या महागड्या शाळेत शिकत आहेत. मळक्या शर्टाच्या बाहीने शेंबुड पुसणारा, कोंबड्यांना हुसकावत, चुलीच्या धुरामध्ये, गोणपाटावर पाटीवर पेन्सिलीने लिहिणारा 'आनंदा रत्नाप्पा जकाते' सारखा मुलगा दिसत नाही तर आज स्वच्छ कपडे परिधान करून शर्टिंग करून टाय लावलेला सोनू खुर्चीवर बसून ए.बी.सी.डी. वहीमध्ये लिहिणारा शेतकऱ्याच्या घरोघरी दिसत आहे. जुने वाडे ढासळून स्लॅबच्या इमारती गावेगाव दिसू लागल्या आहेत. पाणी साठविण्याचे रांजण आता कालबाह्य झाले आहे त्यांची जागा पिंप, टाक्या, कुलर यांनी घेतली आहे याचा उल्लेख दलित किंवा ग्रामीण साहित्यातून डोकावत नाही.

अलीकडील काळामध्ये ग्रामीण कादंबरीकारांना ग्रामीण जीवनासंबंधीचे एक नवे भान आले. आनंद यादव यांनी 'गोतावळा' या कादंबरीद्वारे ग्रामीण जीवनानुभवाचे दर्शन घडविले आहे. ग्रामीण संस्कृतीचे दर्शन नारबाच्या तोंडून केले आहे. कृषिसंस्कृतीवर यंत्रसंस्कृतीवर केलेले आक्रमण व त्यातून बदललेली मालकाची व्यवहारी वृत्ती हा या कादंबरीचा विषय आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या कृषी सांस्कृतिक जिव्हाळा, पशू व मानव यांचे संबंध आणि खेड्यातील कृषिजगत कसे लयाला जाते या कथानकावर ही कादंबरी आधारलेली आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीमधील नारबाला झोपतून उठल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत शेतीची व शेतीशी संबंधित निरनिराळी कामे करावी लागतात त्याप्रमाने उद्धव कांबळे यांच्या 'श्राद्ध' या कादंबरीतील आबाला लहानपणापासून शिक्षणाचे वेड घेतलेल्या आबाला पाटलांच्या वाड्यावर चाकारीला ठेवले जाते. सकाळी उठले की शेणात हात घालायचा. दहा-वीस जनावरांचं शेण काढायचं, गोठा साफ करायचा, भाराभर लाकडं फोडायची, शेतावर जायचं. पडेल ते काम करायचं. मिळेल ते खायचं, वर पाटलाच्या शिव्या. राबराबून शिळं अन्न खायचं.' अशा स्वरूपाचे कामे आबाला करावी लागत होती. दोन्ही कादंबरीतून असे दिसून येते की, आबा काय किंवा नारबा

काय दोघांच्या वाट्याला अनंत कष्ट आलेले आहेत. कितीही कष्ट केले तरी त्याचा योग्य असा मोबदला मिळत नाही, उलट अपमान, शिव्या पदरात पडतात. हे समान विषय या दोन्ही कादंबरीमधून दिसून येतात.

ग्रामीण व दलित कादंबरीच्या रूपाने जीवनमूल्यांचे महत्त्व नकळत पटवून देण्याचा प्रयत्न होत आहे. आनंद पाटील यांनी 'इच्छामरण' या कादंबरीद्वारे संस्कृती, रूढी, परंपरा अजूनही गावामध्ये मोठ्या प्रमाणात पाळल्या जातात हे दाखवून शहरातील धावपळ ग्रामीण भागात दिसत नाही. सण, उत्सव, विवाह समारंभ यासारखे अनेक कार्यक्रम उत्साहाने होतात. 'इच्छामरण' या कादंबरीमध्ये अडाणी आजीच्या इच्छेनुसार तिच्या मरण सोहळयाचे चित्रण केले आहे. या अनुषंगाने गावात, आजीच्या कुटुंबामध्ये घडणाऱ्या गोष्टींचे चित्रण केले आहे.

जुन्या पिढीचे आणि नवीन पिढीच्या विचारामध्ये मोठे अंतर पडत चालले आहे. दलित व ग्रामीण साहित्य केवळ समता, भूक, विषमता, दुष्काळ, बेरोजगारी, शेतीतील अस्थिरता या पलीकडे गेलेले दिसत नाही. आज घरातील माताभगिनींनी केलेला स्वयंपाक आवडीने खाणारा ग्रामीण युवक कुठेही दिसत नाही याउलट पानठेला, धाबा, बार, हॉटेल यातील अन्नपाणी आवडणारा युवक प्रत्येक ठिकाणी दिसत आहे. खेड्यामध्ये हेवेदावे आजही आहे. परंतु पूर्वीप्रमाणे समझोता होत नाही तर पैशाच्या जोरावर सर्व जण उड्या मारतात. गुन्हेगारी व भ्रष्टाचार याचे कारण आजच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये आहे असे दिसते. पंधरा-पंधरा तास वीज नसणे, युवकांमधील बेकारी, परीक्षेमध्ये कॉपी करू देण्यासाठी पैसे, नोकरी मिळविण्यासाठी पैसे हा सगळा भ्रष्ट कारभार शिक्षण क्षेत्रामध्ये सुरू झाला आहे. शिक्षणाला आपण गोरगरिबांच्या कल्याणाचे माध्यम म्हणून ओळखत होते तेच क्षेत्र आता भ्रष्ट झाले आहे या गोष्टींचा परिणाम युवा पिढीवर होत आहे.

रा.रं.बोराडे यांनी लिहिलेली 'कथा एका तंटामुक्त गावाची' ही ग्रामीण जीवनावरील कादंबरी आहे. ग्रामीण संस्कृतीशी निगडित त्यांचे साहित्य ग्रामीण जीवनाच्या अनेक अंगांना स्पर्श करते. या कादंबरीलेखनातून इसारवाडी या गावाची निर्मिती करून सामाजिक मूल्य जोपासण्याचा संदेश दिला आहे. दारूचे दुष्परिणाम दाखवून देऊन दारू संसारचे वाटोळे करते हे दाखविले आहे. मुक्या प्राण्यांवर प्रेम करणे, ग्रामीण संस्कृती, माणसांचे निरनिराळे स्वभाव, एकमेकांतील हेवेदावे, राजकारण वगैरे सर्व विषय या कादंबरीमध्ये समाविष्ट झाले आहे. आत्मभान आलेली स्त्री केवळ परंपरेला न झुगारता स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरते.

पूर्वीच्या काळी प्रत्येक गावागावामध्ये जे वैभव होते ते आज राहिले नाही. गावामध्ये घर, घराच्या आजूबाजूस शेत ही कळा रयाला गेली आहे. रवींद्र शोभणे यांनी लिहिलेल्या 'पांढर' या कादंबरीद्वारे जागतिकीकरणाने गावगाड्याचे रक्त शोषण केले आहे असा वाचकांना सुन्न करून टाकणारा अनुभव त्यांनी कादंबरीद्वारे मांडला. आज खेडी ओसाड पडत आहेत. खेड्यातील लोक नोकरीच्या, व्यवसायाच्या निमित्ताने शहरात झुंडीने येत आहे. खेडे ओसाड पडत असल्याने खेड्यामध्ये जीव लागत नाही. एक दिवस रहावे किंवा एक रात्र राहण्याची वेळ आली तर नकोसे वाटते. कालची खेड्यातील माणसे तीच आहे तरीही असे का व्हावे? ही विचार करण्याची वेळ आली आहे. केवळ महामार्गावर असणाऱ्या खेड्याची अवस्था थोडी वेगळी आहे परंतु महामार्गापासून थोड्या अंतरावर किंवा दूरवर असणाऱ्या खेड्यांची दशा किती वाईट असेल याचा विचार करायला नको. कारण महामार्गाजवळच्या खेड्यांना आधुनिकतेचा स्पर्श झालेला असतो. त्यामुळे तेथे रंगीबेरंगी दुनिया दिसते किंवा मन रमेल असे हॉटेल, दुकाने, मनोरंजनाची साधने असतात. 'पांढर' मधील खरसोली गाव यासर्वांचे प्रतीक आहे. दुष्काळ आणि नापिकी यातून त्या खेड्यामधील लोकांची बदललेली मानसिकता लेखकाने टिपलेली आहे. या गावातील तरुण वर्ग आसपासच्या शहरातील झगमटाचे आकर्षण, भौतिक सुखसोयी याकडे आकर्षित होतात. ही सर्व खेड्याच्या विनाशाची काही कारणे लेखक सांगून जातो. गावातील नागोराव पाटील, वासुदेव काळे, साहेबराव पाटील ही माणसे स्वतःचे दुःख प्रकट करतात. गावामध्ये सलग दोन-तीन वर्षे पाणी दिसू नये... झाडांचे कोळसे व्हावे ... जनावरं तडफडून मरावीत अशा वेळी फक्त पाणी दिसावं म्हणून गाव सोडून जाण्याची जी परिस्थिती निर्माण होते त्याचे चित्रण रवींद्र शोभणे यांनी केले आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे असे आपण म्हणतो. शेतीप्रधान देशामध्ये शेती करणाऱ्या शेतकऱ्याला मदत करणारे घटक कधी सुखी होते का? हा वाचकाला प्रश्न पडतो. सततच्या संकटांशी एकाकी झुंज देऊन शेतात राबणारा शेतकरी कधी सुखी होत नाही. वारंवार पडणारे दुष्काळ, राजकीय शक्तीकडून होणारी लुटालूट ही शेतकरी किंवा दलित बांधव यांच्यासाठी आव्हानात्मक संकट ठरत आहे हे दोन्ही प्रकारच्या कादंबरीतून प्रकर्षाने प्रतीत व्हायला हवे आहे.

कित्येक शेतकरी मोबाईलचा वापर करतात. मोबाइलमध्ये बाजारभाव समजत असल्याने आज काही शेतकरी एकत्र येऊन शेतामध्ये पिकविलेला शेतमाल विक्रीसाठी बाजारपेठेमध्ये नेतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रगतीला वाव मिळत आहे. दुसरे असे की आज अनेक सहकारी, राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करत आहे. पूर्वीचा शेतकरी बैल व बैलांच्या सहाय्याने शेतीची मशागत करत होता. नंतरच्या काळामध्ये टॅक्टरच्या सहाय्याने शेतीची मशागत करत होता आणि आज कित्येक शेतकरी हार्वेस्टर, जेसीबी, पोकलॅनच्या साहाय्याने शेती करत आहेत हे आजच्या ग्रामीण साहित्यातून मांडले जात नाही.

**समारोप –**

ग्रामीण व दलित साहित्यातून जागतिकीकरणात होणाऱ्या बदलाचे भान साहित्यिकांनी ठेवून समाजातील बदल टिपण्यासाठी तत्पर राहिले पाहिजे. बदलत्या ग्रामीण समाजाचे चित्रण, समाजातील नवनवीन प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नवग्रामीण साहित्यिकांनी तत्पर राहिले पाहिजे. नवनवीन तंत्रज्ञान, बदलती जीवनशैली, युवकांमधील व्यसनाधीनता, शेतीचे बदलते अर्थकारण यावर भाष्य करून समाजाला विशेषतः युवकांना दिशा देण्याची जबाबदारी ग्रामीण साहित्यिकांनी घ्यायला हवी.

* * *

# दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा

–डॉ. सारीपुत्र तुपेरे

**प्रास्ताविक :**

साठोत्तरी कालखंडात उदयास आलेल्या विविध वाङ्मयीन प्रवाहांमध्ये दलित व ग्रामीण या दोन प्रवाहांची मौलिकता व उपयोगिता सर्वज्ञात आहे. मराठी भाषा आणि साहित्याला आशयाभिव्यक्तीच्या पातळ्यांवर समृद्ध करण्याचे कार्य तसेच नागरीकरणाच्या वर्तुळात अडकलेल्या मराठी लेखनाभिरुचीला तळागाळातील सामान्य माणसांच्या जीवनाचे संदर्भ देण्याचे ऐतिहासिक कार्य दलित व ग्रामीण वाङ्मयीन प्रवाहांनी केल्याचे विशेषत्त्वाने लक्षात घ्यावे लागते. दलित व ग्रामीण साहित्याचे वेगळेपण म्हणजे त्यांच्या अभिव्यक्तीची 'भाषा' होय. प्रमाण भाषेपेक्षा बोलीभाषेचा वापर या दोन्ही प्रवाहांनी लेखनाचे माध्यम म्हणून केला. त्यामुळे मराठी बोलीभाषांचे संग्रहालय म्हणजेच दलित व ग्रामीण साहित्य होय. असे म्हणावे लागेल. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बोलल्या जाणाऱ्या विविध प्रादेशिक, सामाजिक बोली या प्रवाहातील विविध वाङ्मय प्रकारात आलेल्या आहेत. त्यापैकी 'कादंबरी' या वाङ्मय प्रकारात तर याचे प्रदीर्घ व व्यापक रूप पाहावयास मिळते. याचे कारण कादंबरी हा भाषिकदृष्ट्या व्यापक पट मांडणारा रचनाबंध आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा हा विषय घेऊन त्याचे स्वरूप लक्षात घेण्याचा अभ्युपगम स्वीकारलेला आहे. त्यामध्ये दलित कादंबरीची भाषा, ग्रामीण कादंबरीची भाषा, दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा साम्यस्थळे व या दोहोंमधील भाषेचे वेगळेपण असा तौलनिक विचार करता येईल.

**दलित कादंबरीची भाषा :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून दलित साहित्याचा उदय झाला. आंबेडकरी चळवळीतून दलित साहित्यनिर्मिती झाली, त्यामुळे दलित साहित्य हे सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचा परिपाक आहे. दलित साहित्याची कक्षा गावकुसाबाहेरील समूह समाज, संस्कृती आणि भाषा यांनी बंदिस्त केलेली आहे. ही कक्षा व्यापक असून इतिहासात या परिघाबाहेरील जीवजाणिवांची मांडणी झालेली नव्हती. ती दलित साहित्यातून झालेली आहे. याचा प्रत्यय दलित साहित्यातील इतर वाङ्मयप्रकारांप्रमाणेच कादंबरीत मोठ्या प्रमाणात प्रत्ययास येतो. त्यामुळे दलित कादंबरीच्या भाषेचा विचार करताना

वरील संदर्भ लक्षात घ्यावे लागतात.

दलित साहित्यात 'कादंबरी' लेखन मोठ्या प्रमाणात झालेले आहे. मात्र त्याची नोंद मराठी कादंबरी समीक्षकांनी फारशी घेतलेली नाही. वास्तविक दलित जीवन वास्तवाचा पट कादंबरीचा उभारणीसाठी उपयुक्त आहे. याची जाणीव दलित लेखकांना उशिरा झाली असली तरी दलित कादंबरीत मोठे लेखन झालेले आहे. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा', शंकरराव खरात 'मी माझ्या गावच्या शोधात', भीमसेन देठे 'इस्कोट', सुधाकर गायकवाड 'शूद्र', केशव मेश्राम 'हकिकत आणि जटायू', माधव कोंडविलकर 'अजून उजडायचं आहे', अशोक व्हटकर 'मेलेलं पाणी', बळवंत कांबळे 'जोगव्याचे दिवस', विजय सिरसट 'कुस्ती', नामदेव ढसाळ 'हाडकी-हाडवळा', उत्तम कांबळे 'श्राद्ध', प्रेमानंद गज्वी 'जागर', नामदेव कांबळे 'राघववेल', मुरलीधर जाधव 'कार्यकर्ता', शरणकुमार लिंबाळे 'दंगल' बाबुराव बागूल 'सूड', योगीराज वाघमारे शिक्षणनामा, धुराळी, पडझड इ. कादंबऱ्यांची नावे सांगता येतील. या सर्व कादंबऱ्यातून दलित समाजातील अनुसूचित जाती, जमाती, आदिवासी, भटके विमुक्त या समाजांचे दर्शन घडते. या समाजदर्शनाची अभिव्यक्ती त्या त्या समाजाच्या भाषेतून झाल्याने दलित कादंबरीतील भाषेला सामाजिक संदर्भ प्राप्त झाल्याचे पाहावयास मिळते.

अण्णाभाऊ साठे यांनी 'फकिरा' या कादंबरीत सामाजिक संदर्भान्वये भाषा वापरली आहे. उन्हाळ्यात मातंग समाज दोर वळण्याचे काम करत असतो याचे चित्र करताना अण्णाभाऊ लिहितात, ''हिवाळा आला नि गेला. मग उन्हाळा आला. चैत्राचं चावरं ऊन धगधगू लागले. काराप्या-बोराट्यानांही बहर आला, नव्या फण्या येऊन निवडुंगाची मान अधिकच उंचावली. टचटचीत लाल बोंड डोळ्यात भरू लागली. फण्यांचे काटे सणसणू लागले. मांगवाड्यात मोठी धडपड सुरू झाली होती. आपापल्या दारात मागांनी वाक लावून चऱ्हाट वळायचं, काम सुरू केले होतं. मोठी माणसं सावलीला बसून पड सोडीत होती. लहान लहान पोरं चाक फिरवीत त्या उन्हात डोकीवर चिंध्या घेऊन माग सरत होती. ती वैतागली होती. तापलेली चाकं कुईकुई आवाज करीत होती. वाकाच्या बट्या आणि बुरकुल सर्वत्र उडत होती'' वरील वर्णनातून मातंग समाजाचे जीवनचित्रण आपणास पाहावयास मिळते. वरील संदर्भामध्ये आलेली भाषा मातंग समाजाचा व्यवसाय व त्याच्याशी निगडित शब्दसंच मांडते. उदा. 'वाक' हा शब्द येथे येतो. 'वाक' हा पदार्थ दोरी वळण्यासाठी तयार केला

जातो. त्याची एक प्रक्रिया असते. केकताड या झाडाची पाने कापून त्याला सोलले जाते. त्यापासून बनलेल्या दोऱ्या एकत्र करून पाण्यात त्या भिजविल्या जातात. नंतर त्या वाळवून त्यापासून 'चऱ्हाट' म्हणजे भिंगरीला बांधून ती वळली जाते. त्यापासून दोर तयार केला जातो. 'पड' हा शब्द म्हणजे चव्हाट्यावर दोर ओलून लांबलचक दोऱ्या सोडल्या जातात. त्यांना 'पड' सोडणे असे म्हणतात. एकूणच दलित कादंबरीत येणारी भाषा ही त्या त्या समाजाची खास बोली असून त्यामध्ये विशिष्ट शब्दप्रयोग येताता. हे शब्दसंच त्या भाषिक समाजाच्या जीवनाशी निगडित आहेत.

दलित कादंबरीत निवेदनासाठी वापरलेल्या भाषेबरोबरच संवादाची भाषासुद्धा अत्यंत प्रत्यंकारी पद्धतीने अभिव्यक्त झालेली आहे. या संवाद भाषेचे वेगळेपण म्हणजे इथले इथे दलित-दलितेवर, दलित-दलित संवाद येतात. त्याबरोबरच या संवाद भाषेतून दलितांच्या अस्मितेचे दर्शनही घडताना पाहावयास मिळते. शंकरराव खरात यांच्या 'पारधी' मी कादंबरीतील पोलीस व पारधी यांच्यातील संवाद इथे विचारात घेता येईल. खरात लिहितात, ''चित्र्या पोलीस स्टेशनमध्ये जातो. तोच बाहेर उभा असलेला पोलीस त्याच्यावर ठिसकारला, 'काय रे भडव्या! का तरंगतोस! काम उचलायचा बेत आहे का?' तू असा काय बोलतोस मला?, मग तू काय मंत्री झालाय म्हणून तुजं स्वागत करू? बेट्या अस संशयानं बघतोस?, मला तुझ्या सायबाला भेटायचं हाय! काय रे वर साहेबाला भेटायला अगोदर आम्ही काय मेलो व्हय रे?' वरील संवाद भाषेचा विचार करता दलितेत्तर व्यक्ती दलितांना नेहमी एकेरी संवादाने बोलताना दिसतो. विशेषतः एखादी शिवी व संवादाच्या सुरुवातीस असते. ही जात मानसिकता परंपरागत आहे. दलित हा शूद्र आहे, खालच्या जातीचा आहे. त्यामुळे दलितेत्तर समाज स्वतःला उच्चवर्गीय, वर्णीय समजून दलितांशी संवाद साधताना तुच्छता, तिरस्कारदर्शन शब्द वापरतो. एकूणच दलित कादंबरीत येणारी संवाद भाषा ही विविधांगी असून त्यातून सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक परंपरांची मानसिकता व त्यान्वये संवाद येताना दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्याने दलित समाजजागृत झाला. हजारोवर्षांची गुलामगिरी त्याने नाकारली व अस्मितादर्शनातून दलित विद्रोहाची, हक्काची भाषा बोलू लागला. या अस्मितारूपी भाषेचा प्रत्ययही दलित कादंबरीतील भाषेत पाहावयास मिळतो. बा.ह.हाटे यांच्या 'युगविधान' या कादंबरीने कोकणातील दलित समाजाचे त्यांच्यातील अस्मितेचे दर्शन

पहावयास मिळते. उदा. "हे भिकेचं अन्न आपण खायचं?, भिकेचं कसलं लेका? आपुन गरीब लोक, मायेनी देतात वाडवडलापासनं. बाय आण ती जोगली इकडं. पिठूने भीत भीत जोगली पुढ्यात ठेवली. त्यांने ती उचलली नि गोवरावर फेकल. म्हणाला. आपण गरीब आहोत यात काही खोटं नाही. त्यात लाज वाटण्यासारखं काही नाही. पण बाय, ह्यापुढं भिकेचं अन्न कधी घेऊ नकोस. नि बायलापण देऊ नकोस, न्हाय ना खायचीस?, नाय, शाब्बास. त्यापेक्षा आपण नाचण्याची आंबील पिऊ" इथे आंबेडकरी विचार प्रेरणेतून नायकाला झालेले अस्मितादर्शन पाहावयास मिळते. त्यामुळे भाषेतील हा नकार, विद्रोह, तत्त्वदर्शनात्मक आहे. ही भाषा आजचा दलित बोलू लागला. कारण त्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा असल्याचे दिसते. एकूण दलित कादंबरीतील भाषेचे हे वेगळेपण म्हणून लक्षात घ्यावे लागते.

कथात्मक वाङ्मयात व्यक्ती, घटना व वातावरणांचे वर्णन करण्यासाठी लेखक रूपकांबरोबरच प्रतिमांचा वापर करतो. मी प्रतिमा भाषिक उपयोजनाचाच एक भाग म्हणून कथनात येतात. बाबुराव बागूल यांची 'सूड' ही कादंबरी जानकी या नायिकेवर आधारित आहे. बागुलांनी या कादंबरीत प्रतिमांचा वापर अत्यंत विलक्षणपणे केलेला दिसतो. उदा. "काळोख त्या बैराग्याप्रमाणे दबा धरून असल्याचा तिला भास झाला, हिरव्यागार गवतातून काळा नाग सळसळत यावा तशी तिला तिच्या किळसवाण्या आयुष्याची आठवण झाली, उतारवयाची लठ्ठ फातिमा गळ्यात पडताच त्याने जानकीला बकरी विकावी तशी नायकिणीला विकली. गुळावर गावभरच्या माशा जशा येऊन पडाव्यात तशी तिच्यावर अनेक रंगाच्या, वयांच्या पुरुषांची झुंबड येऊन पडू लागली, समोरून येणारी महारोगी स्त्री बघून तर तिरस्काराने, घृणेने त्याचे मन, संतापलेल्या नागिणीचा हात विषाने भरून यावा तसे भरून आले, त्या ज्वाळांच्या प्रकाशात अंथरुणावर नग्न होऊन बसलेली ज्वाला सोन्याच्या लखलखीत मूर्तीसारखी दिसत होती. ते ढगातून बाहेर पडणाऱ्या जलधारेप्रमाणे थरारत तिच्या अंगावर कोसळू लागले, तिने त्यांना जीवनाचे दर्शन दिले. त्या दर्शनाने ते आनंदाने तळ्यातील पाण्यासारखे उचंबळून आले. वातावरण जीवनाचा जन्माच्या वेळी असे गंभीर झाले होते, तसे झाले होते अन् चंद्र ज्वालेतून प्रकट होणाऱ्या याज्ञसेनीप्रमाणे बाहेर येत होता." बाबुराव बागुलांनी आपल्या कथात्म लेखनात प्रतीक- प्रतिमांचा वापर अत्यंत उत्कृष्ठपणे केलेला दिसतो. त्यांच्या प्रतिमा या निसर्गाशी नाते सांगणाऱ्या आहे. विशेषतः मानवी जीवन, निसर्ग यांच्यातील अनुबंधनाचे प्रकटीकरण करणाऱ्या

आहेत.

दलित कादंबरीची भाषा ही लोकभाषा आहे. त्यात प्रादेशिक, सामाजिक, भौगोलिक स्तरावरील विविध बोलीभाषेची रूपे येतात. त्यामध्ये म्हणी, वाक्प्रचार, येतात. विशेषतः दलित कादंबरीतील भाषेचे शब्द वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदा. अण्णाभाऊ साठे यांचा 'फकिरा' कादंबरीत सुरकांड्या, फासका, टिपरू इ. बोलीभाषेतील शब्द येतात. गव्हासंगं कीडा रगडं, मेलेलं मेंढरू आगीला भीत नसत, हातच्या काकणाला आरसा कशाला, जे परावंते उगवते, शेंडी तुटो वा पारंबी तुटो, नाक दाबल्यावर तोंड उघडते, इ. म्हणींचा वापर अण्णाभाऊंनी केलेला दिसतो. तर दारिद्र्यात वाईटाखेरीज दुसर काय जन्मणार? खोडीला औषध सत, कर्तबगार माणसांची कीर्ती दिगंतरात जाते, दारिद्र्याच्या वाटेवर धैर्याला धार चढते, शौर्य श्रीमंतीत फुलत नाही, ते गरिबीत फुलतं इ. सुभाषित वजा वाक्ये अण्णाभाऊंच्या कादंबरीतील भाषेत आलेली आहेत.

एकूणच दलित कादंबरीतील भाषा ही दलित समाजदर्शन घडविते.

## ग्रामीण कादंबरीची भाषा :

दलित साहित्याप्रमाणेच ग्रामीण साहित्य हा एक महत्त्वाचा वाङ्मयीन प्रवाह आहे. ग्रामीण साहित्याचा परीघ हा गावाशी निगडित आहे. गाव शिवार यातील लोकजीवनदर्शन ग्रामीण साहित्यात अभिव्यक्त होते. ग्रामीण कादंबरीमध्ये आनंद यादव यांच्या गोतावळा, झोंबी, रा. रं. बोराडे 'पाचोळा सावट, चारापाणी, रहाटपाळणा, इथं होतं. एक गाव', महादेव मोरे यांच्या रैत, बली वस्ती, प्रवाह आडगार, लाईन झोंबड इ. बाबाराव मुसळे यांच्या हल्या हल्या दुधू दे, पखाल, नागनाथ कोत्तापल्ले यांच्या उलट चालली प्रवाहो, गांधारीचे डोळे, विश्वास पाटील यांच्या 'आंबी, पांगिरा, झाडाझडती, आनंद पाटील 'कागूद आणि सावली', गणेश आवटी 'गणगोत' पुरुषोत्तम बोरकर 'मेड इन इंडिया', वासुदेव मुलाटे, 'विषवृक्षाच्या मुळ्या', मोहन पाटील 'लिंगाड, खांदेपालट' सदानंद देशमुख 'बारोमास', आणि महेंद्र कदम यांच्या 'धुळपावल' आणि 'आगळ' या कादंबऱ्यांचा निर्देश करता येईल.

ग्रामीण कादंबरी ही ग्रामीण जीवनाभिव्यक्ती ग्रामीण बोलीतून करते. त्यामुळे भाषिकदृष्ट्या ग्रामीण कादंबरीचा वेगळा विचार करता येतो. ग्रामीण कादंबरीतील भाषा ही बोलीभाषा आहे. ही बोली गावाशी म्हणजेच ग्रामीण भागाशी निगडित असून गावाच्या परिघात येणाऱ्या सबंध भाषाबंधांची अभिव्यक्ती ग्रामीण कादंबरीत आपणास पाहावयास मिळते. त्याचा शोध येथे घेता येईल. 'गोतावळा'

ही आनंद यादव यांची महत्त्वाची ग्रामीण कादंबरी आहे. यामध्ये त्यांनी ग्रामीण जीवनाचे प्रभावी चित्रण केलेले दिसते. उदा. 'ढोरांच्या वैरणी रचत हुतावं, रानातली समदी पिकं खळ्यावरनं घराकडं गेलेली. खळ्याच्या भवतीनं उसाचं वाळलेले वाडं, नदीची गवतं, कडब, शेंगाचं चाल, तुरीचं कोडं, तुरकाड्या पडल्या हुत्या. व्हळीची जागा' परवादिवशी निर्मळ करून घेरलेली तिथं नवी वैरण रचायचं चाललेलं कडब्याचं नि गवताचं भारं झरारा वर येत बहुतं. नि वैरणीची वृष्टी माटात वर चढत व्हती.'६ गाव म्हटले की शेती आलीच. शेती हा ग्रामसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे ग्रामीण कादंबरीतील भाषेमध्ये शेतीशी निगडित असणारे नानाविध शब्दबद्ध येतात. वरील गोतावळा कादंबरीमध्ये वैरण, उसाच वाडं, गवत, कडबा, असे कृषीतील शब्द आलेले आहेत. ग्रामीण जीवनात निसर्गाची विविध रूपे पाहावयास मिळतात. याचे वर्णन करताना कादंबरीमध्ये ग्रामीण लेखकांनी अस्सल बोलीरूपे वापरलेली दिसतात. या बोलीरूपातून ग्रामीण निसर्गाचे व तेथील लोकांच्या जीवनातील आंतरसंबंधाचे दर्शन आपणास पाहावयास मिळते.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' कादंबरीत निसर्गाचे वर्णन करताना ते लिहितात, ''मे महिना संपला आणि जून आला, उन्हाळा संपला, पावसाळा आला. इंद्रगोप दिसू लागले आणि मृग निघाला. आभाळ झोकाळून आले, स्वच्छ ऊन नाहीसे झाल. वारा सुटला. झाडे झुडे गदगदू लागली. धूळमाती चौफेर उडू लागली, आभाळाकडे बघून लोक म्हणू लागले. वार पाऊस घालवील. पण तसे झाले नाही सडासडा धारा आल्या, मृगाचा पाऊस बनगरवाडीला झोपडत राहिला. भटकी कुत्री भिंतीच्या आडोशाला उभी राहिली. लवकर उघडीच होण्याचे दिसेना, धनगरांची धावाधाव झाली. डोक्यावर रिकामे पोते घेऊन त्यांनी वाड्यात भिजणारी मेंढरे काढून झोपड्यात आणली. घरात दाटीवाटीने उभ्या राहिलेल्या मेंढरांनी अंगे झाडली भिजल्या लोकरीच्या वासाने धनगरांची घरे दाखवली. सरीवर सर आल्या. तापलेल्या जमिनीतून वाफा निघाल्या, धूळ उडाली. चिखल झाला आणि तोही वाहून गेला, खडे उघडे पडले.'' निसर्ग हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक आहे. निसर्गाच्या सानिध्यात जगणारी ग्रामीण माणसे निसर्गावर अवलंबून जीवन जगतात. शेतीसाठी पावसाचे पाणी त्यांना मिळते. त्यामुळे पावसाचे वर्णन व्यंकटेश माडगूळकर यांनी उपरोक्त परिच्छेदात अत्यंत विस्ताराने केलेले दिसते. या परिच्छेदात वापरलेली भाषा ही प्रत्यंयकारी आहे. त्यातून निसर्गाची विविध रूपे आल्या

नजरेसमोर उभी राहतात. इंगद्रगोप ही संकल्पना इथे विशेषत्वाने लक्षात घ्यावी लागेल. पावसाच्या आगमनाबरोबर आकाशात सप्तरंगांची रेखाटने दिसायला लागतात. एक भला मोठा रंगांचा गोफच आकाशात दिसून लागतो. एकूण इथे बनगरवाडी कादंबरीत निसर्गाचे वर्णन करताना वापरलेली भाषा विशेष महत्त्वाची आहे. माणदेशी भाषिक रूपे यात झालेली आहेत.

ग्रामीण कादंबरीच्या भाषेत अशाप्रकारे निसर्गाची विविध रूपे अभिव्यक्त होतात. विशेषतः शेतीशी निगडित अनेक शब्दबंध इथे वापरल्याचे प्रत्ययास येते. एकूणच ग्रामीण कादंबरीच्या भाषिक निवेदनात अशा प्रकारचे विविध घटक दिसतात. संवाद भाषेचा, विचार करताना सुद्धा ग्रामीण भाषेतून संवाद आलेले आहेत. विशेषतः या संवादामध्ये महाराष्ट्रातील प्रादेशिक बोलीरूपे पाहावयास मिळतात. त्यामुळे ग्रामीण कादंबरीतील भाषेला प्रादेशिक बोलीचे विविध संदर्भ लाभलेले आहेत. असे म्हणता येते.

एकूणच ग्रामीण कादंबरीमधील भाषा हा वाङ्मयीनदृष्ट्या अतिशय सशक्त अन् प्रभावी असा घटक आहे. प्रमाणभाषा व बोला यांचा सुंदर मिलाफ इथे पाहावयास मिळतो.

## दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा : साम्य भेद

भाषा हा साहित्य व्यवहारातील महत्त्वाचा घटक असतो. साहित्यात भाषेचे उपयोजन अनेक स्तरांवर होते. लेखकाचे अनुभवविश्व साहित्याची भाषा घडविते. दलित कादंबरीमध्ये आलेली भाषा ही सामाजिक संदर्भान्वये येते. हजारोवर्षाची गुलामगिरी दलितांनी सोसली. शब्दचा एकही स्वर बाहेर न काढता. निमुटपणे शोषण सहन केले. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिदर्शी विचारप्रेरणेने दलित बोलू लागला. हजारो वर्षे मूक असलेला जेव्हा बोलू लागतो तेंव्हा साहजिकच त्याच्या भाषाविष्कारात प्रचंड आवेश, आवेग असणार आहे. तो दलितांच्या भाषेत दिसतो. याचा प्रत्यंतर दलित कादंबरीच्या भाषाविचारास आपण पाहिलेला आहेच.

- दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा ही बोली रूपात अभिव्यक्त होते. साहित्य व्यवहारात सर्वप्रथमच या दोहो वाङ्मयीन प्रवाहांनी प्रमाणभाषेला छेद देऊन ग्रामीण स्तरावरील बोली भाषा लेखनासाठी वापरली. त्यामुळे दलित व ग्रामीण साहित्य हे बोलीभाषा संग्रहालय बनलेले आहे.
- दलित व ग्रामीण कादंबरीतील भाषा ही लोकभाषा आहे. लोकभाषा म्हणजे लोकांची दैनंदिन जगण्याची भाषा होय. भारतीय भाषापरंपरेत

संस्कृत भाषेच्यापूर्वी प्राकृत या लोकभाषा समाजव्यवहारात बोलल्या जात होत्या. या लोकभाषा आजच्या बोलीभाषांशी नाते सांगणाऱ्या आहेत. त्यामुळे दलित व ग्रामीण कादंबरीच्या भाषेचे वेगळेपण म्हणजे संस्कृत भाषा परिवारापेक्षा प्राकृतभाषा परिवाराशी त्यांचा अनुबंध आहे.

- दलित व ग्रामीण हे दोन्ही प्रवाह बहुजन समाजाच्या अस्मितेची वाङ्मयीन रूपे आहेत. मराठी साहित्य हे मध्यमवर्गीय, पुणेरी अभिरुचीवर पोसलेले असताना या दोन्ही प्रवाहांनी ही परंपरा नाकारुन वाङ्मयीन निर्मिती केली त्यामुळे दलित व ग्रामीण हे वाङ्मयीन प्रवाह विद्रोही परंपरेचे आधारस्तंभ असून भाषिकदृष्ट्या हा विद्रोह अधिक प्रमाणात मराठी साहित्यात आलेला आहे. त्यामुळे विद्रोह भाषा या दोन्ही प्रवाहांमधील कथा कादंबरीत असलेली दिसते.
- ग्रामीण कादंबरीतील भाषेमध्ये येणारे निवेदन हे प्रमाणभाषेशी जवळीता साधणारे आहे. त्यामध्ये गावाशी निगडित शब्द, वाक्य रचना पाहावयास मिळतात. मात्र दलित कदंबरीतील निवेदन हे लोकभाषेशी निगडित आलेले असून त्यामध्ये प्रवाहीपणा पाहावयास मिळते.
- ग्रामीण कादंबरीची भाषा संवादरूपात अभिव्यक्त होताना त्यामध्ये संयतपणा दिसतो. मात्र दलित कादंबरीतील भाषेमध्ये आलेले संवाद विद्रोही रूपात अभिव्यक्त होतात. यात दलित-दलित, दलित-दलितेत्तर व्यक्ती-व्यक्तींमधील संघर्ष पाहावयास मिळतो.

एकूणच दलित व ग्रामीण कादंबरीची भाषा या विषयांतर्गत शोध घेताना या दोन्ही प्रवाहांनी भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण वापर साहित्यलेखनात केलेला दिसतो. बोली, लोकभाषेची अभिव्यक्ती यामध्ये प्रामुख्याने आल्याने मराठी भाषा व साहित्याचा कक्षा विस्तारलेल्या आहेत. दलित व ग्रामीण कादंबरीचे भाषिक योगदान व्यापक असून त्यामुळे मराठी साहित्य विश्व भाषिकदृष्ट्या समृद्ध झालेले आहे. हे सूर्यसत्य कोणीही नाकारू शकणार नाही.

* * *

# दलित, ग्रामीण जाणिवेचे कादंबरीकार : माधव कोंडविलकर

**–प्रा.सौ. दीपा यशवंत कुलकर्णी**

दलित व ग्रामीण जीवनाविषयीचे चित्रण आपल्या कादंबरी वाङ्मयाच्या माध्यमातून करत असताना प्रामुख्याचे चर्मकार समाजाविषयीचे चित्रण त्यांनी आपल्या बहुसंख्य कादंबऱ्यातून घडविले आहे. मानवी जीवनाबद्दल कोंडविलकरांच्या मनात प्रचंड कुतूहल आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यातून मानवी जीवनाचे विविधांगी दर्शन घडते. 'हाताची घडी तोंडावर बोट', 'डाळं', 'अनाथ', 'कळा त्या काळाच्या', 'अजून उजडायचं आहे', 'छेद', 'आता उजाडेल', 'वेध', 'देशोधडी', 'एक होती कातळवाडी', 'झपाटलेला', 'भूमिपूत्र' यासारख्या कादंबऱ्या लिहून केवळ एकाच जातीचे जीवनचित्रण करता समग्र समाजाचा व्यापक पट त्यांनी आपल्या असंख्य कादंबऱ्यातून घडविण्याचा प्रयत्न केला आहे. एकूणच दलित ग्रामीण जाणीव वास्तव पातळीवरती त्यांच्या कादंबरीतून अवतरताना दिसते. अभ्यासाच्या सोयीसाठी त्यांच्या कादंबऱ्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) शैक्षणिक समस्यावर प्रकाश टाकणारी कादंबरी:–**

आमचे शिक्षणक्षेत्र जातीयतेचे कसे बंदिस्त झाले आहे याचे चित्रण या कादंबरीतून येते. माधव कोंडविलकर हे दलित प्राथमिक शिक्षक होते. त्यांचाही नोकरी करताना राजीनामा द्यावा लागला होता. तो का द्यावा लागला. त्याला शाळेतील व गावातील लोक कशाप्रकारे जबाबदार आहेत हे या कादंबरीच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. सहा ते चौदा वयोगटातील मुलांचा प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आहे. शासनाचे महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हास्तरीय पातळीवर कितीही प्रयत केले तरी शंभर टक्के साक्षरता प्रत्यक्षात येत नाही. ग्रामीण भागातील शैक्षणिक, आर्थिक, वैचारिक, नैतिक अशा वेगवेगळ्या स्वरूपाच्या कारणांमुळे शासनाचा हा कार्यक्रम सातत्याचे निष्फळ ठरताना दिसतो. अशाही अवस्थेमध्ये कमल चिखलीकरसारख्या काही शिक्षिका आपल्या ध्येयाशी प्रामाणिक राहा शिक्षणाविषयी अस्था बाळगतात. अंत:करणापासून विद्यार्थ्यांचा सुधारण्याची व शिक्षणाविषयीची आवड त्यांच्यामध्ये निर्माण करतात.

प्राथमिक शिक्षकांच्या दैन्यावस्थेचे तिसरे रूप नैतिक आहे. आपली खुर्ची टिकविण्यासाठी सरपंचांची हुजरेगिरी करणारा मुख्याध्यापक, आपल्या स्वार्थासाठी शरीराचा भोग देऊ करणारी शिक्षिका, शिक्षकाच्या बदलीसाठी समलिंगी संभोगाची मागणी करणारा शिक्षणाधिकारी आणि लाच देणे आणि घेणे हा समाजमान्य व्यवहार मानणारे शिक्षणखाते हे या कादंबरीत साकल्याने चित्रित केले आहे. अशा या अंधकारमय वास्तवात आशेचा एक किरण आहे तो म्हणो कमल चिखलीकर, ही व्यक्तिरेखा मुलांवर प्रेम करणारी, शिक्षणाविषयी आस्था बाळगणारी आणि नैतिक भूमिका घेऊन शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची प्रतिनिधी आहे. अशा असंख्य चिखलीकर समाजामध्ये अस्तित्त्वात आहेत. गरज आहे ती समाजाने त्यांना प्रोत्साहन देण्याची.

**२) शेतकऱ्यांचे जीवन चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या :-**

भारत हा प्रामुख्याचे कृषिप्रधान देश आहे. देशातील ७०% भाग शेतीवरती अवलंबून आहे. या पार्श्वभूमीवरती कोकणची भूमी व तेथील शेतकऱ्यांचे वास्तव जीवन 'डाळं' या कादंबरीत कोंडविलकरांची चित्रित केले आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये जरी शहरी जीवन व शिक्षण व्यवस्थेचे चित्रण येत असले तरी शेती हाच प्रमुख विषय या कादंबरीचा असल्याचे दिसते. वर्तमानपत्रामध्ये आलेली बातमी वाचून कोंडविलकरांचा ही कादंबरी सुचली आहे. प्रस्तुत कादंबरीचा प्रारंभ पात्र चित्रणाचे होतो. जवळ जवळ २८५ पात्रे या कादंबरीत आहेत. धोंडू गणू बाईत या अशिक्षित व्यक्तीच्या संवादाने कादंबरीचा प्रारंभ होतो. धोंडूला एकूण तीन मुले आहेत सुरेश, वसंत, शोभा याबरोबरच धोंडूची पती धोंडी अशा एकूण पाच माणसांचे कुटुंब चालविताना धोंडूची दमछाक होते. म्हणून धोंडू आपला मोठा मुलगा सुरेश याला रत्नागिरी येथे बाबासाहेब भोगले या जमीदाराकडे कामाला ठेवतो. कारण कर्जापोटी धोंडूने बाबासाहेब भोगले यांच्याकडून ३००/- रुपये घेतले होते. दरम्यान बाबासाहेबांच्या घरी चोरी होते. या चोरीचा आळ सुरेशवर येतो. त्याला काही दिवस तुरुंगात जावे लागते. तो निरपराधी आहे हे कळल्यावर त्याला तुरुंगातून सोडले जाते. हे खरे परंतु बाबासाहेब भोगले यांच्याकडील नोकरी तो सोडतो व हातखंब्याच्या तिठ्यावरील एका हॉटेलात नोकरी धरतो. थोड्याच दिवसात या हॉटेलातून तो संशयास्पदरीत्या नाहीसा होतो. त्याचा शोध घेतला जातो. परंतु शेवटपर्यंत तो हाती लागत नाही. सुरेशच्या शोकात्म जीवनाचा जिथे अंत होतो तिथेच वसंतच्या शोकात्म जीवनाचा प्रारंभ होतो. वसंतची जगण्याविषयीची जी धारणा आहे तीच त्याला

कळत नकळत शोकात्म जगण्याकडे घेऊन जाते. परंतु सातत्याचे स्वाभिमान जागृत होत असल्याचे तो कांही प्रमाणात आत्मप्रौढी मिरवितो. आपला निश्चय व्यक्त करताना वसंत म्हणतो, ''मी गावात नोकरी करणार नाही आणि खोतांची गुरं राखणार नाही. त्यांचा शेणगोठा झाडणार नाही, मग मी एवढे शिकलो कशाला?'' यावरून त्यांची आत्मप्रौढी व्यक्त होते. या देशात आर्थिक शोषणाचे बळी लाखो आहेत. धोंडू गणू बाईत हा त्यापैकी एक. हे कुटूंब जसे आर्थिक शोषणाचे बळी आहेत, तसेच अज्ञान, अंधश्रद्धेचेही बळी आहे. अज्ञानामुळे वसंताचे कर्ज काढून लग्न केले जाते. कर्जफेडीसाठी मुंबईला नोकरी केली जाते. त्यामुळे गंगाराम बरोबर धोंडूला डाळं करण्याशिवाय पर्याय राहत नाही.

**३) चर्मकार समाजाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या :-**

माधव कोंडविलकर यांनी आपल्या अनेक कादंबऱ्याद्वारे चर्मकार समाज जीवनाचे वैविध्यपूर्ण चित्रण केले आहे. यामध्ये प्रामुख्याचे 'अनाथ', 'अजून उजाडायचं आहे', 'आता उजाडेल', 'कळा त्या काळच्या', या कादंबऱ्यांचा समावेश होतो. या माध्यमातून चर्मकार समाजाचे दु:ख, श्रद्धा, अंधश्रद्धा, शिक्षण, पाचवीला पूजलेले दारिद्र्य, जात पंचायत, बलुतेदारी पद्धती, भीषण दारिद्र्याने आलेली लाचारी, ग्रामीण जीवन, त्यातही अस्पृश्य चर्मकार समाजाचे जीवन अतिशय बिकट आहे. हे दाखविण्याचा प्रयत्न उपरोक्त कादंबऱ्यांच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे. यापैकी 'अनाथ' कादंबरीचा नायक भास्कर हा आहे. त्याच्या जीवनाभोवती अनाथचे कथानक गुंफले आहे. लहानपणापासून हुशार असलेल्या भास्करला आपण शिकून मोठे व्हावे ही परिवर्तनाची पहाट पाहणारा नायक भास्कर त्यासाठी जातीला सोडून परंपरा, अन्याय, जुलूम, दारिद्र्य या सर्वांवर मात करून स्वावलंबी बनणाऱ्या भास्करच्या दुहेरी जीवनाचे चित्रण केले आहे. त्यासाठी दोन पिढ्यातील संघर्षाला भास्करला सामोरे जावे लागते. भाषिक दृष्टीने विचार करता पात्रानुवर्ती भाषा हा भाग प्रस्तुत कादंबरीमध्ये महत्त्वपूर्ण ठरतो. कोकणी राजापुरी भाषेचा प्रभाव या कादंबरीत दिसतो. भास्करचे घरच्या कामात मदत करावी अशी वडिलांची अपेक्षा असते. त्यावेळी भिकाजी भास्करला म्हणतो, ''बाबू द्या सकाळी सालत जाव नको'', भिकाजी अंगावर पांघरुन ओढून घेत भास्करला म्हणाला, ''गुरुजी ओरडतील ते! भास्कर धस्कून म्हणाला, हल्ली पाच मिनिटं उशीरा गेलो तरी ते ओरडतात. '' यावरुन भिकाजी शिक्षणाला दुय्यम स्थान देतो. या बरोबर भास्करचे शाळा चुकवून घरची कामे करावीत असे त्याला

मनोमन वाटते. प्रस्तुत कादंबरीतून चर्मकार समाजाच्या वेदानांचे बोलके चित्रण येते. संपूर्ण कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदन पद्धती वापरली आहे. देवजी चांभार, त्याची बायको, देवकी आणि त्यांची मुलं यांची दु:स्थिती, अस्पृश्यता या कादंबरीतून पुढे येते.

### ४) जात–आंतरजात समस्या मांडणाऱ्या कादंबऱ्या :–

कोंडविलकरांच्या 'छेद' व 'आता उजाडेल' या कादंबऱ्या जात व आंतरजात समस्या मांडणाऱ्या कादंबऱ्या ठरतात. पैकी 'छेद' ही कादंबरी १९८२ मध्ये प्रकाशित झाली आहे. चांभार जातीच्या दु:खाचे वेगळे रंग या कादंबरीत पहावयास मिळतात. या कादंबरीत मांग व चांभार जातीतील भेद किती अमानुष असतात याचे वर्णन वाचत असताना वाचक अस्वस्थ होतो. काहीसा प्रक्षोभक व आव्हान देणारा वेगळा विषय मांडण्याचा प्रयत्न निवेदकाचे याठिकाणी केला आहे. दलित समाजातही वेगळी अशी वर्णव्यवस्था आहे. तिच्या व्यापक विषमतेतून व्यक्त होणारे परिणाम 'छेद' कादंबरीमध्ये दिसतात. दलित अंतर्गत दु:खाचे वेगळे दर्शन घडविणारी, वेगळा विषय हाताळणारी 'छेद' ही दलित कादंबरी आहे.

'छेद' चा नायक सुधीर भंडारे हा मातंग जातीचा सांगली जिल्ह्यातील कुपवाडचा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हॉटेलमध्ये काम करून तो शिक्षण घेतो. त्यामुळे कॉलेजमध्ये वर्गात तो झोपतो. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गराजांच्या पूर्ततेसाठी त्याला दाही दिशा फिरावे लागते. त्यात त्याला जगदाळे सरांच्या माणुसकीने तो गहिवरतो. त्याच्या शिक्षणाची जबाबदारी ते घेतात. सुधीर एम.ए. होतो. पण गावकरी त्याचा समाज, कौतूक करत नाहीत. कारण मांगाचं पोर एम.ए. झालं तरी मांगच राहणार ही गावाची धारणा असते. शिक्षणामुळे सुधीरला प्राध्यापकाची नोकरी मिळते पण तिथेही जातीची चौकशी केली जाते. बापूसाहेब होन्याळे खोटा मदतीचा आभास निर्माण करतात पण प्रत्यक्ष मदत करत नाहीत. उपदेशाचे डोस ऐकवतात. सुधीरला खोली देताना प्रत्येक ठिकाणी त्याच्या जातीची चौकशी होत होती व नकार येत होता. त्यामुळे जातीचे कटू अनुभव त्याला विकासपुरातही आले. सवर्ण व तथाकथित मध्यमवर्गीय उच्चभ्रू समाजातले लोक अजूनही दलितांना सामावून घ्यायला तयार नाहीत. या वृत्तीचा छेद कोंडविलकरांना या कादंबरीत घेतला आहे.

परंपरेने नाकारलेल्या एका अस्पृश्य समाजातील सुधीर वाघमारे या सुशिक्षित तरुणाची जगण्यासाठी चाललेली अनामिक धडपड हे 'आता उजाडेल'

या कादंबरीचे कथानक आहे. सुधीर वाघमारे हे जरी अस्पृश्य जातीतील असले तरी त्याचे आपल्या बुद्धी चातुर्याने एम.ए. ची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यामुळे त्याला सुरूवातीलाच राजापूर याठिकाणी शिक्षक म्हणून नोकरी मिळाली आहे. तो मूळचा मराठवाड्यातील असल्याचे सुधीरसाठी कोकणचा परिसर हा पूर्णपणे नवखा आहे. त्यातही घरच्यांची हुरहूर त्यामुळे काहीसा गोंधळलेला सुधीर नंतर सावरतो व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची 'महाड' या ठिकाणी केलेल्या चवदार तळ्याचा सत्याग्रह आठवून प्रफुल्लीत होतो. घरच्यांची समजूत काढून तो कोकणच्या मार्गाला लागतो. कामावरती दाखल झाल्यानंतर सुधीरच्या जीवनामध्ये घडलेल्या विविध घटना व त्यातूनही सुधीरने काढलेला मार्ग हा या कादंबरीच्या केंद्रवर्ती असल्याचे दिसते. दोन विशिष्ट मागासवर्गीय जाती आणि त्यांच्यातही प्रतिष्ठेसाठी चाललेली धडपड नोंदविताना कोंडविलकर आत्ममग्न होतात. परंतु प्रस्तूत कादंबरीचा शेवट मात्र पूर्णपणे निराशाजनक व शोकात्म करता कादंबरीला दिलेल्या शीर्षकास शोभेल अशा स्वरुपात केल्याचे दिसते. 'आता उजाडेल' या शीर्षकातूनच एका नव्या पहाटेचे स्वप्न लेखकाचे साकार केले आहे. सुधीर आणि नलिनी यांच्या विवाहामुळे जातीव्यवस्थेच्या भिंतींना तडे पाडण्यास मदत होईल आणि भविष्यात त्या पूर्णपणे कोसळून पडतील अशा प्रकारचा एक आशावाद प्रस्तुत कादंबरीच्या माध्यमातून अभिव्यक्त होताना दिसतो.

कोंडविलकरांच्या कादंबरीतील ग्रामीण व दलित जीवनाचे चित्रण केल्यानंतर हाती आलेले काही प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे :-

१) कादंबरी वाङ्मयामध्ये स्थल, कालाचा विस्तीर्ण पट चित्रित होऊ शकतो. थोडक्यात कादंबरी म्हणजे आशय, विषय, पात्रे, घटना यांना वास्तव आणि कल्पित स्वरुपात मांडणारा गद्य प्रकार होय.

२) दलित ग्रामीण जीवनाविषयीचे चित्रण करणाऱ्या माधव कोंडविलकरांची आपल्या बहुसंख्य कादंबऱ्यातून चर्मकार समाजाचे चित्रण केले आहे.

३) कोंडविलकरांची कथानक एकच ठेवलेले आहे. फक्त गावामध्ये बदल करून कादंबरीची संख्यात्मक केलेली वाढ अप्रस्तुत वाटते.

४) कोकणच्या पार्श्वभूमीवरती दलित लोकांच्या चित्रणाबरोबरच जात-अंतरजात चित्रणातून विविध समस्या, रीतिभाती कोंडविलकर रंगवतात. यातूनच त्यांनी अस्पृश्यांतर्गत असलेला संघर्ष तपशीलवारपणे टिपला आहे.

* * *

# अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील ग्रामीण आणि दलित जाणिवा

–प्रा.राजेश्वर दुडूकनाळे

**प्रास्ताविकः**

मानवी जीवनानुभवाचा उत्कट आविष्कार म्हणजे साहित्य, मराठी साहित्यही याला अपवाद नाही. संत नामदेवांच्या अभंगवाणीपासून ते वर्तमान काळातील कोणत्याही लेखकाच्या साहित्यकृतीतून हा जीवनानुभवच व्यक्त झाला आहे. समाज जीवनातील विविध अनुभव लेखक शब्दबद्ध करीत असतो. या विविधांगी जीवनानुभवामुळे साहित्याच्या क्षेत्रात अनेक नवे प्रवाह अस्तित्त्वात येतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, जनवादी हे साहित्य प्रवाह होत. त्या त्या जीवनानुभवाची गरज म्हणून असे नवे साहित्य प्रवाह उदयास येतात. या साहित्य प्रवाहातून व्यक्त झालेले अनुभवविश्व नेमके कसे आहे, हे जसे अभ्यासने आवश्यक आहे. तसेच या साहित्य प्रवाहांचा तुलनात्मक अभ्यास होणेही गरजेचे आहे.

**ग्रामीण आणि दलित साहित्यः**

१९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय झाला. विसाव्या शतकाच्या या सहाव्या दशकात शेतकरी, कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधित्त्व करणारी एक तरुण पिढी शिक्षण घेऊन बाहेर पडली. शिक्षणामुळे आत्मभान आलेल्या या पिढीने स्वतःचे अनुभव शब्दबद्ध करायला सुरुवात केली. डॉ.आनंद यादव, रा.रं बोराडे आदि लेखकांनी एक नवा जीवनानुभव शब्दांकित करुन ग्रामीण संवेदनशीलतेला मराठी साहित्याच्या क्षेत्रात प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारला. सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीच्या विरोधात बंड पुकारुन त्यांनी भारतीय समाजाला एक नवी दिशा दिली. या त्यांच्या जीवनसंघर्षातून आंबेडकरवादाचा उदय झाला. अर्थातच, डॉ.आंबेडकरांच्या विचाराची प्रेरणा घेऊन दलित साहित्य प्रवाह उदयास आला.

**अण्णाभाऊ साठेः**

आधुनिक मराठी साहित्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांचे महत्त्वाचे योगदान

आहे. लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार आणि नाटककार म्हणून त्यांनी दिलेले योगदान मराठी साहित्याचे अनुभवविश्व समृद्ध करणारे आहे. एक चळवळीतील कार्यकर्ता आणि संवेदनशील लेखक म्हणून त्यांचे लेखन समजून घ्यावे लागते. मार्क्सवादी विचाराने प्रेरित होऊन त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या आहेत. पुढे या मार्क्सवादाच्या मार्गावर चालत असतानाच त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान प्रभावित करुन गेले. त्यामुळे आंबेडकरवादाचा प्रभाव त्यांच्या लेखनावर पडलेला दिसून येतो. समाजातील विषमता नष्ट करणे हे त्यांच्या साहित्यलेखनाचे ध्येय आहे. अशाप्रकारे समाजपरिवर्तन घडून येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या दलित आणि ग्रामीण जीवनातल्या विद्रोही जाणिवा त्यांच्या साहित्यातून व्यक्त झाल्या आहेत. अर्थात सामाजिक परिवर्तन ही त्यांच्या साहित्यलेखनामागची मुख्य प्रेरणा आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे स्वरुप समजून घेणे आवश्यक आहे.

**कादंबरीलेखन:**

आग, आघात, अहंकार, अग्निदिव्य, कुरुप, चित्रा, फुलपाखरु, वारणेच्या खोऱ्यात, रत्ना, रानबोका, रुपा, संघर्ष, तास, गुलाम, डोळे मोडीत राधा चाले, ठासलेल्या बंदुका, जिवंत काडतूस, चंदन, मूर्ती, मंगला, मथुरा, मास्तर, चिखलातील कमळ, अलगुज, रानगंगा, माकडीचा माळ, वैजयंता, धुंद रानफुलाचा, आवडी, वारणेचा वाघ, फकिरा, वैर, पाझर, सैरसोबत आदी कादंबऱ्यांचे लेखन अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे.

अण्णाभाऊ साठे यांनी कथा, कादंबरी, नाटक, कविता अशा प्रमुख साहित्यप्रकारात लेखन करुन समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजातील शोषण, अन्याय, मानसिक गुलामगिरी, आर्थिक विषमता, अज्ञान हे त्यांच्या साहित्य निर्मितीचे विषय आहेत. समाजात क्रांतीचा विचार पेरला तरच सामाजिक परिवर्तन शक्य आहे. अशी लेखक म्हणून त्यांची धारणा आहे. की त्यांची भूमिका लक्षात घेऊन, मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे लेखक म्हणून त्यांच्या साहित्यातील ग्रामीण आणि दलित जाणिवांचा अभ्यास प्रस्तुत लेखात केला आहे.

**अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यातील ग्रामीणता:**

अण्णाभाऊ साठे यांच्या अनेक कादंबऱ्यांतून ग्रामीण, प्रादेशिक जीवनाचे

चित्रण आले आहे. त्यांचे बालपण खेड्यात गेल्यामुळे आणि ग्रामीण जीवनानुभवाशी ते प्रमाणिक असल्यामुळे त्यांच्या साहित्यातून ग्रामीण संवेदनशीलतेचा आविष्कार झालेला दिसून येतो. फकिरा, माकडीचा माळ, वारणेचा वाघ आदी कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाचे चित्रण आले आहे. यासंदर्भात डॉ.भास्कर शेळके लिहितात. वारणेच्या खोऱ्यातील मानवसमूहाचे जीवनदर्शन घडविणारा कादंबरीकार अण्णाभाऊ साठे यांनी फकिरा (१९५९), माकडीचा माळ(१९६३), वारणेचा वाघ(१९६८) या तीन कादंबऱ्यांमधून स्वातंत्र्यपूर्व काळातील प.महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण केले आहे. ग्रामीण संवेदनशीलता आणि प्रादेशिकता अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतून व्यक्त झाली आहे. या संदर्भात फकिरा कादंबरीचे उदाहरण घेता येईल. फकिरा कादंबरीमध्ये वाटेगाव आणि शिगावचे चित्रण आले आहे. जोगणीच्या प्रकरणावरून या दोन गावांमध्ये जणू युद्धच सुरू होते. या संदर्भात डॉ.भास्कर शेळके म्हणतात. फकिरा कादंबरीचा विषय हा राणोजीचा मुलगा फकिराने अन्याय-अत्याचार करणाऱ्या इंग्रज सरकारविरुद्ध दिलेला अयशस्वी लढा हा आहे. जोगणी विषयीच्या लोकसमजांचा सांस्कृतिक धागाही गुंफला आहे. गावात जोगणीची जत्रा भरली तर संकटे येत नाहीत, समृद्धी येते; या लोकसमजापेटी वाटेगावाचा राणोजी मांग शिगावच्या जोगणी पळविताना गावासाठी प्राणांचे बलिदान करतो. गावात जोगणीची जत्रा भरते. ह्या जोगणी विषयीच्या लोकसमजातून प्रादेशिकता टिपता येते. ग्रामीण जीवनातील विविध प्रकारचे अनुभव, तेथील विविधता अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांचा विषय बनते. खेड्यातील लोकांची जगणे, त्यांची भाषा अण्णाभाऊ अत्यंत प्रभावीपणे चित्रित करतात. म्हणून त्यांच्या लेखनाला ग्रामजीवनाचे मूल्य प्राप्त झाले आहे.

ग्रामीण जीवनव्यवहाराचे प्रभावी दर्शन हा अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचा एक महत्त्वाचा विशेष आहे. या संदर्भात डॉ.बाबुराव गुरव लिहितात. पराक्रम गाथा, स्त्री-प्रश्न कथा, प्रेम-शृंगार कथा या प्रकारच्या कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये कमी जास्त प्रमाणात लेखनविषय ठरलेली असूनही वरील विषयांपेक्षा ग्रामीण जीवनव्यवहार-दर्शन हाच ज्या कादंबऱ्यांचा प्रमुख विषय मानता येईल असा एक कादंबऱ्यांचा संच अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनात ठळकपणे सापडतो. या संचात माकडीचा माळ, वैर, डोळे मोडीत राधा चाले, रानबोका, कुरूप, पाझर, केवड्याचं कणीस या कादंबऱ्यांचा समावेश होतो. माकडीचा माळ ही कादंबरी ग्रामीण जीवनवास्तव घेऊन येणारी आहे. अनेक भटक्या

जमातींचे प्रश्न या कादंबरीतून अण्णाभाऊंनी मांडले आहेत. हे प्रश्न मांडताना ग्रामीण जीवनाचे चित्रणही ते करतात. गावातील वातावरण, तेथील राजकारण, निसर्ग, विविध प्रकारची माणसे अण्णाभाऊ नेमक्या भाषेत टिपतात. वारणेचा वाघ या कादंबरीमध्येही ग्रामीण संवेदनशीलतेचे प्रभावी चित्रण झाले आहे. खेड्यातील संघर्ष आणि त्या संघर्षामागे असणाऱ्या कारणांचा शोध अण्णाभाऊ मधील कलावंत घेऊ इच्छितो.

वारणेचा वाघ या कादंबरीतही ग्रामीण जीवनाचे दर्शन आले आहे. वारणेच्या खोऱ्यांतील समाजजीवन, त्यातील संघर्ष, स्त्रियांचे प्रश्न आणि गावातील गुंड प्रवृत्तीची माणसे अण्णाभाऊ चित्रित करतात. वारणेच्या खोऱ्यातील निसर्ग हा या समाजजीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळ ग्रामीण भागातील निसर्ग चित्रणाच्या दृष्टीनेही ही कादंबरी उत्कृष्ट आहे. वैर, डोळे मोडीत राधा चाले, रानबोका, कुरूप, पाझर, केवड्याचं कणीस या कादंबऱ्यांतूनही ग्रामीण समाज वास्तव अधोरेखित झाले आहे.

## अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील दलितत्व:-

अण्णाभाऊंच्या साहित्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शब्दांकित केलेले अनुभवविश्व अनेक अंगांनी अभ्यासता येते. ग्रामीण, दलित, प्रादेशिक, स्त्रीवादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी दृष्टीने या साहित्याचा विचार करता येतो. ग्रामीण जीवनजाणिवा त्यांच्या साहित्यातून जशा व्यक्त झाल्या आहेत तशाच दलित, विद्रोही जीवनजाणिवाही व्यक्त झाल्या आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील दलितांचे प्रश्न अण्णाभाऊंच्या साहित्यात पहावयास मिळतात. अर्थातच समाजातील शोषित, उपेक्षित घटक हा त्यांच्या साहित्याचा विषय बनतो. यामुळेच त्यांच्या लेखनावर मार्क्सवादाचा आणि आंबेडकरवादाचा प्रभाव दिसून येतो. त्यांच्या अनेक कथा-कादंबऱ्यांतून शोषित-पीडित समाजाचे चित्रण आले आहे. म्हणून डॉ.बाबुराव गुरव म्हणतात. समाजातील अवघा दलित वर्ग, जात-पात, धर्म, पंथ, मानपान यांची कवचे फेकून उभा राहणारा दलितवर्ग आणि त्याचे जीवघेणे प्रश्न हा अण्णाभाऊंचा राखीव मतदार संघ आहे. अण्णाभाऊ सातत्याने आणि आस्थेवाईकपणे त्याचेच प्रतिनिधित्व करीत राहिले आहेत. यादृष्टीने फकिरा, वारणेचा वाघ, चिखलातील कमळ, माकडीचा माळ आदी कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. फकिरा म्हणजे अण्णाभाऊंनी एका उपेक्षित नायकाचा घेतलेला वेध होय. या कादंबरीतून दलितांच्या जीवनातील संघर्ष,

दारिद्रय, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार आले आहेत. या सर्व प्रकारच्या शोषणाचा प्रतिकार फकिरा करतो. म्हणूनच तो एका उपेक्षित, शोषित, दलित वर्गाचा बंडखोर नायक बनतो. माकडीचा माळ मध्येही अशाच उपेक्षित फिरत्या जमातींचे चित्रण आले आहे. वारणेचा वाघ मध्ये महार जातीतील गरोदर सईवर झालेल्या अन्यायाला याचा फोडली आहे. तर चिखलातील कमळ मध्ये समाजातील मुरळी प्रथेचे धगधगते वास्तव अधोरेखित केले आहे. अशा अनेक कादंबऱ्यांतून दलितांच्या, शोषितांच्या जीवनातील दुःखाचे धागे-दोरे अण्णाभाऊ साठे यांनी मांडले आहेत.

एकूणच अण्णाभाऊंच्या साहित्यातून ग्रामीण आणि दलित जीवनातील विविध प्रकारच्या जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. ग्रामीण आणि दलित-शोषित संवेदनशीलतेचा उत्कट आविष्कार त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येतो. समाजजीवनातील उपेक्षित माणसाबद्दल त्यांच्या मनात व्यापक सहानुभाव दिसून येतो. यामुळेच ते आपल्या साहित्यातून ग्रामीण आणि दलित जीवनातील जाणिवा शब्दबद्ध करू शकले. यातच त्यांचे लेखक म्हणून मोठेपण सामावले आहे.

* * *

## कादंबरी एक वाड्:मय प्रकार

प्रा.सुभाष अडावतकर

**कादंबरीची पूर्वपीठिका :**

कादंबरी हा एक आधुनिक ललित वाङ्मय प्रकार आहे.'' गद्यत्मिक कथा'' असे तिचे वर्णन करण्यात येते. मराठी साहित्यात 'कादंबरी' या साहित्यिक प्रकाराचा जन्म अगदी अलीकडचा म्हणजे इंग्रजांचे राज्य भारतात प्रस्थापित झाल्यानंतरचा आहे. 'यमुनापर्यटन' ही बाबा पद्मजीची पहिली मराठी कादंबरी इ.स. १८५७ त लिहिली. गेली तिला दिडशे वर्ष पूर्ण झाली आहेत. असे असले तरी या वाङ्मय प्रकाराने प्रसिद्धी व लोकप्रियता या दोन्ही बाबतीत उच्चांक गाठला आहे. जनमानसावर तिने आपले स्थान निर्माण केले.

इंग्रजी साहित्याच्या अनुषंगाने 'कादंबरी' चा वाङ्मय प्रकार मराठी साहित्यात आला. काही टीकाकारांनी तिची उत्क्रांती संस्कृत कथा साहित्यातून लावण्याचा प्रयत्न केला आहे. पण कादंबरीचे स्वरूप व तिचा घाट पाहता ही गोष्ट योग्य वाटत नाही. बव्हंशी इंग्रजी साहित्यातील 'नॉव्हेल' या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व घाट यांच्याशीच ती जुळणारी आहे. ही गोष्ट निर्विवादपणे मान्य करावयाच पाहिजे. कादंबरीत 'कथातत्त्व' हे असलेच पाहिजे. अन्यथा ती कादंबरीच म्हटली जाणार सयनाही. कादंबरीतील कथातत्त्वाचे हे मूळ अतिशय पुरातन आहे. जवळ जवळ मानवाच्या जन्माइतके ते पुरातन आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

**कादंबरी शब्दाची व्युत्पत्ती:**

मराठी साहित्यात 'कादंबरी' ह्या वाड्मय प्रकार नवा व परकीय असला तरी 'कादंबरीचे' हे नाव मात्र आपलेच व परिचित असे आहे.

कादंबरी या शब्दाचा अर्थ 'कल्पित कथा' असा असला तरी त्याचा शाब्दिक अर्थ ''कुटुंब पुलापासून तयार केलेले मद्य किंवा आसव'' मदिराचे प्राशन करताच मनुष्याला ज्याप्रमाणे इहलोकाचा विसर पडतो व कल्पनेच्या सुखद संसारात विहार करू लागले. त्याचप्रमाणे कादंबरी वाचत असताना वाचकतीत इतका तन्मय होतो की त्यास सभोवतालच्या विश्वाचा विसर पडतो व तो कल्पनेच्या जगाचा आस्वाद घेतो. त्यात रममान होताना त्यास जो अनिर्वचनीत आनंद मिळतो. तेच कादंबरीचे प्रमुख उद्दिष्ट होय.

**कादंबरीच्या व्याख्या :**

कादंबरीची सर्वात अधिक सुटसुटीत व्याख्या जर कोणी केली असेल तर ती M.Abbel Chevelly या फ्रेंच लेखकाने "जिला काही विस्तार आहे. अशी गद्य कल्पित कथा" म्हणजे कादंबरी अशी व्याख्या तो करतो. तिलाच थोडीशी मुरड घालून ई.एम. फॉस्टर म्हणतो. "पन्नास हजार शब्दांच्या वर लिहिलेली कोणतीही काल्पनिक गद्य कथा म्हणजे कादंबरी होय" ह्या दोन व्याख्यांना विस्तृत करून न्यू इंग्लिश डिक्शनरीकार म्हणतो. भरपूर विस्तार असलेली मानवी जीवनातील व्यक्ती व त्यांच्या कृतीचे कथानकातून दर्शन घडवणारी काल्पनिक गद्य गोष्ट किंवा कथा "म्हणजेच कादंबरी होय ही व्याख्या कादंबरीच्या स्वरूपावर पुरेसा प्रकाश टाकणारी असून तिच्या निरनिराळ्या घटकाचाही उल्लेख तीत आला आहे.

**मराठी टीकाकार :**

पाश्चात्त्य साहित्यकाराप्रमाणेच मराठी टीकाकारांनी पण कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. मा.का. देशपांडे म्हणतात. कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्यचित्र होय. बापट व गोडबोले तिला "काल्पनिक प्रतिसृष्टी" मानतात व म्हणतात. "सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अशी तदवलंकित जीवित घटना याचे गोष्ट रूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून, जीवितातील गुंतागुतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्यवाङ्मय विभाग होय".

"कार्यकारण शंखलावद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी" अशी श्री.मा.कुलकर्णी यांनी कादंबरीची व्याख्या केली आहे.

**हिंदी टीकाकार :**

मराठी प्रमाणे हिंदी साहित्यकारांनी पण पाश्चात्त्य साहित्यिकांच्या अनुषंगाने कांदबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदीचे पहिले कादंबरीकार किशोरीलाल गोस्वामी कादंबरीला "प्रेमका विज्ञान" म्हणतात. त्यांच्या काळी कादंबरीकार "रोमान्य" चा पगडा अधिक असल्याने त्यांनी प्रेमाला महत्त्व दिले आहे.

मै. उपन्यास की मानव चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्र

पर प्रकाश डालना और उसके रहस्यों का खोलना ही उपन्यासो का मुलतत्त्व है।

–प्रेमचंद मेथिलीशरण गुप्त–

उपन्यास साहित्य मानव जीवन की व्याख्या और आलोचना है ।

–श्याम सुंदरदास

''उपन्यास मनुष्य के वास्तविक जीवन की काल्पनिक कथा है ।

**सारांश :**

कादंबरीची व्याख्या अशा प्रकारे अनेक विद्वानानी आपापल्या परीने करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून कादंबरीची काही लक्षणे स्पष्ट होण्यासारखी आहेत. त्यावरून कादंबरी म्हणजे ''मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी एक ललित गद्यकथा होय.'' तिचा विषय कोणताही असो. पण त्यातून मानवी जीवनाचे चित्रण होणे आवश्यक आहे. कालोमानाप्रमाणे मानवी जीवनात बदल घडतो.

**सामाजिक पार्श्वभूमी :**

वास्तववादी कादंबऱ्यातून ज्या स्थळाचे व कालाचे लेखन वर्णन करतो त्या स्थलाची व कालाची सामाजिक पार्श्वभूमी चितारणे आवश्यक असते. प्रत्येक समाजाची कालानुरूप वैशिष्ट्ये असतात. प्रत्येक समानाच्या आपल्या चालीरीती, धार्मिक सामाजिक, नैतिक समजुती, आचार–विचार, पोशाख, भाषा त्यांच्या समस्या असतात. ह्या सर्वांचे यथातथ्य वर्णन करणे आवश्यक असते. हरिभाऊ आपल्या कादंबरीतून आपल्या काळाच्या पांढरपेशा वर्गातील विविध व्यक्तीचे नमुने दाखवून त्यांच्याद्वारे त्याप्रमाणे कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या जीवन दर्शनातही बदल होतो.

**कादंबऱ्यांचे प्रकार :**

**वास्तववादी कादंबऱ्यांचे प्रकार :**

**ऐतिहासिक कादंबरीची वैशिष्टये :**

ऐतिहासिक कादंबरीत इतिहास गौण व कादंबरीतत्त्व प्रधान असावे. त्यात कल्पिताला प्राधान्य असावे. परंतु ऐतिहासिक सत्याला डावलून कल्पितता आणू नये. ऐतिहासिक सत्य हे तीत अपेक्षित आहे.

ऐतिहासिक सत्य म्हणजे केवळ राजकीय घटनाच नव्हे, तर तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाचा पण समावेश त्यात होतो.

**सामाजिक कादंबरी :**

ज्या कादंबरीतून समाजाचे यथातथ्य चित्रण असेल ती सामाजिक कादंबरी होय. ''विशिष्ट समाजाचे चित्र रेखाटणे, समाजस्थितीचे दर्शन घडविणे, सामाजिक समस्यांना पुढे आणणे, यांपैकी एक किंवा अनेक हेतूंनी प्रेरित होऊन कादंबरी लिहिली असेल व तो तिचा हेतू सिद्धीस गेला असेल तर अशा कादंबरीला सामाजिक कादंबरी म्हणावे''.

**कल्पनारम्य कादंबऱ्या :**

ज्या कादंबऱ्या वास्तववादी असूनही विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन लिहिल्या नसतील, तींतील पात्रे प्रत्यक्ष सदृश्य असली, तरी ती समाजाची पुरेशी प्रातिनिधिक नसतात अशा कादंबऱ्यांना काल्पनिक कादंबऱ्या म्हणावे.

**टीकात्मक व प्रश्नात्मक कादंबऱ्या :**

समाजातील अनिष्ट चालीरीती किंवा रुढ कल्पनांमुळे मानवतेची विटंबना होऊ लागते व माणसाला माणूस म्हणून जगणे कठीण होऊ लागते, तेव्हा अशा सामाजिक समस्यांवर कादंबरीकार प्रश्नात्मक रूपाने वा टीकात्मक रूपाने आपले विचार व्यक्त करतो तेव्हा सामाजिक कादंबऱ्यांना टीकात्मक व प्रश्नात्मक स्वरूप प्राप्त होते.

**प्रचारकी कादंबऱ्या :**

साहित्यातून लेखकाच्या भावनांची अभिव्यक्तीच प्रामुख्याने होत असल्यामुळे प्रत्येक कादंबरी ही स्वःमताच्या प्रचारा करताच लिहिली जाते, ही गोष्ट खरी असली तरी कादंबरीकार हा प्रचार कालात्मकतेच्या आवरणाखाली झाकून टाकतो. काही कादंबरीकार स्वमतांचा हिरीरीने पुरस्कार करण्याच्या हेतूनेच कादंबऱ्या लिहितात. तेव्हा त्यांचे स्वरूप हे बव्हंशी प्रचारकी होते.

**मनोविश्लोषणत्मक किंवा संज्ञाप्रवाही कादंबरी :**

'मनोविश्लेषण' या घटकाला आधार मानून लिहिलेल्या कादंबऱ्यांना 'मनोविश्लेषणात्मक' कादंबरी असे म्हणतात. चंचल, गूढ व वैचित्र्यपूर्ण अशा मानवी मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न साहित्यिक विविध प्रकारांनी घेत असतात. परंतु ह्या मानवी मनावरच लक्ष केंद्रित करून एका घटनेद्वारे त्याच्या मनात उठणारे निरनिराळ्या विचारांचे तरंग चित्रित करणे हा या कादंबऱ्यांचा उद्देश असतो.

**ग्रामीण व वन्य जमातींच्या जीवनावरील कादंबऱ्या :**

मानवी जीवन हे एका विशिष्ट वर्गापुरते सीमित नाही. हे विविध स्वरूपाचे व जमातीचे बनलेले आहे. खेड्यापाड्यात व रानावनात ते विखुरलेले आहे. शिक्षणाचा प्रसार मुंबई-पुणे हे शहरी जीवन ओलांडून खेड्यात पसरू लागताच या लोकांच्या जीवनाकडेही कादंबरीकारांचे लक्ष जाऊ लागले व त्यांच्यातूनही कादंबरीकार निर्माण होऊ लागले. कादंबरीला नवीन 'ग्रामीण जनतेचा, विविध व्यवसाय करणाऱ्यांचा विषय हाताळण्यास मिळाला त्याबरोबर शहरी जीवन व संस्कृतीभोवती अडकलेला तिचा प्रवाह पुन:वाहू लागला.

**प्रादेशिक कादंबरी :**

एखाद्या विशिष्ट प्रदेशाला किंवा टापूला कादंबरीची पार्श्वभूमी घेऊन कथानक लिहिले जाते तेव्हा तीस प्रादेशिक कादंबरी म्हणतात. त्यातील घटना, व्यक्ती व वातावरण हे सर्व त्या प्रदेशाला साकार करते. त्यातून विशिष्ट प्रदेशातील व्यक्तींचे, त्यांच्या चालीरीतींचे, त्यांच्या सामाजिक-नैतिक-धार्मिक-राजकीय-आर्थिक कल्पनांचे त्यांच्या मनोधर्माचे एक संबंध जाळे विणलेले असते. त्यात व्यक्ती वा व्यक्तिसमूहाला महत्त्व नसून प्रदेशाला महत्त्व असते.

**अति वास्तववादी कादंबऱ्या :**

प्रौढ मनाचे मनोरंजन बालिश गोष्टींनी होऊ शकत नाही. आपल्या सभोवतालच्या जगाची वास्तव जाणीव होऊ लागताच मानव व मानवी जीवनाबद्दल कुतूहल जागृत होते

व जीवनाचे रहस्य शोधण्याच्या नादात वास्तवदर्शी कादंबऱ्यांची निर्मिती होते.

**रहस्यकथा :**

मानवी जीवनाच्या दोन अवस्था असतात. त्या अशा १. बाल्यावस्था २. प्रौढावस्था या दोन्ही अवस्थात त्यांच्या विचारात कल्पनेत, वृद्धीत ग्रहण शकतो. बरेच अंतर असते.

बाल्यावस्थेत अपरिपक्व बुद्धीमुळे त्यांच्यात तर्कबुद्धी किंवा सारासार विचारशक्ती नसते. त्यामुळे अशक्य गोष्टी शक्य वाटतात व असंभाव्य सत्य, सत्य वाटते. अचाट, अफाट, रहस्यमय गोष्टींत त्यांचे मन रमते. बालिश मनाला तर्कहीन गोष्टी आवडतात, त्यांचे त्यास आकर्षण वाटते. रहस्यमय व अद्भुतरम्य, टारझनसारख्या कथा त्यास आवडतात.

प्रौढ मन हे अनुभवाने, शिक्षणाने व विचाराने परिपक्व होते. त्यात सारासार विचारशक्ती येते व ती हे 'असंका?' असा तर्क करू लागते. सत्य व तर्कशुद्ध गोष्टीकडे त्याचे मन झुकू लागते.

सारांश, मानवी जीवनाच्या ह्या दोन प्रमुख अवस्थांवर साहित्याची निर्मिती होत असल्यामुळे अद्‌भुतरम्य व वास्तवदर्शी असे कादंबऱ्यांचे दोन ठळक भेद मान्य होण्यासारखे आहेत.

समाज हा परिवर्तनशील आहे. काळाप्रमाणे तो नेहमी बदलत असतो. तर या बदलत्या समाजाच्या स्थितीगतीचे चित्रण साहित्यामधून येत असते. तसेच सन १९४५ नंतरच्या मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य दलित साहित्य, देशी साहित्य, विज्ञान साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य इ. वाङ्‌मयीन प्रवाह उदयास आले. या सर्व वाङ्‌मयीन प्रवाहाने मराठी साहित्य समृद्ध केले. आपले स्वत:चे स्थान निर्माण करून आजही तितकीच कसदार साहित्य निर्मिती होत आहे. या पैकी एक प्रमुख वाङ्‌मयातील प्रवाह महणजे "ग्रामीण साहित्य" होय.

आजच्या मराठी साहित्याला अनुभवाचा कसदारपणा बहाल करणारे जे विविध वाङ्‌मयीन प्रवाह उदयास आले. त्यामध्ये ग्रामीण साहित्य हा एक महत्त्वाचा प्रवाह मानला जातो.

* * *

## दलित कादंबरी : संकल्पना व स्वरूप

–प्रा. सुहास निर्मळे

### १) अण्णाभाऊ साठे :

वारणेच्या खोऱ्यात–१९५१, चित्रा–१९५१, फकिरा–१९५९, वैजयंता–१९५९, चंदन–१९६२, अलगूज–१९६२, माकडीचा माळ–१९६३, आवडी–१९६३, गुलाम–१९६४, वैर–१९६४, चिखालातील कमळ–१९६५, धुंद–१९६६, कुरूप–१९६६, तारा–१९६७, अहंकार–१९६७, मयुरा–१९६८, वारणेचा वाघ–१९६८, पाझर–१९६९, राजगंगा–१९६३, अग्निदिव्य–१९६९, रानबोका–१९६९, आघात–१९६९, केवड्याचं कणीस–१९६९, आग–१९६९, संघर्ष–१९६९, रूपा–१९६९, मूर्ती–१९७०, मंगला–१९७१, डोळे मोडीत राधा चाले–१९७१, मास्तर–१९७५, रत्ना–१९७५, फुलपाखरू–१९७७.

**अण्णाभाऊ साठे यांच्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या :**

वारणेच्या खोऱ्यात–१९५१, अलगूज–१९६२, आवडी–१९६३, मयुरा–१९६८, वारणेचा वाघ–१९६८, पाझर–१९६९, रानगंगा–१९६३, केवड्याचं कणीस–१९६९, मंगला–१९७१, वैर–१९६४, कुरूप–१९६६, अहंकार–१९६७, रूपा–१९६९.

**अण्णाभाऊ साठे यांच्या दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या :**

चित्रा–१९५१, फकिरा–१९५९, वैजयंता–१९५९, चंदन–१९६२, माकडीचा माळ–१९६३, गुलाम–१९६४, चिखलातील कमळ–१९६५, रानबोका–१९६९, आघात–१९६९, डोळे मोडित राधा चाले–१९७१, रत्ना–१९७५.

"अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचा वेग व पसारा मोठा होता. ते स्वत: दलित समाजातील होते त्या समाजातील माणसांची सुख–दु:खे त्यांनी स्वत: भोगली होती. त्यामुळे अनुभवांचे समृद्ध भांडार त्यांचेजवळ होते. त्यांना कादंबरी लेखनाची धाटणीही अवगत होती. इतके असूनही त्यांच्या कादंबरी लेखनात, दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी प्रमाणात आढळते."

वरील विधानाला आधार देणारे समीक्षणात्मक संदर्भ खालीलप्रमाणे देता येतील.

१. 'आण्णाभाऊंनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे.'

२. 'वाङ्मयीनदृष्ट्या त्या कलाहीन आणि जिवंत नव्हत्या. एवढेच म्हणता येईल विषयातील नावीन्य इतके जबरदस्त असूनही आणि लेखनाची धाटणीही अवगत होती तरीही आण्णाभाऊंना मन हेलावून टाकणारी, दीर्घकाळ लक्षात राहील अशी कादंबरी रसिकांना देता आली नाही.'

३. 'फकिरा' सारखी कादंबरी ते पुन्हा लिहू शकले नाहीत. त्यांनी कादंबरी लेखनात नंतर रंजकतेचाच मार्ग अनुसरलेला दिसतो. याचे मूळ त्यांच्या जीवनवैफल्यात व दारुण स्थितीत आढळते.'

४. 'त्यांचे मूळ त्यांच्या दारू(ण) स्थितीत आहे. 'वैजयंता', 'माकडीचा माळ', 'वारणेचा वाघ' या कादंबऱ्यांना 'फकिरा'चे तेज लाभलेले नाही. पुढच्या डझनावरी कादंबऱ्याना तर नाहीच नाही.'

**२) शंकरराव खरात :**

हातभट्टी-१९७०, मी मुक्त! मी मुक्त!-१९७१, झोपडपट्टी-१९७३, गावचा टिनोपाल गुरुजी-१९७३, मसालेदार गेस्ट हाऊस-१९७४, पारधी-१९८०, फुटपाथ नं.१-१९८०.

'कावळे गुरुजीसारखी टिनोपाल माणसे सुमित्रा पारवे, काय किंवा मधुरा घारे काय या सत्यप्रवृत्तीच्या माणसांवर कुरघोडी करताना दिसतात. त्यांच्या मसालेदार गेस्ट हाऊस मध्ये शहरातील गेस्ट हाऊसचे चित्रण आले आहे.'

शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी', 'झोपडपट्टी', 'मी मुक्त! मी मुक्त!', 'पारधी', 'फूटपाथ नं. १' या कादंबऱ्यांमध्ये दलित जीवनाचे चित्रण आले आहे.

'शंकरराव खरात एखादा विषय एखादे उद्दिष्ट समोर ठेवून कादंबरीची रचना करताना दिसतात.' पण शंकरराव खरातांची जीवनदृष्टी ही शांत व संयमी आहे. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कथा-कादंबरी लेखनामधून अभिव्यक्त झाले आहे. धीरगंभीर, शांत व संयमी लेखनशैलीमुळे त्यांना रसिक वाचक मोठ्या संख्येने लाभला आहे.

३) ना. रा. शेंडे :

कांदबरी लेखन :

शृंगारलेले प्रेत–१९३८, काजळी रात्र–१९५६, तांबडा दगड–१९५८, विलासिनी–१९७४, अंशुजा–१९७४, गायत्री–१९७८.

'ना. रा. शेंडे एखादा महत्त्वपूर्ण विचार समोर ठेवून त्यावर कादंबरीच्या कथानकाची जडणघडण करताना दिसतात. उदा. कला आणि नीती यासंबंधीचे बरेचसे अनुभव शृंगारलेले प्रेत या कादंबरीतून चित्रित झाले आहेत. 'काजळी रात्र' मधून जीवनातील भावनात्मक एकता निर्माण करण्याचा विचार पुढे येतो ते 'तांबडा दगड' या कादंबरीचे कथाबीज आदिवासी बाधवांची सुधारणा हे आहे. 'विलासिनी' ही कादंबरी अध्यात्म साहित्य आणि संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर आकारली आहे. 'अशुंजा' मध्ये अतींद्रिय विश्वाचे दर्शन घडते, तर 'गायत्री' मधून स्त्रियांवरील अत्याचाराचा विषय आला आहे.'

४) नामदेव व्हटकर :

अपराधी–१९४३, सोळा शिणगार–१९६८.

अपराधी कादंबरीमध्ये अनाथ–वेबारस मुलाचा प्रश्न आणि सोळा शिणगार या कादंबरीमधून तमासगीरांचे उपेक्षित जीवन चित्रण आले आहे.

नामदेव व्हटकरांचे कादंबरीलेखन अल्प असले तरी दलितांच्या सुरुवातीच्या पिढीतील दलित कादंबरीकार म्हणून त्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो.

५) हिं. गो. बनसोडे :

मुक्तिसंग्राम–१९६९, उज्वला–१९७३, आभाळाएवढी–१९८१.

महार–मांगानी धर्मांतर करून, गावकीची कामे नाकारून, स्वाभिमानाने जगावयाचे ठरविल्यावर महार–मांग व गावकरी यांच्यामध्ये सुरू झालेला संघर्ष हा मुक्तिसंग्राम कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. या मूळ कथानकाला दुधी गाईचे प्रकरण, बापाचे लोकजागृतीचे कार्य, शांताराम–भारती व गीताचे प्रेमप्रकरण या उपकथानकाची जोड मिळाली आहे.

'उज्वला' या कादंबरीमधून सरळ माणसाच्या आयुष्यात विश्वासघाताने कसे ढवळून निघते ते सांगितले आहे. 'आभाळाएवढी' ही कादंबरी जोतिराव आणि सावित्रीबाई यांचे जीवनकार्य चित्रित करते.

राजा जाधव यांनी हि. गो. बनसोडे यांच्या कादंबरी लेखनाबद्दल असे म्हटले आहे की, 'हि.गों. बनसोडे यांच्या वाङ्मयीन जाणिवा प्रबळ आहेत. परंतु प्रेरणातील अस्पष्टता जाणवू लागते.'

**६) ना. बं. जाधव :**

डॉ. अंजना-१९७२, अपर्णा-१९४७, राजाभाऊ-१९७४, दे दान-१९७९.

डॉ. अंजना ह्या कादंबरीमध्ये मंजिरीच्या जीवनाची विफलता स्पष्ट झाली आहे. 'दे दान' कादंबरीतून उपेक्षित जगात एकटी पडलेली मंगला व तिची कथा स्पष्ट झाली आहे. पण दलित जीवनाचे सखोल चित्रण ह्या कादंबऱ्या करू शकत नाहीत.

**७) केशव मेश्राम :**

हकिकत आणि जटायू-१९७२, पोखरण-१९७९.

'केशव मेश्राम यांच्या या दोन कादंबऱ्या हकिकत आणि जटायू मधून एका दलित नायकाच्या आयुष्यातील दहा वर्षाचा काळपट केशव मेश्राम यांनी उलगडून दाखवला आहे. या कादंबरीचे दोन भाग आहेत दुसरा भाग 'जटायू' यामध्ये रक्तबंबाळ होणारा रामायणातील जटायू हे पौराणिक मिथ वापरून दलित जीवनातील विदारकता स्पष्ट होते. 'पोखरण' ही कादंबरी आर्य-अनार्य, संस्कृती संकर आणि संघर्ष याची पार्श्वभूमी आहे. या दोन्ही कादंबरीतून दलितांचे वास्तव जीवन चित्रण प्रत्ययकारिकतेने केशव मेश्राम यांनी केले आहे.'

**८) ज. वि. पवार :**

ज.वि. पवार यांनी 'बलिदान-१९७०' ही कादंबरी लिहिली आहे. त्यामध्ये गटबाजीतून होणारे उद्ध्वस्त दलित जीवन रेखाटले आहे.

**९) हरिभाऊ पगारे :**

'युगप्रवर्तक-१९७०' या कादंबरीतून बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि जीवन प्रणाली स्पष्ट करण्याचा प्रयत्न हरिभाऊ पगारे यांनी केला आहे.

**१०) निशिकांत शेंडे :**

'कलंक मुक्ती-१९७६' एका कुष्ठरोग्याच्या वाट्याला आलेली उपेक्षा व त्याचा जगण्यासाठीचा संघर्ष परिणामकारकरीत्या चित्रित झाला आहे.

११) भीमसेन देठे :

इस्कोट–१९८०, चक्री–१९९४ डिसेंबर (प्र. आ.) २०१२, द्वि. आ.

'इस्कोट' ही कादंबरी एकूण २५ भागातून साकारली आहे. धर्मांतरानंतर दलित आणि सवर्ण गावकरी यांच्यातील संघर्ष वास्तव स्वरूपात भीमसेन देठे यांनी रेखाटला आहे. दलित जीवनाचे सखोल चित्रण या कादंबरीतून स्पष्ट झाले आहे.

'चक्री' ही त्यांची दुसरी कादंबरी चक्रीमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान दलित समाजामध्ये कसे रुजले आहे. दलितांची अस्मिता सर्व सामान्य उपेक्षित वंचित माणसांना खूप प्रेरणा देते. त्यांचे प्रतिबिंब चक्रीमधून स्पष्ट झाले आहे. कादंबरी रसिक मनाचा ठाव घेते आणि दलित चळवळ डोळ्यासमोर उभी करते.

**साहित्य : समाज सापेक्ष सर्जनशील आविष्कार :**

१) साहित्य हा समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार आहे. त्यात मानवी जीवनविषयक अनुभवांचा म्हणजेच जीवनमूल्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न असतो. जीवनविषयक प्रेरणानीच साहित्य रूपास आलेले असते. साहित्यात कलावंताच्या मनोवृत्तीचे आणि समाजाच्या विचार सरणीचे प्रतिबिंब पडलेले असते. या प्रतिबिंबावरूनच सामाजिक संस्कृतीचे मूल्यमापन ही होत असते म्हणूनच प्र.बा. गजेंद्रगडकर साहित्यिकाच्या साहित्यकृतीच्या संदर्भात अशी अपेक्षा बाळगतात. 'कलावंत ज्या सामाजिक व्यवस्थेत राहात आहे. त्या सामाजिक व्यवस्थेत रहात आहे. त्या सामाजिक स्थितीचे सूचन त्याच्या कलेत व्हावे आणि त्या समाजाशी आपली दृढता त्याने कायम ठेवावी.'

२) 'व्यक्ती व समाज यांच्यातील संबंध आणि सांस्कृतिक जीवनातील साहित्याचे स्थान यासंबंधीचा त्याचा दृष्टिकोण निकोप, सुस्पष्ट व मूलग्राही असेल तर त्याच्या वाङ्मयात समाज पराङ्मुखतेचा लवलेशही सापडणार नाही. उलट त्यांची अस्मिता संपूर्ण सामाजिक जीवनाला सामावून घेण्याइतकी विशुद्ध व व्यापक बनलेली असेल.'

३) 'पण हे दृश्य दिसले नाही. थोड्याफार दलितेतरांच्या साहित्यकृतींनी दलित जीवनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. पण तो पुसट आणि शबल स्वरूपाचा आहे. त्या खरेखुरे दलित जीवन डोकावले नाही हे दलित आहेत तरी

कोण? याचा विचार इथे करणे क्रमप्राप्त वाटते.'

४) 'दलित लोक व दलित समाज जगभर पसरले आहेतहे सर्व जातीत व धर्मात आहेत. युरोप-अमेरिकेतील गोऱ्या जमातीतही दलित आहेत, तसेच भारतातील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यासारख्या तथाकथीत उच्चवर्णीयांमध्येही दलित आहेत.'

५) 'साहित्य हे मनुष्याच्या समाजव्यवहाराचे एक अंग आहे आणि म्हणूनच समाजातील गतिशीलतेचा परिणाम साहित्यावर होणे अटळ असते ह्या परिणामातून निरनिराळ्या साहित्यविषयक जाणिवा, प्रवाह साकार होत असताना दिसतात.'

६) 'सामान्य आयुष्यातील दुःख ही एक नुसती वेदना म्हणूनच जाणवते. पण या दुःखात जे काही सामावले आहे, ते शोधू लागल्यास ते नुसते वेदनारूप राहत नाही. तो अनुभव फुलू लागतो असा फुलवतो व आंतरिक रचना असलेला अनुभव एखाद्या व्यक्तीचा वैयक्तिक अनुभव राहत नाही. त्याला लवचीकता प्राप्त होते.'

अशा सामाजिक गतिशीलतेची एक अपरिहार्य परिणती म्हणजे आजचे दलित साहित्य होय.

### ७) दलित साहित्याचे वेगळेपण :

दलित साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करावयाचे झाल्यास, दलित साहित्यातील 'नकार' आणि 'विद्रोह' ही साहित्यमूल्ये समजून घ्यावी लागतात. वर्णभेद, सामाजिक विषमता, दारिद्र्य, अज्ञान आणि उपेक्षा या साऱ्यांना तोंड देत शेकडो वर्षे पशुतुल्य हीन जीणे जगलेल्या दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारामुळे जागृतिवस्था प्राप्त झाली आणि गुलामाचे हीन जगणे झुगारून देण्यासाठी त्याने आपली मनोभूमिका तयार केली. त्यातूनच नकार हे नवे साहित्यमूल्य आकारला आले. परंपरेला नकार देण्यासाठीच त्याने विद्रोहाचे शस्त्र हाती धरले हा विद्रोह दलित साहित्याचे प्रवृत्ती वैशिष्ट्य आहे.

* * *

LIBRARY AKOLE 422601

# दलित साहित्य

–डॉ.चंद्रकांत रूद्राक्ष

LIBRARY

**प्रास्ताविक :**

ब्रिटिश राजवटीपासून म्हणजे १८१८ पासून भारताच्या आधुनिक युगास सुरुवात झाली. जुन्या कर्मठ विचारात घडलेल्या संस्कृतीतून नवविज्ञानाधारित संस्कृतीत प्रवेश करताना प्राधान्याने ज्या घटकाला हादरा बसला तो घटक म्हणजे चातुर्वर्ण्याधिष्ठित समाज व्यवस्था. नवशिक्षणाच्या झपाट्याने होऊ लागलेल्या प्रसाराने प्राचीन धर्मकल्पनांचा नव विचारातून घडलेल्या डोळस दृष्टीने विचार केला जाऊ लागला. समता, स्वातंत्र्य, बंधुता, मानवी हक्क यांची प्रथमच जाणीव झाली.

इंग्रजी राज्यव्ययस्था, मिशनऱ्यांनी सुरू केलेले इंग्रजी शिक्षण यांचा एकत्रित परिणाम होऊन आधुनिक सुशिक्षितात नवी जाण निर्माण झाली. त्यातून समाजसुधारणेचे वारे वाहू लागले. कर्त्या सुधारकांच्या कृतिशील आणि धोरणात्मक विचारातून येथे प्रार्थना समाज, आर्यसमाज, ब्राम्होसमाज, मानवधर्म सभा, रामकृष्ण मिशन यासारख्या संस्थांचे जाळे उभे राहिले. पुढे महाराष्ट्रातही या संस्थांचे हस्तक निर्माण होऊन समाज सुधारणेबरोबरच स्त्री–पुरुष समतेचा विचार प्रथमच सुरू झाला. त्या दृष्टीने न्यायमूर्ती रानडे, भांडारकर, दादोबा पांडुरंग विष्णुबुवा ब्रम्हचारी, महात्मा फुले, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित प्रभृतींचे कार्य मोलाचे आहे. जातिभेदावर प्रखरतेने भाष्य करून मानवतावादाच्या उदार दृष्टिकोनातून त्यांनी जागृती करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नातूनच पुढे गावकुसाबाहेर राहिलेल्या, पिढ्यांन्‌पिढ्या अज्ञान अंधःकारात खपलेल्या दलितांना शिक्षणाची कवाडे खुली झाली. या शिक्षित होत गेलेल्या पिढीच्या हाती लेखनीरूपी शस्त्र आल्याने त्यांनी आजवरच्या आपल्या मूक भावनांना वाट करून देण्याचा प्रयत्न आरंभीला. या प्रयत्नाने दलितांच्या शोषणाच्या करुण किंकाळ्या स्पष्टपणे जनमानसाच्या बोथट झालेल्या भावनांना संवेदनशील बनवू लागल्या. येथूनच दलित साहित्याच्या निर्मितीची पहाट झाली.

**दलित साहित्य :**

आजचे दलित साहित्य हे स्वातंत्र्योत्तर काळातील केवळ महाराष्ट्रातीलच नाही तर अखिल भारतीय पातळीवरील एक महत्त्वाची सांस्कृतिक आणि

साहित्यिक घटना आहे. तिच्यामुळेच देशपातळीवर अखिल मानवीकरणाच्या प्रक्रियेला समतेची चाके प्राप्त होऊन गती मिळाली. ग्रांथिक संस्कृतीपासून वंचित राहिलेल्या गावकुसाबाहेरील नव शिक्षित मनाचा हुंकार प्रथमच दलित साहित्याने समाजासमोर ठेवला. समाजपरिवर्तनाचा वसा घेऊन पुढे आलेल्या दलित साहित्याने मानवतावादाला पूज्य मानले आहे. भगवान बुद्ध, आंबेडकर, मार्क्स हे त्याचे प्रेरणा स्त्रोत असून समता स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांची प्रस्थापना हा त्याचा ध्येयवाद आहे. हजारो वर्षे ज्याच्यावर अन्याय झाला, त्याच्या उत्कर्षाचा मार्ग थोपविणाऱ्या, परंपरांना जाळून भस्म करणाऱ्मा विचारांची लेखनी रूपी मशाल या साहित्य निर्मिकाने हाती घेतली आहे. एकूणच मराठी साहित्य विश्वाला ''आपल्या अस्सल देशी अनुभवाच्या बळावर'' झळाली प्राप्त करून देणारे दलित साहित्य अल्पावधीत लोकप्रिय ठरले, याचा एक अभ्यासक म्हणून मला अभिमान आहे. धर्म, रूढी, वर्ण व्यवस्था यातून उदयाला आलेल्या परंपरांनी समाजाचे शोषण केले. माणूस असूनही गुलामगिरीच्या, बंधनांनी त्याला जखडून टाकले. अनादी काळापासून सुरू असलेला मूक कंठशोष या साहित्याने बेधडक बोलका केला. आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोह हे आपले प्राणतत्व मानून या साहित्याने माणसाचे माणूसपण, त्याची प्रतिष्ठा आणि त्याचे स्वातंत्र्य नाकारणाऱ्या संस्कृतीला कडाडून विरोध केला. या विरोधापोटी जन्माला आलेले साहित्य अस्सल देशी साहित्य म्हणूनच विचारात घ्यावे लागते.

दलित साहित्य हा गावकुसाबाहेर वास्तव्य करणाऱ्या बारा बलुतेदारांच्या भीषण जीवन प्रवाहाचा करुण चल चित्रपट आहे. वर्षानुवर्षे पिढ्यांन्पिढ्या ज्यांच्या वाट्याला कधी माणूसपण आलंच नाही. अशा माणूसपण गारठलेल्या, अवमान, अपमान, उपासमार, अज्ञान आणि दारिद्र्य याने व्यथित झालेल्या माणसाच्या भावभावनाचे, जगण्या-भोगण्याचे चित्रण करणारा एक साठोत्तरी वाङ्.मयीन प्रवाह म्हणून दलित साहित्याकडे पाहिले जाते. या साहित्याचा आत्मकथनाच्या रूपाने सुरू झालेला प्रवास कथा, कविता, कांदबरी आणि काही प्रमाणात नाटक इत्यादी वाङ्.मय प्रकाराने समृद्ध केला आहे. वेदना, विद्रोह आणि नकाराच्या माध्ममातून शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा आत्मविश्वास दलितांच्या मनात निर्माण करणाऱ्या जाणीवेने हा प्रवाह आज एकूणच साहित्याच्या समग्र दालनात स्थिरावलेला दिसतो. आंबेडकरी विचारांचा

वारसा घेऊन समाज मनात आपल्या विषयीचे एक स्वतंत्र आणि आढळ स्थान निर्माण करण्या एवढी लोकप्रियता त्याला मिळाली आहे. येथील विषमतेशी आणि दास्याशी या साहित्याचे वैर आहे. म्हणूनच की काय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्त्व या मूल्यांच्या प्रत्यारोपणासाठी उभ्या राहिलेल्या दलित आंदोलनातून साकारलेल्या दलित साहित्याचे स्वरूप हे प्रलंयकारी आणि प्रज्ञावंत वाटते. त्यामुळेच की काय या दलित साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणा ही अस्पृश्यतेच्या आगीत सोसाव्या लागणाऱ्या यातनेतून पुढे आलेल्या दलित साहित्याने असंघटित असलेल्या दलित वर्गाला संघटित करण्याचा प्रयत्न प्रथमतः करण्याची गरज मला वाटते महत्त्वाची आहे.

हजारो वर्ष जातीयतेच्या अंधारात खितपत पडलेल्या अस्पृश्यांना आज आपल्यावर होत असलेल्या अन्याय, अत्याचार आणि बलात्काराविरुद्ध आवाज उठविता येणे शक्य झाले ते डॉ. आंबेडकरांनी उभारलेल्या लढ्यामुळेच. त्यांनी दाखवलेल्या मार्गानी वाटचाल करून गावकुसाबाहेर राहणारा दलित आपल्या स्वत्त्वाची जाणीव इतरांना करून देण्यास सिद्ध झाला आहे.

दलित साहित्याविषयी आपली भूमिका व्यक्त करताना प्रसिद्ध विचारवंत व समीक्षक डॉ. बानखेडे म्हणतात, दलित आंदोलनातून दलित साहित्याची चळवळ उभी राहिली आहे. या चळवळीच्या पाठीमागे आंबेडकरी ध्येयवाद उभा आहे. आंबेडकरवादी विचाराने भारावलेल्या अनेक तरुणांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला, दुःखाला वाचा फोडण्यासाठी साहित्याचा आधार घेतला. वास्तविक पाहता साहित्य हा जीवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते. परंतु या ठिकाणी दलित आणि सवर्ण यांच्यात चाललेला झगडा, त्यात होणारी दालितांची गळचेपी, होणारे हाल या सर्वच गोष्टींना प्रतिकार करण्यासाठी दलित लेखकांनी साहित्यासारखे धारदार, तीक्ष्ण शस्त्र हाती घेऊन चळवळीला ताकद पुरविण्याचा प्रयत्न आरंभिला आहे. या प्रयत्नातून साकारलेल्या दलित कवितेने मराठी साहित्याला नवी धार आणली. त्यात नारायण सुर्वे, वामन निंबाळकर, बाबुराव बागूल, दया पवार, त्र्यंबक सपकाळ. नामदेव ढसाळ, प्रल्हाद चेंदवणकर, ज.वि. पवार, केशव येश्राम, अर्जुन डांगळे, धुरंधर मीठबावकर, दादाभाऊ साळवे, शशिकांत लोखंडे, ज्योती लांजेवार, निलकांत चव्हाण, यशवंत मनोहर, फ. मु. शिंदे, इत्यादी कवींचा वाटा मोठा आहे. या सर्वच कवीच्या कवितामधून जीवनातील विसंवाद, विषमतेचे चटके, लादलेली गुलामगिरी, अन्याय, जुलूम

यांच्या विरुद्धची तीव्र स्वरूपाची प्रतिक्रिया पहावयास मिळते. तर त्याचवेळी बौद्ध मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानाचा सुगंध या काव्यातून दरवळताना दिसतो.

आत्मकथनाच्या माध्यमातून पुढे आलेल्या दलित लेखकांच्या लेखणीने नवे तेज आत्मसात केलेले दिसते. आपले जीवनानुभव व्यक्त करताना त्यांच्या ठिकाणी चीड, संताप, द्वेष या गोष्टी पदोपदी जाणवतात. अर्थात त्यांचे जगणे विलक्षण अशा पशुवत जगण्याशी समांतर होते. त्याबद्दल पूर्वी कधी तक्रार केली नव्हती की नकार व्यक्तविला नव्हता. केवळ सोशीकतेने सहन करीत जगणे एवढेच काय ते त्यांनी अनुसरले. पोट जाळून, उपाशी राहून दारिद्र्यात खितपत पडून माणूस असूनही जनावरापेक्षा भीषण जगणे आपल्याच वाट्याला का? हा प्रश्न घेऊन पुढे आलेल्या आत्मकथनांनी शोषणरहीत समाज व्यवस्थेच्या उभारणीसाठी आपली दु:खे समाजासमोर ठेवून त्याला विचार प्रवृत्त केले.

त्यामुळेच त्यात नकाराबरोबरच प्रस्थापिता विरुद्धचा विद्रोह मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतो. माणसाला जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या किमान पातळीवरील अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा भागविणे जेथे दुरापास्त होते तेथे माणूस म्हणून वागवणे कसे शक्य होईल ? जेथे जातच जातीला वैरी होते तेथे सुखाचा शिडकावा कोठून होणार, साऱ्याच बोथट होऊन गेलेल्या संवेदनांच्या मानसी प्रवृत्तीला इंगा दाखविणाऱ्या रोख ठोक भाषेच्या माध्यमातून आपल्या अनुभवांना वाट करून देताना पुढे आलेली आत्मकथने मराठी साहित्यात मैलाचा एकेक दगड ठरवा अशी उतरली आहेत.

प्र.ई. सोनकांबळे यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकातून टप्प्याटप्प्याने प्रकाशित केलेले आपले अनुभव पुढे आठवणींचे पक्षी रूपाने उजेडात आले. आज या पुस्तकाचा अनेक देशी भाषेत अनुवाद होऊन एक ज्वलंत जातिवंत जीवनाची स्मरणगाथा असे त्याचे मूल्यमापन करू गेल्यास त्यात अतिशयोक्ती ठरणार नाही. दया पवारांचं 'बलुतं' असो की उत्तम बंडू तुपे यांची 'काट्यावरची पोट', रूस्तुम अचलखांब यांचे 'गावकी' असो की कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट', शंकरराव खरात यांचे 'तराळ अंतराळ' या सर्वांनी दलितांच्या आजवरच्या मूक जाणिवा ज्वलंतपणे उभ्या करताना माणसाला श्रेष्ठ माणणाऱ्या विचारांशी आपली बांधिलकीच व्यक्त केलेली दिसते. वर्ण, जात, धर्म यांना नकार देताना स्वातंत्र्य बंधुता या सामाजिक मूल्यांना ते अनुसरते.

तुलनेने कथा आणि कादंबरीच्या पातळीवर दलित साहित्यिकांनी

फारशी निर्मिती साधली नसेल. परंतु बाबुराव बागूल, शंकरराव खरात, अर्जुन डांगळे, वामन होवाळ, भि. शि. शिंदे, सुधाकर गामकवाड, दि. रा. वाघमारे, ना. रा. शेंडे, नारायण व्हटकर इत्यादी लेखकांनी दलितांच्या वेदना वेशीवर टांगण्याचा काही कथा व कादंबऱ्या लिहून प्रयत्न केला आहे. आक्रस्ताळेपणा, बिंभत्सपणा, भूक दारिद्रय यांच्या भोवती या लेखकांच्या कलाकृती फिरत असल्या तरी त्यांच्या तळाशी मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार ही जाणीव असलेली पहावयास मिळते.

**प्रश्न आणि समस्या :**

दलित साहित्यासंदर्भात विचार करताना प्रामुख्याने असे दिसते की बहुतांश पातळीवर दलित साहित्य हे एकसुरी साहित्य आहे. खरे तर पूर्वापार चालत आलेल्या व्यवस्थेत दलितांना मिळालेली सापत्न वागणूक हे त्याचे एक कारण असू शकेल. त्यामुळे चाकोरी बाहेर जाऊन धाडसाने एखादा निर्णय घेणे या समाजाला कदापि शक्य झाले नाही. उदा. दलितांच्या लहानपणी अशिक्षित स्त्रियांबरोबर झालेले विवाह त्यामुळे समग्र साहित्य प्रेमभावनेपासून अलिप्त राहिलेले साहित्य असे त्याचे स्वरूप दिसू लागते. भारतरत्न डॉ. बाबासाहेबाच्या विचारांनी प्रेरित झालेली पिढी शिकून पुढे नोकरीच्या क्षेत्रात स्थिरावत गेली. त्यामुळे शहरी संस्कृतीत मिळून मिसळून राहू लागलेल्या खेड्यातील दलितांना शहराच्या आकर्षणाबरोबरच खेड्याविषयीची आत्मीयता हळूहळू लयाला जाऊ लागली. चातुवर्ण्याधिष्ठित समाज व्यवस्थेत भोगलेल्या भीषण अमानूष जीवनप्रणाली पासून हा वर्ग पांढरपेशा संस्कृतीच्या दिशेने झेपावला जात आहे. तसे पाहता दलित साहित्याने प्रस्थापिता विरुद्ध आपल्या जाणिवा व्यक्त करायला सुरुवात केली परंतु त्या पाठीमागून पिढ्यांपिढ्यांचा आक्रोश हा या साहित्यातून उमटत गेला परिणामी आक्रोश, आक्रस्ताळेपणा यासारख्या प्रश्नांनी हे साहित्य मूळ प्रवाहापासून बाजूला गेल्या सारखे वाटू लागते. आणि केवळ आपल्यावरील अन्यायाचा पाढा ते वाचत असल्याचे दिसू लागते.

डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या शिका संघटित व्हा, संघर्ष करा या प्रेरणेचा भलेही शिक्षणातून प्रभाव जाणवत असला तरी ज्या चाकोरीतील जीवन दलितांनी आजवर अनुभवले ते जीवन टाकून एका नव्या सुजाण संस्कृतीचा स्वीकार म्हणावा तसा या समाजाने केलेला दिसत नाही.

मानवी जीवनात राजकारण या क्षेत्राला विशेष महत्त्व दिले जात आहे. राजकारण हा ज्याच्या त्याच्या अखत्यारातील प्रश्न आहे. परंतु दलितांमध्ये राजकीयदृष्ट्या निर्माण होणारे संघर्ष. समाजाच्या विकासाच्या दृष्टीने घातकच म्हणावे लागेल. गट तर गरीब श्रीमंत लहान मोठा, उच्च नीच या संकल्पनांना राजकारण खतपाणी घालीत असते. त्यात समतेची तत्त्वे बऱ्याचदा पायदळी तुडवली जातात. वर्ग आणि वर्ण भेद निर्माण होऊन समाजात दुफळी निर्माण होते. एकता, एकात्मता खंडित होऊन विरोधकांचे पारडे जड होते. परिणामी विकास खुंटत जातो हे राजकीय सूत्र दलित साहित्याने तपासून पहावे. आणि योग्य त्या विचारांची राजकीय विचारांची धारा आपल्या समाजात प्रसारीत करावी. अशी माफक अपेक्षा व्यक्त करणे मला वाटते. माझ्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्यानंतर देशाचे दारिद्र्य फारसे कमी होऊ शकले नाही. वेगवेगळ्या स्तवरावर वावरत असलेली विषमता कमी होण्या ऐवजी ती वाढतच गेली. दलित समाजाला घटनेने ज्या सोई आणि हक्क मिळाले तेही त्यांना निर्वेधपणे उपभोगता येत नाही.

अस्पृश्यतेच्या आगीत सोसाव्या लागणाऱ्या यातनेतून पुढे आलेल्या दलित साहित्याने असंघटित असलेल्या दलित वर्गाला संघटित करण्याचा प्रयत्न करण्याची गरजही मला वाटते महत्त्वाची आहे.

* * *

# समकालीन वास्तव व मराठी कादंबरी

–प्रा. डॉ. गणेश मोहिते

साहित्य हे समाजजीवनाचे प्रमुख अंग मानले जाते. साहित्याला समकालीन सामाजिक परिस्थितीतून आशयद्रव्य मिळत असते. सामाजिक बदल साहित्यातून अभिव्यक्त होत असतात. समाजातील समकालीन वास्तव साहित्यातून आविष्कृत केले जात किंवा तसा प्रयत्न करणारे साहित्यच वास्तवसन्मुख ठरते. परंतु सामाजिक वास्तव अधिक सशक्तपणे अभिव्यक्त करण्यासाठी लेखकाकडे प्रगल्भ सामाजिक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. हा दृष्टिकोन प्राप्त होण्यासाठी समाजाचे सखोल आकलन, चिंतन, समाजकारण, अर्थकारण, राजकारण यांना समजावून घेण्याची दृष्टी लेखकाकडे असणे महत्त्वाचे ठरते. सामाजिक, धार्मिक, राजकीय या घटकांच्या सरमिसळीतून 'सामाजिक पर्यावरण' आकारास येते. या भोवतालच्या पर्यावरणात अनेक व्यक्ती, अनेक प्रसंग, घटना, विविध कुटुंब, त्यांनी बनलेला समाज, त्या समाजाच्या धारणा, मूल्य संकल्पना, विविध प्रश्न, विविध जाती–जमाती, त्यातून उद्‌भवणारे ताणतणाव, जगण्याच्या विविध रीती, विविध प्रदेश, विशिष्ट भाषिक समाजाची संस्कृती, त्या मानवी समूहांच्या आकांक्षा, व्यक्तींची मानसिक, आत्मिक स्थिती, समूहाचे जगणे, त्यातले अभाव, दु:खे इत्यादी गोष्टी आकार घेत असतात.

व्यक्तींचा समूह म्हणजे समाज. या समाजात राहणाऱ्या व्यक्तींना अनेक प्रश्न भेडसावत असतात. व्यक्तिजीवनावर या प्रश्नांचा खोलवर परिणाम होत असतो. त्यातून त्याला सामाजिक परिमाण प्राप्त होत असते. लेखक हा समाजाचाच एक घटक असल्याकारणाने व या सामाजिक पर्यावरणातच त्याचा 'पिंड' तयार होत असल्याकारणाने व्यक्तींच्या भोवती असणाऱ्या वास्तवाचा गुंता त्याला अस्वस्थ करीत राहतो आणि याच वास्तवाला तो जेव्हा भाषिक अभिव्यक्तीतून प्रकट करतो तेव्हा त्यास कलात्मक मूल्य प्राप्त होते. हा अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखकाला विस्तृत भाषिक अवकाश असणारा 'कादंबरी' वाङ्मयप्रकार अधिक जवळचा वाटतो. म्हणूनच मराठी कादंबरीत सामाजिक वास्तवाची परंपरा मांडणारी परंपरा मोठी आहे असे दिसते.

बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन'पासून ते १९८० पर्यंत सामाजिक बास्तव अभिव्यक्त करणाऱ्या कादंबरीची चर्चा अनेक ग्रंथांतून झाली आहे.

म्हणून प्रस्तुत लेखात तो भाग टाळून १९८० नंतरच्याच सामाजिक कादंबरीला केंद्रस्थानी ठेवून विचार केला गेला आहे. या कालखंडातही सामाजिक वास्तवाला अभिव्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांची परंपरा मोठी आहे. समकालीन सामाजिक परिस्थितीचा विचार करता काही बाबी स्पष्टपणे जाणवतात. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे व्यक्तीच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या; परंतु स्वातंत्र्याच्या तीस वर्षांनंतर भारतीय समाजाच्या पदरी निराशाच पडली. त्यातून भ्रमनिरास वाट्याला आला. धर्म आणि जात या बाबींना राज्यघटनेने नाकारले असले तरी त्यावरून समाजात शोषण चालूच होते. आदिवासी, ग्रामीण समूहांपर्यंत अजूनही 'विकास' पोहोचला नव्हता. ग्रामीण समाजात तर विकासाऐवजी राजकारणाचा नुसता धुडगूस सुरू होता. देशाच्या विकासासाठी सहकाराचे धोरण स्वीकारले गेले; परंतु त्यालाही 'स्वाहाकाराचे' ग्रहण लागले. तळागाळापर्यंत शिक्षण प्रसार व्हावा या उदात्त हेतूने स्थापन झालेल्या शिक्षण संस्थांनी शिक्षणाचा बाजार मांडला. जनकल्याणाच्या विकासासाठी सरकारी योजना तयार झाल्या; परंतु भ्रष्ट शासनयंत्रणा आणि राज्यकर्त्यांमुळे त्यांचा लाभ समाजातील सर्व स्तरांतील लोकांपर्यंत पोहोचलाच नाही. प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त, दलितांचे, गरिबांचे, आदिवासींचे, निरक्षरांचे, स्त्रियांचे प्रश्न जसेच्या तसेच राहिले. या प्रश्नांतून समाजात अस्वस्थता निर्माण होऊ लागली. या अस्वस्थतेचा गैरफायदा राजकीय नेतृत्वाकडून धार्मिक, जातीय, भाषिक अस्मितेच्या नावाखाली उचलला गेला. साधारणत: या कालखंडाचा विचार करताना समाजजीवनात या काळात मोठ्या प्रमाणात बदलास सुरुवात झाल्याचेही दिसून येते. देशात घडलेल्या विविध सामाजिक, राजकीय घटनांनी समाजमन अस्वस्थ झाल्याचे दिसते. भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून पुढे येत असतानाच १९७५ साली इंदिरा गांधींनी राष्ट्रीय अणीबाणी देशावर लादून लोकशाहीच्या मर्यादा स्पष्ट केल्या. त्यातून व्यक्तिस्वातंत्र्याची जाहीररीत्या गळचेपी झाली. येथूनच पुढे हळूहळू भारतीय राजकारणात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. धार्मिक शक्तींचा उदय झाला. रामजन्मभूमी-बाबरी मशीद प्रकरणानंतर हिंदू-मुस्लीम दोन्ही धर्मात तेढ वाढत गेली. त्यातून देशाच्या विविध भागांत जातीय दंगली झाल्या. दहशतवाद वाढीस लागला. मूलतत्त्ववादाचा प्रसार जोमाने सुरू झाला आणि याचा परिणाम होऊन समाजजीवन अस्थिर बनत गेले.

१९९० नंतरच्या दशकात भारताने मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. १९९२ च्या खुल्या आर्थिक धोरणाने जागतिकीकरणाला भारतात प्रोत्साहन मिळाले. खाजगीकरण, उदारीकरणाचा काळ आला. समाजात या गोष्टींचे प्रतिकूल-अनुकूल असे दोन्ही परिणाम जाणवू लागले. चंगळवाद याच काळात मोठ्या प्रमाणात वाढीस लागला. त्यात दूरदर्शनचे रंगीत प्रसारण, देशी-विदेशी चित्रवाहिन्यांचे आगमन, संगणक-इंटरनेट, मोबाईल यांनी मन व्यापून टाकले. याचबरोबर या माध्यमांतून जाहिरातींचा पगडा निर्माण झाला. या जाहिरातींनी समाजजीवनात प्रचंड बदल घडवून आणला. आहार, पोशाख, जीवनशैली यात मोठ्या प्रमाणात समाजात बदल झाला. या नव्या वातावरणात अनेक परकीय कंपन्या भारतात आल्या. 'व्यक्ती'चे 'ग्राहका'त रूपांतर करणारा असा हा कालखंड ठरला, असे म्हणता येईल.

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक बाबतीतही या काळात मोठे बदल घडून आले, असे म्हणता येते. स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासासाठी सुरुवात करण्यात आलेल्या सहकार चळवळीचा बोजवारा उडाला. राजकीय नेते आणि भ्रष्ट अधिकारी यांच्या स्वार्थामुळे सहकारातून निर्माण होणाऱ्या ग्रामीण जीवनाच्या समृद्धीत मोठा अडसर आला. या चळवळीचा फक्त राजकीय स्वार्थासाठी वापर झाला. स्वातंत्र्यानंतर विविध प्रश्नांभोवती केंद्रित असणाऱ्या सामाजिक चळवळी या कालखंडात जवळपास निकाली निघाल्या. काही राजकीय पक्षांच्या आश्रयाला गेल्या. त्यामुळे राजसत्तेवरील सामाजिक अंकुश काही प्रमाणात या काळात नाहीसा झाल्याचे चित्र स्पष्ट आहे. सामाजिक समता व न्याय यासाठी मंडल आयोगाच्या शिफारशी या देशात स्वीकारण्यात आल्या. दलितांना, इतर मागासवर्गीयांना 'राखीव' जागा उपलब्ध झाल्या. त्यामुळे वंचितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास बळ मिळाले; परंतु सवर्णांच्या तोंडाला या आयोगाने पाने पुसली. जात उच्च असली तरी त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन काही निर्णय घेणे अपेक्षित होते; आजपावेतो तसे झाले नाही. त्यातून बहुसंख्य असणाऱ्या समाजातील गरिबांच्या मनात या काळात संतापाची लाट निर्माण झाली, ही बाब येथे नोंदवावीशी वाटते.

शेतकऱ्यांची, दलितांची, स्त्रियांची, आदिवासी समाजाची या नव्या भांडवली समाजवास्तवात दमछाक होऊ लागली. आर्थिक विषमता वाढीस लागली. शेती उद्योग तोट्यात गेला. शेतीवर अवलंबून असणारे घटक निकाली

निघाले. उत्पादन खर्चावर आधारित भाव न मिळाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला. पर्यायाने आत्महत्या करू लागला. शेतकऱ्यांविषयी आवाज उठविण्याचे कार्य जोरकस पद्धतीने शेतकरी संघटनेने केले; परंतु सत्तेअभावी शेतकऱ्यांचे राज्य निर्माण करणे तिलाही जमले नाही. त्यातून शेतकरी या राजकीय प्रक्रियेत दुर्लक्षिला गेला. दलितांचे, स्त्रियांचे, आदिवासींचे प्रश्न जैसे थे आहेत. दलित संघटना भ्रष्ट निघाल्या, नेते स्वार्थी झाले, आंबेडकरी विचारांना दूर सारून पोटभरू राजकारण करू लागले व त्यातूनच दलित समाज दिशाहीन झाला. आदिवासींच्या अनेक विकास योजना भ्रष्टाचारात अडकल्या. त्यामुळे हा समूह मुख्य प्रवाहापासून कोसो योजने दूरच राहिला.

या काळात आलेल्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग जवळ आले. देशात शहरीकरणाच्या प्रक्रियेने गती घेतली, तर दुसऱ्या बाजूला खेडी ओस पडू लागली. वाढती लोकसंख्या, पाणीटंचाई, मानवी मूल्यांची पडझड, सुशिक्षित बेकारी, मुक्त स्वातंत्र्याचा पुरस्कार, मानवाचे यंत्रात रूपांतर होणे, समाजातील काही मोजक्याच भांडवलदारी वृत्तीने जगाची सर्व सत्तासूत्रे ताब्यात घेणे, माणसांच्या मनाचे वेगाने दुबळे होत जाणे, प्रादेशिक पक्षांनी भाषा, धर्म, प्रादेशिक अस्मितेचे राजकारण सुरू करणे, अशा काही बाबी या काळाच्या अपत्य ठरतात. या पार्श्वभूमीवर १९८० नंतरच्या मराठी कादंबरीचे स्वरूप व आशयाचा विचार करता या काळात मराठी कादंबरी अनेक अंगांनी विकसित झाल्याचे दिसते. मराठी कादंबरी पूर्वसंस्कारातून चालत आलेल्या मध्यमवर्गीय जीवनचित्रणाच्या कक्षा ओलांडून दलित, आदिवासी, ग्रामीण, अलक्षित, वंचित, मुस्लीम समूहांच्या दैन्य, दुःख, दास्याला अभिव्यक्त करू लागली. तळागाळातल्या समाजातील शिकून पुढे आलेल्या लेखकांनी आपल्याच समाजाच्या वाट्याला आलेल्या दुःखाची अभिव्यक्ती केल्यामुळे या कलाकृतींना जाणिवांचे व जिवंत अनुभवांचे वास्तव परिमाण प्राप्त झाले. भालचंद्र नेमाडेंच्या प्रभावातून लिहित्या झालेल्या पिढीने देशीय भूमिका या काळात आपल्या लेखनातून दृढ केली; तर शाम मनोहर, विलास सारंग, रंगनाथ पठारे यांच्यासारखे प्रयोगशील कादंबरीकार नैतिकता, नवनैतिकता नावाची प्रवृत्ती कादंबरीतून आविष्कृत करू लागले. या काळाचे वैशिष्ट्य म्हणजे या काळात मोठ्या प्रमाणात कादंबरी लिहिली गेली. त्यात ग्रामीण व कृषिनिष्ठ जीवन अभिव्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. ग्रामीण कादंबरीच्या विकासाच्या सर्व खुणा या काळातल्या

कादंबरीत सापडतात.

समाजातील जिवंत वास्तव कवेत घेत असताना खेडे, खेड्यात वाढत चाललेले मूल्यभ्रष्ट राजकारण, शेती उद्योगाविषयीची उदासीनता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विविध बाजूंनी ग्रामीण समूहांचे होत असणाऱ्या शोषणाबरोबरच गावकुसाबाहेरील समाजजीवन, आदिवासी समूह, खेड्यातील स्त्रियांचे प्रश्न, खेड्यात नव्याने निर्माण झालेले वास्तव या कादंबऱ्यांतून अधिक प्रत्ययकारीरीत्या व्यक्त होत आहे. या काळात दलित कादंबरी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली असली तरी तिचे स्वरूप चरित्रवजाच आहे. दलित चळवळीवर भाष्य करणे आणि दलित नेतृत्वाचे चरित्र रेखाटने याच बाबतीत या काळातील दलित कादंबरी अडकल्याचे स्पष्ट जाणवते. दलित संकल्पनेशी अधिक जवळीक साधण्यात 'राघववेळ' कादंबरीचा अपवाद वगळता इतर दलित कादंबऱ्यांच्या तुलनेत दलितेतर लेखकांनी लिहिलेल्या दलित जीवनावरील कादंबऱ्या दलित जीवनाशी अधिक एकरूप होतात असे म्हणता येते.

याच काळातील महानगरीय कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ही कादंबरी महानगरीय समाजात राहणाऱ्या गरीब, मध्यमवर्गीय, झोपडपट्टीतील जीवनाचा सर्वांगाने वेध घेते; परंतु महानगरात राहणाऱ्या उच्चभ्रू वर्गाचे चित्रण मात्र या कादंबऱ्यांतून त्रोटक येते. म्हणून संपूर्ण महानगरीय वास्तव या कालखंडातील कादंबरीकाराला फारसे पकडता आले नाही असे नोंदवावे लागते.

१९७५ नंतर स्त्रीवादी चळवळीने स्त्रियांच्या स्वातंत्र्यासंबंधी अनेक प्रश्न उपस्थित केले. स्त्रीमुक्तीचा लढा तीव्र झाला. त्या परिणामातून स्त्रीवादी कादंबरी अवतरू लागली. स्त्रीजीवनाचा विविधांगी वेध घेण्याचा प्रयत्न या काळात कादंबरीतून करण्यात आला आहे; तरीही मध्यमवर्गीय स्त्रीचित्रणाच्या कक्षेतून स्त्रीवादी कादंबरी अजून बाहेर पडली आहे, असे म्हणता येत नाही.

या काळात राजकीय, ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक या कादंबऱ्या या कालखंडात पुष्कळशा निर्माण होत आहेत; परंतु साठोत्तरी कादंबऱ्यांच्या तुलनेत विश्वास पाटलांच्या कादंबरीलेखनाचा अपवाद वगळता वाचकप्रिय कादंबरी याही काळात निर्माण झाली नसल्याचे स्पष्ट दिसते. एकूणच सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक या जीवनाच्या विविध अंगांचा सखोल वेध घेणारी एकही कादंबरी या काळात निर्माण होऊ नये, ही बाब चिंताजनक वाटते. संख्येच्या दृष्टीने भरमसाट कादंबरी निर्माण होत असली तरी गुणवत्ता

उंचावलीच असे म्हणता येत नाही.

१९८० नंतरच्या कालखंडात ज्या कादंबऱ्या समाजजीवनाशी घट्टपणे नाळ जोडून आहेत, ज्या गुणात्मक उंची प्राप्त करून आहेत अशा कादंबऱ्यांचे विश्लेषण दुसऱ्या भागात करून या काळातील सामाजिक वास्तवाला स्पष्ट केले आहे.

साहित्याची समाजाशी बांधिलकी असते. समाजवास्तवाला वगळून खरे साहित्य निर्माण होऊ शकत नाही. याचीच प्रचिती या कादंबऱ्यांतून अभिव्यक्त झालेल्या समाजजीवनातील या वास्तवाला लक्षात घेतल्यानंतर येते. समाजात वावरणाऱ्या माणसाला भेडसावणारे हे रोजचे जीवन-मरणाशी संबंधित प्रश्न आहेत. या सगळ्याच प्रश्नांनी समाजात टोकदार रूप धारण केलेले आहे आणि या प्रश्नांचा समाजाच्या आरोग्यावर घातक असा परिणाम होत आहे. याच बाबींचा ठळकपणे निर्देश करताना या समकालीन काळातील कादंबऱ्या खऱ्या अर्थाने सामाजिक दस्तऐवज ठरलेल्या आहेत असे नोंदवता येते.

मराठी कादंबरीतून आलेले वास्तव या वरवरच्या स्वरूपात प्रकट होत नाही, तर समाजजीवनातील प्रश्नांच्या मुळाशी असणाऱ्या शोषक प्रवृत्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यात करण्यात आला आहे. या प्रश्नांमुळे मानवी जीवनाची झालेली वाताहत, माणसांच्या बदलत चाललेल्या वृत्ती-प्रवृत्ती, विविध सामाजिक समूहांच्या संस्कृती, आचार-विचार, प्रथा, परंपरा यांसह त्यांच्याच भाषेत कादंबरीकारांनी प्रकट केल्यामुळे या काळातील कादंबरीस सामाजिक परिमाण प्राप्त होते.

त्यानंतर नव्वदीच्या दशकात प्रकाशित झालेल्या कादंबऱ्यांचा विचार करण्यात आला आहे; कारण १९९१ च्या मुक्त आर्थिक धोरणाने भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. भारतात परकीय कंपन्यांचा संचार वाढला. जागतिकीकरणाने गती घेतली. सरकारने समाजहिताच्या बाबींतून अंग काढून खाजगीकरणाला प्रोत्साहन दिले आणि या सर्व बाबींचे बरेवाईट परिणाम समाजावर झाल्याचे स्पष्टपणे दिसून येऊ लागले. यातूनच समाजात काही नव्या प्रश्नांचा जन्म झाला. त्यात प्रामुख्याने अस्थिर राजकारणामुळे मूल्यभ्रष्ट राजकारण वाढीस लागले, राजकीय नेतृत्वाचे नोकरशाहीला पाठबळ मिळाल्यामुळे नोकरशाही भ्रष्ट बनली, शिक्षणाविषयी समाजात उदासीनतेचे चित्र निर्माण झाले, सुशिक्षित बेकारीचा प्रश्न प्रबळ बनून या काळात पुढे आला,

त्यातून स्पर्धा वाढली, शिक्षणक्षेत्रात भ्रष्टाचार वाढीस लागला, शिक्षणाचे बाजारीकरण झाले, विविध वाईट प्रवृत्तींचा चंगळवादी संस्कृतीच्या फोफावण्यातून उदय होऊ लागला. आधुनिक जीवनशैलीत स्वातंत्र्याच्या नावाखाली स्त्रियांच्या लैंगिक शोषणात वाढ झाली. आर्थिक, सामाजिक विषमता वाढीस लागली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढीस लागल्या. गरीब, वंचित, सर्वहारा वर्ग आणि श्रीमंतांमधील दरी वाढतच चालली. लोकशाहीचा फक्त डोलारा शिल्लक राहिला. त्यामुळे गेल्या साठ वर्षांत सरकार आणि लोकशाहीवरील सामान्य जनतेचा विश्वास उडाला. यांसारखे व्यामिश्रस्वरूपाचे वास्तव 'मेड इन इंडिया', 'निशाणी डावा अंगठा', 'बारोमास', 'ब्र', 'एसईझेड', 'बुझ्र्वागमन' या अलीकडच्या कादंबऱ्यांतून अधिक प्रभावीपणे व टोकदारपणे व्यक्त होऊ लागले.

या दशकातील कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे समाजजीवनातील कोणत्याही एका समूहाला त्या साकार करत नाहीत, तर समाजाचे सर्वांगीण चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करतात. अनेक सामाजिक प्रश्नांना त्या कलात्मकरीत्या अभिव्यक्त करतात. लोकशाहीवरील आदिवासी, दलित, गरीब, शेतकरी, शेतमजूर यांचा विश्वास उडाला व लोकशाही ही भांडवलदारांसाठीच आहे की काय? भांडवली सत्तेचे संरक्षण करणे हेच प्रमुख कार्य सरकारचे आहे काय? असे सामान्य माणसाला पडणारे प्रश्न कादंबऱ्या अतिशय प्रभावीपणे मांडतात. म्हणून या कादंबऱ्यांतून येणारे खलप्रवृत्तीचे 'पात्र' हे सरकार ठरते. एकूणच बदललेल्या समाजजीवनातील बदललेल्या सामाजिक वास्तवाला या दशकातील मराठी कादंबरी अधिक वास्तवरीत्या व समाजसन्मुख पद्धतीने अभिव्यक्त करीत आहे असे म्हणता येते.

१९८० नंतरच्या कादंबरीच्या वाङ्मयीन बाबींची चर्चा करता साधारणत: या कालखंडातील बहुतेक कादंबरी ही प्रयोगशील व स्वतंत्र अस्तित्व जोपासणारी आहे. प्रयोगधर्मी साहित्याच्या सगळ्याच खुणा कमी अधिक प्रमाणात या कादंबऱ्यांतून जाणवतात.

आशय, विषय, भाषा, शैली या रूढ कादंबरी संरचनेत ती प्रयोगशीलता जोपासताना दिसतेच; त्याचबरोबर काही नवे प्रयोगही या कालखंडातील कादंबऱ्यांतून घडत आहेत. 'गौतमची गोष्ट' या कादंबरीतून अनिल दामले यांनी केलेला पात्रनिर्मितीच्या बाबतीतील प्रयोग हा असाच वैशिष्ट्यदर्शक आहे.

'समूहनिष्ठता' हाही या काळातील कादंबऱ्यांचा महत्त्वाचा विशेष दिसतो. या कालखंडातील जवळपास सर्वच कादंबऱ्या विविध समूह घटकांना एकत्र एकसंधपणे अभिव्यक्त करताना दिसतात. त्याचबरोबर विविध 'सामाजिक प्रश्न' या काळातील कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी आढळतात.

विविध स्तरातील व्यक्तिचित्रणातून अनेक दुर्लक्षित माणसांच्या दुःखाला या कादंबरीने मुखर केले आहे. प्रसंग निवेदन, भाषा या बाबींना आशयरूपाशी एकसंध केल्यामुळे वाङ्मयीन-कलात्मकदृष्ट्या कादंबऱ्या सकस ठरल्या आहेत.

विविध प्रदेशांची बोलीभाषा, विविध व्यावसायिक बोली, लोकभाषेचा वापर, वाक्प्रचार व म्हणींची चपखल योजना, प्रतिमाप्रतीकांचा अतिरिक्त हव्यास नसणे, साधे,सरळ पण समाजजीवनाचे अंग मांडणारे वास्तव कथानक, लेखकांचे आत्मपर अनुभव या काही बाजू या कालखंडाच्या कादंबऱ्यांची उंची वाढवतात. त्याचप्रमाणे बोलीभाषेवर झालेला इंग्रजीचा परिणामही कादंबऱ्यांतून सहजपणे जाणवतो. एकूणच वाङ्मयीनदृष्ट्याही या काळातील कादंबरी सरसच ठरते.

एकंदरीत या कालखंडातील कादंबरी समाजसन्मुख व अधिक वास्तवाभिमुख झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. या कालखंडातील कादंबरीकारांचा विशेष म्हणजे ते कोणत्याही विचारसरणीशी बांधील राहून तिला कादंबरीतून मूर्तरूप देण्याचा प्रयत्न करतात असे वाटत नाही. शेवटी कादंबरी विचारप्रेरक असते, कोणता ना कोणता विचार देतच असते; पण कादंबरीची बीजे समकालीन घटना, व्यवस्थेतच आढळतात. या व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी ही कादंबरी आवाहन करते. शेतकऱ्यांचे प्रश्न, दलित, आदिवासी, मुस्लिम समाजाचे प्रश्न, निसर्गनिर्मित प्रश्न; शासन-प्रशासनाने निर्माण केलेले प्रश्न, या वास्तवाला अभिव्यक्त करून कादंबरी ठळकपणे

समकालीन जीवनाशी नाते दृढ करते. समकालीन जीवनाशय साकारते. काळाने निर्माण केलेल्या वास्तवाची विविध रूपे साकारता साकारता या व्यवस्थेच्या पाठीमागे असणाऱ्या शोषक प्रवृत्तींचाही कादंबरी शोध घेते. बोधवाद, कलावाद, अस्तित्ववाद, मनोविश्लेषण, वास्तववाद यासारख्या साठोत्तरी वाङ्मयीन प्रवृत्ती टाकून या कालखंडातील कादंबरी देशीपणाची वा भूमीनिष्ठ भूमिका दृढ करताना आढळते.

ग्रामीण, दलित, आदिवासी, उपेक्षित, भटके, नक्षलग्रस्त, धिर्यी

यासारखे सामाजिक घटक अभिव्यक्त करून 'मध्यमवर्गीय' परिघाच्या बाहेर या कालखंडातील कादंबरी पडलेली दिसते. आशय, शैली, भाषा, तंत्र याबाबतीत विविध प्रयोग जरी करीत असली तरी प्रायोगिकतेसाठी 'आशया'कडे कादंबरीत दुर्लक्ष केले जात नाही. दैववाद, जातीयता, धर्मांधता, अंधश्रद्धा, शोषणाच्या विविध परंपरा, मूल्यहीनतेचे दर्शन, शिक्षणातील अपप्रवृत्ती या बाबी कादंबरीचा आशय समृद्ध करत आहेत. तरीही जागतिकीकरणाचे खरे रूप, मूलतत्त्ववाद, मानवी एकाकीपणा, बाजारू व्यवस्थेत माणसाचे स्थान, सांस्कृतिक, भाषिक वैविध्य नष्ट होणे, येऊ घातलेला नवा वसाहतवाद, भांडवलशाहीचे विनाशकारी रूप, विविध राजकीय प्रवृत्ती, यांसह मानवी संबंधाचे तुटलेपण, या बाबी समकालीन कादंबरीत येणे महत्त्वाचे वाटते. या पार्श्वभूमीवर या कालखंडातील कादंबऱ्यांतून समकालीन वास्तव अधिक चांगल्या पद्धतीने व्यक्त झालेले दिसते. या काळातील अनेक कादंबरीकार आत्मपर लेखन करतानाच आढळतात. म्हणून समाजातील एककेंद्री अनुभव मांडून कादंबरीकारांनी थांबणे हिताचे ठरणार नाही. बहुपेडी, बहुकेंद्री अनुभव आणि समकालीन वास्तवातील गुंतागुंत मराठी कादंबरीला अधिक ताकदीने सामावून घेऊन कलात्मक पातळीवर उभी करता आली पाहिजे असे नोंदवावेसे वाटते आणि तशी शक्यता व अपेक्षांची क्षितिजे या कादंबरीने निर्माण केली आहेत.

एकंदरीत महाराष्ट्रीय समाजजीवनातील विविधांगी समाजवास्तवाला दुसऱ्या शतकातील कादंबरी पृथगात्मकरीत्या अधोरेखित करते, आपल्या सामाजिक आकलनाचा परीघ वाढवते. त्यातल्या त्यात जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या ग्रामजीवनातील प्रश्नांना ती अजून नीटपणे मुखर करू शकली नाही. एकूणच तिला 'सामाजिक गतिकी' असे संबोधले जाते. ती गतिकी आणि त्यातून निर्माण होणारे गतिशील समाजवास्तव या कादंबऱ्यांतून पुरेसे प्रकट होत नाही. मात्र त्या दिशेने त्यांची सुरू असलेली वाटचाल निश्चितच स्वागतार्ह आहे. असे गतिशील समाजवास्तव कवेत घेऊन कलात्मक दर्जा उंचावणाऱ्या कादंबरीची या कादंबऱ्यांनी वाट मोकळी केली आहे, असे म्हणता येईल.

* * *

# ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता–
# सद्यस्थिती आणि उपाय

–प्रा. दीपक बोचरे

आपली भारतीय संस्कृती खूप महान आहे. या थोर परंपरेत थोर गुरू शिष्याची परंपरा पहावयास मिळत होती याच थोर भारतीयांनी संपूर्ण जगाला ही देगणी दिली होती. कौटील्य, पाणिनी, आर्यभट्ट, चाणक्य ही नावे केव्हाच विसरलो आहोत. नालंदा तक्षशीला ही आमच्या भारतीयाची जगभर प्रसिद्ध विद्यापीठे त्या काळी होती. त्याच भरत वर्षामध्ये २१ व्या शतकात वाटचाल करत असताना आम्हाला ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता सद्यस्थिती आणि उपया याबाबत चर्चा करावी लागते ही अतिशय खेदाची गोष्ट आहे.

कित्येक वर्षे झाली तो सूर्य नभी येऊनी अजूनही दऱ्या खोऱ्यात अंधार दाटतो आहे. अशी आमची आजची व्यथा आहेत. तर दुसरीकडे शासकीय शैक्षणिक संस्थाचा शैक्षणिक दर्जा खालावत आहे. परंतु मला असा प्रश्न पडतो. इ.स.पु. ५, ६ वे शतक आणि इ.स.नाच्या नंतर १० व्या शतकापर्यंत कुठे इंग्रजी भाषेचे शिक्षण होते. तरी आमची ज्ञानलालसा संपूर्ण जगाने पाहिली त्याच राष्ट्रामध्ये शैक्षणिक गुणवत्तेची चर्चा व्हावी ही अतिशय खेदाची गोष्ट आहे.

Teacher is a social Engineer च्या प्रमाणे शिक्षक हा सामाजिक अभियंता आहे तो आपल्या आचार विचारामधून समाजाची जडण घडण करतो. समाजात नीतीमूल्यांचे बीज पेरून त्याचे वटवृक्षात रूपांतर करत असतो. त्यातूनच चारित्र्य संपन्न समाजाची निर्मिती होत असते याच शिक्षकाला जर आम्ही अनेक शासकीय विविध कामामध्ये गुणवंत असू तर अशा शिक्षक गुरू करून कुठल्या चांगल्या कामाची आपेक्षा बाळगावी! शासनाच्या विविध योजना ह्या खरोखर चांगल्या आहेत. आता सुरू असलेली सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शालेय पोषण आहार योजना ही एक परंतु यासाठी शिक्षक गुरूंना गॅस आणण्यापासून तर आहारातील प्रत्येक पदार्थ्याचा ग्रॅममध्ये हिशोब ठेवता ठेवता नाकीनऊ येतात. तेव्हा या गुरुजींकडून आदर्श ज्ञानदानाची अपेक्षा ठेवणे कितपत योग्य आहे. परंतु हाच शिक्षक 'जेव्हा मी हे करू शकेन' हे मला केलेच पाहिजे त्याप्रमाणे काम करेल केव्हा शिक्षणात बदल दिसून येईल.

शिक्षण व्यवस्थेत मुल महत्त्वाचे आहे.
मुलासाठी शिकण्याचे शाळा केंद्र आहे.
मुलांचे अध्ययन हे प्रथम प्राधान्य आहे.

परंतु आज ग्रामीण शैक्षणिक गुणवत्ता ढासळत असलेली आपण पाहतो, भारतीय तत्त्वज्ञानाला उपनिषदाचा आधार प्रश्न आहे. प्रश्नातून ज्ञानाचा उगम झाला. न्युटन एडिसन ग्रॅहमबेल, गॉलिलिओ अशा शास्त्रज्ञानी लावलेले शोध त्यांच्या जिज्ञासा वृत्तीमध्ये आढळते. प्रश्न विचाराना गती देतो, समस्या निवारण्यासाठी 'वादे वादे जायते तत्वबोधा:'! हाच मार्ग स्विकारावा लागतो परंतु आपण सर्वजण या विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती निर्माण करण्यास कमी पडतो आहोत हीच खरी समस्या आहे. अशा प्रकारे आजची ग्रामीण भागातील सद्यस्थिती आहे.

'भुतकाळातील दु:ख विसरुन
भविष्य उज्वल बनवायच असत
सर्व तुफानांना तोंड देवून
किनाऱ्याला जिद्दीन पोहोचायच असत'!

हा विचार सतत प्रत्येकाच्या मनामध्ये असला पाहिजे परंतु आज ग्रामीण भागात अप्रगत विद्यार्थी, सतत गैरहजेरी, प्रौढ निरक्षरांचे प्रमाण जास्त आहे आणि त्याचे मूळ कारण हे आपल्या सामाजिकतेमध्ये आणि शैक्षणिक प्रक्रियेमध्ये आहे असे मला वाटते म्हणून तर शासनाला मोफत आणि सक्ताचा बालशिक्षणाचा कायदा करावा लागला. परंतु कायदा करून कोणत्याही समस्येचे मुळापासून निराकरण करता येणार नाही असे मला वाटते, खेड्यातील शाळेत ज्ञानदान करत असतांना खालील सद्यस्थिती समस्या नियमितपणे अनुभवण्यास मिळतात.

- विद्यार्थी शाळेत हजर राहात नाही.
- मुलीना घरकामासाठी घरी ठेवणे.
- आई वडील रोजगारासाठी ६-६ महिने घराबाहेर असणे.
- घरातील वातावरण व्यसनाधीन असणे.
- घरात शैक्षणिक वातावरण दूरच परंतु रोजच्या भाकरीचा प्रश्न मुलासमोर असणे.
- शाळेत येण्यासाठी रस्त्याच्या प्रश्न असणे.

अशा कितीतरी अनेक महत्त्वाच्या गंभीर समस्या आणि सद्यस्थिती आहे ही सद्यस्थिती आणि समस्या दूर करायच्या असतील तर मला वाटते कायदा करून किंवा शिक्षकांवर दडपण आणून ही परिस्थिती बदलणार नाही.

**विद्यार्थी भुमिका :-**

- विद्यार्थीदशेत असेपर्यंत नियमित शाळा विद्यालयात हजर राहणे लेखी, गृहकार्य वेळच्या वेळी पूर्ण करणे.
- अध्ययन केलेले घटक उपघटकाचे गृहपाठ म्हणून लेखन वाचन मनन करणे.
- मुल्यमापन पद्धतीनुसार प्रामाणिक परीक्षा देणे प्रगती करण्याचा प्रयत्न करणे.
- श्रवण लेखन ममन या त्रिसूत्रीच्या अवलंब करणे.

**समाज व पालक भूमिका :-**

- आपल्या पाल्यास नियमित शाळेत पाठवणे.
- पाल्यास शाळापुरक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे. (उदा. पुस्तक, वही, पेन, गणवेश, इतर)
- स्वत: कोणतेही व्यसन करु नये व आचरण शुद्ध ठेवावे.
- ग्रामसभेत तसेच ग्रामशिक्षण समितीच्या सभेत हजर राहून आपल्या शैक्षणिक प्रश्नावर चर्चा घडवून आणणे.

**शिक्षक भूमिका :-**

आचार्य देवो भव याप्रमाणे समाज शिक्षकास देवदेवतांचे स्थान देतो त्यानुसार शिक्षकाने आपल्या देवस्वरूपास तडा जाणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. शिक्षणकार्यातील महत्त्वाचा घटक की ज्याच्यावर संपूर्ण यंत्रणा अवलंबून आहे. अर्थात आचार्यानी ज्ञानदानातील कौशल्य विद्यार्थ्यांचे वात्सल्य व सामाजिक मांगल्य या त्रिसूत्रीचा संगम योग्य प्रकारे करावा.

- दिलेली शैक्षणिक कामे प्रामाणिकपणे आचार संहितेचे पठण करून पूर्ण करावेत.
- शालेय समस्या संस्था शासन व समाज यांच्या सद्विचाराने व एकमेकांच्या सहकार्याने सोडविणे.

- शाळा पूरक उपक्रमाची अंमलबजावणी परिणामकारक करून आपल्या समस्या व अडचणी विधायक मनाने योग्य अधिकाऱ्यापर्यंत पोहचणे.

**शैक्षणिक संस्था भूमिका :-**

- सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा विद्यालयात उपलब्ध करून देणे.
- योग्य शैक्षणिक पात्रतेचे व उत्कृष्ट गुणवत्तेचे शिक्षक नियुक्त करणे.
- शिक्षण सारख्या क्षेत्रात डी.एड्. बी.एड्. शिक्षक नियुक्त करतांना देणगी (रेट) ठरवून शिक्षक भरती करू नयेत.
- संस्थेतील कर्मचाऱ्यांची वेळोवेळी सभा घेऊन त्यांच्या समस्या सोडवणे शिक्षक पालक व संस्था सदस्याच्या समस्यासाठी सभेचे आयोजन करणे व विविध मुद्याची चर्चा करणे.
- सुसज्य ग्रंथालयाची निर्मिती करणे.

वरील सर्व घटकांनी एकत्र येऊन एकमेकांवर विश्वास दाखवून आपआपल्या भूमिका पार पाडल्यास ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता सद्यस्थिती आणि उपाय विषयाची चर्चा करणे दुरच पण. Mah. Is the rational animal असे म्हणून Thinking is the Betiuuing every thing असे मानावे लागेल. शिक्षण एक आनंदायी प्रवास झाला पाहिजे. शिक्षण एक स्पर्धा न होता आंतर उर्मीचा विकास शिक्षणात घेणे आवश्यक आहे. धोका आणि शिका असे न होता सर्वांसाठी शिक्षण आनंदायी शिक्षण होईल मग हळूच आत्मविश्वासाच्या

पावलांनी कोणीतरी आनामिक चेहरा येईल आणि म्हणेन
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा,
पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा !

हे शब्द कानी पडल्यावर असे वाटेल 'धावे त्याला शक्ती येई' आणि मार्ग सापडे म्हणून तर हे जीवन सुंदर आहे ते अधिक सुंदर करायला हवे यासाठी या जगण्यावर शतदा प्रेम करावे जीत जायेंगे हम तुम अगर संग है * म्हणूनच या शिक्षक बनून विद्यार्थी दशेत जगण्यावर शतदा प्रेम करावे.

* * *

# दीक्षाभूमी : सामाजिक, धार्मिक, साहित्यिक चळवळीचे प्रेरणास्त्रोत

–डॉ.भास्कर शेळके

डॉ.बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तीने आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विचाराने २० व्या शतकाच्या मध्यावर भारतीय लोकशाही पर्व सुरू होण्याच्या उंबरठ्यावर एक धार्मिक बंड केले. तो दिवस म्हणजे १४ ऑक्टोंबर १९५६ हा दिवस भारतीय इतिहासात सुवर्ण अक्षरात कोरून ठेवण्यासारखा आहे. यादिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माशी फारकत घेऊन भूमिपूत्र भगवान गौतम बुद्धांनी २५०० वर्षापूर्वी स्थापन केलेल्या बौद्ध धर्मात प्रवेश केला. या धम्म स्वीकारामुळे सगळा देश खडबडून जागा झाला.

प्रस्थापित समाजव्यवस्थेत दीनदलितांवर सतत अन्य, अत्याचार होत होता. या अन्यायाविरुद्ध प्रतिक्रिया म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायासह बुद्ध धम्मात केलेला प्रवेश होय. कारण जगाच्या पाठीवर असा एकमेव धर्म आहे, तो म्हणजे बुद्ध धर्म. ज्या धर्मात मोक्ष, कर्म, आत्मानर्क, स्वर्ग, ईश्वर या संकल्पना नाहीत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्मात प्रवेश करुन आपल्या बांधवांना पुन्हा एकदा माणूस म्हणून जगण्याचे बळ प्राप्त करून दिले. मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. ही उक्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वास्तवात उतरवली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या या कृतीने सर्वांनाच अंतर्मुख केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक भूमिकेमुळे हिंदू धर्मालाच सुरुंग लावल्यासारखे झाले. पण ती काळाची गरज होती. कारण हिंदू धर्मात दीनदलितांना माणुसकीचे हक्क नाकारले होते. सम्यक क्रांतीपासून दूर ठेवले होते. डॉ.बाबासाहेबांच्या कृतीमुळे, भगवान गौतम बुद्धांना अपेक्षित असलेली सम्यक क्रांती घडवून आणता आली. १४ ऑक्टोंबर १९५६ च्या धर्मक्रांतीमुळे दलितांना त्यांच्या सोयी सवलतीपासून मुकावे लागले पण जगण्यासाठी आवश्यक असलेली उर्जा मात्र प्राप्त झाली.

या धर्मांतराची बीजे आपणाला १९२७ साली झालेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात शोधता येतात. हा सत्याग्रह केवळ चवदार तळ्याचे पाणी

मिळविण्यासाठीचा नव्हता तर अस्पृश्य बांधवांना ज्या प्रस्थापित व्यवस्थेने सार्वजनिक क्षेत्रात नाकारले होते. त्या व्यवस्थेविरुद्धची एक स्वाभाविक प्रतिक्रया होती. एवढेच नव्हे तर हिंदू समाजातील सामाजिक विषमतेला जबाबदार असलेल्या मनुस्मृतीचे दहन करून आपले न्याय व समतेच्या हक्काची चळवळी अधिकतर तीव्र केली. दलितांना सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी भरण्यास जसा मज्जाव होत होता तसाच प्रकार मंदिर प्रवेशाबाबतच होता. दलितांना हिंदूची मंदिरे बंद केली होती.

म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हजारो अनुयायांसह २ मार्च १९३० ला नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेशासाठी सत्याग्रह केला. सामाजिक हक्कांबरोबरच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या राजकीय हक्काबाबत ही जागृती केली. मतदानाचा हक्क, कायदेमंडळात प्रतिनिधित्त्व व शासनात सहभाग याबाबी त्यांनी पुणे कराराद्वारे साध्य केले. दलितांच्या सामाजिक, शैक्षणिक, प्रगतीसाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. शिक्षणासाठी बहिष्कृत शिक्षण मंडळ स्थापन केले. दलितांना सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्य करण्यासाठी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. जनता, मूकनायक, बहिष्कृत भारत या पत्रकांद्वारे समाजात नवजागृती घडवून आणण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले. डॉ.बाबासाहेबांच्या लक्षात आले की आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत. प्रस्थापित व्यवस्थेपुढे हात पसरण्यात काही हशील नाही. कारण हिंदू धर्मात मिळणारी विषमतेची वागणूक थांबत नव्हती आणि म्हणूनच भगवान गौतम बुद्धांच्या अत दीप भव या ब्रीद वाक्याची कृतिशीलपणे दखल घेतली. शेवटी हिंदू धर्माचा त्याग करावा असे त्यांना वाटले. बुद्ध धम्मात प्रवेश करायचा हे बाबासाहेबांनी पक्के ठरविले होते. नाशिक जिल्ह्यातील येवले मुक्कामी डॉ.बाबासाहेबांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली होती. तब्ब्ल २१ वर्ष बाबासाहेबांनी जगातील विविध प्रमुख धर्माचा अभ्यास करून विचारपूर्वक आणि जाणीवपूर्वक हिंदू धर्मातील विषमतेच्या वागणुकीला कंटाळून बुद्ध धम्मात प्रवेश केला.

या बुद्ध धम्म क्रांतीमुळे दलितांचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आर्थिक आणि राजकीय जीवन ढवळून निघाले. देव, दैव, नशीब, कर्म, पूर्वजन्म, पाप-पुण्य, पुनर्जन्म, शाप-वरदान, अवतार, चमत्कार, मध्यस्त, पुरोहित ह्या सगळ्या मागण्या मनाला ग्रासणाऱ्या व पूर्ण हतबल करणाऱ्या,

अतींद्रिय-अतार्किक घटकांच्या अदृश्य धाकाचा गडंद पडदा, टराटरा फाटला. माणसे एकदमच बदलून गेली. तीर्थयात्रा देवधर्म, पूजापाठ, तुळशीला पाणी, दगडांना शेंदूर फासणे, स्मशानात जाऊन दहीभातांचा शिडकाव करणे, वेगवेगळे उपसा करणे ह्या अवघ्यातून समाज बाहेर पडला. (धर्मांतराचे अर्धशतक पृ. ६९, ७०) ईश्वर संकल्पना नाकारली गेली. दलितांना आत्मभानातून आत्मसन्मानाची जाणीव झाली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या नाऱ्याने दलित समाज झपाटून गेला. सवर्णांच्या बरोबरीनेच नाहीतर एक पाऊन पुढे टाकले जाऊ लागले. याचे प्रत्यंतर आजही आपणास पहावयास मिळत आहे आणि मिळणार आहे.

धर्मांतरानंतर काही काळातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ ला महापरिनिर्वाण झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, मी सारा भारत देश बुद्धमय करून टाकीन परंतु काळाने त्यांच्यावर घाला घातला आता तमाम बौद्ध धर्मीयांची ती जबाबदारी आहे की, धम्म घरा-घरात गावागावात आणि देशादेशात पोहचविणे होय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान गौतम बुद्धाच्या प्रेरणेतून बौद्ध बांधवांमध्ये महाकाय बदल घडून आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतूनच शैक्षणिक चळवळी उभारल्या, सामाजिक चळवळी उभारल्या गेल्या. दलित समाज शिकला-सवरला प्रस्थापित समाजव्यवस्थेला त्याची दखल घेणे भाग पडले वेगवेगळ्या राजकीय, सामाजिक चळवळीतून दलित पँथरची स्थापना झाली. दलित बांधवाना सरकारी-दरबारी संधी उपलब्ध झाली. हा सर्व पराक्रम म्हणजे भारतीय राज्य घटनेतच बाबासाहेबांनी करुन ठेवलेल्या तरतुदी, कारण स्वातंत्र्य  समता-बंधुभाव आणि मानवता या मूल्यांची पेरणी बाबासाहेबांनी घटनेच्या पानापानात केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या प्रेरणेतून दलित साहित्यप्रवाहाची निर्मिती झाली. प्रस्थापित मराठी साहित्याला आलेली मरगळ दूर करून दलित साहित्याने एक वेगळा ठसा भारतीय साहित्याच्या पटलावर उमटविला. प्रस्थापित साहित्यात देवांदिकांचे राजे-महाराजे यांचेच चित्रण होते. परंतु दलित साहित्याने सामान्यातला सामान्य माणूस विश्वाच्या केंद्रस्थानी आला. दलित साहित्यिकांनी हे सिद्ध केले की, दलित साहित्य हेच खरे भारतीय साहित्य आहे. खरे देशी साहित्य आहे. कारण या साहित्याचा प्रेरणाकर्ता भगवान गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या भारत मातेचे खरे भूमिपूत्र आहेत. कारण बुद्धांनी जन्म घेतला

भारत भूमीत त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. भारत भूमीत आणि त्यांच्या ज्ञानाचा प्रसार केला त्यांनी या भारत भूमीत अगदी त्याच पद्धतीने डॉ.बाबासाहेबांनीही कार्य केले. आपल्या ज्ञानाचा वापर त्यांनी येथील दलित बांधवासाठी केला. म्हणून असे प्रकर्षाने जाणवते की दीक्षाभूमीवरील (नागपूर) धर्मांतरामुळेच दलितांना मुक्त श्वास घेता आला. त्यांना माणूस म्हणून हक्क मिळाले. धर्मातरामुळेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि वास्तव जीवनात मानवतेचे हक्क प्राप्त झाले.

: अत् दीप् भव :

* * *

# ग्रामीण व दलित कादंबरीलेखनातील स्त्री साहित्यिकांच्या अत्यल्प योगदानाचा स्त्रीवादी मागोवा

–प्रा. शोभा नितर

यूनोने १९७५ हे जागतिक स्त्रीवर्ष म्हणून जाहीर केल्यानंतर स्त्री–मुक्ती, स्त्री–अभ्यास, स्त्रीवाद अशा विषयांचा उहापोह होऊ लागला. महत्त्वाचे म्हणजे हा कालखंड स्त्रियांच्या जाणीवजागृतीसाठी महत्त्वाचा ठरला. विविध क्षेत्रात स्त्रियांना संधी मिळू लागली आणि त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापनही होऊ लागले. इतिहास, राजकारण, समाजकारण, विज्ञान, ललितकला, साहित्य इ. अनेक क्षेत्रातील स्त्रियांच्या कार्याची मिमांसा केल्यावर महत्त्वाचे निष्कर्ष हाती येऊ लागले. या सर्वांमधील एकसूत्रता म्हणजे एकूणातील ५०% असलेल्या स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान! कोणत्याही क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान अभ्यासताना भोवतालचे समाजवास्तव त्यांच्या भूमिका निश्चित करते, असे दिसते. साहित्यक्षेत्रातील स्त्रियांबाबतही याचा विचार करावा लागेल.

'मराठी कादंबरी – चिंतन आणि समीक्षा' या ग्रंथात मार्क्सवादी समीक्षेची मांडणी करताना चंद्रकांत बांदिवडेकर यांनी ख्रिस्तोफर कॉडवेलचे विचार मांडले, ते असे, 'साहित्य आणि कला यांची निर्मिती समाजसापेक्ष असल्यामुळे प्रत्येक युगातील किंवा समाजाच्या अवस्थेतली साहित्यसंपदा तत्कालिन समाजाच्या व काळाच्या मर्यादा व शक्ती यांनी नियंत्रित असते. त्याचप्रमाणे समाजाला नियंत्रित किंवा संचालित करणारी आर्थिक व्यवस्था आणि साहित्य यांचा संबंध अतूट असा असतो.'

विशेषत: दलित आणि ग्रामीण या संज्ञाच मुळात समाजसापेक्ष आहेत. जात–वर्ण–वर्ग यांवर आधारलेली मूल्यव्यवस्था त्यांना आकार देते. दलित साहित्यातून वर्णव्यवस्थेविरुद्धची जाणीव प्रकट होते, तसेच आर्थिक पिळवणूकीविरुद्धची बंडखोरीही व्यक्त हेते. दलित साहित्य सामाजिक समतेची आकांक्षा हे ध्येय प्रकट करते. ग्रामीण समाजाचे बहुसंख्य प्रश्न हे जातिव्यवस्थेने व अर्थव्यवस्थेने निर्माण केलेले आहेत. अठरा पगड व्यावसायिक व दलित मानल्या गेलेल्या असंख्य जातीजमाती आणि कृषी–संस्कृतीशी बांधलेले असे हे जीवन आहे. अशा समाजव्यवस्थेतील व अर्थव्यवस्थेतील ग्रामीण व दलित

स्त्रियांचे स्थान काय याचा गांभीर्याने अभ्यास केल्याखेरीज त्यांच्या लेखनप्रक्रियेवर भाष्य करणे योग्य ठरणार नाही.

**स्त्री–साहित्यिकांची ग्रामीण कादंबरी :–**

ग्रामीण जीवन आजही कृषिकेंद्रित आहे. ग्रामीण स्त्री या शेतीनिष्ठ जगण्यात पूर्ण गुंतलेली आहे. इंधन–पाण्यासाठी, स्वयंपाक–कुटुंबाच्या देखभालीसाठी बचत करणारी ही स्त्री शेतातही दिवसभर खपते. लहान–सहान भाजीपाला पिकवून रोजचा घरखर्चही भागवते. ग्रामीण स्तरावरील इतर व्यावसायिकांनाही कुटुंबातील स्त्रियांची मोठी मदत असते. कुटुंबाच्या आर्थिक मिळकतीत नेटाने भर घालताना निर्णयप्रक्रियेत आणि महत्त्वाच्या आर्थिक व्यवहारात तिला स्थान नाही. रुढी–परंपरांचे जोखडही तिच्याच मानेवर आहे. ते व्यवस्थित पेलले तरच ती मर्यादशील 'लक्ष्मी' आहे. तिच्या घडणीत शिक्षण नाही तर 'लग्न' महत्त्वाचे आहे. स्वतःकडे कनिष्ठ दर्जा घेऊन जोडीदाराला 'मालक' समजून ती वावरते. या जगण्यात आनंदापेक्षा दुःखं–वेदना अधिक आहेत. ग्रामीण स्त्रीची प्रतिभा कष्टतानाच गाण्यांतून, ओव्यांतून व्यक्त होत राहते. आज शिक्षणाने थोडी धीट झालेली ग्रामीण स्त्री कवितेच्या सूचक भाषेतून विचार मांडते, कथेच्या माध्यमातून बोलते. पण आजच्या कादंबरी–लेखनास जी बंडखोरी आणि अवकाश लागतो, तेवढा तिच्याकडे नाही. तरिही ग्रामीण स्त्री कादंबरी लेखनाचे जे काही मोजके प्रयत्न झाले तेही महत्त्वाचे आहेत. समीक्षकांनी त्याची महत्त्वपूर्ण दखल घ्यायला हवी. अतिसंवेदनशील रोपटं प्रतिकूल वातावरणात रुजविण्याचाच हा प्रकार आहे.

'विशाल स्वरुपात नसली तरी स्त्रियांची एक परंपरा ग्रामीण साहित्याला लाभली आहे' असं आनंद यादव म्हणतात. ही परंपरा शोधताना बहिणाबाई चौधरी, सरोजिनी बाबर, अनुराधा गुरव आणि प्रतिमा इंगोले यांचा उल्लेख ते करतात. या चौघींपैकी कादंबरीलेखन केवळ प्रतिभा इंगोले यांनीच केले आहे. त्यांची बुढाई (१९९९) ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. प्रतिभा इंगोले यांचे कथासाहित्यातील योगदान मोठे आहे. त्यांचे कादंबरीलेखनही प्रभावी ठरले आहे. वऱ्हाडी लोकजीवनाची पार्श्वभूमी या कादंबरीला लाभली आहे. 'बुढाया' म्हणजे भेगा. भेगाळलेली जमीन हे माणसाच्या आयुष्याचे प्रतीक म्हणून लेखिकेने वापरले आहे. पूर्वी एकसंध असणाऱ्या पण आज भेगाळलेल्या ग्रामजीवनाची मांडणी या कादंबरीत आहे. वऱ्हाडी बोलीभाषा, संवाद,

लोकसंस्कृतीशी निगडीत म्हणींचा वापर इ. मुळेही कादंबरी लक्षणीय ठरली आहे. मधु सावंत यांचेही नाव मराठवाड्यातील पहिल्या स्त्री ग्रामीण कादंबरीकार म्हणून लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. त्यांच्या 'राहुकेतू' आणि 'जिनगानी' या स्त्री कादंबऱ्या लक्षणीय आहेत. ग्रामीण भागातील विधवा, परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न त्यांनी आपल्या कादंबरीलेखनातून मांडले आहेत.

**मान्यवर लेखिकांच्या कादंबरीतील ग्रामीणता :-**

ग्रामीण, प्रादेशिक पार्श्वभूमी लाभलेल्या वरील दोन स्त्री कादंबरी-कारांव्यतिरिक्त काही मान्यवर लेखिकांनी ग्रामीण चित्रण आपल्या कादंबरीलेखनात केले आहे. त्यांचाही मागोवा घेणे महत्त्वाचे ठरते. १९५० साली आलेल्या विभावरी शिरुरकरांच्या 'बळी' या कादंबरीचा उल्लेख समीक्षकांनी ग्रामीण कादंबरी म्हणून केला आहे. गुन्हेगार म्हणून घोषित झालेल्या मांगगारोडी समाजाच्या जीवनाची शोकान्तिका विभावरी शिरुरकरांनी मांडली आहे. दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तीरावर' ही ग्रामीण चित्रण करणारी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. शांता शेळके यांनीही विपुल कादंबरीलेखन केले आहे. त्यांपैकी विझती ज्योत (१९४६), ओढ (१९५०), माझा खेळ मांडू दे व मायेचा पाझर या ग्रामीण पार्श्वभूमीवरील कादंबऱ्या आहेत. 'ओढ' मधून ग्रामीण भागातील कोष्टी समाजाचे कोटुंबिक व सामाजिक जीवनचित्रण येते. 'माझा खेळ' मधून शिक्षणाचा अभाव आणि निष्क्रियता यांमुळे मावशीच्या घराची खालावलेली स्थिती त्या दर्शवितात. 'मायेचा पाझर' मधून बापू व मंजूळा यांच्या प्रेमकथेतून खेड्यातल्या माणसांचे सच्चेपण चित्रीत केले आहे. या लेखिकांच्या ग्रामीण कांदबऱ्यांमध्ये बळी आणि बुढाई या कादंबऱ्यांची समीक्षकांनी विशेष दखल घेतली आहे. साहित्यप्रांतात महत्वाची भूमिका बजावलेल्या या लेखिकांनी साहित्य लेखनाला गांभीर्यपूर्ण स्थान त्यांच्या आयुष्यात दिलेले आहे.

**स्त्री साहित्यिकांच्या कादंबरीतील दलितत्त्व :-**

दलित स्त्रीजीवनालाही ग्रामीणतेचा स्पर्श आहे. ग्रामीण स्त्रीच्या म्हणून ज्या काही वेदना आहेत, त्या तिच्या बरोबर आहेतच; त्याबरोबरच कौटुंबिक-आर्थिक दुर्बलता, सामाजिक विषमता, अज्ञान याबरोबरच समाजाचा तळाचा जो दलित पुरुष त्याच्याकडूनही दुय्यम ठरलेली अशी सर्वात तळाची व्यक्ती, ही दलित स्त्री! स्वत:चं असं घर-शिवारही नसलेली, रूढी-परंपरांनी सन्मान

द्यायचं नाकारलेली अशी दलित स्त्री ग्रामीण स्त्रीपेक्षा धीट आहे, हे तिच्या भाषेतून जाणवते. जेव्हा अस्तित्व राखायचा, टिकून राहायचाच प्रश्न येतो, तेव्हाची जिद्द तिच्यात आहे.

दया पवार तिच्या भाषेचे उदाहरण देतात. 'ये इजाऱ्या खाली बस' यातील इजाऱ्या हा उल्लेख शहरी पुरुषाबद्दलचा ! असे शब्द घडविण्याची तिची क्षमता मोठी आहे. सुमित्रा भावेनींही या स्त्रियांशी संवाद साधल्याचा अनुभव मांडला आहे. 'त्यांनी अनेक तऱ्हेतऱ्हेचे उखाणे आम्हाला सांगितले. आम्हाला ते ऐकताना लाज वाटायला लागली. त्यातून काढले तर अश्लील अर्थ काढता येतील, काढले तर सरळ अर्थही काढता येतील! हा अनुभव सांगून ते एक नवं विश्व जे आपण कधीही अनुभवत नाही, असे निरिक्षण नोंदविले. भाषिक वैविध्य, अभिव्यक्तीतील धीटपणा, पराकोटीचा संघर्ष हे लेखनासाठीचे मूलघटक या ग्रामीण पार्श्वभूमीवरील दलित स्त्री कडे आहेत, पण शिक्षण, स्वत:साठीचा वेळ आणि आर्थिक समृध्दी या बाबींची कमतरताही तिच्याकडे आहे. शिक्षण घेतलेल्या, शहरात स्थिरावलेल्या दलित-लेखिका, कवयित्री कविता, आत्मकथन, इ. साहित्य प्रकारातून जोमदारपणे व्यक्त होत आहेत. हे दोन्हीही साहित्यप्रकार अतिभावनिकतेशी सलगी करणारे आहेत. त्याबाहेर पडून कथालेखन करतानाही त्या दिसतात. प्रज्ञा पवार, उर्मिला पवार इ. चे साहित्य वाचताना सकस कादंबरीलेखनाचा पर्याय लवकरच निवडला जाण्याची शक्यता त्यांच्याकडून वाटते. पण आज ते घडलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. दलित साहित्यात पुरूष लेखकांकडूनही कादंबरीलेखन फारसे घडलेले नाही. नजुबाई गावित यांची 'तृष्णा' ही आत्मकथनात्मक कादंबरी आहे, पण आदिवासी आणि दलित यांत भेद करायचा का, हा प्रश्न पुन्हा निर्माण होतो. स्त्रीवादी जाणीव व्यक्त करणारी ही कादंबरी स्त्रीशोषणाचे चित्रण करते. नजुबाई गावित या स्वत: आदिवासी समाजातून पुढे आलेल्या लेखिका आहेत. शैला बेल्हे यांची 'झाड' ही ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेली कादंबरी आहे. यातील दलित नायक 'पुरंदर' आणि ब्राम्हण सुमंगली यांची प्रेमकथा कन्नड संस्कृतीत, देवस्थानच्या परिसरात घडते. दलित आणि सवर्ण यांच्या संबंधाचा विचार करणारी कादंबरी म्हणजे विनया खडपेकर यांची 'भिंती' (१९८५) ही कादंबरी! सवर्णाची दलितांविषयीची भूमिका सांगणारी ही कादंबरी वैचारिक चर्चांमधून पुढे जाते. जातीयतेची दखल या कादंबरीने घेतली आहे इतकेच! पण समीक्षकांनी या कादंबरीचा ग्रामीण म्हणून उल्लेख

केला आहे. कविता महाजन या मराठीतील नामवंत लेखिका-कवयित्री आहेत. त्यांच्या 'ब्र' या कादंबरीतून आदिवासी स्त्री चे विविध पातळ्यांवरून कसे शोषण होते याची मांडणी केली आहे. तसेच 'सम्बुध' ही बुद्ध-आंबेडकर विषयावर लिहिलेली प्रा. सुशीला मूल यांची कादंबरी आहे.

**स्त्रियांच्या अत्यल्प कादंबरीलेखनाची कारणे :-**

'शतकातील दलित विचार' मधून अनेक दलित लेखक-समीक्षकांनी लेखिकांच्या संकोचाची कारणमिमांसा केली आहे. डॉ. शरणकुमार लिंबाळे लिहितात, आजची सुशिक्षित दलित-स्त्री नव्या दलित मध्यमवर्गाच्या पुरुषप्रधान संस्कृतीतही गुलाम आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. साहेबी मनोवृत्ती जोपासणारा हा वर्ग आपल्या बायकोस हवे तेवढे स्वातंत्र्य देतो असे दिसत नाही. एखाद्या दलित लेखकाने आपल्या लेखनात आपल्या आयुष्याचा पसारा मांडल्यामुळे त्यांच्यावर दुगान्या झाडल्या जातात. जर दलितलेखिकेने आपले खरेखुरे आत्मचरित्र लिहिले तर तिचा नवरा, भाऊ, बाप किंवा नातेवाईक आज तरी समजून घेण्याच्या मन:स्थितीत आहेत काय? जसा एखादा नवा लेखक अनेक पातळीवर स्वत:ला घुसळून घेतो, विचाराच्या मंथनातून जातो तसं दलित स्त्री लेखिकेला आज तरी चार भिंतींच्या आतच कोंडली गेल्यामुळे शक्य होत नाही. नोकरीवर गेली तरी तिच्या अर्थार्जनापेक्षा त्यास वेगळे महत्त्वच दिले जात नाही. अमृता प्रितम यांच्या म्हणण्याप्रमाणे, घराला किचन, बेडरूम, ड्रॉईंगरूम असू शकते. स्त्रीला सुरूवातीच्या दोन खोल्यातंच रहावे लागते. कुणी पाहुणे-रावळे आले तरच ड्रॉईंगरूममध्ये शोभेसाठी बोलविले जाते. पण या तिन्ही रूम्सच्या पलिकडे स्त्रीला चौथी रूम हवी आणि ती मेंदुच्या कप्प्यात हवी. हे जसे सर्वच स्त्रियांना अभिप्रेत आहे, तेव्हा हाच न्याय दलित स्त्रीलाही लावला जावा. दलित स्त्री मानसिक बंधनातून मुक्त झाली तर दलित साहित्यामध्ये फार मोठी भर स्त्रीलेखिका घालू शकतील.'

योगिराज वाघमारे म्हणतात, 'शिक्षण हे सर्व स्तरांपर्यंत अद्यापही पोहोचू शकले नाही. आमच्या मुलींना उच्चशिक्षणापर्यंत आम्ही जाऊ दिले नाही. जेमतेम मॅट्रीक पास झाली की तिचे लग्न लावून आपल्या जबाबदारीतून आम्ही मोकळे होतो. तिच्या इच्छा-आकांक्षांना मुरड घालून तिच्यावर अकालीच मातृत्व लादतो. आजही बहुतांश स्त्रिया पुरूषीवर्चस्वाच्या जोखडामध्ये बंदिस्त आहेत. त्यांचे हुंकार आणि त्यांच्या व्यथा सर्वंकषपणे चव्हाट्यावर कुठे मांडल्या गेल्या आहेत?' दलित पुरूषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा या विषयावरील

चर्चासत्रात आशा मुंडले म्हणतात, 'ग्रामीण/दलित स्त्रीच्या भावविश्वाची समृध्दी आणि ताकद तिच्या भाषेत दिसते. पण कचाकच भांडणं, शिव्या सोडल्या तर कला म्हणून किंवा सुसंवाद म्हणून संभाषण वापरले जाण्याचे प्रसंग कमी व स्त्रीचा अशा प्रसंगी सहभागही कमी असतो. पुढे त्या इंग्लंडमधील भाषाशास्त्रज्ञांचे विचार मांडतात की, 'शाब्दिक प्रक्रियेची संधी अंतर्गत शक्तिसंबंधामुळे जिथे नाकारली जाते, तिथे मनोविकास आणि बुध्दिविकासही खुंटतो.' नुसता अनुभव घेत जगणे पुरेसे नसून त्या अनुभवावर भाष्य, टीका-टीप्पणी करता येते हे समृध्द सहजीवनाचे लक्षण आहे, त्याष्टीने या स्त्रिया सांस्कृतिक दारिद्र्यातच जगत आहेत. फार दूरचा विचार करून योजना आखण्याची कुवत आदिवासी किंवा भटक्या लोकांत नाही. स्त्रियांना जे जिवंत मालमत्तेचे स्थान आहे, ते बदलल्याशिवाय नवा विचार अशक्य आहे.'

मराठी साहित्यातील एकूण स्त्री कादंबरीकारांचा परामर्ष घेतल्यास दिसते की, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लोकप्रिय कादंबरीकार म्हणून कुसुम अभ्यंकर, नयना आचार्य, सुमती क्षेत्रमाडे, शैलजा राजे, शकुंतला गोगटे, योगिनी जोगळेकर, जोत्स्ना देवधर, मृणालिनी जोशी, कुमुदिनी रांगणेकर, लिला श्रीवास्तव, निर्मला देशपांडे यांचा उल्लेख केला जातो. तर महत्त्वपूर्ण, वेगळे व लक्षणीय लेखन करणाऱ्या स्त्री कादंबरीकार म्हणून विभावरी शिरूरकर, कमल देसाई, गौरी देशपांडे, अंबिका सरकार, सानिया, शांता गोखले, कविता महाजन, मेघना पेठे यांचा उल्लेख केला जातो. यातून ग्रामीण व दलित कादंबरीलेखन करणाऱ्या स्त्री कादंबरीकारांच्या नगण्य अस्तित्वाची कल्पना येते. म्हणूनच ग्रामीण व दलित स्त्रीजीवनाचे वेगळेपण, जात-वर्ग-वर्ण व्यवस्था, रूढी-परंपरा, आणि पुरूषप्रधानता या मुद्यांच्या आधारे समजून घ्यावे लागेल. न्याय, समता आणि स्वातंत्र्य या ध्येयातून अवतरलेले दलित व ग्रामीण साहित्य सामाजिक परिवर्तनाच्या आशयाची मांडणी करते. न्याय, समता आणि स्वातंत्र्य या बाबींची दलित व ग्रामीण स्त्रीची भूक थोडी जास्तच आहे, हे समजून घेणेही महत्त्वाचे ठरते.

उच्च शिक्षणाचा अभाव, मानसिक बंधने, पुरूषप्रधानता व रूढी-परंपराचा काच ही ग्रामीण व दलित स्त्री कादंबरीच्या अभावाची कारणे आहेत. म्हणून सामाजिक संवादात सहभाग आणि आर्थिक सबलीकरण या बाबी दलित, ग्रामीण स्त्रीलेखनास पोषक ठरू शकतात. आशा मुंडले यांनी म्हटल्याप्रमाणे, 'फार दूरचा विचार करून योजना आखण्याची कुवत' स्वत:त आणता आली

तर दलित, ग्रामीण स्त्रीकादंबरीलेखनात निश्चितच वाढ होईल. कादंबरी हा बहुस्तरीय रचना वा बहुस्तरीय जीवनजाणीवा व्यक्त करणारा प्रकार आहे, त्यासाठी वेगळी क्षमता आवश्यक आहे. समाजातील वैचारिक तात्विक क्षमता व्यक्त करणाऱ्या या साहित्य प्रकारासाठी वेगळी कलात्मक अभिरूची जोपासावी लागेल, ही जाणीव दलित व ग्रामीण स्त्री साहित्यकांमध्ये वाढीस लागणे आवश्यक आहे.

काही विधाने ही साधी पण नेमकी ठरतात. जगात महिला अर्थशास्त्री का नाहीत याची चिकीत्सा करणाऱ्यां चार्लोट गिलमन हिने १८९८ मध्ये लिहिलेल्या पुस्तकात नोंदवलंय, 'समस्त पृथ्वीतलावर फक्त माणसांतच अशी प्रथा आहे की, ज्यात स्त्रीला आर्थिकदृष्ट्या पुरुषावर अवलंबून रहावं लागतं.' हे वास्तव मानवनर्मित आहे, पितृसत्तेसाठी घडविले गेले आहे, अशी मांडणी पुढे, विशेषतः स्त्रीवादी अभ्यासकांनी केली. तर साधनाच्या २३ फेब्रुवारी २०१३ च्या 'पितृसत्ता आणि पूर्वग्रह' या लेखात रामचंद्र गुहा जोसेफ कॅन्रॅडचे विधान देतात की, 'स्त्रीचा जन्म हे एक अतिशय कठीण कर्म आहे. कारण मुख्यतः पुरूषांना हाताळणे हा तिच्या जीवनातील एकमेव व्यवहार होऊन बसला आहे.' एकूणच जागतिक स्तरावरही बाईपणाचे हे अनुभव तिचे कार्यक्षेत्र संकुचित करतात, असे दिसते. पण साहित्यासारख्या सृजनशील क्षेत्रात प्रवेश व प्रभाव वाढविण्यासाठी वैयक्तिक मानसिक धीटाईचीसुध्दा फार मोठी गरज आहे, असे वाटते.

**संदर्भग्रंथ :**


१) डॉ. खांडगे मंदा : 'स्री साहित्याचा मागोवा – खंड २' साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, डिसेंबर २००२

२) डॉ. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरी-चितन आणि समीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वि. आ. १९९६.

३) डॉ. लिंबाळे शरणकुमार, 'शतकातील दलित विचार', दिलिपराज प्रकाशन, पुणे, द्वि. आ., जून २००७.

४) डॉ. यादव आनंद, '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. मार्च, २००१


* * *

# 'चारापाणी' व 'झावळं' या कादंबऱ्यांचा : एक तुलनात्मक विचार

–डॉ. उगले ए. बी.

ग्रामीण व दलित साहित्यातील महत्वाचे लेखक रा. रं. बोराडे यांची 'चारापाणी' व उत्तम बंडू तुपे यांची 'झावळं' या कादंबऱ्यांचा तुलनात्मक विचार या निबंधात केलेला आहे. रा. रं. बोराडे आणि उत्तम बंडू तुपे या दोन्हीही लेखकांनी कथा व कादंबरी या प्रकारातून ग्रामीण व दलित जीवनाचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण केलेले आहे. माजी प्राचार्य, रावसाहेब रंगनाथ बोराडे हे मूळचे लातूर जिल्ह्यातले. ते एक कथाकार म्हणून सर्वांना परिचित असले तरी नंतर त्यांनी दर्जेदार कादंबरी लेखन केलेले आहे. पाचोळा (१९७१), सावट (१९८७), आमदार सौभाग्यवती (१९८८), चारापाणी (१९९०), महानगाव (१९९२), रहाटपाळणा (१९९६), इथं होतं एक गाव (२०००) या वेगवेगळ्या विषयावरील सात महत्वाच्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

उत्तम बंडू तुपे यांचे कुटुंब मूळचे सातारा जिल्ह्यातले परंतु उदरनिर्वाहा करण्यासाठी अहमदनगर, श्रीगोंदा येथे ते स्थायिक होतात. नंतर पुण्याला येऊन नोकरी करतात. अशा विविध ठिकाणच्या परिस्थितीतून व अनुभवातून त्यांनी कादंबरी लेखन केलेले आहे. इजाळ (१९८४), खाइं (१९८८), चिपाड (१९८९), शेवंती ९१९९१), झावळं (१९९१), भस्मं (१९९१) इत्यादी कादंबऱ्या त्यांनी दलित जीवनावर लिहिलेल्या आहेत. प्रस्तुत निबंधामध्ये 'चारापाणी' व 'झावळं' या कादंबऱ्यांचा कथाविषय, व्यक्तिचित्रणे, परिस्थिती व संघर्ष या घटकांच्या आधारे तौलनिक विचार केलेला आहे.

**कथाविषय :–**

'चारापाणी' कादंबरी म्हणजे रा. रं. बोराडे यांनी १९८६ साली लिहिलेल्या 'होरपळ' या दीर्घ कथेचे विस्तारीत होय. ही दीर्घ कथा १९९० मध्ये प्रकाशित झाली. १९८४-८५ साली महाराष्ट्रात अपुरा पाऊस झाला. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ग्रामीण भागात निर्माण झाला. खरीप आणि रब्बी पिके शेतकऱ्यांच्या हातात आली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी व गुराढोरांनी कसं जगायचं हा प्रश्न सर्वांच्या समोर निर्माण झाला. कादंबरीचा नायक 'सुखदेव' एम.ए. ची परीक्षा देऊन गावाकडे येतो. दुष्काळामुळे गाव सोडून बैलगाडीत फाटका तुटका संसार भरून निघालेला दत्तू त्याला भेटतो. गावात बैलांना चारा नाही, माणसांना पाणी नाही ही गोष्ट शहरात राहिल्यामुळे त्याला जाणवली नाही. घरी आल्यावर त्याची आई-राहीबाई त्याला मोजकं पाणी पिण्यास देते. बाजेवर

बसून अंघोळ करायला लावते. म्हणजे त्याखाली धरलेल्या टोपल्यातील पाण्यात तिला धुणं-भांडी करता येतील. गोठ्यात फक्त दौन बैलं ठेवून बाकीची गुरं विकून टाकलेली असतात. गुरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न गावात असतो. चारा असतो फक्त सावकार 'आबाराव शेळकेंकडे'. गावातील सारे शेतकरी चाऱ्यासाठी आपले बैल सावकाराकडे नेऊन सोडतात. हे सुखदेवला आवडत नाही. त्याला वाटते बैल ठेवून घेण्यापेक्षा सावकाराने आपल्याकडील चारा उधार द्यावा. परंतु तो नकार देतो. यावरून सुखदेव व सावकाराचे भांडण होते. यामुळे गावातील सर्व शेतकरी सुखदेववर नाराज होतात.

गावात पिण्याच्या पाण्याचा टँकर दिवसातून एकदाच येतो. पाणी काढताना रामा सुराशेची बायको विहिरीत पडते. त्या विहिरीत अजिबात पाणी नसते. कादंबरीचे लेखक बोराडे पेपरमध्ये आलेली एक घटना देतात की, एका तांड्यावरची स्त्री बाळंत होते. तिला मुलाच्या अंगावरील नैसर्गिक आवरण धुण्यासाठी पाणी मिळत नाही. ते वाळून मुल मरते. तेव्हा ती स्त्री टाहो फोडून मुल पाण्याशिवाय मेल्याचे सांगत असते. या घटनेतून दुष्काळाची तीव्रता लक्षात येते. कादंबरीचा नायक सुखदेव व त्याचा वर्गमित्र तालुक्याला जाऊन बी.डी.ओ. ला दुष्काळाची भयाणता सांगतात. साखर कारखान्याचे चेअरमन व आमदार, तहसीलदार यांनाही भेटतात. पण प्रत्येक ठिकाणी त्यांना अपयश येते. सावकार आबाराव शेळकेंकडे शेतकरी बैल नेऊन सोडतात तशीच शेतीही त्याच्याकडे लावतात. आपल्या बैलांसह आपल्याच शेतात राबवून पीक मात्र त्याच्या घरात जाते. या परिस्थितीने सुखदेव अधिक दुखावतो. गावातील जयराम हा आबाराव शेळकेंच्या कडब्याच्या गंजीला आग लावतो. म्हणून सावकार शेतकऱ्यांचे बैल जमिनी परत करतो. यामुळे शेतकरी दुःखी होतात. परंतु सुखदेव आबाराव सावकाराचा ढोंगीपणा शेतकऱ्यांच्या लक्षात आणून देतो. दुसऱ्या दिवशी 'मेख आंदोलनासाठी' शेतकऱ्यांना तयार करतो. कारण ग्रामीण भागातील दुष्काळ शासनाच्या लक्षात यावा म्हणून लोकं आंदोलनाला तयार होतात. असे साधे सरळ कथानक 'चारापाणी' या कादंबरीत आहे.

'झावळं' या उत्तम बंडु तुपे यांच्या कादंबरीचा नायक 'काशीनाथ' हा कोळी आहे. तो ग्रामीण भागात नदीतील मासे पकडून उपजीविका करतो. परंतु निसर्गाचा असमतोल झाल्याने कमी पडणारा पाऊस, त्यात शासनाची तळे-तलाव यांची योजना, तसेच नदीला वाहणारे अपुरे पाणी यामुळे त्याला मासे पकडून व्यवसाय करता येत नाही, उदरनिर्वाह करता येत नाही म्हणून तो जगण्यासाठी धडपड करतो. नायक काशिनाथच्या पाने ग्रामीण भागातील सर्व कोळी जमातीची हीच अवस्था आहे, हे येथे लेखकाने दाखवून दिले आहे. तसेच ग्रामीण भागातील कोळी लोकांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

पूर्वी भरपूर पावसामुळे नदीला भरपूर पाणी असायचे. त्यामुळे परंपरेने मासे पकडून गावाची आणि आपली गरज भागविणारा कोळी समाज समाधानी होता. या

समाजाचे प्रतिनिधीत्व करणारा काशीनाथ हाही समाधानी होता. परंतु अलिकडच्या काळात त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्याला आई वडील नसल्याने त्याचे मर्यादित कुटुंब आहे. त्याची पत्नी गर्भवती आहे. काशीनाथ धाडशी, कष्टाळू, स्वाभिमानी व मेहनत करणारा आहे. त्यामुळे सतत नदी, डोह, पाणी, काळोख, थंडी यांच्याशी तो सामना करतो. कधी खेकडा हात रक्तबंबाळ करतो, कधी वामटी माशाने हात कापला जातो. पाण्यात जीव कासावीस करून जाळे फेकावे लागते. नदीकाठी अंधारात वावरताना सापाचे भय असते तर कधी डोहात गाळात रुतून मरणाची भीती असते. या गोष्टींकडे काशीनाथ दुर्लक्ष करतो. काशीनाथचा संघर्ष रात्रंदिवस सुरू असतो. मासे पकडून उदरनिर्वाह करताना त्याच्यासमोर अनेक संकटे उभी असतात. जसे जाळे कुरतडणारे खेकडे, जाळ्यातील माशांना पळून लावणारी धामण, जाळ्याचा गुंता करणारी कासवं, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत जाळे पळविणारे इतर कोळी, अशा अनेक संकटाचा सामना त्याला करावा लागतो. माशांची शिकार मिळाल्यानंतर गावात खपवताना (विक्री करताना) अनेक नमुन्याचे ग्राहक त्याला भेटतात. कमी भावात मागून हेळसांड करणारे, उधारीत घेऊन जाणारे, अनेक दिवस उधारी न देणारे, माशांऐवजी बोंबिल, झिंगे, मटन पसंत करणारे यांच्याशी त्याला स्पर्धा करावी लागते. तरी तो आपला व्यवसाय करतो. 'झावळं' कादंबरीचा नायक अनेक अडचणींना तोंड देत आपले जीवन जगत असतो. पावसाळ्यात त्याच्या कुटुंबाचे जास्त हाल होतात. व्यवसाय करून मिळविलेले धान्य संपलेले असते. पावसाने छप्परही गळत असते. धान्य वस्तू उधारही कोणी देत नाही. त्यातच श्रावण महिना आल्यावर त्याची चिंता वाढत जाते. श्रावण महिन्यात मासे कोणी खात नाही. म्हणून त्याची विक्री होत नाही. म्हणून घरखर्चासाठी त्याची पत्नी सोनी त्याला मंगळसूत्र विकण्यास सांगते. परंतु काशीनाथला ते आवडत नाही. नारळी पौर्णिमेनंतर त्याची खरी सुगी सुरू होते. वेगवेगळ्या जाळ्यांचा उपयोग करून तो बरेच मासे पकडतो. परंतु ते गावात खपत नाहीत म्हणून बाहेरगावी ते बर्फात साठवितो. नंतर सोनीला मुलगा होतो. त्या बाळंतपणाला त्याचा बराच पैसा खर्च होतो. दुसरीकडे नदीचे पाणी आटते. त्याचा धंदा मंदावतो. नदी कोरडी पडल्याने त्याचा मासेमारीचा धंदा कायमस्वरुपी बंद पडतो. अशा अनेक समस्यांना काशीनाथला तोंड द्यावे लागते.

**व्यक्तिचित्रणे :–**

'चारापाणी' कादंबरीचा विषय ग्रामीण जीवन, तेथील शेतकरी, त्या शेतीत राबणारा बैल व त्याच्या चाऱ्याची समस्या हा आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्याला शेती उभा करणारा बैल हा घटक कसा जगवायचा? हा प्रश्न या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. या कादंबरीत गाव सोडून जाणारा दत्तू धायवट आहे. उपाशी बैल खाटकाला विकता येत

नाही म्हणून त्यांना सोडून देणारा बाळबा शेलार आहे. घोटभर पाणी मिळावे म्हणून तो काढताना विहिरीत पडलेली रामा सुरेशची बायको आहे. 'पाण्याविना बाळ मेलं रे' म्हणून टाहो फोडणारी लमाणतांड्यावरची बाई आहे. दुष्काळात सर्व गावाला गिळू पाहणारा आबाराव शेळके आहे. ही कादंबरी गावातील व्यक्तींच्या दुष्काळग्रस्त व्यथा साकार करणारी तसेच गावगाड्याची परिस्थिती सांगणारी आहे. आपली नथ मोडून चारा विकत घ्यायला लावणारी सुखदेवची आई धडपड करते. कोणत्याही परिस्थितीत आपले दोन्ही बैल जगविले पाहिजे म्हणून प्रयत्न करणारे सुखदेवचे वडील तहसीलदार, गटविकास अधिकारी, शेतकरी संघटना आणि वर्तमानपत्रे यांच्याकडून दुष्काळाची जाणीव होते. या दुष्काळानंतरही शेतकरी उभा राहिला पाहिजे यासाठी परिश्रम घेणारा, संघर्षशील आणि चिंतनक्षम असा कथानायक सुखदेव या कादंबरीत आहे.

'झावळं' या कादंबरीतील काशीनाथला केंद्रस्थानी ठेवून आलेले हे कथानक समग्र कोळी समाजाची शोकांतिका बनून राहते. शिवाय काशिनाथ या व्यक्तिरेखेभोवती जरी हे कथानक फिरत असले तरी त्याला अधिक वास्तवतेच्या पातळीवर नेण्यात सोनी, सुब्या, रखमा, काशीनाथ चे सासू सासरे, संशयखोर गौरी म्हातारी, मावशीचा जावई, कुशाबा नाईक, रंग्या सरपंच, गुलाबराव मोकाशे, इनामदार इत्यादी पात्रांमुळे या कादंबरीला गतिमानता येते. सोनी दिसायला देखणी आहे; परंतु नवरा आहे म्हणून आपण आहोत याची तिला जाणीव आहे. म्हणून ती त्याच्या बरोबरीने कष्ट करते. मासे खरेदीच्या निमित्ताने तिच्या देहाला न्याहळणारा कबिऱ्या, माशांबरोबर तिची मागणी करणारा रंग्या सरपंच, मासे खरेदीच्या निमित्ताने तिला चावटपणे बोलणारा नाऱ्या यांनी वेळीच धडा शिकविते. सुब्या हा काशीनाथचा भाऊबंद आणि दुरचा नातेवाईक. तसेच आळशी, दारुड्या, अंधश्रद्धाळू, शंकाखोर, मासेमारी माहीत नसलेला, काशीनाथचा सतत द्वेष करणारा तरी काशीनाथ त्याला मदत करतो. दोघांचे मासेमारी वरून भांडणेही होतात. आपल्या सोनीचे मुल जगावे म्हणून तिची आई अनेक देवांना नवस करून काशीनाथला सोनी खर्चात टाकते. सोनीच्या बाळंतपणाच्या वेळेस आई तिला फारशी मदत करीत नाही. काशीनाथच्या मावशीचा जावई त्याला शहरामध्ये मासे पाठविण्याचा सल्ला देऊन एक प्रकारची दलालीच करतो. अशा वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा या कादंबरीत आहेत.

**परिस्थिती व संघर्ष–**

'चारापाणी' कादंबरीतील दुष्काळाची वाढती तीव्रता, पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आणि खेड्यापाड्यातील शेतकरी शेतमजुरांना भेडसावणारा अन्नधान्याचा भीषण प्रश्नही या कादंबरीची संघर्षमय पार्श्वभूमी आहे. माणसांना जगविण्यासाठी शासनाने काढलेली रोजगार हमीची कामे आणि जनावरांसाठी साखर कारखाने किंवा गुरांच्या छावण्या या उपाययोजना लेखकाला अपुऱ्या वाटतात. यापेक्षा शेतकऱ्यांनी दिवसभर आपल्या शेताची

मशागत करून घ्यायची आणि रात्रभर बैलांच्या चाऱ्यापाण्यासाठी सोय छावणीत करायची असे लेखकाला वाटते. दुष्काळात गावात टँकरने पाणीपुरवठा केला जातो. पण तो अपुरा व गैरसोयीचा. टँकर गावातील विहिरीत सोडला जातो आणि ते पाणी काढण्यासाठी गावातील स्त्री-पुरूषांची भांडणे होतात. ही परिस्थिती आजही दिसते. सुखदेव तालुक्याला जाऊन बी.डी.ओ. ला दुष्काळाच्या प्रश्नांविषयी निवेदन देतो. गावातील सावकाराची चाऱ्याची गंजी ताब्यात घ्यावी व तो चारा शेतकऱ्यांना पुरवावा अशी मागणी असते पण तिची दखल घेतली जात नाही. या कादंबरीत प्रामुख्याने बैलांच्या चाऱ्याची समस्या आणि माणसांच्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई यांचे चित्रण केले आहे. वास्तविक या दोन समस्या दुष्काळामुळे निर्माण झालेल्या आहेत. हे प्रश्न ग्रामीण भागातील लोकांना हैराण करून सोडतात. या संघर्षाबरोबरच या परिस्थितीत कौटुंबिक संघर्षही पहायला मिळतो. सुखदेव आणि त्याचे वडील, जयराम त्याचे वडील यांचा संघर्ष हा काही गोष्टींपुरता मर्यादित आहे. सुखदेवने शेवटी शेतकऱ्यांसमोर केलेले भाषण हे लेखकाचीच परिवर्तनशील भूमिका वाटते.

'झावळं' कादंबरीतील नायक काशीनाथचा व इतरांचा जगण्यासाठी रात्रंदिवस संघर्ष चाललेला आहे. 'झावळं' म्हणजे 'डोहात मासे पकडण्यासाठी बाभळीच्या काटक्यांचा लावलेला ढीग.' याच्या बाजूला बाभळीच्या शेंगाच्या कुटात धान्य मिसळून माशांसाठी खाद्य टाकले जाते व नंतर मासे पकडले जातात. कोळी समाजाची सुखदुःखे, कुटुंबातील भावसंबंध, मासे पकडतानांची संकटे, भाऊबंदकी, अंधश्रद्धा यांचे चित्रण कादंबरीत आलेले आहे. संततधार पाऊस थांबावा म्हणून सोनी पावसात विस्तव टाकते. अमवास्येच्या रात्री ती काशिनाथला नदीवर जाऊ देत नाही. कारण या दिवशी भुते निघतात असा तिचा समज आहे. कोळी समाजाचा चुनाभट्टीचा व्यवसाय जोडधंदा आहे. शिवाय गावाला पखालीने पाणी पुरविण्याचे कामही काही कोळी करीत असत. परंतु पुढे अपुरा पाऊस, गावोगावी नदीवरील तलाव, धरणे यामुळे हा समाज अडचणीत आला. मासेमारीचा व्यवसाय अंगवळणी पडल्यामुळे इतर व्यवसायात त्यांना अवघडल्यासारखे झाले. त्यांचे जगणे तर महत्वाचे म्हणून जगण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आणि परिस्थितीने केलेली कोंडी कादंबरीत प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

'चारापाणी' आणि 'झावळं' या ग्रामीण व दलित कादंबरीतील विषय प्रश्न, समस्या, परिसर व परिस्थिती ही एकाच पातळीवरील आहे. ग्रामीण जीवनातील कौटुंबिक जीवनपद्धती व व्यवसायातील अडचणी समान आहेत. सुखदेव व काशीनाथ हे दोन्ही नायक ग्रामीण परिसरातील असल्यामुळे त्यांचे जीवनमान निसर्गावर अवलंबून आहे. अलीकडच्या काळात पाऊस कमी पडत असल्यामुळे, विहिरींना पाणी नाही. त्यामुळे शेती करणारा शेतकरी अडचणीत आला आहे. नदी, तलाव, ओढे यांना पाणी नसल्यामुळे

त्यावर अधारीत असणारा मासेमारी व्यवसाय बंद पडत चालला आहे. यामुळे अनेक कुटुंबे उद्वस्त होत आहेत. याची करुण कहाणी या कादंबऱ्यांमध्ये आहे.

संदर्भ ग्रंथ–


१) बोराडे रा. रं. 'चारापाणी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९०.

२) तुपे उत्तम, 'झावळं', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९१.

३) ठाकूर रवींद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९३.

४) कानडजे एस.एम., 'पीळ आणि पैलू', ('रा. रं. बोराडे यांच्या साहित्याचा अभ्यास') प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती, जून, २००७.

५) गोरे दादा, 'साहित्य समीक्षा आणि आस्वाद', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००९.

६) पैठणकर सुरेश, 'उत्तम बंडू तुपे यांचे साहित्य, आस्वाद आणि समिक्षा', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००५.


* * *

# समस्याप्रधान दलित ग्रामीण कादंबरी

-प्रा. बाळासाहेब वामनराव सोनवणे

प्रस्तावना :

१९६० नंतरची कादंबरी खऱ्या अर्थाने समस्याप्रधान असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबरी फडके – खांडेकरांच्या प्रभावात अडकून पडलेली होती. रंजनप्रधानतेला महत्व दिले जात होते. तंत्रवादात कांदबरीकार भरकटण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. एकूण लेखनाचे स्वरूप स्वप्नरंजनपर होते. वास्तवाभास, योगायोग, घटनाप्रधानता आणि रंजनपरता ही लक्षणे स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबऱ्यात आढळून येतात. ना.सी. फडके यांच्या लोकप्रिय तंत्राला अनेक लेखक शरण गेलेले दिसून येतात. वास्तव आणि कल्पित यांचा मेळ कादंबरीत असणे आवश्यक आहे. हा विचार १९६० नतंरच्या कांदंबरी वाङ्मयात दिसून येतो. म्हणून साठोत्तरी कादंबरी अधिकाधिक समाजाभिमुख झाल्याचे जाणवते. सामाजिक उत्तरदायित्वाचा भार कांदबरीकारांनी स्वीकारल्याचे दिसून येते. नैतिकता आणि कलात्मता यांची सरमिसळ बहुतांशी कादंबऱ्यात झालेली दिसून येते. त्यांतील नैतिकतेचा मूल्यविचार अंतर्मुख करायला लावतो. भालचंद्र नेमाडे, श्याम मनोहर, या कांदबरीकारांनी खंबीर आणि सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून लेखन केले आहे. हा प्रयोगशीलतेचा आणि संक्रमणाचा काळ म्हणावा लागेल. कारण १९६० नंतरचे साहित्य रंजनपरतेतून मुक्त झाल्याचे दिसू येते.

१९६० नंतर मराठी वाङ्मयात वेगवेगळे साहित्यप्रवाह स्वतंत्रपणे वाटचाल करताना दिसून येतात. त्यात प्रामुख्याने दलित, ग्रामीण, स्त्रीवादी आणि आदिवासी साहित्यप्रवाह, प्रत्येक साहित्यप्रवाहाच्या प्रेरणा निरनिराळया आहेत. दलित साहित्याने मराठी वाङ्मयात स्वत:चे निराळेपण सिद्ध केले आहेच शिवाय मराठी वाङ्मय समृद्ध करून त्याला व्यापकता प्राप्त करून दिल्याचे जाणवते. दलित साहित्यप्रवाह हा परिवर्तनाच्या चळवळीतून निर्माण झालेला आहे. जीवनाची बांधिलकी मानणारा, जीवनातल्या वास्तव प्रश्नांना निडरपणे सामोरे जाणारा हा प्रवाह आहे. या जीवनवादी साहित्यप्रवाहाला म.फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे अधिष्ठान आहे. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा मराठी साहित्यनिर्मितीवर खोलवर परिणाम झालेला आहे.

ग्रामीण साहित्यप्रवाहाच्या मुळाशी जाऊन धांडोळा घेतांना जाणवते की ग्रामीण साहित्याची प्रेरणा ही सम्यक परिवर्तनाची आहे. म. फुले ह्यांच्या परिवर्तनवादी विचार ग्रामीण भागातील माणसाच्या शोषणाविरुद्ध आणि त्यांना सोसाव्या लागणाऱ्या विषमतेविरुद्ध आहे. शेतकऱ्यांना सावकारी पाशातून, अज्ञानात टाकणाऱ्या धर्मग्रंथाच्या, गुलामगिरीतून मुक्त करून त्याला त्याचे हक्क प्राप्त करून देणे हे म. फुले यांचे कार्य होते. त्यांच्या प्रेरणेतून सत्यशोधक चळवळ सुरू झाली. ह्यातून कृष्णराव भालेकर, मुकुंदराव

पाटील ह्यांसारखे लेखक उदयास आले. मात्र १९२० नंतरच्या ग्रामीण साहित्यात म. फुल्यांचा विचार जाणवत नाही. ह्या काळातील ग्रामीण साहित्य हे रंजनपर आणि लोकप्रिय प्रकारचे झालेले दिसते. परंतू १९६० नंतरचे ग्रामीण साहित्य वास्तवाला भिडण्याचा प्रयत्न करते. ग्रामीण माणूस व ग्रामीण समाज ह्यांवरील अन्यायाविरुद्ध ग्रामीण लेखक आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रतिकार करताना आढळतो आहे. वाङ्मयाच्या अनेक साहित्यप्रकारात शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना, ग्रामीण संस्कृतीच्या समस्या, रुढी, प्रथा परंपरा याविषयीच्या अडचणी घेऊन ग्रामीण कादंबरीकार टोकदारपणे लेखन करतो आहे. ग्रामीण कादंबरीचा प्रकर्षाने आढावा घेताना जाणवते की, ग्रामीण कादंबरी, समस्याप्रधान कादंबरी, वास्तववादी कादंबरी, नैतिकतावादी कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी, सामाजिक कादंबरी इत्यादी प्रकारच्या कादंबऱ्यामुळे 'कादंबरी' हा वाङ्मयप्रवाह अधिक समृद्ध झालेला आहे.

## मराठी कादंबरीचा उदय:

प्राचीन मराठी वाङ्मयात कथनरूपाची एक प्रदीर्घ परंपरा असल्याचे अनेक पुरावे देता येतील. महाभारत, रामायण, भगवद्‌गीता इत्यादी ग्रंथाच्या माध्यमातून पारंपरिक कथनरूप दिसून येते. एकाने दुसऱ्याला कथा सांगावी दुसऱ्याने तिसऱ्याला अशी मौखिक परंपरा दिसून येते. संपूर्ण हिंदूस्तानात राजेशाही अनेक लहान-सहान संस्थानात विखुरलेली होती. राजे महाराजे फावल्या वेळेमध्ये विरंगुळा म्हणून मनोरंजनाच्या हेतूने कवींना राजाश्रय द्यायचे. अध्यात्मिक ग्रंथ, लावण्या, पोवाडे इत्यादीना राजाश्रय आणि लोकाश्रय प्राप्त झाला होता. परंतु वाचनाची खरी भूक मुद्रणक्रांतीमुळे इंग्रजी राजवटीनंतरच भागू शकली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. इंग्रजी राजवटीने संपूर्ण हिंदूस्तानावर हुकूमत स्थापन केली. पर्यायाने इंग्रजी संस्कृतीचा संबंध सर्वच राज्यातील भाषेशी संस्कृतीशी आला व त्यामुळे अनुकरणाची प्रक्रिया पार पाडली गेली. शिक्षण व्यवस्थेमुळे इथल्या समाजाला, संस्कृतीला विश्वभान प्राप्त झाले व परिवर्तनाचे चक्र कासवगतीने का होईना फिरू शकले. मुद्रणव्यवस्थेमुळे वर्तमानपत्रे, मासिके, ग्रंथ इत्यादी मोठया प्रमाणात निर्मिती होऊ लागली. पर्यायाने वाङ्मयाच्या क्षेत्रातही वाढ झाली. नवा वाचक वर्ग निर्माण झाला.

'कादंबरी' च्या उदयासंदर्भात कुसुमावती देशपांडे म्हणतात. इंग्रजांच्या आणि इंग्रजीच्या संपर्कामुळे निबंधाप्रमाणेच कथा आणि विशेषत: कादंबरी हे नवे साहित्यप्रकार मराठीच्या परिचयाचे झाले. इंग्रजीचा संपर्क आला नसता तरी मराठीमध्ये कादंबरीलेखनाची पूर्वतयारी पूर्ण होत आली होती, व त्यामुळे मराठीत कांदबरीलेखन इंग्रजीच्या संपर्काशिवाय शक्य झाले असते, अशी भूमिका आपल्याकडे अधूनमधून मांडली जाते. हा युक्तिवाद खरे म्हणजे व्यर्थ आहे. जे झाले ते कसे आहे याचे स्पष्टीकरण आपण करू शकतो, व ते करताना कादंबरी हा साहित्यप्रकार आपण इंग्रजीमार्फत युरोपकडून स्वीकारला आहे, असे

म्हणावे लागते. साहित्यप्रकार केवळ रूपविषयक घटकांनी आकाराला येत नसतो. रूपविशेषांच्या मागे विशिष्ट प्रकारचे विश्वभान आणि मूल्यव्यवस्था असते. इहप्रवण दृष्टी, समाज आणि व्यक्ती यांचा व्यक्तिवादी तत्वज्ञानामुळेच शक्य होईल. या प्रकारचा संबंध, कल्पित आणि वास्तव यांचा नवा समतोल, या गोष्टीचा आणि कादंबरी या साहित्यप्रकाराचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. मराठी कादंबरीचा आणि इंग्रजीतील कादंबरीचा संबंध बऱ्याच मोठ्या प्रमाणात अनुकरण करायचे प्रारूप आणि अनुकृती असा आहे. यात शंका नाही. पण हा संबंध तेवढाच नाही. मराठी समाजात निर्माण होऊ लागलेल्या नवी मूल्यदृष्टी व विश्वभानही कादंबरीच्या अवतरणाशी निगडित आहे. याचा अर्थ येथील कथापरंपरेशी व सांस्कृतिक परंपरेशी मराठी कादंबरीचा काहीच संबंध नाही, असे येथे म्हणायचे नाही. या संबंधामुळे मराठी कादंबरीला तिचे असे वेगळे व्यक्तिमत्व प्राप्त झाले आहे. मात्र कादंबरीच्या येथील अवतरणाशी पाश्चात्य संपर्क आणि परंपरा यांच्या असलेल्या संबंधामध्ये गुणात्मक भेद आहे. पाश्चात्य संपर्क हे कांदबरीचे जनक कारण आहे, तर येथील परंपरा, विशेषत: कथापरंपरेशी परिणाम एवढे महत्वाचे म्हणता येणार नाहीत.[१]

इंग्रजी राजवटीपासून ते वर्तमान मराठी कादंबरीची वाटचाल लक्षात घेतांना जाणवते की, वाङ्मयात आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेचे चित्रण आढळून येते. भांडवलदारी पद्धती, वैज्ञानिक दृष्टीकोण, समानता, लोकशाही, मानवता, बुद्धिप्रामाण्यवाद इत्यादी घटकांचा अंतर्भाव दिसून येतो. कादंबरीत घटना निवेदनामार्फत घडताना दिसून येतात. स्थल-कालाच्या एकजीव मिश्रणातून कादंबरीचा आकृतिबंध किंवा संबंध निर्माण होतो. आणि हे सर्व वाङ्मयप्रकारासंदर्भात दिसून येते.

'कादंबरीविषयी' या ग्रंथात हरिचंद्र थोरात यांचे विधान कादंबरीच्या उपबंधाविषयी महत्वपूर्ण ठरते. कथा, निवेदन आणि भाषा या तिही पातळया कादंबरीच्या रूपबंधाला मूर्त करत असतात. या तिन्ही पातळयांच्या परस्परसंबधातून कांदबरीतील कालावकाशाची सरंचना मूर्त करत असते. या तिन्ही पातळयांवरील व्यवहारात सुसंवाद प्रस्थापित करता आला, तर कादंबरीच्या अर्थपूर्ण अशा रूपबंधाची निर्मिती शक्य होते. (२)

१९७५ नंतरच्या कादंबरीने कथा आणि निवेदनाच्या पातळीवर बरेचसे बदल केलेले दिसून येतात. भाषेच्या पातळीवर मात्र कादंबरी कमी पडलेली दिसून येते. 'यमुना पर्यटन', 'पण लक्षात कोण घेतो', 'सुशीलेचा देव', 'इंदू काळे सरला भोळे', 'रागिणी', ब्राम्हणकन्याद्य, इत्यादी कादंबऱ्या कथानक, कालावकाश, सामाजिक भान इत्यादी प्रायोगिक तत्त्वे अंगिकारल्यामुळे महत्वपूर्ण ठरलेल्या आहेत.

**मराठी दलित आणि ग्रामीण कादंबरी : काही सीमारेषा :**

१९६० पासून दलित साहित्य दमदारपणे वाटचाल करत आहे. सम्यक परिवर्तनासाठी, दलित साहित्य चळवळ उभी राहिली. डॉ. आंबेडकराचे तत्वज्ञान, त्यांची

चळवळ ही दलित साहित्याची प्रेरणा आहे. डॉ.जनार्दन वाघमारे म्हणतात. डॉ. आंबेडकरांशी उभारलेला मुक्तिलढा आणि दलितांना प्राप्त झालेले शिक्षण या गोष्टीची सांस्कृतिक उपलब्धी म्हणजे दलित साहित्य, एखाद्या जनसमूहाला आत्मभान प्राप्त झाल्याशिवाय सांस्कृतिक चळवळ उभी राहू शकत नाही.

या आत्मभानाचा अर्थ असा की, आपणही इतरांसारखे आहोत ही जाणीव. वर्णाश्रमव्यवस्था, जातिव्यवस्था आणि जन्मजात व्यवसाय ह्यामुळे दलित माणसाला आत्मभानच नव्हते. म. फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचारांमुळे हे आत्मभान दलितांना लाभले. त्याचेच प्रतिबिंब साहित्यातून जाणवते. दलित साहित्यात प्रकट होणारे हे आत्मभान दलित साहित्याचे आदिकारण आहे. ह्याच आत्मभानामुळे दलित साहित्यात आत्मशोध सुरू होतो. ह्या आत्मशोधातूनच नकार आणि विद्रोह अवतरतो. ह्या संदर्भात प्रा. दत्ता भगत याची व्याख्या पाहणे उचित ठरेल. आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाधारे स्वत:ला आणि स्वत:भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित साहित्य[3]

या व्याख्येतून दलित साहित्याच्या आकलनाचे घटक लक्षात येतात ते म्हणजे आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोह, दलित साहित्याने 'माणूस' हेच मूल्य स्वीकारले आहे. माणसाची प्रतिष्ठा, माणसाचे स्वातंत्र्य दलित साहित्यात केंद्रस्थानी असल्यामुळे दलित साहित्याच्या समीक्षेसाठी रूढ निकष न वापरता, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या जीवनमूल्यांच्या आधारेच दलित साहित्य ही संकल्पना समजू शकेल. ग्रामजीवनात गावकुसाबाहेर राहणारा अस्पृश्य समाज शंभर टक्के शहरात, गेलेला नाही. काही प्रमाणात तो अल्पभूधारक आहे ज्याच्याकडे शेती नाही ते शेतमजूर म्हणून राबतातच म्हणून कृषिकेंद्रित ग्रामव्यवस्था पूर्णपणे धुडकावता येणार नाही. जातिव्यवस्था ही व्यवसायातून निर्माण झालेली असल्यामुळे व्यवसाय आणि जाती यांचे एकत्रीकरण आहे. म्हणून जातीविरुद्ध बंड करणे सोपे आहे, पण व्यवसायाविरुद्ध कसे जाणार? असे प्रश्न निर्माण होतात. कृषिसंस्कृतीत वावरणाऱ्या समाजातील सर्वच घटकांना कृषिसंस्कृतीचे घटक म्हणूनच राहावे लागते.

यासंदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा निष्कर्ष पाहणे उचित ठरेल. ग्रामविभागात राहणाऱ्या दलितांना इच्छा असो वा नसो, ग्रामव्यवस्था स्वीकारावी लागते. परंतु नव्या जाणिवांमुळे ते तिला नकारही देऊ इच्छितात. नव्हे, नकार देण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी जो संघर्ष उद्भवतो तो वर्णसंघर्ष तर असतोच, पण तो 'ग्रामीण जीवनात' घडणारा संघर्ष असतो. म्हणजेच ग्रामीण भागात राहणाऱ्या दलितांच्या जीवनाचे चित्रण हे ग्रामविभागातील दलितांचे चित्रण असते, यांचे भान ठेवणे आवश्यक ठरते. ग्रामीण भागात राहणारे दलित ग्रामविभाग– कृषिसंस्कृती सोडू शकत नाहीत. (आणि त्यांनी

ग्रामविभाग, कृषिसंस्कृती का सोडावी ?) ग्रामीण जीवनातील इतर घटक तर स्थितिशील असेच असतात. अशा समाजात नव्या जाणिवांमुळे जो संघर्ष निर्माण होतो, त्या संघर्षाचे चित्रण करणारे साहित्य हे 'ग्रामीण साहित्य' या सदरातच जमा (व्हायला हरकत नाही.) असते [४]

हे विधान डॉ. कोत्तापल्ले यांनी ग्रामविभागातील दलित सवर्ण संघर्ष डोळ्यासमोर ठेवून केले असावे, मुळात दोन्ही साहित्यप्रवाहामागील प्रेरणा वेगवेगळया आहेत. दलित साहित्य विज्ञानावादी आहे. डॉ. आंबेडकरांनी हिंदू देवदेवतांवर विश्वास ठेवून अंधश्रद्धेने जीवन जगणाऱ्या प्रथा, परंपरावादी, दैववादी समाजापासून फारकत घेतली व अठरापगड जातीच्या उतरंडीवर, विषमतावादी, वर्णश्रमयुक्त पारंपरिक मूल्यांना नकार दिला. समतेवर आधारित जीवनव्यवस्था बौद्ध धर्माच्या रूपाने दलित समाजाला दिली. म्हणून ग्रामीण आणि दलित साहित्य हे जरी ग्रामविभागातून किंवा कृषिकेंद्रित व्यवस्थेतून व्यक्त होत असेल तरी विचारसरणीमध्ये फरक आहे. विद्रोह आणि नकार या संदर्भात आनंद यादवांच्या 'गोतावळा' कांदबरीचे उदाहरण देता येईल. गोतावळा मधील 'नारबा' शेतीत ट्रॅक्टर आल्यामुळे अस्वस्थ होतो. बैलाने शेती न करता ट्रक्टरने करावी हा परिवर्तनवादी, विज्ञानवादी विचार. बैलं गेले, बांधावरची झाडे तोडली तेंव्हा त्याचे मनोविश्व उध्वस्त होते. पण तो आश्रित आहे. आपण नवीन जीवन का जगू नये ? असे प्रश्न त्यांच्या मनात का उपस्थित होत नाहीत. तो सर्व बाबींचा डोळे झाकून स्वीकार करतो. याउलट दलित साहित्यात समतेला केंद्रस्थानी ठेवून असे अनेक प्रश्न उपस्थित करणाऱ्या नायक, नायिका दिसतात. हे स्पष्टीकरण नागानाथ कोत्तापल्ले यांनीचा दिले आहे. ते त्यांच्यात विद्रोही भावना निर्माण करू शकले नाहीत ?

**समस्याप्रधान दलित कादंबरी :**

ग्रामीण जीवनातील दलितांचे वास्तव चित्रण कथात्म साहित्यातून करण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ साठे यांनी केला. 'फकिरा' आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने सरस ठरलेली कादंबरी, महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कारप्राप्त कादंबरी आपल्या माणसांवर बेतलेली आहे. तिला सत्याचे बळ आहे. लोकसमज आणि ग्रामदैवतावरची श्रद्धा त्यात आहे. वाटेगावला जोगतिणी मिळाव्यात म्हणून मांग समाजातील शूरवीर नायक राणोजी स्वत:चे बलिदान देतो. आणि जोगतिणीचा मान गावातच राहावा म्हणून पुढे फकिरा जीवाचे रान करतो. यातूनच ग्रामीण दलित साहित्यांचा जवळचा संबंध दिसून येतो.

अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीतूनही चांभाराचे जीवन, त्यांची आर्थिक ओढाताण, नातेसंबंधातील चढउत्तार इत्यादी घटना धाडसी आणि लक्षणीय आहेत. गावातील सरंजामदार आणि शेतमजूर यांच्यातील संघर्ष, ग्रामीण राजकारणाचे वास्तव चित्रण तसेच गावाच्या वरच्या अंगाला असलेला तलाव प्रतिकात्मक संघर्ष घेतो.

दलित जीवन ग्रामीण जीवनात कसे मिसळले आहे, याचा सामाजिक दस्तावेज म्हणजे 'मेलेलं पाणी' ही कादंबरी होय.

विद्रोही कवी नामदेव ढसाळांची 'हाडवळा' ही कादंबरी ग्रामव्यवस्थेवर आसूड ओढणारी आहे. शीर्षकावरून ती ग्रामीण दलित जीवन व्यक्त करणारी वाटते हे विशेष. दलित साहित्याचे अध्वर्यू बाबुराव बागुल यांचा महत्वपूर्ण उल्लेख करणे आवश्यक आहे. कारण त्यांच्या कथा कादंबरीतील नायक नायिका ह्या विद्रोही तर आहेतच परंतु अस्तित्वासाठी संघर्ष करून त्यात यशस्वी होताना दिसतात. त्यांचा 'जेंव्हा मी चोरली होती' 'मरण स्वस्त होत आहे' हे कथासंग्रह म्हणजे दलित साहित्यातील मैलाचे दगड ठरलेले आहेत. त्यांची 'सूड' ही लघुकादंबरी स्त्रीत्वालाच नकार देते, पुरुषसत्ताक परंपरेला ठोकरते. अशी विद्रोही नायिका त्यांनी प्रथमच उभी केली आहे. शंकरराव खरात हे जसे 'तराळ अंतराळ' या आत्मकथानमुळे वाचकांच्या हृदयात घर करतात, तसेच त्यांच्या कथा-कादंबरीमुळेसुद्धा दलित जीवन हे ग्रामजीवनाशी कसे निगडीत आहे हे सुचवताना दिसतात. त्यांचा बारा बलुतेदार हा कथासंग्रह ग्रामीण जीवनातील बलुतेदारांच्या दुःखाचे चित्रण स्पष्ट करणारा आहे. समस्याप्रधान कथात्मक साहित्यात त्यांचा समावेश करावा लागतो. 'अलुते-बलुते' व्यवस्था आणि 'कारू नारू' संबंधाचे त्यांनी नेमकेपणाने वर्णन केले आहे. कारण त्यांना ग्रामीण वास्तवाची जाण होती.

दलित लेखकाची कथा किंवा कादंबरी ही एका व्यक्तीची कथा राहत नाही. ती कथा सर्व समाजाची कथा म्हणूच राहते. ती प्रातिनिधिक असते. हिंदू धर्मात व्यक्तीला तसे स्थानच नाही. दलित लेखकाच्या वाङ्मयात व्यक्तीचे दुःख ते समाजाचेच दुःख असते. इथे व्यक्ती म्हणजे समाज आणि समाज म्हणजे व्यक्ती असे समीकरण झालेले आहे. दुसरी गोष्ट दलितांचे दुःख व व्यक्ती अलग नाही. व्यक्ती म्हणजे दुःख व दुःख म्हणजे व्यक्ती, तसेच समाज व दुःख हे व्यक्ती अलग नाही. व्यक्ती म्हणजे समाज व समाज म्हणजे दुःख असेच हे नाते आहे. म्हणून दलित वाङ्मयात दुःखालाच व्यक्तित्व (personality) आलेले आहे. दुःख, वेदना व त्यांचे हे प्रश्न व्यक्तित्वात सामील झालेले आहेत. पांढरपेशी साहित्यापेक्षा मूलभूत असे वेगळेपण आहे.(५)

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आघाडीचे दलित लेखक योगिराज वाघमारे यांची ओळख त्यांच्या 'उद्रेक', कथेने होते. दलित तरूण शिक्षण घेतो, आंबेडकरांसारखे आपणाला जगता यावे म्हणून तीळ तीळ तुटतो परंतु ग्रामीण समाजाच्या रेटयामुळे त्याला चिपाडे उचलण्याचे काम करावे लागते. यात ग्रामीण जीवनातील बेगडीपणा लक्षात येतो. त्यांच्या 'सभापती' या कादंबरीतूनही ग्रामीण भागातील राजकारण, आरक्षणाची केलेली चेष्टा व्यक्त होते. तसेच समकालीन मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात आघाडीचे दलित नाटककार प्रा. दत्ता भगत यांचा उल्लेख करणे महत्वाचे आहे. त्यांच्या नाटकातील बरीचशी पात्रे ग्रामजीवनातील आहे. दलित मनाच्या जडणघडणीवर ग्रामीण वास्तवाचा परिणाम कसा

झालेला आहे, तो त्यांनी व्यक्त केलेला आहे.

समस्याप्रधान कांदबरीकार उत्तम बंडू तुपे सामाजिक भान असलेला लेखक, दुर्लक्षित घटकांना संवेदना प्राप्त करून देणारा कादंबरीकार म्हणून त्यांचे वर्णन करणे भाग पडते. त्यांची 'झुलवा' ही एक उत्कृष्ट समस्याप्रधान कादंबरी ठरते. एका तरूण जोगतिणीची-देवदासी जगाची शोधकथा काळजाला आग लावून जाणारी आहे. नैतिकतेच्या सर्व सीमारेषा मोडून टाकणारी पात्रे, नातेसंबंधाची मोडतोड करून अनैतिक संबंधाचे चित्रण मोठ्या प्रमाणात येत असले तरी ते समाजातील एक जळजळीत वास्तव आहे. त्याकडे डोळेझाक करून चालणार नाही.

'झुलवा' ही खऱ्या अर्थाने समस्याप्रधान कादंबरी आहे. कोणतीही समस्याप्रधान कादंबरी काही सामाजिक प्रश्न उपस्थित करीत असते. झुलवानेही काही मूलभूत असे प्रश्न उपस्थित केले आहेत. जगन ही झुलवातील मुख्य नायिका. जोगितिणीचा जन्म. जोगतिणीच्या नरक-यातनातून मुक्त होण्यासाठी ती सतत प्रयतशील. त्यानिमित्ताने काही प्रश्न तिच्या मनात निर्माण होतात. जसे ''आये, ज्या देवीसंगट तुझं लगीन झालं, देवीला तू अर्पण झाली, त्या देवीसंगट माझं बी लगीन लागणार? तसेच आये, जो तुझा न्हवरा, त्यो माझा हुणार, मायलेकीचा एक न्हवरा कसा, गं? जोगतिणीचे लग्न आधी यल्लमासोबत लावले जाते. यल्लमा मग प्रत्येकीचा नवरा कसा होऊ शकते? शिवाय सर्वांना आई आणि बाप असतात, मग आम्हांला केवळ आईच का असते? बापाचा पत्ता नसतो. असला तरी तो अधिकाराचा बाप नसतो. हा अन्याय जोगतिणीवरच का? जोगतिणीला पती नसतो. तरी तीला पोरं कशी होतात? यल्लमा ही देवी आहे तर तिच्या दासीच्या वाटयाला नरक-यातना का? यल्लमात जर खरोखरचं सतपण असतं तर तिनं आपल्या भक्तांना-जोगत्यांना कुबेर का केलं नाही? त्यांना ती नरक-यातना का भोगायला लावते? कोण हयाला जबाबदार? शेवटी किष्णापासून झालेल्या बाळाला आजारी पडल्यावर येलू यल्लमावर हवाला टाकण्यास सांगते, तेंव्हा जगन आपल्या मनातील संताप व्यक्त करताना म्हणतो तुझी यल्लमा घाल हागनदारीला ! आये, तिनं तर आपल्या जल्माचा नास केलाय. यल्लमावरची तिची श्रद्धा पार नाहीशी झाली. तिला जगण्याचा अर्थ कळला पण तिच्या आईची अंधश्रद्धा मात्र ती दूर करू शकली नाही. मुलीला आजारपणात दवाखाना आणि औषध पाहिजे, एवढे सोपे जीवन तिच्या आईच्या वाटयाला आलेले नसते. आय यल्लमा हीच तिच्या जीवनाचा आधार असते. कितीही वाईट वाटयाला आलं तरी हा आपल्या आयुष्याचच भोग आहे, ही तिची श्रद्धा असते. शेवटी कुठेतरी या श्रद्धेचा स्फोट होण्याची आवश्यकता असते. माणूस असून जर माणसासारखं वागायला, जगायला येत नसंल, तर काय रया हाय त्या जगण्याला? कुत्रीला रया हाय, ती जोगतिणीला न्हाय. जगाला तिच्या स्वतःच्या अस्मितेची पूर्ण जाणीव झालेली असते, तरी तिला तिच्या मनासारखं जगता येत नाही. शेवटी यल्लमाचा मुखोटा देव्हाऱ्यातून उचलून, नदीत फेकून देण्यापर्यंत तिची मानसिकता तयार होते. यल्लमाच्या प्रभावातून तरी मुक्त होऊ, या हेतूने तरी जीवनाला

सामोरे जाता येईल. जीवनाची स्वप्ने पूर्ण झाली नाहीत, पण जन्म जोगतिणीचा असला तरी आता या जोगतिणीच्या नरक-यातनांना जबाबदार असलेल्या यल्लमाची तरी आपल्या घरातून हकालपट्टी करावी, हा तिचा विचार जोगतिणीच्या समस्येवरील मूलभूत उपाय म्हणून समोर येतो. उत्तम बंडू तुपे यांनी झुलवामध्ये समस्या मांडली आणि समस्येवरचा उपायही सांगितला आहे. हेच झुलवाचे थोरपण आहे. (६)

नामदेव चं. कांबळे यांच्या 'राघववेळ', 'ऊनसावली' आणि 'सांजरंग' या कादंबऱ्या म्हणजे त्यांच्यातल्या चौफेर लेखकाचे लक्षण म्हणावे लागेल. डॉ. भालचंद्र फडके त्यांच्या 'राघववेळ' प्रस्तावनेत म्हणतात. कादंबरी ही माणसांची गोष्ट असते, खरे म्हटले तर ती प्रश्न पडलेल्या माणसांची गोष्ट असते. यातूनच कादंबरीतील समस्याप्रधानता सिद्ध होते. ते दलित कादंबरीच्या संदर्भात म्हणतात. दलित साहित्याच्या मागे फुले - आंबेडकरांची विचारधारा आहे. माणसाचे मोठेपण हे त्यांच्या अर्थपूर्ण जगण्यावर अवलंबून आहे. हे अर्थपूर्ण जगणे रघू आणि त्याचा समाज यांच्या वाट्याला कधीचा आलेले नाही. रघू हा शोषित वर्गाचा प्रतिनिधी आहे. पण आजच्या समाजव्यवस्थेत शोषितांचा लढा शोषणमुक्तीसाठी आहे. शोषणालाही अंत नाही आणि शोषण- मुक्त होण्यासाठी चाललेल्या संघर्षालाही अंत नाही. या संघर्षाचे चित्रण हा दलित कादंबरीचा आत्मा आहे.[७]

**समस्याप्रधान ग्रामीण कादंबरी :**

ग्रामीण साहित्यामध्ये कादंबरी हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय झाल्याचे दिसून येते. उद्धव शेळके यांच्या 'धग' पासून ते सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' पर्यंतचा ग्रामीण कादंबरीचा प्रवास समस्याप्रधानतेला महत्त्व देणारा आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे नेमके काय ? ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी लिहिलेले ? की हे सर्वच असाच आणखी एक प्रश्न 'खेडेगाव' तेथील जीवनपद्धती, तेथील अशा खास रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याचा प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या या साऱ्यांचा 'ग्रामीण ' या संज्ञेत अंतर्भाव केला जातो.[८]

आणि ही सर्व वैशिष्ट्ये वर्तमान कादंबरी वाङ्मयात दिसून येतात. आनंद यादव यांची 'गोतावळा' ह्या कादंबरीपासून साठोत्तरी ग्रामीण कांदबरीची खरी ओळख निर्माण होते. त्यानंतर रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' ही लक्षणीय कादंबरी आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या आणि शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा तसेच सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशोधडीला लागलेला शेतकरी, आडत्याकडून शेतमालाला अत्यल्प मिळणारा भाव, इत्यादीमुळे शेतकरी आत्महत्येचा मार्ग निवडतो. याचे वास्तव आणि भेदक चित्रण 'बारोमास' मध्ये आलेले आहे. राजा गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीचाही आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे. दलित-सवर्ण संघर्ष आणि ग्रामीण जीवन यांचा मेळ कादंबरीकाराने अतिशय संवदेशीलतेने घातला आहे. दलित ग्रामीण समाजाचे

राजकीय जीवन आणि त्यातला संघर्ष समस्याप्रधान आहे.

सारांश :

स्वातंत्र्योत्तर काळात खेडे वरवर बदललेले दिसते तर जुन्या प्रश्नांत आर्थिक परावलंबित्व, जातीयता, कर्जबाजारीपणा, शोषण, विषमता, इत्यादी प्रश्नांची भर पडली आहे. काही थोडे धनिक शेतकरी सोडले तरी मध्यम शेतकरी, अल्पभूधारक, शेतमजूर, छोटे-मोठे स्त्रिया आहे तिथंच आहेत. त्यांची सर्व प्रश्नांची झुंज चालू आहे. गावगाडा बदलला तरी तो शोषण, विषमतेच्या गाळात अधिक फसत चालला आहे. ग्रामजीवनाचे चित्र रंगविण्यासाठी काही लेखक पुढे आलेले दिसतात. विशेषत: १९६० नंतर ग्रामीण लेखकाला सामाजिक जाणिवेने लिहावे, असे वाटते. कथा कादंबरी, नाटक, कविता, इत्यादी वाङ्मयप्रकारात बदलत्या जाणिवेचो स्वरूप प्रत्ययास येते. ग्रामीण साहित्यातील नवी वळणे 'चाक मात्र फिरत ठेवा' असा आग्रह धरून लागली आहेत. ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य हे एकाच ग्रामातील अभिव्यक्ती असली तरी हया दोन वाङ्मयप्रकारात 'गाव आणि गावकूस' हयातील अंतर स्पष्ट जाणवते. ग्रामीण साहित्यात जातिव्यवस्थेविरुद्ध बंडाची भावना व्यक्त होत नाही. ग्रामीण लेखक मध्यवर्गीय जीवन स्वीकारून स्थितीशील बनू पाहत आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य मध्यवर्गीयांभोवती घोटाळत आहे. असे चित्र निर्माण होतांना दिसते. बदलती खेडी, बदलते समाजजीवन व नवे ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान हयांकडे डोळसपणे पाहण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. एकविसाव्या शतकातील खेडयाचे चित्र जरी पालटले तरी ग्रामसंस्कृती आणि कृषिसंस्कृती नष्ट होणार नाही. ग्रामीण लेखकाला हया बदलाचा आणि कृषी जीवनातल्या समग्र वास्तवाचा वेध घ्यावा लागणार आहे. (९) निष्कर्ष समस्याप्रधानता हा दलित ग्रामीण कादंबऱ्याचा गाभा असावा, हीच अपेक्षा.

**संदर्भटिपा :**


१) थोरात हरिश्चंद्र : कादंबरीविषयी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८ पृ.क्र.४.५

२) तत्रैव पृ.६६

३) भगत दत्ता : दलित साहित्य दिशा आणि दिशांतर, अभय प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती १९२२, पृ.क्र.४६.

४) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती १९८५, पृ.क्र.५४.

५) खरात शंकरराव : 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती' पृ.क्र.१२१.

६) डॉ.सानप किशोर : मराठी कादंबरीतील नैतिकता, बजाज पब्लिकेशन, अमरावती, प्रथमावृत्ती, १९९८, पृ.क्र.४३,४४.

७) तत्रैव पृ.क्र.१३१.

८) यादव आंद : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे तृतियावृत्ती १९९३, पृ.क्र.९

९) स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन प्रवाह : य.च.मु.वि.संपादित, पृ.क्र.४०.


* * *

# ग्रामीण दलित कांदबरीतील स्त्री चित्रण

**–डॉ. दिलीप अलोणे**

१९६० नंतर मराठी कादंबरीत जसा रुपबंधाच्या दृष्टीने बदल जाणवतो तसा तो आशय, जीवनदृष्टी आणि शैली याबाबतही जाणवतो. वाङ्मयीन संकेताविषयी बदलत्या वाङ्मयीन जाणिवांनी समकालीन सामाजिक–सांस्कृतिक संदर्भाचा वेध घेत जीवनविषयक नव्या आकलनाला प्रारंभ केला.

स्वातंत्र्यानंतर दीड दशकात सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा सर्वच क्षेत्रात झपाट्याने आधुनिकतावादी जाणीवांचा बदल होऊ लागला. त्याचे प्रतिबिंब साहित्यातही उमटू लागले. मराठी कादंबरीच्या कक्षा रुंदावू लागल्या. समाजाच्या विविध स्तरातून आलेले लेखक, त्यांनी अनुभवलेले सामाजिक वास्तव रेखाटू लागले. एक नवी जीवनदृष्टी या साहित्यात डोकावू लागली.सामाजिक समस्या, सामान्य माणसाचा जगण्यासाठी चाललेला संघर्ष, सामान्य माणसाचे दुःख, दारिद्रय, शोषण, लाचारी, अज्ञान अशी विविधांगी वास्तववादी आशयसुत्रे या कांदबऱ्यात निर्माण झाली. समकालीन वास्तवाचा एक मोठा पट वासुनाका, झेलझपाट, रानखळगी, धग, माणूस चौडकं, भंडारभोग, इस्कोट, धिंगाणा या कादंबऱ्यामधून नानाविध समाजस्तरांचे व समुहाचे चित्रण घडू लागले.

ग्रामीण कादंबरीच्या लेखनाचा कालखंड अभ्यासताना १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली 'बळीबा पाटील' ही मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी हे मान्य करुन हा प्रवास र. वा. दिघे, म. भा. भोसले, द. र. कवठेकर, श्रीराम अत्तरदे, विठ्ठल चिदंरकर ते ग. ल. ठोकळांच्या 'गावगुंड' या कादंबरीपर्यंत ग्रामीण जीवनाचे चित्रण करीत पुढे सरकली आहे. मात्र हे चित्रण त्रोटक व धूसर जाणवते. रंजकतेचाच विचार अधिक झाल्याने खेड्यातील भिषण वास्तवाकडे त्यातून दुर्लक्षच झाले आहे.

मात्र १९४५ नंतरचा काल आणि ग्रामीण कादंबरीसाठी परिवर्तनाचा काळ मानावा लागेल. या काळातील लेखकांचा कल जीवनाचे भेदक व वस्तुनिष्ठ चित्रण करण्याकडे असलेला दिसून येतो. तांबडी माती (१९४३) आणि पाणी (१९४८) बा. सी. मर्ढेकर, बळी (१९५०) विभावरी शिरुरकर या कांदबऱ्यांनी वेगळे अनुभवविश्व उकलले. विशेषतः विभावरी शिरुरकरांनी मांग–गारुड्यांचे जीवन या कादंबरीत शब्दबद्ध करतांना स्त्रीजीवनातील समस्यांचे चित्रण अधिक प्रभावीपणे करुन त्यांना सोसाव्या लागणाऱ्या भिषण दुःखाचे वास्तव पुढे आणले. याच काळात कोकणातील शेवंती या भाविणीच्या जीवनावरची 'भावीण' (१९५०) ही बा. भ. बोरकरांची कादंबरी प्रकाशीत झाली.

भावीण ही एक जमात असून त्यात स्त्री–पुरुष संबंधाची परिणती विवाहात होत

नाही. या कादंबरीतील शेवंतीला नाईलाजाने आपले शरीर होमावे लागते. शुध्द विचाराच्या, सात्विक, बुध्दिमान अशा शेवंताची ही शोकांतीका यात ठसठसून भरली आहे. यातील दुसरी स्त्री व्यक्तिरेखा फुलवंतीची. तारुण्याच्या काळात शक्य तेव्हढे सुख उपभोगावे व वृध्दापकाळाची तरतूद करुन ठेवावी ही तिचे तत्वज्ञान. जीवनाशय वेगळा असला तरी रंजकतेमूळे स्त्री समस्येचे आकलन प्रभावी ठरु शकले नाही. श्री. ना. पेंडसे (गारंबीचा बापू), गो. नी. दांडेकर (शितू), (पडघवली) (माचीवरला बुधा), व्यंकटेश मांडगूळकर (बनगरवाडी), अण्णाभाऊ साठे (फकिरा), १९५९ पर्यंत या कादंबऱ्यांनी वेगळा ठसा उमटविला. मात्र १९६० मध्ये प्रकाशीत झालेल्या अुध्दव शेळके यांच्या 'धग' या कादंबरीतून स्वतंत्रपणे आपल्या कुटूंबासाठी अखंड झुंजणाऱ्या जिद्दी, सोशिक अशा 'कौतिक' या अस्सल ग्रामीण स्त्रिची व्यक्तिरेखा आणि त्यातून तिची होणारी वाताहत स्पष्टपणे अधोरेखीत होते व अस्सल ग्रामीण जीवनाचे वास्तव उजागर होते. डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या मते 'धग' मधील कौतिकच्या संसाराची झालेली दैना म्हणजे विषम समाजव्यवस्थेचे नागडेपण क्रूर आणि हिंस्त्र करणाऱ्या यांत्रिक-औद्योगिक समाज व्यवस्थेने कष्टकरी ग्रामीण समाजावर केलेल्या अतिक्रमणाचेच प्रतिनिधीक स्वरुपातील चित्रण आहे. त्यानंतरच्या काळात रणजित देसाईची 'माझा गांव', शंकर पाटील यांची 'टारफुला', रा. र. बोराडे यांची 'पाचोळा', आनंद यादव यांची 'गोतावळा' या कादंबऱ्यांमधूनही १९६० नंतरच्या बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण अधोरेखीत होऊ लागले. ग्रामीण माणसाच्या मूलभूत जाणीवांचे चित्र त्यात उमटू लागले.

स्वातंत्र्यानंतर शिक्षण, प्रबोधन आणि फुले-आंबेडकरी विचारातून आलेल्या आत्मभानामुळे १९६० नंतर मराठी कादंबरीचे भावविश्व विविध प्रवाहांनी समृध्द होऊ लागले तसे ते १९८० च्या दशकात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी असे स्वतंत्र अस्तित्व घेऊन मुकर झाले. कारण महाराष्ट्र निर्मितीनंतर सुरु झालेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदलाने व विविध चळवळीने समाजमनाचे अनुभवविश्व अधिक गडद होत गेले. जीवनविश्वाची व्यापकता आणि ओढ, सामाजिक संघर्ष, दारिद्रय आणि सुखलोलूपता यात जीवनमुल्यांचा ऱ्हास होऊ लागला. समुहविश्वापेक्षा व्यक्तिगत जीवनाचे आकर्षण अधिक वाढले. त्या चिंतनातून पुढे आलेला तरुण लेखक वर्ग आपली बलस्थाने शोधू लागला होता.

१९८० नंतर ग्रामजीवन हळूहळू वेगळा आकार घेऊ लागले, १९९० च्या जागतिकीकरणाने, औद्योगिकरणाने, आधुनिकतावादाने ग्रामीण जीवनाचे कंबरडे मोडून काढले आणि एक बकालावस्था निर्माण होऊ लागली. हे सर्व परिणाम साहित्यातून दृगोचर होऊ लागले. आनंद यादव यांची झोंबी, रविन्द्र शोभणे (कोंडी), भीमराव वाघचौरे (रानखळगी), शेषराव मोरे (अस जगण मोलाचं) (धूळपेरणी), भारत काळे (ऐसे कुणबी भूपाळ), अशोक व्हटकर (बगाड), विश्वास पाटील (आंबी), गणेश आवटे (गणगोत)

या कादंबऱ्यांनी ग्रामीण वास्तव अधिक प्रभावीपणे मांडले. या कादंबऱ्यातील नायिकांना परिस्थितीला सामोरे जावे लागते तर कधी कुटूंबातील जाच सहन करावा लागतो तर कधी नवरा नपुंसक निघतो म्हणून दुसरा केला तर तो तिला परपुरुषाकडे घेऊन जातो, कधी सौंदर्यामुळे पुरुषांच्या वाईट नजरेचा बळी व्हावे लागते हे स्त्रि-जीवनाचे वास्तव चित्रण अनुभवायला येते.

स्त्री-पुरुष समानतेच्या काळातही आजची ग्रामीण स्त्री अतिशय हलाखीचे जीवन जगत असून तिच्या दर्जात फारसा फरक पडलेला नाही. अजूनही ती एक वस्तूच आहे याचे यथार्थ चित्रण प्रतिमा इंगोले या स्त्री-लेखिकेने 'बुढाई' या कादंबरीत केले आहे. दिवसभर कष्ट करुन रात्री ऐतखाऊ, आळशी व लिंगपिसाट नवऱ्याला सक्तीने स्त्रीला कशी साथ द्यावी लागते हे नायिकेच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते. 'धग' मधील कौतिकशी नाते सांगणारी नायिका 'आनंदी' ही कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' (२००७) या कादंबरीत पाहायला मिळते. बालवयापासून विधवा होईपर्यंतचा अतिशय कष्टदायी आणि दुर्देवी प्रवास आणि तिचे आयुष्याशी झुंजत राहणे खोतांनी उत्कटपणे मांडल्याचे दिसते.

एकूणच ग्रामीण मराठी कादंबरीने ग्रामीण स्त्रियांचे दुःख, दारिद्रय आणि स्त्रि म्हणून तिचे अपार कष्ट, तिच्या समस्या समर्थपणे मांडल्या आहेत. १९७७ मध्ये प्रकाशीत नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' या कादंबरीतून आपल्या मूलांना शिक्षण मिळावे म्हणून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीस तोंड देणारी 'वालंबी' मनाचा ठाव घेतल्यावाचून राहत नाही. इतर कादंबऱ्याच्या तुलनेत 'वालंबी' चे वेगळेपण जाणवते.

दक्षिण महाराष्ट्रातील देवदासी, जोगतिणी या अनिष्ट रुढी परंपराच्या अमानुष प्रथांना बळी पडणाऱ्या दुःखी आणि दूर्देवी स्त्रियांचा आत्मक्लेष उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा' (१९९६) तसेच राजन गवस यांच्या 'भंडारभोग' (१९८४) व चौंडकं (१९८५) या कांदबऱ्यातून प्रत्ययकारी स्वरुपात आला आहे. यातील स्त्रियांनी परंपरांचा धिक्कार केल्याचे दिसते.

नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीत झाडाझडती (१९९२), विश्वास पाटील 'बस्तान' (१९९७), मोहन पाटील 'एसई झेड' (२००७), शंकर सखाराम या कादंबऱ्यांनी समकालीन स्थितीगतीचे भान जपले असले तरी या कादंबऱ्यामधून समकालीन स्त्रि जाणीवांचा उहापोह प्रकर्षाने झालेला जाणवत नाही.

शेतकऱ्यांच्या आर्थिक विपन्नतेचे दर्शन घडविणारी बाबाराव मुसळे ह्याची 'हाल्या हाल्या दूध दे' (१९८५), भारतीय दारिद्रयावस्थेचे वर्णन करणारी माधव कोंडविलकरांची 'डाळ' (१९९६), शेती व्यवस्थेची भिषणता मांडणारी दिनकर चौधरी यांची 'बुइर्वागमन' (२००७), रा. र. बोराडे यांची 'चारापाणी' (१९८९), शेतकऱ्यांचे आत्मभान जागृत करणारी अशोक कौतूक कोळी यांची 'पाडा' (२००३) या ग्रामीण

कादंबऱ्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेचे व शेतीव्यवसायाचे विदारक चित्र रेखाटून ग्रामीण समाजघटकाला एका भयस्थितीच्या दारात आणून उभे केले असले तरी ग्रामीण जीवनाशी एकरुप असलेल्या ग्रामीण स्त्रियांचे चित्रण आशयघटकाची गरज म्हणून नव्हे तर सहज डोकावून जाणारे म्हणूनच अधोरेखीत झालेले दिसते. कादंबरीचे बलस्थान म्हणून स्त्रिपात्रें फारसे लक्ष वेधत नाहीत. सदानंद देशमुख यांची 'बारोमास' (२००३) ही या काळातील एक महत्वाची ग्रामीण कादंबरी म्हणून लक्षात राहते. जागतिकरणाच्या आवर्तात उध्वस्त होत असलेल्या शेती व्यवस्थेचे आणि समग्र ग्रामजीवनांचे जीवंत चित्रण यातून होत असले तरी यातील स्त्री व्यक्तिरेखांना फारसा न्याय लेखकाला देता आला नाही.

एकूणच ग्रामीण कादंबऱ्यानी बदलत्या ग्रामीण जनजीवनाचा वेध सहजपणे घेतला असला तरी ग्रामीण स्त्रियांच्या समकालीन समस्या प्रभाविपणे त्यातून प्रकट झालेल्या नाही. त्यांचे दारिद्रय, दुःख, पराधिनता, निरक्षरता, रुढी परंपरा या भावेतीय केंद्रिभूत झाल्या असून महीला सक्षमीकरणा सारखा प्रभावी विषय ग्रामीण कादंबऱ्यातून अजूनही डोकावला नाही् तशीत उध्दव शेळकेच्या 'कौतिक' सारखी व्यक्तिरेखा ग्रामीण कादंबरीपासून दूरच राहली असे म्हटल्यास वावगे ठरु नये. ग्रामीण स्त्री ही ग्रामीण व्यवस्थेचा भक्कम कणा असून बदलत्या वास्तवात तिचे बळकटीकरण ग्रामीण जीवनाचे आशादायी चित्र उभे करु शकेल हे नाकारता येणार नाही. ग्रामीण स्त्री लेखिकांचा अभाव हे त्याचे एक कारण असू शकते.

ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या समांतर १९६० नंतरच मराठी वाङमयात दलित साहित्य हा प्रवाह वाड़मयीन परिवर्तनाच्या दिशेने ठळकपणे पुढे आला. मराठी वाड़मयाच्या कक्षा व्यापक आणि समृध्द करीत दलित साहित्याने स्वतःचे वेगळेपण सिध्द केले. स्वातंत्र लढ्याने जो जीवनविषयक दृष्टीकोण निर्माण झाला तो दृष्टीकोण रुजावा म्हणून ज्या राज्यघटनेने आश्वासन दिले आणि ह्याचा जास्तीत जास्त लाभ ज्या दलित पददलित माणसाला होणार होता, तो पुरेसा संवेदनक्षम होताच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा मराठी साहित्याच्या निर्मितीवर सर्वार्थाने आणि अधिक प्रभावाने जो परिणाम झाला तो १९६० नंतरच दिसून येतो. अंधारात दडलेल्या अनुभवविश्वात दलित साहित्याने मोकळी वाट करुन दिली. जीवनाची बांधीलकी मानत या साहित्याने जीवनातल्या वास्तव प्रश्नांना सामोरे जात विद्रोह आणि नकाराचे जीवनवादी साहित्य पुढे आणले. समतेची आणि न्यायाची भूमिका तीव्रपणे प्रकट होऊ लागली. आत्मसन्मानाच्या जाणिवेतून आत्मशोध घेतल्या जाऊ लागला.

१९५० ते १९६० हा अण्णाभाऊ साठेच्या कादंबरीलेखनाचा कार्यकाळ आहे. 'वारणेच्या खोऱ्यात', 'फकिरा', 'माकडीचा माल', 'वारणेचा वाघ' आदि कादंबऱ्यांमधून अन्याय, जुलूमाच्या रगाड्यात सापडलेली माणसे सहनशिलतेचे बंध झुगारुन कसे बंड करतात यांचे दर्शन होते. १९५९ ते १९७० या काळात शंकरराव खरातांनी 'हातभट्टी',

'गावाचा टिनोपाल गुरुजी', 'पोतराज', 'माणुसकीची हाक' अश्या विपुल कादंबऱ्याचे लेखन केले. आर्थिक कोंडी, दारिद्रय, भ्रष्टाचार, बेईमानी हे विषय घेऊन सामाजिक वास्तवाची जाण त्यांनी तेवत ठेवली. खरातांच्या कादंबऱ्यातून दलित, उपेक्षित, पिडित, भटक्या अशा लोकांचे जीवनदर्शन घडते. 'सूड','अघोरी', 'पावश्या' अशा कादंबऱ्या बाबुराव बागुलांनी वाचकांना दिल्या. 'सूड' ही दीर्घकथा असली तरी आपल्या स्त्री लौकिकाच्या पातळीवर सूड घेऊ पाहणारी जानकी ही नायिका त्यांनी उभी केली. स्त्रीत्वाला संस्कृतीने कसलेच अभय दिलेले नाही. स्त्रीचे निराधार जीवन, कुठलीही नाती उपयोगाची नाहीत अश्या वेळी संस्कृतीच्या झगड्यात बंधनातून स्वतःला मुक्त करण्यासाठी वाट काढीत असणारी जानकी सूडाच्या माध्यमातून परत स्त्री-पुरुष नात्याच्या प्रकृतिसुंदर जगाशीच एकरुप होते याचे चित्रण बागुलांनी केले आहे. जानकी एक वेश्येची मुलगी, तिने धंदा करावा हा तिच्या आईचा आग्रह. केवळ मटनाच्या उधारीसाठी रसुलने तिला ठेऊन घेतले आणि तिच्यावर पाशवी लैंगिक अत्याचार सुरु केले. या अमानुष अत्याचारापासून सुटका करुन घेण्यासाठी ती पुरुषी वेष धारण करुन गुरुच्या शोधात फिरते आणि आपला खराखुरा आनंद गुरुला अर्पण करते. अश्याप्रकारे पारंपारिक संस्कृतीवर सुड उगविणाऱ्या जानकीचे चित्रण यातून व्यक्त होते. केशव मेश्राम, भीमसेन देठे, भि.शि. शिंदे, ना. ब. जाधव, अ. श्री. लोखंडे, मुरलीधर जाधव या लेखकांच्या कांदबऱ्यातून स्त्रि विषयक जाणीवा ठळकपणे अधोरेखित करता येत नाही मात्र बळवंत कांबळे ह्यांनी देवदासी स्त्रीच्या जीवनावर 'नापत' ही कादंबरी लिहली असून एकूण दलितांच्या जीवनाचे सामाजिक, आर्थिक दर्शन ही कादंबरी घडवून जाते. देवसासीकडे समाजाने दुर्लक्ष केले असले तरी आपला उध्दार आपणच केला पाहिजे या जिद्दीने पारु समोर येते आणि इनामदाराच्या विरुध्द पेटून उठते आणि देवदासी बरोबरच दलितांचे जीवनपरिवर्तन करु पाहते. दलित स्त्रियांचा हा हुंकार परिवर्तनाच्या वाटेने जाताना आढळून येतो. निशिकांत शेंडे, बंधूमाधव, हि.गो. बन्सोड,माधव कोंडविलकर, बा. स. हाटे, अशोक व्हटकर, हरिभाऊ पगारे, आदिच्या कांदबऱ्यांनी दलितांच्या चळवळीवर आधारित समाज जागृती आणि स्वाभिमानानी जीवन जगण्याची स्फूर्ती व सामाजिक जाणीवेचे भान लक्षात ठेऊन कादंबरी लेखन केल्याचे दिसून येते.

खेडवळ जीवनावर प्रकाश टाकणारी नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' ही वास्तववादी कादंबरी 'बायजा' या कर्तबगार स्त्रिला नायकत्व देते. उदरनिर्वाहासाठी नवरा सायब्या मुंबईला गेल्यावर ती मूलगा 'सावळा' सोबत नवरासोडून एकटी राहते. या परिस्थितीत तिच्यावर ओढवणाऱ्या प्रसंगाचे वर्णन लेखकाने केले आहे. हे करीत असतांना एक धैर्यवान स्त्री म्हणून तिचे व्यक्तिमत्व साकारले असले तरी समाज बदलविण्याचे धाडस मात्र तिच्यात नाही.

दि. रा. वाघमारे (कल्लोळ), विजय काळे (जागृती), योगेंद्र मेश्राम (माझा गाव

RIIC5

कुठाय ?) या कांदबऱ्यातील दलित समाजव्यवस्थेचे चित्रण पुरुषप्रधान असेच आहे.

दलित कादंबऱ्यांचा आवाका लक्षात घेता या कादंबऱ्यांमधून स्त्रियांचे वर्णन काही ठिकाणी अतिशय धैर्यशील दाखविले आहे. मात्र परिवर्तनाची धूरा सांभाळण्यासाठी ती असमर्थ आहे. दलित कादंबरीतील स्त्रिपात्रे आई म्हणून सोशिक, कर्तबगार, पुजनिय, वंदनीय आहेत परंतू दलित साहित्याला अपेक्षित असलेली नव्या युगाच्या वाटचालीचे नेतृत्व करणारी धुरंधर, स्वकतृत्ववान स्त्रि ठळकपणे अजूनही अधोरेखीत होऊ शकली नाही.

दलित स्त्रियांचे वर्णन निश्चितच विद्रोही प्रवृत्तीचे आहे परंतू नकार व परिवर्तनाच्या दिशेने तिचे पाऊल पडणे वाङमयीन परिवर्तनाच्या या टप्प्यावर ते अधिक प्रभाविपणे मांडले जाण्याची आवश्यकता आहे.

ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्रि चित्रण या विषयाच्या अनुषंगाने तौलनिक अभ्यास करताना ग्रामीण कादंबरीतील स्त्रि अजूनही रुढीवादी, परंपरावादी, अज्ञान आणि अंधश्रध्देच्या घुसमटीत चिरंतन जळणारी, हलाकीच्या परिस्थितीत सोशिकपणे तक्रार न करता जीवन जगणारी आणि अद्यापही 'स्व' चा सूर न गवसलेली रेखाटल्याचे दिसून येते. तिचा संघर्ष अजून्ही सुरुच आहे पण तिला अजूनही स्वतंत्र अस्तित्व गवसले आहे असे आशादायी चित्र आढळत नाही मात्र दलित कादंबरी ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचार प्रभावाने प्रभावित आहे त्यातील स्त्रि सोशिक असली तरी परंपरेचे जोखड, अन्याय, अत्याचार याची तिला जाणीव झाली असून दलितांच्या उध्दारासाठी शिक्षण हेच माध्यम आहे हे ओळखून नव्या पिढीस शिक्षित आणि सुसंस्कारीत करण्यासाठी ती जीवाचा आटापिटा करीत आहे. तिला तिच्या अस्तित्वाची ओळख पटली असून ती विद्रोहाच्या वाटेने वाटचाल करीत आहे. आत्मभान जागृत झाले आहे आता परिवर्तनाचे मूलाधार तेवढे तिला व्हायचे आहे.

22 APR 2024

संदर्भ –

१) ग्रामीण साहित्य – चिंतन आणि चर्चा / डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद
२) मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल/ डॉ. सुशीला ढगे, सुगावा प्रकाशन, पुणे.
३) मराठी कादंबरी : प्रवाह व समीक्षा, संपादीत – डॉ. प्रल्हाद वावरे, प्रा. अभय जोशी नभ प्रकाशन, अमरावती.
४) स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल / डॉ. शंकर विभुते, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
५) ग्रामीण साहित्य – प्रेरणा आणि प्रयोजन / डॉ. श्रीराम गुंदेकर, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
६) ग्रामीण समाजजीवन व साहित्य / डॉ. गणेश देशमुख, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

* * *

स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रस्थापित मराठी साहित्यात अनेकविध प्रवाह निर्माण झाले. उदा.दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, नागर साहित्य, देशी साहित्य, जनसाहित्य, वसाहतवादी साहित्य इ. या सर्व साहित्य प्रवाहांनी प्रस्थापित मराठी साहित्याला आलेली मरगळ आणि साचलेपण नष्ट करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली. या सर्व साहित्य प्रवाहामध्ये पुरोगामी, परिवर्तनशील आणि माणुसकी हे मूल्य शिरोधार्य मानणारे जर कोणते प्रवाह असतील तर ते दलित आणि ग्रामीण साहित्याचे होत. ग्रामीण आणि दलित या दोन संज्ञा आज साहित्य विश्वात स्थिर झालेल्या आहेत.

ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य या दोन्हीं साहित्यांचा मूळ विषय आहे शोषणाधिष्ठित माणूस या शोषणाधिष्ठित माणसाला शोषणमुक्त करणे. त्याला नवा अवकाश उपलब्ध करून देणे होय. शोषणविरहित समाजाची निर्मिती करणे होय. माणुसकी हे मूल्य ग्रामीण आणि दलित हे दोन्ही साहित्यप्रवाह शिरोधार्य मानतात. स्वातंत्र्य–समता–बंधुभाव या त्रयीवर या प्रवाहांची नितांत श्रद्धा आहे. प्रस्तुत ग्रंथात दलित आणि ग्रामीण कादंबरीचा तुलनात्मक विचार मांडला असून ग्रामीण आणि दलित कादंबरीची मूळ प्रेरणा शोषण विरहित समाजाची निर्मिती करणे हीच आहे. 'मराठी दलित ग्रामीण कादंबरी' तुलना हा ग्रंथ रसिक वाचकांना मोलाचा व मार्गदर्शक ठरेल असाच आहे.

शशिकांत साळवे

